आंतरभारतीय पुस्तकमाला

लाटांचा आवाज

'कल्कि' रा. कृष्णमूर्ति

अनुवादक

म. ना. लोही

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

नवी दिल्ली

डिसेंबर 1973 (मार्गशीर्ष 1895)

© कि. राजेन्द्रन्, 1972

रु. 9.75

Original Title : Alai Osai (Tamil)
Marathi Translation : Latancha Awaz

वितरक
पॉप्युलर प्रकाशन
35–सी, ताडदेव रोड, मुंबई–34, डब्ल्यू. बी.

प्रकाशक : संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया ए–5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली 16.
मुद्रक : मु. शं. किर्लोस्कर, किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकरनगर, पुणे 411 009

भूमिका

'लाटांचा आवाज' ही कादंबरी तामीळ भाषेत लिहिलेली असली तरी ती केवळ तामीळ प्रदेशाचीच आहे असं म्हणता येणार नाही. भारतातील प्रमुख शहरं ही तिच्यातील घटनास्थळं आहेत. म्हणून ती संपूर्ण भारताची कादंबरी म्हणणं उचित ठरेल.

दक्षिणेतील राजमपेट्टे गावापासून थेट उत्तरेपर्यंत तिच्यातील पात्रे संचार करतात. तरीही कथानकाची साखळी कुठेही खंडित झालेली नाही.

उत्तर आणि दक्षिण ही भारताची अभिन्न अंगे आहेत, याचं विवेचन प्रस्तुत कादंबरीतून केलेलं आहे. या कादंबरीत निरनिराळ्या प्रांतातील वेगवेगळ्या भाषा बोलणारी पात्रं येतात आणि आपापली हृदयं उघडी करून भावनिक एकता प्रस्थापित करतात.

कै. 'कल्कि' यांनी प्रस्तुत कादंबरीची रचना अभिनव पद्धतीनं केली आहे. लेखकानं कथेचा नायक व खलनायक एकाच व्यक्तीत एकवटून वाचकांना अशा संभ्रमात टाकलं आहे की, त्या पात्राविषयी सहानुभूती दाखवावी की त्याच्यावर राग काढावा याचा निर्णयच घेता येत नाही. अशा किती तरी प्रयोगांचा या कादंबरीत समावेश करण्यात आला आहे.

या कादंबरीचं आणखी एक वैशिष्टच असं की, राष्ट्रीय इतिहासातील किती तरी प्रमुख अंगांचं विकसन तिच्या पार्श्वभूमीत दिसून येतं. त्या दृष्टीनं विचार केल्यास ही ऐतिहासिक कादंबरी ठरेल.

महात्मा गांधींच्या संमोहनशक्तीनं आपल्या देशातील जनतेची मनं स्वातंत्र्य-संग्रामरूपी त्याग-यज्ञाकडे कशा रीतीनं आकर्षित करून घेतली होती याची थोडीफार कल्पना आजच्या तरुण- तरुणींना या कादंबरीवरून येईल. आपल्या सर्व साहित्यकृतीत समाजमनावर अधिक काळ स्थानापन्न होण्याची क्षमता याच कादंबरीत आहे, असं स्वतः कल्कींचं मत होतं. कोणत्याही भाषेतील वाचक ही कादंबरी वाचून सहज आत्मसात करू शकतात. हे सांगण्याचा हेतू एवढाच की, भाषांतरानं या कादंबरीची रोचकता कमी होणार नाही.

'अलई ओसई,' म्हणजेच 'लाटांचा आवाज.' या कादंबरीला लेखकानं स्वतःच लिहिलेल्या प्रस्तावनेतून काही भाग उद्धृत करणं अप्रयोजक ठरणार नाही. शिवाय त्याच्या विनोदी लेखनशैलीचा नमुनाही पाहावयास मिळेल.

पुस्तकाच्या सामर्थ्याबद्दल पूर्वसुरींनी बरंच काही सांगितलं आहे. 'पुस्तकं हस्तभूषणम्' ही उक्ती चांगलीच प्रचलित आहे. कपाटाची शोभा वाढविण्यात तर त्याची बरोबरी कोणीच करीत नाही. अनुभवानं आणि चिकित्सा पद्धतीमधील संशोधनानं असं दिसून आलं की, निद्रानाशाच्या रोगावर पुस्तकासारखं अचूक गुणकारी औषध दुसरं नाही.

काही लोकांची झोप चहा-कॉफी प्याल्यानं उडून जाते असं म्हणतात. पण ते पुस्तक हाती घेतील तर निद्रादेवी त्यांच्या गळयात येऊन पडेल. पुस्तकाच्या महिम्यासंबंधी आणखी काय सांगावं!

पुस्तकं मिळविण्याचे साधारणतः तीन मार्ग प्रचलित असल्याचं सांगतात. याचना करणं, उधार नेणं आणि चोरी करणं; याव्यतिरिक्त एक चौथा मार्ग म्हणजे पैसे मोजून विकत घेणं. आपल्यापैकी काही लोकांना आगगाडीच्या प्रवासात निरुपायानं या चौथ्या मार्गाचा अवलंब करावा लागतो.

आगगाडीच्या प्रवासात पुष्कळ लोकांना चांगली झोप लागत नाही. येत असलेली झोप गाडीच्या धक्क्यांनी उडून जाते. साहजिकच हातात पुस्तक असलं तर वेळ बरा जाईल असा विचार मनात येतो. अशा रीतीनं रेल्वे ग्रंथवाचनाच्या विकासाला अप्रत्यक्षपणे हातभार लावते. मोठमोठ्या रेल्वे स्टेशनांवर पुस्तकांची दुकानं दिसतात याचंही कारण हेच होय. पुस्तकं मिळवण्याचे अन्य तिन्ही मार्ग रेल्वे प्रवासात कामास येत नाहीत. म्हणून चौथा मार्ग पत्कारावाच लागतो.

एकदा रेल्वे प्रवासात माझ्यावरही असा प्रसंग आला. 'झोप तर येत नाही. एखादं पुस्तक तरी वाचावं,' अशा विचारानं त्रिचिरापल्ली जंक्शनवर बुकस्टॉलमध्ये एक पुस्तक विकत घ्यायला गेलो. सर्व पुस्तकांवरून दृष्टी फिरविली आणि एक सुंदर तीनरंगी मुखपृष्ठाचं पुस्तक निवडलं. विख्यात लेखक वुडहाउस यांचं होतं ते पुस्तक. वुडहाउस तर विनोदी लेखकांत अग्रगण्य. इंग्रजांच्या जीवनपद्धतीवर, बोलण्याच्या लकबींवर उपहास–विरोधाची पुटं चढवून लिहिण्यात व वाचकांच्या हसून मुरकुंड्या वळविण्यात ते पटाईत आहेत. काही नमुनेदार पात्रांची निर्मिती करून कथामालिका गुंफणं हे त्याचं वैशिष्टच. मी विचार केला, 'हसू तरी येईल नाहीतर झोप तरी येईल!' पावणेसहा रुपये मोजून तीनशे पृष्ठांचं

पुस्तक विकत घेतलं आणि डब्यात आपल्या जागेवर येऊन बसलो. या 'पुस्तकाच्या सत्तावीस लक्ष तीस हजार प्रती आजवर विकल्या गेल्या' असं मुखपृष्ठावरच लिहिलेलं होतं. 'पैसे मोजून पुस्तक वाचणारांची संख्या एवढी आहे तर अन्य तीन मार्गांनी वाचणारे किती असतील ? इंग्रजीतून लेखन करणारे खरेच भाग्यवान आहेत!'– त्यांच्या भाग्याचं नवल करीत मी ते पुस्तक वाचू लागलो.

पुस्तक वाचायला आरंभ करताच एक शंका मनाला चाटून गेली. एक परिच्छेद वाचताच ती शंका वाढली आणि एक पृष्ठ संपवून दुसरं वाचू लागताच ती शंका फिटलीच! 'अरे, यापूर्वीच आपण हे पुस्तक वाचलंय! पुन्हा पैसे खर्च करून आपण मूर्खपणा केलाय. उगीच पावणे सहा रुपये वाया घालविले.' असं मनाशी पुटपुटत मी ते पुस्तक खाली आदळलं. बिचारं पुस्तक! त्याचा काय दोष! पुस्तक वाचून मी हसायचं तर उलट तेच माझ्याकडे बघून हसत होतं. नुसतंच हसत नव्हतं तर माझ्याशी बोलू पण लागलं होतं. 'अरे बाबा, तू मला खाली का आदळलंस? तूही लेखकच आहेस ना? चुकून तुझं पुस्तक विकत घेणारे ते असंच आपटणार नाहीत का ?'

या विचारात उरलीसुरली झोप पार पळाली. आता वेळ कसा जाणार असा प्रश्न पडला. मी आपली बॅग उघडली. आतले कपडे बाहेर काढून ठेवले अन् वेळ जायला काही साधन सापडतं का हे शोधू लागलो. बॅगमध्ये अगदी तळाशी कंबरामायणाची एक प्रत मिळाली. ती काढून कंबराची कविता वाचू लागलो. आता वेळ भराभर जात होता तरी मला त्याचं भान नव्हतं.

हजार वर्षांपूर्वी कंबर कवीनं त्या ग्रंथाची रचना केली. मी तर शेकडो वेळा वाचलं, ऐकलं. तरीही मला कंबराची कविता शिळी वाटली नाही. पुस्तक खाली ठेवायची इच्छा झाली नाही. प्रत्येक वाचनाच्या वेळी ताजेपणा अन् नावीन्यच आढळलं.

प्राचीन काळातील द्रष्टयांच्या अमर महाकाव्यांत आणि अर्वाचीन युगातील साहित्यिकांच्या सकाळी उमलून सायंकाळी कोमेजणाऱ्या ग्रंथात असलेलं अंतर मला चांगल्या रीतीनं कळून आलं.

कंबर कवीच्या पुण्यतिथीनिमित्त भरविण्यात आलेल्या एका संमेलनात मी या गोष्टीचा उल्लेख केला होता. उत्तरेतील तुलसीदासाच्या हिंदी रामायणाप्रमाणेच महाकवी कंबरांनी तामीळ भाषेतून रामायणाची रचना केली. सभा

संपल्यावर श्रोत्यांमधून एक गृहस्थ माझ्याजवळ आले नि म्हणाले, "अहो महाशय, तुम्ही तर आम्हा सर्वांना मूर्खाची पदवी दिलीत!"

"छे छे! मला तर असं काही केल्याचं स्मरत नाही. अहो, पदवी देण्याचं काम विश्वविद्यालयाचं. मी असं धाडस कसं बरं करेन?"

"तसं नव्हे हो! माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की, आम्ही आपली पुस्तकं वाचतो अन् चौकसपणे ती जपूनसुद्धा ठेवतो. काही पुस्तकं तर आम्ही तीन तीन चार चारदा वाचलेली आहेत. अशा परिस्थितीत आपण आपली पुस्तकं एकदा वाचून रद्दीत फेकून देण्यायोग्य कशी ठरवलीत?"

"विनय व्यक्त करण्यासाठी मी तसं म्हणालो. आपण तिकडे लक्ष देऊ नका. भविष्याचं काय ते कुणास ठाऊक? बल्लवर आणि कंबर यांनी ग्रंथरचना करताना आपले ग्रंथ हजारो वर्षांनीसुद्धा वाचले जातील याची कल्पना तरी केली असेल का? नाहीच! शेक्सपियरला तर रंगभूमीवर प्रयोग करण्यासाठी सारखी नाटकं लागत होती. म्हणून त्यानं घाईघाईत नवीनवी नाटकं लिहिली. साऱ्या जगात त्या नाटकांचा असा काही प्रसार झाला की, त्यांना व त्याला चिरकालिकता प्राप्त झाली. उलट बर्नार्ड शॉचं उदाहरण घ्या. तो स्वतःला शेक्सपियरहून श्रेष्ठ मानायचा. पण त्याच्या मृत्यूनंतर त्याचं विस्मरण झालं. त्याचं राहातं घर विकत घेऊन स्मारक बनवण्याचा प्रयत्न झाला. पण जनतेनं आश्रय न दिल्यानं तो सोडून द्यावा लागला. म्हणजेच साहित्यिकाच्या हयातीत त्याचं योग्य मूल्यमापन होत नाही, म्हणून मी तसं बोललो."

"तरीही असं सांगा की, आपल्या हयातीनंतर आपलं नाव टिकून राहील अशी एखादी साहित्यकृती काहे का? निदान पन्नास किंवा शंभर वर्षं टिकून राहण्याची पात्रता कोणत्या तरी कलाकृतीत आहे?" त्यांनी विचारलं.

"आपल्या या प्रश्नाचं उत्तर देणं मला आताच कसं शक्य आहे? शंभर वर्षांनी याल तर काही उत्तर देता येईल!" मी म्हणालो.

त्या मित्राच्या प्रश्नाचं उत्तर देण्याची टाळाटाळ केली खरी, पण त्यांचा तो प्रश्न डोक्याला त्रास देत राहिला; मनात सलत राहिला. जेव्हा मी एखादी कथा किंवा कादंबरी लिहायला घेई तेव्हा मनात विचार उठे की, ही रचना वाचकांच्या मनात किती काळ टिकेल, किती वेळा वाचण्यायोग्य ठरेल? मग लिहायला मन धजेना, त्या समस्येनं माझ्या मनात खळबळ उडवून दिली होती.

'कावळ्यालाही आपलं पिलू सोनेरीच वाटतं,' अशी तामीळ भाषेत

म्हण आहे. आपल्या मुलाला का कोणी नावं ठेवतं, असा वाद घालता येईलही. पण कावळ्याला मी मूर्ख पक्षी समजत नाही. श्यामल वर्णाच्या आपल्या फुलासारख्या प्रिय पिलापेक्षा सोनेरी रंगाला तो महत्त्व देईल हे मानायला माझी तयारी नाही. मी तर म्हणेन की मनुष्य ह्याच चुकीचे मूल्यमापन करणारा प्राणी आहे. मनुष्यसुद्धा सोन्यानंतरचं स्थान आपल्या अपत्यालाच देतो. सृष्टीतील प्राण्यांना आपापली निर्मिती श्रेष्ठ वाटणं स्वाभाविक आहे हेच वरील म्हणीवरून स्पष्ट होतं आणि तसाच निष्कर्षही निघतो.

हा निकर्ष ग्रंथकारांना कितपत लागू पडेल हे सांगता येत नाही. प्रत्येक वेळी ग्रंथलेखन करताना तीच साहित्यकृती आपली सर्वश्रेष्ठ रचना वाटण्याचा संभव असतो. पण काही काळ लोटल्यानंतर साहित्यिक स्वतःचेच पुस्तक वाचील तर तीच धारणा कायम राहील की नाही, कोण जाणे ?

सर्वांप्रमाणेच साहित्यिकही दिवसेंदिवस विकसित होत असतो. शारीरिक विकास थांबला तरी मानसिक आणि बौद्धिक विकास होत राहणं स्वाभाविक आहे. त्यामुळे कोणीही साहित्यिक आपली सात-आठ वर्षांपूर्वी लिहिलेली साहित्यकृती वाचून पाहील तर तिच्यातील दोष त्याला दिसल्याशिवाय राहणार नाहीत. 'अरेरे ! मी हे काय वायफळ लिहिलं ! ' अशा विचारानं तो पश्चात्ताप करू लागला तर काही नवल नाही. मलाही असे कितीतरी अनुभव आले आहेत. अशा वेळी मी मनाला दिलासा दिला की, तो काळ वेगळा होता म्हणून ही कथा रटाळ पद्धतीनं लिहिली गेली. आज लिहिली असती तर वेगळ्या शैलीत लिहिली असती.

कधीकधी असंही वाटे की, या पुस्तकाची दुसरी आवृत्ती नाही निघाली तर बरंच होईल.

आधीच माझ्या मनात अशा विचारांनी ठाण मांडून ठेवलं होतं. मित्राच्या त्या प्रश्नानं आणखीच विचारमंथन सुरू झालं. मी मोठ्या पेचात पडलो.

'लाटांचा आवाज' या कादंबरीनं त्या पेचातून सुटका केली.

ही कादंबरी प्रथम 'कल्कि' पत्रातून क्रमशः हप्त्यानं प्रसिद्ध झाली. पत्रिकेत ती छापून संपल्यावर प्रसिद्ध करण्यासाठी मी ती पुन्हा वाचून काढली तेव्हा मला माझ्या मित्राच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं. आपल्या सर्व साहित्यकृती-मध्ये शेपन्नास वर्षं टिकून राहण्याची योग्यता जर कोणत्या कृतीत असेल तर

ती 'अलइं ओसई' म्हणजेच 'लाटांचा आवाज' या कादंबरीत आहे, असा एक विचार मनात तरळून गेला.

खरंच सांगायचं तर 'लाटांचा आवाज' ही कादंबरी मी कुठं लिहिली ? ती लिहिली, ललितेनं नि सीतेनं, तारिणीनं अन् सूर्यानं, सुंदर राघवन् आणि पट्टाभिरामन् यांनी परस्परांना भेटून, विचारविनिमय करून, आपल्या अंतःकरणातील आशा–अभिलाषा, हृदयातील हर्षामर्ष त्यांनी प्रकट केले आहेत, मला तरी ती काल्पनिक पात्रं वाटत नाहीत. वाटतं की त्यांनी आपल्याप्रमाणेच जन्म घेतला असून ती जीवनातील सुखदुःखं भोगतायत. सीता तेवढी कस्तुरबाच्या शोधात निघून गेली. इतर सर्व अजून जिवंत आहेत. कोण जाणे त्यांची भेट केव्हा व कुठं होईल ! ''

ही कादंबरी लिहिण्यापूर्वी कै. कल्कि यांनी कादंबरीत अंतर्भूत केलेल्या सर्वच स्थळांची भ्रमंती केली. नवी दिल्ली, पानिपत, कर्नाल, कुरुक्षेत्र इत्यादी ठिकाणी स्वतः जाऊन पंजाबातून आलेल्या निर्वासितांची दयनीय अवस्था नीट अवलोकन केली.

त्यांनी जेवढ्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या तेवढ्यांचं लेखन करण्यापूर्वी कथानकाशी संबंधित सर्व स्थळं त्यांनी स्वत: बघितली होती. त्यामुळे त्या कादंबऱ्यांतील स्थल-वर्णनात काल्पनिक भाग किती आणि ऐतिहासिक भाग किती हे सहजपणे वाचकांना ठरवता येत नाही. सत्य आणि कल्पना या दोन्हींचा समन्वय करून ते अशा पद्धतीनं लिहितात की, इतिहास संशोधन करणाऱ्या विद्वानांनाही लेखनात दोष काढता येत नाही.

'लाटांचा आवाज' या मूळ कादंबरीचा संक्षेप करताना कितीतरी भाग कापायची इच्छा होत नव्हती. मनात यायचं, हा रोचक प्रसंग कसा बरं काढायचा ? शेवटी अनुवादाची मर्यादा दृष्टीपुढं ठेवून निरुपायानं बरेच सुरस संवाद काढून टाकावे लागले.

इथं मी एक गोष्ट सांगू इच्छिते. 'लाटांचा आवाज' ही कादंबरी रशियन भाषेत जशीच्या तशी अनुवादित झाली असून तिच्या बऱ्याच आवृत्त्या निघाल्या आणि लक्षावधी प्रती विकल्या गेल्या. या कादंबरीला साहित्य अॅकेडमीचं पारितोषकही मिळालं आहे.

कादंबरीच्या लेखकाची जीवनकथा संक्षेपानं अशी आहे :

'कल्कि' या टोपण नावानं विख्यात असलेल्या या लेखकाचं मूळ नाव

रा. कृष्णमूर्ती. तामिळनाडू प्रांतातील तंजावर जिल्ह्यात पुत्तमंडालम् या गावी इ. स. १८९९ मध्ये एका सामान्य मध्यमवर्गीय कुटंबात त्यांचा जन्म झाला.

कॉलेजच्या पहिल्या वर्षात शिकत असतानाच त्यांनी असहकाराच्या चळवळीत भाग घेतला. कारावास भोगला. त्यानंतर देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय भाग घेऊन तीनदा तुरुंगवास भोगला. कै. राजगोपालाचारी यांना ते आपले राजकीय गुरू मानीत. त्याकाळी राजाजी तिरुचेंकोड येथे जो गांधी आश्रम चालवीत त्याची जबाबदारी उचलून 'कल्कि' समाजसेवेला लागले. गांधी आश्रमाद्वारे तेव्हा 'विमोचनम्' या नावाचं एक पत्र मद्य-निषेधाच्या प्रचारासाठी काढलं जात होतं. त्यातून 'कल्कि' लिहीत असत.

१९२३ साली 'तमिल तेन्ड्रल' या नावाने विख्यात असलेल्या श्री. कल्याण सुंदर मुदलियार यांच्या 'नवशक्ती' पत्रात ते सहसंपादक म्हणून लागले आणि प्रगती करीत पट्टीचे लेखक बनले.

कल्याण सुंदर मुदलियार यांच्याविषयी अपार प्रेम आणि कमालीचा आदर असल्यानं त्यांच्या नावातील पहिली दोन अक्षरं आणि आपल्या नावातील आद्याक्षर घेऊन त्यांनी 'कल्कि' हे टोपण नाव घेतलं.

'कल्कि' आणि 'आनंद विकटन'ही तामिळनाडूची दोन सुप्रसिद्ध वृत्तपत्रे होत. कै. कृष्णमूर्ती त्या दोन्ही पत्रांचे यशस्वी संपादक राहिले आहेत. 'कल्कि' या नावाखेरीज 'कर्नाटकम्', 'इशैत्तेनी', 'लांगूलन्', 'अगस्तिमन', 'राकी', 'यमन्', 'विवसाई', 'पेट्रोन' इत्यादि कितीतरी टोपण नावांनी रसिक वाचक त्यांना ओळखतात. राजकारण, संगीत, प्रवासवर्णने, कथा, विनोदी लेख, सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्या आदी सर्वच वाङ्मय प्रकार हाताळण्यात खरोखरीच त्यांच्या लेखणीनं कमाल केली आहे. आजकाल तामिळनाडूच्या लेखन क्षेत्रात जी नवजागृती दिसून येते तिच्या मुळाशी त्यांचा हात आहे असं म्हणणं अतिशयोक्त ठरू नये.

कल्कींच्या समाजसेवेचाही तामिळनाडूला चांगलाच परिचय आहे. विशेषतः एट्टयपुरम्मधील महाकवी भारती यांचा स्मृतिमंडप आणि मद्रासच्या गिंडी भागातील गांधीमंडप ह्या दोन्ही वास्तू त्यांच्या समाजकार्याच्या परिचयादाखल दाखविता येतील.

त्यांच्या ग्रंथसंभारातील वाचकप्रिय कादंबऱ्या म्हणजे 'पार्थिवाचं स्वप्न', 'शिवकामीची शपथ', 'त्यागभूमी', 'चोराची प्रेयसी' इत्यादी. 'पार्थिवाचं

स्वप्नं', 'चोराची प्रेयसी' आणि 'शोलई मलईची राजकन्या' या कादंबऱ्यांचे अनुवाद हिंदीतून प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय कितीतरी कथासंग्रह, प्रवास वर्णनं आणि संगीतावरील लेखसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. ते कवीदेखील होते त्यांनी कित्येक सुंदर पदे रचली आहेत.

त्यांची एक कथा 'पुलिराज' जर्मन भाषेत अनुवादित झाली असून याच नावानं एका कथासंग्रहात समाविष्ट करण्यात आली आहे. 'मोहिनीद्वीप' या नावाच्या दीर्घकथेला 'नेहरू अभिनंदन ग्रंथात' स्थान मिळालं आहे.

अशा रीतीनं यशाच्या अत्युच्च शिखरावर असतानाच १९५४ साली त्यांचं निधन झालं. राजाजींच्या शब्दांत सांगायचं तर पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे देदीप्यमान राहूनच ते लुप्त झाले.

कल्कींच्या लेखनांची कितीतरी प्रमुख व्यक्तींनी अनेक प्रकारे प्रशंसा केली आहे. त्यापैकी काहींचं अवलोकन केलं तर त्यांनी आपल्या लेखणीनं भिन्न भिन्न क्षेत्रातील व्यक्तींना कसं प्रसन्न केलं याची कल्पना येईल.

'कल्कींची गद्यशैली तर पिकलेलं केळ आहे. कुणीही तोडावं नि खावं, मौज लुटावी आणि गोडी चाखावी!' —हे वचन आहे राजाजींचं.

तामीळ भाषेत सुप्रसिद्ध गांधीवादी कवी नागकुल श्री. रामलिंगम् पिल्ले म्हणतात, 'लेखकाच्या व्यवसायात आपल्या प्रयत्नांपेक्षा अधिक सफलता मिळविणारे कल्कीच होत.'

'कल्कि हे एक आकर्षण केंद्र आहे. त्याची शक्ती लेखक-मंडळीत नेहमी सुस्थिर आणि चिरकालिक राहील.'—असं आनंद विकटनचे संपादक आणि कल्कीचे सहकारी कै. देवन यांच मत होतं.

'लेखनकलेशी अपरिचित नवशिक्याला प्रोत्साहन देऊन लेखनक्षेत्रात नामवंत करून सोडण्याची क्षमता कल्कींच्या ठिकाणी आहे'— एक लेखक.

'कल्की यांनी आपल्या लेखणीनं कर्नाटक संगीताची अपार सेवा केली, —कर्नाटक संगीताचे विख्यात विद्वान आणि श्रेष्ठ गायक कै. अरियक्कुडि रामनुज अय्यंगार.

'श्री. कल्कींवर 'आनंद विकटन' चं संपादन सोपवून तामिळनाडूला एक श्रेष्ठ लेखक मिळाल्याचा मला उत्कट आनंद झाला आणि भविष्यात या प्रदेशाला असे कोणी लेखक लाभतील का, या विचारानं मी व्याकुळ झालो.'— आनंद विकटन वृत्तपत्र आणि जेमिनीचे मालक कै. श्री. एच्. एस्. वासन.

' आनंद विकटन ' मध्ये ' त्यागभूमी ' ही कांदबरी जेव्हा क्रमशः प्रकाशित होऊ लागली तेव्हा रात्रीचे आठ वाजता विक्रेत्याची ' आनंद विकटन ' अशी आरोळी येताच गल्लीतल्या घराघरातील विजेचे दिवे पटापट लागायचे आणि फटाफट दरवाजे उघडायचे. '– एक रसिक वाचक.

कल्कीची लेखणी किती माधुर्ययुक्त आणि वाचकांना आकर्षित करणारी होती याची या प्रशस्तीवरून कल्पना येईल. खरं सांगायचं तर वाचक त्याच्या लेखणीवरून जीव ओवाळून टाकीत.

' लाटांचा आवाज ' या कादंबरीचा हा संक्षिप्त अनुवाद वाचून मूळ कादंबरी वाचण्याचे विचार वाचकांच्या मनात घोळू लागले तर अनुवाद करण्याचं ध्येय सफल झालं असंच म्हणावं लागेल.

मुंबई

आनंदी रामचंद्रन

1

राजमपेट्टै गावाच्या ब्राह्मणआळीतील अर्धी अधिक घरं ओस पडली होती. घर म्हणण्यालायक जी घरं होती, त्यांत किट्टावय्यर पाटलाचं घर चांगलंच सुशोभित होतं. पुढच्या दोन खोल्या तर बऱ्याच सजविलेल्या होत्या.

घराच्या पुढील भागात विटा-सिमेंटानं बनविलेल्या फरशीवर बसून सरस्वती अम्मा आपल्या मुलीची, ललितेची वेणी घालत होत्या. केस विंचरून झालेच होते. एवढ्यातच ललिता उतावळेपणानं म्हणाली, " अग आई, किती उशीर करतेस ? झटपट वेणी घालून दे ना !"

"एवढी ग कसली घाई येऊन पडली ? मला नाही घाई. मी आपली आरामात करणार ! अशा रखरखत्या उन्हात मेली टपाल कचेरीत जाणार. खरं की नाही ? डाकेनं काही आलं असलंच तर कुठं जाणार आहे ग ? बाळकृष्णन् पोस्टमन स्वतः आणून देईल."

असं बोलता बोलता सरस्वती अम्मांनी वेणी गुंफून अंबाडा घालायला सुरुवात केली. पण ललितेला धीर नव्हता. तिनं झटकन वेणीचा शेपटा ओढला. उठून उभी राहिली अन् दाराकडे धावली.

"ललिता ऽ ! माझं ऐक. इकडे ये. नाही येत ? बरं ! जा तर तू. लक्षात ठेव ! तुला असं सोडणार नाही. घरात घेणार नाही." तिची आई वडबडू लागली.

तेवढ्यात किट्टावय्यर पाटील घरी आले. वडिलांना पाहून ललिता घाबरली. जागच्याजागी थबकली. तिचं शरीर वेलीसारखं थरथरू लागलं. तिच्या मुग्ध चेहऱ्यावर भीतीचे व लज्जेचे भाव दिसू लागले.

पतीला पाहताच ललितेची आई उठून उभी राहिली, तिच्याकडे पाहून ते खेकसले, "ए, काय झालं ग एवढ्यानं ओरडायला ? सदान्कदा पोरीवर रागावण्याखेरीज कामच नाही का दुसरं ?"

"तर काय ! तुमच्या लाडक्या लेकीवर राग काढण्याशिवाय दुसरं कामच कोणतं आहे मला ? खरं तर तुमच्याच लाडानं . . ."

" हं, टाक म्हणून.... माझ्याच लाडानं पोरगी शेफारली.... जन्माच्या वेळी केवढी सालस होती. नाही का ? वाः ! चांगला न्याय आहे ! ....पण मी विचारतो, यावेळी हा गोंधळ कशापायी चालवलास ? "

" कित्ती वेळा सांगितलं पण ऐकेल तर शपथ ! एकटीच टपाल कचेरीत पळते. मी म्हणत्ये, काही पत्रबित्रं आलंच तर ते काय मधेच रस्त्यावर अडकून पडणार आहे ?...आता पौषाचा महिना लागलाच आहे. तेव्हा कसंही करून यंदा मुलीचं लग्न उरकून टाकावं. "

" पण लग्नाचा अन् आरडाओरडीचा संबंध काय ? "

" लग्नाला आलेल्या पोरीला का एकटी बाहेर जाऊ द्यायचं असतं ? "

" जाऊ दिलंच तर असं काय होणार आहे ? टपाल कचेरी इथनं दोन फर्लांगसुद्धा नाही. मुलींना घराच्या चार भिंतींत नजरकैदेत ठेवण्याचा काळ केव्हाच संपला, आहे बाईसाहेब ! ललिता, जा तू. माझंही एखादं पत्र आलं असलं तर घेऊन ये. "

वडिलांच्या तोंडून एवढं ऐकताच ललितेनं तिरक्या नजरेनं आईकडे पाहिलं. अन् दाराकडे झेप घेतली.

" पुष्कळ लोक पाहिले. पण पोरीचे असे लाड करणारं कुणी दिसलं नाही. मुंबईहून आल्यापासून तर हे फार झालंय्. आता हे सारं कोणत्या मार्गी लागणार आहे, कळत नाही. " सरस्वती अम्मांची बडबड पुन्हा सुरू झाली.

" सुरळीत मार्गालाच लागणार आहे. आता आपली जीभ आवरा म्हणजे झालं. जावई तर चांगला शिकला सवरलेला पाहिजे म्हणता. मग मुलीला धीट बनवायला हवं, हे कसं कळत नाही ? "

इतक्यात दारात कोणी आल्याची चाहूल लागली. खाकरण्याचाही आवाज आला.

सरस्वती अम्मा मागे सरकून खांबाआड झाली.

अनपेक्षित आलेले गृहस्थ होते सोमाच्चु (श्रीनिवास) अय्यर, किट्टावय्यरांचे परम मित्र.

" आज सकाळीच आमचा भाऊ कल्याण सुंदरम् मद्रासहून आला आहे. येताना त्यानं एक वर्तमानपत्र आणलं आहे. त्यात अशी बातमी छापली आहे की... " असं बोलत सोमाच्चु आत आले.

" बोला ! काय बातमी छापली आहे ? "

" बिहार प्रांतात भूकंप झाला आहे ! "

" काय म्हणालात ?"

" अहो, मोठा भूकंप झाला आहे. किती लोक मेले असतील अन् किती कुटुंब उध्वस्त झाली असतील, हेच कळत नाही. संपूर्ण पत्रात एवढीच एक बातमी आहे. पेपरवाल्यांनी तर कमाल करून टाकली... अहो किट्टाजी, मला वाटतं, आतून आपल्याला बोलावणं आलेलं दिसतं. "

खांबाआड उभी असलेली सरस्वती अम्मा पुढं सरकून किट्टावय्यरांचं लक्ष वेधून घेण्याची धडपड करीत होती. सीमाच्चूंनी ते बघितलं नि मित्राला सूचना दिली.

" अग सरसू, इकडे ये नि सांग काय ते. सोमाच्चु कोणी परके थोडेच आहेत ?"

सरस्वती अम्मांचं मातृत्व उफाळून आलं. काळजीच्या स्वरात त्या म्हणाल्या, " ते भूकंपाबद्दल बोलताहेत नं ? पोरगी एकटी बाहेर गेली आहे. तुम्ही स्वतः जाऊन तिला घेऊन या पाहू. नाहीतर झटकन् कोणाला पाठवा. "

ब्राह्मणआळीच्या थोडं बाहेर पडताच मोठी सडक लागते. सडकेनं अर्धा फर्लांग चालून गेलं म्हणजे टपाल कचेरी लागते. ललिता धावतपळत पाच मिनिटांत तिथं पोचली. धावल्यानं तिला दम लागला होता. धापा टाकीत ललितेनं कारकुनाला विचारलं, " बाबूजी, माझ्या नावाचं पत्र आलं आहे का ? "

डाक उघडणाऱ्या कारकुनानं मान वर करून तिच्याकडे पाहिलं.

" बेटी, तू होय ? बैस थोडी. अजून मी डाकेची थैली उघडलेली नाही. थैली उघडतो. मग सांगतो काय ते. "

बाबूनं थैली उघडून लगबगीनं पत्रं वेचली. पत्रं बघून ' ही घे तुझी पत्रं ' असं म्हणत तीन पत्रं तिच्या हातात दिली. त्यांतल्या एका पाकिटावर तिचं नाव होतं. उरलेली दोन तिच्या बाबांच्या नावाची होती.

पत्र घेऊन ललिता लगबगीनं बाहेर आली. पण तिची उत्कंठा इतकी शिगेला पोचली होती की, दारातच तिनं पाकीट फोडलं. पत्र बाहेर काढून ती वाचू लागली. पत्रात लिहिलं होतं—

दादर, मुंबई
दि. १४–१–१९३४

प्रिय ललितातार्ई,

गेल्या रविवारी पाठवलेलं पत्र तुला मिळालं असेलच. ते पत्र लिहिताना मी किती आनंदात होते ! तुला पत्र लिहिताना आईनं मला बघितलं. जवळ येऊन

पाहिलं अन् एकदम माझ्या गालाचा मुकाच घेतला. मला कुरवाळून म्हणाली, 'बेटा, तू नि ललिता जन्मभर असाच स्नेहभाव टिकवून ठेवा' आईचे डोळे आसवांनी डबडबले होते. मला आश्चर्य वाटलं. 'आई हे ग काय ? तुझे डोळे का ग भरून आले ?' मी उदास होऊन विचारलं तेव्हा गदगदलेल्या स्वरात ती बोलली, 'काही नाही बेटा सीता ! माझी तर या जगात कोणी मैत्रीण नाही. भाग्यानं तुला चांगली मिळाली...... हा विचार मनात आला नि आपोआप आनंदाश्रूंनी डोळे भरून आले.'

ललिता ! आता पुढं काय लिहू ? ते पत्र लिहिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी आई आजारी पडली. 'साधा ताप आहे. दोन दिवसांत निघून जाईल' असं ती म्हणाली. आम्ही तिच्या शब्दांवर विश्वास ठेवला. डॉक्टरांना बोलावलं नाही. ताप उतरेना म्हणून बाबांनी डॉक्टरांना आणलं. डॉक्टरांनी तपासून सांगितलं, 'हा विषमज्वर (टायफाइड) आहे. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष केल्यामुळं ह्या फार अशक्त झाल्या आहेत. तुम्ही वेळीच औषधोपचार का नाही केलात ?' त्यांचे ते शब्द माझ्या जिव्हारी लागले. आईचे नेहमीचे उपवास, बाबांची निष्काळजी, या साऱ्या गोष्टी मला आठवल्या.

ललिता ! आता त्या सर्व गोष्टी लिहून काय उपयोग आईची प्रकृती खूपच खालावली आहे. देवानं कृपा केली तरच जगू शकेल ! डॉक्टरसुद्धा बाबां-जवळ असेच बोलले.

ईश्वराच्या मनात काय आहे हे कोणास ठाऊक ! ताई, देव माझ्यावर कृपा करील की मला अनाथ करून आईला घेऊन जाईल ग ?

ती. स्व. मामांच्या पत्रात 'पत्र पाहताच निघून या' असं बाबांनी लिहिलं आहे. तूसुद्धा त्यांना आग्रह कर. मामा आले तर कदाचित आई वाचेल.

पुढील आठवड्यात मी तुला पत्र लिहू शकेन की नाही हे कळत नाही पत्र लिहिलं काय अन् न लिहिलं काय, तुझी आठवण माझ्या हृदयात सदैव ताजीच राहील !

तुझी प्रिय मैत्रीण
सीता

सीतेचं पत्र वाचून अश्रू ढाळीत ललिता घरी आली. तिला तशी रडताना पाहून किट्टावय्यर दचकले. प्रेमानं तिच्या पाठीवरून हात फिरवीत ते विचारू लागले, "बेटा ललिता, रडायला काय झालं ? पत्रात अशी काय बातमी आहे ?" ललितेनं

मोठ्या प्रयासानं [illegible], " बाबा आतेची तब्येत फार बिघडली आहे असं सीतेनं लिहिलं आहे. तुम्हालाही तसं लिहिलं आहे."

किट्टावय्यरांनी तिच्या हातातलं पत्र घेऊन वाचलं. त्यांचेही डोळे डबडबले. तसेच ते आत गेले आणि त्यांनी स्वतःला सोफ्यावर झोकून दिले.

2

श्री. किट्टावय्यर हे आपल्या वडिलांचे एकुलते एक चिरंजीव होते. त्यांच्या वडिलांनी कावेरी नदीच्या काठी कितीतरी एकर भात (धान) पिकवणारी जमीन खरेदी करून ठेवली होती. ती सर्व जमीन त्यांनी स्वतःच्या मिळकतीवर विकत घेतली होती. शिवाय गावची पाटिलकी त्यांच्याकडेच होती. किट्टावय्यरांना वारशाने ह्या दोन्हीचा लाभ झाला होता. शेती चांगलीच पिकाऊ होती. सोनं पिकवणारी होती. किट्टावय्यरांनी सोन्याची माती केली नाही, मातीचं सोनं केलं. 'चंपा' जातीचा धान, केळी, विड्यांची पानं, ऊस अशी पैसा देणारी पिकं ते काढीत.

त्यांच्या दोन्ही बहिणींची लग्नं वडिलांच्या हयातीतच झाली होती. त्यामुळे घराची जबाबदारी त्यांच्या शिरावर पडल्यानंतर खर्चाचं कोणतंच कार्य त्यांना करावं लागलं नव्हतं. तरी त्यांचा हात खर्चिक असल्यानं दानधर्मात, सार्वजनिक कार्यात, स्नेह्यासोबत्यांच्या मदतीसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी उघड्या मुठीनं खर्च होत राहिला. वडिलोपार्जित स्थावरजंगम मालमत्तेत ते कोणतीच भर टाकू शकले नाहीत. मात्र ललितेच्या वयात एकेक वर्षाची भर पडत होती.

ललिता उपवर झालेली असली तरी गेल्या वर्षी तिच्या लग्नाची खटपट करता आली नव्हती. कारण ऐन मोसमात त्यांना मुंबईला सहकुटुंब जावं लागलं होतं.

किट्टावय्यरांची एक बहीण त्यांच्यापेक्षा मोठी होती. शेजारच्या एका गावातील धार्मिक वृत्तीच्या कुटुंबात तिला दिलं होतं.

त्यांची धाकटी बहीण राजम्मा मुंबईला राहात होती. बालपणी किट्टावय्यरांचा तिच्यावर खूप जीव होता. तिच्या लग्नाच्या वेळी त्यांनी उत्साहानं पुढाकार घेतला होता. त्यांना फार आनंद झाला होता. पण तिच्या नशिबात सुख नव्हतं. लग्नानंतर थोड्याच अवधीत जावईबापू दुरैस्वामी यांना मुंबईच्या रेल्वेकचेरीत चांगली नोकरी मिळाली. त्यानंतर अल्पावधीत घर सांभाळण्यासाठी राजम्माही मुंबईला निघून गेली.

राजम्माचं कौटुंबिक जीवन सुखी नाही असं लवकरच कळून आलं. तरी तिच्या दुःखाचं मूळ कशात आहे हे कोणीच खोलात शिरून शोधण्याचा प्रयत्न केला नाही. मानी स्वभावाच्या राजम्मानं आपलं सुखदुःख कुणाला कळू दिलं नाही. त्यांतच मुंबई आणि राजमपेट्टै यातलं अंतरही इतकं, की हवं तेव्हा जाऊन येणं जमण्यासारखं नव्हतं. हळूहळू पत्रव्यवहारही थंडावला. किट्टावय्यर कधीतरी बहिणीच्या आठवणीनं खिन्न होत. आपली राजम कशी दिवस कंठीत असेल, या विचारानं निःश्वास सोडत बसत...

तशातच एक वर्षापूर्वी राजम्माकडून एक पत्र आलं होतं. पत्रातील मजकूर हृदयाला जाऊन भिडणारा होता. राजमनं लिहिलं होतं– इतकी वर्षं धीरानं क्लेश सहन केले. एक दिवस सर्व दुःखाचा परिहार होईल अशी वेडी आशा वाटत होती पण त्यांना अंत नाही. आता हे दुःख माझ्याकडून सोसवत नाही. दिवसेंदिवस माझी तब्येत खालावत चालली आहे. लवकर येऊन मला एकदा भेटून जाल तर बरं होईल !

म्हणून किट्टावय्यर सहकुटुंब मुंबईला गेले होते. ललिता, तिची आई आणि धाकटा शुंडू या तिघांच्या सोबत त्यांचा आगगाडीचा प्रवास कंटाळवाणा झाला नव्हता. स्टेशनवर उतरून घेण्यासाठी दुरैस्वामी अय्यर स्वतः आले होते व त्यांना दादरमधील आपल्या बिऱ्हाडी घेऊन गेले होते.

मुंबईत ललिता व शुंडूचे दिवस मजेत गेले. ललितेला तर मीतेच्या स्वरूपात एक जिवश्च-कंठश्च मैत्रीण लाभली. मीता तशी तिच्यापेक्षा वर्षानंच मोठी होती. त्यांची चांगलीच गट्टी जमली. आयुष्यभर एकमेकींना अंतर न देण्याची त्यांनी शपथ घेतली.

राजम्माचं जीवन अत्यंत दुःखमय व निराशापूर्ण असल्याचं किट्टावय्यरांना आढळून आलं. तरी कारणाचा स्पष्ट उलगडा झाला नाही. दुरैस्वामी फार कमी वेळा घरी येत. मात्र घरी आले म्हणजे हसतमुख दिसत. सभ्यपणानं वागत. रात्री

मात्र घरी थांबत नसत. ' ड्यूटी ' आहे असे सांगून बाहेर निघून जात.

किट्टावय्यरांना पत्र पाहून जेवढी काळजी वाटली होती तेवढी राजम्मा अशक्त झाली नव्हती किंवा अंथरुणाला खिळून पडली नव्हती. तिच्या हिंडण्या-फिरण्यात चपळता होती. घरातील सर्व कामधाम तीच करीत होती.

किट्टावय्यरांनी आपली शंका बोलून दाखविली तेव्हा राजम्मा म्हणाली, " माझ्या तब्येतीला काही झालेलं नाही भाऊ ! तुम्हा सर्वांना बघण्याची इच्छा झाली म्हणून तसं पत्र घातलं. नाहीतर तुम्ही काय सहजासहजी येणार होता ?"

तिच्या या मखलाशीला त्यांनी दाद दिली नाही. प्रश्नामागून प्रश्न विचारून खरं काय ते काढून घेण्याच्या ते प्रयत्नात लागले.

" काय ग राजम, तुझ्या नवऱ्याला कसलं व्यसन तर नाही ? दारूबिरू ..."

" दारूच काय जुगार, घोडदौड, आणिक काय काय काय आहेत हे मला ठाऊक नाही. पण भाऊ, ह्या गोष्टी विचारून माझ्या पोळलेल्या हृदयावर आणखी डागण्या का देतोस ?– असं बोलता बोलता राजम्माच्या डोळ्यांना धारा लागल्या. किट्टावय्यरांनी तिचं सांत्वन करीत हळूहळू बऱ्याच गोष्टी काढून घेतल्या राजम्माच्या बोलण्यावरून त्यांनी अनुमान केलं की दुरैस्वामीला केवळ जुगाराचं व्यसन नसून त्याला स्त्रियांचाही नाद लागला असावा. पण धाकट्या बहिणीच्या तोंडून असं काहीच वदवून घेणं त्यांना उचित दिसलं नाही. सबब त्यांनी अधिक काही विचारलं नाही.

सीता मुंबईच्या शहरी संस्कृतीत जन्मली व वाढली होती. ललिता खेड्यात राहणारी. त्यांच्या राहणीत, वागणुकीत फरक होता. सीतेनं आपल्या कानापाशी मोकळ्या सोडलेल्या केसांच्या कुरळ्या बटांनी तिच्या चेहऱ्याच्या सौंदर्यात भर पडत होती. तिच्या बोलघेवडेपणाबद्दल बोलायची सोय नव्हती. ललितेच्या तोंडून एक शब्द बाहेर पडण्याआधीच तिचे दहा शब्द बोलून होत. कॉन्व्हेंटमध्ये शिकल्यानं तिच्या बोलण्यात वारंवार इंग्रजी शब्द येत. इंग्रजी वाक्यंही येत. ती ऐकून ललिता विस्मित व्हायची.

सीता ललितेपेक्षा वर्षानं मोठी होती. तारुण्यानं मुसमुसलेली सीता अधिक सुंदर दिसायची.

हे सर्व पाहून सरस्वती अम्मांचं मन खवळून उठायचं. सीतेचं ललितेपेक्षा अधिक बडबडणं अन् तिच्यावर अधिकार गाजवणं अम्मांना आवडलं नाही. तरी आपल्या मुलीपेक्षा नणदेची मुलगी रूपानं उजवी आहे हे तिच्या मनाला पटलं होतं

म्हणून मुंबईहून परतल्यावर ती ललितेच्या साजशृंगाराकडे अधिक लक्ष पुरवू लागली होती.

3

किट्टावय्यरांनी दुसरं पत्र उघडलं. ते अर्ध वाचून होताच ते उद्गारले, " छे: छे: ! या इंग्रजी शिकलेल्यांना अक्कलच नसते. चार अक्षरं शिकून मद्रासला जाऊन बसले. झालं ! सारं काही विसरले. दांभिक बनले आहेत लेकाचे ! "

त्यांच्या तोंडून हे तक्रारवजा शब्द एकताच सरस्वती अम्मांनी दचकून विचारलं, " कोणाचं आहे पत्र ? असं काय लिहिलं आहे त्यात ? "

" अग, ते एक बृहस्पती बसले आहेत नं जुन्या मांबलम् भागात, त्यानं लिहिलंय. पक्का अकलेचा कांदा आहे झालं ! "

" म्हणजे तुमच्या धाकट्या मामांनी लिहिलं आहे असं स्पष्ट सांगा की. बरं तर काय लिहिलंय त्यांनी ? " – सरस्वती अम्मांची जिज्ञासा शब्दांतून डोकावत होती.

" मद्रासच्या पद्मापुरम्मध्ये ललितेस योग्य एक चांगला वर आहे, असं सोमाच्चूंनी सांगितलं नव्हतं ? त्याची चौकशी करून पत्र लिहायला त्याला कळवलं होतं. तो त्या मुलाच्या आईवडिलांना भेटला वाटतं. त्यांनी म्हणे याला सांगितलं, मुलीला इथं आणून दाखवा. त्या शहाण्यांनी याला म्हटलं तसंच यानं आपल्याला कळवलं. याची अक्कल कुठं चरायला गेली, कळत नाही. ललितेला एकवेळ इथंच घेऊन याल तर बरं, असं लिहिलं आहे. चांगल्या वाइटाचं भान तरी आहे का याला ? " किट्टावय्यर संतापून बोलत होते.

" असं पाहा. ते काहीही असलं तरी तुम्हाला असं रागावून चालणार नाही. छोटे मामा नीट विचार केल्याशिवाय असं काही लिहिणार नाहीत. समजा, आपण पोरीला नेलंच तर काय सरळ परक्यांच्या घरी घेऊन जाणार आहोत ? . . .

माझं ऐकायचं झालं तर आधी कोपऱ्यावरच्या घरी जा. त्यांचा सल्ला घ्या. अन् मग काय ते ठरवा ! "

सरस्वती अम्मांचा रोख सोमाच्चूकडे होता. त्यांचं नाव काढताच किट्टावय्यरांचा राग जाऊन ते शांत होतील, याची त्यांना कल्पना होती. आणि त्यांनी जे अपेक्षिलं तसंच झालं. किट्टावय्यर घाईघाईनं जेवण उरकून घराबाहेर पडले.

पश्चिमेकडील कोपऱ्यावरच्या घराच्या बाहेरील ओट्यावर तीन माणसं पत्ते कुटावयाच्या तयारीत बसली होती. सोमाच्चू या नावाने ओळखले जाणारे श्रीनिवास अय्यर हातात पत्त्यांचा जोड घेऊन बसले होते. पंचू अय्यर आणि अप्पादुरै शास्त्री 'स्वदेश मित्र' पत्राचं प्रत्येकी एकेक पान जमिनीवर पसरून वाचत बसले होते.

किट्टावय्यरांना पाहताच शास्त्रींनी वर्तमानपत्रातून डोकं वर उचललं अन् विचारलं. " बिहारात मोठा भूकंप झाला आहे याची खबरबात आहे का हो अय्यर तुम्हाला ? "

" भूकंप झाला असो की नसो, एक गोष्ट निश्चित आहे. महात्मा गांधी आपल्या प्रांतात दौऱ्यावर येणार, अशी बातमी पेपरात आली आहे " पंचू अय्यरांनी ठळक अक्षरात छापलेलं शीर्षक सर्वांना दाखवलं.

" माहीत आहे, ते इकडं का येणार आहेत ? " अप्पादुरै शास्त्री गरजले, " दलितांना मंदिरं खुली करून देण्यासाठी ! मी म्हणतो, भूकंप नाही होणार तर काय ? असे अनाचार वाढले तर भूकंप — काय, तुफान येईल. मुसळधार पाऊस पडेल. महापूर येतील. प्रलयच नव्हे, महाप्रलय होईल ! आणखी काय काय घडेल कोण जाणे ! अहो, या विश्वाचं नावनिशाण शिल्लक राहणार नाही ! "

" अहो शास्त्रीबुवा, वेदपठण करणाऱ्या आपल्या मुखानं असं अभद्र बोलू नका. तुमचे शब्द प्रभावी ठरले तर आमची मात्र दुर्दशा व्हायची." पंचू अय्यरांनी तंबी दिली.

" सोमाच्चू, मी एका गोष्टीसंबंधी तुमचा सल्ला विचारायला आलो आहे. " किट्टावय्यरांनी चचला मोडता घातला.

" मग हे आधीच नाही का सांगायचं ? बरं चला ! आत या–" सोमाच्चू अय्यरांनी असं म्हटलं व त्यांना घेऊन बैठकीच्या खोलीत गेले.

मुंबई व मद्रासवरून आलेल्या पत्रांबद्दल थोडक्यात कल्पना देऊन किट्टावय्यरांनी विचारलं, " तुम्हाला या बाबतीत काय वाटतं ? "

सोमाच्चू अय्यरांनी आपलं मत दिलं...

मद्रास शहरात नव्यानं वसलेल्या पद्मापुरम् या भागात रायबहादूर पद्मलोचन शास्त्री यांचं स्वतःच्या मालकीचं घर होतं. ते आपल्या खुर्चीत बसून चिरंजीव सुंदर राघवन् याच्याविषयी विचार करीत होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांना मुलाच्या काळजीनं घेरलं होतं.

त्यांचा पहिला मुलगा शंकर नारायणन्. त्यानं शास्त्रीच्या पदरी निराशाच बांधली होती! शंकर तसा फार बुद्धिमान होता. शाळा-कॉलेजात त्यानं नंतर फार उच्च श्रेणी मिळवली होती. पदवी घेतल्यावर कायद्याचा अभ्यास करून त्यानं वकिली सुरू केली. त्याचे सासरे व्याघ्रम् अय्यर एक नामांकित वकील होते. त्यांच्याच हाताखाली शंकरानं वकिलीचा व्यवसाय सुरू केला. परिणामी तो बापाला कायमचा दुरावला. त्याच्या दृष्टीनं सासऱ्याचं घर म्हणजे स्वर्ग होता. तो कायमचा तिथंच जाऊन राहिला. त्याचे आचार-विचार बदलले. जुन्या वैदिकी परंपरेला हरताळ फासून त्यानं आधुनिक संस्कृतीचा अंगिकार केला. एवढंच नव्हे तर बायकोच्या चिथावणीनं जन्मदात्या आईवडिलांना अगदीच गांवढळ समजू लागला.

शास्त्रीचा दुसरा मुलगा सुंदर राघवन् भावासारखाच तल्लख बुद्धीचा होता· विश्वविद्यालयीन अभ्यास व परीक्षा म्हणजे त्याच्या हातचा मळ होता. बी. ए. ऑनर्ससाठी त्यानं अर्थशास्त्र हा विषय निवडला आणि त्या विषयातून तो सर्व प्रांतांतून पहिला आला होता. ज्या वर्षी तो परीक्षेला बसला त्यावर्षी भारत सरकारच्या आर्थिक धोरणावर वृत्तपत्रातून कडक चर्चा सुरू होती. 'रुपयाची किंमत सोळा पेन्स असावी की अठरा पेन्स? यापैकी कोणती चांगली व किफायतशीर राहील?' या प्रश्नावरील आपले विचार सुंदर राघवननं वृत्तपत्राकडे पत्ररूपानं प्रकाशनार्थ पाठवले 'संपादकाला आलेली पत्रं.' या सदरात ते प्रसिद्ध झाले. या पत्रानं देशातील सर्व अर्थशास्त्र्यांचं लक्ष वेधून घेतलं इतकंच नव्हे तर सरकारच्या मध्यवर्ती अर्थखात्यातील अधिकाऱ्यांनीही त्याची दखल घेतली. शेवटी त्या खात्याकडून त्याला दिल्लीला बोलावलं गेलं. राघवन् दिल्लीला जाऊन त्यांना भेटून आला. या भेटीचा फायदा म्हणजे त्याला मध्यवर्ती सरकारच्या अर्थखात्यात चांगल्या दर्जाची नोकरी देण्यात आली.

म्हणूनच आपल्या या मुलाबद्दल रास्त अभिमान बाळगण्याला पद्मलोचन शास्त्रींना भक्कम कारण होतं. तरीही त्यांना राघवन्बद्दल तेवढीच काळजी वाटत होती. त्यांच्या काळजीचं काय बरं कारण असावं?

कारण तसं काहीच नव्हतं. फक्त त्याच्या लग्नाबद्दल त्यांना चिंता वाटत होती.

साधरणत: मुलीच्या लग्नाबद्दल आईवडील काळजी करतात. शास्त्रींना मात्र आपल्या मुलाची चिंता लागून राहिली होती. त्यांची व्यथा वेगळीच होती. आपला धाकटा चिरंजीव वडील भावावर मात तर करणार नाही ना, अशी त्यांना शंका येई.

त्यांची सहचारिणी कामाक्षी अम्मा तर त्यांच्यापेक्षाही अधिक काळजी करू लागली होती.

सुंदर राघवन् चांगला पाच फूट सहा इंच उंच होता. त्याची शरीरयष्टी उंचीला साजेशी होती. तो निकोप प्रकृतीचा धष्टपुष्ट तरुण होता. शिल्पातील चेहऱ्यासारखा त्याचा चेहरा गंभीर दिसे. डोक्यावरील केसांचा कट् जेवढा कलापूर्ण तेवढाच भांगही काळजीपूर्वक काढलेला असे. यावेळी तो टेबलासमोर ठेवलेल्या खर्चीवर बसला होता. त्यानं उत्तम पोषाख घातला होता.

समोरच्या टेबलावर आलेलं कुणाचं तरी पत्र पडलेलं होतं. त्या पत्राजवळच त्यानं लिहिलेलं अपूर्ण पत्रही पडलं होतं. त्यांच्या खाली त्या दिवशीचं वर्तमानपत्र होतं. आणखी सुंदर फ्रेममध्ये बसवलेला एक फोटो टेबलाची शोभा वाढवीत होता.

सुंदर राघवन्च्या हातात निळ्या रंगाचं सुरेख पेन होतं. नावाप्रमाणेच सुंदर असणाऱ्या त्याच्या चेहऱ्यावर क्रोध, निराशा व दु:ख यांचे संमिश्र भाव दिसत होते. पुन्हा पुन्हा तो नि:श्वास सोडत होता. ज्ञानाचं तेज विखुरणारे त्याचे डोळे स्वप्नाळू व अनंताचा वेध घेत असल्यासारखे भासत होते.

त्या दिवशी त्याला जे पत्र आलं, त्याचं उत्तर लिहिण्याचे प्रयत्न विफल ठरले होते. पुन:पुन्हा तो आलेलं पत्र वाचून नीट समजून घेण्याची शिकस्त करीत होता.

जी. आय. पी. मार्ग
दि. २१-१-१९३४

श्रीयुत सुंदर राघवन् यास,

सप्रेम नमस्कार

आपण मुंबईच्या पत्त्यावर पाठविलेलं पत्रं मी रेल्वेस्टेशनवर निघाले तेव्हा

मिळालं. म्हणून मी हे पत्र चालत्या गाडीत लिहीत आहे.

माझ्या वियोगामुळं आपली मन:स्थिती किती बिघडली याचं प्रत्ययकारी चित्र आपण पत्रातून रेखाटलं आहे. माझ्यामुळं हे घडावं याचं मला दु:ख आहे. तरीही आपण मला विसरून जावं अशी माझी हात जोडून विनंती आहे.

या जगात आपल्याला करण्यासारखी कितीतरी कामं आहेत. आपण मन:पूर्वक त्या कार्याला लागलात तर आपली मन:स्थिती अवश्य पालटेल. त्यासाठी आणखीही एक चांगला मार्ग आहे.

आपल्या आईवर माझी नि:सीम भक्ती व अतीव श्रद्धा आहे. यावर विश्वास ठेवा. दुर्दैवानं त्यांची सून होण्याचं मला भाग्य लाभलं नाही तरीही माझी त्यांच्यावरील श्रद्धा यत्किंचितही कमी झाली नाही. त्यांची मूर्ती माझ्या डोळ्यांत दिव्य सनातन हिंदूधर्मासारखी स्थिरावली आहे. आपल्या मातेनं माझ्यासारखीच्या पायावर पडून याचना केली, 'मुली. माझी तुला हात जोडून विनंती आहे माझी इच्छा पूर्ण कर.' त्यावर मी त्यांना आश्वासन दिलं. की मी तुमचं अवश्य ऐकेन. देवानं मला माझं वचन पार पाडण्याची शक्ती द्यावी त्याच्याच बळावर या आयुष्याचा भार वाहण्याचं सामर्थ्य मला लाभू शकेल, याची मला खात्री वाटते.

आपण मुंबईच्या पत्त्यावर लिहिलेलं आणि त्यापूर्वीही वेळोवेळी पाठवलेली पत्रं या सर्वांची मी होळी केली आहे. ती जवळ ठेऊन तरी काय लाभ होता? माझी तर अशीही प्रार्थना आहे की आपणसुद्धा असच करावं. या पत्रासकट माझी सारी जुनी पत्रं आपणही जाळून टाकावीत. आपल्याजवळ असलेला माझा फोटोही 'अग्नये स्वाहा' करून टाकावा.

बिहारात जो भयानक भूकंप झाला त्याबद्दल आपण वृत्तपत्रातून वाचलं असेलच. भूकंपामुळे बिहारी जनतेला ज्या घोर यातना भोगाव्या लागल्या त्यांचीही माहिती करून घेतली असेल. निसर्गाच्या प्रकोपामुळे बिहारची अजाण जनता स्वप्नातील नरकतुल्य कठोर यातना भोगते आहे. आपद्ग्रस्त जनतेची सेवा करण्यासाठी स्वयंसेवकांची आवश्यकता असून बिहारचे राष्ट्रीय पुढारी बाबू राजेंद्र प्रसाद यांनी संपूर्ण राष्ट्राला आवाहन केलं आहे. त्यांच्या आवाहनानुसार मुंबईहून स्वयंसेवकांच्या अनेक तुकड्या बिहारला निघाल्या आहेत. त्यांतील पहिल्याच तुकडीत प्रवेश मिळवून मी बिहारला निघाले आहे.

माझी आपल्याम पुन्हा नम्र विनंती आहे की आपण मला लवकर विसरून जावं.

तारिणी

आश्चर्य आहे ! ज्या सुंदर राघवन्नं विश्वविद्यालयाच्या परीक्षांतून कठिणात कठीण प्रश्नांची समर्पक उत्तरं लिहून प्रथम क्रमांक मिळवला होता, तोच राघवन् या पत्राचं उत्तर देण्यासाठी इतकं डोकं खाजवत व निःश्वास टाकत का बसला होता ?

पद्मापुरम् (मद्रास)
दि. २४–१–१९३४

श्रीमती तारिणीदेवी,

आगगाडीत प्रवास करीत असताना लिहिलेलं आपलं पत्र मिळालं. त्या पत्रात आपण जो मजकूर लिहिलात त्यानं माझं हृदय विदीर्ण होऊन कसं तळमळत आहे याची कल्पना आहे का ? तुम्हास ते कळलं असतं तर... ? त्यासंबंधी तुम्हाला लिहून तरी काय उपयोग आहे म्हणा ! तुमच्या कठोर हृदयाच्या तुलनेत पोलाद, पाषण नि सनातन धर्माचे कडक निर्बंध अगदीच मृदू ठरतील ! माझी मनोव्यथा तुमच्या निर्दय हृदयाला कशी कळणार ? ..

इतकं लिहून झाल्यावर सुंदर राघवन्चं उत्तर थांबून गेलं होतं. तो विचारमग्न होऊन बसून होता. एवढ्यात दारातून कोणाचा तरी आवाज ऐकू आला, ‘ सर ! ’

राघवन् धडपडून उठला. त्यानं माडीच्या व्हरांड्यातून खाली वाकून पाहिलं मग विचारलं, “ कोण आहे ? ”

दोन्ही आगंतुक गृहस्थांनी वर मान करून बघितलं. त्यापैकी एक राजमपेट्टै गावचे पाटील किट्टावय्यर होते तर दुसरे जुन्या मांबलम् वस्तीत राहणारे, किट्टावय्यर त्यांचे धाकटे मामा सुब्बय्यर होते.

सुब्बय्यरांचा चेहरा पाहताच राघवन्नं ताडलं की ते आपल्या वडिलांच्या परिचितांपैकी आहेत. “ आपण बाबांना भटायला आलात ना ? थांबा ! मी दार उघडायला सांगतो. ”– असं बोलून तो आत निघून गेला.

“ यावं, यावं ! आपण आहांत तर ! म्हटलं, कोण आलं आहे ? अहो, आजकाल घराचं दार काही उघडं ठेवता येत नाही. दार उघडं ठेवलं तर

रिकामटेकडे लोक कुत्र्यासारखे आत घुसतात." पद्मलोचन शास्त्रींनी या शब्दांत नवागतांचं स्वागत केलं. मग त्यांना घेऊन ते बैठकीच्या खोलीत गेले.

"बसावं ! उभे काय राहिलात ? आरामात सोफ्यावर बसा. आपण बसल्यानं सोफा काय झिजणार आहे ? अशी नाजूक प्रकृतीची माणसं मला मुळीच आवडत नाहीत. कदाचित् आपल्याला माहीत असेल अगर नसेल, मी रामनाथपुरम् जिल्ह्यात सबजज्ज असताना एका श्रीमंताकडे गेलो होतो. सांगतो त्यावर विश्वास ठेवा. त्या घरातील प्रत्येक खांबावर गवसणी घातलेली होती. सर्व खांब काळ्या संगमरवराचे बनवले होते. एकेका खांबासाठी पाच पाच हजार रुपये खर्च केले होते. उत्तम कलाकुसरीचे नमुने बनवून त्यावर गवसण्या चढवून ठेवणं कसं दिसेल. ?... ही कल्पित कथा नव्हे बरं. वास्तवातील गोष्ट आहे ! – अरे, आपण अजून उभे आहात ? बसावं बसावं ! " अगदी श्वास न घेता पद्मलोचनशास्त्री बोलत होते. सुब्बय्यर व किट्टावय्यर जागा पाहून हळूच खाली बसले.

शास्त्री श्वास घेण्यासाठी थांबले. या संधीचा फायदा घेऊन सुब्बय्यरांनी बोलायला सुरुवात केली– " गेल्या रविवारी सर्वज्ञ संघात भागवतावर प्रवचन झालं होतं ना ? त्यावेळचा रसोत्कट प्रसंग आठवतो ? आपलं भाषण ! प्रवचनकारा-विषयी कृतज्ञता व्यक्त करणारं जे भाषण आपण केलं ते फार मोलाचं होतं. मोजक्याच शब्दांत आपण मार्मिक भाव व्यक्त केलेत. भाषण करावं तर असं ! इतर लोक बोलतात; पण ते काय बोलणं असतं ? "

स्तुतीचे चार शब्द ऐकून संतुष्ट होणाऱ्यांपैकी शास्त्रीजी नव्हते. ते पटकन उद्गारले, " अहो महाराज, आपल्याप्रमाणेच कितीतरी लोकांनी माझी प्रशंसा करून माझं ते भाषण उत्कृष्ट झाल्याचं प्रशस्तिपत्रही देऊन टाकलं आहे. पण खरं सांगायचं तर माझ्या त्या भाषणाचं मर्म कुणालाच कळलेलं नाही. अन् कळणार तरी कसं म्हणा !... बरं, त्या गोष्टी सोडा. अरे वा ऽ ! सुब्बय्यर आपण आपल्या सोबत या सद्गृहस्थांना आणलंत, अन् त्यांचा साधा परिचयही न करून घेताच मी आपला बडबडत सुटलो. आपणही अजून त्यांचा परिचय करून दिला नाहीत. तसं तर त्यांना पाहताच हे बडे असामी असल्याचं कळून येतं. शिवाय हे कावेरीचं पाणी पिणारे आहेत असं त्यांचा चेहराच सांगतो, काय खरं आहे ना मी म्हणतो ते ? "

" होय ! यापूर्वीच यांच्याबद्दल मी आपल्याजवळ बोललो आहे. राजमपेट्टेचे पाटील किट्टावय्यर हेच बरं का ! मद्रासला एकदा तरी येऊन आपल्याला भेटून

जाण्याबद्दल त्यांना मी लिहिलं होतं. म्हणून आपल्या भेटीमाठी आले आहेत." सुब्बय्यरांनी परिचय दिला.

"वा ऽ सुब्बय्यर ! आपण बरेच आहात की हो ! आधीच नाही का सांगायचं, अमुक गृहस्थ आले आहेत म्हणून !... आपल्याला भेटून फार आनंद झाला ! तर आपणच किट्टावय्यर ! छान ! का हो गावची पाटिलकी सोडून काही जमीन-जुमला साव-सावकारी वगैरे...?"

"सर्व काही आहे. कावेरीच्या अखंड ओलिताखाली साठ एकर भातशेती आहे. सर्वच शेतांतून दोन पिकं निघतात."

"आनंदाची गोष्ट आहे. पण काय हो पाटील मद्रासला कसं येणं केलंत ? कुठल्या कामानिमित्त आलात ? का शहर पाहण्यासाठी ?"

"मद्रास शहर तर यांनी केव्हाच बघितलं आहे. एवढंच नव्हे तर मुंबई-सुद्धा पाहून आले आहेत. यावेळी आले आहेत ते वरसंशोधनासाठी !"

"अरे वा ऽ ! वर संशोधनार्थ काय ? तर सुब्बय्यर आपण विम्याच्या कामाबरोबर हे कामही करू लागलात म्हणायचं ?"

"छे तसं नव्हे ! गेल्या खेपेला आपण भेटलो होतो तेव्हा आपण व आपल्या सौभाग्यवतींनी म्हटलं नव्हतं का, मुलीला इथं आणून आपल्या चिरंजिवांना दाखवून द्याल तर बरं. आठवतं ना ?"

"हं, हं, आत्ता आठवलं ! पण आपण मोठ्यानं बोलू नका. मुलगा वर बसलेला आहे. त्याच्या कानावर एवढ्यातच गोष्टी जायला नकोत !... माझं तर अद्याप तेच मत आहे. याबाबतीत आपण मला थोडं 'मॉडर्न' समजू शकता. मुलानं मुलगी पसंत करावी अन् मुलीनं मुलगा. शास्त्रही हेच सांगतं. आजकाल हुंड्याची पद्धत सुरू झाली आहे. ती मला तरी मुळीच पसंत नाही. शुद्ध वेडेपणा मानतो मी तो. जर मी आपल्या मुलासाठी हुंडा मागायचं ठरवलं तर म्हणू शकतो, तीस हजार द्या. पन्नास हजार टाका. पण..."

सुब्बय्यरांनी त्यांना मोडता घालत म्हटलं, "शास्त्रीजी, त्याबाबत आपणास बोलण्याची गरजच पडणार नाही. किट्टावय्यरांनी लेकीच्या लग्नासाठी तीस हजार रुपये अगदी वेगळे काढून ठेवलेत. कार्यात कोणतीच उणीव ठेवली जाणार नाही. सर्वतोपरी आपल्याला संतुष्ट केलं जाईल."

"ह्या भौतिक गोष्टी सोडा. विवाह हे श्रेष्ठ वैदिक कार्य. अग्नीला साक्षी ठेऊन विवाह केल्यावरच ब्राह्मणांना वैदिक कार्याचा अधिकार प्राप्त होतो. परंतु

मुलामुलींची मतं अजमावल्याशिवाय लग्न जुळवण्याचा जमाना केव्हाच मागे पडला. बरं तर पाटील, आपण मुलीला आणली आहे का ?"

आतापर्यंत तोंड उघडायला अवसर न मिळालेले किट्टावय्यर म्हणाले, "मुलीला सोबत आणणारच होतो, पण या खेपेला शक्य झालं नाही, मुंबईला माझी धाकटी बहीण असते, तिची प्रकृती ठीक नसल्याचं पत्र अचानक आलं. तिला भेटण्यासाठी मुंबईला निघालो आहे. आपण म्हणत असाल तर मुंबईवरून परत येताच मुलीला घेऊन येतो."

"तशी काही घाई नाही. आपल्या सोयीनुसार होऊ द्या. आता कुठं पौष सुरू झाला आहे. मात्र एक अडचण आहे. मुलगा सुट्टी काढून आलेला आहे. सुट्टी संपण्यापूर्वी लग्न करायला पाहिजे. जास्त विलंब करणं शक्य नाही. तशी तर मुलाच्या आईची घाई चालूच आहे." असं बोलून शास्त्रींनी हाक मारली,–कामाक्षीऽ! जरा इकडे ये बरंऽ!"

"आल्ये हं ऽ !" घराच्या आतून स्त्रीचं प्रत्युत्तर आलं.

शास्त्री त्याच उंच आवाजात म्हणाले, "ये, ये ! तू आलीस तरच काम होणार आहे."

थोड्याच वेळात शास्त्रीणबाई बाहेर आल्या. त्यांना येताना पाहून सुब्बय्यर बोलले, "या ! मी सुब्बय्यर आलो आहे. हे राजमपेट्टैचे पाटील किट्टावय्यर. यांच्या मुलीबद्दल मी आपल्याशी मागे बोललो होतो."

"होय!.. बरं, यांनी मुलीला सोबत आणलं आहे का ?"

"यावेळी जमलं नाही. यांच्या बहिणीची तब्येत बिघडल्याचं पत्र आलं म्हणून मुंबईला चालले आहेत. मुलामुलीच्या पत्रिका जुळल्या नि इतर गोष्टीचा खुलासा झाला तर मुलीला आणून दाखवण्यात अडचण कोणती असणार?"

"गोष्टी करायला काही आधारच नाही तिथं काय काय बोलणार ? या उपर आपली इच्छा ! खरं तर आधी मुलगी आणून दाखवा. मुलाला ती पसंत पडली तर बोलायचं काही उरतच नाही. लग्नाचा मुहूर्त काढायचं कामच तेवढं शिल्लक राहणार."

कामाक्षी अम्माचं पुरतं बोलूनही संपलं नव्हतं. तोच जिन्यावर कुणाची तरी पावलं वाजली...

जिन्यावरून खाली येणारा दुसरा कोणी नसून सुंदर राघवनच होता. थोड्याच वेळापूर्वी त्याच्या चेहऱ्यावर जी काळजी नि व्यथा होती ती आता पार नाहीशी

झाली होती. बैठकीत चाललेल्या गोष्टी ऐकून चेहरा उजळला होता.

राघवन् जिन्याच्या पायऱ्या उतरत असताना किट्टावय्यरांनी त्याला डोळे भरून पाहून घेतलं. त्याचं डौलदार शरीर, सौम्य चेहरा अन् त्यावरचं विद्येचं तेज पाहून ते थक्क झाले. त्यांना मनोमन वाटलं, हा तरुण जर आपला जावई झाला तर ते आमचं भाग्य आणि ललितेचं परमभाग्य ठरेल !

बैठकीत बसलेल्या चारही व्यक्तींवर दृष्टिक्षेप टाकून राघवन्नं म्हटलं " इथं कुणाच्या तरी लग्नाच्या गोष्टी चाललेल्या दिसताहेत ?"

"कुणाच्या नव्हेत, तुझ्याच लग्नाच्या आहेत." धीर एकवटून शास्त्रींनी चिरंजिवाला सांगून टाकलं. परक्यांच्या समोर तो उद्धटपणानं बोलणार नाही याची त्यांना जाणीव होती.

" अरेच्चा, असं आहे म्हणता ? मला न विचारता माझा वाङनिश्चय करून टाकण्याचा तुमचा बेत आहे का ?"

"नाही बाळ ! तुझ्या विचारानंच संबंध जुळवायचा आहे. लग्न म्हणजे काय साधी बाब आहे, की आज पक्क करायचं अन् उद्या तोडून टाकायचं ? त्यातून तू काही लहान राहिला नाहीस. तुझा विचार घेतल्याशिवाय आम्ही कसा बरं निर्णय घेऊ?"– कामाक्षी अम्मांनी मुलाची समजूत घातली.

" अडवळणानं कशाला, स्पष्टच बोलतो. या आपल्या सुब्बय्यरांनी राजमपेट्टै गावचे पाटील किट्टावय्यर यांच्यासंबंधी मागं सांगितलं नव्हतं? तेच हे किट्टावय्यर आपल्या कन्येसाठी वर शोधायला आले आहेत. आम्ही तुला बोलावण्याचा विचारच करीत होतो तेवढ्यात तूच आलास. तुझ्या मनात काय आहे ते सांगून टाक. बाकीच्या गोष्टी 'सेटल्' झाल्या तर हे आपल्या मुलीला इथं आणून दाखवायला तयार आहेत. चांगल्या कुलशीलाची घरंदाज माणसं आहेत. मला नि तुझ्या आईला हा संबंध एकदम पसंत आहे. उगीच यांना हेलपाटे देण्यात अर्थ नाही. होकार द्यायचा तर देऊन टाकावा, किंवा नकार असला तरी आत्ताच देणं बरं!" शास्त्रींनी उलगडा करून टाकला.

राघवन्च्या चेहऱ्यावरचं स्मित एकदम मावळलं. तो एकदम गंभीर बनला. थोडं थांबून म्हणाला, "बाबा, मला लग्न करायचं झालं तर मी स्वत: यांच्या गावी जाऊन मुलीला पाहून येईन. मुलीला इथं बोलावण्याची जरूरी नाही."

राघवन् जे बोलला त्यावर काही म्हणण्याची कुणालाच हिम्मत झाली नाही. त्यानंही प्रत्युत्तराची अपेक्षा न करता लांब लांब पावलं टाकीत घराच्या

मागच्या भागाकडे प्रयाण केलं.

तो दृष्टिआड झाल्यावर कामाक्षी अम्मा किट्टावय्यरांकडे वळून म्हणाल्या, " आपण कोणत्याच गोष्टीची काळजी करू नका. राघवन्‌ला ताळ्यावर आणण्याची जबाबदारी माझी. आपण आधी मुंबईची कामं आटोपून या."

पद्मलोचनशास्त्रीच्या बडबडीपासून स्वत:चा बचाव करीत त्या दोघांनी रजा घेतली.

4

' देवी-सदन ' च्या मागच्या भागात एका बाजूला स्वयंपाकघरात होतं. त्याच्या विरुद्ध बाजूला कामाक्षी अम्मांचं देवघर होतं. या दोहोंच्या मधोमध मोठा ' हॉल ' होता. त्याच्या मध्यभागी झोपाळा टांगलेला होता. बैठकीच्या याच हॉलमध्ये झोपाळ्यावर येऊन राघवन् बसला होता. आईची प्रतीक्षा करीत होता. झोपाळ्याप्रमाणेच त्याचं मन हिंदोळत होतं....

नव्या दिल्लीत अर्थखात्याच्या मुख्य अधिकाऱ्याला भेटून राघवन् गावाला परत निघण्याच्या बेतात असताना त्याच्या मनात विचार आला, कराचीवरून का जाऊ नये ? कराचीला तेव्हा अखिल भारतीय काँग्रेसचं वार्षिक अधिवेशन होतं. तत्कालीन बहुतेक तरुणांप्रमाणेच राघवन्‌लाही विद्यार्थीदशेत स्वातंत्र्य-लढ्याबद्दल आवड वाटत होती. समाजसुधारणेबद्दल प्रेम व श्रद्धा वाटत होती. भारतातून जातिभेद आणि विषमता नष्ट केल्याबरच राष्ट्राचं कल्याण होईल, असा त्याला दृढ विश्वास वाटत होता.

म्हणूनच दिल्लीतील काम संपवून तो कराचीला गेला. प्रेक्षकाच्या नात्यानं अधिवेशनाला हजर राहिला. तेथील कामकाज पाहूनही राष्ट्रीय नेत्यांबद्दल त्याला वाटणाऱ्या श्रद्धेत भर पडली नाही. ' दिवसेंदिवस जग किती प्रगती करीत आहे. अमेरिकेतील फोर्ड मोटार कारखान्यात मिनिटाला तीनशे मोटारी तयार

केल्या जातात. अशा यंत्रयुगात हे लोक चरख्यासाठी डोकेफोड करीत आहेत अन् तासाला तीनशे वार सूत काढण्याचा निश्चय करीत आहेत. हे भगवान ! अशा नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली भारताची प्रगती कोणत्या काळात होणार ?' अशा विचारांनी त्यांचा उत्साह पार मावळला.

त्यानंतर तेथून तो विमान पाहायला गेला. त्या काळात विमान हे यंत्र-युगाच्या प्रगतीचं प्रतीक मानलं जात होतं. कराचीला नुकताच विमानतळ बनला होता. पाच रुपये घेऊन पाच मिनिटं आकाशोड्डाण करून देणारी विमानं तेथे होती. विमान भुर्रकन् आकाशात दोन हजार फूट उंचीवर भरारी मारायचं नि कराची शहरावरून एक चक्कर टाकून खाली उतरायचं.

विमानाच्या चढण्या-उतरण्याची गंमत पाहाण्यासाठी एका बाजूला लोकांनी गर्दी केली होती. राघवन्ही गर्दीत उभा होता. त्याच्या जवळच तीन उत्तर भारतीय स्त्रिया उभ्या होत्या. एक प्रौढ वयाची असून दोघी तरुण होत्या. त्यांतील एक तरुणी ठेंगणीठुसकी, स्थूल व सावळ्या वर्णाची होती. तिला सुंदर म्हणता आलं नसतं. पण दुसरी ? .....तिच्या लावण्याचं वर्णन करणंही कठीण ! हेमंत ऋतूतील प्रातःकाळी गवताच्या पात्यावरील दवबिंदू बालरवीच्या सोनेरी किरणांत जसे मोत्यांसारखे चकाकतात तसे तिचे पाणीदार डोळे लकाकत होते.

" आपण मद्रासी आहात काय ? "

आपल्या मृदुमधुर आवाजात त्या रमणीनं राघवन्ला इंग्रजीत प्रश्न केला. तेव्हा आपल्या कर्णरंध्रात अमृतकुंभ ओतला गेला, असं त्याला वाटलं. तिच्या शब्दांत शेले व कीट्सच्या रसाळ कवितेपेक्षा अधिक माधुर्य असल्याचं त्याला जाणवलं. त्यानं होकारात्मक उत्तर देताच त्या युवतीनं विचारलं, " काय आपण-सुद्धा विमानोड्डाण करणार ? "

" होय ! त्यासाठीच तर मी आलो आहे ! "–असं उत्तर देऊन त्यानं प्रश्न केला, " आपणही बसणार ना ?"

" आधी आपण उड्डाण करून या नि कसं वाटतं ते सांगा " युवती म्हणाली.

त्या दोन युवतीच्या आपसांतील संभाषणावरून त्या लावण्यवतीचं नाव तारिणी नि तिच्या सोबतिणीचं नाव अनुपमा असल्याचं त्याला कळलं. त्या दोघी कराची काँग्रेससाठी स्वयंसेविका म्हणून आल्या होत्या. अधिवेशनाचं सूप वाजल्यावर त्याच्याचप्रमाणे शहर बघण्यासाठी त्या बाहेर पडल्या होत्या.

राघवन् जरी विमानातून आकाशात भरारी घेत असला तरी त्याचं मन मात्र जमिनीवरच घिरट्या घालत होतं.

विमान जमिनीला लागताच त्या तिघी उभ्या होत्या त्याबाजूला राघवन्चं लक्ष गेलं. तारिणीनं उत्सुकतेनं त्याच्याकडे पाहात प्रश्न केला, "आकाशभ्रमण कसं वाटलं ?" त्यानं आकाशातील उड्डाणाचं अतिशयोक्त वर्णन सुरू केलं. 'माझं मन इथंच रुंजी घालत होतं' हे सत्य तो सांगू शकत नव्हता. वर्णन केल्यावर शेवटी त्यानं विचारलं, "आपण विमानोड्डाण करणार ना ?"

तारिणी निराशेनं उत्तरली, "नाही हो ! या दोघींना भीती वाटते म्हणून त्या मलादेखील मनाई करताहेत."

"त्यात भिण्यासारखं काही. विमानात अधिक उतारूंची सोय असती ना तर मी तिघींनाही माझ्यासोबत नेलं असतं. पण या विमानात तर 'पायलट' सोडून एकच उतारू बसू शकतो." राघवन्च्या शब्दांतून खेद व्यक्त होत होता.

"बरं, आपण आता चलू या का ?" तारिणीला सोबतच्या तरुणीनं विचारलं. तारिणी राघवन्कडे वळून म्हणाली, "आता आम्हाला जायला हवं."

आकाशातील उड्डाणाचा अनुभव घेतल्यानंतर त्याला जलप्रवासाची मौज अनुभवायची तीव्र इच्छा झाली. कराची काँग्रेसला आलेले बरेच लोक जलमार्गानं मुंबईला जाणार होते. राघवन्नं सिंदिया कंपनीच्या आगबोटीचं तिकिट घेतलं नि तो बोटीवर चढला. आगबोट लहान होती. ती समुद्रकिनाऱ्याजवळून प्रवास करणार होती. गर्दी खूप होती. मालानं भरलेली आपापली पोती, पडश्या, गाठोडी, पेट्या, वळकट्या आणि फराळ पाण्याचं सामान घेऊन उतारू केव्हाच दाटीवाटीनं भरले होते. गोंधळानं कानच काय पण बोटही फुटून जाईल असं वाटत होतं. राघवन्नं कपाळाला हात लावला !–' अरे देवा ! मी हे काय केलं ? फुकटची डोकंदुखी विकत घेतली. अडतीस तासांचा हा प्रवास कसा पार पडेल ? '....पण आगबोट सुरू होणार, इतक्यात घाईघाईनं नावेतून उतरून बोटीच्या पायऱ्या चढून आत येणाऱ्या स्त्रिया पाहून त्याला हायसं वाटलं. त्याचं मन उल्हसित झालं. क्षणात सर्व बदलून गेलं. नरकपुरीप्रमाणे वाटणारी ती गलिच्छ आगबोट गंधर्वलोकासारखी वाटू लागली. राघवन्ला बोटीत पाहून तारिणीदेखील चकित झाली. त्यानं तारिणीच्या चेहऱ्यावरून तिच्या मनातील भाव समजून घेण्याची खटपट केली, तेव्हा तिला आश्चर्यापेक्षा अधिक, आनंद झालेला दिसून आला.

राघवन् उत्तर हिंदुस्थानात पहिल्यांदाच प्रवास करीत होता. तारिणी मुंबईला राहणारी. साहजिकच उत्तर भारतातील भूप्रदेश, लोक, त्यांची राहणी, खाणंपिणं इत्यादींसंबंधी तारिणीकडून समजून घेण्यासारखं खूपच होतं. तारिणीलाही दक्षिणेसंबंधी कितीतरी माहिती काढून घ्यायची होती. त्यामुळे दोघांना बोलण्यासाठी भरपूर सामग्री मिळाली. तारिणीला तामीळ भाषा बोलता येते असं बोलण्याच्या ओघात दिसून आलं. तेव्हा तर त्याच्या आश्चर्याला अन् आनंदाला सीमाच राहिली नाही !

त्या आगबोटीत तारिणी व निरुपमा यांच्याप्रमाणे आणखीही देशसेविका होत्या. निरुपमा तारिणीच्या तुलनेनं रूपानं उणी वाटत असली व तिच्यामुळे तारिणीच्या सौंदर्याला उठाव मिळत असला तरी तिला कमालीचं कंठमाधुर्य लाभलं होतं. मग काय ! मैफल सुरू झाली. निरुपमेच्या सोबत सर्व सेविकांनी राष्ट्रीय गीतांचं सामूहिक गायन केलं. त्यांनी त्याकाळचं प्रचलित ध्वजगीत ' झंडा ऊंचा रहे हमारा ' गायलं. त्यानंतर डॉ. इक्बालांचं ' सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्तां हमारा ' हे गीत सर्वांनी मिळून म्हटलं. ही सर्व गीतं जणू आपण देवलोकातील गंधर्वकन्यांकडून ऐकतो आहोत, असं राघवन्‌ला वाटलं. इक्बालांच्या उर्दू गीताचा जेव्हा अर्थ त्यानं तारिणीकडून समजून घेतला तर त्याचं शरीर रोमांचित झालं. पहिल्या ओळीचा अर्थ कळताच तो वेडावून गेला. आणि उत्स्फूर्तपणे म्हणाला, " खात्रीनं हिंदुस्थान सर्व देशांपेक्षा चांगला देश आहे. कारण याच देशात तुमच्या-सारख्या लावण्यलतिकाच्या जन्म झाला आहे. अहो, आपल्या देशाच्या तुलनेत बसू शकेल असा देशच जगात नाही ! हे ऐकून तारिणीनं स्मित केलं. तिच्या गालावर खळ्या पडल्या. राघवन्‌च्या अंतःचक्षूंनी ते दृश्य असं काही टिपलं की, अजिंठ्या-मधील कधीही न पुसणाऱ्या रंगातील युवतीच्या चित्रासारखं ते सदैव ताजं राहावं !

या घटनेला आता जवळजवळ तीन वर्षं झाली आहेत. तेव्हापासून राघवन् आणि तारिणी यांच्यातील पत्रव्यवहार सुरू झाला. पण त्यांचा संबंध पत्रव्यवहारा-पुरताच मर्यादित राहिला नव्हता. एकदा राघवन् काही कामासाठी मुंबईला गेला तेव्हा तारिणीनं त्याला एलिफन्टा लेण्यांतील अनुपम चित्रकला दाखवण्यासाठी नेलं होतं. आणि तारिणी जेव्हा दिल्लीला गेली तेव्हा नोकरीच्या निमित्तानं तिथं वास्तव्याला असलेल्या राघवन्‌नं तेथील प्राचीन किल्ले, भव्य मशिदी व मोगल बादशहांनी बांधलेले संगमरवरी महाल दाखवून संबंध घनिष्ठ केले होते....

सारांश, गेली तीन वर्षं, राघवन्‌च्या जीवनात सत्ययुगासारखी लोटली होती.

नोकरीत उन्नती करीत करीत तो वरच्या पदावर पोचला होता. त्याचे विभाग-प्रमुख एक इंग्रज गृहस्थ होते. ते प्रसन्न झाले होते. मी तुला आपल्यासोबत विलायतेला घेऊन जाईन, असं त्यांनी म्हटलं होतं. तो एकीकडे व्यवसायात उन्नती करीत होता तर दुसरीकडे प्रेमाच्या राज्यात कल्पनातीत विहार करीत मधुर स्वप्नं रंगवत होता. त्या काळात त्याच्या पायातळी सुवर्णकिरणांच्या पायघड्या अंथरलेल्या होत्या. कानात स्वर्गलोकातील वीणेचे मधुर झंकार गुंजन करीत होते....

या सर्व सुखांचा अंत तर जवळ आला नाही ना ? हे सारं काय घडतं आहे ? ... त्याचा विश्वास बसत नव्हता !

पाहुणे रजा घेऊन बाहेर पडल्यावर कामाक्षी अम्मा आत आल्या. चिंताग्रस्त चेहऱ्यानं राघवन् झोपाळ्यावर हळूहळू झोके घेत होता. कामाक्षी अम्मा त्याच्या पुढं भिंतीलगतच्या खुर्चीवर येऊन बसल्या.

क्षणभर राघवन् काहीच बोलला नाही. मग आईकडे वळून त्राग्यानं म्हणाला, " आई, तू नि बाबांनी मिळून माझं आयुष्य बरबाद करायचं ठरवलं आहे का ग ? मला आनंदात पाहणं बरं नाही का वाटत तुम्हाला ? बाबांच्या स्वार्थाला तू देखील बळी पडलीस ? "

तो संतापून असे काही प्रश्न विचारील हे अपेक्षित होतं. त्या प्रतीक्षाच करीत होत्या, म्हणून त्या मुळीच गांगरल्या नाहीत. उलट, संयमपूर्वक बोलल्या, " बाळ राघव, आपल्या वडिलांबद्दल मला काही विचारू नकोस. माझ्याबद्दल काय ते बोल. काय सांगू बेटा ! तुझ्या जन्मापासून गेल्या चोवीस वर्षात, अगदी आजपर्यंत तुझ्या-सुखासमाधानाखेरीज, दुसरा कोणताच विचार माझ्या मनाला शिवला नाही. पुन्हा असं वेडंवाकडं बोलू नकोस. तुझ्या सुखाशिवाय वेगळा असा स्वार्थ मला ठाऊक नाही ! " असं बोलता बोलताच त्यांचे डोळे भरून आले.

" माझ्या आनंदाची एवढी अभिलाषा होती तर तारिणीला का पळवून लावलंस ? "–राघवन्नं चिडून विचारलं.

" हाय रे दुर्दैवा ! केवढा खोटा आरोप हा ? मी काय त्या पोरीला घालवून दिलं ? माझ्या घालवण्याला ती भीक घालणार होती होय ? तूच सांग तिचं तुझ्यावर खरंच प्रेम असतं तर माझ्या म्हणण्यानं ती गेली असती का ? नीट विचार करून काय तो निर्णय घे. "

आईचे हे शब्द ऐकताच तो विचारात पडला. मग म्हणाला, " माझ्या अनुपस्थितीत इथं काय घडलं ते खरं खरं सांग पाहू. "

" काय सांगू कपाळ ? अरे, ती जे काय बोलली ते सांगायला माझी जीभ अडखळते. ती म्हणालीहोती– ' मी कोणती कल्पनाचित्रं मनाशी रंगवून इथं आल्ये होत्ये, हे कसं सांगू ? पण इथं येऊन बघितल्यावर निराशाच पदरी पडली. तोंडावर आम्हा दोघांना गावंढळ म्हणायला भ्याली नाही ! त्याचंही मला दुःख नाही. आमच्याबद्दल तिला काय वाटलं याची आम्हाला पर्वा नाही. पण तुझ्याबद्दल तिची काय धारणा आहे याची तुला कल्पना आहे का ! तू पक्का शुंभ आहेस, असं म्हणत होती. मी हे सहन करू शकल्ये नाही राघव ! अरे, ती तर असंही म्हणाली, ' माडी गुंडाळलेली कुठलीही पोरगी दृष्टीस पडली तर तो दात विचकत मागं गोंडा घोळत फिरतो. खरं सांगायचं तर त्याला चार समजुतीच्या गोष्टी ऐकवून ताळ्यावर आणण्यासाठीच मी मद्रासला आल्ये आहे.' आणखी कितीतरी बडबडत होती. तिचे अर्वाच्य शब्द मला सहन झाले नाहीत ! " असं बोलून कामाक्षी अम्मा हुंदके देत पदरानं अश्रू पुसू लागल्या

राघवन्‌ला संताप आला. मात्र, मनातील संताप आईचा की तारिणीचा, हे त्यालाही नीटसं कळलं नाही.

अचानक तारिणीच्या पत्रात लिहिलेल्या एका गोष्टीचं त्याला स्मरण झालं ती कठोरपणानं म्हणाला " आता पुरे बरं आई ! आपलं रडणं थांबवून माझ्या प्रश्नाचं उत्तर दे, तू, तारिणीचे पाय धरलेस ते काय म्हणून ? अन् तिच्याकडे कशाची याचना केलीस ? "

" अस्सं ! तिनं तुला तेदेखील लिहिलं, असं सांग ना ? . . . तुला खरंखोटं काय लिहिलं ते काही मला माहीत नाही. मी मात्र जे काय घडलं ते तुला खरंखरं सांगून टाकत्ये. माझ्याबद्दल ती जे काही उपेक्षेनं बोलली ते ऐकून मी संकोचल्ये. म्हणाल्ये ' बाई ग ऽ काही जरी असलं तरी माझा लेक सुखी व्हावा अशीच प्रार्थना मी करीत आल्ये आहे. जात, कुळ नि राहणी वेगळी असली तरी तू आमची भाषा बोलत्येस. एवढंच माझ्या दृष्टीनं पुरे आहे. मात्र, माझी तुझ्याजवळ एक प्रार्थना आहे हं ! तू माझ्या मुलाला माझ्यापासून तोडू नकोस. तुम्हाला हवं तिथं जा. कुठंही राहा. पण मला सोबत न्या... तुमच्या सेवेत मी धन्यता मानेन. हवं तर तुझ्या पाया पडत्ये, मात्र माझं एवढं मागणं मान्य कर. ' इतकं बोलून मी तिचे पाय धरले. माझ्या शब्दांवर तुझा विश्वास बसणार नाही. तुला विश्वास ठेवणं कठीण जाईल. तिनं एवढ्या घाईनं इथून का निघून जावं, हे मला कळत नाही . . . पुढचं ऐक. ती अिथं असतानाच– कोणीतरी बाहेरचं दार खडखडावलं अन् विचार

तारिणीदेवी अिथं आहेत का ? ' ही झटकन् उठून बाहेर गेली. परत आली तेव्हा तिच्या हातात एक चिठ्ठी होती. चिठ्ठी वाचून होताच तिनं म्हटलं, बरं मी आता येत्ये. माझ्या हातून आपल्या मुलाचं काही वाईट होणार नाही. काळजी करू नका.' एवढं बोलून लांब लांब पावलं टाकीत ती बाहेर उभ्या असलेल्या गाडीजवळ गेली. मोटार तयार होती. ती आत बसताच गाडी वायुगतीनं दृष्टिपार निघून गेली ... जाताना घाईघाईत ती चिठ्ठी विसरून गेली. मी ती जपून ठेवली आहे. हवी असल्यास तुला आताच दाखवत्ये. " असं म्हणता म्हणताच कामाक्षी अम्मा उठून कपाटाकडे गेल्या. कपाटातून पत्र घेऊन आल्या. घडधडत्या अंतःकरणानं राघवन्‌नं ते पत्र हातात घेऊन एका दमात वाचून टाकलं.

'प्रियतमे ! माझं काम अपेक्षेपेक्षा लवकर संपलं ! आज संध्याकाळच्या मेलनं मुंबईला जायलाच पाहिजे. यावेळी तू हॉटेलात येऊ शकत नसलीस तर सरळ रेल्वेस्टेशनवर ये. तुझं तिकीट काढलेलं असेल. श्री. राघवन् याच्याबरोबर चाललेला प्रेमाभिनय कुठवर आला आहे ? आधीच त्याला दोन हजारांचा भुर्दंड बसलेला आहे. आणखी लोभात पडशील तर भलतंसलतं होऊन जायचं ! '

हे वाचताच राघवन्‌चे डोळे रागाने लाल झाले. त्याच्या अंतःकरणातील ज्वालामुखी प्रदीप्त झाला. आगीचे लोट उसळू लागले. श्वासोच्छ्वास जोरात सुरू झाला.

क्षणभर तो स्तंभित होऊन स्वस्थ बसून राहिला. मग झटकन् उठून आईच्या पायांवर लोटांगण घालून म्हणाला, " आई ! माझ्यासारखा मूर्ख मीच ! तारिणी म्हणाली तेच खरं ! माझ्यासाठी तिच्या पायांवर डोकं घासून विनवणी करण्या-इतकी मी तुझी दुर्दशा केली. आई, या क्षणापासून तूच माझी देवता ! तू म्हणशील तसंच करीन. तू सांगशील त्या मुलीशी लग्न करीन. यापुढं तुझं मन कधीच दुखावणार नाही. "

5

मुंबईच्या दादर भागातील एक गल्ली. तिचा पत्ताही लागणं कठीण. अशा त्या अज्ञात गल्लीतलं तेवढंच अज्ञात घर. याच घराच्या चौथ्या मजल्यावर तीन खोल्या नि स्वतंत्र बाथरूम असलेल्या ब्लॉकमध्ये किट्टावय्यरांची बहीण राजम्मा गेली वीस वर्ष राहात होती. याच तीन खोल्यांत तिनं आपल्या कौटुंबिक जीवनातील सुखदुःखं अनुभवली होती. तिथंच मुलांना जन्म दिला. तिथंच त्याचं संगोपन केलं आणि अपत्यं मृत्युमुखी पडली तेव्हा मनसोक्त आक्रोशही केला होता. याच घरात वैवाहिक जीवनातील नवतीच्या दिवसांचा पतीच्या धुंद सहवासात आनंद लुटला होता आणि त्याच्या दुराचरणानं कंटाळून मुक्त अश्रू ढाळले होते....

त्याच तीन खोल्यांपैकी एकीत राजम्मा बिछान्याला खिळून पडली होती. वीस दिवसांपासून ती बिछान्यात पडून होती. ती या आजारातून उठेल की नाही याबद्दल शंका होती. स्वतः राजम्मानं तर आशाच सोडली होती.

सीतेचं शालेय शिक्षण एक वर्षापासून बंद करण्यात आलं होतं. लेकीला कसं घर मिळतं कुणी सांगावं; अशा कल्पनेनं राजम्मानं स्वयंपाकपाण्यासारख्या घरकामात तिला तरबेज बनवून ठेवलं होतं. तेच घरकामाचं शिक्षण आता उपयोगी पडलं होतं.

सीता यावेळी आपल्या गॅलरीत उभी राहून मोठ्या उत्सुकतेनं गल्लीत डोकावत होती. " सीता ऽ " खोलीतून क्षीण आवाजात हाक आली.

" आल्ये ग आई ऽ – " सीतेने चटकन् साद दिली.

" आत्ता बाहेर कारचा आवाज आला ना ग ? "

" छे ग आई ! ती कार कुठंतरी दुसरीकडे निघून गेली. तसा काही फार उशीर झालेला नाही काही ! आता कुठं गाडी आली असेल. स्टेशनातून इथं यायला पंधरा मिनिटं तरी लागतात. अग आई, असं उतावीळ होऊन काय उपयोग ?"

एवढ्यात पुन्हा मोटारीचा आवाज आला. सीता धावतच गॅलरीत गेली. गल्लीत डोकावून पाहू लागली. मोटार तिच्या घरापुढं येऊन उभी राहिली.

" आई ग ऽ, मामा आले ! मी खाली जाऊन त्याना घेऊन येत्ये. " असं बोलून ती आनंदानं जिन्याच्या पायऱ्या धाड्धाड् उतरू लागली. ती दुसऱ्या

मजल्यावर पोचलीही नव्हती, तोच हातात ' हॅन्ड बॅग ' घेतलेले डॉक्टर वर येताना दिसले. संकोचून ती जागीच उभी राहिली. तिनं डॉक्टरांना विचारलं, " डॉक्टर, आता आलेली गाडी आपलीच होती ? मला वाटलं, मामाच गावावरून आले. "

" अस्सं ! तर आज तुझे मामा यायचे आहेत ! ठीक. पाहू, आता ते आल्यावर तरी तुझ्या आईची प्रकृती सुधारते की काय ? "

डॉक्टरांच्या हातातून सीतेनं त्यांची ' हॅन्ड बॅग ' घेतली. दोघंही काही न बोलता वर आली.

रोजच्याप्रमाणे डॉक्टरांनी थर्मामीटर लावून ताप घेतला. पाठीवर नळी लावून पाहिली. टॉर्चच्या उजेडात घशात बघितलं. सर्व सोपस्कार झाल्यावर ते ' प्रिस्क्रिप्शन ' लिहिणार एवढ्यात दुरैस्वामी व किट्टावय्यर खोलीत येऊन पोचले.

राजम्माचा मलूल चेहरा पाहताच किट्टावय्यर सुन्न झाले ! गावाहून निघताना जरी ते उद्विग्न मनस्थितीत असले तरी मद्रासला पद्मलोचन शास्त्रींकडे भावी जावयाला बघितल्यावर ती उद्विग्नता बरीच कमी झाली होती. तुमच्या मुलीचं लग्न या मुलाबरोबर होणार असं निश्चित समजा, अशी मखलाशी सुब्बय्यरांनी करताच उद्विग्नतेची जागा उत्कंठेनं घेतली होती. त्यांचा उत्साह द्विगुणित झाला. त्या उत्साहाच्या भरात त्यांचं मन म्हणालं होतं, ' राजमची तब्येत एवढी बिघडलेली नसणार. थोडा ताप आला असेल झालं ! "

पण मुदतीच्या तापानं अगदीच क्षीण झालेलं राजम्माचं दुबळं शरीर बघून त्यांच्या हृदयाला कमालीच्या वेदना झाल्या. डबडबलेल्या डोळ्यांनी डॉक्टरांकडे पाहून त्यांनी विचारलं,

" डॉक्टर, राजमची प्रकृती कशी आहे ? "

" आपण आलात ! आता त्या लवकर बऱ्या होतील. मला वाटतं, आपली बहीण शरीरानं कमी पण मनानं बरीच आजारी आहे. आता काही आपण या दुखण्यातून उठत नाही, असं तिच्या मनानं घेतलं आहे. अशा अवस्थेत मी कितीही औषधं दिली तरी काय होणार ? " — असं बोलून डॉक्टर जायला निघाले. त्यांना पोचवायसाठी दुरैस्वामी त्यांच्या पाठोपाठ बाहेर पडले.

किट्टावय्यर आपल्या लाडक्या बहिणीजवळ जाऊन बसले. आतापर्यंत डोळ्यांत भरून राहिलेले अश्रू आता वाहू लागले. अंगावरील उपरण्यानं डोळे कोरडे करीत ते म्हणाले, " राजम, तुला धीर देण्याऐवजी मी तुझ्या दुःखात भर घालतो आहे. पण इतके दिवस तुझी साधी विचारपूसदेखील केली नाही

याचं मला फार वाईट वाटतंय. "

" भाऊ, यात तुझा तरी काय दोष आहे ? तुझ्या काळजी करण्यानं काय फरक पडणार होता ? माझ्या नशिबानं पाठ फिरवली आहे तिथं काय करणार होतास ? मात्र या खेपेला तू आला नाहीस तर कसं होणार, याचीच मला भीती पडली होती. तू आलास हे फार बरं झालं ! एकदा माझ्या मनातल्या गोष्टी, तुला सांगून मोकळी झाल्ये, म्हणजे डोक्यावरचं ओझं हलकं झाल्यासारखं वाटेल. मग शांत मनानं देवाघरी जायला मी मोकळी होईन ! "

तिचं हे निर्वाणीचं बोलणं ऐकून किट्टावय्यरांचं हृदय दुःखानं विदीर्ण झालं. कसं तरी रडू थोपवून ते उद्गारले, " वा ऽ ग वेडे ! असं काय बोलतेस ? आता तुला काही व्हायचं नाही. देव तुला खडखडीत बरी करील. तू आपल्या सीतेचं लग्न झालेलं पाहशील. नातवंडांचं कौतुक बघत आनंदानं जगशील ! "

राजम्मा कोरडं हसली. त्या हसण्यात तीव्र निराशा डोकावत होती. तरी मरणकळा पसरलेल्या तिच्या निस्तेज मुखावर त्या हसण्यानं टवटवी आली.

सहज राजम्माचं लक्ष दाराकडे गेलं. तिथं दाराआड उभी राहून अश्रुपात करणारी सीता तिला दिसली. तिनं सीतेला हातानं खूण करून जवळ बोलावलं. " सीता मामाजी गावावरून आले आहेत बेटा. त्यांना तुझ्या हातची कॉफी नाही का देणार ?"

" आत्ता एका मिनिटात आणत्येच हं आई ! " असं बोलून सीता स्वयंपाक घरात निघून गेली.

सीता नजरेआड होताच राजम्मा भावाला म्हणाली, " भाऊ, पुढं काय व्हायचं ते होऊंदे. मला मात्र जे काय सांगायचं ते आताच सांगून टाकत्ये. पण त्याआधी माझं एक काम आहे तुझ्याकडे. तू आपल्यासोबत पेटी आणली आहेस ना ? ती जरा इकडं घेऊन ये. "

किट्टावय्यरांना तिच्या उतावळेपणाचं कारण कळेना. त्यांनी म्हटलं, " पेटीबिटी आणली आहे ग ! ती काय बाहेरच्या खोलीत आहे. पण ती आताच इकडे आणायला हवी आहे का " ?

" भाऊ पेटी आणायला मी उगीच सांगत नाही ! अन् हे पाहा, ती आणायच्या आधी, हे डॉक्टरांच्या गाडीत बसले की नाही, एवढं बाहेर जाऊन बघून ये. बहुतेक ते डॉक्टरांबरोबर औषध आणायला जात असतात. " राजम्मा सारखं बोलत होती.

" राजम, असं सारखं बोलू नकोस बरं. आपण सावकाश बोलू. मी काही परतीच्या गाडीनं जात नाहीय्. "

त्यांना मधेच थांबवत राजम्मा म्हणाली, " तुला पुण्य लागेल बाबा ! माझं एवढं ऐकून घे. मला काही महत्त्वाचं सांगायचंय्. वेळीच सांगून टाकलेलं बरं ! "

तिच्याशी वाद घालण्यात अर्थ नाही असं बघून किट्टावय्यर गुपचुप बाहेरच्या गॅलरीत आले. त्यानी खाली बघितलं. राजम बोलली तसंच झालं होतं. डॉक्टरांबरोबर दुरैस्वामी मोटारीत बसले होते.... गाडी निघून गेल्यावर किट्टावय्यर बैठकीच्या खोलीत आले. तेथून त्यांनी आपली पेटी राजम्माच्या खोलीत आणली.

" भाऊ, जरा दार लावून घे अन् तुझी पेटी माझ्याजवळ आणून ठेवा. ' किट्टावय्यरांनी तिच्या सांगण्याप्रमाणे केलं. ते आश्चर्यानं राजमकडे पाहातच राहिले.

राजम्मा झटकन् उठून बसली. तिनं डोक्याखालच्या दोन उश्यांपैकी एक हातात घेतली. उशीवरची खोळ काढून टाकली. उशीच्या तोंडावरची शिलाई उसवून आत हात खुपसला. आधी नोटांची दोन बंडलं बाहेर काढली. नंतर एक उत्कृष्ट बनावटीचा रत्नहार.

" भाऊ, या गड्ड्यांत दोन हजार आहेत. पैसे नि रत्नहार पेटीत सावध-पणानं दडवून ठेव. चल, घाई कर बरं. "

किट्टाचावय्यर घुटमळले. त्यांच्या मनात अनेक शंका डोकावल्या. तरीसुद्धा त्यांनी स्वप्नात असल्यासारखे पैसे व रत्नहार पेटीत सुरक्षित ठेवले. मग पेटीला कुलूप ठोकून ते मोकळे झाले. आता ते बहिणीकडे वळले.

" भाऊ. मला जे काय सांगायचं आहे ते सांगितल्याशिवाय मी जाणार नाही. अन् अशी गेलेच तर माझ्या आत्म्याला शांती लाभणार नाही ! "

" राजम, असं काय ? मनात येईल ते बोलतेस ? आता गप्प बैस पाहू ! मला तुझ्याकडून काहीएक ऐकून घ्यायचं नाही ! " किट्टाचावय्यरांनी तिला थांबवण्यासाठी म्हटलं.

राजम्मा थोडा वेळ गप्प बसली. थकवा कमी होताच तिनं बोलायला सुरुवात केली–" तू ऐक नाहीतर नको ऐकूस, मी तर सांगून टाकणारच ! आताच मी तुला जे दोन हजार रुपये दिले ते सीतेच्या लग्नासाठी. रत्नहार

तिलाच लग्नात द्यायचा. भाऊ, सीतेच्या लग्नाची खटपट तूच करायला हवी. तिला आपल्यासोबत गावाला घेऊन जा. तिथंच एखादा चांगलासा वर पाहून तिचं लग्न लावून टाक !.... मला आश्वासन हवं आहे. त्याशिवाय मनाचं समाधान होणार नाही. कदाचित् डॉक्टर म्हणाले त्याप्रमाणे माझी तब्येत सुधारूनही जाईल ! ''

" राजम, ही काय बोलायची गोष्ट झाली ? अग ऽ, मी काय तुझ्या पोरीला वाऱ्यावर सोडून देईन ? ललिता जशी माझी मुलगी तशीच सीतेलाही मी माझी मुलगीच मानतो. निश्चितच मी तिच्यासाठी चांगलासा वर शोधून धूमधडाक्यात लग्नाचा बार उडवून देईन. तू आपल्या डोळ्यांनी तिचं लग्न झालेलं पाहशील, तृप्त होशील. पण तिच्या लग्नासाठी आपल्या नवऱ्याच्या नकळत पैसे जमवायची तुझ्यावर का पाळी यावी, हे मला समजत नाही. त्यांना या गोष्टी कळल्या तर तुझ्याबद्दल ते काय ग्रह करून घेतील ? माझ्याबद्दल काय वाटेल याचा नीट विचार केलास ? मला तर तुझं हे कृत्य मुळीच आवडलं नाही ! ''

" भाऊ, जरा दमानं घे ! फाडफाड बोलत काय सुटलास ? माझ्यावर भरवसा ठेव. मी भलत्याच मार्गावर जाणार नाही. त्यांच्या कमाईतून एक दिडकी मी चोरलेली नाही, उलट, लग्नात तू मला जे काय दिलंस, तसंच त्यांनी सुरुवातीच्या काळात हौसेनं जे सोनंनाणं घेऊन दिलं, ते विकून अडी-अडचणीच्या काळात मी त्यांना मदतच केली आहे. घरखर्चासाठी त्यांच्याकडून मिळणाऱ्या तुटपुंज्या रकमेतून इतके पैसे वाचवणं कसं शक्य होतं ? या मुंबईत कुटुंब चालवून बघ म्हणजे तुला माझ्या बोलण्याची खात्री पटेल !....हे पैसे व रत्नहार सीतेच्या लग्नासाठी देवाच्या दयेन मला मिळाले आहेत. माझं ऐकून घेशील तरच ती कहाणी तुला कळेल ! भाऊ, आत्ता मी जे काय सांगणार आहे ते सीतेच्या वडिलांना कळता उपयोगी नाही. त्यांनाच काय कुणालाही, वहिनीलासुद्धा याचा पत्ता लागू देऊ नकोस, असं मला म्हणायचं आहे. ''

" नाही सांगणार माझे बाओ ! त्यापेक्षा तू मला काय ते न सांगितलेल बरं नाही का ? बोलायला लागलीस की दम लागतो. मी काय मुंबओला आलो तो तुला त्रास द्यायला का ? ''

" माझं ऐकून तर घेशील ? मला त्रासबीस काही होत नाहीय्.' असं बोलून राजम्मा सांगू लागली. 'या खपेला मला आजारी पडून वीस दिवस झाले.

यातल्याच एक दिवसाच्या संध्याकाळची ही घटना. देवीच्या फोटोपुढं दिवा लावून नमस्कार केला अन् प्रार्थना केली, हे पराशक्ती माते, माझ्या सीतेचं रक्षण कर ! तुझ्या कृपेनं तिला चांगलं घर मिळून दे. चांगल्या कुटुंबात पडून तिचं सारं आयुष्य सुखासमाधानात जाऊ दे ! ... प्रार्थना आटोपताच अंग भारी पडल्यासारखं वाटलं म्हणून या खोलीत येऊन खाटेवर पडल्ये. त्यावेळी सीता आपल्या मैत्रिणीला भेटायला गेली होती. हे ऑफिसातून आले नव्हते. घरात एकटीच होत्ये मी. भोवळ आल्यासारखी वाटली. थोडा वेळ काहीच सुचेना. डोळे मिटून राहिल्ये. बरं वाटल्यावर डोळे उघडून पाहिलं. खोलीचं दार अर्ध उघडं दिसलं. कदाचित् दार उघडण्याच्या चाहुलीनं जाग आली असावी ...

कोणी बरं दार उघडलं असेल ? —सीता असेल की तिचे वडील; असा विचारच करीत होत्ये... एवढ्यात दरवाजा पूर्ण उघडला गेला. तो सीतेनं उघडला नव्हता की तिची वडिलांनी ! दरवाजा उघडणारी होती स्त्री, अगदीच अपरिचित होती. डोक्यावरून बराच पुढं पदर ओढला होता तिनं. माझ्याजवळ येऊन तिनं मराठीत विचारलं " राजम्मा तुम्हीच ना ? " वीस वर्ष अिथं राहून मला मराठी चांगलं कळतं. तरी मी काहीच उत्तर दिलं नाही. वाटलं ही बाओ कोण, कुठली ? आपल्याशी बोलायला ही का बरं आली असेल ? ...

चटकन् अधीरतेनं तीच बोलू लागली,—" हे बघा ताओ, एका जरूरीच्या कामासाठी आल्ये आहे. माझ्याकडे अधिक वेळ नाहीं. राजम्मा तुम्हीच नं ? दुरैस्वामींच्या पत्नीच ना तुम्ही ? " " होय ! " तिच्या प्रश्नाचं मी जरा मोठ्यानं उत्तर दिलं. " पण यावर विश्वास कसा ठेवायचा ? " असं विचारून ती इकडेतिकडे पाहू लागली. भिंतीवरचे फोटो पाहताच ती जवळ जाऊन बारकाईनं बघू लागली. एका फोटोवर तिची दृष्टी खिळून राहिली. नंतर मागं वळून ती माझ्याकडे आली. रोखून पाहिलं नि म्हणाली. " खात्रीनं तुम्हीच राजम्मा आहात. " असं बोलून ती वेगानं दाराकडे गेली. दरवाजा बंद करून घेतला. परत माझ्याजवळ आली. मग माझ्याकडे पाठ वळवून सोबत आणलेल्या कातडी बॅगमधून काहीतरी बाहेर काढलं. नंतर माझ्याकडे वळून म्हणाली, " राजम्मा, आता मी जे तुम्हाला सांगणार आहे ते ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल. पण त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. बरं ते मी नंतर सांगत्ये. आधी हे रुपये व रत्नहार ठेवा. रुपये दोन हजार आहेत अन् रत्नहार फारच मौल्यवान आहे. हे सर्व तुमच्या मुलीच्या लग्नात देऊन टाकण्यासाठी हं ! यात विचार

करण्यासारखं, घाबरण्यासारखं काही नाही. नि:संकोच घ्या हे. ' मला खरोखरीच नवल वाटलं. आनंदही झाला, शंकाही आली . . ही आहे तरी कोण ? मला हे सारं का देते आहे ? सारं विचित्रच घडत होतं तरी मी तिचं म्हणणं टाळू शकल्ये नाही. ' घ्या. लवकर घ्या ! ' असं तिनं म्हणताच मी दोन्ही हात पुढं करून त्या वस्तू घेतल्या. ' सांभाळून ठेवा ! ' ती म्हणाली. ' हो ! नंतर मी पेटीत ठेवतेच.' असं बोलन मी पैसे व हार उशीखाली झाकून ठेवून दिला.

मग तिनं म्हटलं, "राजम्मा, अशा अनपेक्षित रीतीनं ह्या वस्तू आणून देणं तुम्हाला विस्मयात टाकणारं आहे. तुम्हाला वाटेल, ही कोण अनोळखी बया ? आपल्याला हे का देतेय् ? तुम्ही मला ओळखत नसला तरी मी तुम्हाला खूप दिवसापासून ओळखत्ये. काही काळापूर्वी अगदी अजाणतेपणी मी तुमचं फार नुकसान केलं होतं. त्याची भरपाई या रूपानं करत्ये आहे. हा ऐवज नीट जपून ठेवा. मुलीच्या लग्नात तिच्या स्वाधीन करा. मात्र एक लक्षात असू द्या. हे मी दिल्याचं कुणाला कळू नये. प्रसंगवशात कुणाला सांगावंच लागलं तरी आपल्या पतीसमक्ष या रहस्याची वाच्यता होऊ नये. समजलं ? " " होय समजलं ! " मी कुजबुजल्ये. " माझ्या सांगण्यानुसार कराल नं ? " तिनं बजावलं, तेव्हा मी गप्प राहिल्ये.. पाहता पाहता तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. ती आपल्या बॅगेत हात घालून तिनं आणखी काही बाहेर काढलं. तीक्ष्ण धारेची सुरी होती ती ! माझ्या डोळ्यापुढं तिचं उघडं पातं नाचवीत ती कडाडली, ' मी चांगल्याशी चांगलं पण वाइटाशी फार वाईट वागत्ये. मी सांगेन तसंच तुम्हाला वागावं लागेल. मी अिथं येऊन गेल्याची गंधवार्ता तुमच्या पतीला लागायला नको. तुम्ही त्याला हे सांगितल्याचं जर का मला कळलं तर याचं सुरीनं तुमच्या काळजाचा छेद घेऊन आतडी बाहेर काढीन. लक्षात ठेवा ! "

असं बोलून तिनं आपली कातडी बॅग बंद केली. जाताजाता ती पुन्हा गुर-कावली, " राजम्मा, सावधान ! माझं बोलणं नीट लक्षात असू दे. " तिनं दार उघडल्याचा, ती गॅलरीतून चालल्याचा नि जिना उतरल्याचा आवाज स्पष्टपणे माझ्या कानावर आला....ती गेली तेव्हा माझ्या जिवात जीव आला. हिम्मत आली... हे सारं स्वप्न असावं असंही वाटलं. उशीखाली हात घालून पाहिला तर तिथं तिनं दिलेल्या वस्तू हाताला लागल्या. म्हणजे मी अनुभवलं ते स्वप्न नसून सत्य होतं तर. ... एवढ्यात सीता बाहेरून आली. आत येत तिनं विचारलं, " आई, कोणी आलं होतं का ग ? तसा आवाज ऐकू आला खरा ! ... का ऽ ग आई अवेळी

झोपलीस ? " आत येताच तिला टेबलावर सुरी दिसली. सुरी पाहताच सीता भयभीत झाली. तिनं माझ्याकडे चौकशी केली, ' टेबलावर सुरी कुठून आली ग आई ? हिची मूठ तर विचित्रच दिसते. ' असं बोलून सुरी उचलायला ती पुढं झाली. ' नको ग बाई त्या सुरीला हात लावूस ! ' मी घाबरून म्हणाल्ये. माझा नकार ऐकून सीता टेबलाकडे न जाता माझ्याकडे एकटक पाहात राहिली. इतक्यात घाईघाईनं जिन्याच्या पायऱ्या चढण्याचा आवाज आला. एकदम माझ्या डोक्यात विचार आला, सुरी कुठंतरी लपवावी, नाहीतर दरवाज्याला कुलूप ठोकून द्यावं. पण काही करण्यापूर्वीच ती वादळासारखी आत घुसली. सरळ टेबलापाशी जाऊन तिनं सुरी पिशवीत ठेवून घेतली. मग आळीपाळीनं माझ्याकडे अन् सीतेकडे बघत तिनं विचारलं, ' राजम्मा, हीच ना तुमची मुलगी ? ' मी म्हटलं, ' होय ' तिनं झटकन् सीतेला जवळ ओढलं. तिच्या कपाळाची, गालाची चुंबनं घेतली, नुसता वर्षाव केला ! ' देव तुझं कल्याण करो ! पुरुषांच्या जुलमातून तुझं रक्षण करो ! ' असा आशीर्वाद देऊन ती चालती झाली.... तिच्या पावलांचा आवाज ऐकू येणं बंद होताच सीता माझ्याजवळ येऊन विचारू लागली, ' आई, कोण आहे ग ही वेडी ? ' त्यावर मी उत्तरल्ये ' नाही ग बाई, ती वेडी नाही ! फार चांगली बाई आहे. माझी तिच्याशी फार जुनी मैत्री आहे. ' मी चक्क खोटं बोलत होत्ये. पण तसं बोलण्याची बुद्धी का झाली कुणास ठावूक ?" ...

इतकं सर्व ऐकल्यावर किट्टावय्यरांना वाटलं, ही आधी खोटं बोलली का ? पण आतापर्यंत तिनं जे सांगितलं ते तरी कुठं खरं होतं ? पोरीसाठी नवऱ्याच्या आडून पैसे साठवीत राहिली बिचारी ! अन् हे लपवण्यासाठी कल्पित कहाणी सांगत्ये आहे ! वा रे आईची ममता !

दुसऱ्या दिवशी डॉक्टरांनी राजम्माची तपासणी करून सांगितलं, " आज तब्येत बरीच सुधारल्यासारखी वाटते. " त्यांनी औषधोपचार लिहिण्यासाठी पेन काढून कागद हातात घेतला. औषधांबद्दल विचार करीत असताना त्यांना वेगळीच कल्पना सुचली. कागद-पेन खाली ठेवून ते म्हणाले,

" मिस्टर दुरैस्वामी, एक गोष्ट बोलू ? "

" अवश्य! त्यासाठी विचारणा कशाला हवी ? "

" आपल्या सौभाग्यवतीसाठी मला एक गुणकारी औषध सुचलं आहे. हवापाण्यात बदल झाला तर त्यांची तब्येत आपोआप सुधारेल. गेली वीस वर्षं त्या मुंबईतच आहेत ना ? थोड्या दिवसांसाठी का होईना कुठं दुसरीकडे

जाऊन राहिल्या तर हरकत नाही ना ? आपले शालक श्री. किट्टावय्यर खेड्यात राहातात. त्यांच्यासोबत काही दिवसांसाठी गावाला द्या नं पाठवून."

"ते नेत असल्यास माझी ना नाही."

"मी तर केव्हाही तयार आहे. अगदी याच क्षणी ! आनंदानं नेतो...मी तर गेल्या वर्षीच घेऊन जातो म्हटलं होतं. पण हे पाठवायला तयार नव्हते."

"खरं म्हणजे मी तयार होतो हो ! आपली बहीणच न जाण्याचा हट्ट धरून बसली होती."

"आताही मी तेच म्हणत्ये आहे." राजम्मानं मधेच तोंड घातलं.

"असा हट्ट करणं बरं नव्हे. हवापालट झाला नाही तर तब्येतीत सुधारणा होणार नाही."

"डॉक्टर ! गेली वीस वर्षं इथंच राहिले. आता उरलेसुरले दिवस इथंच काढू द्या !"

"जशी तुमची इच्छा ! तुमच्या जाण्यावर मी कसा भर देऊ ?" असं बोलून डॉक्टरांनी पुन्हा पेन उचललं.

डॉक्टर निघून गेल्यावर किट्टावय्यर आणि सीता या दोघांनी तिच्या खूप विनवण्या केल्या. मोठ्या मिनतवारीनं राजम्मा गावाला जायला कबूल झाली. सीतेच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

त्या रात्रीपासूनच राजम्माची प्रकृती हळूहळू सुधारू लागली. किट्टावय्यर आल्यापासून ठीक आठव्या दिवशी बहिणीला व भाचीला घेऊन बोरीबंदर स्टेशनवर मेलमधे बसले. दुरैस्वामी त्यांना पोचवायला स्टेशनवर आले होते.

गाडी सुटेपर्यंत किट्टावय्यर डब्याच्या दारात उभे राहून मेहुण्याशी बोलत होते. गप्पा करता करता त्याचं लक्ष वर्तमानपत्र विकणाऱ्या पोराकडे गेलं. तो तारस्वरात ओरडत होता, 'रजनीपूरच्या महाराजांच्या हत्येचा प्रयत्न ! एका महिलेचा धाडसी हल्ला ! हातातल्या सुऱ्यानिशी महिलेला अटक !' वृत्त-पत्रवाला इंग्रजीतून व मराठीतून ओरडत होता. किट्टावय्यराचं इंग्रजीचं ज्ञान बेताचं असलं तरी स्थूलमानानं त्यांना बातमी कळली.

"का हो, काय भानगड आहे ? या महाराजांच्या खुनाचा प्रयत्न कशासाठी ?"

"मुंबईत अशा घटना रोजच घडतात. त्यांची माहिती कुठून व कशी मिळवणार ?" असं उत्तर देऊन दुरैस्वामींनी तात्पुरती सुटका करून घेतली तरी त्यांचा चेहरा काळाठिक्कर पडला !....

तेवढ्यात गाडी सुटण्याची वेळ झाली. शिटी वाजवून गाडी चालू लागली. दुरैस्वामी भावविवश होऊन चढ्या आवाजात म्हणाले, " राजम, लवकरच तिकडे येऊन मी तुम्हाला परत घेऊन येईन. उगीच काळजी करायची नाही. मी इथं मजेत आहे,...सीता, आईची नीट व्यवस्था ठेव बेटा ! मी जे सांगितलं ते नीट ध्यानात ठेव. किट्टावय्यर ! गावाला पोचताच पत्र लिहा बरं का ? दाराची कडी आतून लावून घ्या राजम, प्रकृतीची काळजी घ्यायची... ! "

दुरैस्वामीच्या बोलण्यात कळकळ जाणवत होती. ते वरवरचं नव्हतं. पण मनुष्य ठरवतो एक व देवाच्या मनात वेगळंच असतं. ही जगाची रीतच नाही का ?

6

देवपट्टणम्च्या मुख्य रस्त्यावर समोरासमोर दोन घरं होती. दोन्ही दुमजली होती. घराच्या समोरील ओसरीला लोखंडी गजांच्या भव्य चौकटी होत्या. दोन्ही घरांवर मालकाच्या नावाच्या पाट्या होत्या. एकीवर लिहिलं होतं. आर्. आत्मनाथ अय्यर बी. ए. बी. एल; ॲडव्होकेट आणि दुसरीवर, एन्. दामोदरम् पिल्ले, बी. ए. बी. एल्. ॲडव्होकेट.

आत्मनाथ अय्यर व दामोदरम् पिल्ले या दोघांचा घनिष्ठ स्नेह होता. दोघंही गावातील विख्यात वकील. त्यांची कुटुंबसुद्धा मोठी होती. तसा दोघांना पैसाही भरपूर मिळायचा. तरीही नवी घरे बांधण्यासाठी त्यांना कर्ज काढावं लागलं होतं.

एके दिवशी रात्रीच्या चांदण्यात दामोदरम् पिल्ले यांच्या घरच्या एका अगदी वरच्या गच्चीवर तीन तरुण गप्पांत रंगले होते. त्यापैकी एक होता दामोदरम् पिल्ले यांचा वडील पुत्र अमरनाथन्. दुसरा होता आत्मनाथ अय्यरांचा मुलगा पट्टाभिरामन् आणि तिसरा किट्टावय्यरांचा मुलगा सूर्यनारायणन्.

अमरनाथन् आणि पट्टाभिरामम् बी. ए. च्या वर्गात शिकत होते. दोघंही

समवयस्क असून त्यांना विसावं वर्ष सुरू होतं. सूर्यनारायणन् जरी त्यांच्याहून दोनच वर्षांनी लहान असला तरी मॅट्रिकच्या वर्गातच होता. कारण किट्टावय्यरांनी त्याचं शिक्षण उशिराच सुरू केलं होतं.

आत्मनाथ अय्यर हे किट्टावय्यरांचे वकील. तसे ते जुने सोबतीच होते. त्यांच्याच देखरेखीखाली सूर्यनारायणन्‌ला ठेवलं होतं. सूर्यनारायणन् खाणावळीत जेवायचा नि अभ्यासाच्या सोयीसाठी वकीलसाहेबाच्या घरी राहायचा.

" अरे अमरनाथ, आपला सूर्या आता गावाला चालला आहे. ठाऊक आ हे ना तुला ?" पट्टाभीनं विचारलं.

" नाही बुवा ! पण आता गावात काय काम आहे ? परीक्षेचे दिवसही जवळ आले आहेत."

" मद्रासवरून बहिणीला पाहायला पाहुणे यायचेत. म्हणून बाबांनी मला गावाला बोलावलं आहे." सूर्यनारायणन्‌नं उलगडा केला.

" अरे पाहुणे येणार आहेत ते मुलगी पाहयला. मग तुला बोलवायची काय जरूर ? तू का मुलगी आहेस ?" अमरनाथन्‌नं चेष्टेनं विचारलं.

" अरे अमर असं काय बोलतोस ? याच्या बहिणीचं लग्न ठरणार. मग हा तिथं राह्यला नको ?" पट्टाभीनं त्याची बाजू सावरली.

" काय म्हणतोस ? सूर्याच्या बहिणीचं लग्न ठरतंय ! तिला पाह्यला मद्रासहून पाहुणे येणार ? कमाल आहे ! मला तर वाटलं होतं, तूच तिच्याशी लग्न करशील म्हणून !"

" असं भलतंच काय बोलतोस अन् तेसुद्धा सूर्या इथं बसलेला असताना ?

" यात वावगं काय बोललो मी ? खरं ते सांगतोय तर तू टाळाटाळ चालवली आहेस. सूर्यालाच विचारतो. मला काय भीती आहे काय ? काय रे सूर्या हा आपला पट्टाभी ललितेच्या ध्यासानं कसा वाळत चालला आहे हे तुला मुळीच माहीत नाही, असं तू छातीवर हात ठेवून सांगू शकतोस ?... अशा परिस्थितीत ललितेला दाखवायसाठी मद्रासचे पाहुणे बोलावलेच कसे ?" अमरनाथानं ठणकावून प्रश्न केला.

" मला तरी या गोष्टी काय माहीत ? मला विचारून का त्यांनी हे ठरवलं ? कदाचित् पट्टाभीची कुंडली जुळत नसेल ?"

" हे खरं नाही ना ! माझ्या माहितीप्रमाणे माझी कुंडली मागवली गेली ना जुळवून पाहिली गेली... पण अमर, माझी लग्नासंबंधीची मतं तुला अपरिचित

का आहेत ? जोपर्यंत मी बी. ए. होऊन स्वत: शे-दोनशे रुपये मिळवू लागत नाही तोपर्यंत लग्नाची गोष्ट बोलणार नाही, हे तुला कितीदा सांगितलं आहे ?"

"अरे बच्चू, या गोष्टी दुसऱ्या कुणाला सांग. गेल्यावर्षी किट्टावय्यर आणि ललिता एक आठवडा तुझ्या घरी राहिले. त्यावेळी तू का बरं अस्वस्थ झाला होतास ? सारखा आतबाहेर करीत असायचास हे मी विसरलो असं समजजोस का ? अरे बाबा, तुझं हृदय प्रेमाच्या रंगानं कसं रंगून निघालं आहे हे मी चांगलं जाणतो... सूर्या, वाईट वाटून घेणार नसलास तर तुलाही काही सांगायचं आहे. तुझे वडील करताहेत ते चांगलं नव्हे. आपला पट्टाभी असताना त्यांना दुसरा मुलगा शोधायची गरजच काय ? ह्या मुलात तुम्हाला काय दोष दिसला ?"

आतापर्यंत गप्प बसून ऐकत राहिलेला सूर्यनारायणन् म्हणाला, " माझ्या मनातलं मी थोडं बोलू का ? मलाही बाबांचं हे असं करणं पसंत नाही. ललितेचं लग्न पट्टाभिरामन्शी व्हावं अशीच माझीही इच्छा आहे. ललितासुद्धा या संबंधानं आनंदित होईल असंच मला वाटतं. तरी कुण्या एका परक्या व्यक्तीच्या गळ्यात तिला का बांधलं जात आहे, कळत नाही.

" तुम्ही दोघं का उगाच डोक्यात राख घालता ? माझी काय इच्छा आहे हे नीट कान उघडून ऐकून घ्या नि मग काय ते बोला. ललितेच्याविषयी असा विचार कधी माझ्या मनाला शिवला नाही, तरीदेखील एक गोष्ट स्पष्ट करून टाकायलाच हवी. एखाद्या अपरिचित तरुणानं मुलगी बघायला यावं, तिनं त्याच्यापुढं सजून धजून जावं, उभं राहावं नि त्यानं तिचं रंगरूप चेहरामोहरा याचं मोजमाप करून घरी परतल्यावर खुशाल कळवून टाकावं की मुलगी पसत नाही, हे माझ्या दृष्टीनं अगदी गैर आहे." पट्टाभिरामन् एका दमात बोलून गेला.

अमरनाथन्ला त्याच्या मनाचा थांग लागला. त्यानं सल्ला दिला, " सूर्या, माझं नीट ऐकून घे. कसंही कर पण पाहायला आलेला मुलगा तुझ्या बहिणीला पसंत नाही असं तिच्याकडून वदवून घे."

"नाही सूर्या, असा वेडेपणा करू नकोस." पट्टाभीनं मनाई केली.

" सूर्या याच्या गोष्टी सोड. तुला काय वाटतं बोल ?"

"तुला जसं वाटतं ना, तसंच !"

"ऐकलंस पट्टाभी, बहुमत तुझ्या विरोधातच आहे. आता काय करायचं बोल ?"

"बहुमताबद्दल विवेकानंदांनी असं म्हटलं आहे की जगातील बहुसंख्य लोक

मूर्ख असतात. तुला हे ठाऊक नाही का ?"

"अरे बाबा विवेकानंदांचं ठीक आहे. ते तसं म्हणू शकतात. आपण नाही म्हणू शकत. भविष्यकालात 'मेजॉरिटी' ला फार महत्त्व येणार आहे. जो बहुमताची उपेक्षा करील तो जगात प्रगतीच करू शकणार नाही. बहुमतानुसार वागा अगर वागू नका, बहुमताला चकविण्याची कला शिकलात तरच जगात हसत खळत राहू शकाल." अमरनाथनं साररूप तात्पर्य सांगून टाकलं.

सीता मुंबईहून आल्यावर आठवडाभर राजमपेट्टला राहिली. नंतर मायलेकी तिच्या मावशीच्या गावाला जाऊन आल्या. ज्या दिवशी त्या राजमपेट्टला परतत होत्या त्याचदिवशी सूर्यनारायणन्‌ही देवपट्टणम्‌वरून गावाकडे येत होता. रस्त्यात गाठ पडली. गावात येईपर्यंत झालेल्या गप्पागोष्टींनी सूर्याला त्याच्या आतेला आणि सीतेला मनानं खूप जवळ आणलं.

सीता आल्यानंतर एक आठवडा मामाकडे होती. त्या आठवड्यात ललिता सीतेला घेऊन नियमानं तलावाकाठी बांधलेल्या आपल्या नव्या बंगल्यात घेऊन जायची. तिथं निर्विघ्नपणे त्यांच्या गप्पा चालायच्या. दोघी आपापली अंतःकरणं उघडी करीत. आपले मनोरथ बोलून दाखवीत. दिवसभर बोलूनही त्यांच्या गोष्टी संपेनात. सूर्यास्त झाला तरी त्यांना घरी परतावसं वाटेना. संध्याकाळी तलावाच्या काठी बसून बोलत. बोलण्यात खंड नसे. नक्षत्ररूपी लक्षावधी नेत्र उघडून आकाश विस्मयानं पाहात राहायचं. त्या दोघींचं काय गुपित होतं हे कुणी सांगावं ?

आज मात्र का कोण जाणे, त्याच बंगल्यातील एकांन्तातही त्यांच्या गप्पांची सम जुळत नव्हती !

"ललिता, आज इथं येऊन आपण बरं नाही केलं बाई ! मामी आपल्याला धुंडाळत असतील. कदाचित मीच तुला ओढून इथं आणलं असं समजून मला शिव्यादेखील मोजत असतील !"

" तुला कसल्या शिव्या ? द्यायच्याच तर मला दे म्हणावं. मी तिची समजूत घालीन."

"जेवणं आटोपताच तुझी वेणी घालायला सुरुवात करायला हवी, असं म्हणत होत्या. केवडा माळून वेणी करायची तर सहज एक तास लागेल. ते लोक तर पाच वाजता यायचेत. आपण इथंच बसून राहिलो तर कसं जुळायचं ?" सीतेनं अडचण सांगितली.

"सीता, माझ्या मनचं विचारशील तर, मला हे सारं मुळीच आवडलं नाही.

आता तू माझ्यापेक्षा वर्षानं मोठी. तुझं लग्न करायला हवं. मग माझ्या लग्नाचा विचार. हेच योग्य नव्हे का? बाबासुद्धा या कटात सामील होऊन असं वळचणीचं पाणी आढचाला न्यायला कसे कबूल झाले, कळत नाही! आता हेच बघ, आज एवढ्या थाटामाटाची काही जरूर होती? एवढं घर डोक्यावर घ्यायची गरजच मला दिसत नाही. पण मी असं काही बोलायला गेल्ये तर आई माझ्यावर तुटून पडेल ना! त्याच भीतीनं..."

"अगऽ! भ्यायचं कशाला? मी असताना तुला भ्यायचं कारण नाही." असं म्हणत सूर्यनारायणन्‌नं बंगल्यात प्रवेश केला.

त्याला आलेला पाहताच ललिता त्याच्यावर खेकसली, "इथंही येऊन येऊन पोचलात का आपण? इथं कोणालाही कुणाची भीती पडलेली नसून आपल्या मदतीची याचनाही कुणी करत नाही. अन् काय हो, इथं दोन बायका बोलत बसलेल्या असताना आपल्यासारख्या पुरुषाचं काय काम आहे?"

"ललिता मी उगाच आलेलो नाही तिकडे आत्या सीतेला शोधत होती. मी दिसलो तर म्हणाली, 'सीता बंगल्यात असली तर पाहा.' कळलं? मुंबईच्या मामांकडून या सीतेच्या नावाचं पत्र आलं आहे."

सूर्याच्या तोंडून पत्राची बातमी ऐकताच सीता उठून चालायला लागली. जाता जाता ललितेला म्हणाली, "तू इथंच थांब हं! मी पाच मिनिटांत येत्ये."

सूर्याला तर तेच हवं होतं. ललितेशी तिच्या लग्नाच्या संबंधात त्याला चार शब्द एकान्तात बोलायचे होते. हीच वेळ योग्य आहे असं पाहून तो म्हणाला, "ललिता, मला तुझ्याशी काही महत्त्वाचं बोलायचं आहे. त्यासाठी हीच वेळ चांगली आहे. यापेक्षा अधिक चांगली संधी मिळेल असं वाटत नाही...."

"जे काय सांगायचं ते झटपट बोल पाहू! उगीच लांबलचक प्रस्तावना नको."

"नाहीच करीत प्रस्तावना. तुझ्या हिताची एक गोष्ट सांगतो. आज तुला बघायला मद्रासवरून पाहुणे यायचेत ना? त्याच संबंधात मी असं म्हणतो की त्यांनी सोबत आणलेला पोरगा तुला आवडला तर ठीकच. पण आवडला नाही तर मात्र संकोच न करता तसं स्पष्ट सांगून टाकायचं. आईबाबांच्या म्हणण्यावर जाऊन किंवा विनयानं तोंडाला कुलूप लावून घेऊ नकोस. समजलं? अग, लग्न म्हणजे काही खेळ नव्हे! एकदा हात पिवळे झाले की मग सुटका नाही. याची नीट खूणगाठ बांधून ठेव!"

" एकदम कबूल ! मी पण असाच निर्धार केला आहे. समजा, तो मला पसंत पडला नाही तर तू माझ्या पाठीशी उभा राहशील ? "

" अवश्य ! याबद्दल मनात यत्किंचितही शंका बाळगू नकोस. "

नेमका त्याच क्षणी शुंडू धावत बंगल्यात शिरला नि म्हणाला " ए ताई, तुला आईने बोलावलं आहे. तुझी वेणीफणी कपडेलत्ते, दागदागिने वगैरे तयारी करायची आहे म्हणाली. तीन वाजून गेले तरी तू अजून इथंच आहेस ? दादाशी बोलायला हीच वेळ सापडली का ? "

" पाहिलंस भाऊ, एवढासा नाही तरी काय अधिकार गाजवतो आहे ! का रे शुंडू, तिकडे सीताताई नाही का ? इकडे येणार ना ती ? "

" सीताताई येते ! अग, तिनंच तुला लवकर निघून यायला सांगितलंय. ती इकडे येणार नाही. का नाही येणार, माहीत आहे ? हे श्री सूर्यनारायणन् इथं येऊन बसले नि सारी मजा घालवली ना ? म्हणून !... " असं बोलून शुंडू बाहेर पळण्याच्या पवित्र्यात उभा राहिला. समजा, दादा मारायला धावलाच तर त्याच्या हातात सापडण्याइतका का तो मूर्ख होता. ?

7

सरस्वती अम्मांनी ललितेला खरोखरच घरी बोलावलं होतं. सीतेनं त्यांची साथ केली होती. ललिता घरी येताच तिला सजवायला सुरुवात झाली. त्या कामात सीतेनं इतक्या उत्साहानं पुढाकार घेतला की सरस्वती अम्मांचं पाषाणहृदय-देखील द्रवलं. त्यांनी आपल्या मनाशी म्हटलं, ' सीतेसाठी वर शोधायला हवा. जमलं तर एकच मुहूर्तावर दोघींची लग्नं उरकून घेता येतील. याबाबतीत शास्त्रं काय म्हणतात कुणास ठावूक ! शास्त्रात आधार सापडला तर किती बरं होईल ? एका खर्चात दोन्ही कार्यं उरकून जातील. नव्यानं उठाठेव करावी लागणार नाही. चैत्रापर्यंत जमून गेलं तर सोईचं होईल बाई ! " – हळूहळू त्या पुटपुट् लागल्या.

ललितेचं प्रसाधन संपायला आलं, तसा सीतेचा हात जोरात चालू लागला. या हातातल्या बांगड्या त्या हातात घालून पाहणं, डोक्यातील फुलवेण्या चाचपून पाहणं, केसांच्या बटा पुन:पुन्हा सावरणं, केसांचा भांग नीट जमला याची खात्री करून घेणं, असे तिचे चाळे सुरू होते. कपाळीचं कुंकू तर पुन:पुन्हा पुसून रेखीव करण्यासाठी ती धडपडत होती.

आता कुठं सूर्यनारायणन् तिथं आला. त्याला बघताच अम्मा रागानं म्हणाल्या, " काय रे मेल्या सूर्या, आतापर्यंत कुठं होतास ? पाहुणे मंडळी केव्हाची येऊन थडकली आहे. त्यांच्यासाठी फराळाचं घेऊन जायला तुला शोधलं तर तू बेपत्ता ! शेवटी शुंड्‌ला सोबतीला देऊन आचाऱ्याच्या हातानं फराळाचं पाठवावं लागलं. आता हे तिकडंच निघाले आहेत. तू पण जा त्यांच्यासोबत. आपल्या होऊ घातलेल्या जावयाला स्वत:च्या हातानं फराळ दे. कॉफी पण स्वत: द्यायची. चल पळ लवकर ! "

" मी नाही जाणार ग ! एवढ्याशा कामासाठी किती लोकांनी जायचं ? एवढ्याशा गोष्टीसाठी तुम्ही का इरेस पडता हेच मला कळत नाही ! "

" ऐका याच्या गोष्टी. बाप तसा लेक ! अशा मरतमढ्यांना घेऊन जुळावायची लग्नं ? " सरस्वती अम्मांनी संतापानं एक पाऊल पुढं टाकलं.

आता सीता मधे पडली. सूर्याला म्हणाली, "सूर्या, जा बाबा. जरा आईचं ऐकावं. अरे जावयाचा समाचार तू नाही घ्यायचा तर कोणी ? "

" अरे, पण हे काय चालवलंत ? सर्वांनी आतापासूनच त्याला जावई बनवून टाकलात ? त्यानं तर आपल्या लल्लूला अजून पाहिलंदेखील नाही. "

" तेच तर मी म्हणत्ये. " ललितेनं त्याला साथ दिली.

" तू गप्प बैस ग शहाणे ! " आईनं दटावलं.

सीतेनं त्याच्या पौरुषाला आव्हान देत म्हटलं, " तू जातोस की मी जाऊ ? बोल ? तू असा अडून बसणार असलास तर मी जाऊन देते कॉफी-फराळ. पुरुषासारखा पुरुष तू ! बाईसारखा इथं बसून राहाणार ? अरे, तयार हो, ऐटीत जा अन् जावयाचा हात हातात घेऊन त्याचं कुशल विचार. काय ?"

" कसं बोललीस पोरी ! या घरात तूच खरी हुशार आहेस—अग, तू आज इथं नसतीस ना, तर ह्या पोरीनं का वेणी घालू दिली असती ? नाव सोड ! मला तर तिनं बोटावर नाचवून जीव खाल्ला असता. खरंच, आता मात्र तुझ्या-साठी एखादा चांगला वर शोधून तुला पिवळी केल्याशिवाय माझ्या मनाला

समाधान वाटणार नाही. ”

“ तुम्हाला बाहेरच्यांचा मोठा पुळका येतो. मारे त्यांच्या समाचाराला धावता. घरच्यांना कोणी विचारायला तयार नाही. आम्हाला कोणी विचारलं फराळाचं ? वाहवा रे दुनिया ! ” असं काहीसं बडबडत सूर्यनारायणन् बाहेर पडला.

तो सोमाच्चु अय्यरांच्या घरी पोचला तेव्हा मंडळी फराळ करीत होती. सूर्यानं पाहुण्यांवर दृष्टिक्षेप केला. वराबरोबर त्याचे आईवडील तसेच सुब्बय्यर होते. छोटा शुंडू मंडळीत बसून फराळ करीत होता. सोमाच्चु समाचार घेत होते.

सूर्या ओसरीच्या खांबाला टेकून गप्प उभा राहिला. तरी पद्मलोचन शास्त्र्यांचं त्याच्याकडे लक्ष गेलंच, “ हा पोरगा कोण ? ” त्यांनी विचारलं.

“ हा मुलीचा वडील भाऊ सूर्यनारायणन्. मॅट्रिकच्या वर्गात आहे. ” सोमाच्चूंनी परिचय करून दिला.

सुंदर राघवन्नं वर मान उचलून पाहिलं नि थट्टेत म्हटलं, “ मॅट्रिकला आहे म्हणता ? अरे वा ! खुशाल शिकावं. पण तेवढ्यासाठी असं गाल फुगवून राह्यचं कारण काय ?

राघवन्नं केलेली थट्टा सूर्याला मुळीच खपली नाही. त्यानं ताडकन् उत्तर दिलं, “ मी फुगून बसलेलो नाही. उलट आपणच रुसलेले दिसता. नाहीतर पुढं वाढून ठेवलेल्या पदार्थांवर असा रुसवा धरलाच नसता. ”

“ वा ऽ ! छान ! ” पद्मलोचन शास्त्रींनी त्याचं कौतुक करीत पत्नीला म्हटलं, “ पाहिलंस कामाक्षी, पोराच्या बोलण्याची पद्धत बघ. कावेरीचं पाणी आहे हे ! ”

ललितेचं प्रसाधन एकदाचं संपलं ! ललिता सीतेला म्हणाली,

“ जा ग बाई, चटकन् तोंड धुवून पावडर कुंकू करून ये पाहू. ”

“ मला ग कसली घाई आली आहे ?... या कानाजवळच्या बटा जरा अशा फिरवल्या तर सुंदर दिसतील ! ”

“ पुरे ग ! झालं एवढंच पुरे ! आता तू तोंड धुवायला जानेस का नाही ? जा म्हणत्ये ना. हाततोंड धुवून पावडरकुंकू कर नि चांगलीशी साडी नेस नाहीतर मी खोलीत जाऊन आतून दार लाऊन बसेन. मग कोणीही खटखटावलं, कितीही वाजवलं, तरी दारच उघडणार नाही. आलेल्या पाहुण्यांना मुलगी न बघताच परत जावं लागेल. आलं लक्षात ?”

ललितेचा हट्ट पाहून सीतेची मावशी तिला म्हणाली, "जा बाई सीता. ऐक तिचं. उगीच कशाला हट्ट करत्येस ? तू तिची पाठराखीण व्हावंस अशी तिची इच्छा दिसते. तू अशी लंकेच्या पर्वतासारखी गेलीस तर लोक काय म्हणतील ?"

"मावशीचं म्हणणं ऐकायलाच हवं सीता." सरस्वती अम्मांनी दुजोरा दिला.

"बरं बाई ! तुम्ही सर्वजणी म्हणताच आहात तर होत्ये तयार. नाही कसं म्हणायचं ?" असं बोलून ती तयारीला लागली.

तेवढ्यात सरस्वती अम्मांच्या आईनं त्यांना मागच्या बाजूला बोलावून कानात काहीतरी सांगितलं. त्यावर सरस्वती अम्मा झटक्यात बोलल्या, "तुझं आपलं काहीतरीच ! भलत्याच शंका काढून माझं डोकं खाऊ नकोस बरं. भरतीच्या पाण्यानं का विहिरीचं पाणी वाहून जातं ? उवा झाल्या म्हणून कुणी बिछाना का फेकून देतं ?" जवळ असलेल्या बायकांनीही ते ऐकलं.

सीता हाततोंड धुऊन व कपडे बदलून आलेली अम्मांनी बघितली. तिला त्या म्हणाल्या, "सीता, तुझे मामा बाहेर उभे आहेत. त्यांना आत बोलाव बरं."

सीतेनं दारात जाऊन बघितलं. तिचे मामा गावातल्या चार प्रतिष्ठित गृहस्थांबरोबर बोलत उभे होते. सोमाच्चूच्या घराकडून एक मोटार येत होती.

'यावेळी मामांना बोलावणं बरं दिसेल का ?' असा विचार करीत सीता दारात घोटाळली. तेवढ्यात मोटार येऊन उभी राहिली. ललितेला पाहण्यासाठी आलेल्या वराला बघण्याच्या जिज्ञासेनं तिची पावलं खिळून राहिली.

मोटारीतून आधी एक प्रौढ गृहस्थ उतरले. मागोमाग एक तरुण. हाच ललितेचा भावी पती दिसतो ! काय देखणा आहे ! ललिता केवढी भाग्याची !

सीतेचं हृदय उचंबळून आलं. डोळे डबडबले. डोकं गरगरायला लागलं. पण कसंतरी तिनं स्वतःला सावरलं. तरी एकदा त्या सुंदर युवकाकडे पाहण्याचा मोह तिला झालाच. सीतेनं त्याच्याकडे बघितलं, तोही तिच्याकडेच बघत होता ! 'हे मलाच आपली वाग्दत्त वधू समजले तर ?' असा विचार मनास येताच ती कमालीची लाजली. चटकन् मागं वळून 'पाहुणे आले !' असा पुकारा करीत आत धावली...

आत येताच ती ललितेजवळ गेली. तिला आलिंगन देऊन कानात पुटपुटली, "अग ललिते मी तुझ्या नवऱ्याला पाहिलं. काय सुंदर आहे ग ! मामा म्हणाले तेच खरं ! अग, तो मदनावर मात करील !"

"अे गप्पा मारू नकोस !"

घराच्या उंबरठ्यावर पाहुण्यांची चाहूल लागताच आतल्या सर्व बायका जमेल तशा आतल्या खोल्यांत, स्वयंपाकघरात जाऊन दडल्या.

सरस्वती अम्मा बाहेर आल्या. त्यांनी आपल्या भावी विहिणीचं स्वागत केलं. मग कामाक्षी अम्मांना आत घेऊन गेल्या.

बैठकीच्या खोलीतील खुर्च्यांवर पुरुषमंडळी येऊन बसली. काही वेळ सर्व गप्पच होते. शेवटी सीमाच्चूंनी आतल्या दाराशी जाऊन म्हटलं, " अहो ऽ ! पान-सुपारीचं तबक घेऊन मुलीला बाहेर पाठवा. लौकर येऊ द्या बरं ऽ. "

खोलीतील बायकांत कसलीतरी कुजबुज सुरू होती. सीमाच्चूंनी अंदाज घेऊन म्हटलं, " सीता सोबतीला आली तरी चालेल ! हवं तर तुमच्यापैकी कोणी या. "

त्यांनी असं म्हणताच ललिता व सीता बाहेर आल्या. ललितेच्या हातात पानसुपारीचं तबक होतं. तिची मान खाली होती, सीतेनं तिचा हात धरला. सीता जणू काही ललितेला ओढून आणते आहे असा भास होत होता.

सीता धीटपणानं पाहुण्यांकडे बघत आत आली. येता येता तिनं राघवन्‌कडे दृष्टिक्षेप केला. तिच्या अंतर्मनानं दिलेल्या सूचनेनुसार घडलं होतं. राघवन् ललितेकडे न बघता तिच्याकडेच रोखून बघत होता. तिचं अंग पुलकित झालं !

ललिता स्वप्नात चालल्यासारखी पाहुण्यांच्या समोर आली. तिथं ठेवलेल्या तिपाईवर तबक ठेवून तिनं सर्वांना वाकून नमस्कार केला.

ललिता नमस्कार करीत असताना सीतेनं पुन्हा एकवार राघवन्‌कडे बघितलं. अजूनही तो ललितेऐवजी सीतेलाच न्याहाळत होता ! तिच्या ओठावर स्मितरेषा उमटली ! आकाशातील सर्व तारकाच धरतीवर उतरून लकाकू लागल्या ! तिचं हृदय ज्योतिर्मय झालं !

नमस्कारासाठी वाकलेली ललिता सरळ उभी राहिली. आपल्या नियोजित नवरदेवाला डोळे भरून बघण्याची तिला तीव्र इच्छा झाली. तिनं मोठ्या प्रया-सानं झुकलेल्या पापण्या वर उचलून राघवन्‌वर कटाक्ष फेकला. त्याच्या चेहऱ्यावर स्मित दिसत असलं तरी तो ललितेच्या खांद्यावरून पलीकडे कुठं तरी दृष्टी लावून बसला होता. तिनं पुन्हा दृष्टी खाली वळवली. मान झुकवली !

" आम्हाला कोणत्या मुलीला पाह्यचं आहे ? ही आभूषणं घालून उभी आहे, हिलाच ना ? " पद्मलोचन शास्त्रींनी विचारलं.

" असा हो कसा प्रश्न विचारता ? पोरीनं नमस्कार केलेला बघूनही

लक्षात आलं नाही? आता म्हणावं तरी काय बाई ? " –कामाक्षींनी पतिराजांना दाबलं.

" तसं नव्हे हो ! मला सारं कळतं. पण मागाहून शंकेला जागा नको, म्हणून स्पष्ट विचारलं. बरं, मुलीला लिहिता-वाचता येतं ना ? "

सीमाच्चु उत्तरादाखल बोलले, " वा ऽ पाहुणे ! अहो, हे काय विचारणं झालं ? वडिलांचं अर्धअधिक काम ही पोरगीच सांभाळते. हिनं वाचली नाही अशी कादंबरी आपल्या भाषेत शोधून सापडायची नाही, इंग्रजीसुद्धा कसं छान बोलते ! उद्या जावईबापू तिच्याशी बोलतील नं तेव्हा ती कशी फाड्फाड् इंग्रजी बोलते ते कळेलच. "

हे ऐकून सुंदर राघवन् अधीरतेनं म्हणाला, " उद्याची वाट कशाला ? याच घटकेला बोलून पाहचला काय हरकत आहे ?"

" वा ऽ ! खूप केलीत जावईबापू ! " सीमाच्चु बोलले, " आमच्या बोलण्याचा अर्थ असा की पोरगी आपल्या घरी आल्यावर आपली संस्कृती आत्मसात् करील. आम्ही पडलो खेडवळ लोक. आमच्यापर्यंत आपली नागर संस्कृती पोचलेली नाही. काय, खरं ना हे किट्टावय्यर ? "

" अहो, त्यांना काय विचारता ? मला विचारा. खरं तर, आम्हाला तरी ही आजची नागर संस्कृती कुठं पसंत आहे ? आमच्या सुनेनं इंग्रजी शिकून नोकरी करावी असं आम्हाला तरी मुळीच वाटत नाही. पण पोरगा आहे नव्या वातावरणात वाढलेला. त्याला शिकलीसवरली मुलगी हवी आहे. यात त्याचं काही चुकलं का ? मग आम्ही तरी त्याला विरोध कसा करायचा ? बरं, आता असं सांगा, की मुलीला गाणंबिणं येतं का ? "

" अहो मुलीचे बाबा, या प्रश्नाचं उत्तर तुम्हीच द्या. प्रत्येक प्रश्नाचं उत्तर मी कुठवर देऊ. ? " सीमाच्चूनी किट्टावय्यरांना चर्चेत ओढण्याचा प्रयत्न केला.

किट्टावय्यर ताडकन् बोलले, " असं पाहा, मुलीला नियमित संगीत शिक्षण मिळालेलं नाही. आमच्या खेड्यात तशी सोयच नाही. तरी ती चांगलं गाते. मीच तिला गाणं शिकवलं. तसं संगीताचं थोडं ज्ञान आहे आम्हाला. "

" अरे वा ऽ ! म्हणजे आपण एक झाकलेलं माणिक आहात तर !... आता असं करा. मुलीला दीक्षितारांच्या रचनेतलं काही येत असलं. . . "

" अवश्य ! ललिता, ते आपलं 'मामव पट्टाभिराम ' ऐकव बरं ! "

आतापर्यंत खाली मान घालून उभ्या असलेल्या ललितेनं वडिलांची आज्ञा

ऐकून त्यांच्याकडे क्षमायाचनेच्या दृष्टीनं बघून पुन्हा नजर खाली वळवली.

यावर शास्त्रींनी पर्याय सुचवला, "दीक्षितारांचं नाही तर श्यामा शास्त्रींचं पद चालेल."

"बरं तर ! श्यामा शास्त्रीचं 'सरोज दल नेत्री' आठवतं ना ? मग तेच गाऊन दाखव."

तरी ललिता ढिम्म ! तिला गप्पच पाहून सीता तिच्या कानात कुजबुजली, "अग, असं गप्प बसून कसं चालेल ? तुला येत असेल ते गाऊन टाक !"

आपल्या बोलण्याचा काहीच परिणाम होत नाही असं दिसताच तिनं राघवन्-कडे सहज बघितलं. त्यानंही तिच्याकडे बघितलं. डोळ्यांना डोळे भिडले अन हृदयसंवाद सुरू झाला !

"सीता, तू ललितेबरोबर गा. बहुतेक ती एकटी गायला लाजत असावी." सीमाच्चूंनी बरोबर तोड सुचवली.

सरस्वती अम्मांनी सीतेच्या जवळ येऊन हलकेच म्हटलं, "सीता, तू तिला साथ कर."

त्यावर सीतेनं ताडकन् उत्तर दिलं, "आम्हा दोघींना येत असलेलं गाणंच आठवत नाही."

"तर मग तू आधी एक गीत गा. नंतर ती गाईल" पद्मलोचनांनी तोड काढली.

"बरं बाओी ! बघते आठवून दोघींना येणारं गीत ! . . . ललिता, तुला ते 'नागुमोकू गन लेनी' येत ना ? आपण दोघी मिळून गाऊ या. कबूल आहे नं ? नाहीतर मागाहून बसशील गप्प !"– असं बोलून सीतेनं घसा साफ केला. अर्ध्या 'अस्ताओी'पर्यंत तिनं टिकाव धरला. पण तिचा गळा धोका देऊ लागला. अंतऱ्यात तर सीतेचं गाणं खूपच रंगलं. ललिता शिकस्त करीत होती. तशातच तिचा स्वर चिरकला. स्वर बेसूर आला. गाणं थांबवून ती झटकन बैठकीतून उठून निघून गेली.

सर्व सुन्न होऊन गेले ! तिला थांबवण्यासाठी किट्टावय्यर गरजले, "ललिते ! काय चालवलेस हे ?"

सरस्वती अम्मांनीही तिचा हात धरून म्हटलं, "वेडे ! तुला झालं तरी काय ?"

पण आईचा हात झटकून ललिता आत निघून गेली.

क्षणभर सीता गांगरून गेली. काय करावं हेच तिला कळेना, तरी फार विचार न करता एकवेळ राघवन्‌कडे नजर टाकून ती आत चालती झाली.

किट्टावय्यरांना खुर्चीवरून उठताना पाहून पद्मलोचन शास्त्री म्हणाले, "तुम्ही उगाच मनाला लावून घेऊन पोरीला तंग करू नका. तिचा आवाज आम्ही ऐकला. किती गोड ! गाणं काय आरामात ऐकता येईल."

"बरोबर बोललात बाबा ! मुलगी मुकी नाही कळलं एवढं ना ? हेच काय कमी आहे. !" उपरोधिक स्वरात राघवन् बोलला.

"असं बोलू नये बेटा !" असं मुलाला दटावून कामाक्षी अम्मा आत गेल्या. काही वेळ बायका मागस आपसांत इकडचं तिकडचं बोलल्या. त्यानंतर पाहुणे मंडळी बिऱ्हाडी गेली.

8

ती मंडळी बिऱ्हाडी जाऊन बराच वेळ झाला तरी सरस्वती अम्मांच्या मनाची अस्वस्थता कमी झाली नाही. त्यांनी सीतेला बोलावून म्हटलं, "मुली जरा पाहुण्यांच्या बिऱ्हाडी जा. विहीणबाईंना विचार, तुमची सर्व व्यवस्था नीट होते आहे की नाही. ... सीताच्चु मामा तिथं असतील तर त्यांना इकडे पाठवून दे. जा बरं बाई !"

व्याह्यांच्या बिऱ्हाडी जायला निघालेल्या सीतेला रस्त्यावरच सीमाच्चु येताना दिसले. तरी ती न परतता पाहुण्यांच्या बिऱ्हाडी गेली, सीता पोचली तेव्हा राघवन् आरामात सोफ्यावर विसावला होता. तिला पाहताच तो सरळ बसला. मग त्यानं सीतेला विचारलं,

"एकट्या तुम्हीच आलात ? सोबतीण नाही आणलीत बरोबर ?"

त्याच्या प्रश्नानं सीता गडबडली तरी धीरानं म्हणाली, "एकटीच आल्ये."

"सुदैवानं तुम्ही घाबरला नाहीत, मोकळेपणानं बोलता आहात, हेच पुरे !

नाहीतर तुम्हीसुद्धा मुक्याचं व्रत धारण केलं असतं तर ? ”

“ मलाही कुणी ‘ पाहायला ’ आलं असतं तर मी तेच केलं असतं. ” असं म्हणत ती आत निघून गेली. तरीही का न कळे, तिचे हृदय धडधडत होतं !

आतल्या खोलीत कामाक्षी अम्मा नि शास्त्री आपसांत बोलत बसली होती. सीतेला पाहाताच बोलणं थांबलं.

“ कसं येणं केलंस मुली ? ” कामाक्षींनी विचारलं.

“ आपल्याला जेवणविवण नीट मिळतं का नाही याची चौकशी करून यायला मामींनी पाठवलं आहे. ”

“ एवढंच ना ? मग तुझ्या मामीला सांग, इथं सर्व व्यवस्थित आहे. कशाची उणीव नाही. ”

सीता किंचित् घुटमळली. मग हळूच म्हणाली, “ मला थोडं ललितेसंबंधी बोलायचं आहे. आज ती का गोंधळली, कळत नाही. खरं बोलायचं तर तिच्या-सारखी गुणी पोरगी शोधून सापडायची नाही. नेहमी कशी हसतमुख असते, माझ्या-पेक्षा चांगलं गाते. आधीच आपण नवखे. त्यात ‘ पाहायला ’ आलेले. म्हणून थोडी घाबरली. गैरसमज करून घेऊ नका हं ! ”

“ ही मुलगी चांगलीच धीट दिसते. ” शास्त्रींनी कौतुकानं म्हटलं.

“ धीट आहे म्हणून नियोजित वधू हीच असावी शंका आली का ? ”

“ नाहीतरी नवऱ्यामुलीपेक्षा तिच्यात काय कमी आहे ? कधी तरी हिचंही लग्न व्हायचं आहेच. काय मुली, तुझे बाबा मुंबईला काय करतात ? ”

“ रेल्वेत नोकरीला आहेत. ”

“ पगार काय मिळतो ? ”

“ तीनेकशे मिळतात. पण मुंबईच्या महागाईत घरखर्च भागवताना नाकी नव येतात. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे अशी स्थिती आहे. ”

“ ललितेसारखे कपडे, दागदागिने नाहीत म्हणून का असं बोलत्येस बेटा ? श्रीराम प्रभूंची कृपा झाली तर यापेक्षा अधिक वस्त्राभूषणांनी वाकून जाशील ! काय ग सीता, तुझे बाबा तुझ्या लग्नाच्या विचारात असतील ना ? वरसंशोधन सुरू आहे ना ? ” कामाक्षींनी चौकशी केली.

“ माझ्या वडिलांना बालविवाह मान्य नाही. पण माझ्या आईला लग्नाची घाई झालेली आहे. कदाचित् उद्या आपल्याशी या विषयाची चर्चा होईल. आपण मात्र मनावर घेऊ नका. ”

"असं का म्हणतेस मुली ? वेळीच लग्न झालेलं बरं नाही का ?"

"खरं आहे. पण वरपक्षाचे लोक पाच दहा हजार रुपये हुंडा मागू लागले तर माझे बाबा कुठून आणणार ! म्हणून लग्नच न करण्याचा माझा विचार आहे."

"मुलगी वा मुलगा असावा तर असा ! आईबापांवर केवढी ही श्रद्धा !" पद्मलोचन शास्त्रींच्या मुखातून प्रशंसापर उद्‌गार बाहेर पडले.

"ललिता तर माझ्यापेक्षा काकणभर अधिक आहे. फार आज्ञाधारक मुलगी ! त्यांच्या आज्ञेशिवाय पाऊल टाकणार नाही. समजा, आपल्या चिरंजिवांशी लग्न होऊन सून म्हणून आपल्या घरात आली तर आपल्याही आज्ञेबाहेर जायची नाही. आपण इकडे आल्यावर मी तिला काय बोलले ठाऊक आहे ? मी म्हटलं, 'बाई ग, लग्नानंतर सासूसासरेच आईवडिलांच्या ठिकाणी असतात. नव्हे, जन्मदात्यापेक्षा अधिक असतात.' यावर ती उत्तरली, 'यात काय संशय ! हे काय सांगायला हवं ?' माझ्यासारख्या एका अडाणी मुलीचं मत आपल्याला पटणार नाही, तरी सांगत्ये, हे लग्न झालं तर आपला पुत्र स्वत:ला भाग्यवान समजेल. ललितेलाही तसंच वाटेल, यात तिळमात्र शंका नसावी."

"काय चतुर मुलगी आहे हो !" पद्मलोचन शास्त्री उर्मी दाबू शकले नाहीत.

त्यांचे हे उद्‌गार ऐकताच सीतेचं हृदय उचंबळून आलं ! आता इथं बसण्याबोलण्यात अर्थ नाही. हे जाणून तिनं निरोप घेत म्हटलं "बरं मामी येत्ये मी. बोलण्यात काही कमीअधिक तोंडून निघून गेलं असलं तर क्षमा असावी."

राघवन् जिथल्या तिथंच बसलेला होता. सीता बाहेर पडल्यावर त्यांची पुन्हा गाठ पडली. तो म्हणाला, "तुम्ही आईशी जे बोललात ते मी ऐकलं. तुम्ही जशी आपल्या मैत्रिणीची बाजू सांभाळून घेतलीत तशी कुणीच घेणार नाही. निश्चितच तुमची मैत्रीण भाग्याची म्हटली पाहिजे."

"धन्यवाद !"

"मला कशाबद्दल ? उलट मीच तुम्हाला धन्यवाद द्यायला हवेत."

"पण आताचे तुमचे धन्यवाद मी स्वीकारत नाही हं ! उद्या वाङ्‌निश्चय झाल्यावर दिलेत तर आनंदानं स्वीकारीन. चालेल ?"

"अवश्य चालेल. पण त्याआधी दोन्ही पक्षांची संमती नको ?"

उत्तरादाखल स्मित करून ती घराकडे चालू लागली. मात्र सुंदर राघवन्‌च्या बोलण्याचा अर्थ तिला नीट कळला नाही.

सीता घराकडे निघाली. हर्षित हृदयानं नि पुलकित कायेनं ती आपल्याच

नादात चालली होती. आकाशातून गंधर्व-किन्नर सुगंधित पुष्पांचा वर्षाव करीत आहेत, स्वर्गसुंदरी प्रेमगीतं गात आहेत, असं तिला वाटत होतं. त्या अज्ञेयाच्या तालावर नर्तन करीत चालली होती ती ! हे सर्व काय घडत आहे ? आपलं हृदय एवढं उल्हसित का झालं आहे ? या प्रश्नाची दखल घेतली नाही तिनं.

घरी पोचल्यांवर तिची धुंदी उतरली. सरळ मामीजवळ जाऊन तिनं सांगितलं, " आता काळजी करण्याचं काम नाही मामी. अग, त्यांच्याजवळ ललितेची अशी काही प्रशस्ती केली, अशी प्रशंसा केली की ते अगदी लुब्ध झाले. नवरा मुलगा माझ्या गोष्टी ऐकत होता, आता उद्या वाङनिश्चय करूनच ते इथून जाणार असं मला खात्रीपूर्वक वाटतं. "

किट्टावय्यरांच्या दारासमोर उभारलेल्या मंडपात गावपंचायत सुरू होती. काही लोक खाली सतरंजीवर, काही बाकांवर तर काही ओटचावर बसले होते.

घरातून बाहेर येणाऱ्या किट्टावय्यरांना पाहताच पंच अय्यर म्हणाले, " अहो पाटील, ऐका आपल्या चिरंजिवाची मुक्ताफळं ! काय तर म्हणे चार-चार दिवस लग्नसोहाळे करून पाण्यासारखा पैसा खर्च करणं, हुंडा देणं तसंच हुंडा घेणं हे सर्व मूर्खपणा आहे. "

" तो म्हणतो त्यात काय चुकलं ? आजकाल कितीतरी लोक असंच बोलतात. गरिबांना कष्ट करून पोट भरायची मारामार पडते तिथं व्यर्थ डामडौलात पैसा उधळायचा कशाला ? " किट्टावय्यरांनी मुलाची कड घेतली.

" अहो, तो एवढचावरच थांबता तर हरकत नव्हती. ' पैसा बरबाद करू नये, काटकसर करावी' एवढंच म्हणता तर बापलेकांचं म्हणणं समजण्यासारखं होतं. पण सूर्या तर एखाद्या मोठचा समाजवाद्यासारखं बोलतो आहे. म्हणतो, ' शेतकरी घाम गाळून कष्ट करतो नि त्याच्या निढळाच्या घामाचा पैसा आम्ही फुकटच्या अवडंबरात घालवतो. हे फार दिवस चालणार नाही' असं म्हणून आम्हाला धमकावणी देतो. "

त्यावर सीमाच्चु अय्यरांनी उत्तर दिलं, " तर काय शतकानुतकं हे असंच चालू राहणार असं तुम्हाला वाटतं का ? तुम्हाला बदलल्या काळाची जाणीव झालेली नाही. ' कसेल त्याची जमीन ' असा प्रचार जोरात सुरू आहे आपण कूपमंडूक बनून बसाल तर त्यात दोष कोणाचा ? "

" वा सीमाच्चु तुम्ही पण त्यांची बाजू घेता ? आज म्हणता कसेल तो जमिनीचा मालक. उद्या म्हणाल कापणी करील त्याचं पीक. पुढं असाही

काळ येईल की धोब्याला धोतर, गवंड्याला घर, ड्रायव्हरला मोटार नि पोर्टरला आगगाडी देऊन टाकावी लागेल. एवढंच काय, जो स्वयंपाक करील त्यालाच जेवता येईल असाही कायदा केला जाऊ शकतो. 'विनाशकाले विपरीत बुद्धिः' असं जे जुन्या लोकांनी सांगून ठेवलं आहे ते पूर्ण विचारांतीच नव्हे का ?" अप्पा दुरै-शास्त्रींनी एक लहानसं व्याख्यानच देऊन टाकलं.

अगदी याचवेळी सीमाच्चु अय्यरांची पत्नी अन्नम्मा घरून लगबगीनं आली नि किट्टावय्यरांच्या घरात शिरली. ती आत गेल्यावर थोड्याच वेळात घरात भयंकर प्रकार घडल्यासारखं वातावरण बदललं. रागारागात बोलल्याचे आवाज बाहेर ऐकू येऊ लागले. एकदम गलका झाला. कोणाच्या तरी स्फुंदून रडण्याचा आवाज आला. या सर्व गलबल्यातून सरस्वती अम्मांच्या आईचा संतापून बोलण्याचा आवाज स्पष्ट ऐकू आला– "तरी मी म्हणत होत्ये या काळतोंड्यांना घरात घेऊ नका. पण माझं ऐकतं कोण ? ते लोक इथं यायच्या आधीच तुला एकान्तात बोलावून पोपटासारखं शिकवून सावध केलं. पण तुमच्या डोळ्यावर झापड होती. म्हणे, समुद्राची भरती विहिरीचं पाणी वाहून नेत नाही. आता गेलं ना पाणी वाहून ? बोल, आत, काय करणार आहेस ?"

रडव्या स्वरात सरस्वती अम्मा म्हणाल्या, "हे असं काही घडेल असं तेव्हा वाटलं नव्हतं ग आई ! – अरे शंडू, तुझ्या बाबांना पटकन आत बोलाव. इथं घराला आग लागली आहे अन् हे बसले आहेत गप्पा करीत. लवकर बोलाव मेल्या–"

बाहेर बोलत बसलेल्या मंडळींच्या कानापर्यंत ही बोलणी पोचली. किट्टावय्यर रागानं उठून आत आले. "का हो, एवढं घर डोक्यावर घ्यायला काय झालं ? कुणाच्या डोक्यावर उल्कापात झाला की वीज कोसळली ?" त्यांनी संतापून विचारलं.

"होय बरं ऽ ! वीज कोसळली ! अन्नम्मांना विचारा म्हणजे कळेल काय ते. मद्रासवरून बोलावलेल्या तुमच्या पाहुण्यांनी काय गुण उधळले ते ऐका जरा. तसंच लाडक्या बहिणीला मुंबईहून आणलंत ना, त्याचं काय फळ मिळालं तेही ऐकून घ्या." सरस्वती अम्मा चिडून बोलत होत्या.

"अग हो ! सर्व काही ऐकून घेतो. पण आधी जरा आवाज कमी कर. कुणीतरी मेल्यासारखं गळा काढून रडत्येस कशाला ?"

किट्टावय्यरांच्या धमकावणीचा थोडा परिणाम झाला. रडारड कमी झाली

हळूहळू उत्पाताचं स्वरूप व कारणंही कळून आली....

सीमाच्चु अय्यरांची पत्नी अन्नम्मा हिच्या कानावर मद्रासच्या पाहुण्याचं जे आपमानलं अस्पष्ट बोलणं आलं त्यावरून तिला कळलं की मुलगा ललितेशी नव्हे तर सीतेशी लग्न करू इच्छितो. त्याच्या आईवडिलांनी त्याचं मन बदलण्याचा खूप प्रयत्न केला तरी तो आपल्या निश्चयापासून ढळला नाही. निरुपायानं त्यांनी मुलाचं म्हणणं मान्य केलं; परंतु किट्टावय्यरांपुढे ही गोष्ट कशी काढावी असा त्यांना पेच पडला असून ते सुब्बय्यराचा सल्ला घेत आहेत. अन्नम्मा घरून निघाल्या तेव्हा चर्चा चालली होती, आताच सर्व गोष्टींचा खुलासा करून होकार वा नकार घ्यावा की मद्रासला गेल्यावर सविस्तर पत्र लिहून आपली अडचण कळवावी ?

ह्या गोष्टी ऐकून शांत वृत्तीच्या किट्टावय्यरांनासुद्धा फार राग आला. पण राग काढणार कोणावर ?—शेवटी सीमाच्चु अय्यरांकडे पाहून निराशेनं बोलले, " पाहिलंत सीमाच्चू, हे शहरातले लोक बिलंदर असतात, असं मी तेव्हाच नव्हत का बोललो ? आता तरी पटली ना खात्री ?"

" अहो, यांच्या नकारानं का ललितेचं लग्न राहून जाणार आहे ? तुमची आज्ञा झाली तर हजार मुलं आणून उभी करतो." अप्पादुरै म्हणाले.

" पुरे झालं ! यावर्षी पोरीचं लग्नच करायचं नाही. हे लोक एकदाचे टळले म्हणजे जिवाला थोडी चैन पडेल !" सरस्वती अम्मा बोलल्या.

आता राजम्मा स्वतःला आवरू शकली नाही. म्हणाली, " भाऊ, सारं माझंच चुकलं. मीच मेली कमनशिबी ! जिथं जावं तिथं हे फुटकं कपाळ मागेच असतं !"

किट्टावय्यरांनी तिला दटावलं, " बडबडू नकोस उगीच. आता तुला कोणी काय म्हटलं ? "

" बिचारी सीता सारखी रडत्ये आहे. करणार तरी काय ? ती तर पाहुण्यांच्या समोर जायला कबूल नव्हती. ललितेनंच हट्ट धरला. वहिनींनं तिला अडवलं नाही." सीतेची मावशी मधेच बोलली.

" माझीच अक्कल चरायला गेली होती ! मी एक मूर्ख तर माझी पोरटी शतमूर्ख आहे, हे तर सर्वच जाणतात. पण तुम्ही तर अनुभवी, शहाण्या होता नं ? तुम्ही समजवायचं होतं, अडवायचं होतं."

किट्टावय्यर चिडून म्हणाले, " आता बडबड बंद करा. कुणीतरी आधी

जाऊन त्या रडणाऱ्या पोरीची समजूत घाला."

इकडे खोलीत ललिता सीतेची समजूत घालत बसली होती. पलीकडचं बोलणं कानावर पडताच, विशेषत: आईचे विषारी शब्द ऐकताच ती चवताळलेल्या नागिणीसारखी बाहेर येऊन त्वेषानं म्हणाली, "बाबा, मी काय बोलत्ये ते नीट ऐका. हे जे राजेश्री मला पाहायला आले आहेत त्यांच्याशी मी चुकूनसुद्धा लग्न करणार नाही. अगदी माझे तुकडे केलेत तरी नाही. आधीपासूनच मी म्हणत होत्ये की मला हे सारं पसंत नाही. माझं कोणीच ऐकून घेतलं नाही. जे घडलं त्यात सीतेचा काहीच दोष नाही. ती माझ्यासोबत बैठकीत यायला तयारच नव्हती. खरं तर ती तोंडावरून पाण्याचा हात फिरवायलाही तयार नव्हती. मीच हट्ट धरला. मीच तिला सोबत आणलं. तुम्ही जर तिला विनाकारण दोषी ठराल तर मी हे घर सोडून जाईन, नाहीतर जीव देईन ! "

ललितेनं आपल्या सोबतिणीची बाजू घेतलेली पाहून सर्व शांत झाले. मात्र सरस्वती अम्मांचा पारा चढला. त्या ओरडल्या, " जा आत्ता जाऊन विहिरीत उडी घे ! माझ्या पोटी पोरगी आलीच नाही असं समजेन मी ! "

" अरे, अरे ! असं अभद्र काय बोलता ? अद्याप काही ठरलेलं नाही. त्यांचं मन समजून घेण्यासाठी, त्यांची समजूत घालण्यासाठी गेलेला सीमाच्चु अजून परतला नाही. मग हे काय ? त्याला परत येऊ द्या...."अपादुरै शास्त्री समजुतीच्या स्वरात बोलले.

" सीमाच्चु मामा काहीही ठरवून येवोत, मी त्याच्याशी लग्न करणार नाही. खरं सांगत्ये, मी या लग्नाला तयार नाही. "

किट्टावय्यरांनी मुलीला समजावलं, " ललिता, काय हे ? तूच का हे बोलते आहेस ? "

" ती कुठं बोलते आहे ? बोलविता धनी वेगळाच आहे. त्यानं पढवलेलं बोलते आहे. आपल्या लाडक्या लेकाच्या शिकवणीनं ती अशी पिसाळली आहे. मला तर वाटतं, त्यालाही कोणी गुरू भेटला असावा." सरस्वती अम्मा म्हणाल्या.

"मला कोणी गुरू भेटला नाही." आतापर्यंत गप्प उभा असलेला सूर्या आपलं नाव निघताच ताडकन् बोलला. "हा वेडेपणा सोडा असं मी आधीच बजावलं होतं. पण तेव्हा कोणी ऐकलं नाही. तुमच्या काळात तुमच्या पद्धतीनं जी लग्नं जुळवलीत त्यांनी नशिबी आलेले भोग पुरे नाहीत का ? मग आम्हाला आमच्या इच्छेनुसार का वागू देत नाही ? मुलगा आवडला असेल तर ललिता खुषीने लग्न

करू शकते. नाहीतर तिनं कुणाचं ऐकू नये. ललिनेबद्दल जे बोलतो आहे तेच सीतेला लागू आहे. मद्रासवरून जे विद्वान आले आहेत ते तिला आवडले नसतील तर तसं स्पष्ट सांगून टाकावं. त्यासाठी एवढं हमसाहमसी रडायाची, हुंदके देत बसण्याची गरज नाही."

सूर्या चांगलाच गरम झाला होता. नाहीतरी त्याचा राघवन्‌वर रोषच होता. प्रथमदर्शनीच सूर्याच्या मनात त्याच्याविषयी अढी पडली होती. आता तो सीतेशी लग्न करू इच्छितो हे ऐकून तर त्याच्या क्रोधाग्नीत भरपूर तूप ओतलं गेलं.

काही वेळानं सीमाच्चूंकडून किट्टावय्यरांना बोलावणं आलं. ते लगोलग निघून गेले. पाहुण्यांच्या बिऱ्हाडी पोचताच पद्मलोचन शास्त्री नि त्यांच्या सहधर्मचारिणी कामाक्षी अम्मा यांनी स्वतःच सुरुवात केली " आपल्या मुलीत कसलीच उणीव नाही. किती सुंदर आहे ! लोभसवाणी आहे ! पण आजकालच्या पोराचं वागणंच विचित्र ! आमच्या युवराजांनी प्रथमदर्शनीच त्या दुसऱ्या पोरीत असं काय पाहिलं कळत नाही. म्हणतो, 'लग्न करीन सीतेशीच !' आम्ही त्याला खूप समजावलं. त्याला काही पाझर फुटला नाही. लग्न आहे त्याचं. तेव्हा त्याच्याच कलानं घेतलेलं बरं नाही का ?... जर आपल्याला आमची मागणी रुचत असली तर उद्याच वाङ्‌निश्चय करून टाकू. मात्र मुलीला व तिच्या आईला हा संबंध नको असला तर तसं स्पष्ट बोला. ही काही सक्तीची बाब नव्हे !"

किट्टावय्यर थक्क झाले ! त्यांना काही उत्तर सुचेना. 'मुलीच्या आईचा विचार घेऊन काय ते सांगतो.' असं बोलून ते बाहेर पडले. मात्र घरी न जाता सीमाच्चु व सुब्बय्यरांना घेऊन सल्लामसलत करण्यासाठी तलावाकाठच्या बंगल्यात गेले. तेथे दोघांनी एका सुरात मत दिलं, "मांजराच्या भाग्यानं शिंकाळं तुटावं' तसा सारा प्रकार आहे. तुमच्या मुलीला यापेक्षा चांगला वर मिळणार ! तुम्ही मुळीच काळजी करू नका. आम्ही शेकड्यानं मुलं आणून उभी करू... आता असं पाहा, मुबईच्या मुलीसाठी वर शोधणं जड जाणार आहे. हे लोक तर हुंड्याशिवाय मुलगी करून घ्यायला तयार आहेत. तेंव्हा आपण कशाला नकार द्या? उद्याच वाङ्‌निश्चय उरकून टाकणं बरं."

किट्टावय्यरांच्या रागाचा पारा आता चांगलाच खाली आला होता. शांत मनानं विचार करताच त्यांना त्यांचं म्हणणं पटलं, योग्य वाटलं, तरी बायकोला कसं राजी करावं, तिची समजूत कशी पटवावी हे त्यांना कळेना. हाच विचार

करीत ते रात्री एकच्या सुमारास घरी आले. आणि सूर्यानं त्यांची अडचण सहज दूर केली !

सूर्याला बऱ्याच उशिरापर्यंत झोप आली नव्हती. त्याच्या अंतःकरणात विचारांचा कल्लोळ उठला. तो शमल्यावर तो शांत मनानं विचार करू लागला. ' हे लग्न व्हावं अशी कदाचित देवाचीच इच्छा असेल ! सुंदर राघवन् दिल्लीला चांगल्या हुद्द्यावर आहे. सात-साडेसातशे रुपये महिना मिळवतो. माझ्यापेक्षा सीतेसाठी तोच वर योग्य आहे. बहुधा सीतेच्या भाग्यानंच त्याला इथं ओढून आणलं. तिच्या भावी आयुष्याशी, सुखी जीवनाशी खेळण्याचा मला काय अधिकार ?'

अशा विचारतरंगांत हेलावत सूर्यनारायणन् बिछान्यात कुशी बदलत पडून होता. तेवढ्यात त्याला वडिलांची चाहूल ऐकू आली. ते आत येताच सूर्यानं विचारलं, " बाबा ते काय म्हणाले ? शेवटी काय ठरलं ?"

" कोण, सूर्या ?" किट्टावय्यर आश्चर्याने म्हणाले, " तू अजून झोपला नाहीस ? बरंच झालं. वाटलं तुझ्याशी थोडं बोलावं... तो पोरगा तर सीतेशी लग्न करू इच्छितो. त्याच्या आईवडिलांची संमती आहे. हुंडा–करणी नको म्हणतात. तेव्हा काय करावं ? तू समजदार आहेस. सांग, तुला काय वाटतं ?" किट्टावय्यरांनी त्याच्यापुढं समस्या मांडली.

" बाबा, गोष्टी या थराला गेल्या आहेत तर मी एक गोष्टीचा खुलासा करून टाकतो. आपले वकीलसाहेब, आत्मनाथ अय्यर यांचा मुलगा पट्टाभिरामन् ललितेशी लग्न करायला एका पायावर तयार आहे. गेल्या वर्षी तुम्ही देवपट्टणमला आला होता तेव्हाच त्यानं ललितेला बघितलं होतं. पट्टाभीला ती एकदम पसंत पडली. तुम्ही तिच्यासाठी दुसऱ्या वराच्या शोधात आहात याचं त्याला दुःख आहे. त्यालाच नव्हे तर त्याच्या वडिलांनासुद्धा. ते तर असंही म्हणाले, "आमचं स्थळ तुझ्या वडिलांना कसं दिसेल ? ते अधिक मोठं ठिकाण शोधत असतील !"

" खरंच का ते असं बोलले ? आत्मनाथ अय्यरांचा मुलगा चांगला आहे. मला त्याचा विसर पडलेला नाही. पण तुझ्या आईनं सारखा पिच्छा पुरवला होता. तिला त्याहून चांगलं स्थळ हवं होतं. ललिता पट्टाभीला द्यावी, असं मला मनापासून वाटत होतं. त्याबद्दल सवडीनं बोलू. सीतेबद्दल काय ते बोल."

" तिच्याबद्दल मी काय सांगू, कसं सांगू ? आत्याला नि तिलाच काय ते विचारा. त्यांना पटलं तर सोन्याहून पिवळं. थोड्या पैशात एवढं चांगलं स्थळ मिळते आहे ही आनंदाची गोष्ट आहे. या संबंधामुळे आपलंही नाव होईल !"

" तर मग तुझ्या आईची समजूत घालून तिची संमती मिळवायची जबाबदारी तुझी. मी काही बोललो तर ती वसकन् अंगावर येईल. मी बहिणीची तळी उचलून धरतो आहे असं म्हणेल."

" बरं बाबा मी तिची समजूत घालीन."

सूर्या बोलून गेला तरी हे काम सोपं नव्हतं. त्यानं मोठ्या युक्तीनं नि प्रयासानं ते उरकलं. ' या वराशी तिचं लग्न लावलं तर तिला आज दिल्ली, उद्या कराची तर परवा लाहोर अशी भ्रमंती करावी लागेल, हे तिला पटलं. उलट वकीलसाहेबांच्या मुलाशी लग्न झालं तर ती जवळच राहील नि केव्हाही भेटून येता येईल. या अस्त्राचा चांगलाच प्रभाव पडला. तिचं मातृहृदय मुलीच्या मायेमुळं द्रवलं. '

दुसऱ्या दिवशी सायंकाळी सीतेचा वाङ्निश्चय झाला. परस्परांना पानाचे विडे दिले गेले. राजम्मानं दुरैस्वामीची हमी दिल्यानं काही अडचण राहिली नाही. यावेळी ललिता खूप खूप होती. सर्वांपेक्षा तिला जास्त आनंद झाला होता. काल मुकी वाटणारी ललिता आज मनमोकळं बोलत होती. राघवन्‌ला ' जावईबापू' बनवन मोकळेपणानं त्याची थट्टामस्करी करीत होती.

9

विवाह-संबंध निश्चित झाल्यावर राघवन् मद्रासला परतला तेव्हा उत्साहानं फुलून गेला होता. आपल्या आयुष्यात नवं पर्व सुरू झालं असून त्यात आनंदाशिवाय दुसरं काही नाहीच असं त्याला वाटत होतं. त्याच्यात अन् तारिणीत जे एक स्नेहाचं मधुर नातं निर्माण झालं होतं, ते एक स्वप्न होतं असं मानून त्यावर विस्मृतीचा पडदा टाकण्याचा प्रयत्नही त्यानं चालवला होता. त्याला विसर पडल्यासारखाही झाला होता...

एके दिवशी मुजफ्फरपूरवरून त्याला अचानक एक पत्र आलं. पत्रातील

मजकूर वाचून तो कमालीचा अस्वस्थ झाला. ते पत्र भूकंपपीडितांच्या सहाय्यासाठी गेलेल्या सेवापथकाच्या मुजफ्फरपूर छावणीतून आलं होतं. पत्रातील मजकूर असा होता :

मुजफ्फरपूर
दि. १२–२–१९३४

प्रिय महाशय,

आपणास एक दु:खद बातमी कळवावी लागत आहे. भूकंपपीडितांच्या मदतीसाठी मुंबईहून आलेली तारिणी नावाची एक स्वयंसेविका फार कार्यतत्पर होती. आपल्या स्वभावामुळे ती येथील सर्वांची आवडती होती. काल दुपारचं जेवण आटोपून ती आपल्या कामाला निघून गेली. रात्रीपर्यंत परतली नाही. दुर्दैवानं तिला एक वाईट खोड होती. भूकंपामुळे पडलेल्या जमिनीतील खोल भागांपाशी जाऊन ती आत डोकावून पाहायची. आम्ही वारंवार सूचना देऊनही तिनं आपला हेका सोडला नाही. काल सायंकाळी ज्या लोकांनी तिला अखेरचं बघितलं त्याचं म्हणणं पडलं की, त्यावेळी ती अशीच एका दरीत डोकावून पाहात होती. पुष्कळ शोध करूनही अद्याप तिचा काहीच पत्ता मिळालेला नाही. तिच्या डायरीत आपला पत्ता सापडला म्हणून आपणास हे पत्र लिहीत आहे. तारिणीच्या नातलगांशी आपला परिचय असल्यास त्यांनाही आमच्या वतीनं ही दुर्वार्ता कळवून द्यावी. यदाकदाचित् तारिणी परत आलीच तर आपणास त्वरित कळवले जाईल.

—सरलादेवी

या पत्रातील काही ओळी वाचताच राघवन्चा तारिणीवरील राग शांत झाला. त्याच्या हृदयात तिच्याविषयीच्या प्रेमाचा व सहानुभूतीचा झरा वाहू लागला. पत्र वाचून पूर्ण करता करता त्याचे डोळे भरून आले. तो उठला. कपाटाकडे गेला. कपाटाचं कुलूप उघडून त्यानं आतून तारिणीचा फोटो काढला. कितीतरी वेळ तो फोटोकडे एकटक पाहात राहिला... तारिणीची आकृती, बोलणं-चालणं, हावभाव, एकामागून एक त्याच्या स्मृतिपटलावर दिसू लागले. पाहता पाहता त्याच्या तोंडून आर्त उद्गार बाहेर पडले, ‘अरेरे ऽ ! तुझी काय अशीच गत व्हायची होती ! ” आणि संयमाचा बांध फोडून त्याचे अश्रू तारिणीच्या फोटोवर टप्टप् पडू लागले, क्षणात त्याच्या हृदयावरील भार हलका झाला !

नंतरच्या आठ-दहा दिवसांत शुभवार्ता देणाऱ्या मुजफ्फरपूरच्या पत्राची त्यानं सतत वाट पाहिली. पण तिकडून पत्रच आलं नाही.

सीतेचं लग्न जुळल्यावर काही दिवसांनी मुंबईची आत्या आणि सूर्या असे दोघेच तलावाच्या काठावरील बंगल्यात येऊन बसले असता सूर्या म्हणाला, " आत्याबाई मला तुमच्याशी काही बोलायचं आहे म्हणून तुम्हाला इथं आणलं."

" काय मनात असेल ते न कचरता बोलून टाक बाबा. मला वाईट वाटेल या भीतीनं काही दडवून ठेवू नकोस." राजम्मांनी मनाची तयारी करीत त्याला सांगून टाकलं.

सूर्या काही वेळ कमळांच्या ताटव्याकडे व पलीकडच्या मुरूच्या झाडांकडे टकमक बघत राहिला. मग हळूच बोलला, " तसं पाहिलं तर अगदी क्षुल्लक बाब आहे. 'निनावी पत्र' म्हणजे काय हे कळतं ना तुम्हाला ? त्यात लिहिणाऱ्याचं नाव नसतं किंवा पत्ता दिलेला नसतो. द्वेष नि मत्सर यांनी पछाडलेले दुष्ट लोक चांगल्या कार्यात अडथळा आणण्यासाठी अशा मार्गाचा अवलंब करतात. असंच एक पत्र तुम्हाला आलेलं आहे."

" त्या पत्रात कुणाविषयी लिहिलं आहे ? माझ्यासंबंधी की त्यांच्यासंबंधी लिहिलं आहे ?"

" तुम्हा दोघांबद्दल लिहिलेलं."

" मग काय माझ्या पोरीबद्दल लिहिलं आहे ? कोणत्या दुष्टानं काय लिहिलं आहे ?"

" छे: ! सीतेबद्दलदेखील नाही. तिच्यासंबंधी लिहिण्यासारखंच आहेच काय ? कोणी लिहून लिहिणार तरी काय ? आत्याबाई, तुम्ही किती सहन केलंत हे काय मला ठावूक नाही ? तरी सीतेच्या जन्मानं तुमच्या जिवाचं सोनं झालं ! सीतेसारखी सद्गुणी मुलगी असणं हे भाग्याचं लक्षण आहे."

राजम्मांचा चेहरा प्रफुल्लित झाला. त्यांनी जिज्ञासेनं विचारलं, "सीतेबद्दल लिहिलेलं नाही तर लिहिलं तरी कोणाविषयी ?"

" सीतेचं लग्न ज्यांच्याशी ठरलं आहे ना त्यांच्याविषयी."

" काय म्हणतोस ? जावईबापूबद्दल लिहिलं आहे ? काय लिहिलं आहे बाबा ?" राजअम्मानं उतावळेपणानं विचारलं.

" सांगायला मला खेद होतो आत्या, तरी पण ते तुम्हाला माहीत असायला हवं. राघवन्‌ची मुंबईच्या एका मुलीशी गाढ मैत्री होती म्हणे. एकदा तर

ती त्याच्याकडे येऊन त्याच्याशी भांडून गेली. हे सर्वांना चांगलं ठाऊक असल्याचं लिहिलं आहे. अशा माणसाला आपली मुलगी देणं कितपत बरोबर आहे, याचा नीट विचार करा. "

राजम्मानं निश्वास टाकला. थोडावेळ विचार केल्यावर विचारलं, " एवढंच लिहिलं आहे की आणखी काही आहे ? "

" त्याच्या आईवडिलांवर थोडी चिखलफेक केली आहे. त्याचे वडील पैशाचे फार लोभी असून खाली पडलेला तांब्याचा पैसा हातानं उचलणारांपैकी आहेत. त्याची आई पक्की दुष्ट व कजाग आहे. आपल्या पहिल्या सुनेला तिनं बोटावर नाचवलं म्हणून ती कायमची माहेरी जाऊन राहिली. मोठा मुलगा घरजावई बनला. अशा घराशी संबध करायचा का ? "

" राजम्माला चिंतेनं घेरलं.. मन थोडं शांत झाल्यावर सूर्याला ती म्हणाली, " सूर्या, तू वयानं लहान असलास तरी तुला बरं-वाईट चटकन् कळतं. तू विचारी आहेस. धोरणी आहेस. वहिनी नेहमीच तुझ्या गुणांचं कौतुक करतात. त्याना त्याचा कंटाळा येत नाही. म्हणून मी तुलाच सल्ला विचारते. या निनावी पत्रा-बद्दल तुला काय वाटतं ?त्यात लिहिलेल्या सर्व गोष्टी तुला खऱ्या वाटतात का ? "

" ते कसं सांगणार आत्या ? मला तर वाटतं, कोणीतरी मत्सरापोटी हे सारं लिहिलं असावं. केवळ या पत्रावरून लग्न मोडणं मला तरी उचित दिसत नाही. आता तुमचा काय विचार असेल तो खरा. मामांना हे कळलं तर काय वाटेल अशी काळजी लागन राह्यली आहे. ते का आले नाहीत, कळत नाही. वास्तविक आतापर्यंत त्यांनी यायला हवं होतं. "

" लग्नाच्या एखादा दिवस आधी येतोच असं त्यांचं पत्र आलं आहे. दिल्लीला वराबद्दल चौकशी केल्याचंही लिहिलं आहे. तेथे त्याच्याबद्दल फार चांगलं बोललं जातं अन् वरिष्ठांची त्याच्यावर मर्जी आहे म्हणे. पगारसुद्धा अखेर दोन हजारपर्यंत पोचेल असंही त्यांनी लिहिलं आहे.

" चला, तर मी बोललो ते खरंच ठरलं म्हणायचं. निश्चितच कुणातरी मत्सरी माणसाचं हे काम असलं पाहिजे. "

" हं ! चांगली मुलं सहजासहजी मिळतात कुठं ? किती तरी लोकांनी या मुलाला आपल्या मुली देण्यासाठी खटपट केली असेल. त्यांचं काम साधलं नाही म्हणून असा हेवादेवा साधला असावा. "

" अगदी बरोबर ! असंच असलं पाह्यजे. "

" तर मग बोल, हे लग्न व्हावं असं तुला वाटतं ना ? "

" हो, हो ! हे लग्न व्हायलाच हवं. सर्व तयारी झाली आहेच, तेव्हा झालेल्या कामात मोडता घालणं ठीक नाही. "

" काय लाख बोललास ! अन् समजा पत्रात लिहिलेल्या गोष्टी खऱ्याही असल्या तरी आपण काय करणार ! कुलस्वामिनीची मर्जी असली तर पोरीला सुखात राह्यला मिळेल. हे लग्न व्हावं असाच ईश्वरी संकेत असला तर ते कोण मोडणार ? "

" हे लग्न व्हावं अशी ईश्वरी योजना दिसते. नाहीतर वल्लिलेला बघायला आलेला हा गडी सीतेशी लग्न करण्याच्या गोष्टी कसा काय बोलला असता ? "

" माझंही मन असंच म्हणतं आहे. कुठल्या कुणाचं निनावी पत्र वाचून मी तरी आपल्या डोक्याला का उगाच ताप करून घेऊ ? आता तू एक काम कर. यापुढं माझ्या किंवा सीतेच्या नावावर येणारी पत्रं तूच घेत जा. वाचून पाहिल्या-वर आम्हाला देण्यालायक असली तरच द्यायची. नाहीतर फाडून टाकायची. माझं तर मत असंही आहे, की तू तुझ्या बापाच्या नावावर आलेली पत्रं पाहून घेत जाशील तर फार बरं होईल. कारण लोक माझ्या नावावर जशी पत्रं पाठवतात तशीच त्यांनाही लिहून त्यांचं मन कलुषित करू शकतात. खरं की नाही ? "

" अगदी खरं आहे. बाबांना येणारी पत्रं आधी वाचून मगच त्यांना दाखवावीत असा विचार माझ्याही मनात आला आहे. "

" देव तुझं भलं करो ! सूर्या, अशी प्रार्थना करण्यावाचून तुला देण्यासारखं माझ्याजवळ दुसरे आहे तरी काय ? " कृतज्ञतेनं राजम्मा गदगदून गेली.

काही क्षण स्तब्धतेत गेले. सुरूच्या बनातून येणाऱ्या वायुलहरींनी तेथील शांततेचा भंग होत होता. तिकडून येणारा हवेचा आवाज सागराच्या लाटांच्या गर्जनेसारखा भासत होता....

तो आवाज ऐकून सूर्याला पूर्वीच्या एका प्रसंगाची आठवण झाली. त्यानं आत्येला विचारलं, " आत्याबाई, तुम्हाला आठवतं ? एक दिवस असाच लाटांच्या आवाजासारखा आवाज ऐकून तुम्ही घाबरला होता. मी कारण विचारलं तेव्हा म्हणालात, पुढं केव्हातरी सांगेन. आता सांगणार का ? "

राजम्माचा चेहरा ढगांनी झाकल्यासारखा निस्तेज झाला... क्षणात सावरून ती म्हणाली, " आता सांगत्येच हं सूर्या. नाहीतरी तुला हे सर्व सांगायचा विचार एवढ्यात मनात येतच होता. . .इथं येण्यापूर्वी मुंबईला मी तापानं अगदी

बिछान्याला खिळून पडल्ये होते. अंगात ताप असताना मनात नाहीनाही ते विचार येत. वाट्टेल तसे भास होत. प्रत्यक्षात न दिसणारी असंभवनीय दृश्यं मी पाहिली. काही आकर्षक असतं तर काही भयानक असत....अशाच एका दृश्यात मी पाहिलं, माझी सीता अन् मी समुद्राच्या किनाऱ्यावर उभ्या आहोत. अचानक सीता समुद्राच्या पाण्यात उतरली नि पुढं पुढं जाऊ लागली. मी ओरडू लागले, ‘ अग ऽ ! पाण्यात जाऊ नकोस. थांब ! ’ पण लाटांच्या गर्जनेत माझे शब्द तिच्या कानापर्यंत पोचलेच नसावेत. ती पुढं पुढं जातच राहिली. तेवढ्यात एक खूप मोठी लाट आली अन् तिला आत ओढून घेऊन गेली. तिला वाचण्या-साठी मी पण समुद्राच्या पाण्यात उतरले. मला पोहता येतं. त्यामुळं लाट फोडून मी पोहत पुढं गेल्ये. जिवाच्या आकांतान मी हाका मारीत होते, ‘सीता ऽ सीता ऽ !’ सीतेचा थांगपत्ता लागत नव्हता. पोहून माझे हात थकले होते. इतक्यात माझ्या हाताला एक वस्तू लागली. काय आहे म्हणून मी उत्सुकतेनं पाहिलं. तो सीतेचा हात होता. मी तो आपल्या हातात घट्ट पकडला.... सूर्या, हे स्वप्न मी एकदा नव्हे अनेकदा पाहिलं. प्रत्येक वेळी सीतेचा हात माझ्या हाती सापडताच मला जाग यायची. तेच स्वप्न आता वास्तवात उतरू लागलं आहे असं मला वाटतं. आताही मला त्या भयंकर स्वप्नाची आठवण झाली की मी घाबरून जाते ! माझं शरीर थरथर कापू लागतं ! सुरूच्या बनातून येणाऱ्या वाऱ्याच्या आवाजानं मला त्या भयंकर स्वप्नाची आठवण होते !"

क्षणभर विचार करून सूर्यानं म्हटलं, " तुम्ही कधी या गोष्टी सीतेला सांगितल्या का ? "

" हं ! सांगितल्या. अन् तिला सावध राहायची सूचनाही दिली. "

" तुम्ही हे सारं सीतेला सांगायला नको होतं.

10

राजमपेट्टै गावाच्या ब्राह्मणआळीत धुमधडाका सुरू होता. किट्टावय्यर पाटलांच्या घरचं लग्न म्हणजे काही साधीसुधी गोष्ट नव्हती. लग्नाच्या एक आठवडा आधीपासूनच वऱ्हाड जमलं होतं. गावात कुणाच्या घरी चूल पेटली नव्हती. सर्वांची जेवणं त्यांच्याच घरी होऊ लागली.

बैलांच्या गळ्यातील घुंगरांचे व घंटांचे आवाज सतत घुमत होते. बैलगाड्यांना फुरसत नव्हती. एकाच मंडपात दोन लग्नं होणार होती. सीतेचं राघवन्‌बरोबर आणि ललितेचं पट्टाभिरामन्‌शी व्हायचं होतं.

लग्नाच्या आदल्या दिवशीच दोन्ही लग्नांची पाहुणे मंडळी व व्याही मंडळी गावात येऊन पोचली होती. गावाला यात्रेचं स्वरूप आलं होतं. अगदी रथोत्सव असल्यासारखी गर्दी झाली होती.

घरात उत्साहाचं, कौतुकाचं वातावरण दिसत असलं तरी सर्वांच्या मनाला एक गोष्ट सलत होती, सीतेचे वडील दुरैस्वामी अद्याप आले नव्हते.

पण एवढ्याच कारणावरून सीतेचं लग्न पुढं ढकलण्याचा विचार कुणाच्याही मनाला शिवला नाही. मात्र राजम्माच्या मनाला टोचणी लागून राहिली होती. तिनं आपली ही मनोव्यथा कुणालाच सांगितली नव्हती. किंबहुना, सीतेचे वडील आले नाहीत तरीही हे लग्न व्हायलाच हवं असा तिनं आग्रह धरला होता. कारण पतीच्या पत्रामुळे तिला धीर आला होता. त्यांनी आपल्या पत्रात या लग्नाला पूर्ण संमती दिली होती. ते पत्र वाचून पाहिल्यावर वर-पक्षाकडील मंडळीच्या मनातील भीती दूर झाली होती. डोक्यावरचा भार उतरल्यासारखा झाला.

रात्रीचे दहा वाजून गेले. शेवटची गाडी निघून गेली तरी दुरैस्वामी आले नाहीत. शेवटी किट्टावय्यरांनी बहिणीशी विचारविनिमय केला. दोघांनी मिळून ठरवलं की, राजम्माची थोरली बहीण अभयंब्रा आणि तिचे यजमान यांनी कन्यादान करावं.

राजम्मानं आपल्या मनाचं समाधान करीत मनाशी म्हटलं, ‘ माझी सीता

केवढी भाग्याची ! तिचं कन्यादान करायसाठी धार्मिक वृत्तीचं सदाचारी जोडपं लाभलं! '

अभयंबाला तर कन्यादानाचं पुण्य पदरी पडणार म्हणून फार आनंद झाला.

किट्टावय्यरांनी मुलगी व भाची असा भेदभाव केला नाही. दोघींच्याही लग्नाची तयारी सारखीच केली. दोघींना अगदी सारखे शालू घेतले. दोन्ही जावयांना सारखे कपडे केले. कशातच उणीव नव्हती. मात्र सरस्वती अम्मांनी मुलीला दिलेलं आंदण भाचीपेक्षा अधिक होतं. त्याबाबत किट्टावय्यर हतबल ठरले होते.

अभयंबाला हा भेदभाव आवडला नाही. ती कुरबुर करू लागली. राजम्मानं तिची समजूत घालत म्हटलं, " ताई, कृपा करून तोंड बंद ठेव ! ज्यांनी हे सारं करायचं ते आले नाहीत. कबूल करून आले नाहीत. तरीही सारं काही व्यवस्थित होतंय यातच मला समाधान आहे. तुझी ही कुरकुर ठीक नव्हे. तसा आपला दादा देवमाणूस आहे ग ऽ ! त्याच्या भलेपणामुळंच एवढं तरी होऊ शकलं. नाहीतर एवढं तरी करण्याची माझ्या हिंमत होती का ? देवाच्या दयेनं व्याही अन् जावई चांगले मिळाले ' हे नाही, ते नाही ' म्हणून हिणवत नाहीत, रुसत नाहीत. सर्व काही गोड करून घेतायत्. मग तू कशाला मनाला लावून घेतेस ? जे चाललंय् तेच चांगलं म्हणून माणसानं आनंद मानून घ्यावा. "

सीतेच्या हृदयात मात्र वेदनेचा सागर उफाळून आला होता. तिच्या लग्नाला वडील आले नाहीत याचा तिला राग आला होता. ललितेला दिलेल्या आंदणातील सामान पाहून तिला दुःख झालं होतं. तिच्या आंदणासाठी सामान गोळा करण्याकडे कोणी फारसं लक्ष घातलं नव्हतं. पण हे सारं दुःख तिनं गिळून टाकलं. ती आपल्या मनाचं समाधान करीत होती, ' ललितेला खूप आंदण दिलं तर देऊ दे. माझं भाग्य थोडंच तिच्या वाट्याला येणार आहे ? ' अशा विचारानं तिचा चेहरा प्रफुल्लित दिसत होता.

सूर्यादेखील अस्वस्थ होता. मात्र त्याच्या अस्वस्थेचं कारण वेगळंच होतं. लग्नाच्या आदल्याच दिवशी राजम्माच्या नावाची तार आली होती. रोजच्याप्रमाणे टपाल-कचेरीत गेला असताना एक खास माणूस शहरातील तार-कचेरीतून ती तार घेऊन आला होता. सूर्यानं तार घेतली. फोडून वाचली. तो थक्क झाला ! तारेत लिहिलं होतं. ' लग्न लांबणीवर टाका. प्रत्यक्ष आल्यावर कारण सांगेन—

दुरैस्वामी.' तार वाचून सूर्या चटकन् कोणताच निर्णय घेऊ शकला नाही. एकदा त्याला वाटलं, ज्यानं निनावी पत्र लिहिलं त्यानंच तर ही तार पाठवली नसेल ? पुन्हा वाटलं, यदाकदाचित् मामांनीच ही तार केली असली तर ? काय असेल ते असो, पण ही तार कुणाला दाखवली किंवा तिच्यातील मजकूर मांगितला तर घोटाळा होऊन जाईल. म्हणून काय व्हायचं ते होवो, तार कुणाला दाखवायची नाही, असा ठाम निर्णय त्यानं घेऊन टाकला. तरीही त्याच्या मनाला शांतता लाभली नाही.

' रात्रीपर्यंत बहुतेक मामा येतीलच. अन् आले तर लग्नही तोडून टाकतील. तरी कारण कळल्याशिवाय लग्न मोडू नये. तारेची तर माहितीच कोणाला देऊ नये. रात्री मामा नाहीच आले तर काय करायचं ते पुढं पाहता येईल...' पण रात्रीच्या गाडीनं दुरैस्वामी आले नाहीत तेव्हा तो चांगलाच गडबडला. रात्री जानवशावर सर्व लोक जमले तेव्हा त्याची मनःस्थिती पार बिघडून गेली. तारे-बद्दल चर्चा करणंही अवघड होऊन बसलं.

त्यानं मनाशी विचार केला, ' समजा, एखाद्या दुष्ट, मस्करी माणसानं ही तार केली असली नि या खोटचा तारेमुळे लग्नकार्य मोडलं तर सीतेवर व तिच्या आईवर केवढं आकाश कोसळेल ! बिचाऱ्यांवर शोक करण्याची पाळी येईल.' या विचारानं त्याचा उरलासुरला धीर पार खचून गेला. सूर्यानं मन खंबीर केलं आणि अखेरचा निर्णय घेऊन टाकला, ' ईश्वराची इच्छा असेल तसे घडेल. काय व्हायचं ते होईल. पण यावेळी तारेतली बातमी कुणाला न सांगणंच योग्य आहे.'

तरीही त्या तारेनं त्याची झोप उडवली, रात्री तो स्वस्थ झोपू शकलाच नाही.

दुसऱ्या दिवशी पहाटेपासूनच लग्नघाई सुरू झाली. सकाळी दहाच्या आधीचाच मुहूर्त असल्यानं सारे विधी भराभर उरकले जाऊ लागले. ' मुहूर्ताची वेळ झाली, घाई करा ' असंच सर्व म्हणत होते. दोघेही जावई काशीयात्रचा विधी पार पाडण्यासाठी धड आठ-दहा पावलं चालले नाहीत तोच कुणीतरी ओरडून बोललं, " अहो पुरे आता ! का खरंच काशीला निघाला ?" मामाच्या खांद्यावर बसून वधूवरानी माळांची अदलाबदल करण्याची प्रथा घाईघाईत उरकण्यात आली. वरानं वधूच्या गळयात मंगळसूत्र बांधण्याचो घटका भरताच नादस्वर (सनईसारखं एक वाद्य) अशा जोरात वाजवलं जाऊ लागलं की आता कानाचे पडदे फाटणार असं वाटू लागलं. तात्रिल (तबल्यासारखं वाद्य) अशा जोरात बडवलं जाऊ लागलं की सारं घर हादरलं. वेदमंत्रांनी सारं आकाश

घुमू लागलं. स्त्रियांनी ' गौरीकल्याणम् ' गायलं. नेमकं याचवेळी राघवन्नं सीतेच्या आणि पट्टाभीनं ललितेच्या गळ्यात मंगळसूत्र बांधलं.

मंगळसूत्र बांधण्याच्या कार्यक्रमानंतर घरातील गडबड बरीच कमी झाली. आतापर्यंत घरात चांगलीच गर्दी झाली होती. सर्व मंडळी घामानं न्हाऊन निघाली होती, म्हणून मोकळी हवा घेण्यासाठी काही बाहेर पडली. सूर्यासुद्धा बाहेर आला. सकाळपासून तो सारखा आतबाहेर करीत होता. आता कुठं त्याच्या मनावरचा भार उतरला. ' चला, लग्न तर लागलं एकदाचं. आता काहीच होऊ शकत नाही ! ' या विचारानं त्याचं मन शांत झालं.

इतक्यात बैलांच्या घुंगराचा आवाज ऐकू आला. बोळाच्या दुसऱ्या टोकाकडे त्याचं लक्ष गेलं. किट्टावय्यरांची धमणी (आरामशीर बैलगाडी) तिकडून येत होती. तिच्यात कोणी माणूस बसला होता. ते मुंबईचे मामाच असावेत असा विचार करून सूर्या त्यांच्या स्वागतासाठी धावला.

गाडी मंडपापुढं येऊन थांबली. आत बसलेले दुरैस्वामी खाली उतरत असतानाच सूर्या म्हणाला, " किती उशीर केलात मामाजी ? आम्ही तर तुमची वाट पाहून थकून गेलो.. "

गाडीतून उतरताच दुरैस्वामींनी सूर्याला थेट पायापासून माथ्यापर्यंत न्याहाळून पाहिलं.

" माझं नाव सूर्या. सीताचा मामेभाऊ आहे मी. "

" ओ हो ऽ ! तू किट्टावय्यरांचा दुसरा मुलगा का ? "

" होय मामा ! ... पण तुम्ही इतका उशीर कसा केलात ? मंगळसूत्र बांधण्याचा कार्यक्रम आटोपून चांगली पंधरा मिनिटं झालीत. थोरल्या आत्येनं व तिच्या यजमानांनी कन्यादान केलं. "

" काय म्हणतोस ? मंगळसूत्र घालण्याचा कार्यक्रम आटोपला ? पण कुणाचा ? "

" कुणाचा म्हणजे ? ललितेचा, सीतेचा; दोघींचाही– "

" म्हणजे ? सीतेचं लग्न लागलं ? कुणाशी लागलं ? "

" कुणाशी म्हणजे राघवन्शी ! हे सारं तुम्हाला आधीपासून माहीत होतं ना ? ... तुम्ही तर दिल्लीवरून पत्र देखील लिहिलं. "

" तरीपण मी जी तार पाठवली . . . " असं बोलता बोलता दुरैस्वामी एकदम थांबले.

" तार ? कसली तार ? " सूर्यानं साहस करून विचारलं.

" सीतेचं लग्न रहित करा, अशी मी तार केली ती मिळाली नाही का ?" सूर्याचं हृदय धडधडू लागलं तरी धोरणीपणानं त्यानं म्हटलं,

" मामाजी, थोड्या वेळापूर्वी एक तार आली खरी. पण लग्नाच्या गडबडीत मी ती उघडून पाहू शकलो नाही. आत्याबाईच्या हाती द्यायची संधीच मिळाली नाही. तुम्ही धाडलेली तार हीच तर नव्हे ? " असं म्हणत त्यानं आपले खिसे धुंडाळून ती तार बाहेर काढली आणि दुरैस्वामींच्या हाती दिली.

" होय रे, हीच तार. पण ही काल कशी नाही मिळाली ? हे खेडं असल्यानं पोचायला उशीर झाला असावा. ईश्वरी लीला आहे बावा ही ! आपण बापडे काय करणार ? ठीक आहे. पण सूर्या, आता चुकूनही या तारेबद्दल कुणाजवळ बोलू नकोस हं ! "

" तुम्ही निर्धास्त असा मामाजी. आता बोलून काय फायदा ? जे व्हायचं ते होऊन गेलं ! "

" तेच म्हणतो. होऊ नये ते होऊन गेलं. देवाची इच्छा वेगळीच दिसते." असं म्हणून दुरैस्वामींनी तारेचे तुकडे तुकडे करून फेकून दिले.

सीता तिरक्या नजरेनं राघवन्‌कडे पाहून पुलकित होत होती. अचानक तिची दृष्टी दाराकडे गेली. दारातूनच तिचे वडील येताना दिसले, त्यांना बघताच तिच्या मनाचा बांध फुटला. आतापर्यंत हृदयात कोंडून ठेवलेलं दुःख डोळ्यावाटे बाहेर पडलं. डोळ्यांना धारा लागल्या नि ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

राजम्मा खांबाशेजारी उभी होती. पतीला पाहाताच तिचा भावनावेग अनावर होऊन ती दगडी मूर्तीसारखी जागेला खिळून स्तब्ध उभी राहिली. मुलीला समजावण्यासाठी पुढं जाण्याचं तिला भानच राहिलं नाही. ते काम सीतेच्या मावशीनं केलं. सीतेजवळ जाऊन ती म्हणाली, " वा ऽ ग वेडे, रडायला काय झालं ? तुझे वडील आलेत ना ? उशिरा का होईना, आलेत. मग आनंदित व्हायचं का असं वेड्यासारखं रडायचं ? "

सीतेची सासूसुद्धा तिला समजावण्यासाठी जवळ आली. सीतेच्या शालूचा पदर आणि जावईबापूच्या उपरण्याची गाठ घालण्याचं काम करीत मागे उभा असलेला शुंडू हळूच म्हणाला, " ताई, असं रडायचं नाही. अग ऽ रडशील तर तुझ्या डोळ्यातलं काजळ गालावर उतरेल ना ? "

दुरैस्वामी अय्यर आपल्या मुलीजवळ जाऊन बसले. मग तिच्या पाठीवरून हात फिरवीत समजावणीच्या स्वरात म्हणाले, " रडू नकोस बेटी. शांत हो, अग ऽ गाडीनं दगा दिला. नाहीतर वेळेवर आल्याशिवाय राहलो असतो का ? "

सर्वांनी समजावलं तरी सीतेचं रडणं थांबेना. शेवटी राघवन्‌नं तिच्या हाताला हलकेच स्पर्श केला अन् म्हटलं, " सीता ! "

बस एवढंच ! पण सीतेचे अश्रू एकदम थांबले. तिनं आसवांनी ओथंबलेल्या टपोऱ्या डोळ्यांनी एकवार राघवन्‌कडे पाह्यलं. त्या दृष्टिक्षेपात किती खोल अर्थ दडलेला होता !

तो सारा अर्थ राघवन्‌च्या डोळ्यांना क्षणात आकलन झाला. प्रेमाची रीतच न्यारी असते !

11

' ग्रॅंट ट्रंक एक्स्प्रेस ' मद्रासवरून निघून अठ्ठेचाळीस तास झाले होते. गाडीत बसून उतारू कंटाळून गेले होते. त्यांच्यावर धुराचा व कोळशाच्या कणांचा सतत मारा करीत त्यांना घेऊन आगगाडी वेगात धावत होती...

याच गाडीच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यातून सीता दिल्लीला निघाली होती. तिच्या सोबतीला सासूबाई– कामाक्षी अम्मा– आलेल्या होत्या.

कामाक्षी अम्मांच्या मांडीवर एक इवलीशी गोड छोकरी होती. ती चिमुरडी कामाक्षीच्या गालावर सारख्या थपडा लगावत होती. आणि त्या हसत हसत त्या थपडा खात होत्या.

सीता आपल्या डोळ्यासमक्ष चाललेला हा जुलूम सहन करू शकली नाही. कामाक्षी अम्मांच्या मांडीवर बसलेल्या मुलीच्या तोंडाकडे तिनं डोळे वटारून पाहिलं. मग आपल्या ओठावर बोट ठेवून तिला दटावीत म्हटलं, " हे बघ वासंती, आजीला असं मारशील तर मार खाशील. " अन् दुसऱ्याच क्षणी सीतेच्या गालावर त्या चिमुकल्या हातांच्या दोन थपडा बसल्या. सासू व सून खूप जोरात हसल्या.

" गालीचं दाल उघला. नाहीतल आनखी मालीन. "

कामाक्षी अम्मांनी खिडकीची झडप बंद केली होती. वासंती सारखी डोकावून पाहायची म्हणून खिडकीचं तावदान वंद ठेवलं होतं. उलट खिडकी बंद असणं वासंतीला पसंत नव्हतं. गाडीतून प्रवास करताना खिडकीतून बाहेर पाहायचं नाही तर खिडकीचा उपयोगच काय अन् गाडीतून प्रवास तरी कशासाठी करायचा, या वासंतीच्या प्रश्नांना उत्तर देणं कठीण होतं. शेवटी आजींना खिडकीची झडप उघडून द्यावी लागली.

खिडकी उघडताच दोन वर्षांच्या वासंतीनं आपली इवलीशी तर्जनी बाहेरच्या दिशेला करून विचारलं, " आई ऽ ! ते काय आहे ग ? "

" अग ऽ, तो जुन्या काळातला किल्ला आहे– " सीतेनं उत्तर दिलं.

" किल्ला म्हणजे काय ग ? "

" किल्ला म्हणजे किल्ला. छे बाई तुला समजावून देणं आपल्याला जमणार नाही. सूर्यामामा आला की देईल सांगून किल्ला म्हणजे काय ते. "

" सुल्या मामाला बोलावनं तल् ! "

" अगऽ बाई, ऽ आता बोलावलं तर त्याला ऐकू जाणार नाही गाडीच्या या आवाजात. गाडी थांबली की तो स्वत:च येईल. तोपर्यंत गप्प बैस पाहू. "

वासंती गुपचुप खिडकीतून बाहेर पाहात बसली. वासंतीप्रमाणेच कामाक्षी अम्मासुद्धा कुतूहलानं खिडकीतून बाहेर पाहू लागल्या. शेवटी न राहवून त्यांनी सुनेला विचारलं, " सूनबाई जिकडं तिकडे किल्लेच किल्ले दिसतात. हे इतके किल्ले कोणी बांधले ग ? "

" कितीतरी राजांनी बांधलेत. गेली हजार वर्षं दिल्ली ही भारताची राजधानी राह्यली आहे. त्यामुळे आग्रा ते दिल्लीच्या प्रदेशात असंख्य किल्ल्यांचे भग्न अवशेष दृष्टीला पडतात. . . "

" आमच्या दक्षिणेत प्रवासाला निघालं म्हणजे दोन्ही बाजूला मंदिरंच मंदिरं दिसतात. अगदी पाच पाच मिनिटाला गोपुरं दिसतात. एकदा चिदंबरम्पासून त्रिचिरापल्लीपर्यंत गाडीतून मी पाचशे गोपुर मोजली. मला वाटतं, इकडच्या भागात नावालाही मंदिर नसावं. "

" असं हो कसं म्हणता आई ? मथुरा–वृंदावन ही श्रीकृष्णांची लीलाभूमी नव्हे का ? तिथं मंदिरांना कसली वाण ? काशीकडे गेलं की मंदिरंच मंदिरं पाह्यला मिळतात. मात्र उत्तर-दक्षिणेच्या वास्तुकलेत फार अंतर आहे. "

" जाऊ दे ग, त्या गोष्टी सोड. " कामाक्षी अम्मानी गोष्टीचा ओघ बदलत म्हटलं, " आता असं सांग, सूर्यानं अजून लग्न का नाही केलं ? तुला आहे का काही कल्पना ?... त्याच्यात काही दोष तर नाही नं ? "

" छे हो ! तसं काही नाही. अन् त्याचं का लग्नाचं वय होऊन गेलं आहे ? हं ! पण लग्नाची गोष्ट काढलीच कुणी तर म्हणतो, मला लग्नच करायचं नाही."

" ही मुलांची नेहमीची सवयच असते. अग काही वर्षं असंच म्हणत राहतात नि कोणी जरा भर दिला तर झटकन् हळद लावून पिवळे होतात. काय ग सूर्याचं शिक्षण किती झालं आहे ? "

" बी. ए. ला शिकत होता, पण मधेच सोडून दिलन्. "

" अस्सं ! पण त्यानं असं मधेच शिक्षण का सोडलं ? अभ्यासात ढ होता का ? चेहऱ्यावरून तर मंदबुद्धीचा वाटतो. "

" पाहणाऱ्याला कदाचित् तो तसा वाटेल पण फार बुद्धिमान आहे हं ! खरं म्हणजे माझं हे लग्न त्याच्यामुळेच जुळलं. तुमच्या लेकानं ललितेला पसंत न करता माझ्याशी लग्न करण्याची इच्छा दर्शवली तेव्हा मामा-मामी खूप संतापली. सूर्यानंच त्यांची समजूत घालून शांत केलं. "

" अग ऽ, तुझ्या मामा-मामींच्या रागावण्यानं का होणार असलेलं लग्न तुटणार होतं . . .? पण का ग सूर्यानं मधेच शिक्षण का सोडून दिलं ? "

" का कोणास ठाऊक ! त्याला इंग्रजी शिक्षणाबद्दल तिटकाराच वाटतो. म्हणतो बी. ए. झाल्यावर आईवडील नोकरी करायला लावतील. अन् मुलींचे बाप आपल्या मुली खपवण्यासाठी चकरा मारून बेजार करतील. "

" कमाल आहे ग बाई ! मुलगी देणं म्हणजे बेजार करणं काय ? मी तरी त्याच्याविषयी अेवढं खोदून कशाला विचारते आहे ? माझी अेक पुतणी आहे. तिचं इथं जुळलं तर बरं होईल असं आपलं वाटलं मला. शिकून सावरून नोकरी करणार नाही तर काय करणार आहे ? "

" कुठंतरी काँग्रेसच अधिवेशन भरणार आहे तिथं जातो म्हणत होता. तिकडून परत गावाला जायचा विचार नाही त्याचा. दिल्लीत राहून वृत्तपत्रांत लेखन करण्याचं त्याच्या मनात आहेसं दिसतं. "

असं बोलणं चालणं असतानाच गाडीनं लांबलचक शिटी देऊन वेग कमी केला. लोकांची गडबड सुरू झाली. सीतेनं खिडकीतून बाहेर डोकावून पाहिलं.

" अहो आई, दिल्ली स्टेशन आलं. तुमचे लेक आपल्याला अुतरून घ्यायला स्टेशनात आले असतील." असं म्हणत तिनं झोपलेल्या वासंतीला जागं करीत म्हटलं, " अग वासंती अूठ अूठ. स्टेशन आलं. तुझे बाबा तुला घ्यायला आले असतील."

जोरजोरानं शिटी देत आगगाडी स्टेशनात शिरली. प्लॅटफॉर्मवर अुभ्या असलेल्या शेकडो लोकांचे चेहरे सीतेच्या डोळ्यापुढून सरकले. पण त्यापैकी अेकही तिच्या हृदयपटलावर स्थिरावला नाही. तिचे आतुर डोळे धुंडाळत होते, हृदयात घर करून राहिलेला तो सुंदर, मनोहारी चेहरा. शेवटी तो तिला दिसला. दिसताच ती आनंदातिशयानं ओरडली, " अग वासंती, ते बघ तुझे बाबा. इकडेच येताहेत ! " प्लॅटफॉर्मवर चाललेल्या आवाजांवर तिच्या आवाजानं मात केली होती.

" बाबा कुथं आहेत ग आई ? " वासंतीन विचारलं.

" ते ऽ बघ !" सीतेनं राघवन्‌च्या दिशेला बोट दाखवलं.

प्लॅटफॉर्मवर जमलेल्या गर्दीतील लोकांचे धक्के मोठ्या कौशल्यानं चुकवत सुंदर राघवन् सीतेच्या डब्याकडे येत होता. त्याला बघून सीता रोमांचित झाली... पण तो अचानक थाबला.

सीतेची गाडी ज्या फलाटावर थांबली होती त्याच्या समोरच्या फलाटावर दुसरी एक गाडी स्टेशनातून निघण्याच्या बेतात शिटी देत उभी होती. त्या गाडीकडे राघवन्‌चं लक्ष जाताच सीतेच्या डब्याकडे यायचं सोडून तो त्या गाडीकडे वेगानं निघून गेला. राघवन् ज्या डब्याकडे गेला त्या डब्यात खिडकीजवळ दोन तरुणी एकमेकींना खेटून बसल्या होत्या. त्यांच्यापैकी एकीला राघवननं काही तरी विचारलं. तिनं त्याला उत्तरही दिलं. आणखी काही तो विचारणार एवढ्यात गाडी चालू लागली, शेवटचा गार्डाचा डबा समोरून सरकेपर्यंत राघवन् त्या तरुणी असलेल्या डब्याकडे पाहात उभा होता. त्यानंतर तो सीतेच्या डब्याकडे यायला निघाला.

सीता डब्याच्या खिडकीतून अनिमिष नेत्रांनी हे दृश्य बघत होती. वास्तविक तिला अन् आपल्या मुलीला पाहिल्यानंतर त्यानं सरळ त्यांच्याकडे यायला पाहिजे होतं. तो सरळ समोरच्या गाडीकडे गेला. त्या तरुणींना भेटला. हे सर्व पाहून सीता हतबुद्ध झाली. त्या युवती कोण हे काही तिला ठावूक नव्हतं. मात्र आपल्या पतीनं आपल्याकडे न येता त्यांच्याशी जाऊन बोलावं हे तिला खटकलं.

ती उदास झाली. पण ही टोचणी फार वेळ लागून राहिली नाही. राघवन् जवळ येताच ती मोहरून गेली. " वासंती, बाबांजवळ जा, " असं बोलून खिडकीतूनच तिनं मुलीला त्याच्या स्वाधीन केलं. पोरगी आनंदानं आपल्या बापाजवळ गेली. त्यानंसुद्धा मोठ्या वात्सल्यानं तिला खांद्यावर घेतलं. तरी त्याचं वात्सल्य औपचारिक वाटलं.

" सीता, आधी तू खाली उतर पाहू. हे सामान काढल्यावर मी खाली येत्ये. " कामाक्षी अम्मांनी बजावलं.

सीता डब्याबाहेर आली व राघवन्‌जवळ जाऊन उभी राहिली. राघवन् हमालांना हुकूम देण्यात दंग होता. तो आपल्याशी काही बोलेल असं सीतेला वाटलं होतं. तो तिच्याशी काहीच बोलला नाही. . .

इतक्यात गाडीच्या कुठल्या तरी डब्यातून उतरून सूर्या त्यांच्याजवळ आला. राघवन्‌नं त्याच्याकडे पाहिलं पण काहीच बोलला नाही. ही गोष्ट सीतेच्या मनाला लागली. तिनं सूर्याकडे बघितलं. तो सस्मित उभा होता.

शेवटी सीतानं हिय्या करून विचारलंच, " अहो ऽ, तुम्ही सूर्याला ओळखता की नाही ? "

" कोण सूर्या ? " त्यानं रुक्ष स्वरात म्हटलं.

" हे काय बाई विचारणं झालं ! ललितेचा भाऊ नव्हे का ? "

" प्रवासात आम्हाला त्याची खूप मदत झाली. अरे तो आमच्या सोबत नसता तर चांगलीच आफत झाली असती. " डब्यातून उतरता उतरता कामाक्षी अम्मा बोलल्या.

सर्व सामान हमालांच्या डोक्यावर लादलं गेलं होतं. कामाक्षी अम्मांनी राघवन्‌च्या हातून वासंतीला जवळ घेतलं. राघवन् पुढं झाला. सर्व त्याच्या मागून निघाले.

मोटारमध्ये सामान ठेवून झाल्यावर कामाक्षी अम्मा आणि सीता वासंतीला घेऊन मागच्या सीटवर बसल्या. राघवन् स्वत: गाडी चालवायला बसला. त्याच्या बाजूची जागा रिकामीच होती. सूर्या त्यांना निरोप देण्यासाठी गाडीच्याजवळ उभा होता. राघवन् त्याला रिकाम्या जागेवर बसायला लावील असं सीतेला वाटलं. त्यानं सूर्याला बसवून घेतलं तर काय बिघडणार आहे असा विचार सीतेच्या मनात येऊन गेला. राघवन् मात्र काहीच बोलला नाही.

मोटार चालू झाली तेव्हा सीता सासूला म्हणाली, "आई, सूर्या तुम्हाला नमस्कार करतो आहे."

त्यावर कामाक्षी अम्मा म्हणाल्या, "बरं आहे सूर्या. गावाला जायच्याआधी एखाद्या दिवशी जरूर घरी ये हं !" सासूच्या तोंडून निघालेले हे शब्द ऐकून सीतेला समाधान वाटलं.

"अवश्य येईन. अहो जावईबापू, आपल्या घराचा पत्ता तर मागा."

सूर्याला राघवन्‌च्या स्वभावाची पूर्वीच कल्पना आलेली होती. तरीही त्याच्यासाठी आपल्या आतेबहिणीचा संबंध तोडून टाकण्याची त्याची तयारी नव्हती. तसा विचारही त्याच्या मनाला शिवला नाही. जावईबापूंनी बोलावलं किंवा बोलावलं नाही तरी त्यांच्याकडे एकदा जाऊन येण्याचा निश्चय त्यानं आधीच करून ठेवला होता.

"नंबर आठ, नादीरशहा रोड–" असं सांगून राघवन्‌नं गाडी चालू केली.

मोटार वायुगतीनं धावू लागली. सीतेच्या मनातील मळभ निघून गेलं. ती उल्हसित झाली. मुलीला म्हणाली,

"बघितलंस वासंती, तुझे बाबा कशी वेगात कार चालवतात ?"

"हं ऽ ! मी शुद्धा काल चालवीन." वासंती खुशीत बोलली.

घटकेत वेगानं चाललेली कार एकदम थांबली. सासू-सूना घाबरल्या. दोघीही एकदम उद्गारल्या, "काय झालं ? गाडी का थांबली ?"

"काही झालं नाही. घर आलं. म्हणून गाडी थांबली."

सीतेनं घराकडे बघितलं. लहानसा सुंदर बंगला होता तो. समोर दोन्ही बाजूला फुलांची व शोभेची झाडं होती. सीतेचं हृदय उचंबळून आलं. वासंतीच्या गालाचा मुका घेऊन ती म्हणाली, "वासंती, बघितलंस हे तुझं घर ? कित्ती सुदर आहे, नाही का ?"

"आई ऽ ! हे घल बाबांनी बनवलं ? आपल्यासाथी बनवलं ?"

12

सुंदर राघवन् लग्न आटोपताच सीतेला सोबत घेऊन दिल्लीला आला होता. विलायती थाटाच्या एका मोठ्या हॉटेलात त्यांनी चांगला महिनाभर मुक्काम केला होता. त्या दिवसांत ती दोघे जणू गंधर्वलोकात विहार करीत होती. नव्या दिल्लीच्या प्रशस्त राजमार्गावरून आणि प्रसिद्ध चौकांतून त्यांनी, मनसोक्त भ्रमण केलं. जुने पडके किल्ले, भव्य महाल आणि मशिदी त्यांनी हातांत हात घालून पाहून घेतले...काही वर्षांपूर्वी हाच राघवन् दुसऱ्या एका युवतीच्या हातात हात गुंफून या स्थळांना भेटी देत असाच भटकला होता. त्या भ्रमंतीची आठवण अजूनही त्याच्या मनातून नाहीशी झाली नव्हती. मात्र मोठ्या प्रयासानं जुन्या स्मृती मनातून झटकून टाकण्याचा त्याचा प्रयत्न चालू होता. मग तो सीतेचा हात घट्ट पकडून घेत होता....

नव्या नवतीच्या त्या दिवसांतच राघवन्‌ला इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली. त्यानं सीतेला आपल्या घरी मद्रासला आणून सोडलं. काही दिवस तो घरी राहिला. या वास्तव्यात त्यानं सीतेची अनेक प्रकारे समजूत घालून तिला दिलासा दिला. राघवन्‌नं तिला सांगितलं, 'विलायतेला जाण्याच्या या सुवर्णसंधीचा फायदा घेतला तर नोकरीतील बढतीचे मार्ग एकदम खुले होऊन जातील. नोकरीच करायची तर अशी संधी सोडून चालणार नाही. बरं, पुन्हा असा योग येईलच असंही नाही. हाताशी आलेल्या अशा संधीचा फायदा न घेणं मूर्खपणाचं ठरेल...आपल्या विधानाच्या पुष्टीसाठी त्यानं असा युक्तिवाद केला की, मी तुला स्वखुशीनं पत्नी म्हणून निवडलं आहे. तुला सोडून जाताना माझ्या मनाला का कमी वेदना होतील ? शिवाय, पतीच्या प्रगतीच्या मार्गात अशा क्षुल्लक कारणावरून अडथळा आणणं सुज्ञ पत्नीला साजेल का? वाटल्यास पुढच्यावेळी इंग्लंडला जाताना तुलाही सोबत नेईन. '

सीतेला एकीकडे प्रिय पतीच्या वियोगाचं अतिशय दुःख होत होतं तर दुसरीकडे तो विलायतेला जातो आहे याचा अभिमान वाटत होता.

राघवन् पंधरा महिन्यांनी विलायतेतून परतला. या काळात सीतेच्या जीवनात महत्त्वाच्या कित्येक घटना घडल्या.... आपल्या लाडक्या लेकीला योग्य

वराच्या स्वाधीन केल्याचा अपरिमित आनंद होऊन तिच्या आईनं –राजम्मानं कायमचे डोळे मिटले. तसं पाहिलं तर अहेवपणी भरल्या कुंकवानं पतीच्या मांडीवर प्राण सोडण्याचं सद्भाग्य तिच्या वाट्याला आलं होतं. तसंच पवित्र कावेरीच्या तीरावर देहत्याग व दाहसंस्कार वाट्याला येण्याचं भाग्यही लाभलं होतं.

आईच्या मृत्यूनंतर बरेच दिवस सीता शोकमग्न होती. सारखी रडायची, आसवं ढाळायची. सासूनं पुष्कळ समजावलं तरी तिचा दुःखावेग कमी झाला नाही. सासऱ्यानं गीतेतील अनेक श्लोक ऐकवले, अर्थ विशद केला तरी तिचं मन शांत झालं नाही....अशा दुःखद प्रसंगाच्या वेळी आपला आवडता पती जवळ नाही या विचारानं तिच्या दुःखात भर पडत होती.

अगदी याच सुमाराम सीतेच्या आयुष्यात अशी एक सुखद घटना घडली की, तिला सर्व दुःखांचा विसर पडला. ती सुखाच्या शिखरावर आरूढ झाली.

त्या सुखद क्षणासाठी सीतेला मात्र जीव धोक्यात घालावा लागला. देवाच्या दयेने धोका टळला. ती माता बनली. सीतेनं ग्लानी ओसरताच डोळे उघडले. तिच्या कुशीत एक इवलीशी कोमल कळी, रक्तामांसाची सुंदर सजीव बाहुली विसावली होती. सीतेच्या आनंदाला पारावर राहिला नाही. त्या आनंदाच्या प्रवाहात दुःखद स्मृती पार वाहून गेल्या. आता आईच्या मृत्यूची आठवण करून शोक करीत बसण्यासाठी वेळच कुठं होता ? शिवाय कामाक्षी अम्मा आणि शेजारच्या म्हाताऱ्या बायकांनी तिची अशी समजूत करून दिली, की तिच्या मृत आईनंच तिच्या पोटी जन्म घेतला. आपल्या लेकीचं गोंडस मुख पाहात बसण्यात तिला अत्यानंद वाटू लागला. हळूहळू तिला आईच्या चेहऱ्याचं विस्मरण पडू लागल....पती विलायतेतून आल्यावर आपली नवजात बालिका त्याला दाखवून विस्मयचकित करण्याच्या विचारप्रवाहावर ती तरंगू लागली.

सासू-सुनेचं तर असं सूत जमलं की पाहणारे थक्क होऊन जात. एकदा तर सीतेनं चक्क सासूच्या तोंडावरच म्हटलं, " 'आई, तुमच्याबरोबर राहून संसार करणं शक्य नाही ' असं बोलून थोरल्या जाऊबाई माहेरी निघून गेल्याचं मी ऐकलं आहे. पण मला वाटलं, त्या फार दुष्ट असाव्यात."

एवढंच नव्हे तर सीतेनं शेजारीपाजारी जाऊन आपल्या सासूच्या प्रेमळ वर्तनाचा डांगोरा पिटला. आपल्याला लागलेला कलंक पुसून चाललेला पाहून कामाक्षी अम्मा आनंदानं फुलून गेल्या. मोठ्या ऐटीत बाहेर फिरू लागल्या....

सुंदर राघवन् विलायतेवरून परत आला. घरात नव्यानं उमललेली वासंती नावाची गोड कळी बघून त्याचं मन प्रसन्न झालं. दिल्लीत घर मिळताच पत्र लिहून तुम्हाला बोलावून घेतो, असं त्यानं दिल्लीला जाताना सांगितलं होतं. आणि मनपसंत घर मिळवायला बराच वेळ लागला होता. सीता नव्या दिल्लीत येऊन आठवडा लोटला. ते सर्व दिवस घर लावण्यात गेले. तरी संध्याकाळी तिला वाटायचं, लग्नानंतर आपण प्रथमच दिल्लीला आलो त्यावेळी राघवन्-बरोबर जसे भटकलो, तसंच आताही त्याच्याबरोबर भटकायला मिळावं पण घरातलं कामच इतकं पुरायचं, की मनातले मांडे मनातच विरून जायचे.

तरी एक दिवस तिनं राघवन्‌ला म्हटलंच, "आज ऑफिसातून जरा लवकर या नं ! आपण थोडं फिरून येऊ."

"बरं आहे. तुम्ही तयार राहा. मी तुम्हाला फिरायला घेऊन जाईन." असं सांगून राघवन् निघून गेला.

संध्याकाळी बाहेर पडताना कामाक्षी अम्मा म्हणाल्या, "मी काही आज बाहेर येत नाही. पोरीला पाहायला घरीच थांबते. तुम्ही दोघं फिरून या."

सीतेलाही मनातून असंच वाटत होतं. पण बोलायचं कसं ? स्वतः कामाक्षी अम्मांनीच माघार घेतलेली पाहून तिला मनातल्या मनात आनंद झाला. ती मोठ्या खुशीत राघवन्‌बरोबर पडली.

प्रथम दोघं कॅनॉट सर्कसकडे गेले. तिथं थोडा फेरफटका करून त्यानं आपली गाडी 'इंडिया गेट' कडे नेली.

'इंडिया गेट' जवळ एक कारंजं होतं. कारंज्याच्या चहूबाजूला हिरवीगार हिरवळ होती. दोघंही हिरवळीवर येऊन बसली. सूर्यास्त होऊन गेला होता. अंधार पडू लागला होता. आकाशातील तारकांशी स्पर्धा करीत चारही बाजूनी विद्युत्‌दीपांच्या मालिका ओळीनं झगमगू लागल्या.

"गंधर्वलोक या नावाचा लोक आहे म्हणतात. तो याहून सुंदर असेल का हो ?" सीतेनं कुतूहलपूर्वक विचारलं.

"हे बघ मी काही कधी गंधर्वलोकात गेलो नव्हतो. त्यामुळे तिथल्या सौंदर्याची इथल्याशी तुलना करणं माझ्या आवाक्याच्या बाहेरचं आहे."

सीतेला हसू आलं... "नव्या दिल्ली शहरापेक्षा लंडन अन् पॅरिस ही शहरं सुंदर आहेत का, हे तरी मला सांगा." तिनं म्हटलं.

" लंडन सुंदर आहे ते वेगळ्या दृष्टीनं. दिल्ली सुंदर आहे ती वेगळ्याच दृष्टीनं. त्यांच्या सौंदर्याची जातच वेगळी आहे. "

काही वेळ स्तब्धतेत गेला. मग मागची आठवण होऊन सीतेनं विचारलं, " मी आल्ये त्या दिवशी स्टेशनात तुम्ही कुठल्यातरी मुलीशी बोललात. कोण होती हो ती ऽ ? "

" असेल कोणीही ! तुला त्याच्याशी मतलब ? " राघवन्च्या स्वरात. निग्वटपणा जाणवत होता.

" अहो ऽ ! पण ती कोण हे सांगितल्यानं तुमचं काय बिघडणार आहे ?"

" पण मला सांगायचं नाही. "

" मी म्हणते का सांगणार नाही ? "

" माझी मर्जी ! या शहरात माझ्या कितीतरी ओळखी आहेत. आता तुला किनिकांसंबधी सांगत बसू ? "

त्याचं हे बोलणं ऐकून सीतेला फार राग आला. तरी तिनं तो गिळून टाकला.

पुन्हा थोडा वेळ दोघं गप्प बसून राहिली !

शेवटी स्तब्धतेचा भंग करीत सीतेनं प्रश्न केला. " का हो ऽ, ती कोण होती हे तुम्ही नाहीच का सांगणार ? "

राघवन् काहीच बोलला नाही.

" ती तुमच्याबरोबर कॉलेजात शिकायला होती का ? "

" .... ! "

" आपल्या भागातली आहे की इकडेच कुठं राहणारी आहे ? "

" .... ! "

" बरं बाई ! माझ्याशी कशाला बोलाल ? तिचं ध्यान लागून राहचलं तर मला कशाला फिरायला आणलंत ? यासाठीच का आणलंत ? " सीतेचे डोळे आसवांनी डबडबले.

" म्हणून तर फिरायला आणायची इच्छा होत नाही. शेवटी आपला बायकी मत्सर दाखवलाच ना ? ... हडळ कुठली ! "

" मी नाहीय् हडळ बिडळ ! " सीता हळूच उद्गारली.

सीतेच्या मुग्ध तरुण हृदयात दुःखाचं बीज पेरलं गेलं.. ते बी कसं अंकुरेल त्याचा कसा वृक्ष वाढेल नि त्याला कशी फळं धरतील हे कसं सांगणार ?

त्या रात्री बऱ्याच उशिरापर्यंत सीतेला झोप आली नाही. . .ती स्वतःलाच

दोष देत राहिली. नव्या दिल्लीत संसार थाटल्यावर आजच तिच्या आवडत्या राघवन्‌नं तिला फिरायला नेलं. वास्तविक तिनं फेरफटक्याचा आनंद लुटायला हवा होता .... पण आपल्या मूर्खपणानं आपण सारी मौज घालवली. राघवन्‌चं मन उगीच दुखवलं. त्याला आपण उगीच डिवचलं. तिला याचा पश्चात्ताप होत होता. तरीही तिच्या हृदयात एक गोष्ट सुईसारखी सलत होती ! 'पण ती कोण कुठली हे सांगायला त्यांनी का बरं नकार द्यावा ? ' अधिक विचार केल्यावर तिला स्वतःचीच चूक दिसू लागली. ती आत्मनिर्भत्सना करू लागली, मी तरी कशी मूर्खासारखा विचार करतेय ? ती तरुणी तर आगगाडीतून कुठं निघून गेली. बरं, गाडीच्या डब्यात तिला पाहून ह्यांनी असं काही आश्चर्य दाखवलं, की ते पाहून दोघांतली ओळख फार जुनी असेलसं वाटलं नाही. मग मी तरी एवढं का बरं मनाला लावून घ्यावं ? बायकांना अक्कल कमी असते म्हणतात, ते काही खोटं नाही.'

मग ती आपल्या मनाची समजूत घालू लागली, 'खरं तर हे ललितेला बघायला आले होते. पण त्यांनी माझ्यावर हृदय ओवाळून टाकलं नि माझ्याशी लग्न करण्यासाठी हट्ट धरून बसले. स्वेच्छेनं मला आपली म्हणणाऱ्या भल्या माणसाबद्दल असा संशय घेणं कित्ती वाईट. छे ! अशी शंका घ्यायलाच नको. मुळीच नको !'

हे सारे विचार रात्रीच्या वाईट स्वप्नासारखे दुसऱ्या दिवशी सकाळी ती पार विसरून गेली. उलट सकाळी राघवन्‌ला कॉफी द्यायला ती गेली तेव्हा त्यानं तिच्याकडे पाहून असं काही लाघवी स्मित केलं की ती एकदम खुश होऊन गेली. राघवन् कचेरीत जायला निघाला तेव्हा तर ती वासंतीला घेऊन उभी राहिली.. त्यानं वासंतीला जवळ घेतलं, खांद्यावर तिची मान ठेवून थोपटलं नि गालगुच्चे घेतले.

"माझ्या बरोबर ऑफिसात चलत्येस का ग वासंती ? " त्यानं मुलीला विचारलं. त्यावर ती म्हणाली, "होय ना बाबा आता च्यलते ! "

" तुला सोबत नेलं तर मग काम झाल्यासारखंच आहे ! " असं म्हणत राघवन् वासंतीला तिच्या आईकडं दिलं नि तो ऑफिसला निघून गेला.

या घटनेला आठवडा झाला. राघवन् आपल्याला फिरायला चलण्यासाठी म्हणेल असं सीतेला वाटलं होतं. पण त्यानं गोष्टच नाही काढली. शेवटी हार मानून सीतेनंच गोष्ट छेडली, "आपल्याला बाहेर जाऊन बरेच दिवस झालेत. आज आपण जायचं का फिरायला ? "

" जाऊ की पण ! त्या दिवशीसारखा मूर्खपणाचा प्रश्न विचारणार नसलीस तर. कबूल असलं तर जाऊ या."

" नाही विचारणार. पण चुकून विचारलाच तर न रागावता उत्तर द्याल ना ?"

" पाह्यलं. झाली सुरुवात ? अशानं आम्ही नाही नेणार."

सीता घाबरली. म्हणाली, " मी सहज बोलले... चला नं आज जाऊ या."

ती दोघे गप्पा करीत निघाली. काही दूर गेल्यावर एक गोल चबुतरा दिसला. भोवताली मऊ हिरवळ होती. जागोजाग फुलझाडं लावली होती. दोघेही सिमेंटच्या एका बाकावर जाऊन बसली.

गप्पांच्या ओघात सीतेनं विचारलं, " का हो, आपण ताजमहाल बघायला कधी जायचं ? पहिल्यावेळी आपण इथं आलो होतो तेव्हा, तुम्ही मला ताजमहाल बघायला नेण्याबद्दल बोलला होता. पण तुमचं विलायतेला जाण्याचं ठरलं. आठवण आहे नं ?"

" आहे तर! पण ताजमहाल बघायचा तर पौर्णिमेच्या दिवशी जायला पाह्यजे. तेव्हाच सौंदर्याचं खरं दर्शन होतं."

" चंद्राच्या प्रकाशात ताजमहाल स्वर्गातील मेनकेच्या महालासारखा दिसतो असं तुम्ही एकवार म्हटलं होतं खरं."

" तेच ! ताजमहाल दिवसा बघितला तर संगमरवरी महाल वाटतो तर रात्रीच्या चंद्रप्रकाशात तोच चंद्राच्या किरणांनी बनवल्यासारखा भासतो."

" तर मग आपण येत्या पौर्णिमेला जायचं का ?"

" पाहू ! "

" आईंना नि वासंतीला सोबत न्यायचं नं ?"

राघवन्‌ने या प्रश्नाचं काही उत्तर दिलं नाही. त्याचं मन कुठंतरी भटकत असावं असं वाटलं...

हिरवळीवरून उठून ती घराकडे निघाली. काही वेळानं घराजवळच्या, घराकडे वळणाऱ्या बोळाजवळ येऊन पोचली. फूटपाथवरून चालता चालता सीता एकदम थांबली. एवढंच नव्हे तर एक पाऊल मागे सरली. कारण तिच्यापुढं एका मोठ्या झाडाला टेकून हातात सुरी घेतलेली कोणी एक बाई उभी असलेली तिला दिसली.

त्या बाईला यापूर्वी आपण पाह्यलं आहे असं सीतेला वाटलं. केविलवाण्या

स्वरात तिच्या तोंडातून शब्द निघाले, "आई ग !" राघवन्‌नं मागाहून तिला धरलं अन् विचारलं, "काय झालं ग ?"

"ती बघा !" सीतेनं हाताच्या इशाऱ्यानं त्याला काही दाखवलं. एका स्त्रीची आकृती घाईनं निघून जाताना त्याला दिसली. क्षणार्धात अंधारात व धुक्यात ती अंतर्धान पावली.

या घटनेचा राघवन्‌वर काहीच परिणाम झाला नाही. सीतेची समजूत घालत तो म्हणाला, "अग वेडाबाई, घाबरतेस कशाला ? नव्या दिल्लीच्या रस्त्यावरून असे कितीतरी लोक येतजात असतात."

राघवन् आणि सीता घराच्या दाराशी पोचली. त्यांना मुलीच्या हसण्याचा आवाज आला. घरात पाऊल टाकताच सूर्या आलेला दिसला. तोच वासंतीला खेळवत होता अन् ती खिदळत होती.

"अय्या ! सूर्या... ! तू कधी आलास रे ?" कुतूहलानं सीतेनं विचारलं.

"अग ताई, मला येऊन चांगला अर्धा तास झाला ! – अहो बापूसाहेब, वासंतीची आपल्या विरुद्ध एक तक्रार आहे. ती म्हणते, तुम्ही तिच्या दादीला एकटं घरी सोडून मसणात गेलात अन् तिला बिचारीला आपल्या दादीच्या देखरेखीसाठी घरात अडकून पडावं लागलं. नाहीतर ती केव्हाच फिरायला निघून गेली असती. आहे की नाही गम्मत ?"

हे ऐकून राघवन् जोरात हसला. वासंतीला त्यानं जवळ घेऊन रागावण्याचं नाटक केलं, "काय ग लबाडे, खरंच का तू असं म्हटलंस ?"

"अच्छच म्हतलं. तुम्ही आम्हाला छोलून का गेला होतां ?"

बापलेकीकडे दुर्लक्ष करीत सीतेने विचारलं,

"काय रे सूर्या, काँग्रेसचं अधिवेशन कसं झालं ?"

"वा ! छान झालं !" सूर्या उत्तरला.

"तुमचे बंधुराज गेले होते नं ? चांगलं होणारच !" चटकन् राघवन् बोलला.

"काँग्रेसच्या अधिवेशनाचा वृत्तान्त सूर्या फार छान सांगतो. पण आधी तुम्ही जेऊन घ्या. अन्नाच्या गारगोटया होऊन चालल्या आहेत. जेवणं उरकल्यावर निवान्तपणी त्यांच्या गोष्टी ऐकत बसा."– कामाक्षी अम्मांनी आज्ञा केली.

सर्वांची जेवणं आटोपली. मग सूर्यानं श्री. सुभाषचंद्रबोस यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या हरिपुरा काँग्रेसचं चक्षुर्वै सत्यम् वर्णन केलं. आश्चर्य म्हणजे अशा गोष्टीत रस न घेणारा राघवन् लक्ष देऊन ऐकत बसला ...

सर्व सांगून संपल्यावर सूर्या म्हणाला, " अधिवेशन तसं चांगलं झालं पण आम्हाला समाधान वाटलं नाही."

" हे आम्ही म्हणजे कोण ?" राघवननं विचारलं.

" मी समाजवादी पक्षाबद्दल बोलतो आहे. मी त्या पक्षाचा आहे."

" ही समाजवादी पक्षाची काय भानगड आहे रे ?" सीतेनं विचारलं.

तिच्या या प्रश्नाचं उत्तर देण्याची जबाबदारी राघवन्नं उचलली. त्यानं सांगितलं, " समाजवादी पक्षाचा एक महान सिद्धान्त आहे. तो असा, की सर्व गरीब श्रीमंत, बुद्धिमान-बुद्धिहीन, चांगले-वाईट समुद्रात नेऊन बुडवून टाकायचे. कळलं ?"

" ताई घाबरू नकोस बरं. आमचे बापूसाहेब थट्टा करताहेत." सूर्या बोलला.

" बरं या गोष्टी सोड. काँग्रेसमध्ये महात्मा गांधीचं स्थान कसं आहे ? त्यांचा प्रभाव पडतो ना ?" राघवन् उत्सुकतेने विचारू लागला.

" महात्माजींचं महत्त्व कसं कमी होणार ? त्यांच्यामुळेच तर कुठल्या एका खेड्यात, काँग्रेसचं अधिवेशन एवढ्या थाटात पार पडू शकलं. "

" गांधींच्या कलानं घेतलं तर या देशात सर्व भिकारीच आढळतील. सर्वांच्या हाती भिकेची झोळी येईल. मात्र भीक देणाराच कोणी भेटणार नाही. जोपर्यंत राजकारणावर गांधीचा प्रभाव राहील तोपर्यंत देशाचं भलं होणार नाही याची खूणगाठ बांधून ठेवा."

" हे बघ राघव, माझं ऐकून घे. गांधीजीच्या बाबतीत असं वायफळ बोलू नकोस बाबा ! महात्मा गांधी हे थोर विभूती आहेत, अवतारी पुरुष आहेत असं सारं जग म्हणतं." कामाक्षी अम्मांनी मुलाला हटकलं.

" जग आंधळं आहे आई ! ते काहीही बोलेल."

" मी हात जोडते. आपण कृपा करून महात्मा गांधीबद्दल बोलणं थांबवा. माझ्या कानांना ते सहन होत नाही. माझ्या आईनं मला शिकवलं की गांधी देवस्वरूप आहेत. त्यांच्याबद्दल वाईट बोललेलं मला खपायचं नाही हं !" —सीता मोठ्या त्वेषाने बोलली.

" बरं बाबा राहिलं. मी तर उद्या तुला दिल्ली दाखवायला न्यायचा विचार करतो आहे."— चर्चेला वेगळं वळण देण्यासाठी राघवन् म्हणाला.

" काय रे सूर्या, तू दिल्ली बघितलीस का ?" सीतेनं प्रश्न केला.

" अजून तरी नाही बुवा. उद्याचा कार्यक्रम त्यानंच ठरवला. "

" अरे वा! हा तर अलभ्य लाभ म्हटला पाहिजे ! तर सूर्या उद्या तू पण चल आमच्यासोबत. मजा येईल. गप्पांना रंग चढेल." – राघवन्नं पुष्टी जोडली.

राघवन्च्या तोंडचं हे बोलणं ऐकून सीतेला आनंद झाला. सूर्याबद्दल त्याला वाटणारा तिरस्कार नाहीसा झाल्याचं पाहून तिला प्रसन्नता वाटावी हे स्वाभाविक होतं. दोघंही अगदी मिळून-मिसळून वागत होते. मोकळेपणानं बोलत होते. यावर कडी म्हणजे राघवन्नं सूर्याला दिल्ली बघण्यासाठी सोबतीला बोलावलं होतं.

रात्री झोपण्यापूर्वी सीतेच्या मनात असं आलं, की सडकेच्या वळणावर सुरी घेऊन उभ्या असलेल्या त्या अज्ञात स्त्रीबद्दल राघवन्कडे चौकशी करावी. पण अशा आनंदाच्या क्षणी त्याबद्दल चर्चा न करणंच बरं, असं विचारान्ती सीतेला वाटलं. समजा, तसं काही विचारलं नि बाचाबाची झाली तर आनंदावर विरजण पडेल. अशा रीतीनं तिनं आपल्या मनाची समजूत घातली. तरी हातात सुरी घेऊन दिसलेल्या त्या बाईचा चेहरा वारंवार तिच्या डोळ्यापुढं उभा राहात होता.

13

" हे फिरंगी फार हुशार आहेत असा माझा आजपर्यंत समज होता. पण ते मूर्खसुद्धा आहेत हे आज कळलं. त्याशिवाय का जिथं तिथं पडक्या इमारतींचे अवशेष, स्मशानं नि जुन्या मशिदी असलेल्या या दिल्लीला त्यांनी आपली राजधानी बनवली असती ? "– दिल्ली शहर पाहून घरी येताच कामाक्षी अम्मांनी आपलं प्रामाणिक मत प्रगट केलं.

" आई, तुम्ही एकदम दिल्लीबद्दल असं मत कसं बनवलंत? आपण लाल किल्ल्यात शहाजहानचा जो महाल बघितला तो काय कमी सुंदर आहे ? अन् दिल्लीचा महाल इतका सुंदर आहे तर आग्र्याचे महाल नि ताजमहाल किती सुंदर

असतील ? . . . का हो ऽ, आपण कधी जायचं आग्र्याला ? '' सीतेनं सर्वच राघवन्‌ला प्रश्न केला.

" मला वाटतं, आग्रा पाहणार नाहीस तोपर्यंत तुला काही झोप यायची नाही. ठीक आहे ! येत्या पौर्णिमेला जाऊ या ! – काय सूर्या, तू पण येणार ना आमच्याबरोबर ? " राघवन्‌नं विचारलं.

" का नाही ? जरूर येईन. "– सूर्यानं उत्तर दिलं.

त्या दिवशी दिल्ली शहर बघताना सोबत सूर्या असल्यानं राघवन्‌ला बराच आराम मिळाला होता. एक तर सीतेनं सर्वच प्रश्न त्यालाच न विचारता सूर्याला विचारले होते. आणि त्यानं मोठ्या उत्साहानं परस्पर उत्तरे देऊन टाकली होती. स्त्रियांना घेऊन फिरायला निघाल्यावर त्यांच्याशी मजेत गप्पा मारण्याची, त्यांच्या विक्षिप्त प्रश्नांना समर्पक उत्तरं देण्याची कला सर्वच पुरुषांना अवगत नसते. राघवन्‌ला तर ती कला मुळीच अवगत नव्हती. उलट सूर्याच्या ठिकाणी ती उपजतच होती. त्याला वाटलं, हा असला तर आपलं काम सोपं होईल.

नेमकं त्या दिवशी सीतेला ललितेचं पत्र आलं तिनं लिहिलं होतं :

प्रिय सीता,

दिल्लीला पोचताच लिहिलेलं तुझं पत्र वाचून अतिशय आनंद वाटला. आपला हा स्नेहसंबंध आपल्या हयातभर असाच कायम राहावा अशी माझी देवाला प्रार्थना आहे.

चारच दिवसांपूर्वी मला बांगड्या भरण्याचा [1] कार्यक्रम झाला. त्यासाठी मी माहेरी आले आहे.

आमच्या मासाहेब आता प्रसन्न झाल्या आहेत. इतके दिवस तिची सदा तक्रार सुरू असायची. संधी मिळताच मला घालून-पाडून बोलायची. म्हणायची ' अग गाढवे ऽ, तुझ्या बरोबर लग्न झालेल्या मुलींच्या मांडीवर चांगली दोनदोन वर्षाची मुलं खेळताहेत ! नाहीतर तुम्ही ? कुठं कशाला पत्ता नाही ! ... ' पदोपदी माझा जीव खायची बघ. तरी मी म्हणायची, ' आई, मुल होणं न होणं देवाच्या हाती असतं ! पण या बोलण्याचा तिच्यावर कधीच परिणाम झाला नाही. आता मात्र

---

[1] नवविवाहिता पहिल्यांदा गर्भवती होते तेव्हा सातव्या महिन्यात तिला माहेरी आणून बांगड्या भरतात. गर्भ व गर्भवती यांच्या संरक्षणासाठी हा संस्कार असतो.

माझ्या शरीरावरचं गर्भाचं तेज पाहून तिच्या चेहऱ्यावरची काळजी जाऊन प्रसन्नता खेळू लागली आहे.

मी इथं राजमपेट्टेला आल्यापासून तुझी वारंवार आठवण होत असते. काठीला बांधलेल्या घुंगरांचा आवाज करीत पळणारा पोस्टाचा 'रनर' दिसला की जुनी आठवण होते. मुंबईहून येणाऱ्या तुझ्या पत्रासाठी मी टपाल कचेरीकडे धावत असे. त्या दिवसांचं स्मरण होतं... तलावाशेजारच्या बंगल्यावर गेल्ये म्हणजे घाटाच्या पायऱ्यांवर बसून आपण जे कल्पनेने मनोरे रचत असू ते डोळ्यांपुढं तरळू लागतात. तू प्रेमिकांच्या ज्या कथा सांगितल्या त्या सर्व आठवू लागतात. त्या कथांतील व्यक्ती – लैला-मजनू, रोमियो-ज्यूलिएट, शकुंतला, संयोगिता मूर्त स्वरुप धारण करू लागतात... काय ग ताई, वास्तव जीवनात अशा प्रेमकहाण्या घडतात का ? की अशा घटना प्रेमकथांपुरत्याच मर्यादित असतात ? भारतसम्राट आठव्या एडवर्डनी एका मुलीच्या प्रेमापायी राज्यत्याग केला म्हणे ! हे खरं आहे का ग ? असंही घडू शकतं यावर माझा तर बाई विश्वास नाही बसत !

सूर्या तुमच्या सोबत दिल्लीला आला नि प्रवासात त्याची तुम्हाला बरीच मदत झाली हे तुझ्या पत्रात वाचून प्रसन्नता वाटली.

पत्रात तू बिचारलं होतंस की सूर्यानं एकाएकी अर्ध्यातून शिक्षण का थांबवलं ? तो असा जगाला विटल्यासारखा गोष्टी का करतो ? त्यावेळी याची कल्पना नव्हती. इथं आल्यानंतर उलगडा झाला.

माझा थोरला भाऊ गंगाधरन् तुझ्या फारसा परिचयाचा नाही. सूर्या गेल्या वर्षी इथं आला होता. एका जमिनीच्या भांडणात त्यानं कुळांची बाजू घेतली. गंगाधरनं रागाच्या भरात त्याच्या अंगावर हात टाकला. त्यामुळं सूर्याचं मन दुखावलं. आळीतले लोकही गंगाधरच्या बाजूनं बोलू लागले. त्या वैतागात 'तुमची ही मालमत्ता तुम्हाला लखलाभ असो ! मला त्यातला वाटा नको.' असं बजावून तो घराबाहेर निघून गेला. शिकावं तर घरचा पैसा घ्यावा लागेल म्हणून त्यानं शिक्षणाला रामराम ठोकला. या साऱ्या गोष्टी इथं आल्यावर कळल्या. कारण आईबाबा जेव्हातेव्हा हीच चर्चा करतात व उरी दुःख बाळगून असतात.

सीता, मी सूर्याबद्दल विचार करू लागले की हृदय दुभंगून जातं. तमा सूर्या किती चांगला आहे म्हणून सांगू ? माझ्यावर त्याचं कसं अकृत्रिम प्रेम आहे, हे तू जाणतेस ? अग ऽ, माझ्यावरच काय पण तुझ्यावरसुद्धा त्याचं अतोनात प्रेम आहे. तुझ्याविषयी तर त्याला विशेष आकर्षण वाटतं. तू सूर्याची काळजी

घेत राहिलीस तर आईला फार आनंद वाटेल.

पत्रोत्तर त्वरित लिहिशील अशी आशा बाळगते.

तुझीच
—ललिता.

ललितेचं पत्र वाचून होताच मीतेनं उत्तर लिहिलं :

प्रिय ललिता,

तुझं पत्र पोचलं. प्रीती ही केवळ कथा-कादंबऱ्यांपुरती मर्यादित नसून तिची पाळंमुळं प्रत्यक्ष जीवनातही खोल रुजलेली आहेत. पुरावाच हवा असला तर माझ्या जीवनाकडे बघ. बरं का ग ललिते, मी खरंच भाग्यवान आहे. मात्र हे जे भाग्य माझ्या वाट्याला आलं आहे ते केवळ तुझ्यामुळं आलं आहे, याचा मला कधीच विसर पडणार नाही.

सूर्या कॉंग्रेसच्या अधिवेशनावरून परत आला आहे. बरं का ग, ललिता, तो आमच्या ह्यांना फार आवडू लागला आहे, ही विशेष आनंदाची गोष्ट आहे. दोघं घनिष्ठ मित्र बनले आहेत. कधीही पाहावं तर कॉंग्रेस अन् ब्रिटिश सरकार यांच्यासंबंधी बोलत बसलेले दिसतात.

गेल्या रविवारी आम्ही सगळे कुतुब मिनार, लाल किल्ला, जंतरमंतर आदी ठिकाणं पाहून आलो. सूर्या पण आमच्यासोबत होता, याचाच मला अतिशय आनंद वाटत होता.

उद्या रात्री आम्ही आग्र्याला जाणार आहोत. सूर्यादेखील आमच्या सोबत येणार आहे. माझ्या सासूबाई यायला तयार नाहीत. मुलीला सांभाळायला आपण घरी राहणार असल्याचं त्यांनी सांगून टाकलं आहे.

आग्र्याहून आगगाडीचा एका रात्रीचा प्रवास केला म्हणजे रजनीपूर या शहरी पोचता येतं. ती एका संस्थानिकाची राजधानी आहे. तिथं एक मोठं सरोवर असून त्याच्या मध्यभागी एक मंडप आहे. त्या सरोवराच्या काठी दहा एक हजार बगळे गोळा होतात आणि थवेच्या थवे उडतात. असं दृश्य जगाच्या पाठीवर कुठंच बघायला मिळत नाही असं म्हणतात. माझ्या पतिराजांचं असं म्हणणं आहे हे की तिथंही जाऊन येऊ.

सूर्या आरामात आहे. ललिते, तू त्याची मुळीच चिंता करू नकोस. त्यानं आम्हा दोघांवर जे उपकाराचं ऋण करून ठेवलं आहे त्याच्या मोबदल्यात

कितीही केलं तरी फेड होणार नाही. योग्य संधी साधून सूर्याला एखादी चांगलीशी नोकरी लावून देण्याबद्दल बोलण्याचं ठरवलं वाहे.

फिरायला जायला उशीर होतो आहे असा तगादा सुरू असून घाई चालली आहे. म्हणून पत्र इथंच संपवते. आग्र्याहून परतल्यावर सविस्तर पत्र लिहीनच.

तुझी
मीता.

14

सामान्यत: आग्र्याला जाणारे, आधी जुन्या किल्ल्यातील महाल बघायला जातात. ते पाहिल्यावर आश्चर्यानं थक्क होऊन जातात. या महालांपेक्षा अधिक अद्भुत काही असेल का, असं त्यांना वाटू लागतं. तिथून ते लोक ताजमहाल बघितल्यावर त्यांची आश्चर्य करण्याची शक्तीच बधीर होऊन जाते.

या परिपाटीनुसार राघवन्, सीता आणि सूर्या आधी किल्ला बघायला गेली. किल्लाच्या भोवतीच्या तटाच्या भिंतीची उंची, नुकत्याच बांधल्याप्रमाणे दिसणारं त्यांचं नवेपण बघून ते थक्क झाले. किल्याच्या भक्कम बनावटीच्या भव्य प्रवेशद्वारानं त्यांना चकित केलं. आत प्रवेश केल्याअर दिवाण–ई–आम व दिवाण–ई–खास हे मुख्य महाल बघण्यासाठी ज्या रस्त्यानं निघाले, त्याच्या दोन्ही बाजूंना फुललेल्या गुलाबांचे ताटवे त्यांचं स्वागत करीत होते.

महालाच्या अंत:पुरात जाऊन त्यांनी रोशनआरा व जहाँनआरा या शहाजहानाच्या लाडक्या शहाजाद्यांचं निवासस्थान पाहिलं. आरसेमहाल बघितला. नंतर महालातील बेगमा व त्यांच्या सख्या ज्या तलावात जलक्रीडा करीत तो संगमरवरी तलाव बघितला... याच तलावात त्या काळी बेगमांच्या पायातील पैंजणांच्या मधुर ध्वनीशी स्पर्धा करीत याच संगमरवरावरून जलधारांचं नर्तन चालत असेल. आज तिथं पाण्याचा थेंब नव्हता. तरी आपल्या मन:चक्षूंनी त्या

गत वैभवाचं कल्पनाचित्र बघत सीता उद्गारली, " अय्या ऽ! ज्या काळात बेगमा नि राजकुमारी इथं वास्तव्य करीत असतील, जलकेली करीत असतील त्या काळात हा राजमहाल कसा वाटत असेल बरं ? "

" कसा वाटत असेल हे काय विचारतेस ? इथं राहणाऱ्या स्त्रियांना तो शुद्ध जेलखाना वाटत असेल ! पिंजऱ्यातील पोपटाला आपला पिंजरा कसा वाटत असेल ?... सोन्याचा पिंजरा करून त्याला हिरेमाणकं लावली तरी त्यात राहणाऱ्या पोपटाला तो तुरुंगच वाटतो ना ? " सूर्यानं सीतेला विचारलं.

" शाबास सूर्या ! काय मार्मिक बोललास ! खरंच, तुम्ही बहीणभाऊ एकाहून एक वरचढ आहात बुवा ! " राघवन् खुश होऊन बोलला.

" काय रे सूर्या, तुम्ही दोघं मिळून मला बनवता होय ? ताजमहाल बघून शहाजहानच्या गुणग्राहकतेची नि गुणीपणाची कल्पना येत नाही का ? हा ताज-महाल बांधण्यासाठी त्यानं किती डोकं लढवलं असेल, किती श्रम केले असतील अन् किती पैसा वेचला असेल ! ज्याअर्थी आपल्या मुमताजचं इतकं अपूव स्मारक त्यानं बांधून ठेवलं त्याअर्थी त्याला तिच्याविषयी केवढं प्रेम वाटत असेल ! ताज-महाल बांधूनच त्याचं समाधान झालं नाही. अगदी अखेरचा श्वास सोडीपर्यंत त्यानं आपल्या प्रियेचं स्मरण करीत त्याचं सतत दर्शन घेतलं ना ? याच जूही महालात बसून तो ताजमहाल बघत असावा, असं मला वाटतं. " – सीता कल्पनासृष्टीत वाहवत होती.

" तुझं अनुमान तंतोतंत बरोबर आहे ! इथूनच तो नेहमी ताजमहाल बघत होता अन् बघता बघताच त्यानं कायमचे डोळे मिटले." राघवन् म्हणाला.

" पण त्यानं असं का केलं हे ठाऊक आहे का ताई ? मी जेवढा इतिहास वाचला त्याच्या आधारे सांगतो आहे. शहाजहाननं अशा तऱ्हेनं खजिन्याची चालव-लेली लूट उघडचा डोळ्यांनी पाहून औरंगजेबाला चीड आली. त्यानं बापाला कैद करून या जूही महालात डांबून ठेवलं. इथं बसून आपल्या लाडक्या बेगमेचं स्मारक डोळे भरून बघण्याची मोकळीक दिली. शहाजहाननं इथूनच सुस्कारे सोडत ताजमहाल पाह्यला अन् अखेर तडफडून प्राण सोडला ! " सूर्यानं राघवन्च्या म्हणण्याला पुष्टी दिली.

" माझ्या मते शहाजहानला योग्य शिक्षा मिळाली. मी जर औरंगजेब असतो तर मीसुद्धा हेच केलं असतं. " राघवन्नं म्हटलं.

" असं हो काय बोलता ? एवढी अनुपम कलाकृती पाहून अशा गोष्टी करणं शोभत नाही. पण मी विचारत्ये, 'तुमची' नजर कुठं लागली आहे ?"

खरोखरीच त्या क्षणी राघवन् आणि सूर्या दूर दिसणाऱ्या ताजमहालाकडे किंवा भोवतीच्या संगमरवरी कलाकुसरीकडे बघत नव्हते. त्यांचं लक्ष वेधलं होतं महालाच्या कमानीतून प्रवेश करणाऱ्या व्यक्तींनी. . .

तीन व्यक्ती आत आल्या होत्या. दोन स्त्रिया होत्या अन् एक पुरुष. कराची काँग्रेसच्यावेळी त्याची ज्यांच्याशी गाठ पडली होती, त्याच या दोघी होत्या. एक होती तारिणी तर दुसरी तिची मैत्रीण निरुपमा. राघवन् तारिणीकडे एकटक बघत राहिला. तिच्यावरून त्याची नजर दूर होईना. दुसरीकडे वळण्याची डोळ्यांची शक्तीच जणू नष्ट झाली होती ! आपण कुठं आहोत, कुणाबरोबर आहोत अन् काय करीत आहोत याचं त्याला भानच उरलं नाही. त्याच्या मनात एकच संवेदना जागृत होती. ती म्हणजे तारिणीचं अकल्पित आगमन !

क्षणभर केवळ पृथ्वीच नव्हे तर सारं ब्रह्मांड कुंठित झाल्याचा त्याला भास झाला. . .मग एकाएकी त्याच्या तोंडून शब्द उमटले, " मी हे जे बघतो आहे ते स्वप्न आहे की सत्य ? "

" ताजमहाल संबंधीच म्हणता नं ? कवीच्या दृष्टिकोनातून ताजमहाल म्हणजे ' प्रेमाचं मूर्त स्वप्न ' अन् ' संगमरवरी स्वप्न' होय. पण इथं उभं राहून आपण जो ताजमहाल बघतो तो स्वप्न नसून ती एक इमारत आहे. " तारणीनं अनपेक्षितपणे त्याच्या प्रश्नाचं उत्तर दिलं.

" हे तर मिस्टर राघवन् ! अय्या कशी अचानक गाठ पडली बघा ! " तारिणीची मैत्रीण निरुपमा म्हणाली.

" होय, मीच तो अभागी माणूस बरं ! "

" अभागी ? अय्या ! तुम्ही हो कसे दुर्दैवी ? तुम्ही एवढे विनयशील कधीपासून झालात ? बरं ती मागं उभी आहे ती मुलगी कोण ? " निरुपमेच्या या प्रश्नानं राघवन्चा चेहरा उतरला.

" त्यांना ग काय विचारत्येस ? अंदाजानं नाही का ओळखता येत ? ती त्यांची सौभाग्यवती असणार. दुसरी कोण असेल ? " तारिणीनं राघवन्चं काम सोपं करून टाकलं.

" अय्या ! किती सुरेख आहे ही मुलगी ! अशी सुंदर बायको मिळाली तरी स्वतःला अभागी म्हणवून घेताना काही लाजलज्जा वाटत नाही का ? हंऽ!

आपण आमची थट्टा तर करीत नाही ना ? " निरुपमेनं हसून म्हटलं " बर बाई, नाही थट्टा. पण मागून येत असलेले तरुण गृहस्थ कोण ?"

" तारकांचा भाऊ आहे तो " राघवन् संथपणे म्हणाला.

" मला तर त्यांचा चेहरा परिचयाचा वाटतो. पाहिल्यासारखा वाटतो. एवढ्यातच कुठं तरी पाहिल्याचं आठवतं. "

" त्याला कुठं पाहिलं असणार ! त्याच्यासारख्या दुसऱ्या कुणाला पाह्यलं असेल अन् उगाचच संभ्रमात पडलात झालं ! " राघवन् शंका काढली.

इतक्यात सूर्या समोर येऊन म्हणाला, " या खोटं सांगत नाहीत. यांना मी हरिपुरा काँग्रेसमध्ये पाह्यलंय. " मग त्यानं तारिणीला विचारलं, " आपण समाजवादी गटाच्या सभेला आला होता नं ?"

हरिपुरा काँग्रेसचं नाव ऐकताच राघवन्‌ला आठ वर्षापूर्वीची कराची काँग्रेस आठवली. कराचीचा विमानतळ, तेथे झालेली तारिणीची पहिली भेट यांची आठवण झाली. त्या जुन्या आठवणीत त्याचं मन रमलं असतानाच स्वप्नात ऐकू यावा तसा तारिणीचा आवाज त्याच्या कानात घुमला, " हं ! समाजवादी गटाच्या सभेला आले होते मी. त्या सभेत तुम्ही जे भावपूर्ण प्रक्षोभक भाषण केलंत त्याचा विसर पडणं शक्यच नाही ! "

" अच्छा ! मला तर अद्याप हे ठाऊक नव्हतं ! सूर्याजी व्याख्यानही देतात ?"

" व्याख्यानं देतात तीसुद्धा साधीसुधी नव्हे. यांचं आशयगर्भ भाषण एकून श्रोते अगदी थक्क होऊन गेले ! " तारिणानं माहिती दिली.

" अग तारिणी, मी तरी कशी विसरभोळी ग बाई ? आधी मला माझ्या मिस्टरांचा यांच्याशी परिचय करून द्यायला पाहिजे. बरं का हो, हे श्री. वेणीप्रसाद बी. ए., एल्. एल्. बी. या शहरातील विख्यात वकील आहेत. तशी यांची 'प्रॅक्टिस फार चालत नाही. त्यामुळे सध्या तरी हे आपल्या आपल्या पत्नीच्या –म्हणजे माझ्या– स्नेहसंबंधातील मंडळींना घरी बोलावून त्याचं आदरातिथ्य करण्याचं काम करतात. तारिणी सध्या माझ्याकडेच राहते आहे. आपणही आमच्या घरी आपली पायधूळ झाडलीत तर संतोष वाटेल. आमच्याकडून बनेल तेवढा आदर-सत्कार करू ... बरं, पण आग्र्यास किती दिवस मुक्काम करण्याचं ठरलं आहे ! "
निरुपमेनं सुंदर राघवन्‌ला प्रश्न केला.

" फक्त आज नि उद्या ! आपल्या या अगत्यपूर्ण निमंत्रणाबद्दल मनस्वी

आभार ! यावेळी नाही तरी पुन्हा केव्हातरी अवश्य येऊ. आज नकोच ! कारण खोटं बोलणारांसोबत राह्यला माझं मन तयार नाही. राग नसावा. ही विनंती सुंदर राघवन् उत्तरला.

"तुम्ही हे काय कोड्यात बोलणं सुरू केलंत ? कोण खोटं बोललं हो तुमच्याशी ?" – त्याच्या बोलण्याचा संदर्भ न कळल्यानं निरुपमेनं विचारलं.

"आपल्या मैत्रिणीला विचारा म्हणजे उलगडा होईल. त्या दिवशी दिल्लीला स्टेशनवर भेट झाली होती ना, तेव्हा काय म्हटलं हे माहीत आहे का ? नसेलच ! म्हणे मी तारिणी नव्हे ! . . . हा खोटारडेपणा नव्हे का ?"

"मुळीच नाही. मी असं बोलले नाही. मी एवढंच म्हटलं की मी ती पूर्वीची तारिणी नव्हे. पुढं काही बोलायच्या आधीच गाडी सुटली होती."

"अस्सं ऽ ! म्हणजे बनवाबनवीची सवय गेली नाही तर !" राघवन्‌नं टोमणा मारला.

"मी कुठं बदलत्ये ? मी तर तीच तारिणी आहे. पूर्वी होत्ये तशीच आजही आहे, इतरही तसेच असते ना तर अशा गोष्टी बोलण्याची पाळीच आली नसती... बरं सोडा त्या गोष्टी ! पुन्हा कधी व कुठं भेटणार ? आपले पैसे परत करायचे आहेत."

"पैशाची काही घाई नाही. पुढे केव्हा तरी घेऊन टाकू. पण आम्ही आपल्याला पुन्हा कधी भेटू शकतो ? ताजमहाल बघून झाला का ?"

"संध्याकाळच्या सोनेरी उन्हात आणि रात्री पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात तो बघण्याचा विचार आहे."

"आम्ही पण त्याच वेळा ठरवल्या आहेत. तिथं पुन्हा भेट होणार तर ?"

यानंतर दोन गट निरोप घेऊन वेगवेगळ्या दिशेला गेले. आतापर्यंत गप्प असलेल्या सीतेनं राघवन्‌ला विचारलं, "का हो ? ही कोण होती ?"

"आपल्या बंधुराजालाच विचार नं ?"

"त्याला काय विचारायचं ? तुम्ही तर तिला ओळखता नं ? मग तुम्हीच का नाही सांगत ?"

"सांगूच म्हणतेस ? ऐक तर ! ती एक बाई होती. कळलं ?"

"बाई आहे हे मला समजतं. चेहऱ्या-मोहऱ्यावरून बाई वाटली तरी तिचं बोलणं-चालणं पुरुषासारखं वाटलं. खरं तर ती पुरुष म्हणूनच जन्माला यायला हवी होती. पण स्त्री होऊन कशी जन्माला आली हेच कळत नाही !"

"तुझं म्हणणं रास्त आहे. मग स्त्रीच्या रूपात जन्म पावलेल्या त्या माण-साशी मी बोलत्लो तर तुझ्या मनाला लागणार नाही असं मी समजू ना ?"

"मी कशाला मनाला लावून घेऊ ? तुम्ही अगदी बाईशी बोललात ना तरी मला काही वाटणार नाही ! काय हो, तुम्ही का मला इतकी मूर्ख समज-लात ? . . . तुमची एक गोष्ट मला मुळीच पसंत नाही. तुम्ही माझ्यापासून काही तरी का लपवू पाहता ? दिल्लीच्या स्टेशनात हिच्याशी बोलण्यासाठीच ना धावत गेला होतात ?"

"ऐकल्यास ना सूर्या तुझ्या बहिणीच्या गोष्टी ? काय तर म्हणे हिच्या धाकानं काही गोष्टी गुप्त ठेवल्या आहेत ! नाहीतरी बायकांची जातच संशयी असते !"

"मी संशय घेतला नव्हता. दिल्लीच्या स्टेशनात तुम्ही जिच्याशी बोललात ती कोण होती एवढंच मी विचारलं होतं. तर तुम्ही टाळाटाळ करू लागलात."

"मी टाळाटाळ केलीच नाही. ती बाई मला ओळखीची वाटली म्हणून मी तिच्याशी बोलायला गेलो. तिनं माझी निराशा केली. अशा वेळी तू मला छंडलंस म्हणून मी संतापलो. आता तूच सांग, त्या मनःस्थितीत मला उत्तर देणं शक्य होतं का ? – आता तर आम्ही तुझ्या समक्षच बोलत होतो. आमच्या गोष्टी तू ऐकल्यास नं ?

"ऐकून काय उपयोग ? तुम्ही तर इंग्रजीत बोलत होतात. काय बोलतात हे मला काय कळणार ? मला कुठं एवढं इंग्रजी येतं ?"

"कळत नाही तर गप्प बस !"

"असं वस्कन अंगावर येणं तुम्हाला चांगलं जमतं. फक्त प्रेम करणंच जमत नाही !"

त्या दोघांमध्ये चाललेला वाद ऐकत सूर्या त्यांच्यामागून चालत होता. तो मध्येच म्हणाला, "ताई, त्या बाईबद्दल तू गैरसमज करून घेणे योग्य नव्हे. ती चांगली राष्ट्रसेविका आहे. हरिपुरा काँग्रेसमध्ये तिनं जे श्रम केले ते पाह्यची तुला संधी सापडती तर तूच तिची तोंड फाटेपर्यंत प्रशंसा केली असतीस. तिच्याविषयी तुझ्या मनात अशा वाईट कल्पना आल्याच नसत्या."

त्यानंतर त्यांनी किल्ल्यातील इतर प्रेक्षणीय जागा बघितल्या पण आता कोणालाही पूर्वीसारखा उल्हास वाटत नव्हता.

"चालून चालून माझे पाय दुखायला लागले आहेत. हॉटेलकडे परत

जाऊ या का ?" सीतेनं विचारलं.

"जाऊ या ! इथल्या सर्व इमारती एकाच साच्याच्या आहेत. त्यांच्यात काही वेगळेपणा दिसत नाही. तोचतोपणा आढळतो. चला निघू या शिवाय संध्याकाळी ताजमहाल बघायला जायचं आहे."

"ताजमहालसुद्धा संगमरवरीच आहे. त्यामुळं त्याबद्दलही असंच मत नाही ना ?"– सूर्याच्या शब्दांत पुरेपूर उपरोध भरला होता.

"हे कसं शक्य आहे ? ताजमहालची गोष्टच वेगळी आहे ! ताजमहाल म्हणजे काही केवळ संगमरवरी वास्तू नव्हे. ते एक दैवी शिल्प आहे. मोगलांच्या काळातील भारताच्या प्रगतीचं ते एक जिवंत प्रतीक आहे. रति-कामदेवाचं ते श्वेत विमान आहे. ज्यानं ताजमहाल पाह्यला नाही त्यानं जन्माचं सार्थक केलं नाही !" राघवन् बोलण्याच्या ओघात अगदी धारेला लागला होता.

तिघही हॉटेलातील बिऱ्हाडी आली. भोजन करून विसावा घेत पडले...

15

नववधू आपल्या प्रियकराकडे जायला निघताना प्रीतीनं अन लज्जेनं ओथंबून उभी असावी तशी ताजमहाल नावाची मोहिनी धवल चंद्रप्रकाशात उभी होती. स्निग्ध चांदण्यात चंदेरी स्फटिकाच्या लादीवर आकाशी रंगाच्या पुष्करणीच्या काठी सीता, राघवन्, सूर्या, तारिणी, निरुपमा आणि तिचे यजमान बेनीप्रसाद ही मंडळी बसली होती.

संध्याकाळपासून त्यांनी ताजमहाल बघायला आरंभ केला. आधी बाहेरून त्याचा कोपरान्-कोपरा मनसोक्त पाहून घेतला. मग आत शिरून शहाजहान व ममताज यांच्या कबरी पाहिल्या. त्या कबरीच्या आसपास संगमरवरात खोदलेलं नक्षीकाम व वेलबुट्टी निरखली. दूरदूरच्या देशांतून मागविलेल्या अमूल्य रत्नांनी मढवलेल्या पुष्पमालिकाचं अनुपम दृश्य पाहिलं. एवढंच नव्हे तर, ताजमहालाच्या चार

दिशांचे पहारेकरी जे एकशे साठ फूट उंचीचे मनोरे उभे आहेत त्यावर आपसांत स्पर्धा करीत ते सर्व चढून गेले. तिथून आसमंताचं विहंगम दर्शन घेतलं. ताजमहालाचा परिसर हिंडून घेतला. यमुनेच्या पाण्यात उतरले. खूप मौज केली.

अशा तऱ्हेनं हसत-खेळत खूप फिरून झाल्यावर थकलेल्या शरीराला विसावा देण्यासाठी सर्वजण पुष्करणीच्या काठी येऊन बसले होते. रात्रीचे दहा वाजले होते. भोवताली नीरव शांतता होती. मात्र सीता, राघवन्, तारिणी, सूर्या यांच्या हृदयात भिन्नभिन्न कारणांनी उलथापालथ सुरू होती.

त्या शांततेचा भंग करीत सीता म्हणाली, “माणसाचा जन्म मिळून ताजमहाल बघता आला नाही तर मनुष्य जन्म कसला सार्थक ! अशा जीवनाला काय जीवन म्हणावं ?”

“अगदी खरं ! पण ताजमहाल दिवसा पाहाणं पुरेसं नाही. असा चांदण्यात बघितला पाहिजे एवढं जोडून टाक.” राघवन् म्हणाला.

“ताई त्यात असंही जोडून टाक की ताजमहाल पाहून झाल्यावर डोळे कायमचे मिटावेत. कारण त्यानंतर आयुष्याची गरजच काय ?” सूर्यानं पुस्टी जोडली.

सूर्या टोमणा मारतो आहे हे कळूनही सीता आपल्याच धुंदीत बोलत राहिली, “ खरं आहे सूर्या ! हे प्रेमाचं अपूर्व प्रतीक बघितल्यावर जिवंत राहाण्याची जरूरी तरी काय ?”

“ताई केव्हाही पाहा, तुझ्या मनात ‘ लग्न आणि प्रेम ’ यांचाच विचार चालू असतो. मी विचारतो, जगात नि जीवनात लग्न अन् प्रेम सोडून दुसऱ्या महत्त्वाच्या गोष्टीच नाहीत का ?”

“ तुला शंका वाटते का ? प्रेमाहून श्रेष्ठ असं या जगात काही नाहीच. साऱ्या कथा-कादंबऱ्या, काव्यं ही प्रीतीच्या पायावर लिहिली जातात. जगात प्रेम नावाची गोष्टच नसती तर वाल्मीकीचं रामायण, कालिदासाचं शाकुंतल कुठून लिहिलं जातं ? ते तर जाऊ द्या. आजचे लेखक कथा-कादंबऱ्या कशाच्या आधारे लिहिते ? ‘ प्रेममूलं जगत् सर्वम् ’ हेच खरं !” राघवन् बोलून गेला.

“ कसल्या या कादंबऱ्या ! निव्वळ केरकचरा ! रद्दीत फेकून द्याव्यात. ज्यांच्या डोक्यात लिहायला विषय नसतात ते या प्रेमकथा भरकटतात.” सूर्या क्षणाक्षणाला उत्तेजित होत होता.

“ तर काय सर्वांनी कार्ल मार्क्स बनून रोज लिहीत बसावं असं का तुझं म्हणणं आहे ?” सुंदर राघवन्नं त्याची थट्टा करीत विचारलं.

"सर्वानीच कशाला काल मार्क्ससारखं लिहायचं? कोणी टॉलस्टायप्रमाणे कोणी गांधी-नेहरूंप्रमाणे तर कोणी शॉसारखं लिहावं."

"काय बंधुराज? आपल्या सुब्रमण्यम् भारतीप्रमाणेही कोणी लिहावं की नाही? प्रेमाच्या संबंधात भारतींनी काय म्हटलं ते आठवतं का?"

"भारतींनी काहीही लिहून ठेवलं असलं तरी त्याचं आता काय? त्यांनी लिहिलेलं सारं योग्य आहे असं मी तरी मानत नाही. ते जेव्हा सावध होते तेव्हा त्यांनी स्वातंत्र्याची स्तोत्रं गायली. बेसावध होते तेव्हा प्रेमाची गाणी गायली." सूर्यानं तडक उत्तर दिलं.

"यांच्या गोष्टींवरून तरी हे निराशा पदरी पडलेले प्रेमी वाटतात." असं बोलून तारिणी हसली तेव्हा जाईच्या कळ्यांसारखे तिचे शुभ्र दात मोत्याप्रमाणे चमकले.

"छे! असं काही नाही हं!" असं म्हणताना सूर्या लाजला.

"सूर्याची गंगाच उलटी वाहते. त्याची मथुरा न्यारीच आहे. बरं सीता, भारतींनी प्रेमाविषयी काय सांगितलं ते ऐकव तरी–" राघवन् सीतेला म्हणाला.

सीता खालच्या आवाजात गाऊ लागली–

"अन्वु वाळकॅन्रू अमैदियिल आडुवोम्!
आशैक कादलैक् कै कोट्टि वाळ्त्तुवोम्!"

बिजय असो प्रेमाचा, वदुनी दंग नर्तनी होऊ!
स्वागतार्थ प्रीतीच्या आपण मजेत टाळी देऊ!

"एकदा संपूर्ण गीत ऐकवा ना! एकावंसं वाटतं." तारिणीनं आग्रह केला. सीतेनं राघवन्च्या तोंडाकडे पाहिलं. तो म्हणाला, "गाऊन दाखव. पण बेसूर होऊ नकोस."

राघवन्च्या बोलण्याचा सीतेला राग आला. तरी तो गिळून तिनं म्हटलं "जसं मला येतं तसं गाईन."

"आम्हाला त्यातलं काही कळत नाही. जसं येत असेल तसं गा!" निरुपमेनं प्रोत्साहन देत म्हटलं.

नारित्वाचा विजय असो! या सगळे मिळून नाचू!
जयजयकार नारित्वाचा! सगळे या रे नाचू!

सीता गात असताना सर्वजण तिच्याकडे बघत राहिले. राघवन् तेवढा तारिणीकडे बघत होता.

गीत संपल्यावर तारिणी आणि निरुपमा यांनी आपला आनंद व्यक्त केला.

"तारिणी, तुला हिंदुस्थानीतलं एक राष्ट्रगीत येतं ना? ते गाऊन दाखव पाहून."– राघवन्‌नं तारिणीला म्हटलं.

"खरंच तारिणी, तुझ्या तोंडून 'सारे जहाँसे अच्छा' हे गीत ऐकून फार दिवस झालेत. कराचीवरून मुंबईला येत असताना आगबोटीत म्हटलं होतंस. त्यानंतर ऐकायला मिळालंच नाही–" निरुपमेनं राघवन्‌ला साथ दिली.

तारिणीनं ते गीत गाऊन दाखवलं. तिचं गाणं ऐकून सारी खुष झाली. ती गात असताना रात्री गाणारे पक्षी व रातकिडे तर गप्प झालेच पण वारादेखील निश्चल झाला. चंद्रप्रकाशात ताजमहालाचा फोटो घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका विदेशी जोडप्यानं आपला कॅमेरा बंद करून गाणं ऐकलं.

गाणं संपताच निरुपमेनं अन् तिच्या पतीनं "वा! छान!" फारच छान असे उद्‌गार काढले.

"गाणं गावं तर असं! नाहीतर गप्प राहावं." राघवन्‌च्या या टोमण्यानं सीतेचे हृदय घायाळ झालं हे सूर्याच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. सीतेचं सांत्वन करण्याच्या हेतूनं तो म्हणाला, "अग सीता, तू हे गाणं सहज शिकू शकशील. या गीताचा अर्थ कळला का? आमचा हिंदुस्थान जगातील सर्व देशांपेक्षा श्रेष्ठ आहे."

"यात काय संशय आहे? अरे जगातल्या देशांपेक्षा आमचा देश महान आहे याची साक्ष पटवायला एकटा ताजमहाल पुरे आहे."

हे मात्र खरं नव्हे हं! ताजमहालामुळं काही हिंदुस्थानला गौरव लाभलेला नाही. हिंदुस्थानची मान उंच आहे ती नगाधिराज हिमालय, पवित्रतम भागीरथी, भगवान बुद्ध, सम्राट अशोक, पुण्यप्रताप शिवराय, रणरागिणी लक्ष्मी यांच्यामुळं!" सूर्यानं लहानसं भाषणच ठोकलं.

"हिमालयासारखे पर्वत आणि गंगेसारख्या नद्या इतर देशांत काय नाहीत? नाही तो फक्त ताजमहाल. त्याच्यामुळं भारताचं महत्त्व वाढलं आहे." राघवन्‌नं सीतेची कड घेतली.

"मला कोणी विचारलं तर मी सांगेन, भारताला असं महत्त्व मुळीच नको आहे." सूर्या उद्दीपित झाला होता.

"पण तुला कुणी विचारलं तर ना? जगातलं नववं आश्चर्य तुलाच कसं आश्चर्य वाटत नाही?" राघवन्‌नं प्रश्न केला.

"मिस्टर सूर्या, आपल्याला ताजमहाल हे आश्चर्य वाटलं नाही तर जगाचं

काहीच होणार नाही. ताजमहालामुळं भारताचा महिमा वाढला आहे यात शंकाच नाही. शिवाय त्याच्यामुळं निष्काम प्रेमाची महती स्पष्ट होते.–" वेणीप्रसाद बोलले.

"अरे वा ! आपणही प्रेमाचं गुणगान सुरू केलंत का ?" तिरस्कारानं सूर्यानं विचारलं.

"तुम्हाला प्रेम शब्दाची एवढी चीड का ? स्वर्गीय सौंदर्यानं परिपूर्ण असा हा ताजमहाल केवळ शहाजहानच्या प्रेमामुळंच अद्वितीय ठरला आहे." निरूपमा बोलली.

"ताई कृपाकरून माझं म्हणणं ऐकून घ्या. शहाजहानच्या प्रेमाच्या पायावर या ताजमहालची निर्मिती झालेली नसून त्याच्या जुलमी राजवटीतून तो बनला आहे. त्याच्या प्रजेवरील अत्याचार प्रत्यक्ष त्याच्या मुलाला–औरंगजेबाला– सहन झाला नाही. म्हणून त्यानं आपल्या जन्मदात्या बापाला कैद करून बंदिवासात ठेवलं होतं."

"हं ! औरंगजेबाच्या ठिकाणी कलेविषयी तिळमात्र प्रेम नव्हतं. तो कलेपासून शेकडो मैल दूर पळायचा. औरंगजेब इतका निष्ठुर होता की सांगता सोय नाही. इतिहासाची कितीतरी पानं याचा पुरावा देतात. पण शहाजहानाबद्दल इतिहास सांगतो की तो चांगला राजा होता. मग तो जुलमी कसा ठरू शकतो ?"

"बरं, समजा तो चांगला गुणी राजा होता. तरी त्यानं स्वतःची कीर्ती पसरावी म्हणून किती लोकांचे हाल करावे ? या ताजमहालाच्या निर्मितीसाठी वीस हजार कारागिरांनी सतत वीस वर्षे निढळाचा घाम गाळला. रक्ताचं पाणी केलं. प्रजेला पिळून कर वसूल केले गेले. त्या पैशातून कोटयवधी रुपये पाण्यासारखे खर्च केले गेले. स्वतःच्या गौरवाप्रीत्यर्थ किंवा प्रेमाच्या स्मृतिप्रीत्यर्थ वीस हजार मजुरांना कमालीचे कष्ट देऊन शेवटी त्यांच्या मृत्यूला कारणीभूत होणं योग्य आहे का ? माझ्या हातांत अधिकार असता तर मी काय केलं असतं असं तुम्हाला वाटतं ?"

"काय केलं असतंत ?" तारिणीनं स्मितपूर्वक विचारलं.

सूर्याच्या बाजूला शोभेचा काचेचा ताजमहाल ठेवलेला होता. संध्याकाळी ताजमहालच्या भोवतीच्या आवारात थाटलेल्या काचसामानाच्या दुकानातून तो विकत घेतला होता. सूर्यानं ताजमहालचं ते खेळणं हातात घेतलं, अन् म्हणाला "कित्येक सहस्र मूक प्रजेवर जुलूम करून एका मूर्ख राजानं केवळ आत्मप्रौढीसाठी उभा केलेला हा ताजमहाल, माझ्या हाती अधिकार असता तर मी तो तोडून–

फोडून उध्वस्त करण्याचा याच क्षणी आदेश दिला असता !" असं बोलून अत्यंत त्वेषानं त्यानं ते खेळणं जमिनीवर आपटलं. तो 'ताजमहाल' उडाला तोच तारिणीकडे. आता तारिणीच्या तोंडाला नाहीतर डोक्याला लागतं की काय म्हणून सर्वजण घाबरली. सर्वांनी एकच गलबला केला. तेवढ्यात तारिणीनं दचकून मान मागं केली म्हणून ताजमहाल बाजूला पडून फुटला. मात्र एक लहानसा तुकडा तिच्या कपाळाला लागलाच. केसांच्या बटांखाली लहानशी जखम झाली. रक्त वाहू लागलं.

तारिणी बचावली म्हणून सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला न सोडला तोच हे घडलं. सर्व दचकले. सूर्या सोडून सर्वांनी तिच्या भोवताली घोळका केला. तरी तेवढ्यात राघवन्‌नं मोठ्या चपळाईनं तारिणीकडे धावून तिच्या जखमेवर हात दाबून रक्त थांबविण्याचा प्रयत्न चालवला. इतक्यात निरुपमेनं त्याचा हात बाजूला सारून जखमेवर आपल्या रुमालाची पट्टी बांधली.

इतराप्रमाणे सीतासुद्धा काळजी करीत तारिणीच्या जवळ गेली होती. पण तारिणीविषयी राघवन्‌नं जी विशेष आस्था दाखविली ती बघून सीतेचं हृदय व्यथित झालं.

थोडा वेळ तारिणीला घेरून सर्वांनी गोंधळ चालवला होता. आता तो थांबला आणि सर्वजण आपापल्या जागी जाऊन बसले.

वेणीप्रसादनं राघवन्‌कडं बघत म्हटलं. " आपले मित्र चांगलेच तापट दिसतात ! "

" अगदी मूर्ख आहे. क्षमासुद्धा मागितली नाहीन् त्यानं. " राघवन् म्हणाला.

" एवढ्या क्षुल्लक गोष्टीचा केवढा बाऊ करताहात ?–" तारिणी.

" बरं झालं कपाळालाच लागलं. चुकून डोळ्याला लागलं असतं तर काय झालं असतं ? " राघवन् चिंतायुक्त स्वरात बोलला.

" डोळ्याला नाही ना लागलं ? मग त्याची चर्चा कशाला ? आपण सर्व गप्प बसाल तर मोठे उपकार होतील! " – तारिणीनं मोडता घातला.

सीता गप्प बसली होती. मात्र तिच्या हृदयात उलथापालथ सुरू होती. क्षणभर तिचं मन म्हणालं, ' तिळाएवढी जखम झाली तर या लोकांचा जीव का एवढा खालीवर होतो आहे ? एवढी का शुश्रूषा चालली आहे ?' तिला तर असंही वाटलं की घाव जरा मोठा व्हायला हवा होता.

त्या घटनेमुळं सर्वांचं मन खट्टू झालं होतं. आता तिथं कुणाचंच मन लागेना.

" पुरे झालं आता ! चांगला बघून झाला ताजमहाल ! आता हॉटेलात परत जाऊ या– " सीतेनं म्हटलं.

" जाऊ या ! " असं म्हणून सर्व उठली.

हॉटेलात पोचताच सूर्यानं आपलं सामान आवरलं आणि 'मला आताच दिल्लीला गेलं पाहिजे', असं सांगून तो स्टेशनवर निघून गेला.

16

दुसऱ्या दिवशी सीता व राघवन् पूर्वीच ठरल्याप्रमाणे रजनीपूरला जायला निघाली. तारिणी आणि निरुपमा स्टेशनवर आल्या तेव्हा त्यांना डब्यात राघवन् व सीता ही दोघंच दिसली. त्यांच्याबरोबर सूर्या नव्हता. सूर्या दिसला नाही तेव्हा तारिणीला शंका आली. तिनं विचारलं, " सूर्या कुठं आहे ? "

" तो दिल्लीला निघून गेला. " राघवन्नं उत्तर दिलं.

" कालच्या घटनेमुळे त्यांच्याशी भांडून तर त्यांना घालवून दिलं नाहीत ना ?" तारिणीनं संशय व्यक्त केला.

" छे: ! छे: ! आम्ही मुळीच भांडलो नाही. बहुतेक त्यालाच स्वत:च्या कृत्याची लाज वाटून हट्टानं तो निघून गेला असावा. "

आपल्या आतेभावाच्या नावाला असा बट्टा लागावा हे सीतेला आवडलं नाही. तिनं म्हटलं, " तसंच काही नाही हं ! त्याला दिल्लीला काही जरूरीचं काम होतं. 'आग्र्यापुरती मी सोबत करीन, नंतर दिल्लीला जायचं आहे', असं येतानाच त्यानं सांगितलं होत. त्यानं आपल्यासाठी क्षमायाचना करणारं पत्रही देऊन ठेवलं आहे." मग राघवन्कडे वळून ती म्हणाली, " अहो, यांना द्या ना ते पत्र."

" गाडी सुरू झाली म्हणजे देतो. एवढी कसली घाई आहे ? "

तारिणीनं म्हटलं, " क्षमा ? कशासाठी ? निश्चितच तुम्ही लोकांनी राईचा

पर्वत करून त्यांना बेजार केलेलं दिसतं. तुम्हीच त्यांना पळवून लावलं असावं. नाहीतर ते कशाला गेले असते ?– मला याबद्दल फार खेद होतोय् ! ”

तिच्या या बोलण्यानं सीतेला समाधान वाटलं.

गाडी चालू झाल्यावर तारिणीनं विचारलं, “ कुठं आहे हो ते पत्र ?”

“ अरेच्चा ! ते पत्र पाहिल्याशिवाय तुम्हाला काही चैन पडणार नाही असं दिसतं ?” म्हणत राघवन्‌नं पत्र काढून तिला दिलं.

श्रीमती तारिणीदेवी,

आज ताजमहालात माझ्यामुळं आपल्याला जो त्रास झाला त्यामुळे मी अत्यंत लज्जित झालो आहे. आपल्या डोक्यावर घाव करून रक्त सांडवण्याचा माझा लेशमात्र विचार नव्हता. आपण आपल्या मनात अशा शंकेला जागा दिली नसेल याची मला पुरेपूर खात्री आहे. बोलता-बोलता भावनेच्या भरात ते ताजमहालाचं खेळणं मी जमिनीवर आपटलं. साहजिकच त्याचे तुकडे-तुकडे झाले. त्याच्या फुटण्याचं मला मुळीच दुःख वाटत नाही. किंबहुना, प्रत्यक्ष ताजमहाल कुठल्याही कारणानं असाच मोडून जमीनदोस्त झाला तरी मला यत्किंचित् दुःख होणार नाही. कधी काळी कुण्या एका बेअक्कल म्हाताऱ्याच्या कचाट्यात आपला देश सापडला होता. म्हातारपणामुळे आधीच त्याची ‘ साठी बुद्धी नाठी ’ झाली होती त्यानं प्रेमाच्या भ्रमात पडून एक खेळणं बनवून घेतलं. आपल्या मृत प्रेयसीचा आत्मा शांत व्हावा म्हणून त्यानं कोट्यवधी रुपये खर्चून जे खेळणं बनवून घेतलं त्याला नाव दिलं ‘ ताजमहाल ! ’ याच ताजमहालास जगातलं एक आश्चर्य मानून बुद्धिहीन व विचारहीन माणसांचे थवे आश्चर्यानं थक्क होऊन बघतात. माझं तरी मत असंच आहे. . .आज अनपेक्षितपणे जी घटना घडली तिच्यासाठी मी आपली क्षमा मागतो.

हे पत्र पूर्ण करण्याआधी मला एक गोष्ट सांगायची आहे. मी आधीच म्हटलं आहे की आपल्यावर आघात करण्याचा विचारही माझ्या मनाला शिवला नव्हता. पण आपल्या कपाळावरील ती लहानशी जखम पाहून ज्यांनी गडबड उडवली त्यांच्या डोक्यावर चार गुद्दे लगावण्याची नि दोन-दोन मुस्कटात ठेवून देण्याची मात्र माझी इच्छा होती.

आपला देश स्वतंत्र करण्यासाठी आपल्याला कोणत्या आपत्तींना तोंड द्यावं लागेल कुणास ठाऊक ! लक्षावधी लोकांना प्राणांची आहुती द्यावी लागेल, उघड्या डोळ्यांनी आगीत उडी घ्यावी लागेल.

या वीरप्रसू भूमीत आमचे पूर्वज असे षंढ बनून कधीच राहिले नाहीत. उद्या आपण वीर रजपुतांच्या प्रदेशात जाणार आहात. तिथं कसे शूर स्त्री-पुरुष होऊन गेलेत हे माहीत आहे ना ? किल्ला फोडून किंवा चढून शत्रू आत आला तेव्हा सहस्रावधी स्त्रीरत्नांनी पेटत्या अग्नीत उड्या घालून जोहार केला. राणा संग्रामसिह या नावाचा, नावाप्रमाणे पराक्रमी राजा होऊन गेला. त्यानं रणक्षेत्रावर लढता लढता शरीरावर शहाण्णव घाव झेलले. अशा महान वीरांच्या देशात जन्म घेऊन आम्ही एक लहानशी जखम झाली तरी अस्वस्थ होतो ! पुरुषांसारखे पुरुष रक्त पाहून ' हिस्टेरिक ' होतात, याला काय म्हणावं ?

झालं ! हे पत्र इथंच संपवतो. मानवाचा हा अधःपात आपल्याही मनाला सहन होणार नाही.

आपला

सूर्या

हे पत्र तारिणीनं रजनीपूरच्या गाडीत बसल्या-बसल्या एकदाच नव्हे तर चांगलं दोनदा वाचलं. नंतर आपल्या पेटीत नीट ठेवून दिलं.

" तुम्ही तर ते पत्र प्रेमपत्रासारखं अगदी जपून ठेवलंत ?" राघवन् बोलला.

" शुद्ध वटवट आहे ! " तारिणीनं म्हटलं. वास्तविक राघवन्च्या बोलण्यावर नोंदवलेलं ते मत होतं. तरी वेड पांघरून राघवन् म्हणाला, " मग ती वटवट का बरं पेटीत बंद केलीत ? "

एकदा तारिणीला वाटलं, पत्र सर्वांना वाचून दाखवावं. पण दुसऱ्याच क्षणी तिनं विचार बदलला.

काही वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. मग त्यानं तारिणीच्या गेल्या आठ वर्षातील आयुष्याबद्दल चौकशी सुरू केली.

राघवन्च्या प्रश्नांची उत्तरं निरुपमेनं दिली. तिनं सांगितलं, " तारिणी आता पूर्वीसारखी देशसेविका राहिलेली नाही. कॉलेजात प्रवेश मिळून तिनं उच्च पदवी संपादन केली आहे. हल्ली विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळवून ती इतिहासाचं संशोधन करीत आहे. आता आम्ही दोघी त्यासाठीच राजपुतान्याचा दौरा करणार आहोत. "

हा सर्व वृत्तान्त सांगून झाल्यावर निरुपमा आपल्या जागेवर जाऊन झोपली. त्यानंतर राघवन्नं तारिणीला तिच्या कॉलेज-जीवनाविषयी कितीतरी प्रश्न विचारले. तारिणीनं त्याच्या प्रश्नांना बेपर्वाईची उत्तरं दिली. ती ऐकून राघवन्

कंटाळला अन् पाय पसरून झोपी गेला.

सीता जागीच होती. तारिणी तिच्याजवळ जाऊन बसली. तिनं सीतेला विचारलं, " तुमचा आतेभाऊ नेहमीच अशीच चिडचिड करीत असतो का हो ? "

तारिणीच्या प्रश्नाचा सीतेला राग आला. ती संतापून म्हणाली, " सूर्याबद्दल ऐकून तुम्हाला काय मिळणार आहे ? तो माझ्यासारखाच मूर्ख आहे, अनाथ आहे. झालं समाधान ? "

" ताई, अशा संतापता कशाला ? तुमचे बंधू तसे फार चांगले आहेत. माझ्या कपाळावर त्यांच्यामुळे जो घाव झाला त्याचं त्यांना फार दु:ख झालं. तसं त्यांनी स्पष्टपणे लिहिलंय्. मात्र ते थोडे चिडचिड्या स्वभावाचे दिसतात. तुमच्या-मार्फत मला त्यांना कळवायचं होतं, की घाव केव्हाच बुजला आहे ! . . . तुम्हाला त्यांच्याबद्दल बोलायचं नमलं तर नका बोलू ! " तारिणी बोलली.

तिचं बोलणं ऐकून सीतेचं मन बदललं तिनं म्हटलं, " मी संतापल्ये नाही. सूर्या तसा मोठाच गुणाचा आहे. अहो, माझ्या मामांच्या कुटुंबात तोच तेवढा समजूतदार नि सहनशील आहे. कालच त्याला एवढा कसला घुस्सा आला अन् बेफाम होऊन त्यानं ते ताजमहालचं खेळणं जमिनीवर कसं आपटलं, याचं मलाच आश्चर्य वाटतं ! बिचाऱ्याच्या अंत:करणात कोणतं दु:ख साठवलं आहे, कुणास ठाऊक ! सर्व बाजूंनी विचार करता त्याचं दैवच खोटं वाटतं ! नाहीतर अशा लफड्यात का बरं पडता ? खूप शिकला असता अन् ऐटीत राह्यला नसता का ? "

" नाही हो ! असं कसं बरं म्हणता ? " असं तारिणीनं विचारताच सीतेनं ओघात सूर्याची कहाणी ऐकवली. आधी तिनं सूर्याच्या आई-वडिलांबद्दल सांगितलं मग भावाबरोबर व गावकऱ्यांबरोबर झालेल्या भांडणाची माहिती दिली. मात्र स्वत:बद्दल, आपल्या लग्नाबद्दल तिनं चकार शब्द उच्चारला नाही.

17

रजनीपूर संस्थानचे दिवाण सर के. आदिवराहाचार्य यांना एखादा कुशाग्र बुद्धीचा तरुण भेटला तर ते त्याच्याकडे आकृष्ट होत. त्याच्यावर प्रेम करू लागत.

ही त्यांची एक सवय होती. राघवन् इंग्लंडला जात असताना आगबोटीवर त्याची त्यांच्याशी भेट व परिचय होण्याचा योग आला. त्याची तीव्र बुद्धिमत्ता आणि वाक्-चातुर्य पाहून आदिवराहाचार्य त्याच्यावर बेहद्द खुष झाले होते. त्याच्याबरोबर त्याच्याशी अधिक परिचय वाढवण्यात त्यांचा एक अंतस्थ हेतू होता. दिल्लीच्या सचिवालयात काम करणाऱ्या लोकांशी जितका अधिक परिचय वाढेल तेवढा फायदा होईल याविषयी त्यांना खात्री होती. केव्हातरी त्यांच्याकडून आपलं काम करू घेता येईलच, असं त्यांना वाटे.

म्हणून त्यांनी राघवन्‌ला म्हटलं होतं, की इंग्लंडवरून दिल्लीला परत आल्यावर आपल्या बायकोला घेऊन रजनीपूरला अवश्य या. त्या निमंत्रणानुसार राघवन् सीतेला घेऊन त्यांच्या बंगल्यावर गेला. तारिणी व निरुपमा दुसरीकडे गेल्या.

दिवाणसाहेबांना काही जरुरीच्या कामासाठी बाहेरगावी जावं लागलं होतं. पण राघवन्‌ची तार मिळताच त्यांनी आपल्या मुलींना त्या दोघांचं यथोचित आगत-स्वागत करण्यासाठी सांगून ठेवलं होतं. त्यांनी राघवन् व सीता यांचं स्वागत तर चांगलं केलंच पण त्यांची व्यवस्थाही उत्तम केली.

आदिवराहाचार्यांच्या मुली, भामा व धामा या दोघीही विलायतेला जाऊन आलेल्या. इंग्रजी संस्कृतीत आकंठ बुडालेल्या होत्या. एक उंच–सडपातळ होती तर दुसरी ठेंगू– लठ्ठ होती. दोघींनीही आपले केस कापून घेतले होते. आपसांत त्या सदा इंग्रजीतून बोलत. इंग्रजी कादंबरीकार वुडहाऊस यांच्या कादबऱ्यांतील पात्र ज्या शैलीत बोलतात त्या शैलीत बोलत. पियानोवर पाश्चात्य संगीत वाजवणं आणि बॉलरूममध्ये जाऊन बॉलनृत्य करणं त्यांना येत होतं.

अशा या मुलींच्या सहवासात सीता चांगलीच गोंधळली. आधी त्या दोघी सीतेला काही विचारायचं झालं तर इंग्रजीतून विचारायच्या. सीतेला त्यांचं इंग्रजी कळेना. ती गोंधळून त्यांच्या चेहऱ्याकडे बघायची. तिला गप्प पाहून मग आपल्या मोडक्या-तोडक्या तामिळी भाषेतून त्या आपलं म्हणणं समजावून द्यायच्या. मुळात त्या इंग्रजांची नक्कल करीत इंग्रजी बोलत. त्यामुळे सीतेचं इंग्रजीचं तोटकं ज्ञान उपयोगी पडेना. म्हणून सीता त्यांना टाळू लागली.

सीतेपेक्षाही राघवन्शी त्या अधिक मोकळेपणानं बोलत. राघवन्सुद्धा औप-चारिकपणा न ठेवता त्यांच्याशी गप्पा मारू लागला. बोलता बोलता तो अशा विनोदी कोटया करी की त्या दोघी खदखदून हसत. त्यांचं हे वागणं सीतेला तिरस्करणीय वाटलं तरी मनाला दाहक वाटलं नाही. त्या मुली सुंदर नव्हत्या हे एक कारण असावं, किंवा राघवन्ला त्यांच्याविषयी ओढ वाटणं शक्य नाही हे तिच्या अंतर्मनाला कळलं असावं.

भारतात जेवढी संस्थानं होती त्यांच्या राजधान्यांत रजनीपूर हे अत्यंत सुंदर शहर होतं. सीता आणि राघवन् यांनी दुसरा संपूर्ण दिवस शहर बघण्यात घालवला. जुने महाल, नवे महाल, आरसे महाल, नंदनवन, अजब बंगला, शहराबाहेरचे जुने किल्ले आणि तटबंदी अित्यादी पाहून त्यांना खूप आनंद झाला. कोणत्याच स्थळी ते फार वेळ थांबले नव्हते. प्रत्येक ठिकाणी राघवन्ला निघायची अशी काही घाई व्हायची- जणू त्याचे पाय तिथं भाजताहेत. सीतासुद्धा त्याच्या उतावळेपणाला साथ देत घाईघाईने प्रेक्षणीय स्थळं पाहून घेत त्याच्या सहचारिणीची भूमिका पुरेपूर पार पाडीत होती.

शहर पाहून दिवाणसाहेबांच्या मोटारीतून परत येताना सीतेनं विचारलं, "का हो, आज त्या दोघी दिसल्या नाहीत ? काय घडलं ?"

" मीसुद्धा तोच विचार करतोय्. 'फोन करू' असं त्या बोलल्या होत्या. फोनही केला नाही ! "

कार थोडी पुढं गेली नाही तो राघवन्ने किंचाळून ड्रायव्हरला म्हटलं, "ठहरो ! " त्याच्या किंचाळण्यामुळे ड्रायव्हरनं एकदम ब्रेक दाबला. चीत्कार करीत गाडी तिथंच थांबली. सीता घाबरून गेली. तिनं भांबावून बाहेर इकडे-तिकडे पाहिलं तेव्हा तिला दिसलं की, एका घराजवळ एक टांगा उभा असून तारिणी व निरुपमा त्यातून खाली उतरताहेत. . .

राघवन्नं तारिणीकडे पाहात कोरडया आवाजात म्हटलं, "हे काय ? तुम्ही

आम्हाला चांगलाच धोका दिलात ?"

" मुळीच नाही. आम्ही तुमच्याबरोबर शहर पाहायला आलो असतो तर काहीच नीट पाहाता आलं नसतं म्हणून आम्ही दोघीच फिरून आलो." तारिणीनं शंकानिरसन केलं.

" उद्यादेखील असंच करायचा बेत आहे का ?" राघवन्‌नं प्रश्न केला.

" उद्या तुम्ही तलावाकडे जाणार असलात तर आम्ही अवश्य सोबत करू. तुम्ही इथं येऊन आम्हाला घेऊन चलू शकाल का ?" तारिणीनं विचारलं.

" आनंदानं घेऊन जाईन. मात्र आजच्यासारखा धोका देऊ नका. नाहीतर सांगितलं नाही म्हणाल ?" राघवन्‌नं उत्तर दिलं.

राघवन् दिवसभर एवढा अस्वस्थ का होता, हे सीतेला आता कळलं. त्या रात्री तिला अर्ध्या तासापेक्षा अधिक झोप लागली नाही. सकाळी बिछान्यातून बाहेर आली तेव्हा तिचं डोकं भयंकर दुखू लागलं. तिनं राघवन्‌ला म्हटलं, " आज मला तलाव बघायला सोबत करता येईलसं वाटत नाही. दिल्लीला परत चालणार असलात तर अधिक बरं होईल."

दुपारी त्यानं विचारलं, " का ग ऽ, खरंच का तुझं डोकं धरलंय् ?"

" हे काय बाई विचारणं झालं ? डोकं कुठं खोटं-खोटं दुखतं का ?"

" बरं तर! मग मी निघतो." असं बोलून राघवन् निघालाच.

" आज जायलाच हवं का ?"

" अर्थात् ! ठरलेला कार्यक्रम तुझ्या डोकेदुखीसाठी रद्द केला जाऊ शकत नाही!"

सीतेला एकदम रडू आलं. राघवन्‌शी वाद घालण्यात अर्थ नाही याची जाणीव झाली. असलेला राग गिळून वैतागानं ती म्हणाली,

" मेला बायकांचा जन्म असाच ! डोकं तडकलं तरी ऐकणार कोण ? ाक आहे ! इथं एकटी राहून मरण्याऐवजी तुमच्या सोबत येऊन मरत्ये !"

" मग लवकर तरी मरा !" राघवन् तुसडेपणानं बोलला.

मोटारीतून जात असताना कोणीच काही बोललं नाही. सीता मात्र सारखी रुमालानं डोळे पुसत होती.

तारिणी व निरुपमा थांबल्या होत्या त्या घरासमोर मोटार थांबली. वरच्या मजल्यावरून निरुपमेनं टाळ्या वाजवून त्यांनी वर येण्याची खूण केली.

म्हणाली, "जरा आत येऊन बसता का? तारिणीला तयार व्हायला दहा मिनिटं तरी लागतील."

"मी नाही आत येत! इथंच बसून राहत्ये....आम्हाला कुठं एक मिनिट उशीर लागला तर कसा नाकावर राग उभा राहतो? अन् आ....?"

"बडबड बंद कर!" राघवन् घुश्श्यात बोलला आणि मोटारीतून उतरून आत चालता झाला.

मोटारीत बसल्या बसल्या सीतेला एकेक क्षण युगासारखा वाटू लागला. कितीतरी मिनिटांचा असा कंटाळवाणा वेळ गेल्यावर वरच्या मजल्यावरून खि:खि: खिदळण्याचा आवाज ऐकू आला, सीतेनं मोटारच्या बाहेर डोकं काढून वर बघितलं. पण तिथं काहीच दिसलं नाही. मग एकाएकी वरच्या उघड्या खिडकीत वेगळेच दृश्य दिसलं. राघवन् हातात एक लिफाफा धरून तारिणीला देऊ पाहात होता. तारिणी तो घ्यायला तयार नव्हती. राघवननं झटकन तिचा हात धरून बळजबरीने लिफाफा तिच्या हातात कोंबण्याचा प्रयत्न चालवला. तरी तिनं घेतला नाही. उलट हात सोडवून घेऊन ती पळू लागली. तो तिच्या मागं धावला....

हे सारं क्षणार्धात घडून आलं तरी सीतेच्या मन:पटलावर ते चित्र पक्कं अंकित झालं. थोडा वेळ तिची विचारशक्ती बधीर झाली. नंतर मात्र तिला असा संताप आला की रागानं तिचं शरीर थरथर कापू लागलं!

थोड्याच वेळात तारिणी आणि राघवन् अशी दोघंच खाली आली. त्यांच्या मागोमाग निरुपमा येईल असं सीतेला वाटल. पण ती आलीच नाही. कार चालू लागली तेव्हा ती थक्क झाली.

रजनीपूरचं ते सरोवर पाहताना असं वाटत होतं, की जणू काही निळ्या आकाशाचा एक भलामोठा तुकडा धरणीवर आणून ठेवला आहे. संरक्षणासाठी तट उभे करावेत तसे दोन्ही बाजूला डोंगर उभे ठाकले होते. उरलेल्या दोन दिशांना हिरवेगार वृक्ष उभे होते. एखाद्या निळ्या रंगातील चित्राला हिरवी चौकट असावी तशी ती वृक्षराजी शोभत होती.

अशा त्या सुंदर सरोवराच्या पृष्ठभागावरून हजारो पांढरेशुभ्र पक्षी थव्याथव्यांनी उडू लागत तेव्हा असे विलोभनीय दृश्य दिसे की त्याकडे बघतच बसावे!

त्या रम्य सरोवराच्या काठी राघवन्, सीता आणि तारिणी अशी तिघे जेव्हा मोटारीतून उतरली तेव्हा त्या जलाशयाकडे बघून तारिणी उत्स्फूर्तपणे

उद्गारली, " अय्या ! कित्ती सुंदर आहे ! आजपर्यंत मी कितीतरी सुंदर निसर्ग-दृश्ये बघितलीत; पण असं मनोहर दृश्य कुठंच बघितलं नाही. "

" म्हणूनच तर तुम्हा दोघींना बळजबरीनं इथं ओढून आणलं. स्वित्झर्लंडमध्ये सुंदर अशी जगप्रसिद्ध सरोवरं असली तरी याच्या तुलनेत ती फिक्की पडतात. मात्र हे अनुपम दृश्य दाखवायला तुम्हाला आणताना माझे प्राण कंठाशी आले त्याचं काय ?" राघवन् चेष्टेने म्हणाला.

सीता काही न बोलता सरोवराकडे बघत होती. तिचे डोळे तलावाकडे लागले असले तरी तिचं मन दुसरीकडेच भटकत होते; सरोवराच्या थंड पाण्याला स्पर्श करून ज्या शीतल वायुलहरी तिच्या शरीरावरून वाहात होत्या त्यांनी शरीर शांत होण्याऐवजी त्यात आगीचा लोळ उठत होता.

लांब पावलं टाकीत त्या दोघांपासून तिला दूर जाताना पाहून तारिणी राघवन्‌ला म्हणाली, " आज तुमच्या सौभाग्यवतीला झालं तरी काय ? मला तर वाटतं, त्यांना नुसता डोकेदुखीचाच नव्हे तर मानसिक रोगाचाही काही त्रास असावा. "

" मला या गोष्टीची कल्पना असती तर तिला सोबत आणलंच नसतं !" राघवन् बोलला.

" बायकाचं मन ओळखण्याची शक्तीच तुमच्या ठिकाणी नसावी असं वाटतं. त्यांची इच्छा अशीच असणार, की तुमच्याबरोबर इथं एकट्यानं फिरायला मिळावं. माझं तरी अनुमान तसंच आहे. "

" तिला एकटीला इथं आणून काय उपयोग ? तिच्या गोष्टी मला रुचत नाहीत अन् माझ्या गोष्टी तिला कळत नाहीत !"

" मग यात चूक कोणाची ? एकतर तिला शिकवून आपल्या योग्य बनवायची होतीत किंवा आपल्यासारखी शिकलेली नाही तर तिच्याशी लग्नच करायचं नव्हतं. आधी स्वत: चूक केलीत. तेव्हा आता असं बोलून काय फायदा होणार ? "

" चूक माझी नव्हे तारिणी, तुझी होती ! तुझ्यामुळेच ही बया माझ्या गळ्यात पडली !"

" वा ऽ ! काय पण बोललास ! हे बघ पुन्हा असे शब्द उच्चारायचे नाहीत. कळलं ? आता त्या जिथं बसल्या आहेत तिकडेच जाऊ या. नाहीतर त्यांचा मनस्ताप अधिक वाटेल !"

" वाढू दे वाढला तर ! मला त्याची पर्वा नाही."

राघवन् जरी असं बोलला तरी तारिणी चालू लागली तेव्हा झक्कत तिच्या मागोमाग गेला. दोघंही [सरोवराच्या काठावर सीतेच्या शेजारी येऊन बसली.

काठावर एकही होडी नव्हती तरी तलावात बऱ्याच नावा दिसत होत्या. त्या सर्व होड्या सरोवराच्या मध्यभागी पुष्पवाटिकांनी वेढलेला जो बेटासारखा भाग होता तिकडेच चालल्या होत्या. त्या बेटावर उंच वृक्षांच्या मधोमध एक मोठा महाल होता.

" तो महाल कुणाचा आहे ? " तारिणीनं कुतूहलानं विचारलं.

' या संस्थानाच्या राजाचा आहे. आता स्वर्गवासी झालेले थोरले महाराज आपल्या हयातीत वारंवार इथं येऊन राहायचे असं म्हणतात. त्यांचे भोगविलास याच ठिकाणी चालत. तुम्हाला माहीत आहे की नाही कुणास ठाऊक पण पाच सहा वर्षांपूर्वी याच राजेसाहेबांची हत्या करण्याचा मुंबईत प्रयत्न झाला होता. खून करण्याचा प्रयत्न करणारी एक बाई होती. या घटनेसंबंधी वृत्तपत्रांतून सनसनाटी बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. तो कट फसला. राजेसाहेब थोडक्यात बचावले. त्या खुनी बाईला दोन वर्षांची शिक्षा झाली. तेच राजेसाहेब दोन वर्षांपूर्वी दारूच्या अतिरेकानं कैलासवासी झाले."

सुरुवातीला सीता आपल्याच विचारात दंग होती. पण मुंबईत रजनीपूरच्या राजाचा खून करण्याचा कट झाल्याच्या गोष्टीनं तिचं लक्ष वेधून घेतलं. तिनं विचारलं, " मुंबईत या संस्थानिकाला जिवे मारण्याचा प्रयत्न कोणत्या बाईनं केला हो ?"

" अरेच्चा ! तू पण ऐकते आहेस का ? त्या खुनी बाईबद्दल फारसं काही कळल नाही. कोणी म्हणत, ती हिंदू होती, तर कोणी बोलत, ती मुसलमान होती. ती हिंदू असो की मुसलमान असो, माझ्या मते ती पक्की राक्षसीण असली पाहिजे. दिवसाढवळ्या कत्तल करण्याचा प्रयत्न करणारी बाई किती धाडसी असली पाहिजे याचा तूच अंदाज लाव."

" पुरुषांनी केवढाही अत्याचार केला तरी त्याला जाब विचारू नये. उलट स्त्री बदला घेत असेल तर ती चुकते, असंच ना तुम्हाला वाटतं ? धन्य आहे पुरुषांची ! "

" कमाल आहे बुवा तुझ्या कल्पनाशक्तीची ! एका खुनी स्त्रीची वकिली

करू लागलीस होय ! हे सारं कुठं शिकलीस ? " राघवन्‌नं उपरोधिक स्वरात विचारलं.

त्या दोघांत तारिणी मध्येच बोलली, " पुढं त्या बाईचं काय झालं हे कळलं का ? " आतापर्यंत गप्प बसून ऐकत राहिलेल्या तारिणीच्या स्वरात एकदम फरक जाणवला. मघाशी सीतेचा आवाज जसा कंपित झाला होता तसाच आता तारिणीचाही आवाज विचित्र वाटला.

राघवन्‌नं आवाजातील बदलाकडे दुर्लक्ष करून म्हटलं, " जेलमधून सुटल्यावर कुठंतरी दारोदार हिंडत असेल. कुणास ठाऊक कुठं असेल ? आपल्याला काळजी करण्याचं कारणच काय ?"

एवढ्यात एक होडी काठाला लागली. तिच्यातील उतारू खाली किनाऱ्यावर उतरले. चटकन् राघवन् विचारू लागला, " हीच होडी ठरवायची का ? आपणही थोडा नौकाविहार करू या ! "

" मी तयार आहे. मजेत आपण जलविहार करू, पण आपल्या सौभाग्यवतीचा सल्ला घ्यायला नको का ? "

' ती पण येईल ! जर तिला यायचं नसलंच तर इथंच बसून राहील. आपण दोघंच फेरफटका मारून येऊ ! "

असं बोलून राघवन् होडी ठरवायसाठी गेला. तो गेल्यावर तारिणीनं सीतेला विचारलं, " काय हो, तुमच्या गळ्यातला हा रत्नहार तुम्हाला कोणी दिला ? "

" माझ्या आईनं दिला आहे ! पण तुम्ही हे का विचारलं ? मी तो कुठून तरी चोरून आणला असा संशय आला का तुम्हाला ? " सीतेनं रागानं विचारलं.

" इश्श ! हे हो काय बोलता ? हा तुमचा रत्नहार सुंदर आहे, त्याची कलाकुसर फारच उत्तम आहे. तो कुठं बनलेला आहे हे जाणून घेण्यासाठी मी सहज विचारलं तर तुम्ही एवढ्या नाराज का झालात ? "

" छे : हो ! मी कशाला नाराज होईन ? "– सीतेनं पटकन् म्हटलं.

18

राघवन् होडी ठरवून आला. तिघंही होडीत जाऊन जाऊन बसली. होडी सरोवरात चालू लागली.

एवढ्यात आकाशात अचानक काळे ढग गोळा झाले. वारा जोरात वाहू लागला. सर्वजण नौकाविहारात दंग असल्यानं तिकडे कुणाचं लक्ष गेलं नव्हतं.

जेव्हा ते सरोवराच्या काठी आले होते तेव्हा नीलजलाच्या पृष्ठावर इवल्याशा लाटांचा खेळ सुरू होता. सागरतटावरच्या वाळवंटाच्या किनाऱ्यावर जशा लाटा उठतात तशा निरुपद्रवी लाटा होत्या त्या. वाऱ्यानं पाण्यावर तरंग उठत, किनाऱ्याकडे पसरू लागत अन् शेवटी पाण्यातच विरून जात.

ही मंडळी होडीत बसून निघाली तेव्हा लाटा फार तर फूटभर उसळून होडीवर आदळत होत्या. हळूहळू त्यांच्या कडेला पांढरा फेस दिसू लागला. लाटा एकमेकींशी दंगामस्ती करू लागल्या होत्या. त्यांचा ध्वनी सागरगर्जने-सारखा येऊ लागला होता.

सरोवरातील बेटाच्या अनुरोधानं निघालेली त्यांची होडी फार दूर गेली नाही तोच वाऱ्याचा जोर वाढला. पाण्यावरील लाटा चीत्कार करीत फेसाळत चांगल्या अडीच–तीन फूट उंच उसळू लागल्या. लाटांचा आवाज वाढू लागला. होडी पाण्यावर झोके खाऊ लागली.

नावाड्यानं आपल्या भाषेत काहीतरी म्हटलं. ते कुणालाच कळलं नाही. सीता भयभीत होऊन चहूंबाजूला भिरभिर पाहू लागली... आणि एकदम तिच्या तोंडून उद्गार बाहेर पडले, " अयाई ग ! मला भीती वाटते ! " असं बोलून ती रडायलाच लागली.

राघवन्नं कडक शब्दात तिला दटावत म्हटलं, " सीता, वेड्यासारखं हे काय चालवलं आहेस ? तुझं रडणं-भेकणं बंद करतेस का नाही ? "

सीतेची भीती आणखी वाढली. ती एकदम किंचाळली, " आईऽ ! तुझं म्हणणं खरं ठरलं ग ! मी आता या पाण्यात पडून मरणार आहे गऽ ! "

या अनपेक्षित परिस्थितीनं राघवन् गोंधळून गेला. गडबडून त्यानं तारिणीला म्हटलं, "तुम्ही तरी तिची समजूत घाला नं ?"

"मिस्टर राघवन्, त्याचा काही उपयोग नाही. तुमच्या बायकोला हिस्टेरिया झालेला दिसतो. नावाड्याला होडी किनाऱ्याकडे न्यायला सांगा."

राघवन् ओरडून म्हणाला, "होडी किनाऱ्याकडे घेऊन चल."

"घाबरण्यासारखं काही नाही साहेब!" नावाडी म्हणाला.

"नावाडी नाहीच परतणार! त्याला आधीच कुणी शिकवून ठेवलं आहे नं!" सीता हुंदके देऊन रडू लागली.

"काही तरी बडबडू नकोस सीता! जरा आपली जीभ आवर बरं!" राघवन्नं सीतेला ठणकावलं. मग नावाड्याला सांगितलं, "होडी परत घेऊन चल! चलतोस का नाही?"

"ठीक आहे साहेब, चलतो!"

एवढ्यात हुंदके आणखी वाढले. मधेच ती किंचाळली,

"आईऽ! तू म्हणालीस तेच खरं ठरलं गऽ!" तिचे हातपाय थरथर कापत होते.

हे पाहून तारिणीनं म्हटलं, "मिस्टर, यांचा हिस्टेरिया वाढतो आहे. तुम्ही यांच्याजवळ येऊन बसा. मी एक हात धरत्ये. तुम्ही दुसरा हात धरून ठेवा." असं बोलून तारिणीनं सीतेचा हात घट्ट पकडला.

सीतेनं झटक्यात आपला हात सोडवून घेतला व ती उठून उभी झाली. आधीच हेलावत असलेली होडी जोरात हिंदकळली.

राघवन् उठून सीतेकडे निघाला नाही तोच एक जोराची लाट होडीवर येऊन आदळली. होडी एका बाजूला चांगलीच कलली. राघवन् तोल जाऊन होडीत पडला.

या गडबडीत 'अयाई गऽ!' असं किंचाळून सीतेनं पाण्यात उडी घेतली!

तारिणीच्या मुखातून तेच शब्द किंचाळण्याच्या रूपानं बाहेर पडले!

नावाडी आपल्या भाषेत काहीतरी बडबडत होता. उलटायला आलेली नाव त्यानं शिताफीनं सरळ केली. पाण्यात पडलेली सीता खाली जाऊन पृष्ठभागावर आली. एकवार डोकं उचलून तिनं 'आई गऽ!' अशी किंकाळी फोडली. तिची किंकाळी वाऱ्याच्या सुसाटयाला अन् लहरींच्या गर्जनेला दाबून आसमंतात घुमली. तारिणी व राघवन् यांच्या हृदयाला भेटून गेली!

राघवन्‌च्या मनात क्षणभर एक भयंकर विचार तरळून गेला. 'यालाच तर दैव म्हणतात ! समजा सीता मेली तर.... ? ' मात्र राघवन्‌नं त्या अशुभ विचाराला थारा दिला नाही. त्यानं उंच स्वरात नावाड्याला हाक मारली. तो त्याला म्हणणार होता की, होडी बुडणाऱ्या सीतेजवळ घेऊच चल. पण त्याआधीच तारिणीनं होडीतून पाण्यात उडी मारली आणि सीतेच्या दिशेनं अतिवेगानं ती पोहू लागली.

सीतेच्या कानात काही वेळ ' घों ऽ ' असा आवाज घुमत राहिला. तिला दुसरा आवाज ऐकू आला नाही किंवा अन्य विचार मनात आला नाही. सीता बराच वेळ विचारात पडली की, ' हा कोलाहल कशाचा असावा ? ' एकाएकी तिला आठवण झाली, ' आईनं आपल्याला जिच्याबद्दल वारंवार सावध केलं तीच ही लाटांची गर्जना तर नसेल ? निश्चित ही लाटांची गर्जना आहे. कानाचे पडदे फाटतील की काय असं वाटतं. पाण्याच्या बाहेर असताना तर हा कोलाहल ऐकू येत नव्हता ! मग पाण्याच्या आत एवढा गलबला का होत असावा ? आता यातून मी वाचेन की नाही ? आईचं ऐकलं नाही हेच चुकलं ! आता पश्चात्ताप करून काय होणार ? ' अशा विचारांच्या भोवऱ्यात सापडलेली सीता जिवाच्या आकांतान झुंजत होती. इतक्यात तिच्या हाताला काही लागलं. चाचपून पाह्यलं तर तो कोणा स्त्रीचा हात होता. 'कोणाचा असेल बरं हा हात ? हं ! आईचाच असला पाहिजे. संकटात सापडलीस तर येऊन तुझं रक्षण करीन, असं म्हणाली होती. '

पाण्यात बुडत असाताना तिच्या मनात चाललेल्या विचारांची पुनरावृत्ती झाली. पण लाख प्रयत्न करूनही तिला डोळे उघडता आले नाहीत.

कुणाच्या तरी बोलण्याच्या आवाज येतो आहे. कोण बरं बोलत असावं ? काय बोलत आहे ? काहीच नीट ऐकू येत नाही. लाटांचा हा कोलाहल थांबेल तर काही ऐकू येईल ना !

" तुमची बायको शुद्धीवर येते आहे. एवढ्यात ती डोळे उघडील."

" हा तर तिचा पुनर्जन्म आहे. तुमच्यामुळं तिचे प्राण वाचले. आता तर तुम्ही तिची जन्मदात्री बनलात ! "

" जर मी सीतेची आई झाल्ये तर तुम्ही माझे जावई झालात नं ? तर जावईबापू, सीता आता शुद्धीवर येते आहे. तिला आपल्या मांडीवर घ्या. आता तिची स्मृती परत येईल, तेव्हा तिला जर दिसलं की ती माझ्या मांडीवर असून

तुम्ही न भिजता तिऱ्हाइतासारखे बघत राहिलात, तर ती तुम्हाला क्षमा करणार नाही. "

" तुम्हाला कळत कसं नाही तारिणीदेवी ? आपल्याकडल्या मुली कमालीच्या क्षमाशील असतात. त्यांची बरोबरी कोणी करू शकत नाही. "

या त्यांच्या गप्पातील सर्व गोष्टी सीतेला नीट समजल्या नाहीत. मात्र पाण्यात उडी घेण्याआधी जे काही घडलं ते तिला आठवलं. आपण पाण्यात पडून धडपडू लागलो तेव्हा तारिणीनंच आपल्याला वाचवलं हे तिच्या लक्षात आलं. आपण तारिणीच्या मांडीवर झोपलो आहोत याची तिला जाणीव झाली. त्या अर्धवट शुद्धीत तिला हेदेखील समजलं की राघवन् जेव्हा क्षमाशीलतेविषयी बोलत होता तेव्हा तारिणीनं सावधपणे आपलं डोकं स्वतःच्या मांडीवरून उचलून राघवन्च्या मांडीवर ठेवलं.

" सीता ऽ ! " अशी हाक मारून राघवन्नं तिच्या मिटलेल्या पापण्यांना हलकेच स्पर्श केला. चटकन् तिनं डोळे उघडले.

" सीता, ओळखलंस मला ? मी कोण आहे सांग पाहू ? हं ! " राघवन्नं विचारलं.

सीता मंद स्वरात बोलली, " न ओळखायला काय झालं ? तुम्ही आहात मिस्टर राघवन्, एम्. ए. ! "

" छान ! आता तुझ्यासमोर कोण बसलं आहे, हे सांग पाहू ?"

" हे काय ? मी का आपल्या आईला ओळखणार नाही ? "

हे ऐकताच राघवन् दचकला ! थोड्या वेळापूर्वी तारिणी व आपण काय बोललो ते हिनं ऐकलं तर नाही ना ? का हिचं डोकं फिरलं ?

चटकन् सीता उठून बसली. ती काय करणार याची दोघांनाही कल्पना येण्यापूर्वी तिनं तारिणीला नमस्कार घातला व तिचा हात हातात धरला...

" तुम्ही माझा प्राण वाचवलात. मला पुनर्जन्म दिलात. या नव्या जीवनात तुम्हीच माझी आई आहात ! " असं बोलता बोलता सीता आनंदानं मोहरून गेली. तिचा आनंद तिच्या अंगप्रत्यंगातून प्रगट होत होता. आपण यमसदनाच्या दारातून परतलो याची तिला पुरेपूर जाणीव होती. आणखी थोडा उशीर झाला असता तर तिचा प्राण गेलाच असता. हा तिचा पुनर्जन्म होता. ती जिवंत आहे हे सत्य आहे. समोरचं निळं सरोवर, हिरवीगार वृक्षराजी, श्वेतवर्णाचे पक्षी या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. ज्या आपल्या सुकोमल अशा लाघवी मुलीला दिल्लीत सासूच्या

स्वाधीन करून ती इथं आली तेसुद्धा सत्य आहे ! ‘ अय्या, हे जग किती आनंदमय आहे ! चिरायू होऊन जगणं किती सुखद आहे ! अशा सु[illegible]मय जीवनाला दुःखपूर्ण करून सोडण्याइतका मोठा मूर्खपणा कोणता असू शकतो ?

सरोवर बघून ती तिघं दिवाणसाहेबांच्या महालात पोचली त्यावेळी दौऱ्यावर गेलेले साहेब परत आले होते. सरोवरात जो अपघात झाला त्यासंबंधी ऐकून दिवाणसाहेब आणि त्यांच्या मुली फारच अस्वस्थ झाल्या. तारिणीनं केलेल्या साहसपूर्ण कृत्याचा त्यांनी गौरव केला. तारिणीनं तर दिवाणांना वश करून घेतलं. इतकं की, तिनं आपल्या मैत्रिणींसह बंगल्यावर यावं नि सर्वांनी दोन दिवस एकत्र राहिल्यावरच जावं, असा त्यांनी आग्रह धरला. त्यांच्या मुलींनी त्यांना दुजोरा दिला. सीतेनंसुद्धा जोराचा पाठिंबा दिला.

म्हणूनच तारिणी आणि निरूपमा दिवाणसाहेबांच्या महालात येऊन राहिल्या. मग काय विचारता ? त्या घरात नुसता कोलाहल माजला ! सीता व तारिणी यांची चांगलीच गट्टी जमली. हे पाहून राघवन्‌ला मनस्वी आनंद झाला. सीतेच्या मनात जे किल्मिष होतं ते पार निघून गेलं.

दिल्लीला जाण्यापूर्वी तारिणी व सीता यांना काही वेळ एकान्तात भेटण्याची संधी मिळाली, तेव्हा तारिणीनं विचारलं, “ सीता, त्या दिवशी मी तुला एक गोष्ट विचारली होती. पण तू काही नीट उत्तर दिलं नव्हतंस. तुझ्या गळ्यात हा जो रत्नहार आहे, त्यासंबंधी आता तरी काही सांगू शकशील ना ? ”

“ ताई ! मी स्वतःच त्यासंबधी बोलणार होत्ये. या शहरी आल्यापासून माझ्या मनाला सारखी त्याची आठवण होते आहे. ”

“ तुझ्या रत्नहाराचा या शहराशी ग काय संबंध ? ”

“ तसा सरळ संबंध काहीच नाही. तरी पण एकापाठोपाठ दुसऱ्याची आठवण येते. माझी कथा ऐकल्यावर कळेल तुला. ”

रत्नहाराची प्राप्ती कशी झाली याची सीतेनं तारिणीला सांगितलेली कहाणी अशी—माझी आई आजारानं अंथरुणाला खिळली होती तेव्हा एका अज्ञात बाईनं येऊन तिला हा रत्नहार व दोन हजार रुपये दिले अन् बजावले की, हे सर्व सीतेच्या लग्नासाठी आहे. परत जाताना ती आपली सुरी विसरली. सुरी न्यायला आली तेव्हा तिनं मला जवळ घेऊन माझं चुंबन घेतले. एवढं सांगून झाल्यावर सीतेनं किट्टावय्यर मामाबरोबर ती आणि तिची आई मुंबईवरून

गावाला जायला निघाल्याच्या दिवशीची घटना निवेदन केली. त्या दिवशी मुंबईच्या स्टेशनात वृत्तपत्रातून वाचलेल्या बातमीनं तिच्या मनात कशा शंकाकुशंका डोकावून गेल्या हे सांगताना ती म्हणाली,

" ताई, मुंबईत रजनीपूरच्या राजाचा खून करण्याचा प्रयत्न ज्या बाईनं केला तिनंच हा रत्नहार मला दिलेला आहे. इथं आल्यावर त्या स्त्रीची वारंवार आठवण का व्हावी, हे कळत नाही. माझ्या सुप्त मनातील आठवणी उकरून काढून त्यांनी त्या घटनेची चर्चा चालवली तेव्हा माझं मन चरकलं. आता यासंबंधी तुला काय वाटतं ? "

" तुझी शंका खरी असू शकते. तरीही या गोष्टीची चर्चा न केलेलीच बरी, असं वाटतं. तू आपल्या पतीजवळ याबद्दल कधी काही बोललीस का ? "

" नाही. मी सांगितलं तरी ते नीट लक्ष देऊन ऐकणार नाहीत. "

" तुझ्या आईनं दिलेल्या या स्त्रीधनाचं तू नीट जतन केले पाह्यजेस. बरं पण तुझ्या आईचं नाव काय होतं ग ? "

तारिणीनं सीतेच्या आईबापाची माहिती काढून घेतली. मग विचारलं " तुझे वडील सध्या कुठं आहेत ? कधी तुला भेटायला येतात का ? "

" वडिलांना भेटून फार दिवस लोटले. आई देवाघरी निघून गेली ! बाबा तरी हयात आहेत की नाहीत, कळत नाही ! देवपट्टणमला माझी मामेबहीण ललिता राहाते. तीच माझी जिवाभावाची मैत्रीण आहे. आता तू एक भेटलीस बाई ! बस ! तुम्हा दोघींना सोडून आता माझं कोणी उरलं नाही. "

काही वेळ गप्प राहिल्यावर तारिणीनं विचारलं, " काय ग सीता, रत्नहार देणारी बाई कोण होती, हे तुझ्या आईनं सांगितलं नाही का ? "

" तिलाही ते ठाऊक नसावं किंवा तिनं मुद्दामच सांगितलं नसावं ! "

" त्या बाईला तू कधी पाहिलं नाहीस का ग ? "

" एकदा बघितलं आहे. "

" कुठं ? अन् केव्हा ? "

सीतेनं उत्तरादाखल सांगितलं की, आमच्या आळीच्या जवळ असलेल्या चौरस्त्यावर मी एकदा हातात सुरी घेतलेली तिला बघितली.

" असं ? मी तर कित्येक दिवसांपासून तिचा शोध घेते आहे. पण ती काही मला दिसली नाही. "

" असं होय ? पण काय ग ताई, तू तिला का शोधते आहेस ? तू तिला ओळखतेस का ? "

" हो नं ! "

" कशी काय ? "

" ती माझी आई आहे ! "

सीता आश्चर्यचकित झाली. तिनं तारिणीकडे टक लावून पाहिलं. म्हणाली, " आता आलं लक्षात ! तुझा चेहरा कुठे तरी बघितल्यासारखा वाटला होता. त्याचं रहस्य आता कळलं ! "

" तुझा गैरसमज झाला आहे. अगं, ती माझी जन्मदात्री नव्हे. तिनं माझं लालनपालन केलं. माझे खरे आई-बाप कोण, हे मला अजून कळलेलं नाही. याची विचारपूस करावी म्हणून तर मी रझियाला शोधते आहे. "

" रझिया बेगम नाव आहे होय तिचं ? म्हणजे मुसलमान आहे होय ?"

" होय ग बाई ! माझी दाई एक मुसलमान स्त्रीच होती. चार वर्षांपूर्वी मी भूकंपपिडितांच्या मदतीसाठी बिहारात गेले होते. त्याच सुमारास रजनीपूरच्या राजाच्या खुनाच्या प्रयत्नात ती पकडली गेली. नंतर दोन वर्षं कैदेत राहिली. जेलमधून सुटल्यावर तिचा मी खूप शोध केला. पण ती भेटली नाही. मी मोठी दुर्दैवी आहे ग सीता ! "

हे ऐकून सीतेच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. कंठ दाटून आला. जड आवाजात ती बोलली, " ताई, पुन्हा कधी ती स्त्री माझ्या पाहाण्यात आली तर तुला कळवीन ! "

" तुला भेटली तर सांग, तिला भेटायची मला फार इच्छा आहे. ती भेटू इच्छीत नसली तर जीव देण्याचा मी निश्चिय केला आहे. "

" ताई, असं अभद्र बोलू नकोस ! मला आयुष्यात केवळ तुझाच आधार आहे बरं ! "— सीता उद्गारली.

19

प्रिय सीताताई,

तुझं प्रेमळ पत्र पोचलं. तुम्ही आग्र्याला जाऊन ताजमहाल बघितलात, नक्षीकाम पाह्यलंत, त्याचं जे विस्तृत वर्णन तू केलंस ते वाचून अत्यंत आनंद झाला. पत्र वाचताना तर असं वाटलं की, तुमच्यासोबत मीदेखील सारं काही बघते आहे. पत्राबद्दल अनेक धन्यवाद ! इथे यांच्याजवळ तुम्ही ताजमहाल बघून आल्याच्या गोष्टी काढून विचारलं, आपणही आग्र्याला जायचं का ? तर नेहमी-प्रमाणे माझ्या गोष्टींची उपेक्षा करून म्हणायचं झालं, आपल्या तामीळनाडू भागात प्रेक्षणीय स्थळं काय कमी आहेत ? आपण तंजावरचं बृहदीश्वर मंदिर कुठं बघितलंय ? माल्लपूरमची शिल्पकला कुठं पाह्यलीय ? मग ताजमहाल बघितला नाही तर कोणतं नुकसान होणार आहे ? यांच्यापुढे हे बोलण्याची दुर्बुद्धी तरी कशी झाली, असं मला होऊन गेलं ! आमच्या ह्या गोष्टी ऐकून सासूबाईंनी घर डोक्यावर घेतलं. ' लोक काशी-रामेश्वराला जाण्यासाठी आसुसतात. त्यामुळे निदान मोक्षाचा मार्ग तरी मोकळा होण्याची शक्यता असते ! पण यवन राजांनी बांधलेल्या कबरी पाहण्याचे डोहाळे लागले तर काय बोलायचं ! आजकालच्या पोरींची अक्कल कुठं चरायला जाते हेच मेलं कळत नाही ! '

आमच्या घरासमोर दामोदरम् पिल्ले नावाचे गृहस्थ राहातात. तेसुद्धा वकील आहेत. माझे मामंजी आणि ते कधीकाळी जिवलग मित्र होते. त्यांचे चिरंजीव अमरनाथ आणि हे यांची तशीच मैत्री आहे. आपला सूर्या इथे शिकायला होता तेव्हा तिघं बरोबर असायचे.

दोन वर्षांपूर्वी अमरनाथचा विवाह झाला. त्याची बायको तिरुनेळवेली जिल्ह्यातली. खूप शिकलेली आहे. शिवाय वडील डेप्युटी कलेक्टर. पण तिला शिक्षणाचा गर्व कसा तो नाहीच ! तिच्या लग्नातच आमची ओळख झाली. एक वर्षापूर्वी ती इथे आली. आमची चांगलीच गट्टी जमली. आमच्या दोघींच्या यजमानांना याचा फार आनंद वाटला.

पण सीता, ह्या सर्व गोष्टी आता इतिहासजमा झाल्यात बरं का ! त्यामागचं कारण माहीत आहे ? मी माहेरी असताना इथे नगरपालिकेची निवड झाली. समोरचे दामोदरम् पिल्ले निवडणुकीसाठी उभे होते. आमच्या मामंजींचे दुसरे एक मित्र राजाराम अय्यर हेसुद्धा उमेदवार होते. मामंजींनी त्यांच्या बाजूनं प्रचार केला. एका प्रचारसभेत मामंजींनी पिल्ले वकिलांना इंग्रजांचा हस्तक म्हटलं. अन् उत्तरादाखल पिल्ले म्हणाले, ब्राह्मणाच्या बुद्धीचं दिवाळं निघालं ! मग काय पाह्यचं ! हे वितुष्ट इतकं विकोपाला गेलं की, आपसांतील जाणं-येणं-बोलणं अजिबात बंद पडलं. आणि इथे मला जी एक मैत्रीण मिळाली होती ती मी गमावून बसल्ये. समोरच्या घरी जाऊन चार गप्पा करण्याची चोरी होऊन बसली. आता तर माझ्यासाठी हे घर म्हणजे निव्वळ तुरुंग बनलं आहे !

माझं हे असं तर सूर्याचं तसं ! त्याचा विचार मनात आला म्हणजे मन विषण्ण होऊन जातं. घरावर तुळशीपत्र ठेवून गावाला रामराम ठोकला अन् दिल्लीत जाऊन बसला. कुठं राहातो, काय खातोपितो, कुणास ठाऊक ! नुकतंच त्याचं एक पत्र आलं आहे. तुझ्याजवळ काही पैसे असतील तर पाठव असं त्यानं लिहिलंय. नसतील तर ह्यांच्याकडून मागून घेऊन पाठव म्हणतो. त्याच्या घरच्या मंडळींकडून त्याला पैसे नको आहेत. बाबांनी पाठवले तर तसेच परत पाठवीन [illegible]ही लिहिलंय. असा मुलगा तू कुठं पाह्यलास का ? निदान माझ्यासाठी तरी त्या[illegible]डे लक्ष असू दे.

चि. वासंती हसत-बागडत रात्रीचा दिवस करून मोठी होत असावी अशी आशा करत्ये.

तुझी
ललिता

पत्र वाचून संपताच सीतेनं घड्याळाकडे पाहिलं. रात्रीचे साडेआठ वाजून गेले होते. ' अजून हे का बरं आले नसतील ? पोरीला घेऊन इथं मला एकटीनं वेळ काढावा लागतो हे ठाऊक असूनही त्यांनी का बरं एवढा उशीर केला ? '

नव्या दिल्लीतील त्या बंगल्यात सध्या राघवन्, सीता व वासंती अशी तिघंच राहात होती. सोबतीला कुणी नव्हतं.

जून महिन्याच्या सुरुवातीला दिल्लीचं उष्णतामान एकशे दहा अंशावर गेलं होतं. दिवसा घराबाहेर पडलं तर चुन्याच्या भट्टीत पडल्यासारखं वाटायचं.

रात्री तापलेल्या भिंतीची आच असह्य व्हायची. दिवस असो की रात्र, उष्ण वाऱ्याच्या झळींनी जीव बेजार व्हायचा.

भारतावर राज्य करणारे व्हाइसरॉय आणि त्यांचे सहाय्यक उष्णतेपासून बचावण्यासाठी केव्हाच सिमल्याला निघून गेले होते.

सुंदर राघवन् आणि सीता हीसुद्धा सिमल्यास जाणार होती. कामाक्षी अम्मा तयार नव्हत्या. पर्वतावरील थंड हवामान आपल्याला मानवत नाही असं त्यांचं म्हणणं होतं. अचानक गावावरून पत्र आलं. त्यांच्या पुतणीचं लग्न ठरलं होतं. लग्नासाठी त्या निघून गेल्या. महिन्यानं परत येईन असं जाताना सांगून गेल्या.

तरीही काही महत्त्वाचं काम निघाल्यामुळे राघवन् सिमल्यास जाऊ शकला नाही. मात्र सीतेला त्यानं म्हटलं, " तुझी इच्छा असली तर वासंतीला घेऊन सिमल्यास जाऊन ये. किती तरी बायका एकटया जातात. भिण्यासारखं काही नाही. "

पण सीतेनं स्पष्ट नकार दिला. " तुम्ही जात नाही तर मी कशाला जाऊ ? तुमच्याशिवाय तिथली चैन मला नकोशी होईल ! "

त्या दिवशी तर मोलकरीणसुद्धा कामावर आली नव्हती. त्यामुळे मुलीला घेऊन सीता संध्याकाळची एकटीच घरात बसली होती. 'बाबा कधी येतील ग ? 'असं विचारीत वासंती आठ वाजेपर्यंत जागी होती. ती झोपी गेल्यानंतर एकटीला घर खायला लागलं.

'काही झालं तरी आज सूर्याचा शोध करून संध्याकाळी त्याला घरी घेऊन येतोच–' असं सांगून राघवन् कचेरीत गेला होता. म्हणून तर त्याला उशीर झाला नसेल ?

ललितेच्या पत्राचं उत्तर लिहायला बसलं म्हणजे हे एकाकीपण कसं तरी शेवटास जाईल, असं सीतेला वाटलं. तसं पाहिलं तर ललितेखरीज सीतेचं जवळचं होतंच कोण ? म्हणून तिनं पत्र लिहायला घेतलं :

प्रिय ललिता,

तुझं विस्तृत पत्र वाचून कमालीचा आनंद झाला. देवपट्टणम् येथील निवडणुकीची कथा ऐकून चांगलीच करमणूक झाली. पण या निवडणुकीमुळे तुला एका मैत्रिणीला मुकावं लागलं हे वाचून दुःख झाले.

तीन आठवडयांपूर्वी मी यांच्यासमवेत व्हाइसरॉयच्या महालात झालेल्या गार्डन पार्टीला गेले होत्ये. अहाहा ! त्या पार्टीबद्दल काय लिहू आणि कसं

लिहू ! त्या पुष्पोद्यानाचं सौंदर्य कसं वर्णन करू ! त्या बागेतील फुलांनी बहरलेली चित्रविचित्र फुलझाडे आणि तेवढेच विचित्र वृक्ष याबद्दल काय लिहावं ! त्यांच्या आडून प्रकाशाचा लपंडाव खेळणाऱ्या विद्युद्दीपांची शोभा शब्दांनी कशी सांगू !

तिथं जी बडी बडी मंडळी बायकांसह आली होती त्यांचं सौंदर्य-प्रसाधन, रंगरूप, कपडेलत्ते, दागदागिने यांच्या विलक्षण विविधतेचा उल्लेख कोणत्या शब्दात करू ? ललिता, अग गोऱ्या मडमा तर चकचकीत काळे पोशाख घालून आल्या होत्या. देशी स्त्रिया रंगीबेरंगी साड्या नेसून आल्या होत्या. प्रत्येकीची साडी कशी नमुनेदार होती ! त्यांनी जे अलंकार घातले होते तेसुद्धा वेगवेगळ्या घाटाचे. जिकडे बघावं तिकडे कसा लखलखाट. माझ्या आश्चर्याला पारावार नव्हता. मला तर दृष्टिभ्रम झाल्यासारखं वाटलं. त्या पार्टीला रजनीपूरच्या दिवाणांच्या धामा व भामा या दोन मुलीसुद्धा आल्या होत्या. आलेल्या निमंत्रितांपैकी बऱ्याच लोकांशी त्यांची चांगलीच ओळख दिसली. त्यांनी माझादेखील त्यांच्याशी परिचय करून दिला. गोऱ्या मडमांचं व पुरुषांचं एक वैशिष्टच असं, की परिचय करून दिला म्हणजे ' हाऊ डू यू डू ? ' (तुमचं कसं आहे ?) असं विचारून कुशल चिंतितात. ' इंग्रज असे आहेत, तसे आहेत' अशी टीका करून उपयोग नाही ललिता. आपल्याला त्यांच्याकडून शिकण्यासारखं कितीतरी आहे !

देवपट्टणमच्या निवडणुकीबद्दल तू लिहिलं होतंस. इंग्रजांच्या देशातदेखील निवडणुकी होतात. पण निकाल जाहीर होताच सर्वांत आधी हरलेला माणूस यशस्वी झालेल्याचं अभिनंदन करतो. त्याला मान देतो. आपल्या देशात तर विरुद्ध बाजूची जीत झाली तर जन्माचं वैर होतं. हा मूर्खपणा नव्हे तर आणखी काय ? ...

अचानक नळाचा आवाज आला म्हणून सीतेनं पत्रलेखन थांबवलं. धारेचा आवाज स्नानगृहातून येत होता. सीतेचं तर धाबंच दणाणलं ! तिचे पाय जमिनीला खिळले ! ती पुतळ्यासारखी निःशब्द उभी राहिली ! ' आपली नजर चुकवून कुणीतरी आत घुसून मागच्या मोरीत गेलेलं दिसतंय् ! नाहीतर पाण्याचा नळ कसा उघडला असता ? पण आता येणारा कोण बरं असेल ?.'...

तिच्या मनाला जी शंका चाटून गेली, भीती वाटली ती दूर करण्यासाठी तिनं ठरवलं की, आत कोणीही असो, जाऊन पाहूनच यावं. लटलटते पाय फरफटत

ती स्नानगृहापाशी आली. दार आंतून बंद होतं. सीतेने ते हळूच ठोकलं. आतला नळ बंद झाला. सीतेनं धाडस करून विचारलं–" आत कोण आहे ? "

स्नानगृहात पावलाची चाहूल ऐकू आली. एकेका पावलाबरोबर सीतेच्या हृदयाची धडधड वाढू लागली. ... एक, दोन, तीन, चार, पाच. दार उघडलं... उघडया दारात एक बाई उभी होती. तिच्या हातात तीक्ष्ण धारेची सुरी होती...

" सीता, तू मला ओळखलंस ना ? "

" होय ! " मोठया कष्टानं सीतेच्या तोंडून शब्द बाहेर पडला.

" सांग तर, मी कोण आहे ? "

सीतेने आपल्या गळयातला रत्नहार दाखवून म्हटलं,

" तुम्ही आहात हा देणाऱ्या. "

" शाबास ! तू फार चांगली मुलगी आहेस ! तुझ्या स्मरणशक्तीचं मी कौतुक करत्ये. सध्या घरात तू एकटीच आहेस की सोबतीला कोणी आहे ? " त्या बाईने प्रश्न केला.

तिचा प्रश्न सीतेला नीट ऐकू आला नाही. कारण तिचं लक्ष एका वस्तूनं वेधून घेतलं. त्या बाईच्या कमरेला एक पांढरा रुमाल खोचलेला होता अन् त्याचा अर्धा भाग रक्तानं माखलेला होता. तो पाहून सीता भांबावली ! मनाचा तोल जाऊन ती किंचाळली, " हाय रे देवा ! खून ! खून ! ! "

मग ती एकदम ओक्साबोक्शी रडू लागली !

रझिया बेगम दोन पावलं चालून सीतेच्या जवळ गेली. तिचा खांदा धरून हिसडला. तिच्याकडे डोळे वटारून पाहिलं अन् म्हटलं, " सीता ! तुला मी हुशार समजल्ये. पण तूदेखील इतर बायकांसारखी मूर्खच दिसतेस. तू अशी रडू-ओरडू लागलीस तर मी काय करीन, असं तुला वाटतं ? नुकतीच मी रस्त्यातल्या एका पिसाळलेल्या कुत्र्याची या सुरीनं शिकार केली आहे. तीच तुझी गत करीन हे लक्षात ठेव ! खबरदार ! "

एकदम सीतेचं रडणंच नव्हे तर हुंदके देणंही थांबलं.

" मला वाटतं, तुला रक्ताचं भय वाटतं. थोडीशी थांब ! रुमाल नळाच्या पाण्यानं धुऊनच टाकत्ये. "

असं बोलून ती नळाजवळ गेली. नळ उघडून रुमाल धुऊ लागली. पण रुमाल कितीही धुतला तरी त्यावरचा रक्ताचा डाग जाईचना. ' हा जाळायला पाहिजे. ' असं म्हणत रुमाल एका कोपऱ्यात फेकून ती परत सीतेजवळ आली.

एवढ्या वेळात सीतेच्या मनानं ठाव सोडला. विचारांनी गर्दी केली. ' ही बया म्हणते की तिनं एका पिसाट कुत्र्याला ठार केलं. पण हे खरं असेल का ? की ही मला बनवू पाहते ? . . .भोवताली इतकी घरं असताना ही मेली याच घरात कशी शिरली ? केवळ योगायोगानं, का मी इथं राहत्ये म्हणून ? . . . नेमके याच घटकेला ते घरी आले तर ? नकोच ! हे येण्याआधीच गोडगोड बोलून हिला घराबाहेर घालवली पाहिजे. नाहीतर काय होईल हे देवच जाणे ! हे भगवान ! ही बया माझ्या घरात शिरलीच कशाला ? दुसरीकडे का नाही जाऊन मेली ? ... '

ती बाई सीतेजवळ येऊन उभी राहिली. तिची चौकस नजर चौफेर भिरभिरली. स्नानगृहाच्या अगदी समोर एक बंद खोली होती. तिकडे निर्देश करून तिनं विचारलं, " या खोलीत काय आहे ? "

" लाकडं, कोळसे अन् अडगळीच्या वस्तू आहेत. "

तिनं ती खोली उघडून पाहिली अन् म्हटलं, " ठीक आहे. आजची रात्र मी इथंच काढीन. मात्र हे या कानाचं त्या कानाला कळायला नको हं ! दाराला बाहेरून कुलूप लावून घे. "

" या खोलीत तुम्हाला लवंडता तरी येईल का ? खोलीत हवा तर शिरत नाहीच पण सामानही अस्ताव्यस्त पडलेलं आहे. "

" काही हरकत नाही सीता ! मी यापेक्षा वाईट जागेत काळ काढला आहे."

हे ऐकून सीतेचं मन द्रवलं. त्या स्त्रीच्या जीवनाबद्दल तिनं जे अनुमान केलं होतं त्याचं तिला स्मरण झालं. ' हिनं खात्रीनं आयुष्यात खूप कष्ट सहन केले असावेत. निश्चितच रजनीपूरच्या राजामुळे हिच्या वाट्याला दुर्दशा आलेली असावी. पण त्या हालअपेष्टांचं स्वरूप तरी काय असावं ? ' हे सारं त्या बाईला विचारून घेण्याची इच्छा सीतेच्या मनात उफाळून आली. पण चौकशी करण्यासाठी ती योग्य वेळ नव्हती. कारण राघवन् कोणत्याही क्षणी इथं येऊन उभा राहील नि वेडी समजून तिला घराबाहेर घालवून देईल, ही भीती तिला वाटत होती.

" थांबा. मी पटकन् बिछाना व उशी घेऊन यत्ये. " असं म्हणत सीता आत गेली अन् बिछाना घेऊन आली. बऱ्याच वेळापासून तिचं मन सांगत होतं. 'तुला एका महत्त्वाच्या गोष्टीचा विसर पडतो आहे. तुला स्मरण असायला हवं... कोणती बरं गोष्ट ? आत्ता आठवलं. ह्या स्त्रीचा पत्ता कळवण्याची तारिणीनं विनंती केली होती.' खात्री करून घेण्यासाठी सीतेनं म्हटलं, " तुम्हाला एक गोष्ट विचारू ? "

" विचार ! पण लवकर. मी फार थकल्ये आहे ! "

" तुमचं नाव काय ? "

" नावाशी तुला काय करायचं आहे ? "

" तुम्ही न सांगितलंत तरी मला माहीत आहे. "

" माहीत आहे तर सांग पाहू ? "

" रझिया बेगम. "

आपलं नाव ऐकून रझियाला आश्चर्य तर वाटलंच पण संतापही आला. सीतेकडे क्रुद्ध दृष्टीनं पाहात ती बोलली, " अं अं नाही, नाही. मला दोन नावं आहेत. माझं खरं नाव रमामणी. एका महत्त्वाच्या कार्यासाठी मी आपलं हे नाव बदलून रझिया बेगम असं सांगू लागल्ये. पण तुला कोणी सांगितलं असेल बरं...? तो मेला मूर्ख ब्राह्मणच असला पाह्यजे. "

ती कुणाला मूर्ख ब्राह्मण म्हणाली हे सीतेला कळलं नाही. तिच्या तोंडून अभावितपणे निघून गेलं, " दुसऱ्या कोणी नव्हे. तुमच्या मुलीनं, तारिणीनंच मला सांगितलंय्. "

सीतेच्या अपेक्षेनुरूप ती बाई एकदम दचकली. क्षणभर तिनं सीतेकडे रोखून पाहिलं अन् म्हणाली, " हे तू खरं सांगत्ये आहेस का ? तारिणीनं तुला माझं नाव सांगितलं होय ? ती तुला कुठं भेटली ? कधी भेटली ? "

" काही दिवसांपूर्वी आम्ही आग्र्याला गेलो होतो. तिथं ती भेटली. "

" बरं ! पुढं काय झालं ? "

" आग्र्यावरून आम्ही रजनीपूरला गेलो... "

रजनीपूरचं नाव ऐकून तिच्या मनाची काहीच का चलबिचल नसेल झाली ? नाही ?... तिचा चेहरा एखाद्या लाकडी बाहुलीसारखा निर्विकार होता !

सीता पुढं सांगू लागली, " रजनीपूरला आमचं चांगलंच सूत जमलं. आपसांत आम्ही खूप बोललो. असंच बोलण्याच्या ओघात मी तारिणीला तिच्या आई-वडिलांबद्दल विचारलं. तेव्हा तिनंच म्हटलं होतं की, तुम्ही तिच्या पालनकर्त्या माता आहात. त्यावरून आता अनुमानानं तुम्हीच त्या असं ओळखलं. "

" म्हणजे तारिणी नि तू जिवलग मैत्रिणी आहात, असंच ना ? " रमामणी ऊर्फ रझिया बेगमेनं विचारलं.

" हं ! मैत्री तरी कशी झाली म्हणता ? होडीतून मी पाण्यात पडल्ये होते. तारिणीनं झटकन् पाण्यात उडी घेतली. आपला जीव धोक्यात घालून माझा जीव वाचवलान् तिनं. "

" शाबास पोरी ! माझं नाव राखलंस ! " रझिया बेगमचा आनंद अगदी गगनात मावेना !

" तुमचं मुलीवर एवढं प्राणापलीकडे प्रेम आहे तर इतक्या वर्षांत का भेटला नाहीत तिला ? तुम्ही भेटलांत, दिसलात तर कळवण्यासाठी तारिणीनं मला बजावून ठेवलं आहे. "

एवढं ऐकलं मात्र, रझियानं हातातला बिचाना खाली आदळला अन् दरडावून म्हटलं, " आधी आपला हात माझ्या हातावर ठेव पाहू ? पटकन् ठेव. "

सीतेनं तिच्या आज्ञेचं पालन केलं.

' आज रात्री मी इथं आल्याचं तुझ्या नवऱ्याला किंवा तारिणीला कळायला नको. माझ्या नावाचा उल्लेख व्हायला नको. कळलं ? माझ्या हातावर हात ठेवून शपथ घे. नाहीतर त्या पिसाट कुत्र्यासारखं तुला इथंच ठार करीन. " असं बोलून रझिया बेगमेनं कमरेची सुरी काढून तिच्यावर उगारली.

सीता खूपच भ्याली. तिनं सांगण्याप्रमाणे शपथ घेतली.

त्याच क्षणी मोटारीचा भोंगा ऐकू आला. तिच्या घरच्या मोटारीचा भोंगा होता तो !

" हे आलेत. तुम्ही चटकन् आत व्हा बरं! "

" लक्षात ठेव ! चुकून सुद्धा माझं नाव उच्चारायचं नाही ! "

सीतेनं त्या अडगळीच्या खोलीचं दार बंद करून बाहेरून कुलूप ठोकलं. मग समोरचा दरवाजा उघडण्यासाठी ती घाईनं चालू लागली.....

20

सीतेनं दरवाजा उघडला. बाहेर तिला आश्चर्यानं थक्क करून सोडणारं भयानक दृश्य दिसलं!

फाटकाजवळ तिच्या घरची मोटार उभी होती. समोरच्या सीटवर तीन व्यक्ती बसल्या होत्या. त्या एकामागोमाग खाली उतरल्या.....त्या तीन व्यक्ती म्हणजेच राघवन्, तारिणी आणि सूर्या. ती तिघे उतरताच सीतेचं लक्ष मागच्या सीटकडे गेलं. तिथं लांबोळचा आकाराचं एक गाठोडं पडलेलं होतं. ते गाठोडंच होतं की आणखी काही.....!

सीता आधीच भेदारलेली होती. आता तर ती इतकी भ्याली की, तिचं सारं शरीर थरथर कापू लागलं!.....

मग एकाएकी तिला गृहिणीच्या कर्तव्याची जाणीव झाली. आलेल्या पाहुण्यांचं स्वागत करायला हवं. ते सर्व फाटकातून दाराकडे येत होते. रस्त्या-वरील दिव्याच्या अंधुक उजेडात सीतेला त्यांचे चेहरे गंभीर दिसले. ' हे लोक असे का बरं दिसताहेत ? यांना झालं आहे तरी काय ? यांचं काही गमावलंय का ? यांच्या चेहऱ्यावर विषण्णता का ?.....'

" अशी रस्ता अडवून दारात का उभी राहचलीस ? बाजूला सरकून रस्ता सोड ना ! " राघवन् सर्वांच्या आधी आला. त्यानं सीतेला दटावलं. आताचा त्याचा आवाज सीतेला नेहमीपेक्षा वेगळाच वाटला. त्याच्या बोलण्यात स्वाभाविक संताप नसून तिरस्कार होता. अस्वस्थता होती.

" असे वस्कन् अंगावर का येता ? "

सीता बाजूला सरली. त्याच्या मागून तारिणी आली. तिच्या स्वागतार्थ सीता काही बोलणार होती. पण तिचा ओढल्यासारखा चेहरा पाहून ती गप्प बसली. तारिणी मुकाटचानं तिला ओलांडून आत निघून गेली. सर्वांच्या मागे सूर्या होता. त्याला तिनं विचारलं, काय रे भाऊ, काय भानगड आहे ? तुम्ही

कुठून येताहात ? एखादा खून करून आल्यासारखे सर्वांचे चेहरे भयंकर व भयभीत का दिसताहेत? "

'खून' हा शब्द ऐकताच सूर्या दचकला. त्यानं सीतेला आपादमस्तक न्याहाळलं. मग दबलेल्या आवाजात म्हणाला, " जे होऊ नये ते झालं आहे ताई. आधी आत चल पाहू ! "

सीता आणि सूर्या आत आली तेव्हा राघवन् फोनजवळ उभा होता. त्याच्या हातात रिसीव्हर होता. तारिणी सोफ्यावर बसलेली होती. सीता तिच्याशी काही बोलण्याच्या विचारात असतानाच राघवन् म्हणाला,

" सीता, वासंती काय करते आहे ग ? झोपली का ती ? "

अगदी याच वेळी आतून वासंतीची हाक आली, 'बा ऽ बा ! '

" आतापर्यंत पोरगी चांगली झोपली होती. तुमचा आवाज ऐकून उठलेली दिसते झोपेतसुद्धा तिला आपल्या बाबांची आठवण असते ! "

" बरं, बरं ! आपली अन् पोरीची बढाई पुन्हा कधी ऐकवा ! आधी आत जाऊन तिला झोपवून ये. तिला म्हणावं, बाबा येताहेत. चल जा चटकन् आत जा ! "

राघवन्च्या त्रासिक स्वरावरून काही तरी भानगड असल्याचं सीतेनं ताडलं.....

" आई, बाबा आले का ग ? "—वासंतीनं विचारलं.

" आले आहेत बरं बाळ ! येतील अन् तुझ्याजवळच झोपतील. आता झोपायचं ना ?" सीतेनं वासंतीला थोपटलं.

" बाबा रागावले नाही नं ? "

वासंतीचा तो प्रश्न ऐकून, या साऱ्या विवंचनेत असूनही सीतेला हसू आलं. तिनं म्हटलं, " छे ग ! ते तुझ्यावर मुळीच रागावले नाहीत हं ! त्यांना कोणी भेटायला आले आहेत. त्यांच्याशी बोलत बसले आहेत. माझी छकुली आता झोपते. झोप बेटा ! "

तिकडे राघवन् टेलिफोनवर बोलत होता, " हॅलो ! पुलिस स्टेशन ? कोण बोलतंय ? मी पी. एल. एस. राघवन् बोलतोय्. हं ! इथं एक अपघात झालाय्. नाही, नाही! कारचा नव्हे. खून वाटतो. यस, मर्डर! ताबडतोब कुणाला तरी पाठवा....ठीक! थँक्स ! "

" ताई, झालं तरी काय ? हे पोलिसांना का बरं बोलावताहेत ? " सीता दबलेल्या आवाजात तारिणीला विचारत होती.

तरीसुद्धा तारिणीनं काहीच उत्तर दिलं नाही. ती कसल्यातरी भ्रमात असावी.

एवढ्यात राघवन् सूर्याला म्हणाला, " चल सूर्या, आपण फाटकात उभे राहू. पोलिस निघाले असतील. "

दोघंही बाहेर पडताच सीता तारिणीजवळ जाऊन म्हणाली, " ताई, ही भानगड तरी काय आहे ? हे फोनवरून काहीतरी भयंकर बोलत होते ! कुठं काय घडलं आहे ?"

" एक भयंकर गोष्ट घडली आहे ! "

" कसली भकयंर गोष्ट ? बोल लवकर. "

" हे सारं तू कशाला विचारतेस ? माझ्या विचारानं ते तुला न कळलेलंच बरं. तुला कळून तरी काय होणार आहे ? "

" तूसुद्धा त्यांच्यासारखंच बोलतेस ताई. ही गोष्ट मला का बरं कळू नये ? तुम्ही अशी लपवाछपवी चालवलीत की माझं मन डगमगू लागतं ग! "

" तुझंही बरोबर आहे बाई. तुला ते सारं कळायलाच पाहिजे. माझ्या न सांगण्यानं का गोष्टी लपून राहणार आहेत ? मी नाही बोलले तरी दुसरं कुणी सांगेल. पण खरं म्हणजे ते सांगण्याची मला भिसारी वाटते. म्हणून मी घोटाळते.....आम्ही तिघं कारमधून येत होतो. मुख्य रस्त्यावरून तुमच्या घरी यायला जिथं रस्ता वळण घेतो व वेगळा रस्ता लागतो ना, तिथं....." बोलत बोलत तारिणी एकदम थाबली. तिचं शरीर थरथर कापू लागलं.

" हे काय ताई ? अगं, मी तर तुला निर्भय समजत होत्ये. अन् तूच अशी ग कशी भितेस ? "—सीतेनं विचारलं.

त्यानंतर तारिणीनं अडखळत जी हकीकत सांगितली ती अशी: ते तिघं मोटारनं येत होते. घराकडे येणाऱ्या रस्त्यावर राघवन्नं गाडी वळवली अन् एकदम गाडीचे ब्रेक दाबून गाडी थांबली. तारिणी व सूर्या या दोघांनी एकाच स्वरात विचारलं, ' काय हो, काय झालं ?' काहीच उत्तर न देता राघवन् मोटारच्या खाली उतरला. ते पाहून दोघंही खाली उतरले. सडकेच्या मधोमध ऐन मोटारच्या रस्त्यात काही तरी पडलं होतं. जरा जवळ जाऊन पाहाताच

कुणीतरी माणूस पडलेला असल्याचं लक्षात आलं.

" लेकाचा झोकून नशेत पडलेला दिसतो. सैतान नाही तर-" राघवन् चिडून म्हणाला.

" गाडीशी टक्कर होऊन पडला तर असेल... !" सुलीनं हळूच विचारलं.

" नॉन्सेन्स ! गाडीची ठोकर-बिकर लागलेली नाही ! " राघवन् जोर देऊन बोलला.

" ठीक आहे. गाडीची ठोकर नसेलही लागली. पण खाली पडलेल्या त्या माणसाच्या अंगावर गाडी गेली नसेल कशावरून ? म्हणून जरा जवळ जाऊन बघू या तरी –" सूर्यानं युक्तिवाद केला.

" हं. पाहूनच घेऊ या. " तारिणीनं दुजोरा दिला.

" गुपचूप गाडी वळवून घेऊन जाऊ या. बसा पाहू गाडीत ?"

सूर्या अन् तारिणीनं त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलं. ती पुढं झाली आणि पडलेल्या व्यक्तीच्या जवळ जाऊन पाहू लागली.

पोशाखावरून तरी तो प्रतिष्ठित माणूस वाटला. सूर्यानं त्याच्या नाकावर बोट ठेवून पाह्यलं अन् म्हटलं, " श्वास चालू आहे. माणूस जिवंत आहे ! "

गाडीचं पुढलं चाक त्या माणसाच्या शरीराला चिकटून उभं असल्याचं तारिणीला दिसून आलं

" गाडीत बसा बरं आपण जाऊ या. " राघवन् म्हणाला.

" वा ऽ साहेब! खूप बोलला! रस्त्यात टक्कर देऊन एका माणसाचा मुडदा पाडलात अन् वरून गुपचुप निघून चला म्हणता ? नाही, नाही ! आधी याला इस्पितळात पोचवायला पाह्यजे. " तारिणी बोलली.

सूर्यानं तिच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

" तर मग आपण परोपकारी लोकांनी त्याला उचलून गाडीत टाकावं. आपण मुळीच हात लावणार नाही. " राघवन्नं स्पष्टपणे सांगून टाकलं.

" बरं तर ! मी स्वतः उचलून आणत्ये. " असं बोलून तारिणी पडलेल्या माणसाच्या डोक्याकडून उचलू लागली. सूर्यानं कमरेजवळ पकडलं. तारिणीनं मानेखाली हात घातला. तो ओला झाला. जमिनीवरून डोकं उचलताच खाली रक्ताचं थारोळं साचलेलं दिसलं. तरीही तारिणी भ्याली नाही. तिनं आपल्या थरथरत्या हाताची पकड सोडली नाही. दोघांनी उचलून तो देह मागच्या सीटवर झोपवून दिला.

" झालं ना आता तुमच्या मानसारखं ? मग बसा पाहू आत ?"

दोघंही पटकन् समोरच्या सीटवर बसले.

कार सुरू करीत राघवन् म्हणाला, " तुम्ही दोघं महामूर्ख आहात ! तुमच्या शोधात आलो हीच मोठी चूक झाली ! "

" खरंच चूक झाली. आमचा शोध करीत फिरायला कोणी सांगितलं होतं तुम्हाला ? " तारिणीनं विचारलं.

" हं ! माझ्या चुकीचं फळही अगदी हातोहात मिळालं ! तुम्ही दोघांनी मला खुनाच्या खटल्यात गोवलंत. खरं तर माझ्या गाडीचा धक्कासुद्धा लागला नाही त्याला. गाडीची ठोकर लागली असती तर रक्ताचं थारोळं साचलं नसतं. कोणीतरी त्याच्या मानेवर सुरा फिरवून पळून गेला. अन् तुम्ही मला फुकट या लफड्यात गोवलंत. मलाच नव्हे तर स्वतःलाही त्यात गुरफटून घेतलंत ! "

" अहो साहेब, तुम्ही म्हणता हे खरं असलं तर आपल्याला कसलं भय आहे ? कर नाही त्याला डर का ? आपल्यावर खुनाचा आरोप येईल कसा ?"

" तो आरोप यावा असं का तुला वाटतं ? खुनाच्या खटल्यात साक्षीदार बनणं हेसुद्धा बदनामीसाठी पुरे आहे. वृत्तपत्रातून आपल्या नावाचा डांगोरा पिटला जाईल ना ? " राघवन् बडबडत राहिला.

" जे व्हायचं ते होऊन गेलं ! आता पुढं काय याचा विचार करा. "

" माझी विचारशक्ती तर संपली. आता तुम्हीच सल्ला द्या. बोला, गाडी कुठं न्यायची ? "

" सरळ इस्पितळात चला. नाहीतर पोलीस चौकीवर जाता येईल. " सूर्या बोलला.

" ठीक आहे ! पण दोन्ही ठिकाणी एकदम जाणं शक्य नाही. तेव्हा आधी कुठं जायचं ते सांगा. " राघवन् म्हणाला.

दोघांनाही काहीच निर्णय घेता आला नाही. म्हणून ते गप्प बसले.

" माझे तर हात लटलटताहेत. गाडी चालवू लागलो तर एखाद्या झाडावर जाऊन आदळायची ! म्हणून मी आधी गाडी घरी नेतो. तेथून फोनवर बोलून घेता येईल. "

गाडी घरी नेऊ नका असं तारिणीला म्हणायचं होतं. पण त्यापूर्वीच गाडी राघवन्च्या घरापुढं येऊन उभी राहिली.

सीता भीतियुक्त उत्सुकतेनं ह्या साऱ्या गोष्टी ऐकत होती. ती कापऱ्या आवाजात बोलली, " असा कसा अनर्थ घडला ? आता पोलिसवाले यांना पकडून तर नेणार नाहीत ? "

" घाबरू नकोस सीता ! नव्या दिल्लीतले पोलीस तसा गाढवपणा करणार नाहीत. शिवाय तुझे यजमान बडे सरकारी अधिकारी व वजनदार नागरिक आहेत. फार तर बयान द्यायसाठी पोलीस चौकीवर जाऊन यावं लागेल. यापेक्षा अधिक काही व्हायचं नाही ! " तारिणीनं समजूत घातली.

हे ऐकून सीतेला थोडं समाधान वाटलं. मनावरचा भार हलका झाल्यासारखं वाटलं. त्यामुळे ती बऱ्याच मोकळ्या मनानं इतर गोष्टींचा विचार करू लागली... घराच्या मागच्या अडगळीच्या खोलीत तारिणीची मानलेली आई झोपली आहे, याचं तिला आता स्मरण झालं. तरी हे तारिणीला सांगता येत नव्हतं. रझिया बेगमनं तसं वचन घेतलं आहे. तिला दिलेलं वचन मोडणं कसं शक्य आहे ? अन् समजा आपण बोललोच तर परिणाम किती भयंकर होतील ?

सीतेच्या अंतर्दृष्टीपुढून मघाचं ते दृश्य तरळून गेलं. त्यात रझिया बेगम रक्तानं माखलेली सुरी नळाच्या धारेत धुऊन स्वच्छ करीत होती. त्या कृतीचा संबंध तारिणीनं कथन केलेल्या घटनेशी असेल का ? कशावरून नसेल ? मग आपण जिला आश्रय देऊन लपवून ठेवलं आहे ती खुनी असेल का ? आणि ही गोष्ट राघवन्‌ला कळली तर तो काय म्हणेल ?

" काय ताई, तुम्ही तिघं आज एकत्र कसे आलात ? "– सीतेनं तारिणीला प्रश्न केला.

" मी गेल्ये होत्ये सूर्याच्या खोलीवर. तिथं तुझे यजमान आले सूर्याच्या शोधात. मग आम्ही तिघं तुला भेटायला निघालो. येताना वाटेत हे रामायण घडलं ! " तारिणीनं उत्तरादाखल सांगितलं.

" काय ग बाई, सूर्याला भेटायला जाता आलं ! मला भेटायला एकदाही यावंसं वाटलं नाही ना ? मला एकदम विसरलीस की काय ? "

" विसरायला ग काय झालं ? मी तर येणारच होत्ये. तुझ्या मिस्टरांना काय वाटेल या विचारानं पाय पुढं पडेना. सूर्यासुद्धा याच पेचात पडले होते. "

हे ऐकून सीतेला वाईट वाटलं. ' आता यांचं सूत जमलेलं दिसतंय. मी मात्र यांच्यापासून दुरावत चालल्ये आहे. सूर्याला हिनं अशी काय मोहिनी घातली की

माझ्यापेक्षा त्यानं हिच्याशी अधिक स्नेह जोडावा ?' या विचारात हेलावत असतानाच सीतेनं विचारलं , " तुला यांची भीती वाटायचं कारणच काय ? हे तुला काय करणार होते ? उलट, तेच तुझ्या नावाची माळ जपत असतात. सूर्याच्या मनात एवढं कपट भरलं असेल याची मला कल्पनाच नव्हती ! "

" हे ग काय बोलतेस ? तुझ्या भावासारखा निर्मळ मनाचा माणूस मी उभ्या आयुष्यात पाह्यला नाही ! " तारिणीनं सीतेकडे रोखून पाहात म्हटलं.

" खरोखर सूर्या भोळाभाबडा होता. गेल्या काही दिवसांपासून तो बदललाय ... ! आग्र्यावरून आल्यापासून आजच पहिल्यांदा त्याची भेट झाली का ?"

" आजच नाही सीता, आग्र्यावरून येताच तातडीनं त्याला भेटल्ये. माझ्या कपाळावर घाव झाला, त्याबद्दल खेद व्यक्त करणारं पत्र त्यानं लिहिलं नव्हतं का ? त्या संदर्भात बोलायला गेल्ये. "

" मलासुद्धा तेच वाटलं ! " सीता म्हणाली.

तारिणी काही बोलण्यापूर्वीच मोटार-सायकलचा आवाज ऐकू आला.

" पोलीस आले वाटतं ..." तारिणी म्हणाली.

पोलीस अधिकारी काही वेळ बाहेरच बोलत उभे राहिले. थोड्याच वेळात राघवन् आणि एक पोलीस अधिकारी आत आले.

तारिणीकडे बोट दाखवून राघवन् म्हणाला, " ह्याच त्या बाई. "

" चेहरा बघताच लक्षात आलं. फारच भेदरलेल्या दिसतात. आता यात भिण्यासारखं काही नाहीच, असं तर म्हणता येणार नाही ?"

" यांची अवस्था लक्षात घेऊनच मी सरळ पोलीस चौकीवर आलो नाही. कसंही करून चौकशीत अन् खटल्यात यांना गोवलं जाऊ नये, असं वाटतं. "

" तसा मी पुरेपूर प्रयत्न करीन. यांचा पत्ताबित्ता आपल्याला माहीत आहे नं ? यांच्या साक्षीची गरज पडलीच तर. . ."

" जरूर भासलीच तर आपण सांगाल तेव्हा मी स्वत: यांना घेऊन येईन. पण यांची गरजच भासणार नाही अशी व्यवस्था आपण करू शकणार नाही का ?"

"प्रयत्न करीन असं तर म्हटलंच आहे ! . . . हे बघा ताई, तुम्ही घाबरायचं कारण नाही. खरं तर स्त्रियांनी अशा भानगडीत पडूच नये. तरी या घटनेवरून धडा घ्या अन् याबद्दल कुणाजवळ बोलू नका. नव्हे, या घटनेविषयी तुम्हाला काही माहीत आहे याचा कुणाला थांगपत्ता लागू नये. कळलं ? "

तारिणीला एवढी समज दिल्यावर राघवन्‌कडे वळून तो म्हणाला, " चला, आपण निघू या. उशीर होतो आहे. "

" सीता, मी यांच्यासोबत जातो. तारिणी आज इथंच थांबेल. " असं बोलून राघवन् निघून गेला.

काही क्षणानंतर फाटकातून मोटार व मोटार-सायकल गेल्याचा आवाज आला. सीतेनं पुढचं दार बंद केलं.

" मी पुन्हा चुकून या मोटारीत बसणार नाही. माझ्या पोरीला पण बसू देणार नाही. ताबडतोब ही गाडी विकून दुसरी घ्यायला सांगत्ये. " सीतेनं तारिणीला म्हटलं.

" हं! मीसुद्धा. कुणी कितीही आग्रह केला तरी या गाडीत बसायची नाही.....तुझं मनोधैर्य पाहून मला तर खरंच आश्चर्य वाटलं. "

" आज सासूबाई असत्या तर त्यांची पाचावर धारण बसली असती. सुदैवानं वासंती पण गाढ झोपली आहे. "

" सीता, तुझ्या मुलीला बघायची फार उत्सुकता लागून राहयलीय. पण त्याआधी आंघोळ करून घ्यायची आहे. आज काही नळाच्या पाण्यानं भागणार नाही. गंगेवरच जायला हवं. "

" तूर्त नळाच्या पाण्यानं आंघोळ करून घे. गंगास्नान पुढं केव्हातरी कर. " असं बोलून सीतेने तारिणीला बाजूच्या स्नानगृहात नेलं. मागच्या स्नानगृहाकडे जाण्याची गरज भासली नाही.

राघवन् आणि सूर्या परत आले तेव्हा सीता व तारिणी स्वयंपाकघरात बसून स्वयंपाक करीत होत्या. हे पाहून दोघांनाही आनंद झाला. दोघं एकदम म्हणाले, " आम्हाला तर मुळीच भूक नाही. पण तुम्ही एवढ्या मेहनतीनं जेवण तयार केलंत, आम्ही जेवलो नाही तर तुम्हाला वाईट वाटेल. पण त्याआधी आंघोळ करायची आहे बुवा ! "–एवढं बोलून सूर्या मागच्या व राघव पुढच्या स्नानगृहात गेले.

सूर्या स्नान करून आल्यावर त्यानं सीतेला विचारलं, " काय ग ताई, बाथरूमच्या समोरच्या खोलीत काय ठेवलेलं आहे ? कसला तरी आवाज येत होता. "

सीतेने दुसरीकडे तोंड फिरवून म्हटलं, " उंदीर शिरला असेल. "

" तारिणीबाई, स्नानगृहात तुम्ही आपला रुमाल विसरलात का ? त्यावर रक्ताचे इतके डाग दिसले की मला राहवलं नाही. मी तो घासून-घासून धुतला " सूर्या म्हणाला.

" माझा रुमाल ? छे !" असं बोलून तारिणीनं सीतेकडं बघितलं.

गोष्ट बदलण्यासाठी सीतेनं म्हटलं, " सूर्या ही कार ताबडतोब विकून टाकायला हवी. मी या मोटारीत बसायची नाही."

" मी तर आधीच ठरवून टाकलं. उद्या पहिलं काम कार विकणं. अन् दुसरं पिस्तुलाचं लायसन्स मिळवणं. काळ काय बिघडला आहे ! रस्त्यातून चालणाऱ्या माणसावर सुरी चालवायची, हा काय अन्याय आहे !" राघवन् म्हणाला.

सर्वजण जेवायला बसली. जेवताना राघवन् म्हणाला, " सीता, तुझ्या बंधु-राजांच्या शौर्याचं काय वर्णन करावं ! अग, कारमध्ये बसला तेव्हा त्याचे हातपाय लटलट कापत होते. मात्र खाली उतरताच कसा फाड्फाड् बोलू लागला !"

" पुरे झालं ो! आता हे बंद करा. वाटल्यास दुसरं काही बोला."

" दुसरं काय बोलायचंय आता तूच सुचव पाहू."

" हे लोक आपल्याकडे इतके दिवस का फिरकले नाहीत हे या दोघांना विचारा."

" ताई, क्षमा कर! कामाची गर्दी झाली होती म्हणून जमलं नाही. आता मात्र बरोबर येत जाईन. पण एका शर्तीवर . आमच्या जावईबापूंना अडचण होणार नसली तर !"

" तुझ्या येण्यानं मला काय अडचण होणार आहे ? उगीच सबबी न सांगता काय ते बोल. "

" वा ! काय छान बोललात ! सूर्या सांग बाबा, तुझ्या येण्यानं यांना कसली अडचण होते ? मोठा आलाय कामाचा ! तारिणीताईला भेटायला तर वेळ मिळतो नं ?"

" ताई, मी अन् ह्या एकाच पक्षात आहोत. पक्षाच्या कामासाठी आम्हाला वारंवार भेटावं लागतं. "

" तुमचा पक्षबिक्ष ठाऊक नाही मला. यापुढं तुम्ही दोघं नेमानं इथं यत राह्यलात तर मला समाधान वाटेल. "— सीता बोलली.

जेवणं आटोपून सर्वजण बैठकीच्या खोलीत येतच होती. तेवढ्यात टेलिफोनची घंटा वाजली. राघवन् रिसीव्हर उचलून बोलू लागला.

" हॅलो ऽ ! मी सुंदर राघवन् बोलतोय. हं ! काय म्हणालात ? जीव गेला ? अरेरे! . . .डॉक्टरांनी सर्टिफिकेट दिलं का ? काय लिहिलंय ? सुरी भोसकून मारलं आहे असं लिहिलंय का ?... हं ! तो माणूस कोण होता ? काय ? विनायकराव मदोंकर . . .? चला, त्याच्या मृत्यूनं जगाचं काही नुकसान झालेलं नाही ! पण शेवटी खून तो खूनच ! खुनी कोण असावा ?... काही तरी अनुमान केलं असेल ?... कोण ? रजनीपूरची वेडी ? नाव तर ऐकलेलं नाही बुवा ! बरं, बरं ! आभारी आहे ! "

" काय झालं ? " राघवन्नं टेलिफोनचा रिसीव्हर खाली ठेवताच सर्वांनी एकदम विचारलं.

" त्याची प्राणज्योत मालवली ! इस्पितळात पोचवल्यावर अर्ध्या तासाच्या आतच मृत्यू झाला. डॉक्टरांनी सर्टिफिकेट दिलं, सुरी भोसकून मारलं गेलं आहे. मृताचं नाव विनायकराव मदोंकर. रजनीपूरच्या आधीच्या राजाचा मंत्री होता. काही दिवसांपासून इथं दिल्लीत राहात होता. क्लबमधील बऱ्याच लोकांना तो ओळखत होता. दारूच्या नशेत नसत्या कटकटी करायचा. रजनीपूरची वेडी म्हणून ओळखली जाणारी एक बाई त्याच्या मागावर होती. विनायकरावनं पोलिसांना याची कल्पना देऊन ठेवली होती. याच स्त्रीनं यापूर्वी रजनीपूरच्या राजाचा खून करण्याचा प्रयत्न केला होता. यावरून तिनंच हा खून केला असावा असा अंदाज केला जात आहे... अरे ! पण तुम्ही सर्व असे स्तब्ध कसे ? काय ग सीता, तुला तर रहस्यकथा खूप आवडतात नं ? मग ?... "

' रजनीपूरची वेडी ' हे शब्द ऐकताच सीता व तारिणी एकमेकींकडे पाहू लागल्या. दोघींच्या डोळ्यात भय आणि करुणा भरलेली होती.

सीतेचा निर्देश करून राघवन् बोलला तेव्हा उत्तरादाखल ती म्हणाली," ह्या गोष्टी कथेतून बऱ्या वाटतात. प्रत्यक्षात तसं घडायला नको असतं. "

" मला तर वेगळंच वाटतं. रजनीपूरच्या वेडीसारखे आणखी लोक पुढं सरसावले तर आपल्या देशातील संस्थानिकांच्या व त्यांच्या दुराचारी मंत्र्यांच्या अकला ठिकाणावर येतील ! "–सूर्या बोलला.

सीतेचं लक्ष मागच्या भागातील अडगळीच्या बंद खोलीकडे लागलं होतं. रजनीपूरची वेडी तर यावेळी तिच्या घरात आहे.ही गोष्ट कोणाला सांगावी का ? सांगितली तर काय संकट कोसळेल ? तारिणी तिला भेटून आपल्या आईबापाची माहिती विचारू इच्छिते. तिला अशी सुवर्णसंधी पुन्हा कधी मिळेल का ?

याच वेडीनं माझ्यावर अन् आईवर एवढी माया का दाखवली ? रत्नहार आणि दोन हजार रुपये का दिले ? याचं कारण समजून घेण्याची सीतेला तीव्र इच्छा झाली. इतर विचार मागे पडले.

21

ठण् ! ठण्

घड्याळात दोन वाजले. सीतेची झोप उघडली . . .

' अरे देवा ! मला गाढ झोप लागली होती वाटतं ! कळत नाही, आता दोन वाजलेत की ... ?' सीतेनं भिंतीवर टांगलेल्या घड्याळाकडे दृष्टी फिरवली. लाल रंगाच्या अंधुक उजेडात दोन वाजलेले दिसले...' चला, दोनच वाजले ! आपल्याला आताच उठून त्या खोलीकडे जाता येईल. मात्र जरासुद्धा आवाज व्हायला नको. चाहूल न लागू देता हळूच उठलं पाहिजे. शेजारच्या खोलीत हे नि सूर्या गाढ झोपेत आहेत. इथं ही तारिणीसुद्धा कशी छान झोपली आहे...'

' आँ ! कशाचा बरं हा आवाज ? दार उघडल्याचा वाटतो ! पण यावेळी कसं दार उघडणार ? कदाचित् ... छे ! छे ! शेजारच्या घरातील असेल ! नाहीतर भास झाला असेल. ते काहीही असो, थोडा वेळ थांबावं झालं. मेली झोप लागायला नको.

बाजूच्या खोलीतून तर कसलीच चाहूल येत नाहीय्. सर्व कसे शांत झोपले आहेत ! रझिया बेगमला भेटायला सोयीची वेळ हीच. तिला सावध करायला पाहिजे. पहाट झाल्यानंतर तिनं इथं थांबायला नकोय्. '

उशीच्या खाली चाचपून सीतेनं किल्ली शोधली. आवाज न होऊन देता ती अंथरुणातून उठली. अन् अशा बेतानं चालू लागली की तिच्या पावलांचा आवाज तिलाच ऐकू येईना ... शेवटी अडगळीची खोली आली. अंधारात चाच-

पडून तिनं कुलूप धरलं. कुलपाला किल्ली लावण्याचा तिचा प्रयत्न सपशेल फसला. आता आली का पंचाईत ? दिवा लावावाच लागेल. काय हरकत आहे दिवा लावायला ?

अंधारात चाचपडत सीतेनं दिव्याचं बटन शोधलं. दिवा लावला. दिव्याच्या प्रकाशात कुलूप-कडी काढली. दार उघडून तिनं हळूच आत पाऊल टाकलं. डोकावून पाहिलं. ' अय्या ! खोलीत तर कोणीच नाही ! '

दुसरं पाऊल आत टाकून तिनं चहुबाजूला निरखून पाहिलं. खोली रिकामीच होती !

' हा मेला कसला खेळ आहे ? नुकतीच रात्र झाली होती तेव्हा जे काय आपण पाह्यलं ते स्वप्नात की काय ? ती बाई आत गेली. तिनं बाहेरून दार बंद करून कुलूप लावायला लावलं. आपण कुलूप लावलं... हा सारा भ्रम होता का ? '

त्याचवेळी सीतेला मागून उघडणारं दार दिसलं. ते उघडंच होतं. सीतेला वस्तुस्थितीची कल्पना आली तेच दार उघडून रझिया बेगम निघून गेली असावी. पोलीस आले, त्यांनी चौकशी केली हे तिला कळलेलं असणार. गडबड थांबताच तिनं इथून पोबारा केला. सीता तिला जे काय विचारणार होती ते तसंच राहून गेलं. हरकत नाही ! या घरातून ती सुरक्षित बाहेर पडली एवढंच पुरे.

असा विचार करीत सीता खोलीबाहेर आली. कुलूप लावायला घेतलं. पण अचानक तिला असा भास झाला की कोणाचे तरी डोळे आपली कृती रोखून पाहात आहेत. तिनं मागे वळून पाहिलं तो तारिणी उभी होती !

सीता भयभीत नजरेनं तारिणीकडे पाहात चित्रासारखी उभी राहिली. तिच्या हातातली किल्ली तशीच हातात राहिली. कुलप लावण्याचं भानच तिला राहिलं नाही. हे बघून तारिणी स्मित करीत तिच्यापाशी आली अन् म्हणाली, " सीता अग ऽ भित्येस कशाला ? तू जिला बघायला आलीस तिलाच बघायला मी पण आल्ये आहे. तिच्याविषयी मला अधिक ओढ वाटणं स्वाभाविक नाही का ? "

आश्चर्यानं विस्फारलेल्या डोळ्यांनी तारिणीकडे पाहात सीतेनं विचारलं, " तुम्हाला हे कळलं कसं ? "

" कसं म्हणजे ? केवळ अंदाजानं ! तुझ्या बोलण्यावरून अन् हालचाली-

वरून मला आधीच संशय आला होता. माझा रुमाल स्नानगृहात बघितल्याचं सूर्या बोलताच माझी खात्री पटली."

"बरं! पण मी उठून इकडे आल्याचं कसं कळलं तुम्हाला? झोप लागलेली नव्हती का?"

"एवढी भयंकर घटना घडल्यावर झोप कशी येणार सीता? घड्याळाच्या ठोक्यांनी झोप उडाली नाही का? पण त्याच्या काही वेळ आधी बगीच्यातून कोणाला तरी बाहेर पडताना मी या डोळ्यांनी पाह्यलं! बरं. सीता, या खोलीत किती व्यक्ती होत्या ग? एक की दोन?"

"एकटीच तर होती. फक्त रझिया बेगम! पण एक का दोन अशी शंका आलीच कशी तुम्हाला?"

"मी ेघांना जाताना पाह्यलं. कोणीतरी येऊन तिला घेऊन गेलं असावं असं दिसतं."

"ती बाई खरंच का तुमची आई आहे? माझा तर बाई विश्वासच बसत नाही... अग बाई! आपण इथंच बोलत काय उभ्या राह्यलो? पोरगी जागी होऊन रडायला लागली तर माणसं जागी होतील अन् आपण बिछान्यावर दिसलो नाही तर घाबरून जातील, भलतेच तर्क-कुतर्क करू लागतील. चला, आत बिछान्यात पडल्या-पडल्या बोलता येईल. मला काही आता झोप लागायची नाही. तुम्ही आपला सारा वृत्तान्त आज मला सांगून टाका."

दोघी खोलीत येऊन आपापल्या अंथरुणावर बसल्या. तारिणीनं विचारल्या-वरून सीतेनं रात्रीच्या पहिल्या प्रहरात तिच्या नजरेपुढं घडलेली घटना निवेदन केली. शेवटी तिनं प्रश्न केला, "काय हो ताई, ती बाई खरंच का मुसलमान आहे? तिचं नाव रझियाच आहे का?"

"नाही! पण ते सारं नंतर सांगत्ये... जेव्हापासून मला कळू लागलं तेव्हापासून मी तिला आपली जन्मदात्री आई समजत आल्ये. जगातील कोणतीच आई आपल्या अपत्याचं संगोपन इतक्या ममतेनं करीत नसेल. ती माझ्यावर जिवापाड माया करायची. मात्र माझी ही माता इतर बायकांप्रमाणे एकाच पुरुषाबरोबर संसार मांडून राहात नव्हती. कुणाच्या तरी भीतीनं छपून-छपून काळ कंठीत असावी असं वाटे. तिला भेटायला एक सज्जन वारंवार यायचे. त्यांनाच वडील समजून 'बाबा' म्हणून मी हाक मारायची. ही सवय मला केव्हा जडली ते कळत नाही. हे येणारे गृहस्थ कधी माझ्या आईशी लाडीगोडीनं

वागायचे तर कधी ।तच्यापाशी चांगलेच भांडायचे.. तरी ही दोघं इतरांसारखी नवराबायको नव्हेत याची मला केव्हातरी जाणीव झाली. मात्र मी त्या गृहस्थाला आपले बाबाच मानायची. येघांचं एका बाबतीत अगदी एकमत असे. ती बाब म्हणजे माझ्यावरची ममता ! कोणती वस्तू मागायचा तेवढा अवकाश; त्वरित पुरवली जाई. कुठं थोडा ताप आला तरी त्यांच्या जिवाची तळमळ होत असे. माझ्या संगोपनासाठी आणि शिक्षणासाठी सढळ हातांनी पैसा लावला. त्यांच्याजवळ खूप पैसा होता असं नव्हे. माझ्या आईजवळ बहुमोल दागिने असलेले मी बालपणात या डोळ्यांनी पाह्यले. एक-एक दागिना तिनं विकायसाठी बाबांकडे दिला. त्यावर प्रपंच चाले. कधी कधी बाबासुद्धा पैसे आणत. पण आई ते घेत नसे. त्यांची कमाई फारच कमी असून त्यांच्यावर आणखी एका प्रपंचाचा भार आहे याची तिला जाणीव होती.

" कॉन्व्हेंटमध्ये शिकत असताना मला निरुपमा नावाची मैत्रीण मिळाली. अशीच केव्हातरी मी आपल्या जन्माविषयी व आयुष्याविषयी उदास व्हायची. अशावेळी निरुपमेच्या संगतीत तिच्या स्नेहामुळे मन उल्हसित व्हायचं.

"आम्ही दोघी सारख्या वयाच्या होतो. वाढल्याबरोबर आम्ही आपल्या भावी जीवनाबद्दल बोलू लागलो. आम्ही एकमेकींपुढं आपलं हृदय मोकळं करीत असू. लग्न न करता देशसेवेला आयुष्य वाहून घेण्याचा निश्चय आम्ही तेव्हाच केला. निरुपमा आपल्या निश्चयापासून ढळली. सीते, तू तिला पाह्यलं आहेसच. जगाच्या दृष्टीनं ती सुंदर नाही. निरुपमेला हे कळलं होतं. म्हणूनच तिनं अविवाहित राह्यचं ठरवलं होतं. पण बाह्य सौंदर्यापेक्षा अंतरंगाचं सौंदर्य महत्त्वाचं मानणाऱ्या माणसानं तिच्या जीवनात पदार्पण केलं. त्याच्याशी लग्न करून सुखानं संसार करते आहे. खरंच ती भाग्यवान आहे !"

तारिणीचे डोळे अश्रूंनी डबडबले ते बघून सीतेचं हृदय हेलावलं. ती म्हणाली, " ताई, निरुपमेप्रमाणे तुमचंही भाग्य कधीतरी उजळेल बरं ! "

" नाही सीते ! तिच्यात व माझ्यात फरक आहे. उणीव आहे ती माझ्या जन्मासंबंधीची. जिच्या आईबापाचा पत्ता नाही तिच्याशी लग्न करायला आपल्या देशातील कोणता पुरुष तयार होईल ? समजा कोणी निघालाच तर त्याचे नातलग मानतील का ? आपल्याकडची लग्नं आप्तांच्या संमतीनंच होतात ना ? सोड त्या गोष्टी ! लग्न करण्यात मला गोडी राह्यली नाही. देशसेवा हीच

माझ्या आवडीची बाब आहे. मुंबईत जेव्हा मिठाचा सत्याग्रह झाला तेव्हा मी व निरुपमा सामील झालो. आमचं वय लहान म्हणून आम्हाला कैदेत डांबलं नाही. शहराबाहेर नेऊन सोडून देत. आम्हाला गंमत वाटायची. निरुपमा सोबत असे. ती चळवळ संपल्यावर आम्ही कराची काँग्रेसला गेलो. . ."

इथं तारिणी जरा वेळ थांबली. मग दोघे दीर्घ निश्वास सोडून म्हणाली, "त्यानंतर भारताच्या पुण्यभूमीचं दर्शन घ्यावयाची तीव्र इच्छा झाली. काश्मीर-पासून कलकत्त्यापर्यंत प्रत्येक गाव पाहून घेतलं. नंतर बिहारातील भयानक भूकंपाच्या बातम्या आल्या. सारा देश दु:खात बुडाला. भूकंप-पीडिताच्या मदती-साठी जे सेवा-पथक मुंबईवरून रवाना झालं त्यात भरती होऊन मी व निरुपमा बिहारात पोचलो. याच सुमारास आमच्या आयुष्यात एक विशेष घटना घडली, निरुपमा आणि वेणीप्रसाद यांची भेट झाली. काही दिवसांतच तिनं त्याला आयुष्याचा जोडीदार निवडलं...."

एवढं बोलून तारिणी गप्प झाली. सीतेनं उत्सुकतेनं विचारलं, "ताई पुढं काय घडलं हे सांगत्येस ना ? उत्कट प्रसंगापाशी येऊन कथा बंद पडली तर कसं होणार ? तुमच्या आयुष्यात पुढं काय घडामोड झाल्या हे तर कळू दे."

"निरुपमेचं लग्न झालं अन् माझा मृत्यू ! सीता मी काहीतरी बडबडत्ये आहे असे समजू नकोस. मी मेल्याचं सर्व संबंधितांपुढं सिद्ध करून चुकल्ये आहे. सर्वांनी मला विसरून जावं अशी माझी इच्छा होती. म्हणूनच सेवा-पथकातील सहकाऱ्यांची माझ्या मृत्यूबद्दल खात्री पटवून मी तिथून पलायन केलं. वृत्तपत्रा-तल्या ज्या बातमीमुळं तुम्ही माझ्या मातेवर संशय दाखवलात त्या बातमीमुळंच मी हे केलं. आईवर खुनाचा आरोप सिद्ध होऊन तिला तुरुंगात धाडण्यात आलं. या बातमीनं माझं मन उद्विग्न होऊन गेलं. या जगात तीच माझ्या प्रेमाची स्वामिनी होती. ज्यांना मी आपले वडील मानलं त्यांच्यावरसुद्धा मी इतकं प्रेम कधीच केलं नाही. आईवर आपला प्राण ओवाळून टाकला होता. तिच्या वर्तना-संबंधी माझ्या मनात कितीतरी शंकाकुशंका आल्या तरी तिच्यावरील माझं प्रेम कमी झालं नाही. गेली काही वर्षं मी तिच्यापासून दूर राह्यले अन् देशभर भटकत राहिले तरी माझं तिच्याविषयी प्रेम कायम आहे. त्यामुळं त्या बातमीनं तिची झालेली बदनामी, भोगावं लागलेलं दु:ख, हालअपेष्टा माझ्या सहनशक्तीच्या पलीकडच्या होत्या.

"एका राजाच्या हत्येचा प्रयत्न तिनं का केला, यासंबंधी मी विचार करू लागल्ये तेव्हा माझ्या मनात नाही नाही त्या निराधार शंका थैमान घालू लागल्या. याच सुमारास माझी बाबांशी दिल्लीत भेट झाली. त्यांनी माझं सांत्वन करण्याच्या हेतूनं अशा काही गोष्टी सांगितल्या की, माझं सांत्वन तर झालंच नाही, पण असह्य दु:खाची भर पडली....तोपर्यंत जिला मी आपली जन्मदात्री समजत होत्ये ती माझी जन्मदात्री नव्हती, ही त्यातली एक गोष्ट. माझ्या अंधकारमय जीवनात नंदादीपाप्रमाणे ती मला प्रकाश देत होती. आज तो नंदादीप विझला होता. मला फार वाईट वाटलं ती जर माझी आई नव्हे तर हे बाबा नसणार. मग मी कुणाची मुलगी आहे ?......सीता, माझी आई रागाच्या भरात जे काय बोलायची त्याचा अर्थ मला आता कळू लागला. तिच्या त्या बोलण्यावरून मला असा संशय येतो की, मी राजकन्या आहे. पण माझ्या या उपमातेनं सतत गावं बदलण्याचं कारण काय ? आपलं मूळचं रमामणी हे नाव बदलून रझिया बेगम असं नाव ठेवण्याचं कारण काय ? या प्रश्नांचा थोडा अंदाज आता आला होता. त्यामुळे माझ्या हृदयाला ज्या वेदना झाल्या त्या पालक–पित्याला कळल्या नाहीत. त्यांना काही महत्त्वाचं काम होतं. मला धीर देऊन ते निघून गेले. मात्र जाताना पुढल्या भेटीची जागा व दिवस ठरवून गेले. तरी मी त्यांना भेटल्ये नाही. भेटायची इच्छा नाही!"

काही वेळ त्या खोलीत स्तब्धता होती. तिचा भंग करीत सीतेनं विचारलं. "तुम्हीसुद्धा रझिया बेगमला वेडी समजता का ?"

"मला तरी काय ठाऊक बाई ? तिला भेटून चार वर्षांहून अधिक काळ लोटला. तिच्या मनात कोणाविषयी तरी भयंकर द्वेष घर करून राहृचला आहे, त्याची मला कल्पना आहे. द्वेष पराकोटीला पोचला म्हणजे त्याचा क्रोध होतो आणि क्रोध पराकोटीला गेला की वेड लागतं. तिला वेड लागलं असलं तर एकापरीनं बरंच आहे. आजच्या घटनेच्या संदर्भात तिला फाशी न देता पागलखान्यात पाठवलं जाईल !"

थोडया वेळानं सीतेनं म्हटलं, "ताई, आणखी एक प्रश्न राहृचला. माझ्या गळ्यात हा जो रत्नहार आहे त्याबद्दल तुम्ही विचारलं होतं का ? रझिया बेगमनं मला तो दिला असावा अशी शंका आली ना ?"

"हं ! मला खात्री होती तिचा पडताळा पाहण्यासाठी विचारलं होतं. माझ्या उपमातेनं सर्व दागिने विकून टाकल्यानंतर तेवढाच एक उरला होता !

" मग तो रत्नहार अन् दोन हजार रुपये तिनं मला का दिले ?"

" मला कशाला विचारत्येस बाई ! माझ्या तोंडूनच ऐकायचं आहे का ? तुला अंदाजानं ओळखता आलं नाही का ? "

सीतेनं आधीच अटकळ बांधली होती, आता तिच्या अनुमानाला पक्का आधार मिळाला. तारिणीला कळू लागल्यापासून ती ज्यांना बाबा म्हणत होती ते नक्कीच सीतेचे वडील होते. सीतेच्या बालपणी घरात अठरा-विश्वे दारिद्र्य नांदलं. तिच्या आईला वारंवार शोक करावा लागला. या सर्व आपत्तीच्य मुळाशी हे रहस्य होतं तर ? आणि या सर्वाचं प्रायश्चित्त म्हणून त्या बाईनं चोरून लपून येऊन हा रत्नहार दिला काय ?

अशा तऱ्हेच्या विचाराच्या आंदोलनातून बाहेर पडल्यावर सीतेनं म्हटलं, " झालं गेलं गंगेला मिळालं ! यापुढं कायमच तुम्हाला माझी बहीण बनून राहचला हवं! "

घड्याळात चारचे ठोके पडले !

22

एके दिवशी धामा आणि भामा अचानक सीतेच्या घरी येऊन थडकल्या. त्यांच्या आगमनानं सीतेला कमालीचा आनंद झाला. हास्य-विनोदानं सारं वातावरण प्रफुल्लित झालं.

खुशालीचं बोलणं झाल्यावर वासंतीचे लाड करीत भामानं विचारलं, " मिस्टर राघवन् कुठं आहेत हो ? आम्ही त्यांचं अभिनंदन करायला म्हणूनच आलोत. "

" आज माझ्या सासुबाई गावाहून येताहेत. त्यांना आणायला स्टेशनावर गेलेत. " सीतेनं सांगितलं.

" अय्या ! काय म्हणालात ? सासुबाई यायच्यात ? मला तर बाई सासूची भीती वाटते ! " भामा बोलली.

" ठाऊक आहे आम्ही लग्न का केलं नाही ते ? लग्न केलं म्हणजे सासूची कटकट आलीच. या भीतीनं आम्ही दोघींनी लग्नाला चाट मारली. " असं बोलून धामा खदखदून हसली. भामेनं तिला साथ दिली.

सीतेलासुद्धा हसू फुटलं. हसत तिनं विचारलं, " कोणत्या गोष्टीसाठी यांचं अभिनंदन करणार आहात ?"

" राघवन् विलायतेला जाऊन आले म्हणूनच त्यांनी एवढी हिंमत केली. आपल्या लोकांनी तर ' कशाला मानगडीत पडा,' असं म्हणून तोंड लपवलं असतं. पण राघवन, मुरामारीत अर्धमेला होऊन रस्त्यात पडलेल्या माणसाला इस्पितळात घेऊन गेले, पोलिसात रिपोर्ट देऊन आले. तुमच्या मिस्टरांच्या या कर्तव्यदक्षतेची आमच्या बाबासाहेबांनी खूप तारीफ केली. या साहसाबद्दल त्यांचं मनःपूर्वक अभिनंदन करण्यासाठी आम्ही मुद्दाम आलो. ' भामा म्हणाली.

त्या रात्री प्रत्यक्षात काय घडलं याचं सीतेला चांगलं स्मरण होतं. विलायतेला जाऊन आलेल्या तिच्या नवऱ्यानंच म्हटलं होतं, कशाला फुकटच्या भानगडीत पडता ? आपण गुपचूप निघून जाऊ. सूर्या व तारिणी यांनीच त्या जखमी झालेल्या माणसाला उचलून नेण्यावर भर दिला होता. आणि राघवन्नं दोनतीनदा त्या दोघांना म्हटलं होतं, तुमच्या हट्टामुळे आपल्यावर ही आफत आली. तारिणीकडून सीतेनं हे सारं ऐकलं होतं. तरी सीता त्यावेळी हा गौप्यस्फोट करणार नव्हती. धामा–भामा फुकटात त्यांच्या गौरव करू इच्छितात तर आपण कशाला नाकारावं ? म्हणून ती गप्प बसली.

ठीक याचवेळी टेलिफोन वाजला. सीतेनं रिसीव्हर उचलून विचारलं, " कोण आहे ? "

दुसरीकडून बोलणारा सूर्या होता. त्यानं म्हटलं, " मी आणि तारिणी तुझ्या भेटीसाठी येतोय्. "

" केवढी आनंदाची गोष्ट आहे ! तुमची भेट बरेच दिवसांत झाली नाही. लवकर निघून या. " सीतेनं म्हटलं.

मग तिनं भामा-धामा यांना कोण येत आहे, हे सांगितलं. ते ऐकून दोघींना फार आनंद झाला.

" तुमच्या यजमानांची भेट झाली नाही. निदान तारिणीची तरी भेट होऊन जाईल."

" त्यांच्याही येण्याची वेळ झालेली आहे. फार तर अर्ध्या तासात घरी येतील. आल्यासारखं त्यांच्याशी भेटूनच जा ना !"

सीतेला सूर्याला भेटायचं होतं. तारिणीलादेखील भेटायचं होतं. पण दोघांची एकदम भेट घ्यायची नव्हती. शिवाय राघवन्‌नं जी तक्रार केली होती ती सीतेच्या मनात ताजी होती. त्यानं म्हटलं होतं, की तारिणी व सूर्या उघड-उघड बरोबर हिंडतात. हे काही बरं नव्हे. सूर्याच्या अकलेचं दिवाळं निघालं का ? त्याच्या घरच्यांना हे कळलं तर किती दुःख होईल ?

सीतेला हे रुचलं नव्हतं. राघवन्‌नं मात्र याचं सारं खापर सूर्याच्या माथी मारलं होतं. सीता मनातल्या मनात तारिणीवर रुष्ट झाली होती. तिला वाटलं, सूर्या एक खेड्यातून आलेला भोळा-भाबडा पोरगा. उलट तारिणी जगाचा अनुभव घेतलेली आहे. तीच त्याला बिघडवते आहे. सूर्याला एकान्तात भेटून सावध करण्याचा तिचा विचार होता. त्यानं तारिणीच्या जाळ्यात फसू नये, असं ती सांगणार होती.

तारिणीसंबंधी सीतेची भावना दुहेरी स्वरूपाची होती. तारिणी भेटली म्हणजे सीता तिच्यावर स्नेहाचा व प्रीतीचा वर्षाव करायची. मात्र तिच्या अनुपस्थितीत तिच्यावर अकारण आग पाखडायची. तिच्या घरची गरिबी, तिच्या आईचे हाल आणि तिचा अकाली झालेला मृत्यू या सर्वांच्या मुळाशी तारिणीच आहे अशी तिची धारणा झाली होती. शिवाय, तारिणी आणि राघवन् यांचा घनिष्ठ स्नेहसंबंध व एकमेकांविषयी वाटणारी ओढ हेही तिच्या त्राग्याचं एक कारण होतं. सूर्याला तर तारिणीनं वेडच लावलं होतं. या गोष्टी काय स्त्रीजातीला शोभणाऱ्या आहेत ?

असा विचार करीत असतानाच सीतेनं धामा आणि भामा यांना म्हटलं, " तुम्ही इथं दिल्लीत राह्यलात तर मला खूप आनंद होईल. माझा तर वेळ संपता संपत नाही."

" आम्ही इथं दिल्लीत येऊन राह्यलो तर नवल नाही. कारण आमच्या बाबांना केंद्र सरकारचं मोठं अधिकारीपद मिळण्याची दाट शक्यता आहे. अडचण एवढीच आहे, की बाबा ते स्वीकारायला बिचकतात." भामा बोलली.

" तुम्हाला हो इथं मैत्रिणींना काय तोटा आहे ? तारिणी तर आहे ना ?"

" तारिणीच्या मैत्रीचं काय घेऊन बसलात ? ती असून नसल्यासारखीच आहे. ती आली म्हणजे समाजवाद, कॉंग्रेस, क्रांती यासंबंधी बोलत बसत्ये. अन् मला काही ते आवडत नाही. " सीतेनं म्हटलं.

" अय्या ! खरंच ! मला तर वाटलं, तुम्हाला अशा गोष्टीचं वेड असेल ? "

" मुळीच नाही ! माझ्या मनात महात्मा गांधींबद्दल भक्तीची भावना आहे. त्यांच्यावर टीका केलेली मला आवडत नाही. माझ्या पतिराजांनी जरी त्यांच्यावर टीका केली तरी मी तुटून पडेन !, "

" गांधीजी थोर महात्मा आहेत या संशय नाही. मात्र त्यांचं आर्थिक धोरण टाकाऊ आहे. प्रत्येक बाबतीत त्याचं म्हणणं मान्य केलं तर आपला देश दोन हजार वर्षं मागं पडेल." धामा म्हणाली.

" दिवसेंदिवस काळ बदलतो आहे. विलायतेत वळू (सांड) पाळणारे, डुकरांचे कळप चारणारे भारतात गव्हर्नर व व्हाइसरॉय म्हणून पाठवले जातात." भामाचं बोलून व्हायच्या आधीच धामानं मधे तोंड खुपसलं, " सध्या तरी एवढ्यावर थांबलं आहे. उद्या मजूरपक्षाचं सरकार आलं तर रेल्वे पोर्टर व पोस्टमन गव्हर्नर बनवून पाठवले जातील आणि आमच्या देशातले राजेमहाराजे, नबाब त्यांना मुजरे करू लागतील ! "

त्यावर भामेनं म्हटलं, " विलायतेतून पोर्टर किंवा पोस्टमन आणायची गरज नाही. आपल्या देशातील कॉंग्रेसवाले व समाजवादी यांचा सल्ला मानला तर येथील पोर्टर आणि प्यूनदेखील गव्हर्नर बनतील की ! यापैकी तुला काय आवडेल सीता ? "

सीतेला राजमपेट्टै गाव आठवलं. तिथला बालकृष्णन् पोस्टमन आठवला. बालकृष्णन् गव्हर्नर बनला तर काय गंमत होईल, या विचारानं तिला मनोमन हसू आलं. तिला वाटलं हे सरकार व सरकारी नोकऱ्या आहेत तशाच राहिल्या तरच बरं होईल. . . .

अगदी याच घटकेला सूर्या आणि तारिणी आत आली. धामा आणि भामा तर ' हॅलो डियर ! ' म्हणत तारिणीला आलिंगन देण्यासाठी धावल्या. नंतर त्यांनी हस्तांदोलन केलं. सीतेनं सूर्याला जरा बाजूला नेलं अन् म्हटलं, " सूर्या, तारणीशी

एवढी गट्टी कशासाठी जमवलीस ? अरे, तुझ्या आईवडिलांना हे कळलं तर काय वाटेल ? फुकटची बदनामी नको. वाटल्यास मी तुझ्या लग्न जमवून देते बाबा !"

" खरंच ? कुठली मुलगी निवडलीस ताई ? यांच्यापैकी तर एखादी नव्हे नं ? " सूर्यानं धामा, भामाकडे पाहात हसून विचारलं.

" इश्श ! यांची आधुनिक संस्कृती व तुझ्या आईची जुनी संस्कृती यांचा क्षणभर तरी ताळमेळ बसेल का ? आपण दुसऱ्या मुली बघू. तू मात्र तारणीच्या जाळ्यात फसू नकोस ! " सीता म्हणाली.

" ताई, तू अशा गोष्टी कुणाकडून शिकलीस ? तारिणीबद्दल तू मनात मुळीच विकल्प आणू नकोस. आम्ही दोघंही एकाच समाजवादी पक्षात काम करतो. त्यासाठी वारंवार भेटून आम्हाला विचार-विनिमय करावा लागतो. लवकरच आम्ही लाहोरला जाण्याचं ठरवलं आहे." सूर्या म्हणाला.

धामा-भामाशी परिचयाचा कार्यक्रम आटोपल्यावर सूर्यानं विचारलं, "आम्ही इथं आलो तेव्हा पोर्टरांच्या व प्यूनच्या गोष्टी सुरू होत्या त्या कशाबद्दल ?"

सीतेनं गप्पागोष्टींचा सारांश सांगितला तेव्हा तर सूर्यानं एक भाषणच देऊन टाकलं. तो म्हणाला, " रेल्वे-पोर्टर गव्हर्नर बनण्याचा काळ लवकर येणार आहे.. कारखान्यातील मिस्त्री गव्हर्नर-जनरल होतील आणि पोस्टमन प्रधानमंत्री. त्यासाठी आम्ही तयार असलं पाहिजे. इंग्रजी शिकलेले अन् बडे लोकच अधिकारी-पदांवर नेमले जातील या कल्पना विसरा आता. जर्मनीची उन्नती पाहून हिटलरला लोक वचकून आहेत तो हिटलर कोण आहे ? चुन्यानं भिंती पोतणारा कारागीर आहे. रशियात काय चाललंय याचाही विचार करा. . ."

" अय्या ! हे तर आग ओकणारे समाजवादी दिसतात !" भामा उद्गारली.

" हं ! हा माझा मामेभाऊ जरा जहालमतवादी आहे. त्याच्या गावातील जमिनीच्या भांडणात कुळाचा पक्ष घेतल्यामुळं त्याला भावाशी व वडिलांशी भांडण विकत घ्यावं लागलं. सार्वजनिक सभांतून त्वेषपूर्ण भाषणं करतो असं ऐकल्ये. मात्र त्याचं तसं भाषण ऐकण्याचा अजून योग आला नाही. " सीतेनं सांगितलं.

मोठी माणसं हे काय बोलताहेत ते समजत नसले तरी चिमुरडी वासंती लक्ष देऊन ऐकत होती. मोटारीचा भोंगा ऐकून, ' बाबा आले ' ' दादीला घेऊन आले ! ' असं बोलत ती दाराकडे धावली.

" हे आलेले दिसताहेत ! तुम्ही बोलत बसा, मी आलेच ! " असं

बोलून सीता उंबरठ्याकडे वळली. मुलीला कडेवर घेऊन व्हरांड्याच्या दारात जाऊन उभी राहिली.

गाडी फाटकाच्या आत येऊन थांबली. त्याची आई खाली उतरण्यापूर्वीच राघवन् गाडीतून उतरून तरातरा सीतेजवळ येऊन रागानं म्हणाला, " काय ग ? तू गावाला तसं पत्र का लिहिलंस ? एखाद्या दिवशी तू माझ्या हातचा चांगलाच मार खाशील. मस्ती चढली का ? गाढव कुठली ! "

" अय्या ! तुम्ही हे काय बोलता ? मी तर काहीच लिहिलं नाही. ' दाटून आलेला राग व रडू दाबीत तिनं म्हटलं. इतक्या शिवराळ भाषेत राघवन् आज पहिल्यांदाच बोलला होता.

" तू नाही लिहिलंस तर कोणी लिहिलं ? खोटं बोलू नकोस ! रजनी-पूरच्या तलावात मीच तुला नावेतून फेकून दिलं, असं तू – ललितेला– तुझ्या प्राणप्रिय मैत्रिणीला लिहिलं नाहीस ? "

आता कुठं सीतेला वस्तुस्थितीची जाणीव झाली. सूर्यानं ललितेला लिहिलेल्या पत्रातला मजकूर तिखट–मीठ लावून राघवन्‌ला सांगण्यात आलेला दिसतो. कुणीतरी सासुबाईंना ती बातमी सांगितली अन् गाडीतून उतरताच त्यांनी यांचे कान फुंकलेले दिसतात !

" आता का नाही देत उत्तर ? बोल, तू असं लिहिलंस की नाही ? "

" उगाच किंचाळता कशाला ? पोरगी बिचारी भेदरून गेली. घरातही काही पाहुणे बसले आहेत. '

राघवन्‌चं डोकं ठिकाणावर आलं. त्यानं विचारलं, " कोण आलंय् ? "

" तारिणी आलीय् ? "

" असं ? "–एकदम त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले.

" धामा व भामासुद्धा आल्या आहेत . . . "

" अरेच्चा ! कैदाशिणी कशासाठी आल्यात ? तरीच एवढा गोंधळ सुरू आहे ? . . . त्याच आल्यात का आणखी कोणी आलंय ? "

" सूर्यासुद्धा आलाय् . . . ! "

" तो गद्धा कशाला आलाय् ? एखाद्या दिवशी पिस्तुलानं ठारच करून टाकीन लेकाला ! " राघवन् गुरगुरला.

आईबापाच्या कुरबुरीमुळं स्तंभित झालेली वासंती सरळ आजीकडे झेपवाली

आत आलेला राघवन् अगदीच वेगळा भासला. त्याचा आततायीपणा कुठल्या कुठं पळाला होता. त्याच्या बोलण्यातून मृदुता डोकावत होती. हा बदल पाहून सीतेला बरं वाटलं ! आपल्यावर हे रागावले तरी इतरांच्या समोर सभ्य बनतात, याचा तिला संतोष वाटला !

आधी भामा–धामाचं त्यानं तत्परतेनं स्वागत केलं. मन तारिणीकडे वळून म्हटलं, " केवढं नवल ! आज बिजेच्या चंद्राचं दर्शन घडलं ! "

" हं ऽ ! पौर्णिमेचा चंद्र कधी तर बिजेचा होणारच ! " तारिणी म्हणाली.

" चंद्र तर नेहमी तसाच असतो. कधी तो पूर्ण चंद्र म्हणून दृष्टीला आल्हाद देतो तर कधी चंद्रकोर बनून व्याकुळ करतो. मात्र सूर्याच्या संगतीत असला म्हणजे एकदम दिसेनासा होतो. कितीही प्रयत्न केला तरी दृष्टीस पडत नाही, एवढं खरं ! " असं बोलून त्यानं सूर्याकडे अर्थपूर्ण दृष्टिक्षेप केला अन् विचारलं, " तू केव्हा आलास ? "

सूर्य-चंद्राचा आधार घेऊन राघवन्‌नं जो उपरोधिक टोमणा मारला तो सूर्याच्या वर्मी लागला. त्याचा चेहरा लाल झाला. तरी आपला त्रासिकपणा दिसू न देता तो म्हणाला, " चांगला अर्धा तास झाला मला येऊन. मी आणि तारिणी-बाई सोबतच आलो. "

भामा व धामा मध्ये पडून राघवन्‌ची स्तुती करीत म्हणाल्या, " त्या रात्री रस्त्यातील मरायला टेकलेल्या माणसाला इस्पितळात पोचवून तुम्ही स्तुत्य कार्य केलंय् ! " त्यावर उत्तरादाखल राघवन् म्हणाला,–

" मी असं कोणतं महत्कृत्य केलं की माझी एवढी प्रशंसा व्हावी ? हे प्रत्येकाचं कर्तव्यच नव्हे का ? बरं ते एक सोडा. दुसरं काही बोला. "

इतक्यात टेलिफोन खणाणला. राघवन्‌नं फोन उचलला.

" हॅलो ऽ ! काय म्हणता ? मदोंकरबद्दल होय ?... हं ! काय म्हणालात ? गुन्हेगार पकडला गेला ?– कोण आहे तो ? च् च् ! केवढं हे धाडस ?... बरं, बरं ! तयारी आहे माझी. जे माहीत आहे ते साक्षीत सांगेन की ! हो, हो ! शहरातच आहे मी ! राइट्टो ! "

तारिणीच्या आणि सीतेच्या नजरेत भीतीची व चिंतेची झाक तरळू लागली.

राघवन् फोन बंद करून येताच सर्वांनी एकदम प्रश्न केला,

" काय झालं ? "

" मदोंकरला ठार करणारा गुन्हेगार पकडला गेला. त्याच्याकडे कित्येक वर्षापासून नोकरी करणाऱ्या जुन्या नोकरानंच त्याचा खून केला. त्यानं आपला गुन्हाही कबूल केला आहे. "–राघवन् म्हणाला.

23

दोन दिवसांनी सुंदर राघवन् तारिणीच्या खोलीवर गेला. त्यावेळी सूर्या तिथंच होता. दोघंही प्रवासाची तयारी करीत असलेली दिसली. त्यानं विचारलं, " तर मग तुमचं लाहोरला जायचं नक्की झालं म्हणायचं ? "

" हं ! आज रात्रीच्या गाडीनं निघणार आहोत. "

राघवन्नं सूर्याकडे पाहून म्हटलं, " हे बघ सूर्या तू लाहोरला जा नाहीतर रावळपिंडीला जा. काबूलला गेलास तरी हरकत नाही. मध्य आशियाच्या वाळवंटात गेलास तर आणखी बरं. सोशॅलिझम, कम्युनिझम यासारख्या मृगजळासाठी वाळवंटच योग्य ठिकाण आहे. मात्र तारिणीला सोबत नेऊ नकोस. त्यात ना तुझा फायदा ना तिचा फायदा. "

सूर्यानं हसऱ्या चेहऱ्यानं म्हटलं, " आपण शेवटी जे बोललात ते साफ चूक आहे जावईबापू ! तारिणीबाईंना मी नेत नसून त्याच मला नेताहेत बरं ! "

" काय तारिणी हे खरं आहे ना ? "

" अगदी खरं ! मी इतिहास-संशोधन करत्ये आहे, हे तुम्हाला ठाऊक आहेच. त्यासाठी मला पंजाबात जायचं आहे. "

" पुरे, पुरे ! ते इतिहास-संशोधन घाल खड्ड्यात ! भारतात हिंदू धर्मातील पावित्र्य स्त्रियांनीच सुरक्षित ठेवलं. ते जाऊ दे ! मला वाद घालायला वेळ नाही. तारिणी तुझ्याशी एकान्तात मला काही बोलायचं आहे. "

त्याच्या चेहऱ्यावरची त्रासिकपणा नि अधीरता पाहून तारिणीनं गमतीनं विचारलं, " तुमच्या सिद्धान्ताप्रमाणे परक्या स्त्रीबरोबर पुरुष एकान्तात बोलू

शकतो का ? हे धर्मविरोधी नाही का ? "

राघवन् क्षणभर गांगरला. तरी सावरून म्हणाला, " पण यावर तुझा तर काही आक्षेप नाही ना ? मग माझाही आक्षेप नाही. हे बघ तारिणी मी हे गमतीनं बोलत नाही हं ! मला तुझ्याशी काही महत्त्वाचं बोलायचं आहे. "

" मलादेखील प्रवासाची तयारी करायचीय्. मी चलतो तारिणीदेवी ! प्रवासाच्या ठरलेल्या कार्यक्रमात काही बदल केलात तर मला तसं त्वरित कळवून द्या बरं का ! "– असं बोलून सूर्या निघून गेला.

सूर्या गेल्यानंतर कितीतरी वेळ त्या खोलीत स्तब्धता होती. राघवन् स्वत: काही बोलेल म्हणून तारिणीनं वाट बघितली, पण तो मुखस्तंभासारखा बसून राहिला तेव्हा तारिणीनं म्हटलं, " तुम्ही एकान्तात माझ्याशी काय बोलणार होता ?"

राघवन् एखाद्या नाटकातल्या पात्रासारखा तारिणीच्या पुढं उभा राहून म्हणाला, " तारिणी, मी एकान्तात तुला काय सांगणार आहे, हे मला खरंच ठाऊक नाही. माझ्या मन:स्थितीची तुला खरोखरीच कल्पना नाही, की जाणूनबुजून तू न कळल्याचं नाटक करते आहेस ? "

" तुमची मन:स्थिती मला कळली असती तर माझी तुम्हाला कळती हे खरं ना ? मग काही बोलायची गरजच काय ? "

" नाही तारिणी, मला तुझं मन ओळखता आलं नाही. एक काळ असा होता, की तुझ्या मनात एखादा विचार आला तर त्याची मला आधीच चाहूल लागून जायची ! त्याचप्रमाणे तुलाही माझ्या मनाचा ठाव लागून जायचा. मी आडवळणानं बोलणार नाही. आपलं हृदय तुझ्यापुढं उघडं करून ठेवतो ! तारिणी, स्पष्टच बोलायचं तर तुझ्याशिवाय मी क्षणभरदेखील जगू शकत नाही. तीन महिन्यांपूर्वी दिल्लीच्या स्टेशनात तुला पाहिल्यापासून माझा माझ्या मनावरचा ताबा पार उडाला आहे. ताजमहालात तुला बघितल्यावर तर मी पुरा वेडावून गेलो. या तीन महिन्यांत कामावरचं लक्ष उडालं. ऑफिसातलं काम नीट होत नाही. माझ्यावर लोभ करणारे माझे साहेबसुद्धा माझ्या तक्रारी करू लागले आहेत. 'तुला झालं तरी काय ? ' असं वारंवार विचारतात. तुझ्यामुळंच मी सिमल्याचा बेत रद्द केला. तू इथं दिल्लीत असल्यावर मला सिमल्यास कसे चैन पडणार ? म्हणून मी सिमल्यास गेलो नाही... लग्न झाल्यावर मधुचंद्रासाठी काश्मीरला जायचा आपला बेत होता, हे तुला आठवतं ना... ? "

"प्रिय मित्रा ! मी हात जोडून विनंती करत्ये, की ती जुनी कहाणी पुन्हा ऐकवू नकोस. ते सर्व काही आता विसरून जा."

"तारिणी, तू ते सर्व विसरून गेलीस असं दिसतं. तू सुदैवी म्हणून एवढ्या लवकर विसरू शकलीस. पण मी विसरू शकलो नाही ! त्या जुन्या स्मृती अजून माझ्या काळजाला ओरबाडतात. त्या आठवणींनी मनाला सुख होतं की दु:ख होतं हे सांगणं कठीण आहे !... एकदा आपण मुंबईच्या मलबार हिलवर गेले होतो. तेथील उद्यानात फेरफटका करून मुख्य सडकेवर येईपर्यंत संध्याकाळ होऊन गेली होती. खाली महानगरातील असंख्य विद्युद्दीप आकाशातील तारकांशी स्पर्धा करीत झगमगत होते. सारं जग आनंदात बुडाल्यासारखं वाटत होतं. त्याचवेळी जवळच्या बंगल्यात रेकॉर्ड वाजत होती, 'प्रेमनगर में बनाऊंगी घर.' सिनेनट सैगल यांनी गायलेलं गीत होतं ते ! मी म्हणालो, 'हे गीत खास आपल्यासाठीच गायल्यासारखं वाटतं. आपणसुद्धा प्रेमनगरात घर बांधू !' आठवलं तारिणी ? निदान मी सांगितल्यावर तरी आठवलं का ? माझ्या गोष्टीवर तुझं लक्ष आहे ना ? की मी वेडपटासारखं काहीतरी बडबडतो आहे, असं समजून तू काही वेगळ्याच विचारात गढून गेली आहेस ?"

गलबलून आल्यानं किंवा आणखी काही कारणानं असेल, पण तारिणी एकदम काहीच बोलली नाही. मग अडखळत घुटमळत बोलू लागली, "तुमच्या सर्व गोष्टी मी लक्ष देऊन ऐकल्या. जुन्या सर्व आठवणी मनात ताज्या आहेत. कोणत्याच गोष्टीचं विस्मरण झालेलं नाही. मात्र त्यावेळी आपण जी चूक केली तिची आता जाणीव होऊ लागलीय्. प्रेमनगर ही केवळ कविकल्पना आहे अन् वास्तवात प्रेमनगर असलं तरी आता मी त्यात घर बांधू इच्छित नाही. उलट, सेवानगरात घर बांधायची इच्छा आहे. ... राघवन्, मी जे काय बघितलं ते तुम्ही बघितलं असतं अन् मी जे अनुभवलं ते अनुभवलं असतं तर तुम्हीसुद्धा माझ्याशी सहमत झाला असता. उगीच प्रेमाच्या मोहजाळात गुरफटून दु:खी झाला नसता. भूतमात्राच्या, किमान मानवजातीच्या दु:खनिवारणाला आपण कितपत हातभार लावू शकतो याचा माझ्याप्रमाणेच तुम्हीसुद्धा विचार केला असता !"

"तारिणी, तू हे काय बोलतेस ? अगऽ विश्वातल्या लोकांचं दु:ख तू अन् मी कमी करू शकतो का ? आपण काय देवापेक्षा अधिक सामर्थ्यवान आहोत ? विश्वनियंत्याच्या नियतीनुसार मानव सुख किंवा दु:ख भोगत असतो. प्रत्येकासाठी त्यानं वेगळा मार्ग बनवला त्यावरूनच त्यांना चालावं लागतं. आपण जग सुधारू,

लोकांचं दु:ख दूर करून त्यांच्या सुखात भर घालू, हे विचार मानवाच्या केवढ्या अहंकाराचे द्योतक आहेत याची तुला कल्पना आहे ? त्या मूर्ख सूर्यासारखं तूही बोलू लागलीस का ? हे विचार त्याच्याकडून तर नाही ना घेतलेस ?" संयम सोडून राघवन् बेधडक बोलत होता.

तरीही तारिणी शांत व संयत स्वरात म्हणाली, " तुम्ही एवढे त्रस्त का होता ? तोंडाला येईल ते बोलताहात झालं ! यात सूर्याचं नाव गोवण्याची गरजच काय ? त्यांची भेट होण्यापूर्वीच मला काही अनुभव आले. त्या अनुभवांवरून मी काही निष्कर्ष काढले आहेत. आपण ईश्वरनिर्मित जगाची उन्नती करू शकतो या अहंकारानं किंवा विधिलिखित पुसून टाकू शकू या अंधविश्वासानं मी सेवामार्ग पत्करलेला नाही. दु:खानं पोळलेल्या जिवांच्या सेवेत माझ्या मनाला सुख लाभतं, शांती मिळते. याहून वेगळ्या जीवनात माझं मन रमत नाही, याला मी काय करू ? आताच तर तुम्ही म्हणालात, की प्रत्येक व्यक्तीसाठी भगवंतानं वेगवेगळे मार्ग आखून ठेवले आहेत. आता त्यानं तुमच्या व माझ्यासाठी भिन्न मार्ग आखून दिले यात त्याचा काय दोष ? पहिल्या प्रथम मी तुम्हाला भेटले तेव्हा आपले मार्ग वेगळे असल्याचं मला कळलं नाही. तेव्हा माझ्या अकलेवर मायेचा पडदा पडलेला होता. तो दूर होताच मला सत्याचा बोध झाला. कृपा करून क्षमा करा अन् मला माझ्या मार्गानं जाऊ द्या."

"नाही ! हे शक्य नाही ! खरं तर, तुझ्या दृष्टीवर मायेचा पडदा पडला तो आता. त्यावेळी तू जे बघितलंस तेच खरं होतं. आपले मार्ग भिन्न आहेत असं म्हणणंच चूक आहे. हिंदू धर्मात तर जो पुरुषाचा मार्ग तोच स्त्रीचा मार्ग असतो. स्त्रियांसाठी वेगळा मार्गच नाही."

" यावर विश्वास ठेवणारी व तुम्हाला दैवाहून श्रेष्ठ मानणारी एक सालस मुलगी सुदैवानं पत्नीच्या रूपानं तुम्हाला लाभलेली आहे. ती तुमची मनोमन पूजा करते हे भाग्य तुमच्या वाट्याला आलं आहे. राघवन्, माझ्याशी प्रेमाच्या गोष्टी करताना सीतेची आठवण होत नाही का हे नीट विचार करून सांगा पाहू. ती अनाथ पोर तुमच्यामुळं स्वत:ला सौभाग्यवती समजते. तिची तुम्हाला दया येत नाही का ? तिची फसवणूक करण्याचा विचार तरी तुमच्या मनात कसा येतो ?"

" अहाहा ! फसवणुकीच्या गोष्टी तू करत्येस ? कोणी कोणाला फसवलं ? माझी व सीतेची फसवणूक तू केली आहेस. मी तुझ्यावर पूर्ण विश्वास टाकून

होतो. तू मला जीवनसरितेच्या धारेत लोटून काहीच न सांगता मद्रासवरून निघून गेलीस. जाताना वाचणाऱ्याचा गैरसमज होईल असं एक पत्र लिहून ठेवलंस. त्यानंतर असं एक पत्र लिहून घेतलंस की ते वाचून तू बिहारात भूकंपानं पडलेल्या खाईत पडून मेलीस हे मला मान्य करावं लागलं. तुझ्या अशा फसवणुकीमुळंच मला सीतेशी लग्न करावं लागलं !"

"मीच तुमची फसवणून केली हे मान्य केलं तरी ती विनाकारण नव्हती. पण हेदेखील खरं ना, की तुम्ही काही सीतेशी चारचौघासारखं लग्न केलं नाहीत. प्रेमाच्या मोबदल्यात प्रेम मिळवलंत, जर का तुमचं माझ्यावर खरंच प्रेम असेल आणि त्याची साक्ष पटवून द्यायची असेल तर तुम्ही आपल्या बायकोला चांगलं वागवा. त्या भोळ्या मुलीला अंतर देऊ नका."

"मी तिला अंतर देईन असं कोण म्हणतं ? तसा विचारही माझ्या मनाला शिवला नाही. ती आपल्या सोबत राह्यली तर माझी काही ना नाही."

"तर असं म्हणा ना, की धार्मिक कार्यासाठी मंगळसूत्र धारण करणारी विवाहित पत्नी तर हवीच. मात्र मी तुमची रखेली म्हणून राहावं."

"छे:, छे:! काय बोलतेस हे ? मी इतका नीच नाही. तारिणी, मी तुझ्याशी लग्न लावायला तयार आहे. त्यासाठी टोमणे ऐकावे लागले, दोष दिला गेला किंवा अपमान सहन करावा लागला तरी माझी तयारी आहे."

"बोला, बोला! पुन्हा एकदा बोला !" तारिणी आश्चर्यानं म्हणाली.

"मी असं म्हणालो, की अग्नीला साक्ष ठेवून मी तुझं पाणिग्रहण करीन. तुझी संमती असली तर मी सारी व्यवस्था करून टाकीन."

"राघवन्, या संबंधानं आपल्या पहिल्या बायकोला काय वाटेल याचा विचार केलात का ?"

"मला तिची पर्वा नाही. तिच्यासाठी मी आपल्या जीवनातलं सुख का सोडावं ? शिवाय मी काही तिचा त्याग करणार नाहीय. तिलाही सोबत ठेवायचं म्हणतोच आहे."

"अय्या ! तुम्ही तिच्याबाबत एवढे उदार झालात ? छान ! आता जरा वेगळ्या दिशेनं विचार करा. समजा तुमच्याप्रमाणेच सीता एखाद्याशी प्रेम-विवाह करू पाहते. तर तुम्ही तिला परवानगी द्याल ?"

"आँ ! काय बोलत्येस हे ? असं कारणं धर्मविरोधी नाही का ?"

" असं होय ? हिंदू धर्मानं काय पुरुषांनाच हवं तसं वागण्याची मुभा दिलेली आहे ?"

" हा सारा धर्मोपदेश मला नकोय. माझं म्हणणं ऐकशील का ? मी सीतेला घटस्फोट देईन. हवं तर तिनं कोणाशीही लग्न करावं. मग तरी तू माझ्याशी लग्न करायला तयार होशील का ?"

" हे पाहा, सीता काही तुम्हाला सोडून जाणार नाही. तुमच्याच पायाशी लोळण घेईल, या भरवशावरच तुम्ही असं बोलताहात. आरंभी मी जे म्हटलं तेच पुन्हा एकदा सांगत्ये. तुमच्या जीवनाचं लक्ष्य वेगळं आहे अन् माझ्या जीवनाचं वेगळं आहे. आपल्या दोघांचा जीवनमार्ग एक होऊच शकत नाही."— तारिणीनं म्हटलं.

राघवन् काही वेळ क्षुब्ध नजरेनं डोळे वटारून बघत राहिला. मग जणू काहीतरी निश्चय करून विकट हसत म्हणाला, " तारिणी, थोड्याच दिवसांपूर्वी मला रिव्हॉलवरचं लायसन्स मिळालं आहे हं !"

" राघवन्, मला धमकी देण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. बिहारात भूकंप बघितल्यानंतर माझ्या मनातील मृत्यूची भीती नष्ट झालीय."

" तू माझ्या बोलण्यातून चुकीचा अर्थ काढलास. तुला गोळी घालीन असं मी म्हटलेलं नाही. मला असं म्हणायचं होतं, की मी स्वतःवर गोळी चालवून घेईन."

" ना मला स्वतःच्या मरणाची काळजी ना दुसऱ्याच्या मरणाची ! भगवद्गीता काय म्हणते ? 'शरीराला मारता येतं, आत्म्याला नाही.' आत्मा तर वज्रानंसुद्धा नष्ट होत नाही."

" तारिणी! आता मला तुझ्या खऱ्या स्वरूपाची ओळख पटली. तू साधारण स्त्री नाहीस नाहीस ; पक्की राक्षसीण आहेस ! तुझं सौंदर्य हे शूर्पणखेप्रमाणे मायावी आहे. ठीक आहे ! तू अन् सूर्या उद्या प्रवासाला कसे जाता हेच आता पाहून घेईन !" राघवन् जणू शपथेवर बोलत निघून गेला. ...

तो तिथून निघून गेल्यावर तारिणीच्या नेत्रातील अश्रुसागराला भरती आली.

24

पद्मापुरमधील आपल्या वरच्या मजल्यावरील खोलीत बसून राघवन्‌चे वडील पद्मलोचन शास्त्री कोणत्या तरी वृत्तपत्रासाठी 'संपादकास आलेली पत्रे' या सदरासाठी जोरदार पत्र लिहीत बसले होते. परिव्राजक शर्मा यांच्याशी त्यांचा वर्णाश्रम व्यवस्थेविषयी झालेला वादाचा सामना चांगलाच रंगला होता. संन्यासाश्रमाच्या बाजूनं सणसणीत उत्तर देणं जरूर होतं त्यासाठीच ते डोकं खाजवत बसले होते. एवढ्यात 'ॐ भवति भिक्षान्देहि !' असा आवाज ऐकू आला. वरच्या मजल्याच्या सज्जातून त्यांनी डोकावून पाहिलं. फाटकात एक तरुण संन्याशी उभा होता! शास्त्रींना कमालीचं आश्चर्य वाटलं ! आयुष्यात पहिल्यांदाच एवढ्या उतावळेपणानं धडाधड जिन्याच्या पायऱ्या उतरून ते खाली आले आणि मागीलदारी कामात गढलेल्या कामाक्षीजवळ येऊन म्हणाले,

"कामाक्षी, केवढं आश्चर्य बघ ! दारावर एक बालसंन्यासी उभा आहे. चेहऱ्यावर विलक्षण तेज आहे. त्याच्या तोंडून 'भिक्षान्देहि' हे शब्द ऐकताच माझ्या शरीरावर रोमांच उभे राहिले. बाहेरच्या दाराची किल्ली दे पाहू चटकन्. साक्षात् भगवान शंकर दारी अवतरले आहेत ! पितरांच्या पुण्याईनं एक मनःपूत संन्यासी दारी आला आहे. अग, अशी गप्प उभी का?"

कामाक्षी अम्मांनी तेवढ्यात दारात उभ्या असलेल्या संन्याशाकडे एक नजर टाकून म्हटलं, "अहो, एवढे उतावीळ का झालात ? समोरचं दार तर उघडंच आहे. तुम्ही म्हणता तेवढे थोर महात्मा येणार तरी कुठून ? रामकृष्ण मठाचे किंवा असेच कोणी स्वामी वर्गणी मागायला आले असतील."

हे ऐकताच शास्त्रींचा उत्साह पार मावळला.

तेवढ्यात स्वामीजी आत आले. त्यांचा चेहरा ओळखीचा वाटतो हे पाहून दोघंही नवराबायको आश्चर्यात पडली. कोण असतील बरं हे ?"

"मामी, मला ओळखलंस ?"—स्वामींच्या तोंडून हा प्रश्न ऐकताच कामाक्षी अम्मांना वस्तुस्थिती कळून आली. त्या म्हणाल्या, "अरे ! तू तर आपला सूर्या ! हा कोणता वेश धारण केलास बाबा ?"

" खरंच ? हा सूर्या का ? तरीच चेहरा ओळखीचा वाटला. " शास्त्रीजी म्हणाले.

" होय बरं ! पूर्वाश्रमी या देहाला सूर्या म्हणत. आता या नव्या आश्रमात 'स्वातंत्र्यानंद' म्हणतात. " संन्याशानं खुलासा केला.

" फार छान ! ऐकून आनंद वाटला. माझ्या भाग्याची कोणत्या शब्दात प्रशंसा करू! दुधात साखर पडली म्हणू का मांजराच्या नशिबानं शिकं तुटलं असं म्हणू ? यावं, महाराज ! " असं म्हणत पद्मलोचन शास्त्रींनी स्वातंत्र्यानंदाला बैठकीत नेऊन सोफ्यावर बसवलं.

" एवढ्या लहान वयात कसा संन्यास घेतलात ? आईवडिलांची परवानगी कशी मिळाली ? कोणतीही गोष्ट योग्य वेळी व्हावी. वृद्धापकाळात संन्यास घेतला तर कोण काय म्हणणार ?" कामाक्षी अम्मा बोलल्या.

स्वामीजी काही उत्तर देण्याआधीच शास्त्रीजी म्हणाले, " वाऽग वा ! कमाल आहे तुझ्या अकलेची ! कोणाला संन्यास घ्यायचा असला तर त्यानं तुझा सल्ला घ्यावा. संसारत्याग करून संन्यास घेतल्यावर आई कोण अन् बाप कोण ? परिव्राजक झाल्यावर ही पारिवारिक बंधनं आपोआप तुटतात. आपण तिच्याकडे लक्ष देऊ नका. आपल्यासारखे हजार दोन हजार लोक संन्यासी बनून सनातन धर्माचा प्रचार करू लागले तर धर्माचा उद्धार होऊन जाईल....बरं आता असं सांगा, तुम्ही संन्यास घेतलात तो कुठं व कधी घेतलात ? संन्यास घेऊन कुठं कुठं जाऊन आलात ? आमच्या शहरात किती दिवस मुक्काम आहे ? या साऱ्या गोष्टी विस्तारपूर्वक सांगा पाहू..... कामाक्षी, तू भोजनाची तयारी कर. शास्त्रोक्त पद्धतीनं स्वामीचीची सेवा घडायला हवी. कळलं ? "

" मला सारं काही कळतं बरं ! तुम्ही काही काळजी करू नका. कुठं काही उणीव राहयची नाही ! " असं बोलून कामाक्षी मागच्या दारी गेल्या. त्यांच्या मागोमाग वासंती जाऊ लागली तेव्हा संन्यासी म्हणाला, " वासंती, मला ओळखलं नाहीस का ? मग बोलत का नाहीस ? "

तरी वासंती स्वामींशी बोलली नाही. तिनं आजीला वाकायला लावलं अन् कानात म्हटलं, " काय ग दादी, सूर्यामामानं चम्पी का केली ? तिरुपतीचे बालाजी बनून आलेत वाटतं ! "

हे ऐकून सर्वजण खदखदून हसली.

कामाक्षी अम्मा आत गेल्यावर शास्त्रींनी पुन्हा पूर्वपदावर येत विचारलं "आपण हा संन्यास का व कसा ग्रहण केलात ? मी तर ऐकलं होतं, की तुम्ही काँग्रेसमध्ये प्रवेश करून 'भारत छोडो !' आंदोलनात भाग घेतलात."

"हं ! खरं आहे ते ! 'भारत छोडो' चळवळीच्या निमित्तानं मी गावोगाव फिरलो. या भ्रमंतीत हरिद्वारला मला एका महात्म्याचं दर्शन घडलं. त्यांच्या दर्शनाचा क्षण भाग्याचा म्हटला पाहिजे. पूर्वजन्मीचे सोडून गेलेले संस्कार पुन्हा मला लाभले."

"काय हो महाराज, आपला भारत कधी स्वतंत्र होईल ? महात्मा गांधी, वल्लभभाई पटेल, जवाहरलाल नेहरू ही मंडळी तुरुंगात गेली तरी अजून काही स्वातंत्र्य पदरात पडलं नाही."

"तर मग भारत स्वतंत्र होणारच नाही असं तुम्हाला वाटतं का ?"

"छे:! छे: मी असं म्हणत नाही. भारत जरूर स्वतंत्र होईल. पण तो या लोकांच्या हातून नव्हे, ईश्वराची तशी इच्छा असली तर दुसऱ्या मार्गानं स्वातंत्र्य भारताचं दार खटखटावील. कलीनं जर्मनीत अवतार घेतलेला आहे. हिटलरसंबंधीच म्हणतोय मी. हिटलरनं रशियावर स्वारी का केली ? भारताला स्वतंत्र करता यावं म्हणून ! एकदा स्टॅलिनग्रॅड घेतलं, की विमानाच्या एका उड्डाणात तो हिंदुस्थानात येऊन ठेपलाच समजा. आर्यकुल हे जगात सर्वश्रेष्ठ आहे असं हिटलर म्हणतो. या आर्यांच्या साम्राज्यासाठी, त्याच्या राजधानीसाठी भारतासारखा योग्य देश कोणता आहे ? म्हणून त्याच्या मागोमाग पन्नास हजार विमानांतून त्याचं सैन्यही येऊन पोचेल. हिटलर भारतात येताच पहिलं काम काय करणार ते आहे का ठाऊक ? जगातल्या सर्व लोकांना तो चार वर्णांत वाटून टाकणार. तेव्हाच वर्णाश्रम धर्माची महती लोकांना कळेल. जातिभेद नष्ट करण्यासाठी कंबर कसून सज्ज झालेल्या विद्वानांना बुरखे घेऊन पळून जावं लागेल, नाहीतर शरमेनं घोटभर पाण्यात बुडून जावं लागेल. यदाकदाचित जिवंत राहचलोच तर हे सारं पाहीन." शास्त्री म्हणाले.

संन्याशानं आपलं हसू दाबीत म्हटलं, "काही लोक तर म्हणतात हिटलर हरणार म्हणून."

"काही लोक तसं बडबडतात खरेच, पण त्यांच्या बडबडीनं व्हायचं ते का चुकणार आहे ? हिटलर असा तसा समजू नका. तो मास खात नाही, मद्य पीत नाही की स्त्रियांचं तोंड बघत नाही. जन्मापासून नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळून आहे.

हठयोगीच समजा. संस्कृत भाषेत पारंगत असे अधिकारी विद्वान केवळ जर्मनीत आहेत. लक्षात ठेवा, हिटलर हिंदू ज्योतिष-शास्त्रानुसार तिथी, वार, नक्षत्र पाहूनच कोणत्याही कामाचा श्रीगणेशा करतो. झेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केलं ते मुहूर्त पाहून आणि फ्रान्सवर चढाई केली तीसुद्धा मुहूर्त साधून. नाहीतर नेपोलियनसारख्या पराक्रमी वीराच्या देशाच्या दहा दिवसांत नाकी नऊ आणणं कसं शक्य होतं ? काय मी बरोबर बोलतो का नाही ? " शास्त्रीजी न थांबता बोलत होते.

संन्याशाला शास्त्रीजींचं हे चऱ्हाट ऐकून घेण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. तरी त्याला या गोष्टीचं आश्चर्य वाटत होतं की, शास्त्रीजी चांगले बी. ए. एल्एल्. बी. झालेले, सबजज्ज असलेले, जीवनाचा भरपूर अनुभव घेतलेले गृहस्थ असून एवढे अंधश्रद्धाळू कसे ? त्याच्या मनानं उत्तर दिलं, 'पिढ्यान्पिढ्या रक्तात भिनलेल्या अंधश्रद्धेपासून सुटका मिळणं सोपं नव्हे.' एकीकडे त्याच्या मनात हे विचार आले तर दुसरीकडे विचार पडला, कामाक्षी अम्मांना एकांतात भेटून सीतेबद्दल बोलायला कशी संधी मिळेल ?

योग्य संधी साधून शास्त्रींच्या चऱ्हाटातून स्वतःला सोडविण्यासाठी त्यानं एक नामी अस्त्र सोडलं. त्यानं म्हटलं, "आपल्या गोष्टी मार्मिक आहेत यात शंका नाही. पण आपण हे सारं इतक्या जोरजोरात बोलताहात ते बरं नव्हे. आजकाल सी. आय. डी. चे लोक सारखे घिरट्या घालत असतात. त्यांच्या कानावर हे बोलणं गेलं अन् त्यांनी रिपोर्ट केला तर फुकटचं लफडं मागं लागेल ना !"

या बोलण्याचा शास्त्रीजींवर जादूसारखा प्रभाव पडला. ते एकदम गप्प झाले. जणू त्यांची जीभच लुळी पडली.

इकडे शास्त्रीजी जिना चढून आपल्या खोलीकडे गेले अन् तिकडून कामाक्षी अम्मांनी प्रश्न विचारीत प्रवेश केला, "सूर्या, हे काय केलंस बाबा ? या वयात तुझं संन्यासी होणं बरं वाटत नाही. तुला हाकच कशी मारावी हे कळेनासं झालं. यावं स्वामीजी, असं म्हणावं की......!"

"मामी, खरं काय ते मी तुम्हाला सांगून टाकतो ! एका कामासाठी मी हा वेष धारण केला आहे. अहो, मी काही संन्यास घेतलेला नाही."

"मग हे नाटक कशासाठी ? अन् हाच वेष धारण करण्याची तुला का बरं बुद्धी झाली ?"

" मी स्वातंत्र्याच्या चळवळीत पडलो आहे नं ?"

" अरे सोड त्या स्वातंत्र्याच्या बाता, मी तुझ्यासाठी एक चांगली पोरगी पाहून ठेवली आहे. म्हणून तुला या अवतारात पाहून मी तर सुन्नच होऊन गेल्ये."

" काय हो मामी, जीवनात लग्न करणं ही आवश्यक बाब आहे का ? जगातले लग्न करणारे सर्वच लोक संतुष्ट व सुखी आहेत का ?"

" नसायला काय झालं ? कितीतरी लोक लग्न करून पोरावाळांसह मजेत राहताहेत. आता काहींचं नशीबच खोटं ! त्यांच्या भाग्यात सुख नसतं. तसं पाहूचलं तर जगात सदैव सुखी आहे तरी कोण ? श्रीरामानं सीतेशी लग्न लावून किती दुःख भोगलं ! म्हणून काय त्यानं लग्नच करायला नको होतं असं म्हणायचं का ?" कामाक्षी अम्मांनी आपलं समर्थन केलं.

" श्रीराम व सीतामाई यांचं केवढं प्रेम होतं एकमेकांवर ! पण आज-कालची जोडपी तशी कुठं आहेत ?" सूर्यानं विचारलं.

" सूर्या, तुझा रोख कळला बरं मला ? माझ्या लेकाचं व सुनेचं हल्ली पटत नाही असेच ना तुला म्हणायचंय् ? गोष्ट खरी आहे हे कबूल. पण असं का झालं ? मोठ्यांचं न ऐकता आपल्याच मनाचं करायचं, त्याचा हा परिणाम बाबा ! आपल्या पूर्वजांनी लग्नाआधी वधूवरांच्या पत्रिका पाहूचची प्रथा उगीच नाही पाडली. पूर्ण विचार करून पाडली. भलतं-सलतं होऊ नये, नवरा बायकोनं सापमुंगसाप्रमाणे भांडू नये म्हणून जन्मकुंडल्या बघतात...आम्ही तुमच्या गावी कशासाठी आलो होतो ? ललितेला बघायसाठीच ना ? राघवन् नि ललितेच्या पत्रिका जुळत होत्या. ते लग्न झालं असतं तर अशी दुर्दशा झाली नसती बरं !"

" हल्ली माझ्या आतेबहिणीवर जो गहजब गुदरला आहे तो माझ्या सख्ख्या बहिणीवर गुदरला असता एवढंच !" सूर्यानं कटू स्वरात म्हटलं.

कामाक्षी अम्मा संतापानं लालीलाल होऊन म्हणाल्या, " वाऽरे सूर्या ! चांगलं बोललास ! तुझी आतेबहीण बिचारी भोळी-भाबडी अन् राघवन् पक्का दुष्ट म्हणून तिला छळतो, असंच तुला वाटतं ना ? लग्न होऊन घरी आली तेव्हा मलासुद्धा तुझी बहीण साधीभोळी वाटली होती. हळूहळू तिच्या खऱ्या राक्षसी स्वभावाची ओळख पटली."

" एक साधीभोळी मुलगी एकाएकी कैदाशीण बनते याला काही कारण असलं पाहिजे नं ?"

"कारण ? कुठलं आलंय कारण ? आम्ही तिला भोळी समजलो इथंच आमचं चुकलं. मी तर आपल्या उभ्या आयुष्यात अशी विषाची गोळी पाह्यली नाही. कधी कधी तर मला भीती वाटते, की कुठं ती जहर घालून–"

"थांबलात का मामी, बोलून टाका नं ! आपल्या नवऱ्याला जहर घालून मारून टाकील, असं म्हणा. "

"मला तसं म्हणायचं नाही रे सूर्या ! . . . पण तिनं स्वतःच विष पिऊन घेतलं अन् नवऱ्यावर आळ आणला तर काय होईल ? 'नवऱ्याच्या जाचाला कंटाळून मी जीवनाचा शेवट करून घेत आहे', असं लिहून ठेवलं तर ? . . . तिचा आक्रसताळेपणा पाहून मला असं वाटू लागलं आहे !"

" मामी ! विष खाऊन मरण्याचा विचार सीतेच्या मनात आला तर काही काळंबेरं असलंच पाह्यजे नं ? तिचं मन जीवनाला विटलं तरच असे विचार येतील नं ? यात आपल्या चिरंजिवांचा काही दोष नसला तरी त्याच्या तळाशी दुसरं काही कारण असणारच ! विनाकारण ती कशाला विष खाईल ? "

या प्रश्नावर कामाक्षी अम्मा पावसाळी ढगामारख्या गरजल्या, " माझा पोरगा निर्दोष आहे असं कुणी म्हटलं ? त्याच्या कितीतरी चुका झाल्यात. तुझ्या बहिणीला बघायला आला नि या स्वर्गातल्या परीला आपलं हृदय देऊन बसला ! तिच्याशी लग्न करायचा हट्ट धरून बसला, ही काय कमी घोडचूक आहे ? हुंडा-करणी न घेता लग्नाला कबूल झाला ही दुसरी चूक. उकिरड्यावर पडलेल्या पोरीला त्यानं देव्हाऱ्यात नेऊन बसवलं, हे त्याचं चुकलंच ना ? तरी मी त्यावेळी पोपटासारखं पढवलं, की बाबा रे, बायकोला एवढं डोक्यावर बसवणं बरं नव्हे. पण हे कशाला ऐकतील ? मा ऽ रे फिरवून आणली. आग्रा काय, सिमला काय, काश्मीर काय ! मला मात्र गंगास्नानासाठी काशीला न्यायला वेळ नव्हता. अन् हिला लंडनला नेणार होता. व्हाइसरॉयकडच्या पार्ट्यांना न्यायचा. इंग्रजीची शिकवणी काय अन् . . ."

सूर्यानं ताडलं, की कामाक्षींबरोबर अशा गोष्टी करण्यात तथ्य नाही. म्हणून गोष्टीचा रोख बदलून तो म्हणाला, " मामी, मी आपल्या चिरंजिवांची निंदानालस्ती करून आपल्या आतेबहिणीची तरफदारी करतोय असं समजू नका. सीतेला आई नाही हे तुम्ही जाणताच. तिचे वडील जिवंत आहेत का नाहीत हे कुणालाच ठाऊक नाही. तुम्ही अन् तुमचे चिरंजीव सोडून तिला दुसरं आहेच कोण ? तुम्ही तिला घालवून दिलीत तर तलाव वा विहीर जवळ करण्याखेरीज तिला दुसरा मार्गच

उरणार नाही. माझ्या आत्येला तर तुम्ही जाणताच. जन्मभर बिचारीच्या वाट्याला दु:खाशिवाय काहीच आलेलं नव्हतं. ती नेहमी म्हणायची, माझं तर उभं आयुष्य दु:खात गेलं. निदान पोरीला चांगलं घर मिळून सुखी झालेली बघितली तर त्यातच सुखी मानीन. या लग्नाला माझाही हातभार लागला. त्याबद्दल तिनं मलाही खूप आशीर्वाद दिले. तिच्या गोष्टी आठवून तुमच्या लेक-सुनेचा संसार बघितला म्हणजे मन खिन्न होऊन जातं. ती दोघं पूर्वीसारखी सुखात राहावीत यासाठी आपल्यापैकी कुणीतरी प्रयत्न करावा असं मला वाटतं. तुम्ही सीतेच्या चुका माझ्या निदर्शनाला आणून दिल्यात तर तिची समजून पटवून ताळ्यावर आणण्याचा मी अवश्य प्रयत्न करीन. "

सूर्याच्या संयमपूर्ण गोष्टींनी कामाक्षी अम्मा प्रभावित झाल्या. त्यांचा राग मावळला.

" मला तरी दुसरं काय हवंय् ? राघवन् नि सीता पूर्वीसारखी खेळीमेळीनं सुखात राहू लागली तर माझ्यासारखीला त्याहून आनंदाची गोष्ट कोणती ? दोघंही परस्परांवर अगदी मनापासून प्रेम करतात हे मी चांगलं जाणते. मात्र सकाळ होताच, कसे कुणाला ठाऊक, आपसांत भांडू लागतात अन् घराचा उकिरडा बनवून टाकतात. तुझ्या बहिणीच्या तापट स्वभावामुळं हे होतं असं मला तरी वाटतं. लग्न होऊन घरी आली तेव्हा तर अगदी गरीब गाय वाटायची. आता तर जीभ चुरूचुरू चालत असते ! मला तर बाई नवलं वाटतं ! आता तर कुणी एक गोष्ट बोललं तर ती सतरा गोष्टी ऐकवते. मग कधीतरी तो रुद्रावतार धारण करतो. अशावेळी तिनं तरी गप्प बसावं का नाही ? पण तिला कुठं कळतो हा गुरुमंत्र. त्याच्या तोंडाला तोंड देऊन आगीत तेल ओतते ! खोटं असेल तर तारिणीलाच विचार. तू तर तिला ओळखतोस ! मी काशीला गेल्ये नं, तेव्हा सीतेला खूप ताप चढला. वाचायची आशा नव्हती. तारणीनं तिची रात्रंदिवस सेवाशुश्रूषा करून काळाच्या दाढेतून ओढून काढलं. पण तापातून उठताच सीतेनं तिला इतक्या शिव्या मोजल्या म्हणतोस की काय सांगू ! तरी तारिणीनं सारं सहन केलं. उलट तिलाच चार समजुतीच्या गोष्टी ऐकवून निघून गेली. बिचारी तारिणी ! एकवेळ मीच तिचं मन दुखावलं होतं. याच घराच्या देवघरात तिनं माझ्या पाया-वर लोळण घेऊन विनवलं होतं ! राघवन्शी लग्न करण्यासाठी तिला माझी संमती हवी होती. ' ना जात ना पात, कुठली कोण ? ' अशा विचारानं मी खडसावून नकार दिला. आता विचार आला म्हणजे वाटतं, आपण असं का केलं ? माझ्या

राघवचं तिच्याशी लग्न झालं असतं तर तो किती सुखी झाला असता ! कधी कधी तर माझं मन म्हणतं, तू त्या मुलीचं मन दुखावलंस त्याचं हे फळ ! जशी करणी तशी भरणी. ”

हे एकून सूर्या थोडा वेळ विचारात पडला ! त्याला तारिणीचा राग आला. ‘ जर असं आहे तर राघवन् अन् सीतेच्या संसारात तारिणीनं लुडबुड करू नये ’ असं त्याला वाटलं.

“ मामी, झालं गेलं गंगेला मिळालं ! तसं झालं असतं तर बरं होतं, असा विचार करून फायदा नाही. विधिलिखित कोण बदलवू शकणार आहे ? आपल्या मुलाला सुखी करण्याचा मार्ग कोणता, हेच आता बघायला नको का ? मी आपल्या शक्तीनुसार सीतेला समजावण्यात काही उणीव राहू देणार नाही. तुम्हीसुद्धा आपल्या परीनं प्रयत्न करा. . . बरं तुम्ही दिल्लीला कधी येणार ? ” सूर्यानं विचारलं.

“ राघवच्या पत्राची वाट बघते आहे. –एक गोष्ट तुझ्या कानावर घालायला हरकत नाही. एकदा सीतेनं काय केलं, आहे का ठाऊक ? आपल्या फुलासारख्या नाजूक पोरीला तिनं काय शिकवलं, देव जाणे ! तिला काय कळतं ? तिनं सरळ बापाला विचारलं, ‘ तुम्ही माझ्या आईला का मारता ? का शिव्या देता ?’ त्यान संतापून पोरीच्या अंगावर हात वाटला अन् तिला चांगलाच ताप चढला !”

“ अरेरे ! ” सूर्याच्या तोंडून उद्‌गार विघाला.

“ तुला तर वाईट वाटलं. पण सीतेनं काय केलं ? मुलीला ताप भरल्याचं तीन दिवस सांगितलंच नाही. नंतर कसं तरी राघवला कळलं. त्यानं डॉक्टरांना आणलं. मुलगी वाचली खरी पण तिचा पुनर्जन्मच झाला. तुझ्या बहिणीच्या निर्दय स्वभावाचा याहून वरचढ नमुना काय सांगावा ! ”

याला सीतेचा निर्दयपणा म्हणावं की आपल्या नवऱ्याला जगाच्या दृष्टीनं निर्दोष ठरवण्यासाठी तिनं केलेली धडपड म्हणावी याविषयी सूर्याचं मन साशंक झालं. कामाक्षी अम्मांशी याबद्दल वाद घालणं निरर्थक आहे, असा विचार करून तो म्हणाला, “ झाल्या गेल्या गोष्टी सोडा ! उद्या सकाळी मी दिल्लीला चाललोय. तिथं गेल्यावर सीतेशी भेटून बोलेन. तसं तुम्हाला कळवीन. कसंही करून तुमचा लेक व सून सुखी होतील असा प्रयत्न करू या ! ”

“ त्यासाठी मीसुद्धा देवदेवतांना नवस करते आहे. सूर्या, माझं सर्वस्व म्हणजे राघवन्, सीता अन् वासंती ! त्यांच्यावरच तर मी जीव टाकत्ये. तुला

सीतेशी काय बोलायचं ते बोलून घेच. पण तिची पत्रिका मिळाली तर बघ बाबा ! तिच्या कुंडलीत काही दुष्ट ग्रह पडले असतील तर त्यांची शांती करायची व्यवस्था करावी लागेल ! " कामाक्षींनी समारोप केला.

25

१९४३ सालच्या उत्तरार्धात दिल्लीतील लोकसंख्येत व संपत्तीत दिवसेदिवस भर पडत होती. जागतिक महायुद्ध भारताच्या सीमेवर येऊन दार ठोठावू लागलं होतं. दिल्ली शहर मोठ्या तत्परतेनं युद्धाला तोंड देण्याची तयारी करीत होतं. टॅक्सी, टांगे, रिक्षा आदी वाहनांना फार मागणी होती. वाहनं मिळणं कठीण झालं होतं, सूर्या दिल्लीच्या स्टेशनात उतरला तेव्हा त्याला या वास्तव अडचणीला तोंड द्यावं लागलं. तो स्टेशनाच्या बाहेर येऊन वाहनासाठी थांबला. शेवटी त्यानं विचार केला, देवानं पाय कशासाठी दिले ? चालण्यासाठीच ना ? आता त्याला प्रश्न पडला कुठं जावं ? नव्या दिल्लीकडे की जुन्या दिल्लीकडे ? पण नक्की निर्णय घेण्यापूर्वीच त्याचे पाय जुन्या शहराकडे चालू लागले.

चांदणी चौकात आल्यावर त्याची चाल मंदावली. कारण त्याचं मन गेल्या काही दिवसांत घेतलेल्या अनुभवांच्या स्मरणात रमलं होतं...

तो उत्तरेतून दक्षिणेत गेला तेव्हा त्यानं उदबत्तीच्या व्यापाऱ्याचं सोंग घेऊन सारा दक्षिण भारत पालथा घातला होता. त्याच वेशात तो देवपट्टणला ललितेच्या घरी गेला होता. प्रत्यक्ष त्याची आई त्याला ओळखू शकली नव्हती. आपल्या डोक्यावरील पगडी काढून ठेवून तो मोकळा हसला तेव्हा आईनं व बहिणीनं त्याला ओळखलं होतं. त्यांच्या आश्चर्याला व आनंदाला मर्यादा राहिली नव्हती.

दुसऱ्या दिवशी ललितेच्या बाळाचा वाढदिवस होता. त्यानिमित्त किट्टावय्यर, सूर्याचा मोठा भाऊ गंगाधर आणि धाकटा भाऊ शुंडू हे सर्वच आले होते. त्यात सूर्याच्या आगमनाची भर पडल्यानं त्या घरात उत्साहाला उधाण आलं होतं.

सर्वांची मनं आनंदानं तुडुंब भरली होती. गंगाधरन् तर असं म्हणाला, " सूर्या, गेली पाच वर्षे तू हिंडून सारा हिन्दुस्थान पालथा घातलास. आता राजमपेट्टला परत येऊन राहा अन् बाबांच्या कामाला हातभार लाव. तुला हव्या त्या सुधारणा कर. मी विरोध करणार नाही. "

ललितेचा पती पट्टाभिरामन् याच्या तुरुंगवासाची बातमी सूर्याला आधीच कळलेली होती. त्यानं ललितेला म्हटलं, " आपला पट्टाभी अशा राष्ट्रीय चळवळीत येण्याचं साहस करील, असा विचारही कधी मनात आला नव्हता. "

उत्तरादाखल ललिता म्हणाली, " पण एक आनंदाची गोष्ट सांगू. सूर्या, हे इतरांच्यासारखे सरकारी कचेऱ्यांना आग लावण्याच्या, रेल्वेचे रूळ काढण्याच्या किंवा पूल पाडण्याच्या आरोपाखाली तुरुंगात गेले नाहीत. गेल्या दोन ऑक्टोबरला एका सार्वजनिक सभेत गांधींना तुरुंगात ठेवल्याबद्दल त्यांनी जोरदार व्याख्यान ठोकलं. बस, तेवढ्यासाठी यांना पकडून तुरुंगात डांबून ठेवलं आहे. "—हे सांगताना ललितेला अभिमान वाटत होता.

ललितेनं पट्टाभिरामन्‌ची खोली अगदी लख्ख ठेवली होती. तीच खोली सूर्यानं ताब्यात घेतली.

ललितेची सासू दोन वर्षांपूर्वीच वारली होती. आता घराची मालकीण ललिताच होती. पूर्ण सुखात होती. गप्पांच्या ओघात सीतेची गोष्ट निघाली. सूर्यानं सीतेच्या हालांचं वर्णन केलं. ते ऐकून ललितेला दुःख झालं.

" आई पदोपदी तुझ्या नशिबाला दोष देत होती नं ? आईच्या इच्छेप्रमाणे घडलं असतं तर तुझं लग्न पट्टाभीशी न होता त्या क्रूर राघवन्‌शी झालं असतं, म्हणजे मग कळलं असतं ! सीतेच्या अवस्थेचं स्मरण झालं म्हणजे हृदय फाटून जातं ग ललिता ! " सूर्या बोलला.

' खरं बोललास भाऊ ! सीता जेव्हा नव्यानं दिल्लीला गेली तेव्हा किती उल्हासानं पत्रं लिहायची म्हणून सांगू ! पण हल्ली तिची पत्रंच येत नाहीत. आपल्या मलीलासुद्धा तिनं सासूबरोबर मद्रासला धाडून दिलं असं ऐकलं आहे. तिनं असं का केलं ? " ललितेनं विचारलं.

" त्या सर्व गोष्टी नंतर सांगेन. तूर्त एवढंच सांगतो की सीतेचं आयुष्य म्हणजे शुद्ध नरकवास आहे. " असं बोलून त्यानं दीर्घ निःश्वास सोडला. मग गोष्टीचा रोख बदलून समोरच्या घरातील लोकांची चौकशी सुरू केली.

" दोन दिवसांपूर्वी यांचे मित्र अमरनाथ व त्यांची पत्नी चित्रा कलकत्त्याहून आली. म्हाताऱ्यांचं वैर कायमच आहे. एकमेकांशी शब्द बोलत नाहीत. आणि हा वेडेपणा तर यांना मुळीच पसंत नाही. सासुबाई मामंजींच्या धाकानं समोरच्यांना टाळायच्या. पण मला वाटतं, उद्याच्या वाढदिवसाचं निमंत्रण त्यांना देऊन यावं काय ? " ललिता बोलली.

" त्यांना जरूर निमंत्रण दे ! नाहीतरी मी समोरच्या घरी जाणारच आहे ! " सूर्यानं सांगून टाकलं.

त्याच रात्री सूर्या समोरच्या घरी गेला तेव्हा अमरनाथनं मोठ्या उत्साहानं त्याचं स्वागत असं केलं, ' यावं ! स्वतंत्रतेचे वीरपुजारी सूर्याजी यावं ! "

दोघंही हातांत हात घालून आत गेले. दामोदरम् पिल्ले यांनी त्याच्याकडे रोखून पाहात म्हटलं, " अहो सूर्यनारायण अय्यर, आम्ही तर ऐकलं की हिंदुस्थानचं स्वातंत्र्य आणण्यासाठी तुम्ही अफगाणिस्तानात गेलात. तुम्हाला मास्कोत पाह्यल्याचं कोणी तरी बोललं. तरी तुम्ही इथंच आहात तर ? भारताच्या स्वातंत्र्याची हाल-हवाल कळेल का ? ते आपण लोकांनी कुठून कुठपर्यंत नेऊन सोडलं ?"

" मामा, आपण मला विसरला नाही, एवढंच नव्हे तर वेळोवेळी माझ्या-बद्दल विचारपूस करीत असता याचा मला फार आनंद वाटतो. पण भारताचं स्वातंत्र्य भारतातच आहे. त्यासाठी अफगाणिस्तानात जाण्याची गरजच काय ? " र्यानं विचारलं.

व। " असं नका म्हणू. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी मलायात भारताचं कृष्णंत्र्य प्रस्थापित केल्याचं ऐकिवात आहे. तसंच जयप्रकाश नारायण यांनी नेपाळात ञेटात भारताचं स्वातंत्र्य प्रस्थापित केल्याचं ऐकतो. मग काय या साऱ्या पेट्टेच्यं खोट्या आहेत ? " दामोदरम् पिल्ले यांनी विचारलं.

सवय " खरं म्हणाल तर गांधी, नेहरूंसारख्या पुढाऱ्यांनी अहमदाबादच्या किल्ल्यात याच्छोय स्वराज्याची स्थापना केली आहे." अमरनाथ म्हणाला.

सुट " तर मग यापैकी कोणत्या वाटेनं भारतात स्वातंत्र्य येणार ? " दामोदरम् गोल्ले यांनी प्रश्न केला.

" निश्चितपणे काहीच सांगता येत नाही मामाजी. स्वातंत्र्य कोणत्याही वाटेनं येऊ शकतं. फक्त ते जेव्हा येईल तेव्हा ते ग्रहण करण्यासाठी आपल्या लोकांनी तयार असायला हवं. त्यासाठी जनतेला तयार करणं हेच आता आपलं प्रथम व प्रमुख कर्तव्य होय ! "

" आपण हे काय बोलता ? अहो, स्वातंत्र्यासाठी काय लोकांना तयार करावं लागतं ? ते कधीच शक्य नाही. आपल्या लोकांना स्वातंत्र्यासाठी सज्ज करायचं तर कोणता उपाय आहे, कळलं का ? जपान्यांनी हिंदुस्थानवर आक्रमण करावं आणि भारतावर कमीत कमी दहा वर्ष तरी राज्य करावं. आमच्या देशातील लोकांना ताळ्यावर आणण्यासाठी जपान्यांहून वरचढ कोणी नाही. जपानी आमच्या लोकांच्या शेंड्यांना हिसके देऊन, आमच्यातील जातिभेद, मतभेद समूळ उपटून काढून, शाकाहारी डाळ-भात खाणाऱ्यांना चाबकाच्या फटकाऱ्यानं मास-मच्छी खायला लावून, राज्य करीत असताना काही शिक्षण देतील तेव्हाच आमचा देश स्वातंत्र्याला लायक बनेल....काय सूर्याजी, तुम्ही आमच्याशी सहमत आहात ना ? "

" मुळीच नाही ! एकदा का आपण जपान्यांना वश झालो तर मग दहाच वर्ष काय, एकशे चाळीस वर्ष आम्हाला गुलामीत काढावी लागतील. मला तर वाटतं, जपानीसुद्धा नेताजींना मदत करून भारताला स्वतंत्र करण्याचाच प्रयत्न करतील. "

" नेताजींच्या सेनेत आतापर्यंत पन्नास हजार सैनिक भरती झाले आहेत. जपान शस्त्रास्त्रे देऊन त्यांना मदत देतो आहे." –अमरनाथनं सांगितलं.

" पन्नास हजारच काय, पन्नास लाख किंवा पन्नास कोटी भरती व्हावेत ! पण नेताजी कधी येतील ते कळत नाही ! मात्र इथले काही धूर्त स्वैराचारी लोक उत्पाती कारवायांना लागले आहेत. हा निव्वळ वेडेपणा आहे. जपानी येईपर्य वाट पाहायला यांचं काय जातं ? त्याआधीच गाड्या उलटवण्याच्या व तोडण्याच्या मागं का लागले ? उत्पात हा केवळ सरकारचाच नव्हे तर जन फार मोठा द्रोह आहे. आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखं हे आहे. मी जर जज्ज असतो तर अशी कामं करणाऱ्या अपराध्यांना सरळ फ दिलं असतं ! "

दामोदर पिल्ले याच्या तोंडून हे सर्व ऐकून सूर्याचा चेहरा एकाएकी त्रासि बनला. ही गोष्ट अमरनाथच्या चटकन लक्षात आली. अमरनाथनं आपलं म जाणलं हे सूर्यालाही कळलं.

दुसऱ्या दिवशी ललितेच्या मुलाचा वाढदिवस धूमधडाक्यात सुरू झाला. घरात उत्साह ओसंडत होता. ललितेचे सासरे आत्मनाथ अय्यर सूर्याच्या आगमना-

मुळं प्रसन्न झाले. कारण त्याच्यामुळं समोरच्या घरातील दामोदरम् पिल्ले याच्याशी असलेलं इतक्या दिवसांचं वितुष्ट संपलं होतं आणि जुने जिवलग मित्र पुन्हा एकत्र आले होते.

सर्वांच्या तोंडून सारखं सूर्याचं नाव ऐकून ललितेची हडकुळी मुलगी पट्टू त्याच्याशी सलगी करून जी त्याच्या कडेवर जाऊन बसली, ती खाली उतरायचं नावच घेईना.

अनेक दिवसांनंतर तो अशा आनंदी वातावरणात वावरत होता. त्याचा उत्साह उतू चालला होता. एवढ्यात कुणीतरी बाहेरून विचारलं, "या घरात के. एम. नारायणन् नावाचे गृहस्थ आले आहेत का ?"

दारावर बालकृष्णन् पोस्टमन उभा होता. सूर्यानं त्याच्याजवळ जाऊन विचारलं, "कोण, बालकृष्णन् का ? मला ओळखलंस की नाही ? बरं चाललंय नं ?"

"अरेच्चा, तुम्ही होय ? तरी मला वाटलंच. हे पत्र तुमचंच आहे का ते बघा बरं !"

तारिणीच्या अक्षरात लिहिलेला स्वतःचा पत्ता पाहून उत्साहानं पत्र हाती घेत त्यानं म्हटलं, "हो, हो, माझ्याच नावाचं आहे."

"ललितातांईच्या नावाचंही एक पत्र आहे सर. ही पत्रं मी उघडून वाचलेली नाहीत यावर विश्वास ठेवा !"— उपरोधिक हास्य करून बालकृष्णन् बोलला.

सूर्यानं त्याच्यावर अर्थपूर्ण नजर टाकली अन् तो मनाशीच हसला. राजमपेट्टच्या टपाल कचेरीत असताना बालकृष्णन्‌ला दुसऱ्यांची पत्रं चोरून वाचायची सवय जडली होती. या गौप्याचा स्फोट झाला तेव्हा सूर्या आणि बालकृष्णन् याच्यात मारामारीपर्यंत प्रकरण आलं होतं. सूर्यानं त्याची ती सवय तोडूनच सुटकेचा श्वास घेतला होता. बहुधा यावरच त्याचा रोख असावा. तरी त्या गोष्टी मनात ठेवून त्यानं दरडावलं, "बालकृष्णन्, हे काय बडबडतोस ?"

"ही बडबड नव्हे भाऊ ! तो सांगतोय, की आपल्या नावे आलेली पत्रं 'सेन्सार' झालेली आहेत. हे तुरुंगात गेल्यापासून या घराच्या पत्त्यावर आलेली सर्व पत्रं 'सेन्सार' झाल्याशिवाय येत नाहीत. याची त्याला कल्पना आहे."— ललितेनं स्पष्टीकरण केलं.

हे ऐकून सूर्या अस्वस्थ झाला. तो आपलं पत्र घाईनं उघडून वाचू लागला. तारिणीच्या त्या पत्रात पोलिसांना उपयोगी पडणारी बातमी नव्हती. ‘ तुमच्या आतेबहिणीची स्थिती दिवसेंदिवस खालावत आहे. तिची शारीरिक व मानसिक अवस्था फारच बिघडली आहे. तुम्हाला भेटायला ती फारच आतुर झालेली आहे. तरी शक्य तेवढ्या तातडीनं निघून यावं. तुम्ही तातडीनं आला नाहीत तर काही वेडवाकडं होण्याची शक्यता आहे–इतिहास.’ पत्र फारच संक्षिप्त होतं. इतिहास हे तारिणीचं आंदोलनात घेतलेलं नाव असून सूर्याचं नाव होतं ‘ दूत. ’

या पत्रामुळे सूर्या फारच अस्वस्थ झाला. तो ज्या कार्यासाठी दक्षिणेत आला होता ते पूर्ण झालं नव्हतं. तरी त्याला परत जाणं भाग होतं, अशी कशी ही सीता ? हिनं तर नाकी नऊ आणले अन् तिचा तो नवराही कसा दुष्ट निघाला ? बदमाष लेकाचा ! सीतेच्या भावी आयुष्याचं काय होणार कळत नाही.

सकाळी साडे-दहाच्या सुमारास दामोदरम् पिल्ले यांच्या घरचा टेलिफोन खणाणला–

“ हॅलो ! पोलीस स्टेशन ? हं, बोला ! समोरच्या घरी म्हणता ? मी तर त्या घरात कधी पाऊल ठेवत नाही. अहं, मला काहीच माहीत नाही ! या नं ! अवश्य या. मी आपल्या घरात बसून गंमत पाहीन. ”– दामोदरन्नी फोन ठेवला अन् आपल्या मुलाला हाक मारली–“ अमरनाथ ! ”

“ काय आहे बाबा ? ”

“ तुझ्या मित्राबद्दल पोलिसांना बातमी लागलेली दिसते. आत्ताच डी. एस्. पी. नी मला विचारलं. मी म्हटलं, समोरच्या घरवाल्यांशी माझं जन्माचं वाकडं आहे. ते लोक आता इथं येतील. आपण तिथं गेलो तर मी म्हटलेलं खोटं ठरेल. सारं बिंग फुटेल ! ”

“ तर मग काय करावं बाबा ? सूर्याला सावध करणं बरं होईल, नाही का ? ”

“ तुझ्या मर्जीला येईल ते कर. आणखी पंधराच मिनिटांत पोलीस येऊन पोचतील. त्याआधी काय करायचं ते कर. मला काही विचारू नकोस. या घरात माझा जेवढा अधिकार आहे तेवढाच तुझाही आहे. त्याला या घरात लपवून ठेवायचं असलं तरी तू ते करू शकतोस. मात्र काय करायचं ते त्वरित कर. तुला हवं ते कर. मला विचारायची गरज नाही. ”

दुसऱ्याच क्षणी अमरनाथ समोरच्या घरात शिरला. पाचच मिनिटांत सूर्याला घेऊन आला. वरच्या मजल्यावरच्या पिछाडीच्या एका खोलीत सूर्याला बंद केलं अन् खोलीला कुलूप ठोकलं.

त्यानंतर जो हल्लकल्लोळ उडाला त्याच्या आठवणीनं सूर्याचं रक्त खवळून उठलं. आत्मनाथ अय्यरांच्या घरात पोलीस सर्वांवर काठ्या चालवीत होते त्यावेळी समोरच्या घराच्या वरच्या मजल्यावर भेकडासारखं त्याला हात बांधून बसून राहावं लागलं होतं. त्याचं स्मरण होताच त्याला रागामुळं रडू कोसळलं. वा ऽ रे न्याय ! अपराधी कोण अन् शिक्षा कोणाला ?

त्याच रात्री अमरनाथनं आपल्या मोटारीतून सूर्याला गावातून बाहेर नेलं. एका आडगावच्या स्टेशनवर त्याला गाडीत बसवून दिलं. गुप्त पोलिसाच्या भीतीनं संन्याशाचा वेश धारण करून तो मद्रासला आला. तिथं त्यानं कामाक्षी अम्मांनी भेट घेतली. मग तारिणीच्या पत्रावरून तो सरळ दिल्लीला आला होता....

आता तारिणी कुठं व कशी भेटेल ?— याच विचारात मोठ्याच दक्षतेनं तो चालत होता. त्याची चौकस दृष्टी आसपास कुणाला तरी शोधत होती....

सूर्यानं चांदणी चौक ओलांडून जुम्मा मशिदीकडे मोर्चा वळवला. तिथं पोचल्यावर तो सरळ मशिदीच्या पायऱ्या चढू लागला. जवळ जवळ तीन चतुर्थांश पायऱ्या चढून गेल्यावर थोडं थांबून त्यानं आसपासच्या सडकांवर नजर फिरवली. मग काही अंतरावर असलेल्या लाल किल्ल्याकडे पाहिलं... पूर्वी केव्हा तरी हा सर्व भाग घरांनी व मशिदींनी गजबजला होता. फिरंग्यांच्या फौजांनी तोफा डागून सर्व उध्वस्त करून टाकला. आपण जिथं उभे आहोत ती ही मशीद काही काळ ब्रिटिश सैन्याच्या ताब्यात होती. तैमूरलंग, नादिरशाह, अहमदशहा हे तर अनादि काळचे जंगली राक्षस होते. पण स्वत:ला सुशिक्षित, सुसंस्कृत म्हणवणाऱ्या ब्रिटिश राजकर्त्यांनी या दिल्ली शहरावर जे अत्याचार केले त्याच काय ?

हिंदू आणि मुसलमान आपसांतील लहान-मोठे मतभेद विसरून या ब्रिटिश राज्यकर्त्यांना भारतातून पळवून लावण्याचा दिवस कधी आणतील ? जुन्या व नव्या दिल्लीत भारताचा स्वातंत्र्यध्वज फडकण्याचे दिवस कधी येतील ? ते पाहण्याचं भाग्य आपल्या वाट्याला येईल का ?

असा विचार करीत सूर्या उभा होता.... तेवढ्यात त्याचा डावा हात कोणी तरी आपल्या पोलादी पंज्यात असा काही आवळून धरला, की तो एकदम दचकलाच!

26

तो पोलादी पंजा एका उंच धडधाकट पोलीसवाल्याचा होता. त्या एका क्षणात सूर्याच्या मनात हजारो विचार चमकून गेले. ‘इतके दिवस एवढा प्रवास केला, पण कोणाच्या कचाट्यात सापडलो नाही. शेवटी आज आळशी म्हणून नावा-जलेल्या दिल्लीतील पोलिसांच्या हातात कसे पडलो ! दुर्दैव ! आणखी काय ?’ मनातले हे विचार अन् भीती दडपून टाकीत सूर्यानं त्या पोलिसाला दटावणीच्या आवाजात विचारलं, “ कोण तू माझा हात पकडणारा ? का धरलास माझा हात ? ”

“ इन्स्पेक्टरसाहेबांनी बोलावलं आहे. ”

पोलिसाच्या तोंडून हे शब्द ऐकताच सूर्याचं हृदय हादरलं. तरी तो बेधडक बोलला, “ मी इन्स्पेक्टरला काही ओळखत नाही. त्यांच्याशी माझा काय संबंध ? मी मुळीच येणार नाही. ”

“ त्यांना एकदा बघितलंत म्हणजे असं बोलणार नाही. या झटपट ! ” पोलीस म्हणाला. मात्र त्याच्या शब्दांतील मार्दव, ओठांवरील स्मित अन् डोळ्यातील धिटाई पाहून सूर्या चांगलाच चरकला. त्या पोलिसाशी वाद घालण्या-पेक्षा त्याच्या सोबत जाणंच बरं असं ठरवून त्यानं म्हटलं, “ बरं बाबा, येतो. पण तुझे साहेब कुठं आहेत ?”

“ निमूटपणे माझ्या मागं या. मात्र जरा अंतर राखून. पळून जाण्याचं नाव काढू नका. मी तुम्हाला साहेबांकडे घेऊन चलतो. ”–असं बोलून पोलीस पुढं पुढं चालू लागला.

हल्ली 'गांधी मैदान' या नावानं ओळखल्या जाणाऱ्या मैदानाजवळ जाऊन पोलीस थांबला. सूर्या त्याच्याजवळ येताच एका मोठ्या झाडाकडे बोट दाखवून त्यानं म्हटलं, "साहेब त्या झाडाच्या आडोशाला बसले आहेत. जाऊन बघा."

यावेळीसुद्धा पोलिसाच्या ओठावर स्मित पाहून सूर्याच्या आश्चर्याला सीमा राहिली नाही. तो झटपट पावलं टाकत झाडाजवळ गेला तो त्याला काय दिसलं.....? एक स्त्री त्या झाडाच्या बुंध्याशी बसून कोणतं तरी पुस्तक वाचण्यात दंग होती. त्याच्या पायांची चाहूल लागताच तिची समाधी भंग पावली. तिनं मान वर करून बघितलं. सूर्याच्या आश्चर्याला व आनंदाला पारावार उरला नाही. ती तारिणी होती !

"या, या; वीरवर सूर्याजी, या !" तारिणीनं मोठ्या तत्परतेनं त्याचं स्वागत केलं.

"ओऽहो ! आपणच इन्स्पेक्टर साहेब का ? त्या आडदांड पोलिसानं माझा हात धरला तेव्हा तर माझी घाबरगुंडीच उडाली !" असं बोलत तो तिच्या पुढं येऊन बसला अन् म्हणाला, "मी तुमच्या आकर्षणशक्तीशी चांगला परिचित आहे. पण एखाद्या पोलिसालादेखील तुम्ही आपल्या जाळ्यात ओढाल अशी कल्पना आली नव्हती !"

"बरं, आधी असं सांगा, की तुम्ही ज्या हेतूनं प्रवासाला गेलात ते सर्व हेतू सफल झाले का ?"—तारिणीनं विचारलं.

"कसे सफल होणार ? कार्यपूर्ती होण्यापूर्वीच आपलं पत्र आलं, की इथं अगदी प्राणाशी गाठ आहे. मग काय ? सारं सोडून आलो इकडे ? त्या पत्रानं देवपट्टणम्ला केवढा गहजब झाला हे ऐकाल तर थक्कच व्हाल ! बरं ते राहू द्या. सीतेला असं काय झालं की तुम्हाला ते पत्र लिहावं लागलं ? खरं तर सीतेचा विचार करू लागलो म्हणजे मला फार संताप येतो. एका स्त्रीमुळे आमच्या राष्ट्रकार्यात किती अडचणी येतात हे तुम्ही जाणताच."

"मला नाही वाटत असं. एखाद्या देवळातील पुतळ्यानं जसं म्हणावं, की गोपुर माझ्याच बळावर उभारलं गेलं आणि माझ्या शिरावरच त्याचा भार आहे तसं हे राष्ट्रकार्य आम्हीच चालवतो आहोत हा आपला भ्रम आहे. सारं काही ईश्वरी इच्छेनं होत असतं. देशाच्या उद्धाराऐवजी आपल्या परिचयातल्या कुण्या व्यक्तीचं दुःख दूर करण्याचा प्रयत्न करणं अधिक उत्तम, फलदायी नि

श्रेयस्कर होय, असं मला वाटतं. सर्वांत आधी सीतेचं दुःख दूर व्हावं, हेच मला हवं आहे."

" सीतेवर तुम्ही करुणेचा हा जो अपार वर्षाव चालवलात त्याचं कारण मला नीट उलगडत नाहीय !"

" कुणाचा कुणाशी स्नेह जुळण्यासाठी काही कारण लागतं का ?"

" मुळीच नाही. म्हणूनच स्त्रिया लुच्च्या– लफंग्यावर प्रेम करू लागतात !"

" तुमच्या बोलण्याचा आशय नीटसा लक्षात आला नाही. बायका फक्त लुच्च्या–लफंग्यावरच प्रेम करतात असं तुम्हाला म्हणायचं आहे का ? मला हे कबूल नाही. काही भली माणसंसुद्धा स्त्रियांच्या प्रेमाला पात्र ठरतात. अशाच एका भल्या माणसाला मीसुद्धा ओळखते."

सूर्या त्राग्यानं म्हणाला, " तो भला माणूस कोण हे मी जाणतो. त्याचं नाव आहे सुंदर राघवन्. काय हे खरं ना ?"

" माझा रोख राघवन्‌वर नव्हता. तशी तर मी त्यांनाही वाईट समजत नाही. त्यांनी काही चुका केलेल्या असणं शक्य आहे. तरी सीतेवर त्याचं किती मनस्वी प्रेम आहे याची मला जाणीव आहे. सीता उगीचच संशय घेऊन त्यांचं प्रेम विषमय करून टाकते."

" तुमच्या बोलण्यावरून तरी राघवन्‌चं अंतरंग सीतेपेक्षा तुम्हालाच अधिक कळलेलं दिसतं."

" कधी कधी एखाद्या वस्तूच्या चांगल्या-वाईट स्वरूपाचं खरं दर्शन जवळच्या व्यक्तीपेक्षा दुरून पाहणाऱ्याच्या डोळ्यांनाच स्पष्टपणे होतं. अशा तऱ्हेनं विचार केला तर सीतेहून अधिक मलाच राघवन्‌च्या हृदयाचा थांग लागला आहे."

" कोण जाणे ! सीतेपेक्षा तुम्हीच त्याच्या हृदयाच्या अधिक जवळ असू शकाल!"

" सूर्या ! तुमच्या मनात भ्रमाचं बीजारोपण झालेलं दिसतं. असं तिढ्यात बोलायचं असलं तर मी तुमच्याशी बोलायला मुळीच तयार नाही. तुम्ही जाऊ शकाल !"

" या मैदानावर तुमचा अधिकार आहे का ?"

" बरं, तर मीच जात्ये." असं बोलून तारिणी उठून उभी राहिली.

सूर्या अधीरतेन म्हणाला, "तारिणीबाई, मी माझे शब्द मागे घेतो. माझ्या तोंडून भलतं-सलतं निघून गेलं त्याबद्दल मला क्षमा करा व कृपा करून खाली बसा !"

पुन्हा खाली बसता बसता तारिणी म्हणाली, "तुमच्यात एवढा बदल झालाच कसा, हे काही कळत नाही. कुणी तरी काही सांगून तुमचं मन कलुषित केलेलं दिसतं. तुम्ही सीतेला भेटून इथं आलात का ?"

"नाही ! स्टेशनावर उतरून सरळ इकडेच आलोय्. अजून माझ्या खोलीवरदेखील गेलो नाही. सीतेचं कसं चाललंय ? मी तिच्यासाठी काय करू शकतो ?"

"तिच्या मनात कुणीतरी विष पेरलं आहे. तुम्ही तिचं मन नीट समजून घ्या. माझ्या मनानं तिला काही दिवसांसाठी बाहेरगावी पाठवलं तर बरं होईल."

"ती जाणार तरी कुठं ? तिला दुसरीकडे कुठं आसरा आहे ? . . . तारिणी, सीतेला सुखी करण्याचा मला तरी एकच मार्ग सुचतो. तिनं घटस्फोट घ्यावा. पण हिंदू शास्त्रांत व ब्रिटिशाच्या इथल्या कायद्यात तशी तरतूद नाही. त्यामुळे तिला दुःखातच तडफडत मरावं लागणार !"

"माझ्याही मनात कधीतरी असा एक विचार डोकावून गेला . . . दक्षिणेत मामेभावाशी आतेबहिणीचं लग्न लावण्याची प्रथा आहे. त्यानुसार सीतेचं तुमच्याशी लग्न झालं असतं तर ती सुखी झाली असती !"

"मुळीच नाही ! तुमची कल्पना अगदी चूक आहे ! माझ्या मनात आत्येबदल जो आदरभाव होता, त्यानंच तिच्या मुलीबदल मंगल-कामना जागृत केली होती. तसं पाह्यलं तर तिच्या-माझ्यात वैचारिक साम्य नाही. तिचे विचार अन् माझं उद्दिष्ट यात ताळमेळ बसत नाही. सीता आहे फुलपाखराच्या जातीची. तिला नटण्या-मुरडण्याची, थाटामाटाची चटक आहे. सभा-सम्मेलनात मिरवण्यात तिला जन्माचं सार्थक वाटतं . . ."

"हे तर सीतेचे उपजत गुण नव्हेत नं ? इतरांकडे पाहून जडलेल्या सवयी आहेत नं ? याबद्दल तिला दोषी समजणं हा कुठला न्याय आहे ? तुम्ही त्वरित जाऊन सीतेला भेटून घ्या. मी तिला भेटून वीस दिवस झाले आहेत. यावेळी ती कोणत्या अवस्थेत असेल, याची मला काळजी पडली आहे. . ."

" बरं आहे ! मी तिला भेटून येतोच... उद्या आपण याच जागी भेटू या का ?"

" नको बाई ! जरा भोवताली चौकस दृष्टी फेका म्हणजे आपल्यावर किती डोळे रोखून आहेत याची सहज कल्पना येईल. उद्या आपण आपल्या बिऱ्हाडी भेटू. तुमच्या भ्रमंतीतील अनुभव ऐकण्यासाठी आपले मित्र आसुमले आहेत. उद्या याच-वेळी घंटाघरापाशी या. इंदूलाल पोलिसवाला तिथं तुम्हाला भेटेल अन् बिऱ्हाडी आणून सोडील... आतासुद्धा माझ्यासोबत येऊ नका. जोपर्यंत मी त्या पोलिसा-जवळ जाऊन पोचत नाही, तोपर्यंत इथंच बसून राहाल तर बरं ! "—एवढं बोलून तारिणी उठून चालू लागली.

सूर्या तिथंच बसून तारिणी व पोलीस दृष्टिआड होईपर्यंत त्यांच्याकडे अनिमिष नेत्रांनी पाहात होता...

तारिणी नजरेआड झाल्यावर सूर्यानं तिथून निघायचं ठरवलं. तेवढ्यात जरा अंतरावर बसलेली तीन माणसं त्याच्या दिशेनं येताना त्याला दिसली, तेव्हा ती माणसं जवळ येण्याची वाट पाहात तो जागेवरच बसून राहिला.

ते तिघं त्याच्या जवळ आले अन् त्याच्याभोवती बसले.

त्यांच्यापैकी एकानं विचारलं, " काय भय्या, तुम्ही कुठले ? "

" मद्रासचा. "

" इथं एक मुलगी बसली होती नं, तिचं तुमचं काय नातं ?

" माझी मैत्रीण आहे ती ! "

" अरे वा ! तुमची मैत्रीण काय ? " तिघांनी एकदम विचारलं.

थोडा वेळ कोणीच काही बोललं नाही. सूर्याचा संयम सुटला. त्यानं करड्या आवाजात विचारलं, " तुम्हाला काय हवं आहे. तुम्ही मला हे का विचारता ? "

" फार चांगला प्रश्न विचारलात. आम्ही काही विचारायलाच आलोत. तेव्हा विचारल्याशिवाय थोडेच जाणार ? "— एकानं म्हटलं.

" तर मग सांगायचं ? " दुसऱ्यानं सोबत्यांना विचारलं.

" सांगायचं. " इतरांनी प्रश्नाची पुनरुक्ती केली.

त्यांच्यामधील पहिल्या माणसानं विचारलं, " तुम्हाला रुपये हवेत का ?"

" किती रुपये ? " सूर्यानं विचारलं.

" विचारतोय की किती ? सांगू का." दुसऱ्या दोघांकडे पाहुन पाहिल्यानं प्रश्न केला.

" हो, सांगून टाक. " दोघांनी म्हटलं.

" तुम्हाला एक लाख रुपये पाह्यजेत ? पूरे एक लाख ! "

सूर्या चांगलाच हैराण झाला. मग सावधपणे बोलला, " खरे रुपये का बनावट नोटा ? "

" हाः, हाः हाः ! बनावट नोटा काय ? " तिघं मोठ्यानं हसले

मग पहिला माणूस बोलला, " भय्या, बनावट नोटा नाहीत अगदी अस्सल रुपये देऊ. नोटा नको असल्यास शंभर नंबरी सोनं मिळेल ! "

शेवटी एक माणूस विचकत-विचकत म्हणाला, " एक लाख रुपये फुकट नाही मिळणार ? आमच्या एका कामात मदत कराल तरच मिळतील."

" आनंदानं ! तुम्हाला कसली मदत हवी ? "

" थोड्या वेळापूर्वी तुम्ही एका मुलीशी बोलत होते नं ? तिला आणायचा आदेश एका मोठ्या ठिकाणाहून मिळाला आहे. या कामात तुम्ही आम्हाला मदत कराल तर एक लाख रुपये मिळतील ! "

सूर्या अशाच काही तरी भयंकर गोष्टीची अपेक्षा करीत होता. तो रागानं लाल झाला. पण दुसऱ्याच क्षणी त्याच्या लक्षात आलं, की रागावून काहीच फायदा नाही. ते तिघं होते. चांगले धष्टपुष्ट होते. त्यांच्याशी भांडण केलं तर आपली कामं राहून जातील म्हणून त्यानं आपला राग गिळून टाकला. थोडा वेळ विचार केल्यासारखं दाखवून त्यानं म्हटलं, " दोन दिवसांचा अवधी द्या. विचार करून सांगतो. "

" ठीक आहे. आपण कधी भेटायचं ? "

" तुम्ही कुठं राहता ? –" एकानं विचारलं.

" सध्या तरी माझ्या राहण्याचं ठिकाण निश्चित नाही. आता कुठं तरी शोधावं लागेल. –" असं म्हणून सूर्य उठला. तेसुद्धा उठले.

सूर्या जिथं गेला तिथं ते तिघं थोडं अंतर ठेवून त्याचा पाठलाग करीत होते.

त्यामुळेच सूर्याला विनाकारण गल्ल्या-बोळांतून भटकावं लागलं. त्यांना चकवून त्यांच्या नजरेतून निसटण्याच्या प्रयत्नात त्याचा खूप वेळ गेला. बरीच रात्र झाली. तरी कसंही करून सीतेला भेटायचंच असा त्यानं निश्चय केला !

27

सीता आपल्या घरात एकटीच बसली होती.

भिंतीवर टांगलेल्या घड्याळाची टिक् टिक् सुरू होती.

सीतेच्या हृदयाचीसुद्धा घड्याळाच्या ठोक्यासारखी धडपड सुरू होती.

रात्रीचे साडेअकरा वाजून गेले होते. तिच्या आयुष्यातील शेवटचा अर्धा तास शिल्लक राहिला होता !

या अर्ध्या तासात तिला कितीतरी कामं उरकायची होती !

मुलीच्यासाठी पत्र लिहून ठेवायला हवं ! यांच्यासाठी चार ओळी लिहून ठेवणं बरं होईल ?

पण लाख प्रयत्न करूनही ती काहीच लिहू शकली नव्हती. आता मी कसं करू ?

ठीक बारा वाजता रिव्हॉल्वर चालवून आपली जीवनयात्रा संपवण्याचा सीतेनं ठाम निश्चय केला होता.

नऊ वाजताच तिन सौंदर्य-प्रसाधन केलं होतं. चांगले कपडे व दागिने घातले होते. मरायचं तर गबाळ्यासारखं का ?

तिनं आधी वासंतीला पत्र लिहायचं ठरवलं. पण वासंतीचं स्मरण होताच तिचं रडू अनावर झालं. 'हाय रे दैवा ! मुलीला डोळे भरून न बघताच मृत्यूला कवटाळावं लागतंय,' या विचारानं तिचं हृदय विदीर्ण झालं, बरं. पोरीला पत्रात लिहायचं तरी काय ?

ठीक आहे ! आधी ललितेला पत्र लिहावं असं ठरवून तिनं सुरुवात केली. 'प्राणप्रिय सखी ललिता.... ' पुढं लिहायला सुचेना. एकदम जुन्या आठवणींनी मनात गर्दी केली ! अहाहा ! लग्नाआधी राजमपेट्टै इथं असताना ललिता आणि आपण एकमेकींच्या सहवासात आपापल्या हृदयातील गुपितं कशी उलगडून सांगत होतो. त्यामुळे दोघी कशा आनंदानं मोहरून जात होतो. त्यानंतर राघवन् ललितेला बघायला आला. त्यानं ललितेऐवजी आपल्याशी लग्न करण्याच्या गोष्टी काढल्या. त्या ऐकून आपलं हृदय आनंदानं मोहरून गेलं... या साऱ्या गोष्टी

एकापाठोपाठ एक आठवल्या. पण तेव्हाचं ते सुख कुठं गेलं ? आता या नरक-यातना कुठून नशिबी आल्या ?

ललितेला अशा अवस्थेत पत्र लिहून काय हाती लागणार ? ती आपल्या सुखी संसारात रमली आहे. तिच्यापुढं आपलं दुःख कशाला उगाळा ? समजा, तिनं माझ्या दुःखाबद्दल सहानुभूती प्रकट केली तरी तिचा मला मेल्यावर काय फायदा होणार ?

राघवन्‌ला पत्र लिहिण्याच्या विचारानं तिचं हृदय इतकं व्यथित झालं, की क्षणात दुभंगून जातं की याय ?

त्यांना मी लिहू तरी काय ?

“ या जगात तुम्हाला सोडून माझं कोणी नाही. तुम्हीच अंतर दिल्यावर उगीचच दुसऱ्यावर भार टाकून का राह्यचं ? यासाठी... ” असं लिहू ?

तुम्ही तर वाक्य-वाक्याला म्हणायचे, ‘ जाऊन मर, जा मर. ’ तुमच्या इच्छेनुसार मी एकदाची मरते आहे ! – असं लिहावं ?

अशा विचारांनी सीतेचं हृदय भरून आलं अन् डोळे आसवांनी डबडबले,

राघवन्‌नं तिच्यावर असंख्य अन्याय केले होते. तरी सुद्धा तिचं मन जेवढं दुखावलं नव्हतं तेवढं ‘ जाऊन मर एकदाची ’ या शब्दांनी दुखावलं, अगदी कासावीस झालं होतं.

तिला आपल्या घरी घेऊन जातील व ठेवून घेतील असे जवळचे आप्त तरी कुठे होते ? आई देवाघरी गेलेली. वडिलांचा पत्ता नाही. मग ती कुठं जाऊन मरणार होती ?

तिला मरण पत्करण्याखेरीज खरोखरीच दुसरा मार्ग नव्हता.

ह्यांनी पिस्तूल खरेदी केलं हे बरंच झालं ! त्यासाठी तरी ह्यांचे आभार मानायला हवेत. मग आभार प्रदर्शन करणारं पत्र लिहावं का ?

अय्या ऽ या मेल्या घड्याळाला एवढी कसली घाई झाली आहे ? हे का बरं इतक्या वेगानं चाललंय ? माझ्या हृदयाची धडधड तरी का वाढली ?

अग बाई ! बारा वाजायला आलेत. फक्त काही मिनिटंच उरलीत.

साडेबाराला ते येतील. ते येण्याआधी आपला बेत पार पाडायला पाहिजे. घरात हे असताना आपण असं केलं तर उगीच यांच्यावर खुनाचा आरोप यायचा. वासंतीची आई गेली तरी तिला बापाचं छत्र राहील.

उरलेली मिनिटं संपली. घड्याळाने टण् टण् करून बारा ठोके दिले. सीतेनं ते बरोबर मोजले, बाराव्या ठोक्याला पिस्तुल हातात घेतलं...

इतक्यात कुणाच्या तरी येण्याची चाहूल लागली. सीतेच्या हृदयाचे ठोके एकदम थांबले. तिचे हात निर्जीव झाले....

कोण येत असेल ? राघवन् तर नसतील ? ते आधी तर नाही आले ?

माझ्या हातात पिस्तुल पाहून मी काय करीत असेन याची त्यांना कल्पना येणार नाही का ? मग माझ्या अंतःकरणातील वेदनेचा थांग त्यांना लागेल. लाचार होऊन माझी क्षमा मागतील.

पायांची चाहूल अगदी जवळून आली तरी तिनं मागं वळून पाहिलं नाही. कशाला वळून पाहायचं ?

आलेली व्यक्ती सीतेच्या मागं येऊन थांबली. चटकन् हात पुढं करून पिस्तुल हिसकावून घेतलं अन् दटावणीच्या आवाजात हाक मारली, " सीता ! "

तो आवाज राघवन्चा नव्हता. सीता चकित झाली. तिनं मागं वळून पाहिलं. सूर्या उभा होता. सूर्याला बघून तिची घोर निराशा झाली. त्याच क्षणी तिच्या मनानं कलाटणी खाल्ली. आता तिनं जीव देण्याचा विचार बदलला अन् जितकं जगता येईल तितकं जगण्याचा निर्धार केला, हा निर्धार राघवन्ला मनस्ताप देण्यासाठी होता.

" सूर्या, तू होय ? चांगली वेळ साधून आलास बाबा, ये. "

" छे : वेळ कसली साधली ? तू जे करायला निघाली होतीस त्यात माझ्या येण्यानं अडथळा मात्र आला. "

" अय्या ! मी काय करणार होत्ये असं तुला वाटलं ? "

" ऐन मध्यरात्री हातात पिस्तुल धरून काय केलं जातं ? "

" चुकन चोर आला तर त्याच्यावर रोखण्यासाठी असू शकतं. दुसरं काय समजलास तू ? अस्सं, अस्सं ! तुला काय मी आत्महत्या करीत होत्ये असं वाटलं ? मी तो वेडेपणा करायची नाही. "

" तसं असलं तर मला फार आनंद होईल. पण तुझा ओढलेला चेहरा अन् आसवांनी भरलेले डोळे पाहून कुणीही माझ्यासारखाच समज करून घेईल. शिवाय इकडनं जे पत्र आलं होतं त्यातसुद्धा तसं समजायला भाग पडलं. "

" पत्र कोणी लिहिलं होतं ? "

" कोणीही लिहिलं असूदे, त्याची तुला कसली काळजी पडलीय् ? "

" बरं बाबा राह्यलं. पण काय लिहिलं होतं हे तरी सांगू शकतोस नं ? "

" तू फार मनस्तापात आहेस. तरी तुझ्या जिवाला कसला घोर लागला आहे, तुला काय त्रास आहे, हे बघण्यासाठी आलो. तसं काही नसलं तर माझी काळजीच मिटली. माझ्या मागं कितीतरी कामं आहेत. चलतो तर मी. "

" सूर्या, आता तुझ्यापासून काय लपवायचं ? मला तुझ्या मदतीची फार गरज आहे. म्हणून तर तू चांगली वेळ साधून आलास असं मी म्हटलं. पिस्तुल झाडून मी आत्महत्याच करीत होत्ये रे सूर्या. मरण्याआधी माझ्या बाबूला पत्र लिहावंसं वाटलं. तरी वेळेवर काही सुचलं नाही. तुला निरोप सांगून ठेवते. तिकडे जाण्याचा योग येईल तेव्हा तिला नक्की सांगशील नं ? मद्रासला तर कधी तरी जाशीलच. "– सीतेनं दुःखित स्वरात म्हटलं.

" अग ताई एवढ्यातच मी मद्रासला व देवपट्टणला जाऊन आलोय्."

" मग मला सांग, तू वासंतीला बघितलंस का ? " सीतेनं आतुरतेनं विचारलं.

" बघितलं तर ! तुझ्या सासू-सासऱ्यांनादेखील भेटलो. "

" वासंतीचं कसं आहे ? तुझ्याशी ती काही बोलली का ? "

" तशी तिची प्रकृती चांगली दिसली. मात्र आपल्या आईबापाला भेटण्यासाठी ती फार आतुर दिसली. अशा फुलासारख्या गोड मुलीला मागं सोडून रिव्हॉल्वरनं आपली सुटका करून घ्यायला तुझं मन धजलं तरी कसं ? मला तर मोठं नवल वाटतं बुवा ! "

" यावरून तरी तुला माझ्या अवस्थेची नीट कल्पना यायला हवी सूर्या ! आपल्या उदरात वाढलेल्या पोरीला दृष्टिआड ठेवून मी आत्महत्येला तयार झाल्ये याचाच अर्थ काय ? हाच नव्हे का की मी नरकात पडल्ये आहे ! "

" ताई, स्वर्गसुख आणि नरक-यातना या कल्पनानिर्मित गोष्टी आहेत. 'आपण चांगले तर जग चांगलं' हे तू ऐकलं आहेस ना ? मनुष्य आपल्या मनोवृत्तीला अनुसरून देवाचं किंवा दैत्याचं राज्य निर्माण करतो अन् सुखदुःख भोगत बसतो. "

हा तुझा वेदान्त माझ्या बाबतीत निरुपयोगी आहे. तुम्ही सर्वांनी मिळून मला या नरकात लोटलं आहे. यांच्याशी लग्न करून मी मोठीच घोडचूक केली बरं सूर्या. आमचं दोघांचं जुळत नाही. खरं तर यांनी एखाद्या मडमेशी

नाहीतर पारशिणीशी लग्न करायला हवं होतं. तुझी ती तारिणी आहे नं, तिच्याशी किंवा अशाच एखादीशी.... "

" दुसऱ्यांबद्दल आपण कशाला बोलायचं सीता ?"

" बोलू नको तर काय करू ? ती माझ्या मार्गात आली नसती तर मला बोलायची काय गरज होती ? ती तारिणी अन् माझी सासू या दोघींनी संगनमतानं मला विष देऊन ठार करायचं ठरवलं होतं. तेसुद्धा केव्हा, आजारानं मी बिछान्याला अगदी खिळून होत्ये तेव्हा ? "

" ताई तुला वेड तर नाही ना लागलं ? अग, तू मृत्युशय्येवर असताना त्या दोघींनी रात्रंदिवस तुझी सेवाशुश्रूषा करून तुला मृत्यूच्या दाढेतून ओढून काढलं. त्याबद्दल असं कठोर बोलवतं तरी कसं तुला ? "

" त्यांनी माझी शुश्रुषा करून मला मरणाच्या दाढेतून सोडवलं हे तुला कसं कळलं ? त्यांच्याच संशयावरून ना ? बाबा रे पुन्हा तेच ते बोलून काय फायदा. मी अनाथ आहे. निराश्रित आहे. माझ्यावर कोण विश्वास ठेवणार ? तू तरी इथं कशाला आलास ? जा, चालता हो, आपल्या कामाशी काम असू दे. "– असं बोलून सीता अश्रू ढाळू लागली.

" मला आपल्याच कामाशी काम ठेवायचं असतं तर माझी सारी कामं बाजूला सारून, हजारो मैलांचा प्रवास करून इथं आलोच *नमतो. तू कसंही करून सुखी व्हावंस हीच माझी मनीषा आहे. त्यासाठी काय मार्ग आहे तेवढं सांग. तुझी आपल्या नवऱ्याबद्दल तकार तरी काय काय आहे ? बोल. मी त्याला खडसावून विचारतो. तो काही माझा शिरच्छेद करणार नाही. मला त्याची अजिबात भीती नाही ! "

" तुला नसेल भीती तरी मला आहे. तू त्यांच्याशी कसंही बोललास तरी माझा काहीच फायदा व्हायचा नाही. उलट, तुझ्यावर जो राग काढायचा तो माझ्यावर अगदी व्याजासकट काढून घेतला जाईल ! माझी त्यांच्याबद्दल काय तक्रार आहे असं तू विचारलंस. अरे, माझ्या हृदयावर जे आघात केते जातात त्यांचं वर्णन केलं तरी तुला नीट कळणार नाही. बायकांच्या जातीला कळत नाहीत तिथं तुला कसं कळणार ? . . . ' पार्टीला चल ! ' असं सांगून एखाद्या समारंभाला घेऊन जातात. तिथं यांचं मन राखण्यासाठी काहीही करावं तरी यांच्या दृष्टीनं ते चुकीचं ठरतं आणि ते दोष शोधत बसतात. समजा मी

चारचौघींत मोकळेपणानं बोलू लागले तर म्हणतात, ' वडवडी कुठली ! आपल्या मूर्खपणाचं प्रदर्शन कशाला करत्येस इथं येऊन ? जरा तोंडाला कुलूप नाही का घालता येत ? अशानं माझी प्रतिष्ठा धुळीत मिळते. ' त्यांच्या अशा टीकेच्या धाकानं गप्प राह्यलं तरी डिवचनात, ' अशी मुखस्तंभासारखी का राहत्येस ? चारचौघींत मिसळत का नाहीस ! तुझ्यासारख्या अडाणी बाईशी लग्न करून फार मोठी चूक केली ! ' हसले नाही तर विनोद न कळणारी मूर्ख ठरत्ये. रडल्ये नाही तर सहानुभूतिशून्य अशा पदवीने टोमणे मारले जातात. चारी बाजूंनी येणाऱ्या यांच्या वाग्बाणांनी विद्ध होऊन एका कोपऱ्याने रडत बसावं तरी सुटका नसते. किंचाळून म्हणतात, ' असा माझा जीव का खात्येस ? त्यापेक्षा मरत का नाहीस ? ' जेव्हा पाहावं तेव्हा ' जा मर एकदाची ' असा जप सुरू असतो. ऐकून ऐकून माझ्या हृदयाची चाळणी होऊन गेली आहे. यातून सुटका करून घेण्याचा मरणावाचून दुसरा मार्गच उरला नाही. म्हणून तेवढा रिव्हॉल्वर परत देऊन जा ! "

" ताई, जीव देण्याची भाषा सोड. तशी काही तू अगदीच निराश्रित नाहीस. माझ्या जिवात जीव आहे तोपर्यंत मी तुला निराधार सोडणार नाही. जीवनात कितीही यातना असल्या तरी त्यापासून सुटकेचा मार्ग असणारच. काही दिवस धीर धर. मी विचार करून काही तरी शोधून काढतोच ! "

" आता मी एक दिवसदेखील धीर धरू शकत नाही. जगण्यासाठी मला एकच मार्ग सुचतो. पण तो तुला मान्य होणार नाही. "

" सांग तरी कोणता मार्ग सुचतो ते. मला मान्य असला तर. . ."

" मला इथून बाहेर घेऊन चल. ही दिल्ली माझ्या दृष्टीनं नरकासारखी आहे. मला कुठंही ने. मी डोळे झाकून येते. मुंबई, कलकत्ता, लाहोर, लंका, लंडन, अमेरिका किंवा तू जिथं म्हणशील तिथं मी यायला तयार आहे. "

" ताई, तशी वेळ आलीच अन् तसं करणं भाग पडलंच तर या सर्व ठिकाणी, तुला अवश्य घेऊन जाईन. मात्र त्यासाठी ही वेळ योग्य नव्हे. भारताच्या स्वातंत्र्य-लढ्यात मी गुंतलो आहे. आणि मी आपल्या मित्रांच्या मेळाव्यात अशी शपथ वाहिली आहे की, देश स्वतंत्र होईपर्यंत मी दुसऱ्या कोणत्याच कामात लक्ष घालणार नाही. भारत एकदा स्वतंत्र होऊ दे. नंतर. . ."

" तर मग एक काम कर. मला महात्मा गांधींच्या आश्रमात नेऊन

सोड. तिथं माझ्यासारख्या अनेक दीनदु:खी स्त्रिया राहतात असं ऐकलं आहे. तिथं एक विलायतेवरून आलेली अन् एक मुसलमान स्त्रीसुद्धा आहे म्हणे !–भारत स्वतंत्र होईल तेव्हा तू मला घेऊन जा. चालेल ? ''

" ताई, महात्माजी सध्या तुरुंगात आहेत. त्यांच्या आश्रमात आता कोण आहे हे कळलं नाही. त्यांच्या अनुपस्थितीत आता कुणालाच नव्यानं घेणार नाहीत ! ''

" मग असं कर ! मला एखाद्या चांगल्या सिनेमा कंपनीत भरती करून दे. बघ मी आपल्या अभिनय-कौशल्यानं नाव काढत्ये की नाही ? मी कितीतरी तामीळ व हिंदी बोलपट बघितलेत. करुण रसाच्या भूमिका कोणालाच जमत नाहीत. मला सिनेमात काम करण्याची संधी मिळाली तर शोकपूर्ण भूमिका अशी करून दाखवीन की बघणारे तोंडात बोट घालतील, अन् मला अद्वितीय सिनेतारका म्हणू लागतील. तुला काय वाटतं सूर्या ? ''

सूर्या काय बोलणार ! सीतेचं बोलणं ऐकून तो थक्क होऊन गेला ! गांधीजींच्या आश्रमात जाणं कुठं अन् सिनेमात जाणं कुठं ? आपल्या आते-वहिणीच्या या विचित्र मन:स्थितीचं त्याला खूपच आश्चर्य वाटलं, सीतेला वेड तर लागलं नाहीना ? . . . शेवटी त्यानं ठरवलं आज चार शब्द सांगून कशीतरी सीतेची समजून घालावी. उद्या तारिणीच्या सल्ल्यानं पुढचं पाऊल टाकता येईल. ''

" ताई, मला सिनेमाची काही माहिती नाहीय्. सिनेमावाल्यांशी ओळख पण नाही. त्यामुळे त्या बाबतीत मी काहीच करू शकल नाही. मात्र तू काही दिवसांसाठी कुठं जात असलीस तर त्यासाठी पुष्कळ ठिकाणं आहेत. देवपट्टणम्ला तुझी मैत्रीण ललिता आहेच. तुझ्या आठवणीनं ती कासावीस होते. या जगात तुझ्यावर ललितेइतकं प्रेम करणारं कोणी नसेलच. तू आपल्या जीवनात सुखी नाहीस असं ऐकल्यापासून तिचं हृदय फाटून गेलं आहे. ललितेचा नवरा पट्टाभिरामन् सध्या तुरुंगात आहे. तो माझा जिवलग मित्र आहे हे तुला ठाऊक आहेच. ललितेचे सासरेसुद्धा फार चांगले आहेत. तू देवपट्टणम्ला जाऊन वाटेल तितके दिवस राहू शकतेस. तिथंच तुला वासंतीला बोलावून घता येईल. ''

" ललितेचं माझ्यावर किती प्रेम आहे हे काय मला कळत नाही ? सूर्या, ती सुखी आहे हे ऐकून माझंही मन सुखी होतं. पण तुला माझी भूमिका

कळली नाही. मी कुठं गेल्ये हे यांना अंदाजानंही कळू नये. मी देवपट्टणम्ला गेल्ये तर चारदोन दिवसांत यांना कळून येईल. त्याचा काही उपयोग नाही. न्यायचंच असलं तर अशा लांबच्या प्रदेशात ने, की हे, मला इकडे शोधत फिरतील अन् चितेनं हैराण होतील. नाहीतर तू इथून चालायला लाग ! आपल्या कामाशी काम असू दे !"

" अग, आपण कुणाला काही न सांगता दोघंच कुठं निघून गेलो तर तुझ्या नवऱ्याला काय वाटेल अन् इतर लोक काय अर्थ लावतील ? लोकांनी भलताच गैरसमज करून घेतला तर कसं ? यावर तू विचार तरी केलास का?"—सूर्यानं विचारलं.

" भलतं समजले तर समजोत. मला त्याची काही पर्वा नाही. तीन महिन्यापूर्वी यांनी काय केलं ते कळलं ? कुण्या पोरीला आपल्या गाडीत कुठं घेऊन गेले. पानिपतजवळ यांची गाडी अन् मिलिटरी लॉरी यांची टक्कर झाली. यांना फार दुखापत झाली नाही. त्या मुलीला मात्र चांगलाच मार लागला. ही गोष्ट इथं कळली. लोक फक्त हसले. त्यासाठी यांना कोणी काय केलं ? पुरुषांनी मनाला येईल ते करावं असं कोणत्या कायद्यात सांगितलं आहे ? "

" ताई, तसा कायदा नाही हे खरं ! वाईट काम पुरुषानं केलं काय किंवा स्त्रीनं केलं काय वाईटच. म्हणूनच मी तुझं ऐकायला तयार नाही. माझ्या मनाला आणखी एक उपाय सुचतो आहे. देवपट्टणम्ला माझे दोन स्नेही आहेत हे तुला माहीत आहे—एक ललितेचा पती पट्टाभिरामन् आणि दुसरा अमरनाथ. तो व त्याची बायको कलकत्त्याला असतात. दोघं सुस्वभावी आहेत. नुकताच मी देवपट्टणम्ला गेलो होतो तेव्हा योगायोगानं ती दोघं तिथं आली होती. ललितेनं चित्राजवळ तुझ्याबद्दल सारं काही सांगून टाकलं. म्हणून मला वाटतं, तू कलकत्त्याला जावंस. एखाद्या आडगावच्या स्टेशनावर मी तुला गाडीत बसवून देईन. कलकत्त्याला काही दिवस चित्राकडे आराम कर. तशी गरजच भासली तर मी तुझ्या नवऱ्याला तुझा ठावठिकाणा सांगेन."

" नको ! मी कुठं आहे याचा त्यांना पत्ता लागायला नको. त्यांना माझ्याबद्दल कळवणं, न कळवणं माझ्यावर सोपव. मी कलकत्त्याला जायला तयार आहे. मात्र आज वा उद्या तूच मला तिथं पोचवायला पाहिजे. उद्याच्या नंतर मी इथं राहू शकत नाही. तशीच मी एकटी जाऊही शकत नाही. तू मला

कलकत्त्याला पोचवावं हे कदाचित् तारिणीला आवडणार नाही. मात्र तुला तिची भीती वाटत असली तर तसं आताच सांगून टाक."

"सीताताई, तुझ्या मनावर कशा विचित्र विचारांचा पगडा बसला आहे हेच कळत नाही! मला कोणत्याही गोष्टीसाठी कुणाची भीती नाही. पण आपण जे करतो ते आपल्या मनाला पटायला नको? तरीपण विचार करायसाठी मला थोडा अवधी दे."

"आनंदानं देत्ये हं! चांगला विचार करून मगच उत्तर दे, मात्र जो काय विचार करायचा तो आत्ता इथंच. तुझा निर्णय आताच हवा.–खरंच सूर्या तू किती दिवसांनी आलास बाबा, मी मात्र तुला अजून पाणी हवं का, असं-सुद्धा विचारलं नाही. तू विचार करीत बैस. तोपर्यंत मी ओव्हल्टिन तयार करून आणते."

सूर्याचं मन द्विधा झालं. 'अरे, हे मी काय करून बसलो? केवढं भयंकर काम करायचं ठरवलं? याचा परिणाम काय होईल? चांगला की वाईट? अरे देवा, या धर्मसंकटातून सुटण्याचा एखादा मार्ग नाही का?"

एवढ्यात फोन खणाणला......

आपल्या विचारांच्या तंद्रीत त्यानं रिसीव्हर उचलला. मध्यरात्री राघवन्‌चा सोडून कोणाचा फोन असणार याचंही अवधान राहिलं नाही, त्यानं विचारलं. "हॅलो! कोण आहे?"

फोनचा आवाज ऐकून सीता लगबगीनं स्वयंपाक घरातून बाहेर आली. सूर्यानं फोन उचलून बोलायला सुरुवात केलेली पाहून तिच्या चेहऱ्यावर भीतीची छाया पसरली !

28

रजनीपूरचे भूतपूर्व दिवाण आदिवराहाचार्य आता कायमचे दिल्लीत येऊन राहिले होते. भारतीय संस्थानिकांना कायद्याचा सल्ला देण्याचं कार्य त्यांना करावं लागे. या नव्या नोकरीत काम कमी अन् प्राप्ती चांगली होती. त्यांचा

वचकदेखील चांगलाच होता. नव्या दिल्लीमधील सामाजिक जीवनात त्यांच्या दोघी मुली मिरवू लागल्या, व्हाइसरॉयच्या निवासात होणाऱ्या पार्ट्या, संस्थानिकांनी आणि वड्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या मेजवान्या, यांना त्या दोघी आवर्जून हजर असत.

त्या दिवशीसुद्धा त्या दोघी आपल्या वडिलांसोबत कुठंतरी पार्टीला गेल्या, या रात्री अकरा वाजता घरी आल्या. सुंदर राघवन् तिथून त्यांच्याच सोबत त्यांच्या बंगल्यावर आला होता. मग ते चौघेजण पत्ते खेळत बसले होते.

खेळ व्यवस्थित चालू झाल्यावर काही वेळानं भामानं विचारलं. "मिस्टर राघवन्, तुम्ही आपल्या सौभाग्यवतीला पार्टीला का नाही आणलंत ? त्यांची प्रकृती नर बरी आहे ना ?"

"तशी सध्या तरी तिची प्रकृती बरी आहे. पण आजारापासून का कोण जाणे, तिचं मन बरंच कमजोर बनलं आहे. मी घरी पोचलो, की काही तरी तक्रार करून सारखी रडारड सुरू करत्ये." राघवन् म्हणाला.

"त्या जर एवढ्या आजारी आहेत तर त्यांना हवापालटासाठी कुठं तरी पाठवायला हवं. इथंच ठेवून घेणं बरं नाही." धामा म्हणाली.

"ते तर मलाही माहीत आहे. कितीतरी वेळा मी तिला म्हटलं, मद्रासला माझ्या आईकडे जाऊन राहा. तिथूनच आपल्या नातलगांना भेटून ये. पण ती ऐकतच नाही त्याला काय करायचं ? मोठ्याच अडचणीत सापडलोय मी. ऑफिसात जावं तर तिथं वेगळीच डोकेदुखी सुरू आहे. घरी यावं तर हिची डोकेदुखी. जीवाला जरा चैन नाही ! कधी कधी तर आत्महत्या करावीशी वाटते. इथं येऊन केव्हातरी बसलं, गप्पा मारल्या म्हणजे तेवढंच हलकं वाटतं !"

"घरातल्या असंतोषाचं कारण लक्षात आलं. पण ऑफिसात तुम्हाला कसला बरं त्रास आहे ?" धामानं विचारलं.

"आपल्या वडिलांनाच विचारा. सांगतील ते. दिवाणसाहेब, मला तर हल्ली मुसलमान व्हावसं वाटू लागलंय ! आपल्याला काय वाटतं ? "

" ही काय भानगड आहे ? तुम्ही का बरं मुसलमान होता ?" भामानं आश्चर्यानं विचारलं.

"आजकाल तर मुसलमानांसच सरकारी नोकरीत बढती मिळते. मी नोकरीला लागल्यावर तब्बल चार वर्षांनी एकाची नियुक्ती झाली. तो एका उडीत माझ्याहून वरच्या हुद्द्यावर पोचला. गेल्या वर्षी तो मला 'जी हुजूर!'

करायचा. आता तो वरच्या जागेवर गेला आणि सध्या मला त्यालाच ‘ जी हुजूर !’ करावं लागतं......दिवाणसाहेब, योग्य सल्ला देऊन मला मार्गाला लावा ! मी इस्लाम धर्म स्वीकारू की या नोकरीचा राजीनामा देऊन टाकू ? ”

आदिवराहाचार्यांनी पहिल्यांदाच तोंड उघडलं, “ तुम्ही दोन्ही गोष्टी करू नका. थोडे दिवस धीर धरा. ”

“ धीर धरून काय होणार ? मला एखाद्या संस्थानात चांगली नोकरी मिळवून द्या ना ? ” राघवन् म्हणाला.

“ होय बाबासाहेब ! आपण यांची कुठं तरी शिफारस करून वर्णी लावून द्या ! ”—भामानं दुजोरा दिला.

“ मी तर प्रयत्न करतोच आहे. तरी तुम्ही राजीनामा देऊ नका. एक नोकरी असतानाच दुसरीकडे जाणं बरं. हातचं सोडून पळत्याच्या पाठी लागण्यात अर्थ नाही. ही नोकरी सोडली तर दुसरी सहजासहजी मिळेलच असं नाही. काय ? ” आदिवराहाचार्यांनी सल्ला दिला.

“ काय हो मिस्टर राघवन्, तुम्हाला नोकरीत बढती न मिळण्याचं कारण तुम्ही हिंदू आहात हेच की आणखी काही वेगळंच आहे ? ” धामानं विचारलं.

“ मी मद्रासी आहे हेसुद्धा एक कारण आहे. हे लोक आता मुसलमानांना ‘ प्रेफरन्स ’ देऊ लागले आहेत. मुसलमान नाहीच मिळाला तर अक्कलशून्य महामूर्खांना घेतील. मद्रासी मात्र यांच्या डोळ्यात खुपतात. ”

आदिवराहाचार्य आता स्वतःच त्यांच्यामधे पडून म्हणाले, “ भामाला ते नाही विचारायचं राघवन् ! तुमच्यावर एक आरोप असून त्याची साऱ्या दिल्ली-भर चर्चा सुरू आहे. काय, तुम्हाला नाही माहिती ?”

“ नाही बुवा ! कोणता आरोप आहे ? ” राघवन्नं आश्चर्यानं विचारलं.

“ आरोप असा, की तुम्ही एका क्रांतिकारी मुलीला आपल्या घरी आश्रय देऊन लपवून ठेवलं. हे खरं आहे का ? ”

“ ओ हो ! आपण तारिणीसंबंधी म्हणता का ? ती क्रांतिकारी चळवळीत सामील आहे हे अगदी खोटं आहे. खरं मी तिला आपल्या घरात लपवून ठेवलंच नाही. सीता आजारी असताना ती स्वतःच माझ्याकडे येऊन राहिली. तिनं सीतेची सेवाशुश्रूषा करून तिला जीवदान दिलं. तारिणी तशी साधीभोळी, तरी बुद्धिमान आहे. आपल्या मुलींना हे माहीत आहे ” राघवन् म्हणाला.

" अहो, पण ती साधीभोळी अन् बुद्धिमान आहे म्हणून ती क्रांतिकारी नसेलच असं कसं म्हणता येईल ? " भामानं विचारलं.

" ती क्रांतिकारी आहे असं गृहित धरलं तरी त्याची जबाबदारी माझ्या-वर कशी ? ती क्रांतिकारकांच्या चळवळीत आहे याचा मला कसा पत्ता लागणार ? याच दिल्ली शहरात कितीतरी क्रांतिकारक पुढारी मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या घरात लपून राहिले होते. करुणावतीदेवी कुठं लपून राहिल्या ? चंद्रकांत सिन्हा पुरे तीन महिने कुणाच्या घरात लपून होता, हे काय आपल्याला माहीत नाही ? त्यांना आश्रय देणाऱ्यांचं कोणी काय वाकडं केलं, फक्त माझ्यावरच दोषारोप का ?"

" ते सर्व वरच्या हुद्द्यावरचे अधिकारी होते. त्यांच्यावर आरोप कोण करणार ? तुमची गोष्ट वेगळी आहे. तुम्हाला अजून नोकरीत बढती मिळवायची आहे ! "

" केवळ एवढंच नाही काही बाबासाहेब ! यांची पत्नी सीता कुण्या क्रांतिकाराला मदत करते असाही प्रवाद आहे. इथून मद्रास प्रांतात एक पत्र गेलं होतं. त्यात त्यांच्या पत्नीचा उल्लेख होता म्हणतात. कालच एका पार्टीत एका गुप्त पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यानं मला सूर्यनारायणन् आणि सीता यांच्या नात्यासंबंधी विचारलं. मला काहीच ठाऊक नाही असं मी सांगून टाकलं. मिस्टर राघवन्, त्या दोघांचं खरोखरच काही नातं आहे का ? " भामानं विचारलं.

" नातं आहे ना. सूर्या तिचा मामेभाऊ आहे अन् ही त्याची आतेबहीण आहे. बरं, पण त्याच्यावर पकड वारन्ट आहे का ? आपल्याला काही कल्पना आहे ? "

" का नाही ? मद्रास, मुंबई आणि मध्यप्रांत यांत वारंट आहेत !"

" अस्सं! सूर्यासारख्यांना तुरुंगात डांबूनच देशाचं कल्याण होईल अन् स्वातंत्र्याची चळवळ पावन होईल !" असं बोलत राघवन् फोनजवळ गेला.

" एवढ्या उशिरा आपण फोनवरून कोणाशी बोलणार ?" भामा म्हणाली.

" माझी बायको झोपली की नाही, याची खात्री करून घेतल्यावरच मी घरी जातो, ती जागी असताना मी घरी गेलो तर शब्दांच्या नांग्या मारून ती दोघांच्याही झोपेचं खोबरं करून टाकत्ये. मग ती रात्र शिवरात्र होऊन जाते! "

" अरे ! आपल्या अवस्थेची कीव येते !" भामा उद्गारली.

सुंदर राघवन्नं आपल्या घरचा नंबर फिरवला. फोनवरून बोलणाऱ्या व्यक्तीचा आवाज ऐकून त्याच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. तो रागानं वेडापिसा होऊन गेला.

इकडे फोनवर राघवन्चा आवाज ऐकून सूर्यानं सीतेच्या चेहऱ्याकडे बघितलं. त्याचा थरकाप उडाला. फोन उचलून आपण अनर्थ तर केला नाही, असं त्याला वाटलं.

राघवन् फोनवर बोलला, " कोण ? सूर्या का ? तू केव्हा आलास ? "

" आजच आलो. "

" मी येईपर्यंत थांबतोस ना ? "

" अवश्य ! – " एवढं बोलून त्यानं सीतेला म्हटलं, " ताई, जावईबापू बोलताहेत. " अन् त्यानं तिच्या हाती रिसीव्हर देऊन टाकला. रिसीव्हर कानाला लावताच सीतेचा चेहरा भीतीनं पांढराफटक दिसू लागला. राघवन् काय बोलला किंवा त्यानं काय विचारलं हे सूर्याला ऐकू आलं नाही. मात्र सीतेच्या डोळ्यात त्याला अश्रूंची गर्दी झालेली दिसली. ती म्हणत होती, " नाही तर ! आजच तर तो आला . . . बरं, बरं ! त्याला थांबायला सांगत्ये. " एवढं बोलून तिनं फोनचा रिसीव्हर खाली ठेवला.

" ताई, जावईबापू काय म्हणाले ? तुझ्या डोळ्यात हे अश्रू का आले ? " सूर्यानं चिंताग्रस्त स्वरात विचारलं.

सीता काही वेळ कुठंतरी पाहात गप्प राहिली. मग तिला एकदम रडू कोसळलं. ती रडत म्हणाली, " सूर्या, तू जा पाहू ! आत्ता निघून जा ! "

"ताई, हे तू काय सांगत्येस ? जावईबापूंनी तर मला थांबायला सांगितलंय ?"

" म्हणूनच तर मी तुला जायला सांगत्येय. मला पण तुला थांबवून घ्यायलाच सांगितलंय्. पण मला यात काही तरी काळबेरं दिसतंय्. सूर्या, तू आज इथं थांबलास तर धोका होण्याचा संभव आहे. तू सरळ चालायला लाग बरं !"

" मी जायची घाई केली तर त्यात आणखीच धोका आहे. त्यांनी मला थांबायला सांगितलंय. त्यांच्या मागे निघून गेलो तर उगीच संशयाला जागा होऊन जाईल. "

" अरे बाबा, संशयाचं बीज तर केव्हाच पडलं आहे. आता आणखी नव्यानं काय व्हायचं राहिलं ? तुला काही कळत नाही सूर्या. तू गेलास तर

पुण्य लागेल. उगीच मला नसल्या भानगडीत पाडू नकोस. झटपट चालायला लाग. तुझ्याकडून काही भलं होवो वा न होवो, निदान वाईट होऊ नये."

"ताई, एका गोष्टीची अगदी खूणगाठ बांधून ठेव ! खरोखरच तुला माझी मदत लागत असली तर निःसंकोच सांग. मी मुळीच डगमगणार नाही. तू आपलं मन घट्ट करून जे काय सांगशील ते करायला मी एका पायावर तयार आहे. तुझं हित तेच माझं कर्तव्य. देशाच्या गोष्टी नंतर.–" सूर्या बोलला.

"फार फार आभारी आहे भय्या. आईनं मला म्हटलं होतं, संकटाच्या वेळी सूर्याची मदत घे. तिचं म्हणणं निरर्थक नव्हतं. उद्या दुपार टळल्यावर फोन कर. तोपर्यंत मी विचार करून काय तो निर्णय घेते. तसं नसतं तर आताच मला घराबाहेर काढ असं म्हटलं नसतं ?"

सूर्या जायला निघाला. सीतेच्या हातून हिसकावून घेतलेलं रिव्हॉल्वर त्यानं आपल्या पॅन्टच्या खिशात सुरक्षित ठेवून दिलं होतं. या वेडपटांच्या घरी ते ठेवणं धोक्याचं आहे, त्याला वाटलं. माझ्या सोबत घेतलं तर कधीतरी कामास येईल . . .

तेवढ्यात मोटारीचा हॉर्न ऐकू आला. कार वेगानं येऊन थेट दारात उभी राहिली. सूर्या आणि सीता चांगलीच गडबडली.

राघवन् खाडखाड बूट वाजवत आत आला. त्यानं खाऊ का गिळू अशा थाटात पाळीपाळीनं सूर्या व सीता यांच्याकडे पाहून घेतलं. त्याच्या मनाचा क्षोभ डोळ्यांतून व्यक्त होत होता. तरी त्यानं तो बोलण्यातून प्रगट होऊ दिला नाही. संयमपूर्वक म्हणाला, " हे काय सूर्या ? तू जायला निघालास वाटतं !"

"होय साहेब, साडेबारा वाजून गेले आहेत. जायला पाहिजे. निरोप घ्यायसाठी आपलीच वाट पाहात थांबलो होतो.–" सूर्या बोलला.

"अरे, एवढ्या उशिरा कुठं जाशील ! तू तर पक्का निशाचर बनलेला दिसतोस ! "

"छे मला काही जरूरीची कामं आहेत. काही मित्रांना कबूल केलं आहे भेटायचं. त्यांना भेटायला पाहिजे."

"वा ऽ ! खूप बोललास. एवढ्या रात्री का कुठं मित्रांना भेटतात ? अन् आता भेटून करणार काय ? कुठं धाड-बिड घालायला तर नाही ना चाललात ?"

"धाड घालणारे रात्री जातात. तेव्हा त्यांना पकडणाऱ्यांना रात्रीच बाहेर पडावं लागतं ! आपल्या देशावर धाड घातलेल्यांना हुसकावून लावण्याचं काम

आम्ही पत्करलेलं आहे, हे तर तुम्हाला ठाऊक आहेच. ”

“ मला काय ठाऊक ? कदाचित तुझ्या ह्या बहिणीला जाणीव असेल. तिच्याशी तर तुझ्याबरोबर भेटीगाठी होतात नं. . . .”

“ कुठल्या आल्यात भेटीगाठी ? तीन महिन्यांपूर्वी असाच एकदा आलो होतो. तुम्ही तेव्हा बाहेरगावी गेला होतात. ”

“ बरं, बरं ! यावेळी तू कुठं-कुठं फिरून आलास ? तू म्हणे मद्रासला गेला होतास ! तिथली खबरबात ऐकायसाठी मी धावपळ करीत आलो. तेव्हा आता रात्री इथंच थांब. सकाळी कुठं जायचं तिथं जा. ”

“ नाही, नाही ! मला आताच जायला पाहिजे ! मद्रासला तुमच्या मातोश्रींना व मुलीला भेटलो. पोरगी इथं येण्यासाठी झुरत होती. मला रस्त्यात काही कामं होती. म्हणून मी तिला घेऊन आलो नाही. तूर्त एवढंच. बाकीच्या गोष्टी पुन्हा कधी येऊन अगदी सविस्तर सांगेन. ”

“ एखाद्या दिवशी येणार—म्हणजे कधी येणार ? ”

“ शक्य झालं तर उद्या नाहीतर परवा नक्की येतो. मग प्रवासातल्या गमती-जमती सांगेन. चालेल ?”

“ चालेल ! बरं उद्या कधी येणार ? असाच रात्री का ? ”

“ अर्थात् ! पोलिसांच्या नजरा चुकवून यायचं तर रात्रीच यावं लागतं. बाकी सर्व सोडा, पण माझ्यासाठी तुम्हाला व्यर्थ भानगडीत पाडू इच्छित नाही. आपण सरकारी नोकरीत आहात नं !”

“ अच्छा ! तरीच तुम्ही माझ्यावर एवढी कृपादृष्टी दाखवता आहात ! बरं हे सांग सूर्या, तुझी मैत्रीण तारिणी सध्या कुठं आहे ? तिची कधी भेट होते की नाही? ”

सूर्यानं सीतेकडे बघितलं. तिचा चेहरा कठोर दिमत होता. तो उत्तरला “ मला वाटतं, ती इथं दिल्लीतच आहे. कदाचित् भेटेनही तिला ! ”

“ भेटलास तर सांग, की मी एका महत्त्वाच्या कामासाठी तिला भेटू इच्छितो. तुला माहिती आहे का, ती कुठं राहत्ये ते ?”

“ जुना पत्ता माहीत आहे. पण आता ती तिथं राहत नाही. कुठं दुसरी-कडे राहायला गेल्याचं ऐकलं आहे. बरं मी येऊ? उशीर होतोय ! ”—असं बोलून सूर्या तिथून चालता झाला.

राघवन् ताठ्यात सोफ्यावरच बसून राहिला. त्याला पोचवायला उठला

नाही. सीता मात्र त्याच्या सोबत बाहेरच्या दारापर्यंत गेली. दारात उभी राहून ती हळूच म्हणाली, " सूर्या, माझ्या गळयाची शपथ आहे ! उद्या जरूर फोन कर हं ! "

" बऽरं ताई !" सूर्यानं म्हटलं.

29

दारापर्यंत सूर्याला पोचवून सीता घरात आली. तेव्हा राघवन् उठून उभा असल्याचं आणि डोळयातून आग ओकीत टवकारून तिच्याकडे बघत असल्याचं तिला दिसून आलं. " बोल, त्याच्याशी काय गुपित चाललं होतं ?" त्याचे ओठ रागाने थरथरत होते !

आपण काय बोलत आहोत याचं भान विसरून सीता म्हणाली, " माझं काहीही चाललं असेल. तुम्हाला त्याच्याशी काय करायचंय ?"

" काय म्हणालीस ? मला काय करायचंय ?" असं विचारत राघवन्नं फाडकन् तिच्या गालावर चपराक ठेवून दिली.

सीतेनं दात ओठ खात म्हटलं, " बस, इतकंच ? अजून दुसरा गाल राह्यला आहे नं ?"

" ओऽहोऽ ! एवढी हिम्मत ?ए महात्मा गांधीची बच्ची, घे कसर काढून टाकतो !" असं बोलून त्यानं दुसऱ्या गालावर चपराक लगावली.

सीतेनं एकदा त्याच्याकडे रोखून पाहिलं अन् ती स्वयंपाकघराकडे जाऊ लागली.

" चाललीस कुठं ? आधी माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. मग जा."

सीतेनं स्वयंपाकघरातून एका मगात ओव्हल्टिन आणून टेबलावर ठेवलं.

" हे शुद्ध ओव्हल्टिन आहे का त्यात विष घातलं आहेस ?" राघ्वननं फणकाऱ्यानं विचारलं.

" विष घातलं आहे !"

"तर मग तूच पिऊन टाक. पण नकोच... तुझंही या जगात काही काम शिल्लक राह्यलंय."— असं बोलून त्यानं मगातलं ओव्हल्टिन खिडकीतून बाहेर ओतून टाकलं.

"अशी मारेकरीण घरात ठेवून तुम्ही का कष्टी होता ? मी उद्याच इथून निघून जात्ये."– सीता म्हणाली.

"कुठं जाऊन मरणार आहेस ?"

"कुठंही जाऊन मरेन. तुम्हीच तर सारखे मला मरायला सांगताय– "

"आतादेखील तेच म्हणतोय. वाटेल तिथं जाऊन मर, मात्र त्यापूर्वी माझ्या प्रश्नाचं उत्तर दे."

"मरणाऱ्या माणसाला कसला प्रश्न अन् त्यानं काय उत्तर द्यावं ?"

"उत्तर द्यावंच लागेल. तुझ्या अन् सूर्याच्या बाबतीत मला संशय वाटतो. कळलं ?"

"संशय ! कसला संशय ?"

"कसला संशय ? तुमच्या चारित्र्याबद्दल. "

"ऐकून अत्यंत आनंद झाला."

"आनंद झाला काय ?"– राघवन्नं तिच्या एकाच गालावर दोन थपडा लगावल्या.

सीता तशीच उभी होती. तिच्या डोळ्यात अश्रुबिंदू नव्हता की चेहऱ्यावर भीतीचा लवलेश नव्हता...

"हे तर आणखी चांगलं. मला एकदाची मारून टाका म्हणजे मला उद्या पळून जायची गरज पडणार नाही ?"– सीता शांतपणे म्हणाली.

"तुझ्या मनात पाप आहे. हातून घडलेला अपराध लपवणं कठीण झालं म्हणूनच ना पळून जायच्या गोष्टी ?"

"माझ्या मनात पाप नाही की मी कलंकिता नाही."

"तर मग इथून जायच्या गोष्टी का बोलत्येस ? आपल्या पतीला सोडून कुणी स्त्री कशाला पळून जाईल ?"

"तुमचं हृदय दुभंगून गेलंय. दुभंगलेलं हृदय अन् फाटलेलं दूध पुन्हा जुळत नाहीत. आपली दोघांची मनं जिथं जुळत नाहीत. तिथं एकत्रित राहणं कसं शक्य आहे ?"

" माझं हृदय दुभंगायचं कारण काय ? तुझं दुश्चरित्र हेच ना ? मी घरात नसताना सूर्या तुला भेटायला का येतो ? हे बघ तू खरीच साध्वी असशील तर तुला माझं म्हणणं ऐकलं पाहिजे. ऐकशील ?"

सीता गप्प होती.

" अगदी याच क्षणी पोलीस चौकीत फोन करून सूर्या एवढ्यातच इथन गेल्याची सूचना दे पाहू."

" मुळीच नाही !"

" या तुझ्या भावामुळं माझ्यावर केवढी आपत्ती आली आहे, याची तुला कल्पना आहे का ? तो क्रांतिकार्यात पडला आहे. पोलीस त्याच्या शोधात आहेत. त्याचं आपल्याकडं येणंजाणं चांगलं नाही. त्यामुळेच माझी बढती झाली नाही. माझ्यानंतर नोकरीला लागलेले बढत्या मिळवून कितीतरी पुढं निघून गेलेत. कमीत कमी पोलिसांना बातमी दिली तर नोकरी वाचेल. नाहीतर तिच्यावरही गदा येईल."

" आली गदा तर येऊ दे. काही झालं तरी मी काही पोलिसांत कळवणार नाही. माझे प्राण गमवावे लागले तरी चालेल."

" ते मला माहीत आहे. तुझ्या पापी हृदयाची परीक्षा पाहाण्यासाठी मी टेलिफोनच निमित्त केलं. माझा अंदाज अचूक ठरला. आता माझ्या डोळ्यापुढून चालती हो. "– असं बोलून सीतेची मानगूट पकडून त्यानं तिला शयनगृहात लोटून दिलं.

सीता शयनगृहात जाऊन पडली. तिच्या डोळ्यात एकही अश्रूबिंदू नव्हता. गालावर चपराकी बसल्यानं ते दुखत होते. 'आज जे घडलं ते स्वप्न की सत्य' असा एक विचार तिच्या मनात आला...

तेवढ्यात राघवन्‌च्या खोलीतून टेलिफोनची तबकडी फिरवल्याचा आवाज आला. सीता धडपडून उठली अन् धावतच राघवन्‌च्या खोलीत आली. त्यानं ज्या हातानं नंबर फिरवायला घेतला तो हात तिनं पक्का धरून ठेवला अन् विचारलं, " तुम्ही कोणाला फोन करताहात ?"

रागानं त्याचे डोळे लाल झाले होते. कठोर स्वरात त्यानं म्हटलं, "तुला त्याच्याशी काय करायचंय ?"

" का नाही करायचं ? तुम्ही पोलीस चौकीवर सूर्यासंबंधी फोन करीत आहात. मी करू देणार नाही. जर तुम्हाला फोन करायचाच असला तर आधी माझा

जीव घ्या. मग खुशाल फोन करा."

" उद्या मी ऑफिसातून फोन केला तर काय करशील ?"

" त्याची मला पर्वा नाही. मात्र आपल्या डोळ्यादेखत मी तसं करू देणार नाही ?"

" सूर्याबद्दल तुला एवढी आपुलकी का ? तू तर म्हणाली होतीत माझा त्याचा काही संबंध नाही."

" मी असं कधीच म्हटलं नाही. या जगात माझा खरा हितचिंतक सूर्याच आहे. माझ्यासाठी तो सर्व काही करू शकतो. तुम्ही त्याला पकडून देऊ इच्छिता हे मी गप्प बसून कसं पाहू शकेन ?" सीतेनं विचारलं.

" अग कुलटे, असं आहे काय ? सूर्याच्या मोहानं तुला कसं वेडंपिसं करून सोडलंय हे मला आता कळलं."

" ही केवढी आनंदाची गोष्ट आहे !"

" आनंदाची गोष्ट ? आनंदाची गोष्ट होय ?"– राघवन्‌नं हात उगारीत विचारलं.

" असं बोलणारी तुमची जीभ गळून पडली नाही, ही काय आनंदाची गोष्ट नव्हे ?"

" माझी जीभ गळून पडावी असा शाप देत्येस काय ?"— असं बोलून राघवन्‌नं टेलिफोनचा रिसीव्हर फेकून मारला. तो सीतेच्या कानशिलावर लागला.

झालं. सीतेचा चेहरा एकदम बदलला. तिचे डोळे आसवांनी डबडबले. तिनं आपलं कानशील तळहातानं गच्च दाबून धरलं. " आई गऽ ऽ मला लाटांचा आवाज येतोय- मला घेऊन चल ग आई ऽ ऽ" असं बोलत ती स्फुंदून रडू लागली. सीतेच्या चेहऱ्यावर व डोळ्यांत उन्मादाची चिन्हं दिसू लागली. सीतेवर हिस्टेरियाचा प्रभाव पडू लागल्याचं राघवन्‌च्या लक्षात आलं.

चटकन् त्यानं आपल्या हातांचा आधार देऊन तिला सोफ्यावर बसवलं. मग संयत स्वरात तिचं सांत्वन करीत तो म्हणाला, " सीता रडू नकोस. मी तर तुझी परीक्षा पाह्यली. अग, तुला काय हे सारं खरंच वाटलं ?" मग तो मोठ्या मायेनं तिच्या पाठीवरून हात फिरवत राहिला.

थोड्याच वेळात सीता सोफ्यावर पालथी होऊन पडली तिचे हुंदके बंद झाले.... ती गाढ झोपी गेली.

सूर्या घराच्या बाहेर पडून फाटकापर्यंत गेला. त्यानं फाटक जोरात उघडून बंद

केलं. मग पाऊल न वाजवता झाडाझुडपांच्या आडोशानं लपत-छपत राघव असलेल्या खोलीजवळ आला. तिथं तो भिंतीला टेकून उभा राहिला. खोलीत काय चाललं होतं ते चाहूल न लागू देता ऐकत आणि पाहात राहिला.

राघवन्नं सीतेला टेलिफोनचा रिसीव्हर फेकून मारला. तिनं ' आई गऽऽ" अशी किंकाळी फोडली तेव्हा त्याचा धीर सुटला. रिव्हॉल्वर चालवावं असंही त्याला क्षणभर वाटलं पण दुसऱ्याच क्षणी त्याचा विचार बदलला. ' हे काही बरं नव्हे. अजून आपल्याला कितीतरी कामं करायची आहेत. एक दिवस धीर धरला तर काही बिघडणार नाही,' असा निर्णय घेऊन अन् पुढचं दृश्य पाहून तो तेथून चालता झाला.

रात्रीच्या शेवटच्या प्रहरात जुन्या दिल्लीतील रस्त्यातून चालत असताना सूर्याच्या मनात विचारांचा डोंब उसळला होता. ' देशाचं भलं होवो की वाईट होवो, स्वातंत्र्य मिळो अगर न मिळो, आपल्याला त्याच्याशी कर्तव्य नाही. सीता अनाथ व निराश्रित आहे. सीतेला सुखी व संतुष्ट राखणं हे माझं पहिलं कर्तव्य आहे. पण मी ते कसं पार पाडू ? तारिणीचा सल्ला घेऊन मला काहीतरी निर्णय घ्यायला हवा. सीता तर त्या नरराक्षसाच्या हातात सापडली आहे. उद्यापर्यंत ती जिवंत तरी राहील का ?'

अशा विचारात बुडालेला सूर्या आपल्या निवासस्थानी आला. अंथरुणात झोपेची आराधना करू लागला. पण डोळ्याला डोळा लागेना. तशातच रात्र संपली. पहाट झाली.

30

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सूर्या चांदणी चौकातून चालला होता. त्याचं मन बेचैन झालं होतं. रात्री अलोचन जागरण झाल्यानं त्याचा चेहरा उतरून गेला होता.

त्या दिवशी सकाळी अकरा वाजता त्यानं सीतेला फोन केला. पण फोनवर ती बोलली नव्हती. तिसऱ्या वेळी सीतेचा आवाज ऐकू आला. तिनं

विचारलं, "सूर्या, थोड्या वेळापूर्वी तू मला फोन केला होतास का ?" सूर्या म्हणाला, "हो ! मी दोन वेळा फोन केला. मात्र तू तो उचलला नाहीस."

"अर्ध्या तासापूर्वी फोनची घंटा वाजली. मला वाटलं, तुझा फोन असेल तरीसुद्धा सावधपणे मी विचारलं, "कोण आहे ?" तिकडून आवाज आला, "मी सूर्या बोलतो आहे. आपण केव्हा भेटायचं ?" तो आवाज काही मला तुझा वाटला नाही. म्हणून मी रिसीव्हर खाली ठेवून दिला. यासंबंधात तुझं मत काय आहे सूर्या ?" सीतेनं विचारलं.

"आश्चर्यच आहे ! तुला असा प्रश्न विचारणारा कोण असेल ? माझ्या तर काहीच लक्षात येत नाही बुवा !" सूर्यानं म्हटलं.

"बरं, त्या गोष्टी सोड ! आज मला कसंही करून तुझी भेट घेणं जरूर आहे. तरी आपली भेट केव्हा, कुठं होईल ?"

"कुठं काय ? तुझ्याकडेच भेटू."

"नको ! या घरी तू येऊ नकोस. संध्याकाळी सहाला मी जुन्या दिल्लीत येते. मला काहीच भीती नाही. तू कुठं भेटशील बोल."

सूर्याला एकदम टाऊन हॉलच्या मागचं मैदान आठवलं. तिथं येण्यासाठी त्यानं सीतेला सांगून टाकलं. सीतेनं 'बरं ऽ' म्हणून फोन बंद केला.

आता सहाच्या आत काल ठरवलेला कार्यक्रम आटोपला पाहिजे. तारिणी आणि इतर सहकाऱ्यांना भेटायला हवं. त्यासाठीच सूर्या चांदणी चौकातून चालला होता. तारिणीचं स्मरण होताच त्याला आदल्या दिवशीच्या गोष्टी आठवल्या. तारिणीला धरून देण्यासाठी एक लक्ष रुपयांचं अभिवचन त्याला मिळालं होतं. त्या विचारानं त्याचा थरकाप झाला.

'खुनी दरवाजा' म्हणून प्रसिद्ध असलेलं ठिकाण ओलांडून पुढं जाताच हिरवा कुडता घातलेले एक मुस्लिम लीगवाले महाशय जाणून-बुजून त्याच्याशी टकरावले आणि भाबडेपणानं बोलले, "क्षमा करा. कायदे आझम जिंदाबाद" सूर्यानं त्यांच्याकडे रागानं पाहिलं.

त्यांच्या डोळ्यात आदल्या दिवशीचाच ताठपणा पाहून सूर्यानं ओळखलं, की काल पोलिसाच्या वेशात भेटलेले महाशय तेच हे आहेत.

त्यानं विचारलं, "आज हा कसला वेष घातलात ?"

"अहो, रोज एकच वेष धारण केला तर कसा बचाव होईल ? तुम्हाला-देखील सावध करण्यासाठी प्रमुखांनी सांगितलंय. तुम्ही कालच्यासारखेच आजही

आहात !" तो लीगवाला म्हणाला.

" प्रमुख घरीच आहेत का ? "

" आहेत ना. तुम्ही पन्नास एक यार्डाचं अंतर ठेवून माझ्या मागं या. पन्नास म्हणजे पन्नास. जवळ नको किंवा दूर नको. समजले ? " असं सांगून ते वेगानं पुढं चालू लागले.

त्याच्या सांगण्यानुसार सूर्या त्यांच्या मागोमाग चालू लागला. जुम्मा मशिदीच्या उजव्या बाजूला असलेल्या सडकेला काटकोन करून एक गल्ली जाते. मुस्लिम लीगवाला अन् तो त्या गल्लीत शिरले. तिथून ते एका अंधाऱ्या बोळात शिरले. त्या बोळात दिवसा सूर्याचं दर्शन होणं कठीण होत असावं. बोळात एका घरासमोर मुस्लिम लीगचा झेंडा फडकत होता. ते गृहस्थ त्या घराजवळच जाऊन सूर्याच्या जवळ येण्याची वाट पाहात उभे राहिले. सूर्या निकट येताच ते दोघे आत शिरले. आत शिरताच बैठकीत एक मौलवी बसले होते. कुराणासारखा दिसणारा अरबी लिपीत लिहिलेला एक ग्रंथ ते पुन्हा पुन्हा चाळून वाचत होते. त्यांनी मान वर करून नवागतांना एकदा पाहून घेतलं अन् पुन्हा ते वाचनात मग्न झाले.

' हे मौलवी कोण ? चेहरा तर कुठं तरी बघितल्यासारखा वाटतो.' असा विचार त्याच्या मनात येतो तोच त्या लीगवाल्यानं त्याचा हात धरून ओढत त्याला भिंतीपाशी असलेल्या पुस्तकांच्या कपाटाजवळ नेलं. कपाटाच्या मागं इतकी अरुंद फट होती की तिच्यातून जाणं-येणं कठीणच होतं. कपाटा-मागं भिंतीला एक दार होतं. कार्यकर्त्यानं ते दार उघडून सूर्याला आत लोटलं व दार बंद करून घेतलं.

सूर्या अंधारात चाचपडू लागला. तेवढ्यात तारिणीचा आवाज ऐकू आला, ' माझ्या सोबत या.'

थोड्याच वेळात एका अंधुक उजेड असलेल्या सभामंडपात सूर्या येऊन पोचला. त्या सभामंडपाचे खांब दगडी असून आपल्या पुरातनेची साक्ष देत होते. वरचं छत चांगलंच ठेंगणं होतं. कुणीही उभ्यानं हात वर केला तर सहज स्पर्श करता येत होता. मात्र मंडप चांगलाच लांब-रुंद होता. नादिरशहा, अहमदशहा, असे जुलमी लुटारू जेव्हा दिल्ली शहराची लूट करीत तेव्हा चांदणी चौकातले धनिक व्यापारी सुरक्षिततेसाठी आपली चीजवस्तू याच सभामंडपात लपवून ठेवीत. या अंधाऱ्या सभामंडपाचा पत्ता लावणं, रस्ता शोधून काढणं आणि

लूट करायला येणं, हे काही सोपं नव्हतं. म्हणूनच इथं ठेवलेलं धन सुरक्षित राहात होतं.

तोच हा पुरातन मंडप आता क्रांतिकारकांच्या प्रमुख अड्ड्यांपैकी एक होता.

मंडपात त्यावेळी सुमारे वीस लोक होते. काही एकटे बाजूला बसून पुस्तकं वाचत होते. काही लहान-लहान गट करून गप्पा झोडत होते. काही चिरूट ओढत होते तर काही झोपले होते. सर्वांचे पोशाख वेगवेगळ्या पद्धतीचे होते.

त्यांच्यापासून काही अंतरावर एकट्यानं बसून लिहीत असलेल्या व्यक्तीकडे बोट दाखवून तारिणीनं म्हटलं, " ते आहेत इथले प्रमुख."

सूर्या त्यांच्याजवळ जाऊन म्हणाला, " इन्क्लाब जिंदाबाद !"

एका नव्या माणसाला आपल्यामध्ये आलेला पाहून सर्वजण उठून आले व प्रमुखांच्या चारी बाजूला कडं करून बसले.

प्रमुखांनी सूर्याला विचारलं, "बोला, आपण कुठं कुठं जाऊन आलात ? जिथं गेलात तिथली परिस्थिती कशी आहे ? "

" मी मध्यप्रांत, आंध्र व मद्रास या प्रांतांत फिरून आलो. जवळजवळ मदुरेपर्यंत जाऊन आलो. मी जिथं गेलो तिथं लोकांची मनं ज्वालामुखीप्रमाण धुमसताना दिसली. ज्वालामुखीचा कधीही उद्रेक होऊन तप्त लाव्हा पसरू शकतो. त्या लाव्हाच्या लोळात ब्रिटिश साम्राज्य भस्मसात होऊन जाईल."

" आपल्याला जो विश्वास वाटतो त्याला आधार तर हवा नं ? कशाच्या आधारावर आपण हे बोलता ? ब्रिटिश साम्राज्य नष्ट करून रामराज्य स्थापन करण्याच्या कार्यात लोकांकडून कोणत्या सहाय्याची आपली अपेक्षा आहे ? गेल्या वर्षीप्रमाणे यंदादेखील नऊ ऑगस्टला सर्व देशात क्रांतीची ज्वाला भडकून उठेल या आशेवर तर पाणी फिरलं. तसं काहीच घडलं नाही ! "

" या बाबतीत निराशा झाली हे बरंच झालं ! बहुसंख्य लोक तर असं समजन चालतात, की जर्मनी किंवा जपान इथं येऊन भारताला स्वतंत्र करतील. अन् काही लोक सुभाषबाबूंची वाट बघताहेत. त्यांना वाटतं, नेताजी मलायात सैन्य जमवून ब्रह्मदेशमार्गे भारतात येऊन थडकतील. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आपण काही करावं असा विचारही बहुतेकांच्या मनात येत नाही. काही अनामिक स्वयंसेवक इथं-तिथं क्रांतीची पताका फडकवतात. पण त्यांच्यावर होणारे पोलिसांचे अमानुष अत्याचार पाहून सामान्य जनता भयभीत होऊन जाते. पोलिसी अत्याचाराचा एक भयंकर प्रकार मी स्वतःया डोळ्यांनी बघितला !"

देवपट्टणम् गावी आत्मनाथ अय्यरांच्या घरी वाढदिवसाच्या दिवशी पोलिसांनी जे क्रूर अत्याचार केले, त्यांचं सूर्यानं वर्णन केलं.

सर्व काही लक्षपूर्वक ऐकल्यावर प्रमुखांनी म्हटलं " दुसऱ्या देशात स्वातंत्र्य-संग्रामात लढलेल्या लोकांनी यापेक्षा कितीतरी पटीनं अधिक अत्याचार सहन केलेत. बरीच वर्षं परकीय शासनाखाली राहिल्यानं आपले लोक भित्रे आणि नादान बनले आहेत. तरी जिथं-तिथं लोकांच्यामधे उत्साह दिसून येतो आणि दृढनिश्चयदेखील दृष्टीस पडतो. विदेशी शासनाबद्दल लोकांच्या हृदयात जी चीड निर्माण झाली आहे ती जागृत होऊन आत घुमसणारा ज्वालामुखी भडकून उठेल. ही क्रांतीची ठिणगी विझू न देता चेतत ठेवण्याचा प्रयत्न करणं हे आपलं कर्तव्य आहे...सूर्या ! तुमच्या दिल्लीत येण्याजाण्याचा पोलिसांना पत्ता लागला आहे. तेव्हा इथं राहणं धोक्याचं आहे. तुम्ही आजच्या आज कालकत्त्याला जाऊ शकता का ? तिथं एक महत्त्वाचं काम पण आहे. "

" जरूर ! मी आनंदानं तयार आहे. –" सूर्या बोलला.

हे बोलताच त्याच्या मनात असाही विचार आला, की सीता हट्टच धरून बसली तर एका दगडात दोन पक्षी मारता येतील ! तिला कलकत्त्याला पोचवून आपण सुटकेचा श्वास घेऊ शकतो.

त्याला कलकत्त्यात काय काय करायचं आहे याचा तपशील प्रमुखांनी सांगन टाकला.

मौलवीसाहेब ज्या बैठकीत बसले होते तिच्या एका कोपऱ्यात अरुंद लाकडी जिना होता. सूर्या व तारिणी अंधाऱ्या सभामंडपातून बाहेर आली आणि जिना चढून वर गेली. वरच्या खोलीत वेताच्या दोन खुर्च्या ठेवलेल्या होत्या, त्यावर दोघं बसली....

तारिणीनं विचारलं, " कलकत्त्याला कधी जायचा विचार आहे ?"

" त्यात विचार करण्यासारखं काय आहे ? आजसुद्धा जाता येईल. पण जाण्यापूर्वी सीतेच्या बाबतीत विचार-विनिमय करून काही तरी निर्णय घेणं भाग आहे. तारिणी, त्या नरराक्षसाच्या तडाख्यात सापडलेल्या सीतेला ज्या यातना भोगाव्या लागत आहेत त्या समक्ष या डोळ्यांनी पाहिल्यावर मानवाच्या रूपात जगात वावरणाऱ्या राक्षसांची कल्पना आली हं !"

" काल रात्री सीतेकडे गेला होतात का ? सीतेनं राघवन्‌च्या खूपच चुगल्या केलेल्या दिसतात. " तारिणी म्हणाली.

" सीतेच्या चुगल्यांनी मी या निष्कर्षावर आलो नाही. आधी तर मी तिचा शब्दांवर विश्वासच ठेवला नाही. मात्र ते दृश्य पाह्यल्यावर सीतेनं आपल्या परिस्थितीचा दहावा हिस्सादेखील सांगितला नसल्याची माझी खात्री पटली.."

मग सूर्यानं स्वत:च्या डोळ्यांसमक्ष सीतेच्या घरी घडलेल्या प्रसंगाची हकीगत सांगितली. ती ऐकून तारिणीचा चेहरा चिंताग्रस्त आणि दुःखी दिसू लागला.

" ह्या सर्व गोष्टी तुम्ही फक्त कानांनी ऐकल्या पण डोळ्यांनी पाह्यल्या नसत्या तर मी विश्वास ठेवला नसता. राघवन् इतके कठोर व क्रूर असतील असं स्वप्नातदेखील वाटलं नव्हतं मला ! " तारिणीनं म्हटलं.

" होय ना, कुणालाच असं वाटलं नसेल. कदाचित् यावेळी सीता मैदानात येऊन पोचलीही असेल. तिला मी काय सांगू ? तिला आपल्यासोबत कलकत्त्याला घेऊन जाऊ का ? " सूर्यानं विचारलं.

" नको ! तुम्ही तिला आपल्या सोबत कलकत्त्याला नेलं की तिचं वैवाहिक जीवन संपलंच समजा ! सीतेची समजूत घालून तिला आधी तिच्या घरी पोचवा अन् नंतर कलकत्त्याला जा. मी तिची काळजी घेईन. आजच रात्री राघवन्ला भेटून त्यांच्याशी यासंबंधी बोलून घेत्ये."– तारिणी म्हणाली.

" आज रात्री राघवन्ला कशा भेटणार तुम्ही ? "

" ते ज्या पार्टीला जाणार आहेत त्या पार्टीला जाण्याचा माझाही विचार आहे. राघवन्च्या वागण्यात आजपासूनच बदल झालेला आढळेल. तिची जबाबदारी माझ्यावर सोपवा. काही कमीअधिक झाल्यास मी जाब देईन ! "

" तो तर पक्का राक्षस आहे. तुमचं त्याच्याशी भेटणं, बोलणं मला मुळीच आवडणार नाही. तसाच तो फार धूर्त आहे. "

" मला तरी राघवन्शी भेटणं अन् बोलणं कुठं पसंत आहे ? पण सीतेच्या हितासाठी मी त्याला तयार झाल्येय् ! "

" तारिणीबाई, माझ्या एका प्रश्नाचं उत्तर द्याल ? सीतेबद्दल तुम्हाला एवढी आत्मीयता का वाटते, हे मला सांगू शकाल ?"

" नाही ! वास्तविक तुम्हाला सीतेबद्दल जे काय वाटतं, त्यापेक्षा मला तिच्याबद्दल अधिक वाटतं. त्याला तसंच जबरदस्त कारण आहे. पण कृपा करून तेवढं विचारू नका !– " तारिणी काकुळतीनं म्हणाली.

" ठीक आहे ! नाही सांगायचं तर नका सांगू ! तुम्हाला सीतेविषयी एवढा जिव्हाळा वाटतो तर एक काम करा. तुम्ही मुंबईला गेल्यावर तिच्या

वडिलांचा शोध करा. मला त्यांचा जुना पत्ता ठाऊक आहे. मी तो अवश्य सांगेन. सीतेची ही स्थिती एकदा त्यांच्या कानावर घातली की आपली जबाबदारी कमी होईल."

"सूर्या, तुम्हाला आश्चर्य वाटणार नसलं तर एक गोष्ट सांगत्ये. मला त्यांचा पत्ता माहीत आहे. मात्र आता ते सीतेला काहीच मदत करू शकणार नाहीत. उलट त्यांची सध्याची परिस्थिती सीतेला कळली तर तिलाच बरं वाटणार नाही."

सूर्याला वाटलं, सीतेचे वडील एखाद्या फौजदारी गुन्ह्यात सापडून तुरुंगाची हवा खात असतील पण त्याचवेळी त्याच्या दृष्टीपुढं एक चेहरा उभा राहिला. तो चेहरा दाढी वाढलेल्या मौलवीसाहेबांचा होता ! ...

"बरं, तारिणी, खाली एक मौलवी कुराण पठण करीत बसले आहेत ना, ते कोण हे तुम्ही सांगू शकाल ?" – सूर्यानं प्रश्न केला.

"अय्या ! त्यात काय आहे ? ते मौलवी माझे वडील आहेत."

31

तारिणीच्या या वाक्यावर विचार करीत सूर्यानं जुम्मा मशीद पार करून चांदणी चौकात प्रवेश केला. तो टाऊन हॉलजवळ पोचला तोच त्याला सीता सडकेच्या एका कडेला उभी दिसली. लांब-लाब पावलं टाकीत तो सीतेजवळ गेला अन् विचारलं, "का ग ताई, तुला इथं येऊन बराच वेळ झाला का ?"

"फार तर पंधरा मिनिटं झाली असतील. तरीसुद्धा रस्त्यानं जाणारे लोक सारखे माझ्याकडे टवकारून पाहात. म्हणून मी तर अगदीच त्रासल्ये. तेवढ्यात सुदैवानं तूच अवतरलास."–सीतेनं उत्तर दिलं.

दोघं टाऊन हॉलच्या मागे असलेल्या सडकेनं गांधी मैदानाकडे गेली. काल ज्या झाडाखाली बसून तारिणीबरोबर गोष्टी केल्या होत्या त्याच झाडाकडे तो

सीतेला घेऊन गेला. चालताना तो तिच्याशी काहीच बोलला नाही. कारण सीतेच्या बाबतीतल्या कर्तव्याबद्दल त्याचं मन विचारमग्न झालं होतं.

झाडाच्या खाली जाऊन बसताच सीतेनं एकदा चारी बाजूला पाहिलं अन म्हटलं, " सूर्या, तू त्वरित हे शहर सोडून जा पाहू. पोलीस तुला पकडण्याच्या प्रयत्नात आहेत. फोनवरून तुझ्यासारखं बोलून त्यांनी माझ्याकडून तुझी माहिती काढून घेण्याचा प्रयत्न केला. तुला कसंही करून सावध करावं एवढ्याचसाठी मी इथं आल्ये आहे. हे फोनवरून सांगणं योग्य वाटलं नाही. टेविफोनवरच्या गोष्टी चोरून ऐकता येतात नं. म्हणून मला भीती वाटली. आजच रात्री तू चालायला लाग सूर्या. " आपल्या मनातल्या गोष्टी भडाभड सांगून टाकल्यावरच ती थांबली.

" ताई, कशाला माझी एवढी काळजी करत्येस ? पोलिसांनी मला पकडलं तरी काय होणार मोठंसं ? मी तर कधीही पकडला जायला अन् तुरुंगात जायला तयार आहे. सीता, तू स्वतःबद्दल काय ते बोल. काल रात्री तर, मी तुझ्या घरून बाहेर जाण्याचा नुसता बहाणा केला होता. बगीच्यातील झाडाझुडपांच्या आडून मी खिडकीजवळ आलो, तिथून सारं काही ऐकलं अन् पाह्यलं. राघवन्नं तुझ्या अंगावर हात टाकला तेव्हा माझं रक्त उसळून आलं होतं. अशा क्रूर नवऱ्याला सोडून तू घराबाहेर पडलीस तर मी तुला मुळीच दोष देणार नाही. मी स्वतः तुला घेऊन जायला एका पायावर तयार आहे. आजच रात्री मी कलकत्त्याला चाललो आहे. माझ्याबरोबर तूदेखील चल. तुला अमरनाथच्या घरी ठेवून मी आपली कामं उरकीन. अमरनाथ व चित्रा माझ्यासाठी वाटेल ते करतील. "

आतापर्यंत सीता त्याच्या गोष्टी बेचैन होऊन ऐकत होती. मग ती मध्येच बोलू लागली. " सूर्या, आता त्या साऱ्या गोष्टी सोड. आत्महत्येचे अन् त्यांना सोडून पळून जाण्याचे विचार मी मनातून पार काढून टाकलेत. यापुढं त्यांच्या इच्छेप्रमाणे वागण्याचा, त्यांना प्रसन्न राखण्याचा माझा निश्चय झालाय. काल रात्रीच्या घटनेनंतर मी असा निर्णय घेतलाच कसा, याचं तुला नवल वाटेल. कदाचित् यावर तुझा विश्वासही बसणार नाही. पण मी बोलत्ये आहे ते अगदी खरं आहे. मी हे मनापासून बोलले आहे. आजच दुपारी कुठल्याशा पत्रिकेत कस्तुरबा गांधींचं चरित्र वाचत होत्ये. त्यामुळेच माझं हृदयपरिवर्तन झालं. कस्तुरबांनी किती हाल सोसले ते आहे का ठाऊक ? वयाच्या सत्तराव्या वर्षी त्या तुरुंगात गेल्या. खरी साध्वी बरं ती !"

सूर्याच्या शिरावरचा भार उतरला. सीतेचा हा निर्णय त्याला खूपच

रुचला. तरी पण तो तिचा निर्णय पचवू शकला नाही. तो म्हणाला, " स्त्रियांच्या मनाचा थांग लागणं कठीण आहे असं म्हणतात, ते खरंच आहे. कस्तुरबांचं काय सांगत्येस ? त्यांचे पती जगात मान्यता पावलेले महात्मा आहेत. महात्मा गांधींशी इतरांची तुलना कशी होऊ शकेल ? "

" सूर्या, तसं नव्हे बाबा ! कस्तुरबा गांधींच्या इच्छेनुसार वागू लागल्या, तेव्हा कुठं ते महात्मा झाले होते ? मला तर यांनी सर्व प्रकारचं स्वातंत्र्य बहाल केलं होतं. मी कुठंही जाऊ शकत होत्ये; कुणाशीही बोलू शकत होत्ये. त्यांनी कधी काही म्हटलं नाही. मीच त्यांना खोदून खोदून विचारलं. अगदी पिच्छाच पुरवला. त्यांना चैन पडू दिलं नाही. आता विचार करू लागते तेव्हा सर्व अनर्थाचं मूळ मीच असल्याचं जाणवू लागतं. अरे, तेव्हा माझं डोकं ठिकाणावर नव्हतं. आता माझा पक्का निश्चय झाला आहे. त्यापासून मला परावृत्त करण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे ! "

सीतेच्या तोंडून हे सारं ऐकून सूर्या थक्क झाला. तो म्हणाला, " हे बघ मी तुझं हृदयपरिवर्तन करण्याचा कधी प्रयत्न केला नाही आणि पुढं कधी करणार नाही. तू राघवन्च्या इच्छेनुसार वागावं नि त्यानं तुझं मन राखावं याहून आनंदाची गोष्ट कोणती असणार ? मी तर फक्त तुम्हा दोघांना सुखात पाहण्याची मनीषा बाळगून आहे. बरं तर ! चल, आता घरी जाऊ. अंधार झाला आहे. मी तुला तुझ्या घरी पोचवून माझ्या कामाला लागतो. "

" छे रे ! तुला माझ्या सोबत येण्याची गरज नाही. फक्त एक टॅक्सी ठरवून मला बसवून दे. नाहीतर मीच टॅक्सी करून घेईन. "– सीता म्हणाली.

" हे बरं नव्हे सीता ! मला माझं कर्तव्य पार पाडू दे. दिल्लीत आज-काल जिथं तिथं धोका आहे. बायकांनी एकटं फिरणं चांगलं नाही. अंधार झाल्यावर तर एकट्यानं कुठं जाऊच नये. "

" मला काही व्हायचं नाही सूर्या. तू उगीच काळजी करतोस ! "

" तुला काही कळत नाही. काल सायंकाळी मी अन् तारिणी असेच या झाडाखाली बोलत बसलो होतो. तारिणी निघून गेल्यावर तीन माणसं माझ्या-कडे आली. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर त्यांनी म्हटलं, ' तुम्ही तारिणीला पकडून द्याल तर तुम्हाला एक लाख रुपये देतो. ' "

" अग बाई ! हा तर कहर झाला. कोण बरं असतील ते लोक ? "

" कुठल्या तरी संस्थानिकाचे लोक असावेत. आता तूच सांग, अशा परिस्थितीत तुला एकटीला घरी कसं पाठवायचं ? "

" सूर्या, माझ्या बाबतीत काळजी करण्याचं कारण नाही. तारिणी सुंदर आहे. तिच्यासाठी जे लोक एक लाख रुपये द्यायला तयार आहेत, तेच माझ्याकडे ढुंकून बघणार नाहीत. उलट मला बघून पळून जातील. हेच होते म्हणून तारिणीला नकार देऊन मला पदरात घ्यायला तयार झाले. यासाठी मी कृतज्ञता व्यक्त करायला हवी. "

" कोणी नाही म्हटलं ?... तुला घरापर्यंत पोचवणं हे मी माझं कर्तव्य समजतो. ते केलं नाही तर मनाला स्वस्थता लाभणार नाही. वाटल्यास मी तुझ्या घरी नाही येणार. तुझ्या घराजवळ नेऊन सोडतो. तिथून तू एकटी घरी जा. एवढं केलं तरी माझ्या मनाला समाधान मिळेल. "– सूर्यानं म्हटलं.

" बरं बाबा, जशी तुझी मर्जी. "– सीतेनं संमती दिली.

दोघं उठून चालू लागली. मैदानापासून चांदणी चौकापर्यंत रस्ता एकाकी होता. सडकेच्या कडेला एक कार उभी होती. तिचा नंबर प्लेटवर त्याची सहज नजर गेली. '१११९' हा तिचा क्रमांक त्याच्या लक्षात राहिला. कार जवळून जाताना त्याच्या मनाला कसली तरी शंका चाटून गेली. पण त्या शंकेचं निरसन करून घेण्याची ही वेळ नव्हे, असं त्याला वाटलं. मग त्यानं आपल्या पावलांची गती वाढवली...

सूर्या अन् सीता चांदणी चौकातल्या घंटाघराजवळ आल्यावर त्यांनी एक टॅक्सी ठरवली. दोघं आत बसताच टॅक्सी वेगात चालू लागली.

आपल्या टॅक्सीचा पाठलाग एक कार करीत आहे अशी त्याला दाट शंका आली. परंतु त्याला खात्री करून घेता येईना. नव्या दिल्लीच्या सडकेवरून सारखी वाहनं धावत होती. अशा अवस्थेत नक्की कसं कळणार ? त्यांची टॅक्सी तर वेगात पळत होती. 'जंतरमंतर' जवळ पोहोचताच सीतेनं म्हटलं, " इथंच थांबू या. इथून घर जवळच तर आहे."

टॅक्सी थांबली. खाली उतरता उतरता सीतेनं म्हटलं, " आज रात्रीच कलकत्याला निघून जा. वेळ घालवू नकोस. आजच जा बरंऽ ! "

" जातो ग बाई. जरूर जातो ! "

" पुन्हा आपली भेट कधी होईल, कुणास ठाऊक ! मात्र तुझ्या स्नेहभावनांचा मला जन्मभर विसर पडणार नाही."

" मलासुद्धा कधीच तुझा विसर पडणार नाही. "

सीता सडकेवरून चालली होती. सूर्या टॅक्सीच्या खाली उतरून तिच्याकडे पाहात होता...

दुग्ध धवल चांदणं पडलं होतं. आजुबाजूच्या घरांतून रातराणीचा सुगंध घेऊन हवा वाहात होती....

अशा सुंदर गंधयुक्त वातावरणात सीतेची दूर जाणारी आकृती चित्रपटातल्या मोहक दृश्यातल्यासारखी भासत होती...

सीतेच्या कपाळी काय लिहिलं असेल कळत नाही. आपले पूर्वीचे विचार पार बदलले आहेत असं ती बोलली. ते खरं असेल का ? की ती आपली फसवणूक करते आहे ? आपल्याला असं सांगून घरी गेल्यावर ती विष तर घेणार नाही ? तिला अशा तऱ्हेनं मृत्यू आला तर त्याची काही अंशी जबाबदारी आपली नसेल का ?' सूर्या विचारात पडला.

त्यांचा पाठलाग करीत आलेली मोटार भरकन् पुढं निघून गेली. तिच्या १११९ या क्रमांकावर त्याचं लक्ष केंद्रित झालं.

वेगानं चाललेली ती कार सीतेजवळ येताच ब्रेक लागून थांबली. तिच्यातून दोन माणसं लगबगीनं खाली उतरली. त्यांनी सीतेला धरून जबरीनं कारमध्य बसवलं. मग ते दोघे आत बसले. दार बंद झालं. कार चालू झाली. अन् मागे वळून सूर्या उभा होता त्याच रस्त्यावरून धावू लागली....

हे सारं क्षणार्धात घडलं होतं. सूर्याचं तर डोकं बधिर झालं. कारमधून 'भाऊ!' म्हणून हाक ऐकू आल्याचा सूर्याला भास झाला. त्यानं पॅन्टच्या खिशातून पिस्तुल काढलं. नेम साधून चालत्या कारच्या टायरवर झाडलं पण गोळी टायरला लागलीच नाही. सूर्या झटकन् शेजारी उभ्या असलेल्या टॅक्सीत बसला. त्यानं हुकूम सोडला, त्या गाडीच्या मागं घे. म्हणशील तेवढे पैसे देईन गडबड केलीस तर गोळी घालीन."

"पेट्रोल फारच कमी आहे साहेब." टॅक्सी ड्रायव्हर म्हणाला.

" असू दे. पेट्रोल संपेपर्यंत चल. "

तेवढयात एक पोलीस तिथं आला. त्यानं विचारलं, "गोळी तुम्हीच झाडलीत ना. ते रिव्हॉल्वर इकडे द्या."

सूर्यानं त्या पोलिसाला असा धक्का दिला की, तो कोलमडून पडला. "चल लवकर." असं त्यानं करडया आवाजात म्हणताच टॅक्सी चालू झाली.

पोलिसानं उठून तीन वेळा शिटी फुंकली. काही क्षणात तिथं एक जीपगाडी आली. तिच्यात चार पोलीस बसले होते. तो पाचवाही आत घुसला. त्यानं काहीतरी सांगितलं. जीप त्या दोन गाड्यांचा पाठलाग करीत धावू लागली.

सीतेला पळवून नेणारी कार दिल्लीकडून शहाजहांपूरकडे निघाली. ती कार चांदणी चौक ओलांडून जुम्मा मशिदीजवळून, लाल किल्ला उजव्या बाजूला सोडून, रेल्वे रुळाच्या पलीकडे गेली. तिथून यमुनेच्या पुलाकडे गेली.

थोडावेळ सीतेची दिशाभूल होऊन गेली. मग तिला सूर्यानं दिलेल्या सावधतेचं स्मरण झालं. आपल्या संरक्षणासाठी सूर्या आपल्या मागोमाग येतो आहे या गोष्टीचा तिला धीर आला. कसंही करून सूर्या ह्या कारला गाठल्याशिवाय राहणार नाही. त्याला चैनच पडणार नाही, अशी तिच्या मनानं ग्वाही दिली. पण यमुनेच्या पुलाजवळ गाडी येताच तिच्या हृदयात धडकी भरली. पूल फारच अरुंद होता. त्यावरून एका वेळी दोन मोटारी विरुद्ध दिशेनं जाऊ शकत नव्हत्या.

सीतेला ज्याची भीती पडली होती तेच नेमकं घडलं. तिला नेणारी कार पुलावर चढताच पोलिसानं मागच्या गाड्यांना थांबण्याचा इशारा दिला. तिची गाडी पलीकडे जाताच तिथं थांबून राहिलेल्या गाड्यांना पूल ओलांडण्याचा इशारा देण्यात आला. सीता भयभीत झाली. तिला उन्माद चढला. एक किंकाळी फोडून तिनं धावत्या मोटारीतून उडी घेण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात तिच्या जवळच्या माणसानं तिच्या तोंडावर गुद्दा लगवला. तिचं किंचाळणं तर थांबलंच पण उडी घेण्याचा प्रयत्नही थांबला. कारमध्ये निःशब्दता पसरली.

32

दुसऱ्या दिवशी तिसऱ्या प्रहरी सुंदर राघवन भूतपूर्व दिवाणसाहेब आदिवराहाचार्य यांच्या घरीं गेला तेव्हा त्यांच्या मुखावर शोककळा पसरली होती. कित्येक दिवस चिंताग्रस्त असल्यानं अन् सतत जागरणानं चेहऱ्यावर व डोळ्यात

जो थकवा दिसतो तोच त्याच्या चेहऱ्यावर आणि खोल गेलेल्या डोळ्यात दिसत होता.

"मिस्टर राघवन् तुम्ही तर असा चेहरा केलात, जणू तुमच्या बायकोला कोणी लुटून नेलं आहे ?" अशा शब्दात भामानं त्याचं स्वागत केलं.

हे ऐकून मनाला झालेल्या वेदना त्याच्या चेहऱ्यावर उमटल्या. व्यथित स्वरात तो म्हणाला, "तुम्ही लोकसुद्धा इतकी निर्दयता दाखवाल असं वाटलं नव्हतं. ठीक आहे. येतो मी."– तिरिमिरीने तो जायला निघाला.

तेवढ्यात धामा उठली. चपळाईनं त्याच्या समोर गेली अन् रस्ता अडवून म्हणाली, "भामाचं काय मनावर घेता ? तिची जीभ विष ओकत असते. आपल्या विषारी शब्दांनी सर्वांना पळवून लावणं एवढंच तिचं काम. तुम्ही जरा खाली बसा. अहो, तुमचे सुहृद अन् हितैषी अख्ख्या दिल्लीत आम्हाला सोडून दुसरे कुणी आहेत का ? हे तुम्हाला ठाऊक नाही ? "

राघवन्नं निघून जाण्याचा इरादा बदलला. तो सोफ्यावर येऊन बसला. मग म्हणाला, " दिल्लीतच काय घेऊन बसलात, इतर कुठंच मला मित्र नाहीत. नोकरीतली मैत्री का मैत्री आहे ? त्यापेक्षा आगगाडीच्या प्रवासातली मैत्री बरी ! जोपर्यंत आपलं चांगलं चाललं आहे तोपर्यंत घनिष्ठ स्नेह दाखवतील. स्वार्थ साधण्यासाठी खेटे घालतील. उलट आपण संकटात सापडलो तर कोणी जवळ येणार नाहीत. हे जग असंच आहे ! आज माझी तशीच स्थिती झाली आहे ! "

" काय म्हणाला ? तुमची नोकरी गेली ? कशी गेली ? अय्या ! हा तर निव्वळ जुलूम झाला ! " भामा अन् धामा एकदम बोलल्या.

" तशी अजून नोकरी पूर्णपणे सुटली नाही. चौकशी पूर्ण होईपर्यंत 'सस्पेन्ड' करण्यात आलं आहे. पण त्यांनी परत नोकरीत घेतलं तरी आता तिथं नोकरी करायचा माझा विचार नाही. फार दिवसांपासून तुमच्या वडिलांना दुसरीकडे जमवून देण्यासाठी सांगत आलो आहे. त्यासाठी योग्य वेळ आली आहे. यावेळी मला त्यांच्याकडून मदतीचा हात मिळायलाच हवा. नाहीतर माझी धडगत नाहीय्. "

" आमच्या बाबांना काही कठीण नाही. सहज एखाद्या बँकेत किंवा विमा कंपनीत नोकरीचं जमवून देतील......तुम्हाला सस्पेन्ड करण्याचं कारण तरी काय हे तर सांगा ?...अन् चौकशी कशाची होणार ? " धामानं विचारलं.

" आज मी ऑफिसात गेलो. आत पाऊल ठेवलं, तोच आमच्या विभागाच्या मुख्य अधिकाऱ्याचं बोलावण आलं 'आज काहीतरी विपरीत घडणार' असा विचार करीत मी त्यांच्या खोलीत गेलो. त्यांच्या बोलण्यानं माझ्या विचाराला दुजोरा मिळाला. त्यांनी म्हटलं, 'राघवन् तुम्हाला सस्पेन्ड करावं लागत आहे याचा मला खेद होतो. कारण तर तुम्हाला माहीत असेलच.' 'मला काहीच माहीत नाही. आपणच सांगून टाकाल तर बरं' मी म्हणालो. त्यावर ते म्हणाले, 'बरं तर मीच सांगतो. तुम्ही आपल्या घरात क्रांतिकारकांना आश्रय देण्याचं काम फार दिवसांपासून करीत आहात असा तुमच्यावर आरोप आहे.' मी म्हटलं, 'माझ्यावर असा आरोप कसा लावता येईल ? क्रांतिकारकाची बातमी मी स्वतःहून पोलिसांना दिली आहे.' यावर ते बोलले 'मिस्टर राघवन् तुम्ही फार बुद्धिमान अन् चतुर आहात. चौकशीच्या वेळी स्वतःच्या बचावासाठी हे कारण पोलिसांना न सांगितलेलं बरं. त्या क्रांतिकारक युवकाचा पोलिसांना आधीच सुगाव लागलेला होता. ते त्याला अटक करण्याच्या तयारीत होते. अशा वेळी तुम्ही दिलेल्या बातमीचा काय उपयोग ? तुम्ही निरुपायानं केवळ आपल्या बचावासाठी बातमी दिली असा याचा अर्थ लावला जाईल.'

" हे ऐकून मी थक्क झालो...त्यांनीच पुढं बोलणं चालू केलं, 'सरकारी नोकरांनी–विशेषतः दिल्लीच्या सचिवालयात काम करणारांनी आपलं वर्तन सीझरच्या पत्नीप्रमाणे संशयातीत ठेवायला पाहिजे. हा काळ युद्धाचा आहे हे विसरू नका. त्यातून यावेळी युद्ध मोठ्याच नाजूक अवस्थेला पोचलं आहे. म्हणूनच आजवरच्या सर्व प्रथा मोडून एका सेनानीला भारतात व्हाइसरॉय म्हणून धाडलं आहे. यावरून युद्ध कोणत्या थराला गेलं आहे याची कल्पना येईल.' त्यांच्या या बोलण्यावर मी उत्तर दिलं, 'वॅव्हेल साहेबांना व्हाइसरॉय का बनण्यात आलं याचा अंदाज सहज करता येण्यासारखा आहे. या साहेबांना युद्धाच्या मैदानावर पाठवलं तर ते किल्ला जिंकून नव्हे, गमावून येतील.' माझं बोलणं ऐकून अधिकारी हसले व म्हणाले, 'आपलं हे मत चौकशीच्या वेळी जरूर सांगा. आता तुम्ही जाऊ शकता.' मी म्हणालो, 'माझा अपराध काय, हे तर आपण सांगितलं नाहीच. माझ्यासंबंधी त्यांना कसला संशय आहे ?' ते म्हणाले, 'चौकशीच्या वेळो सर्व काही सविस्तर सांगितलं जाईल. मी केवळ कल्पना देतो. कैद केलेल्या माणसाजवळ तुमचं रिव्हाल्वर सापडलं, हे तुमच्यावर वहीम असण्याचं एक कारण आहे.' मी म्हटलं, रिव्हाल्वर चोरून नेलं

जाऊ शकतं.' 'नेलेलं असू शकतं. पण त्यासाठी पुरावा हवा. शिवाय तुमच्या-बद्दल संशय येण्याचं दुसरंही एक कारण आहे. तुमची पत्नी कालपासून बेपत्ता आहे!' साहेबाच्या तोंडून हे शब्द ऐकून मी आपादमस्तक शहारलो. मी विचारलं, 'माझी पत्नी बेपत्ता होणं अन् आताच्या आपल्या गोष्टी यांचा संबंध कुठं येतो?' या माझ्या प्रश्नावर त्यांनी जे उत्तर दिलं, त्याची आठवण येताच आतादेखील हसू येतं मला!" असं बोलून राघवन् निर्जी हसला.

"तुमच्या अधिकाऱ्यानं असं काय म्हटलं की तुम्हाला आतासुद्धा हसू अनावर व्हावं." भामानं विचारलं.

"त्यांनी एक विचित्रच विचार मांडला. त्याचंच मला हसू आलं. त्यांनी म्हटलं, 'सीता हीदेखील क्रांतिकारकांपैकी आहे. सीता आणि सूर्या या दोघांनी कट करून कायदा तोडला. दोघांनी मिळून गुप्त रेडिओवरून शत्रुराष्ट्रांना सैन्याच्या हालचालींची माहिती दिली. मी इकडे पोलिसांना वर्दी दिली अन् तिकडे त्यांना सावध करून पळून जायला सांगितलं. सीता कुठं लपून बसली आहे, कळत नाही.' काय कशी आहे कथा? ऐकून मजा वाटली नं?"

"बरं ते असू द्या! तुमच्या पत्नीचा काही पत्ता लागला का, हे आधी सांगा."

"काहीच पत्ता कळलेला नाही. त्यातून एक दुःखदायक योगायोग घडून आला. कालच रात्री मी तुम्हाला म्हणालो होतो ना, की मी नव्या आयुष्याला सुरुवात करणार असून सीतेच्या भावनेशी एकरूप होऊन सुखाचं कौटुंबिक जीवन जाणार आहे. असा ठाम निश्चय करून घरी पोचलो तो काय? सीतेचा घरात पत्ता नाही. याला काय म्हणावं? नशिबाचा क्रूर खेळच नव्हे का हा?" राघवन् हताशपणे म्हणाला.

"काय हो राघवन् सीतेची काहीच खबरबात अजून कळली नाही का? सूर्याला तर अटक झाली. त्याच्याकडून काहीच बातमी लागली नाही? पोलीस इन्स्पेक्टर तर तुमचे चांगले मित्र आहेत?" भामानं विचारलं.

"हं! फौजदार माझे मित्र आहेत हे तर खरंच. एकदा त्यांनी मला फार मदत केली होती. आतादेखील त्यांच्या भरवशावर आहे. सूर्याचा खटला इथं दिल्लीत चालवला तर माझी नाचक्की होईल, म्हणून तो नागपूरला चालवा, असं मी बोललो, ते त्यांनी कबूल केलं. एवढेच नव्हे तर माझ्यासंबंधी काही गुप्त चौकशी झालीच तर माझ्या बाजूनं बोलण्याचं त्यांनी आश्वासनही देऊन

टाकलं... तरी अजून ते सीतेबद्दल काहीच माहिती मिळवू शकले नाहीत. सूर्याच्या डोक्याला चांगलाच मार लागला असून तो अद्याप बेशुद्ध आहे. मधूनच बेशुद्धीत तो बडबडतो, 'सीता, सीता, आभाळ कोसळलं....मला पकडलं.' सूर्या ज्या टॅक्सीत होता त्या टॅक्सीवाल्याकडे मला घेऊन गेले आणि तपास काढला. चौकशीत त्यानं जे सांगितलं ते आणखी विचित्र आहे. शहाजहाँबादच्या चांदणी सडकेवर एक तरुण आणि एक तरुणी माझ्या टॅक्सीत बसली. 'जंतर-मंतर' पाशी आल्यावर ती युवती खाली उतरून पायी निघाली. ती थोड्या दूर गेल्यावर तिच्याजवळ एक कार येऊन उभी राहचली. त्या तरुणीला जबरीनं कारमध्ये बसवून कार पळविण्यात आली. तरुणाच्या सांगण्यावरून मी त्या कारचा पाठलाग केला. मात्र यमुनेच्या पुलावरून ती गाडी पुढं निघून गेली. मला गाडी थांबवावी लागली. काही क्षणातच पोलिसांची जीप आली. त्यांनी त्या तरुणाला अटक केली..टॅक्सी ड्रायव्हरनं केलेल्या वर्णनावरून ती युवती सीताच असावी असं वाटतं. पण सीतेला असं जबरीनं कुणी का बरं पकडून न्यावं?...विचार करू लागलो म्हणजे डोकं फिरू लागतं."

"पण आधी जी कार गेली तिचा शोध लावण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला नाही का?" भामानं विचारलं.

"नाही कसा? शोध चालवलाय्. चारी दिशांना फोन अन् तारा पाठवल्या. अमक्या नंबरची गाडी दिसली तर अडवून ठेवावी. टॅक्सीवाल्यानं कारचा नंबर दिला होता. ती कार शंभर मैलांवर अडवण्यात आली आहे. पण तिच्यात कोणी स्त्री नव्हती अशी बातमी आली आहे, पोलीस इन्स्पेक्टरांनी फोनवरून मला हे वृत्त कळवलं."

"म्हणजे तुमची पत्नी सीता गेली ती गेलीच. मिस्टर राघवन् तुमच्या दुःखात आम्हीही सहभागी आहोत." भामा बोलली.

"तुमच्या नुसत्या सहानभूतीचं काय करू? माझं जीवन तर बरबाद झालं. आतापर्यंत ऑफिसचं काम होतं त्यात मन रमवलं असतं. तेही हिसकावून घेतलं गेलं. आता जीवनात उरलंच काय?"

"असं काय बोलता? तुमची सुंदर, हुशार मुलगी आहे ना? तिला इथं घेऊन या. आपल्यापाशी ठेवा अन तिच्या सुखात सुख माना."

राघवनच्या डोळ्यात अश्रूंनी गर्दी केली. "मुलीला आणलं तर ती पहिला प्रश्न विचारील, आई कुठं आहे? तिला काय उत्तर देऊ? शिवाय

इथं तिचं संगोपन कोण करणार ? "

" त्यात कसली अडचण आलीय ? तिला इथं आणण्यापूर्वी एक आई तयार ठेवा की झालं ! एकीकडे ती घराची मालकीण बनेल अन् दुसरीकडे मुलाची आई बनेल. नोकरीची काळजी नको. आमचे बाबा तुम्हाला याहून मोठी नोकरी मिळवून देतील. " धामानं म्हटलं.

घरी जाताना राघवन् धामाच्या बोलण्याचा विचार करीत होता... आई तयार ठेवा, याचा अर्थ काय ? तमा त्याला तिच्या बोलण्यातला अर्थ कळला. पण तिनं सुचवलेल्या गोष्टीला स्वीकारायला त्याच मन तयार नव्हतं.

घरी आल्यावर त्याला नोकराचाकरांच्या चेहऱ्यावर शोककळा पसलेली दिसली. तो त्यांच्याकडे डोळे उचलून पाहू शकला नाही. सरळ आपल्या खोलीत गेला. नंतर एकामागून एक सर्व खोल्यातून फिरला. घरातील प्रत्येक खाली, प्रत्येक वस्तू, प्रत्येक चित्रकृती –सर्व सीतेचं स्मरण देऊन त्याच्या हृदयाला दंश करू लागल्या. ती दोघं नव्यानंच त्या घरकुलात आली तेव्हा त्याच जीवन कसं रम्य, सुखद अन प्रेममय होतं. ते रुसवे-फुगवे, त्या मनधारण्या ....सारं किती सुखाचं, आनंदाचं होतं. त्यानंतर क्षुल्लक गोष्टीवरून दोघांत वितुष्ट येऊ लागलं. त्या आठवणी होताच राघवन्ला वाटलं, दोष आपला होता, सीता तर निर्दोष होती. तरी आता पश्चात्ताप करून काय होणार ? सीता गेली ती काय आता परत येणार आहे ? सीतेच्या जागी दुसऱ्या स्त्रीला घरात आणण्याची कल्पना आपल्या हृदयाला सहन होईल. छे ! कदापि नाही.

विचारप्रवाहात वाहात चाललेलं त्याचं मन शेवटी या निष्कर्षापर्यंत आलं की सीतेला आपल्याविषयी वाटणारा तिरस्कार फार वाढल्यानं ती घरातून पळून गेली. आपण केलेल्या अन्याचाराला कंटाळून ती इथून निघून गेली, यात तिळ-मात्र शंका नाही. पण ती कुठं गेली असेल ? मुलीला भेटायला मद्रासला तर गेली नसेल ? मद्रासला गेली असली तर लवकरच आपल्याला बातमी लागेल ! ...

...सूर्याच्या अटकेचा अन् सीतेच्या नाहीसं होण्याचा खरंच काही संबंध असेल का ? कधी कधी सूर्यावरून सीतेला झोंबण्यासारखं बोललो तरी तिच्या शीलाविषयी शंका घेऊन आपण तिच्या तिला कधीच दुखावलं नाही. मग आपला सूर्यावर राग का ? सूर्यासंबंधी पोलिसांना वर्दी देण्याचं नीच काम आपण का केलं ? हं ऽ ! सूर्या अन् तारिणी यांच्यातील स्नेहबंध आपल्याला खपला नाही. उलट खुपला. आपल्या हृदयात क्रोधाग्नी भडकला. त्यात सीतेची आहुती देऊन

तिचं जीवन नरकासारखं दुस्सह करून सोडलं. म्हणूनच आपल्याला ही संकटं सोसावी लागताहेत...

काल संध्याकाळी पार्टीच्या वेळी तारिणी भेटली तेव्हा तिनं हात जोडून विनवणी केली. सीतेला मद्रासला पोचवा अन् येताना मुंबईत मला भेटा. तिथं मी तुम्हाला माझ्या जीवनरहस्याबद्दल सांगेन. असं कोणतं रहस्य ती सांगू इच्छित असेल ?

भामा-घामानं तारिणीसंबंधी एक विचित्र संशय व्यक्त केला होता. काय, तर ती सरकारी गुप्तहेराचं काम करीत असावी. यात काही तथ्य असेल ? नाहीतरी त्या दोघी बहिणी आगावूच आहेत. कुणाच्या तरी तक्रारी करीत राहण्याचा त्यांचा धंदाच होऊन बसलाय. वास्तविक त्यांच्या संगतीत न राहणंच बरं !...यावेळी तरी आपल्याला दिलासा अन् मदत तारिणीकडूनच मिळेल...

कसंही करून तारिणीला भेटलं पाहिजे. तिचा सल्ला घ्यायला पाहिजे. सीता नाहीशी झाल्याची बातमी तिच्या कानी घातली पाहिजे.

त्या पार्टी देणाऱ्या अधिकाऱ्याच्या घरी आपण दोन दिवस आहोत असं ती बोलली होती. आताच तिला का बरं बोलावू नये ?

चटकन् त्यानं फोन उचलला. पण तारिणी तिथं नसल्याचं उत्तर मिळालं.... आणि राघवन्‌ला आपलं भावी जीवन शून्यवत् वाटू लागलं !

33

आग्रा रेल्वे स्टेशनात हलकल्लोळ सुरू होता. येणाऱ्या-जाणाऱ्या आगगाड्यांचा खडखडाट होत होता. प्रवाशांची दाटी, रेटारेट वाढली होती. गर्दी तर इतकी होती, की आगगाड्यांच्या डब्यात काय, प्लॅटफॉर्मवर काय, तीळ ठेवायला जागा नव्हती. प्रवाशांत अर्धेतरी इंग्रज सोल्जर अन् देशी सैनिक होते. भूतपूर्व सेनाध्यक्ष लॉर्ड वॅव्हेल हिंदुस्थानच्या व्हाइसरॉय-पदावर विराजमात झाले होते. त्यांच्या

सैनिकी कारकीर्दीत युद्धआघाडीवर गेलेल्या इंग्रजी फौजा यशस्वी माघार घेऊन परतल्या होत्या. तो वचपा काढून आपला दुलौंकिक धुवून काढण्याचा निर्धार करूनच त्यांनी सैनिकी नियंत्रण वाढवलं होतं.

अनेक दिशांकडून येणाऱ्या रेल्वे मार्गावर आग्रा हे जंक्शन असल्यानं सारखं गाड्यांचं जाणंयेणं सुरू होतं.

दुसऱ्या वर्गाच्या प्रतीक्षालयाच्या एका कोपऱ्यात सीता बसलेली होती. तिच्या बाजूला एक लहानशी पेटी होती. पेटीवर एक हात ठेवून ती विचारात स्वतःला हरवून बसली होती. तिचं मन कुठल्या कुठं भराऱ्या मारीत होतं...

पाच वर्षांपूर्वी याच आग्रा शहरात ती, राघवन् आणि सूर्या यांच्याबरोबर आली होती. किल्ल्यातील महाल अन् ताजमहाल बघितल्यावर तिनं आनंदाच्या भरात सुखस्वप्नांचे सर हृदयात साठवून ठेवले होते...

त्या सर्व स्वप्नांवर मात करणारी एक चमत्कारिक घटना काल तिच्याच जीवनात घडून आली होती. काही तासांसाठी ती स्वतःला राजमहालात राहण्यास पात्र अशी राजकुमारी समजून बसली आणि मनाचे वारू मोकळे सोडून आनंदानं मोहरून गेली होती. पण तो सारा आनंद एका क्षणात, एका शब्दानं पार मावळला. सीता ही एक सामान्य स्त्री आहे, हे सिद्ध होऊन गेलं. ती राजकुमारी आहे असा संभ्रम ज्यांनी तिच्या मनात निर्माण केला त्यांनीच तिला या स्टेशनात आणून सोडलं. आग्ऱ्याहून दिल्लीचं दुसऱ्या वर्गाचं एक तिकीट तिच्या हातात कोंबून ते कुठं अंतर्धान पावले कोण जाणे ! मात्र ते फक्त तिकीटच देऊन गेले नव्हते तर एक लहानशी पेटीसुद्धा देऊन गेले होते. त्यांच्यामुळे तिला जो त्रास सोसावा लागला त्याच्या मोबदल्यात काही भेटवस्तू त्या पेटीत होत्या म्हणे. राजमातेकडून ही भेट आहे असं जाताना सांगून गेले. आहाहाऽ ! राजमातेच्या या भेटीसाठी इथं कोण रडत बसलं होतं ? तिनं तर कितीदा म्हटलं, मला भेट-बीट काही नको ! पण तिचं म्हणणं मनावर न घेता ते निघून गेले होते...

पेटी उघडून तिच्यात काय आहे हे सीतेनं पाहिलं नव्हतं !

सीतेला पळवून नेणाऱ्यांनी बहुतेक तिला गुंगीचं औषध पाजलं असावं. दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा ती शुद्धीवर आली तेव्हा पक्ष्यांची किलबिल ऐकू येत होती. मात्र गुंगी पूर्णपणे उतरली नव्हती. थोड्याच वेळात तिला काही व्यक्तींचं बोलणं ऐकू आलं. ते बोलत बोलत तिच्याकडेच येत होते.

" झोपेच्या गोळ्यांचा अंमल अजून उतरलेला दिसत नाही ! " कुणी तरी म्हणालं.

" ही माझीच बहीण आहे नं ? " हा एका तरुणाचा आवाज होता.

" तुझीच बहीण आहे. वास्तविक हिचं लालन-पालन तुझ्याप्रमाणेच या राजवाड्यात व्हायला हवं होतं, पण दुर्दैवानं तिची ताटातूट केली..." हा कुण्या-तरी बाईचा आवाज होता.

हे ऐकून सीतेच्या शरीरातून वीज चमकून गेली ! त्याच आनंदाच्या गुंगीत ती पुन्हा झोपी गेली.

त्या गुलाबी झोपेची गुंगी उतरल्यावर सीतेनं डोळे उघडले...ती एका प्रशस्त दालनात सुंदर शयन-मंचावर मखमली गादीवर झोपली होती. तेवढ्यात एका आयानं जवळ येऊन आदरसूचक विनम्र स्वरात म्हटलं, " शेजारच्या खोलीत मुखमार्जनाची सोय आहे. तेवढं उरकून घ्यावं. न्याहारी तयार आहे. " त्या आयाला काही विचारावं असं तिला वाटलं. मात्र विचारायचा धीर झाला नाही.

अर्धवट शुद्धीत तिनं जे ऐकलं होतं ते आठवल्यावर तिची खात्री पटली, की आपल्याला इथं कोणत्याही वाईट हेतूनं आणलेलं नाही.

कुठल्या बरं संस्थानातील राजमहाल असेल हा ? इथल्या धनदौलतीवर माझाही अधिकार आहे ? तर मी खरोखरीच का या संस्थानची राजकुमारी आहे ? नशिबाच्या तडाख्यानं का, मला इतके दिवस यांच्यांपासून दूर राहावं लागलं ? त्या बाई कोण बरं असतील ? हा राजकुमार आपला सख्खा भाऊ असेल का ? नसायला काय झालं ? जगात असे कितीतरी चमत्कार घडून येत असतात ! तसाच काही चमत्कार माझाही आयुष्यात घडून आला आहे. एरव्ही, मला इथं आणण्यासाठी या लोकांनी एवढा आटापिटा कशाला केला असता ?

या साऱ्या गोष्टीचा पत्ता लागल्यावर आपल्या ह्यांच्या मनाची काय अवस्था होईल ? एका राजकुमारीशी आपलं लग्न झालं याबद्दल अभिमान वाटेल ? इतक्या दिवसांच्या आपल्या दुष्टपणाचा अन् अतिरेकाचा त्यांना पश्चात्ताप होईल ? निदान यापुढं आपली उपेक्षा न करता आपले लाड करतील ना ? प्रेमानं तरी वागतील ?

झोपेच्या गोळ्यांची गुंगी अन् तिची उपजत कल्पनाशक्ती –दोहोंचा मेळ बसताच ती मनोराज्यं रचू लागली. कल्पनेच्या भराऱ्या मारू लागली...

पुन्हा ती सर्वजण आली. राजमाता, युवराज आणि खासगी चिटणीस असे तिघं होती. सीतेनं त्यांच्याकडे टक लावून पाहिलं...

राजमातेच्या मुखावर स्मित खेळत होतं. ती म्हणाली, " मुली, आम्ही कुणी परके नाही. मी तुझी धाकटी आई अन् हा तुझा भाऊ बरं का ! नशिबाच्या फेऱ्यामुळं तुला आजपर्यंत दुसरीकडे काळ कंठावा लागला ! "

सीता थक्क झाली ! वाटलं तसंच झालं होतं. आपला जन्म निश्चितच राजकुलात झालाय ! मी राजकुमारी आहे ही तर जादू दिसते !

" बोलत का नाहीस ग बाई ? मी तुला इथं ज्या पद्धतीनं आणलं ती बहुधा तुला पसंत पडली नसावी. म्हणून का तू रागावलीस ? मी तुला कितीदा तरी निरोप पाठवला. पण तू इथं यायला तयार नव्हतीस म्हणून जबरदस्तीनं आणावं लागलं. तुझ्या भावाला राज्याभिषेक करायचा आहे. त्यापूर्वी तुझ्यावर झालेल्या अन्यायानं परिमार्जन करायची त्याची इच्छा आहे..." राजमातेनं म्हटलं.

" ताई ! आई म्हणते ते अगदी खरं आहे. माझ्यामुळेच तुम्हाला इथं जबरीनं आणण्यात आलं आहे. मार्गात आपल्याला जो त्रास सोसावा लागला त्याबद्दल क्षमा असावी. तुम्ही तनमनानं देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात कार्य करीत आहात हे मी चांगलं जाणतो. आपल्या या पवित्र कार्यात बाधा यावी असं मला वाटत नाही. खरं बोलायचं तर राज्याभिषेक करून घेऊन या संस्थानचा राजा व्हावं हे मनाला पटत नाही. गोऱ्यांना आपल्या देशातून हाकलून देश स्वतंत्र करण्याच्या कार्यात भाग घेण्याची माझीसुद्धा मनस्वी इच्छा आहे. तेव्हा या कार्यात तुम्ही मदत द्यावी नि मार्गदर्शन करावं. त्यासाठी तुम्ही इथंच राहावं अशी माझी विनंती आहे. ती मान्य कराल का ? "– युवराजानं विचारलं.

सीतेला त्याच्या बोलण्याचं शेंडाबूड कळलं नाही. जणू आपल्या डोळ्यावर पट्टी बांधून एखाद्या निर्जन वनात सोडून दिलंय असं तिला वाटलं...हे लोक काय बोलतायत् ? हा काय तमाशा आहे ?

" मी तर एक अबला स्त्री आहे. मी आपल्याला कशी काय मदत करणार ? शिवाय मला आपल्या पतीला विचारायला नको ? त्यांना न कळवता मला इथं आणण्यात मोठीच चूक झालीय्–" सीतेनं म्हटलं.

हे ऐकून ती सर्वजण थक्क झाली. यांच्या मस्तकावर जणू काही वज्रप्रहार झाला.

त्या तिसऱ्या माणसाकडे पाहून राजमातेनं विचारलं, " हे काय रे ज्ञानदास ? तू तर म्हणाला होतास, पोरगी खूप शिकलेली आहे. ही तर अगदीच मोडकं तोडकं बोलत्येय् ? "

" ही तर नवऱ्याच्या गोष्टी करत्येय्. हिचं लग्न केव्हा झालं ?"– युवराजानं विचारलं.

ज्ञानदासानं घाईनं खिशातून एक फोटो बाहेर काढला. तो निरखून पाहात म्हटलं, " अरे अरे ! मोठीच गल्लत झालीय्. हिचं रूप तर तसं आहे पण ही ती नव्हे ! च् च् ! घोडचूक झाली. सरकार, आता कसं ?"

" बेटा, खरं खरं सांग. तुझं नाव तारिणी नाही का ?" – राजमातेनं विचारलं.

त्या एका वाक्यानं सारा गौप्यस्फोट झाला ! सीतेची सारी मनोराज्य क्षणात धुळीला मिळाली ! अरे दैवा ! हे पढतमूर्ख आपल्यालाच तारिणी समजून इथं घेऊन आले तर ! आपणसुद्धा ही गंधर्वनगरी खरी समजून हवेत मनोरे रचू लागलो!. . . तिच्या आशांचा भंग झाल्यानं ती खवळून उठली. तिच्या हृदयातील संतप्त ज्वालामुखीतून लाव्हारसासारखे प्रखर शब्द बाहेर पडले –

" हे पाहा, मी काही तारिणी नव्हे ! मी या धूर्त राजकुलात जन्मल्ये नाही. नटून–थटून आपल्या मोहक स्वरूपानं पुरुषांना आपल्या जाळ्यात पकडणाऱ्या स्त्रियांपैकी मी नाही. मी आहे, एका गरीब घरात जन्मलेली एक सामान्य मुलगी. दैवानं लाभलेल्या पतीच्या हातचं मंगळसूत्र लेवून मी संसार चालवीत होत्ये. आपल्या मूर्खपणानं तुम्ही माझी ही दशा करून टाकलीत ! आणखी पुढं काय वाढून ठेवलंय कुणास ठावूक ! "– सीता मोठमोठ्यानं रडू लागली.

" ए पोरी ! उगीच आरडा–ओरडा करू नकोस. अजाणतेपणी आमच्या हातून चूक घडली. तरी आम्ही तुला सुरक्षित घरी पोचवून देऊ. माफ कर ! "

" तुम्हाला काय ? अगदी सहज बोलून टाकलंत ! . . .तुम्ही लोक महान पातकी आहात ! निर्दय आहात ! स्वार्थी आहात ! तुमचा निर्वंश होईल ! तुमचं नावनिशाण शिल्लक राह्यचं नाही ! " सीता शाप देऊ लागली.

हे न ऐकवल्यानं राजमाता व युवराज त्वरेनं चालती झाली. जाताना त्या माणसाला चांगलंच फटकारलं. केविलवाणेपणानं क्षमायाचना करीत अन् आपली बाजू सावरीत तोही त्यांच्या मागोमाग गेला . . . .

ते तिथून निघून जाताच सीतेच्या डोळयांतून कढत अश्रूंची धार तिच्या गालांना चटके देत वाहू लागली. प्राचीन काळच्या साध्वीप्रमाणे तिच्यात सामर्थ्य असतं तर तिनं डोळ्यातील क्रोधाग्नीनं त्या तिघांना जाळून भस्म केलं असतं !

" हाय रे दैवा ! मी कुठंही गेल्ये तरी ही कुलांगार तारिणी वैरीण बनून सोबत करत्येच ! माझ्या आशांवर पाणी फिरविण्यासाठी, माझं जीवन दु:खमय बनवण्यासाठीच मेलीचा जन्म झालाय् ! अग, मोहक चेहऱ्याच्या कैदाशिणी, तुझा मनोभंग करणारा कुणी धैर्यवान पुरुष तुला का बरं भेटत नाही ? पुढच्या वेळी भेट तर खरी, तुला विष देऊन ठारच करून टाकत्ये. '

अपमानित अन् निराश झालेल्या सीतेच्या मनात कितीतरी भयंकर विचार येऊन गेले.

त्यानंतर जे घडलं ते घडलं तें एका निमिषात, कमालीच्या वेगानं . . . आग्रा स्टेशनच्या प्रतीक्षालयात सीता बसली होती. आपल्या आयुष्यात असं काहीतरी घडून गेलं यावर तिचा स्वत:चा विश्वास बसत नव्हता . . .

पण आता पुढे काय करायचं ? आपलं भवितव्य काय ? आपल्याजवळ दिल्लीचं तिकीट आहे अन् एवढ्यात गाडी येईलच, हे सारं खरं. पण दिल्लीला जाऊन काय करायचं ? त्यांच्यापुढं कोणत्या तोंडानं जायचं ? ' दोन दिवसांपासून कुठं होतीस ? ' असं विचारलं तर मी काय उत्तर देऊ ? आधीच तर ते आपल्यावर विनाकारण जळफळतात. हे निमित्त करून त्यांनी नातंच तोडून टाकलं तर ? सूर्या नि आपण मिळून काहीतरी कट रचला असंच त्यांच्या मनानं घेतलं तर कसं करायचं ? अशा अवस्थेत ते कसे घरात घेतील ? प्रत्यक्षात अनुभव-लेल्या गोष्टी सांगितल्या तरी ते खऱ्या मानतील तेव्हा नं ? आपण कल्पनेनं रचून कथा सांगतोय असं समजतील झालं. आपण स्वत: सर्व काही भोगलं तरी, आपल्या जीवनात हे घडलं, यावर आपलाच विश्वास् बसत नाही. मग ते कसा विश्वास ठेवणार ? आपल्या आधीच्या विचारानुसार त्यांना सोडून गेलो तर काय होईल ? पण आपण जायचं तरी कुठं ? मद्रासला आपली वासंती आहे, तरी तिथं जाऊन सासूसासऱ्यांना तोंड तरी कसं दाखवायचं ? अचानक एकट्यानं निघून येण्याचं कारण काय सांगायचं ? त्यापेक्षा सूर्याच्या सांगण्याप्रमाणे कलकत्त्याला ललितेची मैत्रीण आहे तिच्याच घरी जावं. तिथून नीट विचार करून मग मद्रासला पत्र घालावं. तिथल्यांचं मत कळल्यावर जाणंच योग्य ठरेल. अंहं !

आपण मद्रासला कशाला जायचं ? उपजीविकेसाठी नोकरी का शोधू नये ? आजकाल कितीतरी स्त्रिया नोकरी करतात अन् स्वतंत्रपणे आयुष्य कंठतात. आपणही एखादी नोकरी शोधून आपल्या लेकीला बोलावून घेतलं तर काय बिघडेल ? अशा प्रकारच्या विचार-लहरींत हेलकावे खाल्ल्यावर कलकत्त्यास जाणंच बरं होईल असा तिनं निर्णय घेऊन टाकला.

34

जगातल्या सर्व महानगरांत नवयौवन आणि रमणीयता यांनी पुरेपूर भरलेलं कोणतं एक महानगर असेल तर ते आहे कलकत्ता ! त्या नगरसुंदरीच्या सुडौल खांद्यावर हवेनं फडफडणाऱ्या निळ्या ओढणीसारखं स्वच्छ जलानं काठोकाठ भरलेलं ते निळं सरोवर दूरवर पसरलेलं दिसत होतं. त्या सरोवराच्या काठी जी हिरवीगार हिरवळ उगवली होती ती निळ्या ओढणीला लावलेल्या नक्षीदार हिरव्या किनारीप्रमाणे दिसत होती.

त्या सरोवराच्या मध्यभागी पाचूच्या रंगाचं बेट एखाद्या चित्रकाराच्या चित्ररूप धारण केलेल्या हृदयंगम चित्रकल्पनेची आठवण करून देत होतं.

त्या जलाशयावर नौकांचा विहार अन् श्वेतपक्ष्यांची क्रीडा सुरू होती.

सरोवराच्या मध्यभागी असलेल्या बेटावरून पक्षांची सायंकालीन किलबिल नादमधुर समूह-गानाप्रमाणे मंद मंद वायूलहरींवरून चारीबाजूला ऐकू येत होती.

अशा रम्य सायंकाळी सरोवराच्या काठावरील हिरवळीवर स्त्री-पुरुषांचे थवेच्या थवे दिसत होते.

काहीजण एकेकटे हिरवळीवर उताणे पडून अर्धोन्मीलित नेत्रांनी दिवास्वप्न पाहात काव्यरचना करीत होते.

काही लोक वर्तुळाकृतीत बसून तावातावानं चर्चा करीत होते.

कितीतरी तरुण जोडपी मीलनाच्या अद्वैतानंदात तल्लीन झाली होती.

देवपट्टणम्चे दामोदर पिल्ले यांचे चिरंजीव अमरनाथ व त्याची पत्नी चित्रा ही दोघंसुद्धा तिथंच एका बाजूला एकान्तात बसून त्या रमणीय सौंदर्याचा आनंद लुटत बसली होती.

चित्रा म्हणाली, " कलकत्याच्या या सरोवराचं सौंदर्य तिरुचेंदूरच्या समुद्र-किनारीदेखील आढळत नाही. "

" या वंगभूमीचा तुझा मोह अद्याप सुटत नाही असं दिसतं. मला तर आता या सरोवराचं मुळीच आकर्षण वाटत नाही. उलट हे सरोवर पाहताच माझं हृदय वेदनेनं भरून जातं. वाटतं, वंगभूमीनं आपल्या लाडक्या लेकरांची दुर्दशा पाहून ढाळलेल्या अश्रूंनीच हे तुडुंब भरलं आहे. "—अमरनाथ बोलला.

" इश्श ! यापूर्वी तुम्ही याचं वर्णन नेमकं याच्या उलट केलं होतंत. तुम्ही म्हणाला, बंकिमचंद्रांच्या कादंबऱ्या अन् रवींद्रनाथांची काव्यं वाचून वंगदेवीनं आनंदाश्रू ढाळले, तेच या सरोवराच्या रूपानं इथं साचून राह्यलेत. ती तुमची आनंदानुभूती आताच कुठं लुप्त झालीय ? "

" दुष्काळात आटून गेली ! गेल्या तीन महिन्यांपासून सडकेच्या दोन्ही बाजूला उपासमारीनं मरून पडलेल्यांची प्रेतं पाहून माझा कथा-कादंबऱ्यांवरील, काव्य-गीतांवरील विश्वासच उडून गेला. ते सारं वेडेपण आहे असं वाटू लागतं. म्हणून तर महात्मा गांधीनी म्हटलं, ज्या देशात लोक भुकेनं मरतात त्या देशातील कला आणि कविता समुद्रात फेकून द्यावी. चरख्याचं गीत हेच खरं गीत आहे. तेच संगीत असून भुकेला ते पळवून लावतं. "

" या वंग देशातील लोक तर फार देशभक्त नि ईश्वरभक्त आहेत. तरी देव त्यांची एवढी कठोर परीक्षा का घेत आहे हेच कळत नाही ! " चित्रा भारावलेल्या आवाजात बोलली.

" बंगाली लोक चांगलेच आहे. मात्र त्यांच्यात एक फार मोठा दुर्गुण आहे. त्यांच्यात संकुचित प्रांतीयता ओतप्रोत भरलेली आहे. त्यांच्या दृष्टीनं बंगाली हेच देवांच्या जातीतले आणि इतर सर्व दैत्यांच्या जातीतले आहेत. या त्यांच्या दुर्गुणासाठीच देव त्यांना ही शिक्षा देत आहे. असं मी समजतो. " अमरनाथ म्हणाला.

" अय्या ! तुम्ही देवाला निष्ठूर बनवून टाकलंत हो ! ज्या प्रांतात चैतन्य, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद अशा थोर विभूती अवतरल्या तिथल्या लोकांना देव इतकी कठोर शिक्षा का देतोय ? देवाला तर आपण करुणाघन म्हणतो ना ?

सुरेंद्रनाथ, देशबंधू आणि नेताजी अशा नेत्यांना जन्म देणाऱ्या भूमीतील लोकांना प्रांतीयतेचा थोडा अभिमान असला तर तो असा कोणता वाईट ठरतो ? "

" तर मग तूच सांग, याचं कोणतं वेगळं कारण असेल ? बंगालच्या लोकांना एवढ्या हालअपेष्टा का सोसाव्या लागताहेत ?"

" माझ्या दृष्टीनं तर लोकांची स्वार्थी वृत्तीच याला कारणीभूत आहे. तामसी गुणांनी भरलेले लोक पैशाच्या लोभानं शेतीत होणारं अख्खं पीक खरेदी करून त्यावर काळाबाजार करू लागले तर दुष्काळ पडल्याशिवाय राहील का ?"

" पण अशा क्रूर जीवांना ईश्वरच जन्माला घालतो ना ? आपले वेद, शास्त्रं अन् पुराणं सांगतात, की सर्वांच्या हृदयात ईश्वराचा वास असतो. म्हणजे मनुष्य जे काय करतो त्याचा सारा भार त्याच्याच डोक्यावर पडेल ना ? "

" तुम्ही कम्युनिटांच्या सहवासानं पक्के नास्तिक बनलात. अशानं मी नाही तुमच्याशी बोलायची ! "– चित्रा फणकाऱ्यानं म्हणाली.

" असो. कम्युनिस्टांच्या सहवासानं एक गोष्ट खात्रीनं चांगली झाली. एका मुजोर बाईला गप्प करण्यात मला यश आलं. "– अमरनाथ चेष्टेनं म्हणाला.

काही वेळ विचार करीत चित्रा गप्प होती. नंतर ती म्हणाली, " सुभाषबाबू इथं असते तर त्यांनी क्रांती घडवून आणली असती. सध्या मलायात ज्या सैन्याची जमवाजमव करीत आहेत त्या सैन्यात भारतीय बहुसंख्येनें भरती होवोत, न होवोत, पण जे भरती होतात ते मनाची पूर्ण तयारी करूनच होतात. वाहवा ! नेता असावा तर सुभाषबाबूंसारखा असावा."

" सुभाषबाबूंची तुझ्या मनाला पडलेली भुरळ कमी झालेली नाही. त्यांनी लढाई जिंकली तर ठाऊक आहे काय होईल ? इंग्रजांच्या जागी बंगाली प्रशासक येतील."– अमरनाथ बोलला.

" येतील तर येऊ द्या. परकीय इंग्रजांच्या गुलामगिरीत राहण्यापेक्षा बंगाली शासनाखाली राहाणं हजार पटीनं बरं."

" हजार पटीनंच का ? लाखपटीनं बरं म्हण. मी तुला वस्तुस्थितीची जाणीव करून दिली इतकं ! आता तूच सांग, बंकिमचंद्रांनी 'आनंदमठ' लिहिली ती कोणाला वरचढ ठरवून ? बंगाल्यांनाच की नाही ? आधी त्यांनी सात कोटी बंगाल्यांचा उल्लेख 'वंदे मातरम्' या गीतात केला होता. पुढ सातचं तीस केलं. तू काहीही म्हण बंगाली लोकांत हा दुर्गुण आहेच ! "

" रवींद्रनाथ टाकूर बंगालीच होते नं ? त्यांनी तर सर्व जगाला एक मानून सर्व मानवांची एकच जात मानली आहे. तुमची बंगाली लोकांवरील टीका मला मुळीच पसंत नाही. आपण व्यापारउदीम करून चार पैसे मिळविण्यासाठी इथं आलो. इथलं अन्नपाणी खाऊनपिऊन वरती निंदा का करायची ? हे असं शोभतं का ? ज्या पानात जेवायचं त्यालाच छिद्र पाण्यासारखा हा प्रकार आहे. बरे पुरे आता ! हावऱ्याला जायचं असं तुम्ही बोललात ना ?" – असं म्हणत चित्रा उठून उभी राहिली.

" माझी तर फार दिवस इथं राह्यची तयारी नाही. लवकरच तामीळ-नाडूला परत जायचा माझा विचार आहे."– अमरनाथही उठला.

याप्रमाणे कधीच न संपणाऱ्या वादविवादात गुंतलेलं जोडपं आपल्या गाडीकडं आलं. ते दोघं गाडीत बसली....

अमरनाथ आणि चित्रा कलकत्त्याच्या 'टॉली गंज' विभागातील एका सुंदर बंगल्यात राहात होती. पूर्वी ते नियमानं हवा खाण्यासाठी त्या ठिकाणी येत. दुष्काळ-पीडित लोकांची कलकत्त्याला रीघ लागल्यानंतर या उपक्रमात खंड पडला. दुष्काळ-पीडितांना सहाय्य करणाऱ्या एका संस्थेची सदस्य बनून चित्रा समाज-सेवेच्या कार्याला लागली होती. वास्तविक ती संस्था ब्रह्मदेशातून आलेल्या शरणार्थी स्त्रिया-मुलांच्या सहाय्यार्थ स्थापन झाली होती. ते कार्य पूर्ण व्हायला आलेलं असताना दुष्काळ पडला. तेव्हा उपासमारीनं अर्धमेल्या अवस्थेत बाहेर-गावाहून येणाऱ्या स्त्रिया-बालकांच्या सेवाशुश्रूषेचा भार या संस्थेनं आपल्या शिरावर घेतला होता.

आता काही दिवसांपासून सेवाकार्यसुद्धा संपलं होतं. म्हणून तीन महिन्यांनंतर थोडा वेळ काढून अमरनाथ व चित्रा त्या दिवशी सरोवराच्या काठी फिरायला आली होती. घरून निघताना हावऱ्याला जाण्याचा कार्यक्रम ठरवून आली होती. हावरा स्टेशनापासून थोड्या अंतरावर मोठमोठ्या व्यापारी कंपन्या होत्या.

गाडी चालवत असताना अमरनाथ म्हणाला, " दुष्काळानं म्हणे इथं इतके लाख लोक मेले अन् तिथं तितके लाख लोक मेले. इतके लोक मरूनही इथं केवढी गर्दी आहे बघ ! '

" असेना का गर्दी. जपून गाडी चालवा. उगीच कुणाच्या अंगावर गाडी घालून लोकसंख्या कमी करण्याच्या फंदात पडू नका हं ! " –चित्रानं म्हटलं.

" या रस्त्यावर मी कुणाच्या अंगावर गाडी घातली तरी तो खात्रीनं तांदळाचा साठा करून काळ्या बाजारात विकणाराच असेल. अशाला ठार करण्यानं देशसेवेचं फार मोठं पुण्य माझ्या पदरात पडेल. " अमरनाथ थट्टेत बोलला.

संध्याकाळ संपून रात्र पडली. अंधार झाला. रस्त्यावरचे विजेचे दिवे लागले. मात्र प्रकाश-बंदीसाठी दिव्यांवर काळी शेड लावल्यानं रस्त्यावर अंधुक प्रकाश पडला होता.

" जपानी आक्रमण आलं अन् कलकत्त्याची शोभाच नाहीशी झाली. पूर्वी इथंच दिव्यांचा काय झगमगाट असायचा ! रात्र दिवसासारखी वाटे. "

चित्रा हे बोलत असतानाच दशादिशांना भेदून जाणारा धडाम् असा आवाज झाला. एकदम धोक्याची सूचना देणारा भोंगा वाजू लागला. जपानी विमानं बॉम्ब वर्षाव करीत आहेत ही गोष्ट त्याच्या लक्षात आली. ए. आर. पी. चा भोंगा आधी वाजायचा तो नंतर वाजत होता. त्यांना आलेला हा अनुभव अपूर्व व आकस्मित असल्यानं दोघेही घाबरली. त्यांची शरीरं थरथर कापू लागली. हृदयं धडधडू लागली. चित्रानं अमरनाथचा खांदा गच्च पकडून ठेवला. अमरनाथनं कशीतरी गाडी सडकेच्या एका बाजूला उभी केली. सडकेवरची गर्दी एका निमिषात पांगली. लोक सैरावैरा पळू लागले. मोटारी तेवढ्या सडकेवर जिथल्या तिथं थांबून राहिल्या.

गोळ्याचे आवाज थांबून पाच मिनिटं झाली. ' तूर्त एवढंच झालेलं दिसतं. आता जायला हरकत नाही ' असा विचार त्यांच्या मनात आला नाही तोच आहाहा ! एकदम डोळे दिपवणारा प्रकाश पडला. कोटी-कोटी सूर्य धरणीवर उतरल्यासारखे वाटले. पुढल्याच क्षणी तो चमत्कारिक प्रकाश मंद झाला.. त्यानंतर असा काही धडाक्याचा आवाज झाला की सारं बम्हांड कोसळलंसं वाटलं. एकदम कानठळ्या बसल्या. गाड्या हलू लागल्या. काचेची तावदानं फुटून पडली. चारी दिशांनी लोकांच्या कण्हण्याचे—किंचाळण्याचे आवाज ऐकू येऊ लागले...

एवढ्यानंच सारं काही संपलं नाही. थोड्या अंतरावरून धुराचे लोट आकाशात जाताना दिसले. आकाश धुरानं व्यापून टाकलं. त्या धुरातून आगीचे लाल-लाल लोळ आकाशाशी स्पर्धा करू लागले.

एवढा सारा वेळ चित्रा अमरनाथला घट्ट पकडून होती. आता तिनं हळूच तोंड उघडलं. कापऱ्या आवाजात तिनं विचारलं, " अग बाईऽ! हे काय? हा आगीचा डोंब कुठून उमळलाय ? "

" मला वाटतं, टी. एन. टी. च्या दारूगोळ्याला आग लागली असावी. त्यामुळेच तर कानठळ्या बसणारे स्फोट होतायत. " अमरनाथ बोलला.

" हे बघा, गाडी परतवून घरी घेऊन चला. आजचा हावऱ्याचा बेत रद्द करू या. " चित्रानं म्हटलं.

" माझ्या हातांना कापरं भरलंय. ते जरा कमी होऊ दे. त्यामुळेच तर मी थांबलोय. आज हावऱ्याला जातो म्हटलं तरी शक्य नाही. "

अमरनाथचं म्हणणं खरं होतं. चहूबाजूंनी येणाऱ्या आवाजांनी, भोवतालच्या दृश्यांनी त्याच्या म्हणण्यास पुष्टी दिली.

आगीचा जो डोंब उसळला होता तो आता हजारो जिभा काढून चहूकडे पसरू लागला होता. आकाशाशी स्पर्धा करू लागला होता !

त्याच्या भोवताली लहानमोठ्या अग्निज्वाला पसरू लागल्या.

त्यातून निघणारा धूर आकाशात पसरून आच्छादन घालू पाहात होता.

सर्व लोक आरडा ओरड करीत आग लागलेल्या ठिकाणाकडे धावत होते.

ठण् ठण् आवाज करीत आगीचे बंब उडत आल्यासारखे चहूदिशांनी येऊन थडकले !

अमरनाथची कार तेथून निघाली. सडक ओलांडून दुसऱ्या गल्लीत घुसली, थोडं दूर जाताच लोकांची गर्दी झालेली दिसली. कार गर्दीच्या जवळ गेली. काही गुंड एका मारवाड्याच्या घरात शिरून लूट करीत होते. हाती लागेल ते घेऊन पळत होते....

गर्दीत काही पोलीसही होते. गुंडांनी चालवलेली लूटमार गुपचुप पाहात होते.

अमरनाथनं आपली मोटार गर्दीजवळ नेली. मात्र तेथील परिस्थितीची जाणीव होताच तो थोडा घाबरला. त्याला वाटलं, गाडी परत घेऊन जावी. पण परत जाण्यासाठी रस्ता मोकळा नव्हता.

शिवाय, गुंडांच्या या दंडेलीला भिऊन का परतून जायचं ? सडकेच्या काठाकाठानं हळूहळू गर्दीतून त्यांची गाडी जाऊ लागली... काही लोकांनी गाडीच्या टपावर ताल धरला. काहींनी दार खटखटावलं. काहींनी मागून ओढून मोटार

थांबवण्याचा प्रयत्न केला. काही लोक उगीचच 'हो ऽ हो ऽ!' करून ओरडले. या सर्वांवर मात करीत कुणाचा तरी आवाज आला, 'ठोका!'

अमरनाथनं घाबरून गाडी पुढं काढली. सुदैवानं काहीच घडलं नाही. गर्दीतून बाहेर पडताच अमरनाथनं गाडीचा वेग वाढवला.

काही दूर गेल्यावर त्यांना सडकेच्या बाजूला कलंडलेली बस दिसली. ती बस जळत होती.

" काय हो, बसला आग कशी काय लागली ?"– चित्रानं विचारलं.

" आग आपोआप कशी लागणार ? कुणा गुंडानं लावली असेल. "

" कशासाठी ?"

" याचं काय उत्तर देणार ? गुंडांच्या आततायी कृत्याचं कारण कसं सांगायचं ? लूटमार, डाका घालणं, आगी लावणं यासारख्या कामात त्यांना काय आनंद मिळतो, कळत नाही. कदाचित् हे कामसुद्धा त्यांचंच असेल !"

गाडी आणखी पुढं गेली. सडकेच्या एका बाजूला कुणी पडलेलं होतं. जवळ गेल्यावर दिसलं, ती बाई होती. तिच्या अंगावर एक पोरगा ओणवा झाला होता.

"अहो, गाडी थांबवा !" चित्रा ओरडली.

गाडी थांबली. बाईच्या अंगावर ओणवा झोलेला पोरगा धूम पळाला.

"तो मुलगा काय करीत होता हो ?" चित्रानं विचारलं.

" हातातल्या बांगड्या काढत होता. आपल्याला पाहून पळाला लेकाचा !"

ती दोघं मोटारीतून उतरून त्या बाईजवळ गेली.

" अय्या ऽ ! ही तर मद्रासकडची पोरगी दिसते. वयसुद्धा फार दिसत नाही. दुर्दैवी बिचारी !"– चित्रा उदगारली.

"अग, मद्रासी असली म्हणून का यमराज तिला सोडून देणार आहे ? बिचारीच्या नशिबी असंच मरण लिहिलं असेल !"

खाली पडलेल्या त्या मुलीच्या नाकाशी चित्रानं बोट नेलं. अगदी हळूहळू श्वासोच्छ्वास सुरू होता.

" ही काही मेली नाही; जिवंत आहे ! चला या, उचला लवकर ! " असं बोलून चित्रानं त्या बेशुद्ध पोरीला डोक्याकडून उचललं.

" असे दगडासारखे हो काय उभे राहचलात ? झटपट पायाकडून उचला बरं. " चित्रानं आज्ञाच केली जणू.

" रस्त्यात पडलेल्या बेवारशी मुलीसाठी मला दगड ही पदवी मिळाली.

कळत नाही, कुठल्या जन्माचं कर्म आड आलं म्हणून आज हिचे पाय धरावे लागतायत्." अशी बडबड करीत अमरनाथनं मुलीला पायाकडून उचललं. दोघांनी मिळून त्या बेशुद्ध मुलीला गाडीत आणून झोपवलं.

"चला, लवकर गाडी चालवा. या बाईच्या प्राणाचं रक्षण करा!"

गाडी सुरू करीत अमरनाथानं विचारलं, "गाडी कुठं घेऊ?"

"कुठं म्हणजे काय? घरी चला."

"तर मग मी गाडी इथंच थांबवतो. हिला घरी न्यायला नको. हिनं आपल्या घरात येऊन प्राण सोडला तर काय आफत होईल?"

"तुमच्यासारखा निर्दय, पाषाणहृदयी माणूस कधी पाहिला नाही! अनाथाश्रमात तरी चला. कुठंही चला, पण लवकर चला पाहू!"

अमरनाथनं वेगानं गाडी काढली. चालत्या मोटारीतील थंड हवेच्या झुळकीनं बेशुद्ध तरुणीच्या चेहऱ्यात फरक दिसू लागला. तिची गेलेली शुद्ध परत आली. अनाथाश्रमात नेऊन थोडे प्राथमिक उपचार करताच ती पूर्णपणे शुद्धीवर आली. धोका टळल्याची खात्री होताच अमरनाथ आणि चित्रा घरी गेली.

35

सकाळी चांगला अर्धा तास जोराचा पाऊस झाल्यानं कलकत्त्याच्या सडका धुवून निघाल्या होत्या. सडकांच्या दोन्ही बाजूला असलेल्या वृक्षांवरून पाण्याचे थेंब टप्टप् खाली पडत होते. पक्षी पंख फडफडून अंगावरचे जलबिंदू झटकून टाकत होते.

वरच्या झरोक्यातून चित्रा हे मनोहर दृश्य बघत होती.

तिचा पती अमरनाथ ऑफिसात जाण्यासाठी कपडे बदलत होता.

" आज ऑफिसातून संध्याकाळी लवकर घरी याल न ! पाऊस पडल्या-मुळं सरोवराचा भाग रम्य दिसत असेल. लवकर आलात तर आपण तिकडन फिरून येऊ " चित्रानं म्हटलं.

" बस, बस ! त्या दिवशी सरोवरावर गेलो तेव्हा जी शोभा झाली ती पुरेशी नाही का ? त्या दिवसापासून सरोवराचं नाव काढलं की माझ्या अंगावर शहारे येतात. परत येताना पुन्हा एखाद्या बाईचा जीव वाचवायची पाळी... त्यापेक्षा एखाद्या सिनेमालाच जाऊ या. 'ॲना कॅरेनिना' सिनेमा लागला आहे म्हणे ! "

" बाई, बाई ! या पुरुषांचं सारंच विचित्र ग ऽ बाई. नाटक-सिनेमात एखादी स्त्री रस्त्यात पडलेली पाहचली की यांचं हृदय विरघळून जातं; अन् प्रत्यक्षात तशी पडलेली बाई दिसली तर तोंड लपवू लागतात. एका अनोळखी मुलीविषयी तुम्ही इतकं कठोर का व्हावं हेच मला कळत नाहीय्. " चित्रा बोलली.

" अहो बाईसाहेब, अनोळखी म्हणूनच अधिक सावध राहावं लागतं. ती कुलीन असती तर तिनं आपलं नाव लपवून का ठेवलं असतं ? अजून तिनं आपला खरा परिचय दिलाच कुठं ? " अमरनाथनं विचारलं.

" त्यामुळे काय बिघडतं ? परिचय न देण्याची अनेक कारणं असू शकतात. मला तर ती दुःखानं पीडलेली वाटते. अनाथाश्रमाच्या अध्यक्ष चौधरीबाई तर सारखी तिची स्तुती करीत असतात. अगदीच कंटाळत नाहीत. काय तर म्हणे, ती रोज पाचपन्नास अनाथ मुलांना न त्रासता न्हाऊ-माखू घालते. ती इथंच राहचली तर त्यांची कितीतरी कामं हलकी होतील असंही म्हणत होत्या. "

" एवढी चांगली आहे तर मग आपलं नावगाव सांगायला का तयार नाही ? " अमरनाथनं पुन्हा प्रश्नावर जोर देत विचारलं.

" कोण जाणे ? कदाचित् तिचा नवरा तुमच्यासारखाच पाषाणहृदयी असेल. त्यानं तिला मारझोड करून घरातून घालवून दिलं असेल अन् ती हे रहस्योद्घाटन करायलाही तयार नसेल. "

" अस्सं काय ? एवढी हिम्मत होय तुझी ! एखाद्या दिवशी खरंच मी तुला चांगली ठोकून घराबाहेर काढतो की नाही ते बघ. "

" पण मी त्या भोळ्याभाबड्या मुलीसारखी सारं सहन करून गप्प बसेन अशा भ्रमात राहू नका हं. मी तर जगभर दवंडी पिटून सांगेन, मला मारझोड करून घराबाहेर हाकून देणारे पतिराज हेच होत. लक्षात ठेवा. "

याच वेळी घरचा नोकर त्या दिवशीची डाक देऊन गेला. अमनाथनं ती पत्रं चाळून पाहात म्हटलं, " श्रीमती चित्रादेवीच्या नावाचं एक पत्र आहे. श्रीमती ललितादेवीनं लिहिलेलं दिसतं." असं म्हणत चित्राच्या हातात पत्र देऊन तो आपली पत्रं वाचू लागला.

चित्रा आपलं पत्र घेऊन खोलीत गेली. पण पाचच मिनिटात ' अहो, ऐकलंत का ? " असं म्हणत बाहेर आली.

" ललिताच्या भावानं–सूर्यानं–दिल्लीतील पोलिसांच्या डोळ्यात धूळ झोकून पळून जाण्याचा प्रयत्न केला आहे. पोलिसांनी चारी बाजूनी त्याला वेढलं तर त्यानं पिस्तूल झाडलं. पोलिसांशी झालेल्या झटापटीत त्याला चांगलाच मार लागला असून त्याचं जीवित धोक्यात आहे. ललितेनं व्याकुळ होऊन सर्व काही लिहिलंय्. याशिवाय सीतासुद्धा अचानक नाहीशी झालीय. काहीच न कळवता निघून गेलीय्. सूर्या पकडला गेला त्याच दिवशी सीता पळून गेलीय. सीतेच्या नवऱ्यानं ललितेच्या वडिलांना पत्र लिहिलंय् की ती देवपट्टणम् किंवा राजमपेट्टेला येण्याचा संभव आहे. तरी तसं असल्यास त्वरित कळवावं " चित्रानं एका दमात सांगून टाकलं.

हे ऐकताना अमरनाथ एकदम विचारात गढून गेला. मग झटक्यात उठून वर्तमानपत्रं ठेवलेल्या कपाटाकडे जात म्हणाला, " चित्रा, चारच दिवसांपूर्वी वृत्तपत्रात दिल्लीची एक बातमी प्रसिद्ध झाली होती. तूसुद्धा ती वाचली असशील."

कपाटातील ठेवलेली वर्तमानपत्रं त्यानं घाईघाईत चाळून पाहिली. काही मिनिटांतच ती बातमी त्याला सापडली. ती शोधायसाठी तो कमालीचा उतावीळ झाला होता.....

" ओहोऽ ! सापडली. ही बघ ती बातमी. ऐक चित्रा " असं बोलून तो वर्तमानपत्रातील ती बातमी मोठ्यानं वाचू लागला :

'चार दिवसांपूर्वी सूर्यनारायणन् नावाच्या क्रांतिकारक तरुणाला अटक झाल्याची बातमी आमच्या अंकात छापली होती. अटकेपूर्वी त्याने पोलिसांशी चांगलीच झटापट केली. परिणामी त्याला बरीच गंभीर दुखापत झाली. उपचारासाठी त्याला इस्पितळात दाखल करण्यात आले होते. काल रात्री तो पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरारी झाला, अशी बातमी मिळाली आहे. पोलिसांना हूल

देऊन तो कसा पळाला, हे रहस्य अज्ञात आहे. गुप्त-पोलीस खाते कसोशीने त्याचा शोध करीत आहे.

सूर्यनारायणन् पकडला गेला त्याच दिवशी फरारी झालेली तरुणीसुद्धा अद्याप सापडलेली नाही. ती स्त्री अत्यंत चतुर आहे. नव्या दिल्लीत ती दोन वेगवेगळ्या नावांनी कालक्रमणा करीत असून तिचे बडया अधिकाऱ्यांशी स्नेहाचे संबंध आहेत, असं म्हणतात. त्या क्रांतिकारक तरुणीच्याही शोधात गुप्त पोलीस शिकस्तीनं लागले आहेत.'

अमरनाथनं घाईघाईनं ही बातमी वाचली अन विचारलं, " यासंबंधात तुला काय वाटतं चित्रा ? वृत्तपत्रात ' सूर्यनारायणन् ' हे नाव वाचताच मला केवळ सूर्याचं स्मरण झालं नाही तर त्याच्या चातुर्याचं कौतुक वाटलं. इतक्या दिवसांपासून पोलिसांच्या डोळ्यात धूळ झोकत दडून राहणं ही का सोपी गोष्ट आहे ? पोलिसांच्या पहाऱ्यातून घायाळ असताना हातावर तुरी देऊन पळून जाणं हे काही सोपं काम नव्हे. चित्रा, तुझ्या तोंडून शब्द फुटत नाही. सूर्याचं हे धाडस काय आश्चर्यकारक नाही ? "

" आता सूर्याची बढाई बंद करा.....माझ्या मनात वेगळाच विचार येतोय.... सीतेचं काय झालं ? ती का व कशी फरारी झाली. .... अहो, तुम्ही आजच्या दिवस सुट्टी घ्या नं गडे ! आपण दोघं अनाथाश्रमात जाऊन येऊ. चलता आताच ?"

" कमाल आहे तुझी. अनाथाश्रमात जाण्यासाठी मी ग कशाला सुटी घेऊ ?" अमरनाथनं विचारलं.

" अय्या ! अजून तुमच्या लक्षात नाही आलं ? त्या दिवशी सडकेवर पडलेल्या एका मुलीला आपण अनाथाश्रमात ठेवून आलो नं ? त्याच्याबद्दल मला शंका.... "

" अच्छा, म्हणजे तुला का ती सीता वाटली ? वाहवा. खूप डोकं लढवलंस. कुठं दिल्ली अन कुठं कलकत्ता. ती इथं कशाला येईल ? तिच्या नवऱ्यानं लिहिल्यानुसार ती देवपट्टणम् किंवा राजमपेट्टेला गेली असली तर गोष्ट वेगळी ! " अमरनाथनं तिला अडवून म्हटलं.

" बरेच शहाणे आहात ! तुमच्या शहाणपणाची करावी तेवढी स्तुती कमीच ठरेल.... सीता क्रांतिकारक आहे हे तुम्ही कसे विसरता ? देवपट्टणम् किंवा राजमपेट्टेला जाणं म्हणजे पोलिसांना निमंत्रण देणंच ठरेल ना. भूमिगत लोकांना

लपून छपून राहण्यासाठी कलकत्ता हेच योग्य ठिकाणी आहे असं समजून ती इथं आली असावी.....बरं; तुम्ही सीतेला आधी पाहिलं आहे ना ? आता तिला ओळखू शकणार नाही का ? "

" अग, लग्नाच्यावेळी फक्त एकदाच तिला बघितलंय. तेदेखील तब्बल दहा वर्षांपूर्वी. आता ते कसं आठवणार ? "

" आता चला. नीट निरखून पाहा अन् सांगा, ती सीताच आहे का ? "

" वा ग वा ? मी काय तिचं देणं-घेणं लागतो ? ती सीता असेल नाहीतर आणखी कुणी असेल. तूच जाऊन विचारून घे. चल. मी ऑफिसात जाता जाता तुला अनाथाश्रमात सोडून देतो. " अमरनाथनं म्हटलं.

त्या दिवशी संध्याकाळी अमरनाथ ऑफिसातून लवकरच घरी आला. चित्रा त्या तरुणीविषयी माहिती काढून घरी आलीच असेल असा विचार त्याच्या मनात आला होता.

घराच्या फाटकात गाडी येते तोच चित्रा घराच्या दारात येऊन उभी राहिली. तिचा चेहरा प्रसन्न दिसत होता.

मोटार ठेवून येता येता अमरनाथनं विचारलं. " चित्रा, तू तर मोठी खुश दिसतेयेस. कशाचा एवढा आनंद झालाय ? "

" ओळखा पाहू तुम्हीच. हसू काय उगीच येतं ? " चित्रानं म्हटलं.

" असं होय ! सांगूच का तुझ्या प्रसन्नतेचं कारण ? तुला त्या मुलीबद्दल निश्चितच काही तरी कळलंय्. काय, खरं की नाही ? "

" होय नं ! मी जे म्हटलं होतं ते खरं निघालं. तुम्ही तर म्हणत होता असं होऊच शकत नाही. "

दोघंही घराच्या आतल्या बैठकीत आली. तिथं एक तरुण मुलगी सोफ्यात बसून पत्र वाचत होती. तिला बघताच अमरनाथ दचकलाच. त्या दोघांना आलेलं पाहून ती झटकन उठून उभी राहिली. नव्हे तर घाईघाईनं जिना चढून वरच्या खोलीत गेली.

ती नजरेआड होताच अमरनाथनं विचारलं, " काय ग चित्रा, ही सीताच आहे का ? तिचा पत्ता लावायला तर चुकली नाहीसच, उलट लगोलग तिला घरीही घेऊन आलीस. "

" मग कसं तर ? कोणतंही काम हाती घेतलं तर ते पूर्ण केल्याशिवाय मी राहणार आहे होय ! "–चित्रा उत्तरली.

15

" मुळीच नाही. म्हणूनच मी अशी प्रार्थना करीत असतो. की तू कोणतंच काम हाती घेऊ नयेस. आताच नाही का तू हे फुकटचं श्राद्ध विकत घेतलंस ?"

" आता कृपा करून आपल्या श्रीमुखाला कुलूप घालाल का ?"

" जशी आपली आज्ञा देवी ! या दासानुदासाला क्षमा असावी. केवळ एवढंच विचारण्याची परवानगी असावी, की आपण ही देवलोकातील अप्सरा एवढा शोध करून आणलीत ती कुठल्या उद्देशानं आणलीत ? "

" उद्देश कसला विचारताय ? ही मुलगी आपल्याच भागातली आहे. शिवाय, ती आपल्या परमप्रिय मित्राची आतेबहीण आहे. या सर्व गोष्टी कळल्या-वर तिला अनाथाश्रमात कसं बरं सोडायचं ?"

" त्यात काय वावगं होतं ? अन् ही सीताच आहे याची तरी खात्री काय ? "

" खात्रीनं ही सीताच आहे... माझं अनुमान कधी चुकलंय का ?... तिनं सारं काही स्वतःच कबूल केलंय... मघाशी तुम्ही मला अनाथाश्रमात सोडून गलात. मी सरळ सीतेजवळ गेल्ये. तिच्याशी गप्पा करता करताच तिची माहिती काढून घ्यावी म्हटलं. पण ती कसली वस्ताद. तिनं काही मौन सोडलं नाही. अनाथाश्रमातील मुलांना जेऊ घालण्यात गुंग राह्यली... मी चौधरीबाईशी बोलत तिथून निघून गेल्ये. मग एक युक्ती केली. सीतेला ऐकू जाईल अशा बेतानं जोरजोरात सूर्याबद्दल बोलत बसले. मात्रा लागू पडली. थोड्याच वेळात बाई मला शोधत आली. मी चौधरीबाईंशी सूर्याबद्दल काय बोलल्ये हे विचारू लागली. तिला सूर्याबद्दल सर्व सांगून मी विचारले, ' सूर्याबद्दल एवढी जिज्ञासा दाखवणारी तू आहेस तरी कोण ? ' तिनं उत्तर दिलं नाही. तेव्हा मी म्हणाले. ' माझ्यापासून कशाला लपवत्येस बाई. तू सीताच आहेस नं ? ' माझ्या या प्रश्नानं ती गोंधळली. मग हळूहळू तिनं खरं ते सांगून टाकलं. मी तिला घरी येण्याचं निमंत्रण दिलं. आधी तर तिनं चक्क नकार दिला. म्हणाली, ' अनाथ बालकांची सेवा करणं मला मनापासून आवडतं. तरी मला इथंच राहू द्या. ' तेव्हा मी तिला समजावून सांगितलं, ' अग, आम्हीसुद्धा आठवड्यातून दोनदा इथं येऊन या मुलांची सेवा करतो. तसंच तुलाही करता येईल. ' अखेर जबरदस्तीनं तिला इथं ओढून आणावं लागलं... कशी आहे युक्ती ? "

" वाहवा ? तुझ्या युक्तीबद्दल काय बरं बोलायचं खरं तर तुला केंद्रसरकारच्या गुप्त पोलीस खात्यात नेमायला पाह्यजे. तुझ्यासारख्या हुषार डिटेक्टिव्हांच्या

अभावीच गुप्त पोलिस खातं यु. जीं. ना पकडण्यात असमर्थ ठरत आहे."

" यु. जी. म्हणजे ह्रो काय ? "

" हात्तेच्या ! यु. जी. माहीत नाही ? यु. जी. म्हणजेच अंडर-ग्राउंड अर्थात भूमिगत. पोलिसांच्या हाती न सापडता जे लपून-छपून घातपाती चळवळीत भाग घेतात त्यांना हे नवीन नाव देण्यात आलंय. आपल्या या सडकेच्या वळणावर काही पोलीस आणि गुप्त पोलीस उभे असलेले इकडे येताना मला दिसले. कुणा यु. जी. च्या शोधात निघाले असल्याचं ऐकलंय्. "

अमरनाथ आणि चित्रा अशा गोष्टी करीत असतानाच बाहेर बुटाचे खाड् खाड् आवाज कानी आले. एवढा गलका करीत कोण येत आहेत बरं, हे पाहण्यासाठी दोघंही बाहेर आली. समोर उभी असलेली पोलीस व गुप्त-पोलीस यांची फौज पाहून चित्राचं डोकं गरगरू लागलं.

त्या तुकडीचा प्रमुख वाटणारा इन्स्पेक्टर अमरनाथजवळ येऊन म्हणाला, " साहेब, एक अत्यंत चतुर यु. जी. आपल्या घरात लपून बसली आहे. ही बाई नव्या दिल्लीत सीता व तारिणी अशा दोन नावांनी वावरत असताना पोलिसांना हूल देत राहिली. आता हेच बघा ना. आम्ही अनाथाश्रमात येणार हे तिला कसंतरी कळलं. झालं, तिनं लाघवी बोलून आपल्या पत्नीला वश करून घेतलं. त्यांच्या सोबत इथं येऊन लपून बसली. आपल्याच येण्याची वाट बघत आतापर्यंत आम्ही कोपऱ्यावर थांबलो होतो.

त्याचं हे बोलणं ऐकून अमरनाथनं म्हटलं, " इन्स्पेक्टर, आपली काही गल्लत तर होत नाही ना ? माझ्याकडे आलेली बाई भूमिगत क्रांतिकारक तर नाहीच पण तिचा क्रांतिकारकांशी काडीचा संबंध नाही "

" मिस्टर अमरनाथ आपण हे कसं काय बोलता ? आमच्याकडे भक्कम पुरावा आहे. फोटोसुद्धा आहे. "—इन्स्पेक्टरनं ठासून म्हटलं.

हे ऐकून चित्राचं अवसान गळालं. ती रडत रडत वरच्या मजल्यावर गेली. तिनं सारं बोलणं सीतेला ऐकवलं...

आधी तर तिला काही कळलंच नाही. चित्राच्या सांगण्याचा मथितार्थ कळायला बराच वेळ लागला. तो कळल्यावर मात्र तिला हलकं हलकं वाटलं. कुठं जायचं, काय करायचं हे प्रश्न आपोआपच सुटले होते. आता तुरुंगात जाऊन आरामात राहता येणार होतं. किती तरी शिकलेल्या घरंदाज स्त्रिया सध्या तुरुंगात आहेत. तसंच आपल्याही राहता येईल...

आता वासंतीची भेट होणार नाही एवढंच. तेंही बरंच झालं. पोरीला भेटून तरी सांगणार काय ? ती आपल्या बाबांबद्दल विचारू लागली तर काय सांगायचं ? पोरीची आजी आपल्या नातीचं संगोपन छान करत्येय. पोरगी चांगली लाडात वाढेल. आपल्याला तरी काय हवंय ? आपली लाडकी लेक सुखात आहे, याहून आनंदाची गोष्ट कोणती ? देवाच्या दयेनं सुटका झाल्यावर पुढचं पुढं पाहता येईल.

सीता न बिचकता खाली आली. स्वतः पोलिसांच्या स्वाधीन झाली.

पोलीस इन्स्पेक्टरला अमरनाथनं म्हटलं, " आमची सीता घरंदाज मुलगी आहे. तिला योग्य वागणूक मिळावी. "

सीता जायला निघाली तेव्हा चित्राच्या मनाचा बांध फुटला. ती अश्रू ढाळत सीतेला जाऊन बिलगली– " सीता, काळजी करू नकोस ! मी तुला सोडवून आणायला लावीन. "

" देवाशप्पथ असं काही करू नकोस चित्रा. देवाच्या दयेनं झालं हे बरंच झालं. माझी मुळीच चिंता करू नकोस. " – सीतेनं म्हटलं.

36

राजमपेट्टच्या ब्राह्मण आळीचं स्वरूप खूपच बदललं होतं. पूर्वीपेक्षा किती तरी अधिक घरं ओसाड पडली होती. किट्टावय्यरांच्या घरापुढं आता पूर्वीसारखा मांडव घातलेला नव्हता. घर कसं सुनं सुनं वाटायचं. पूर्वीची शोभा राहिली नव्हती.... मात्र सोमाच्चू अय्यरांचं घर पूर्वीपेक्षा सुंदर दिसत होतं. गावची बदलती परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी देवपट्टणम् गाठलं. तिथं कापडाचं दुकान घातलं. त्यांना लक्ष्मीचा वरदहस्त लाभला.

किट्टावय्यरांवर अलीकडे कितीतरी वाईट प्रसंग आले. खूप त्रास सोसावा लागला. गेल्या कित्येक वर्षांपासून आबादीच्या जागेसंबंधी वतनदार आणि कुळांत

भांडण चालू होतं. गेल्याच वर्षी या खटल्याचा निकाल वतनदारांच्या बाजूनं लागला होता. या खटल्यात पुढाकार घेवून तो चालवण्याची जबाबदारी किट्टाव–य्यरांना उचलावी लागली. त्यामुळे छोटे शेतकरी (कुळं) आणि शेतमजूर यांच्या विरोधाला बळी पडावं लागलं.

तुरुंगातून सुटून आलेल्या आपल्या जावयाच्या भेटीसाठी दहा दिवसांपूर्वी किट्टावय्यर देवपट्टणमला गेले होते. परतीचा प्रवास संध्याकाळच्या गाडीनं करावा लागला. स्टेशनावरून राजमपेट्टेला ते बैलगाडीनं निघाले. रात्रीचे दहा वाजले होते. गाव अजून चार मैल लांब राहिलं होतं एकदम सात–आठ बुरखाधारी चोरांनी बैलगाडी थांबवून घेरून टाकलं. गाडी चालवणारा आणि आत बसलेले किट्टावय्यर यांच्यावर हल्ला करून दोघांनाही झोडपलं. पैशाचं पाकीट हिसकावून घेतलं अन् दिसेनासे झाले. किट्टावय्यरांना चांगलाच मार लागला होता. कसेतरी ते घरी पोचले. त्याच रात्री त्यांना खूप ताप भरला.

ही बातमी कळताच पट्टाभिरामन् आणि ललिता पोरांसहित देवपट्टणमहून राजमपेट्टेला आली. मामऱ्याचा समाचार घेऊन दोन दिवसांनी पट्टाभिरामन् आपल्या गावाला परत गेला. मात्र सासुसासऱ्यांच्या आग्रहाखातर ललितेला व मुलांना त्यानं तिथंच राहू दिलं.

त्या दिवशी सरस्वती अम्मा ललितेची वेणी घालत बसल्या होत्या. केस विंचरता विंचरता आपली मनोव्यथा तिच्याजवळ प्रगट करीत होत्या. जेमतेम वेणी गुंफून झाली होती, तेवढ्यात बाहेरच्या दारातून पोस्टमनची हाक ऐकू आली. ललितेनं झटकन् आईच्या हातून वेणीचा शेपटा सोडवून घेतला अन् ती उठून उभी झाली.

" मेलीचं वय वाढलं पण जुनी सवय गेली नाही. लग्नाच्या आधी जशी डाकेसाठी धावत होती तशीच अजूनही धावते घोडी." सरस्वती अम्मांच्या या बडबडीकडे लक्ष न देता ललिता पत्र घ्यायसाठी दाराकडे गेली.

पत्र तिच्याच नावचं होतं अन त्यावरचा पत्ता तिच्या नवऱ्याच्या हस्ताक्षरात होता. ललितेनं लगबगीनं लिफाफ फोडला. त्यातून दोन पत्रं निघाली. एक तिच्या नवऱ्याचं होतं अन दुसरं....! अय्या ! हे तर सीतेचं अक्षर दिसतं.... आधी यांचं पत्र वाचू. मग सीतेचं.

सौ. ललितास आशीर्वाद.

तुला पत्र लिहिताना सुरुवात करावीशी वाटते, 'प्रियतमे,' 'प्राणप्रिये,' 'लाडके' पण ऐनवेळी त्यांचा विसर पडतो अन् नेहमीच्या परिपाठाप्रमाणे लिहू लागतो.

मी इथं सुखरूप येऊन पोचलो. रस्त्यात कुणी अडवलं नाही, हाणामारी केली नाही किंवा पैशाचं पाकीट हिसकावून नेलं नाही. कुणी तसं साहस केलं असतं तरी त्याला काय मिळालं असतं? देवपट्टणम्च्या आगगाडीच्या भाड्यापेक्षा दीड आणा अधिक. बिचाऱ्याची फसगत झाली असती.

आता मामाजींची प्रकृती कशी काय आहे? थोडी सुधारली असेल अशी आशा आहे. त्यांच्यावर अशी संकटं यावीत हे खेदकरी आहे. सूर्याचं म्हणणं ऐकलं असतं तर अशी मानहानी व धनहानी झाली नसती. मानसिक यातना सोसाव्या लागल्या नसत्या. अर्थात कर्ताकरविता तो भगवंत आहे. आपण काय त्याच्या हातातील बाहुली!

तू केव्हा येणार आहेस, बोल. माझ्या मते, जेवढ्या लवकर जमेल तेवढ्या लवकर यावंस... कारण समजून घ्यायचं असलं तर– सोबतचं पत्र वाच.

तुझ्या लाडक्या मैत्रिणीनं – सीतेनं भेटायला येत असल्याची धमकी दिली आहे. ती इथं आली अन् तू नसलीस तर मी काय करणार? कसं करणार?

तरी हे पत्र पोचताच आपल्या आईवडिलांना वस्तुस्थितीची जाणीव देऊन पहिल्या गाडीनं निघून ये. सीमाच्चूंनी तुला इथं सुखरूप पोचवून देण्याचं आश्वासन दिलं आहे. कळावे.

तुझा
पट्टाभिरामन्

त्या पत्रात इतक्या गोष्टी लिहिलेल्या असूनही ललितेच्या मनात एकच गोष्ट ठसली. ती म्हणजे सीतेचं आगमन. आपल्या यजमानांचं पत्र वाचून होताच तिनं मोठ्या उत्सुकतेनं सीतेचं पत्र वाचायला घेतलं.

तेवढ्यात खोलीतून वडिलांची हाक आली, 'ललिता ऽ!'

ललिता पत्र वाचत वाचत खोलीत गेली. किट्टावय्यरांनी विचारलं, "कुणाचं पत्र आलंय् बेटी? काय लिहिलंय?"

"देवपट्टणमवरून तुमच्या जावयांनी एक पत्र लिहिलंय. दुसरं पत्र आहे. सीतेचं, कलकत्त्यावरून चित्राच्या घरून लिहिलंय. लवकरच ती मद्रासला येत्येय. तिथून मला भेटायला देवपट्टणम्ला येणार असं लिहिलंय."

"अरे वा! सीतेनं पत्र लिहिलंय? खूप दिवसांत तिचा समाचार कळला नव्हता. बिचारी कशी असेल कुणास ठावूक? तिला एकदा भेटावं अशी इच्छा आहे. भेट झाली तर तिला थोडा सल्ला देणार आहे. सीता देवपट्टणम्ला आलीच तर एकवार इथंही येऊन जायला सांग." किट्टावय्यर म्हणाले.

"अवश्य सांगेन बाबा. तुमची परवानगी असली तर मी आत्ताच देव-पट्टणम्ला निघून जाईन म्हणत्ये. सीता तिथं येणार आहे. म्हणून तू लवकर निघून येशील तर बरं, असं ह्यांनी लिहिलंय. पण तुम्हाला अशा अवस्थेत सोडून जायला मन होत नाही. काय करावं हेच कळत नाही!"

"तुला जायलाच पाह्यजे ललिता! जावईबापू दोन वर्षांनंतर तुरुंगातून सुटून आलेत. त्यांना एकटं सोडून इथं किती दिवस राहशील बेटा? त्याशिवाय सीता यायचीय. म्हणून तू जाणंच योग्य!.... कधी कधी मलाही वाटतं, देव-पट्टणम्ला येऊन स्थायिक व्हावं. आता या गावात मनाला चैन पडत नाही. कुठं तरी निघून गेल्याशिवाय मनाला समाधान मिळायचं नाही!"

इतक्यात दारात बैलगाडी येऊन थांबल्याचा आवाज ऐकू आला. कोण आलंय हे पाहायला ललिता दारापाशी गेली. बैलगाडीतून उतरणाऱ्या व्यक्ती पाहून ती थक्क झाली! आनंदानं मोहरून गेली!

37

सीता, सूर्या अन शुंडू बैलगाडीतून खाली उतरले. ललितेनं सूर्या अन् शुंडू यांची तेवढी पर्वा केली नाही. चार-दोन औपचारिक गोष्टी बोलून तिनं सीतेचे हात हातात घेतले अन तिला ओढत आत घेऊन गेली.

"अग, आताच मी अन् बाबा तुझ्याबद्दल बोलत होतो. थोड्याच वेळापूर्वी पोस्टमन पत्र देऊन गेला. देवपट्टणम्ला गेलेलं तुझं पत्र त्यांनी उघडून वाचलं, इथं धाडलं अन तू तिथं पोचायच्या पूर्वी मी घरी यावं असं

पत्रात लिहिलंय. पण त्यापूर्वीच तू इथं येऊन थडकलीस." उत्साहाच्या भरात ललिता बोलत राहिली.

आता त्या बैठकीत आल्या होत्या. तिथं दोन लहान मुलं उभी होती. ती पोरं सीतेकडे आश्चर्यानं अन् बिचकून बघत होती.

"हीच नं तुझी मुलं? पट्टू नि बालू काय?"– सीतेनं विचारलं.

"हीच ती!" असं सीतेला सांगून तिनं मुलांना म्हटलं, "काय रे, मी म्हटलं नव्हतं, तुमची मावशी सुंदर आहे म्हणून? माझं बोलणं खरं आहे का नाही ते समक्ष पाहून घ्या हं." मग तिनं सीतेकडे वळून म्हटलं, "ताई, तुरुंगात एवढ्या यातना सोसून आलीस तरी किती सुंदर दिसतेस ग? तुझे यजमान तुला सोडून राहूच कसे शकतात हे कळत नाही. त्यांच्या मनावर विलायतेची मोहिनी पडलेली दिसते. नाहीतर आता त्यांना विलायतेत एवढं कोणतं असं घाईचं काम निघालं?– बरं, पण वासंतीला तू आपल्या सोबत का नाही आणलंस?"

सीतेचा चेहरा अधिक कोमेजला होता, तो वासंतीचं नाव निघताच आणखीच निस्तेज दिसू लागला.

"अग, ती शाळेत जाते नं? तिची शाळा नाही बुडणार? म्हणून नाही आणलं तिला.... बरं ललिता मामाजी कुठं आहेत ग?"– सीतेनं विचारलं.

"बाबा आता थोड्या वेळापूर्वी तुला भेटायचं म्हणत होते. तू आल्याचं कळलं म्हणजे त्यांना फार आनंद होईल. बाबावर काय आपत्ती आल्या हे तुला समजलं आहे ना सीता?"

"काल देवपट्टणमला आल्यानंतर कळलं. तुझ्या यजमानांनी सूर्याला सांगितलं ते ऐकताच आम्ही पहिलीच गाडी पकडून इथं आलो. तुझे यजमान तर आम्हाला एक दिवस थांबण्याचा आग्रह करीत होते...."

"तुझ्याशी बोलले नाही का ते? अग, ते बायकांना इतके लाजतात की ते बघून बायकांनीच लाजावं अन त्यांच्याकडून लाजण्याची कला शिकून घ्यावी. पण त्यांना तुझ्याविषयी फार आदर वाटतो हं. तू देशासाठी तुरुंगात गेलीस, हे ऐकल्यापासून जेव्हा तेव्हा तुझ्याबद्दल विचारीत असतात. आता तर काय तू स्वतःच आलीस. ताई आता तुझे यजमान विलायतेवरून परत येईपर्यंत तू आमच्याकडे देवपट्टणमला राहा. कळलं?"

"ब ऽ रं बाई आताच काय घाई येऊन पडली? ते मग ठरविता येईल. आधी मामाजींना भेटून घेऊ, चल."

किट्टावय्यरांच्या खाटेजवळ बसून सूर्या अन् शुंडू त्यांच्याशी बोलत होते. ललिता व सीता खोलीत येताच दोघंही उठून उभे राहिले.

सीतेनं मामांना नमस्कार केला. त्यांनी तिला जवळ बोलावून घेतलं. ती त्यांच्या शेजारी खाटेवर बसली. किट्टावय्यर हळूहळू खाटेवर उठून बसले. मग सीतेच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाले, "सुखी राहा बेटा."

मामांची ती दुर्बल अवस्था, शरीरभर घावांवर जागोजाग लावलेल्या मलमपट्ट्या, त्यांचा 'सुखी राहा बेटा' हा आशीर्वाद, यामुळे जुन्या स्मृती चाळवल्या जाऊन सीतेच्या डोळ्यातून आसवं ओघळली.

सीतेनं आसवं पुसत म्हटलं, "मामाजी, तुमची ही अशी अवस्था बघून हृदय कसं भडभडून येतं! तुमच्या अंगावर कुणी तरी हात टाकला हे ऐकून माझ्या मनाचा तडफडाट झाला. तुम्ही कधी किड्या-मुंग्यांनादेखील दुखावलं नसेल, अन् तुम्हाला मारण्यासाठी ज्याचा हात धजावला तो केवढा पापी चांडाळ बरं!"

"माझ्या नशिबात तसंच लिहिलं तर दुसऱ्यांना दोष किंवा शिव्या देऊन काय फायदा? बेटा सीता, ऐकणार असलीस तर एक गोष्ट सांगतो. चोरांनी माझ्या बैलगाडीला घेरलं अन् लाठीमार केला. एक काठी माझ्या डोक्यावर लागली. चांगलाच मार लागला. त्यावेळी माझ्या मनःचक्षूपुढं कोण उभं राहिलं असेल असं तुला वाटतं? तुझी आई राजम्मा आली. आकाशमार्गावर उभी राहून आपल्या दुबळ्या हातांनी जणू मला बोलावत होती, 'भाऊ ये!' तेव्हा माझ्या मनात विचार आला. 'अरे, सीतेला न भेटताच आपण निघालो. आता ही तिचं कुशल विचारील तर मी काय सांगू?' डोक्यावर लागलेल्या मारामुळे अस्वस्थतेच्या एका क्षणात हे मनात येवून गेलं." किट्टावय्यरांनी सांगितलं.

"मामाजी, तुमचं आईवर नि माझ्यावर केवढं गाढ प्रेम आहे, हे यावरून सहज कळून येतं. मात्र आता तुम्ही अधिक काही बोलू नका. डॉक्टरांचं ऐका....." सीतेनं म्हटलं.

"खरंच ग पोरी! एका दमात इतकं बोलायला नको होतं....खरं तर तुला भेटायला नि तुझ्याशी चार गोष्टी बोलायला माझा जीव आतुर झाला होता. आता तूच आलीस. बरंच झालं. आपल्याला फुरसतीनं बोलता येईल.

आता जा बेटा. आंघोळ करून चार घास खाऊन घे." किट्टावय्यरांनी मोठ्या मायेनं तिला सांगितलं.

"सीता, कितीतरी वेळापासून मी तुझी वाट बघतोय बेटा! इतकी रात्र होईपर्यंत तलावाच्या काठी बसणं बरं आहे का?" त्याच रात्री सीता भेटल्यावर किट्टावय्यरांनी क्षीण आवाजात विचारलं.

"मामाजी, माफ करा! मला वाटलं, आपण इथं काही दिवस थांबणार आहोत तेव्हा तुमच्याशी नंतर बोलता येईल" सीतेनं समजावण्याचा प्रयत्न केला.

"तू इथं राहशील हे खरं असलं तरी माझ्या मनातील गोष्टी सांगून संपेपर्यंत मी तर जिवंत राहयलो पाह्यजे नं?"

"वा ऽ मामाजी! असं अभद्र काय बोलता? माझं पापिणीचं नशीबच असं आहे का? आधीच मी अनाथ आहे, निराश्रित आहे. त्यातून तुम्ही पण माझ्यावर असे रागवाल तर...." सीता एकदम रडू लागली.

"सीता, जरा दमानं घे. माझं ऐकून घे. मी काही तुझ्यावर रागावलो नाही.....गेल्या काही दिवसांपासून मी असा बिछान्याला खिळून पडलोय. पडल्या पडल्या मनात विचार गर्दी करू लागतात. असं वाटू लागतं, की गेल्या काही वर्षात आपल्या हातून चांगली कृत्यं घडली नाहीत. इथल्या काही लोकांच्या नादी लागन मी उगीचच गरीब कुळांना, मजुरांना विरोध केला. त्याचं वैर ओढवून घेतलं. आमच्या आजोबा–पणजोबापासून ज्या कुळांनी पिढ्यान्-पिढ्या आमच्या कुटुंबासाठी रक्ताचं पाणी केलं त्यांनीच माझ्यावर उलटून जीव घ्यायची तयारी दाखवली. आता मला ज्या आपत्तींना तोंड द्यावं लागतं आहे त्या माझ्या कर्मामुळेच आल्या. मी अद्याप जिवंत आहे तो पूर्वजांच्या पुण्याईनं. हल्लेखोर मला तिथंच मारून टाकू शकले असते. पण मला जिवंत सोडलं ही त्याची कृपाच म्हणावी लागेल. बिचाऱ्यांचं भलं होवो!"

"काय म्हणाला मामाजी? ज्यांनी तुमच्यावर हात टाकला त्याच भलंन होवो? नाही! मी त्या पाप्यांना मुळीच क्षमा करणार नाही!"

"अग पोरी, त्यांना क्षमा करणारी तू कोण किंवा मी तरी कोण? त्यांना दोषी ठरवण्याचा आपल्याला काय अधिकार आहे? बाण का कुठं दोषी असतो? दोष असतो बाण मारणाऱ्याचा! खरं तर हल्लेखोरांच्या रूपात येऊन भगवंतानंच मला हे शिकवलं आहे...सीता, आता या गावात राह्यची माझी

इच्छा नाहीय्. तू आलीस हे बरंच झालं. तुझ्यामुळं सूर्या आला. आता सूर्याच्या हाती इथला सर्व कारभार सोपवून मी निघून जाईन म्हणतो. काशीला जाऊन गंगा-स्नान करायचं, प्रयागला त्रिवेणीचं दर्शन घ्यायचं. तिथून हरिद्वार, ऋषिकेश बद्रीनाथ इत्यादी तीर्थक्षेत्री जायचं. एवढंच नव्हे तर कैलासाला जायची इच्छा आहे. काही दिवसांपूर्वी ' कैलास-यात्रा ' या नावाचं पुस्तक वाचलं. तेव्हापासून माझ्या मनात कैलासगिरी ठाण मांडून बसला आहे. "

" मामाजी, तुम्हाला तीर्थाटन करायचं आहे, तर माझ्याबरोबरं चला. मी तुम्हाला सर्व क्षेत्रांना घेऊन जाईन. " सीतेनं आनंदित होऊन म्हटलं.

" अरे वा ! सीता, तुझ्या सोबत या पुण्यपावन तीर्थक्षेत्रांची यात्रा करण्याचा योग आला तर ती केवढी आनंदाची बाब ठरेल ! म्हणूनच तर मी तुझ्यापुढं माझं हृदय उघडं केलं. पण आपण दोघांनी तीर्थयात्रेला जाण्यापूर्वी तुला आपला जीवन-मार्ग सुरळीत करायला नको का ?" किट्टावय्यरांनी विचारलं.

सीतेनं काहीच उत्तर दिलं नाही. खाली मान घालून बसून राहिली.

" माझा रोख कोणत्या गोष्टीवर आहे हे तुला कळलं. तरीच तू गप्प आहेस. तुम्हा नवरा-बायकोचं पटत नाही, असं कळल्यापासून माझ्या मनाला अवर्णनीय वेदना झाल्या ! . . . याच गावात तुझा वाङ्‌निश्चय झाला, विवाह झाला. ललितेला बघायला आलेल्या वरानं तुझ्याशीच लग्न करण्याचा हट्ट धरला होता. तुझी मामी संतापली अन् शेवटी निराश झाली. कित्येकांना बरं वाटलं. मला मात्र उत्साहाचं भरतं आलं. मी एकाच मांडवात ललितेचं अन् तुझं लग्न उरकून टाकलं. तुझ्या सद्भाग्यानं मी आनंदित होऊन मी सर्व देवदेवतांचं स्तवन केलं. त्याचं काय हे फळ मिळावं ? तुझी आई आजन्म दुःख भोगून यातनांनी तडफडून मेली. तुझ्याही नशिबी तेच यावं का ? आपल्या पसंतीच्या मुलाशी तू लग्न लावलंस. काय त्याच्या बरोबर सुखानं नांदू शकत नाहीस ? बोल, बेटा बोल !"

" आपला ललाट-लेखच तसा असेल तर कोण काय करणार मामाजी ? तुम्ही केवढ्या उत्साहानं, प्रसन्न मनानं माझं लग्न लावून दिलंत, हे काय मला ठाऊक नाही ? मीसुद्धा अगदी मनापासून अतिशय प्रेमानं त्यांच्या हातात हात दिला. पण त्यांच्या पोटात असे गुण भरले असतील, हे कुणाला ठाऊक होतं ?"

" तू त्याच्या गुणांबद्दल बोललीस, पण कधी आपल्या गुणांचा तू विचार केलास ? दुसऱ्यांचे दोष काढणं सोपं आहे. आपले गुणदोष ओळखणं कठीण आहे. सीता, तू शिकली-सवरली आहेस. समजुतदार आहेस. तू जी देशसेवा केलीस

तिची सूर्यानं फार स्तुती केली. ऐकून मलाही आनंद झाला. तरीपण माझं म्हणणं नीट लक्ष देऊन ऐक... या आपल्या देशाचं वैशिष्टच काय ? त्याची महानता कशात आहे ? आहे का ठाऊक ? जगात कितीतरी देश कधीकाळी उन्नतीच्या शिखरावर होते. पुढं त्याची एकदम अवनती झाली. त्यांचं नावनिशाण राहिलं नाही. मात्र आपला भारतच एक असा देश आहे जो हजारो वर्ष टिकून आहे अन् आपली महानता राखून आहे. महात्मा गांधींसारखे महापुरुष अजून इथं अवतरतात. का ? या देशातल्या स्त्रीरत्नांमुळं. अगदी आदिकाळापासून पुरुष कितीही क्रूर, मूर्ख दुर्गुणी असले तरी इथल्या साध्वी सर्वार्थानं त्यांच्या जीवनसाथी बनून त्यांचा प्रपंच चालवण्याचं महान व्रत आचरीत आल्या आहेत. त्यांच्याच पुण्याईनं आजही आपल्या देशाचा गौरव टिकून आहे, सुरक्षित आहे. महात्मा गांधींनी आपली पत्नी कस्तुरबा हिच्याबद्दल जे लिहून ठेवलं ते तू वाचलं असशील. गांधीजी अनेकदा त्याच्यावर विनाकारण भडकले, गरळ ओकले तरी कस्तुरबांनी पराकोटीची सहनशीलता दाखवली. शेवटी गांधींना पश्चात्ताप करावा लागला. पण एवढ्या लांब जाण्याची तरी गरज काय ? आपल्या मामीचं उदाहरण घे. तशी नेहमी माझ्याशी भांडायला तयार असते. पण तसा प्रसंग आला तर माझ्याविरुद्ध काहीच करीत नाही. कितीदा तरी मी तिच्यावर संतापलो, अंगावर हात टाकला तरी तिनं कधी म्हटलं, की मी घरातून निघून जाईन ?"

" मामाजी, कस्तुरबा देवतातुल्य आहेत अन् तुमच्यासारखे पती लाभले हे मामीचं अहोभाग्य आहे. उलट मी तर सर्वतोपरी कमनशिबी आहे. कलकत्याला मी अलिपूरच्या तुरुंगात असताना वर्षभर हे कलकत्त्यात होते. मी तिथल्या तुरुंगात असल्याच यांना माहीत होतं, तरी ते तुरुंगात येऊन भेटले नाहीत. असं असूनही तुरुंगातून सुटताच, जाऊन त्यांचे पाय धरून क्षमा मागावी असा मी निर्धार केला होता. पण शेवटी काय घडलं ? माझ्या सुटकेच्या एक महिना आधीच हे विलायतेला निघून गेले. कलकत्यात त्यांनी जे स्वैर जीवन घालवलं त्याची माहिती कळताच मन खट्टू झालं. यांच्याबरोबर संसार करणं मला तरी असह्य होईल. "

"असं बोलू नकोस बेटा सीता! डोळ्यांनी पाहिलेल्या अन कानानं ऐकलेल्या गोष्टीवरसुद्धा विश्वास ठेवू नये म्हणतात ! म्हणून मोठ्या सावधपणानं सत्य शोधून काढावं लागतं. तुझ्या नजरेआड घडलेल्या म्हणून सांगितल्या गेलेल्या गोष्टीवर, इतर म्हणतात म्हणून विश्वास ठेवणं, आणि त्यावरून कोणताही निष्कर्ष

काढणं इष्ट नव्हे. राघवन्चा तुझ्यावर असलेला राग अकारण म्हणता यायचा नाही. तू सूर्याला आपल्या घरी आश्रय दिलास. तू स्वत: तुरुंगात गेलीस त्यामुळे त्याची एवढी मोठी नोकरी गेली. अशा परिस्थितीत कुणीही माणूस संतापणार नाही तर काय?" किट्टावय्यरांनी विचारलं.

"ती नोकरी गेल्यानं काय वाईट झालं? त्या नोकरीपेक्षा जास्त पगाराची बँकेतली नोकरी मिळाली आहे ना मामाजी?"– सीतेनं सांगितलं.

"ते काहीही असो. राघवन् विलायतेवरून परत आल्यानंतर मी त्याला एकवेळ भेटणार आहे. तुलाही माझ्यासोबत यावं लागेल. तुम्हा दोघांमध्ये निर्माण झालेले गैरसमज अन् वारंवार चाललेल्या कटकटी दूर करून सुरळीत चाललेला तुमचा संसार डोळ्यानी पाहिल्याशिवाय माझ्या मनाला चैन पडणार नाही बेटा. त्याशिवाय तुझ्या आईच्या आत्म्याला परलोकात शांती मिळणार नाही. मी कसंही करून त्याला रस्त्यावर आणीन. हे बघ सीता. तुझे हे दुर्दिन लवकरच संपतील." किट्टावय्यर बोलले.

"तुम्हाला असं वाटतं मामाजी, की माझं दु:ख-दैन्य संपून जाईल. मला तर मुळीच तसं वाटत नाही. माझं मन उगीचच भयभीत होतं. अशा प्रसंगी हृदयाची धडपड वाढू लागते. पोट तुंबल्यासारखं होतं, प्राण कंठाशी येतात. रात्री स्वस्थ झोप येत नाही. भयानक स्वप्न पडतात." असं बोलता बोलता सीतेचं अंग थरथर कापू लागले. डोळे डबडबले.

आतापर्यंत झोपून, नाहीतर अर्धवट उठून बोलत असलेले किट्टावय्यर एकदम उठून बसले. सीतेच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाले, "बेटा, हा निव्वळ भ्रम आहे. पूर्वी तू जे दु:ख सोसलंस, त्याची आठवण होऊन मन विचलीत होतं. त्याचा हा परिणाम बरं. तुला अशा तऱ्हेची भीती वाटू लागेल, तेव्हा रामनामाचा जप कर. तो तारक मंत्र आहे. भय पार पळून जाईल. यावेळी तर मी तुझ्या सोबत येणार आहे. तुला काही त्रास होऊ नये याची मी काळजी घेईन हं."

नेमकी याच वेळी ललिता त्या खोलीत आली. किट्टावय्यरांच्या तोंडून बाहेर पडलेलं वाक्य ऐकून म्हणाली, "वाऽ रे बाबा हे हो काय? तुम्ही तर माझ्याबरोबर देवपट्टणम्ला येणार होतात नं? त्याचा अर्ध्या तासात विसर पडला अन् सीतेच्याबरोबर जायला तयार झालात? खरंच आमच्या या मुंबईवाल्या ताईच्या ठिकाणी वशीकरण शक्ती दिसते."

तिरुमूलर नामक महान सिद्ध पुरुषानं मानवी जीवनाच्या अनित्यतेवर एक पदाची रचना केली आहे : (त्या पदाचा आशय असा–)

कुणा एका गृहस्थानं रात्री पक्वान्नावर ताव मारला.
नंतर पत्नीला घेऊन शय्यागृहात गेला.
'छातीत डाव्या बाजूस दुखतं' असं पत्नीला बोलला.
अन् झोपल्यानं बरं वाटेल, या भावनेनं झोपला,
पण झोपला तो कायमचा झोपी गेला !

तिरुमूलरांचा अंतिम चरण किट्टावय्यरांच्या बाबतीत तंतोतंत खरा ठरला. किट्टावय्यरांनी रात्री सीतेपुढं आपलं मन मोकळं केलं. नंतर स्वस्थ मनानं ते झोपी गेले. ती झोप काळझोप ठरली !

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या घरातून आक्रोश ऐकू आला. सर्वांत अधिक आक्रोश करीत होती किट्टावय्यरांची भाची सीता.

38

आगगाडी वेगात धावत होती.... रणांगणावर शरवर्षेची पर्वा न करता लक्ष्य, पुढं ठेवून निघालेल्या शूर सैनिकासारखी वादळ, पाऊस यांच्या माऱ्याकडं दुर्लक्ष करीत ती धावत होती....

दुसऱ्या वर्गाच्या डब्यात सीता, ललिता, तिचा नवरा पट्टाभिरामन् अन् तिची दोन मुलं ही मंडळी बसली होती.

सर्वजण बाहेरच्या दृश्याकडे दृष्टी लावून बसली होती. आकाश काळ्याकुट्ट ढगांनी भरून आलं होतं. पाऊस पडत होता. दुपारची वेळ असूनही संध्याकाळ झाल्यासारखं वाटत होतं.

एका खेड्याजवळच्या शेतांनी वेढलेल्या मैदानात एक चिता जळत होती. पावसानं चिता विझू नये म्हणून काही लोक घाईघाईनं तिच्यावर नारळीच्या

पानांचं छप्पर तयार करीत होते.

" ते बघ आई ! ते लोक आगीच्या लोळावर छप्पर घालतायत. असं कशासाठी करतात ग आई ?"— पट्टूनं विचारलं.

सर्वांच्या नजरा तिकडे वळल्या. जळणारी चिता पाहताच सीतेला रडू कोसळलं. रडत म्हणाली, "मामांची चिता अशीच पेटवलीत नं ?"

ललितेच्याही डोळ्यात अश्रूंनी गर्दी केली. ती म्हणाली, " बाबांच्या मृत्यूनं मला जेवढं दुःख झालं नाही तेवढं तुला दुःखी बघून होतं ग ताई !"

" मामांच्या मृत्यूबद्दल कुणालाच दुःख करण्याचं कारण नाही. त्यांच्या आत्म्याला खात्रीनं मोक्ष मिळाला असणार!"— पट्टाभिरामन् बोलला.

सीतेनं रडणं थांबवून डोळे पुसत म्हटलं, " खरंय, सूर्यासारख्या कुलदीपकाला जन्म दिल्यानं त्यांना सद्‌गती मिळणारच."

" यात मुळीच शंका नाही. फक्त दहाच दिवसांत, सूर्यानं गावातल्या कुळांची मनं, केवढ्या कौशल्यानं आपल्याकडे वळवून घेतली ? " पट्टामीनं पुष्टी जोडली.

जिकडे दृष्टी फेकावी तिकडे पाणीच पाणी दिसत होतं !

" काय हे ? इकडे तर अगदी जलप्रलय झालेला दिसतो ! राजमपेट्टपेक्षा इकडे फारच अधिक वृष्टी झालेली दिसते." गप्पांचा रोख बदलण्यासाठी पट्टामी बोलला.

" काय सांगावं ? आपण आगगाडीत बसल्यानंतर तिथंही असा भयंकर पाऊस पडला असेल." सीतेनं म्हटलं.

" पाऊस नाही अशी लोकांची ओरड होती. आता तर आभाळ फाटल्या-सारखा मुसळधार पाऊस पडतोय." ललिता बोलली.

" पावसानं डोळे वटारले म्हणजे लोकांना त्याचं महत्त्व कळू लागतं. वैदिक काळातील ऋषि-मुनी जशी सूर्याची उपासना करीत, तसेच वरुणाचीही प्रार्थना करीत. 'शिलप्पधिकारम्' नावाच्या तामीळ महाकाव्यात सूर्य व चंद्र यांच्या वंदनेनंतर वरुणाचं स्तवन केलेलं आहे." पट्टाभिरामन् यानं पांडित्याचं प्रदर्शन केलं.

" तरीसुद्धा पावसाची फार स्तुती बरी नव्हे. स्तुतीच्या मोहाला बळी पडून वरुणराजानं अशी प्रलयकारी वृष्टी सुरू केली तर गरीब लोक काय करतील ?

कुठं आश्रय घेतील ?"– ललितेनं शंका काढली. मग बोलली, " जरा तिकडे बघा तरी !"

ललितेनं जिकडं बोट दाखवलं तिकडे एक गाव होतं. त्या गावाच्या अरुंद रस्त्यावरून नदीच्या पुरासारखं भरून पाणी वाहात होतं. वादळानं कितीतरी झोपड्यांची छपरं उडून गेली होती.

आगगाडी देवपट्टणम्च्या स्टेशनात पोचली तेव्हा रात्रीचे साडेआठ वाजले होते. रेल्वेच्या रुळांच्या दोन्ही बाजूला पावसाचं पाणी साचलं होतं. त्या पाण्यात स्टेशनातील दिव्यांचं प्रतिबिंब पडलेलं होतं. त्याचप्रमाणे शहरातील रस्त्यांच्या बाजूला पाण्याची जी डबकी साचली होती त्यांत रस्त्यावरील दिव्यांचं प्रतिबिंब दिसत होतं. गाडी स्टेशनात शिरताना हे मनोहर दृश्य दिसलं.

गाडी प्लॅटफॉर्मवर येऊन थांबल्यावर ही सर्व मंडळी दार उघडून बाहेर आली. बाहेरची सर्द हवा अंगाला झोंबत होती.

त्याचवेळी स्टेशनाच्या दुसऱ्या बाजूला लोकांची आरडाओरड, गोंधळ ऐकू येऊ लागले. थोड्याच वेळात शेकडो स्त्री-पुरुष मुलाबाळांसहित प्लॅटफॉर्मवर आणि बाहेरच्या अंगाला एकत्र जमलेले दिसले. सर्वांची शरीरं अन् कापडं भिजून चिंब झालेली होती.

पट्टाभीच्या कुटुंबाला त्या गर्दीतून रस्ता काढत बाहेर पडावं लागलं. पट्टाभिरामन्नं एका हमालाला विचारलं, " आज ही एवढी गर्दी कशाची आहे ? हे सर्व लोक कोणत्या गाडीनं जाणार आहोत ? "

" हे लोक गाडीसाठी आलेले नव्हेत साहेब. आज संध्याकाळी जो वादळी पाऊस झाला त्यामुळं यांच्या झोपड्या कोलमडून पडल्या. पावसापासून स्वत:ला वाचावायला, आसरा मिळवायला हे सैतान इथं येऊन बसलेत. "

मोठ्या मुष्किलीनं एक भाड्याची गाडी मिळवून पट्टाभिरामन् परिवार कसातरी घरी पोचला. घरी पोचताच ललितेनं घर आवरलं अन् स्वयंपाकाच्या तयारीला लागली. पट्टाभिरामन् आपल्या ऑफिसच्या खोलीत जाऊन वर्तमानपत्रं वाचत बसला. पोरांनी कपडे बदलले. मग जेवणाची वाट पाहात झोपायच्या तयारीला लागली.

सीता मात्र आपले ओलसर कपडे न बदलताच बैठकीच्या एका कोपऱ्यात व्याकुळ अंत:करणानं गुपचुप बसून होती.

ललितेने पानं मांडली अन् सर्वांना बोलवायला बाहेर आली. सीतेची तशी अवस्था पाहून तिनं म्हटलं, " हे ग काय सीता ? अद्याप तू कपडेसुद्धा बदलले नाहीस ? अन् अशी उदास होऊन काय बसलीस ? "

त्याचवेळी पट्टाभिरामन् खोलीच्या बाहेर आला.

सीता सांगू लागली, " मला स्टेशनात पाहिलेल्या अभागी गरिबांची आठवण येतेय्. बिचारे, अगदी लहान मुलांसकट सर्व तशाच भिजलेल्या कपड्यांनी रात्र काढतील नं ? त्यांचं स्मरण झालं अन् कोरडे कपडे घालायला मन होत नाही. या दुमजली घराच्या छपराखाली आरामात कोरडं बसून राहणंदेखील मनाला व्यथित करतं."

" ती तर खेदाची गोष्ट आहेच. पण त्यासाठी आपण काय करू शकतो ? ती काही दहा-वीस माणसं आहेत ? हजारो लोक आहेत. काही करू म्हटलं तरी काय करणार आपण ? " पट्टाभिरामन् बोलला.

" आधी आत चला. जेवता जेवता बोलता येईल....बिचारे पट्टू अन् बालू पावसात चांगलेच भिजलेत. राहून राहून वाटतं, कुठं त्यांना सर्दी–पडसं झालं तर कसं व्हायचं ? मला तर तीच काळजी पडलीय."

" स्टेशनात आपण किती मुलं पाहयली ? त्या सर्वांना आज रात्रभर पावसात भिजत अन् गारठ्यात कुडकुडत बसावं लागणार. त्यांची तब्येत बिघडली तर कोण शुश्रूषा करील ? " सीतेनं विचारलं.

" मीसुद्धा तोच विचार करतोय. सकाळ होताच मित्रांना भेटून यासंबंधात काही करण्याचा प्रयत्न करू या. चला, आता आधी जेवून घेऊ. " पट्टाभिरामन् बोलला.

पटाभिरामन्कडून आश्वासन मिळताच सीता जेवायला गेली. जेवणं झाल्यावर तिघंही काहीवेळ बोलत बसली मग सर्व झोपायला गेली.

बिछान्यावर पडताच ललितेनं पायापासून डोक्यापर्यंत पांघरूण ओढून घेतलं आणि तिला पटकन् झोप लागली.

सीतेला मात्र रात्रभर झोप आली नाही. तिच्या डोळ्यापुढं स्टेशनातले ते निराधार लेक दिसत होते....

दुसऱ्या दिवशी सकाळी झोपून उठताच पट्टाभिरामन् आपल्या मित्रांना भेटून सीतेला बोलल्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्यासंबंधी विचार-विनिमय करण्यासाठी घराबाहेर पडला. आधी त्यानं चौकशी करून किती गरिबांच्या झोपड्या मोडून

16

पडल्या याची माहिती मिळवली. मग आपल्या खास मित्रांना भेटून वादळग्रस्त व पूरपीडित लोकांच्या मदतीसंबंधी चर्चा केली. दुपारी घरी आल्यावर त्यानं सीतेला सर्व वृत्तान्त सांगितला.

सीतेनं म्हटलं, " कलकत्त्याला असताना मी अशा विपद्ग्रस्त लोकांना मदत करण्याच्या कामाचा अनुभव घेतला आहे. तुमच्यासोबत येऊन मीदेखील बायका-मुलांच्या मदतीला हातभार लावीन. "

पट्टाभिरामन्नं मोठ्या आनंदानं तिच्या बोलण्याला रुकार दिला. त्यानं म्हटलं, " आमच्या गावात समाजसेवेला वाहून घेतलेल्या काही भगिनी आहेत. त्यांच्यासोबत तुलाही मदतकार्याला लावून देईन. "

सुरुवातीला काही दिवसांसाठी निराश्रितांच्या राहण्याची सोय शाळामधून केली. गेली. त्या सर्वांच्या जेवणाचीही जबाबदारी कार्यकर्त्यांना उचलावी लागली. आजाऱ्यांच्या औषधोपचाराची आणि शुश्रूषेची सोय करावी लागली. एवढंच नव्हे तर लहान मुलांना संसर्ग पोचू नये म्हणून दक्षता घ्यावी लागली. पाऊस थांबला नि जमीन कोरडी झाली तेव्हा आपद्ग्रस्तांना नव्या झोपड्या उभारण्यासाठी मदत द्यावी लागली.

दुःख-निवारणकार्य पुरं व्हायला तीन महिने लागले. या तीन महिन्यात पट्टाभिरामन् आणि सीता या दोघाना श्वास घ्यायला वेळ मिळाला नाही, इतका भार त्यांच्यावर पडला. शहरातील कितीतरी लोकांनी त्यांच्या कामात मदत केली. सीतेनं घेतलेले श्रम, तिचा मनमिळाऊ स्वभाव आणि गोड बोलणं यामुळे सर्व प्रभावित झाले. सीतेची कीर्ती त्या देवपट्टणम् शहरात पसरली आणि लोक तिची तोंड फाटेपर्यंत स्तुती करू लागले.

तुरुंगातून सुटल्यापासून पट्टाभिरामन्चा उत्साह पार मावळला होता. देश तर स्वतंत्र झाला नव्हता पण लोकांची स्वातंत्र्याकांक्षा मंदावली होती. कोर्टात जाऊन वकिली करण्याचीही त्याची इच्छा नव्हती. दुसरं करण्याजोगं कामही राहिलं नव्हतं. अशा अनेक कारणानी त्याच्या उत्साहावर पाणी फिरलं होतं. अशा वेळी काम मिळाल्यानं त्याचा तर जणू पुनर्जन्मच झाला होता. पूरग्रस्तांच्या मदत कार्यात त्याला सर्वच प्रकारची कामं करावी लागली. ती कामं त्याच्या आवडीची होती. संध्याकाळी घरी आल्यावर पट्टाभिरामन् आणि सीता दिवसभराच्या कामाबद्दल चर्चा करीत. घरातलं वातावरण प्रसन्न असे. त्यामुळे ललितेच्या

आनंदाला पारावार उरला नाही, ती प्रत्येक वेळी मीनेला म्हणायची, " अग, आमच्या घरात इतकी प्रसन्नता कधीच नसे. मीना, हेसुद्धा एवढे आनंदात नसत. तू अन् तुझं काम यांना खूपच आवडलं. खरं तर तू कुणाला आवडणार नाहीस ? ताई, तू आता नेहमीसाठी इथंच राहा."

" कदाचित् देवाचीसुद्धा हीच इच्छा असावी ! नाहीतरी मला जायला दुसरी जागा तरी कुठं आहे ? " मीना म्हणायची.

" वासंतीला तू [illegible] राहू द्यावंस हे मला पसंत नाही. तू तिला इथंच बोलावून घे बरं. माझ्या दोन मुलांत ती तिसरी मुलगी म्हणून राहील. " ललिता म्हणायची.

" या उन्हाळ्यात सुट्टया लागून शाळा बंद होताच, तिला इथंच घेऊन यायचा माझा विचार आहे. – मीनेचं उत्तर ठरलं होतं.

वादळानं तात्पुरतं नुकसान झालं असलं तरी परिणामी त्या लोकांचं भलंच झालं. आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना अंगावर घालायला दोन–तीन नवी कापडं मिळाली. राहायला नव्या झोपड्या बांधून मिळाल्या. नव्या वस्तीच्या मध्यभागी एक गणेश मंदिर उभारण्यात आलं. त्या देवळापुढं रात्रीच्या वेळी भजनं होऊ लागली.

तसं पाहिलं तर वादळ पीडितांचं भाग्यच उजळलं. पण त्यांना मदत करणाऱ्या लोकांची स्थिती केविलवाणी झाली. त्यांना काम उरलं नाही. पट्टाभिरामनचं मन उद्विग्न झालं. मीना आपल्या नवऱ्याच्या आणि नजरेआड असलेल्या मुलींच्या आठवणीनं झुरणीला लागली. घरातील पूर्वीची प्रसन्नता नाहीशी झाली. सर्वांचे चेहरे उतरलेले दिसू लागले.

39

एक दिवस संध्याकाळी काही मित्र पट्टाभिरामन्‌चा शोध घेत आले. नगरपालिकेची निवडणूक जवळ आली असून पट्टाभीनं उमेदवारीचा अर्ज करावा

असा त्यांनी आग्रह धरला. शिवाय तो निवडून आला तर अध्यक्षपद मिळण्याची शक्यता आहे, असं त्यांनी प्रलोभन दाखवलं.

मित्रांचा हा सल्ला पट्टाभिरामन्‌ला आधी तर पटला नाही. तरी मित्रांनी आग्रहपूर्वक म्हटलं की, तू तुरुंगात जाऊन हाल सोसलेस. या तुझ्या त्यागामुळे तुझ्या विरोधात उभं राहण्याचं कोणीच साहस करणार नाहीत. यावर 'विचार करून सांगतो' असं बोलून त्यानं मित्रांना टाळलं.

रात्री जेवताना पट्टाभिरामन्‌नं या गोष्टींची ललितेजवळ चर्चा करून तिचं मत विचारलं.

ललितेनं पटकन म्हटलं, "आपण निवडणुकीच्या भानगडीत पडायचं नाही."

"असं का बरं म्हणत्येस ग ललिता ? मघाशी आलेले लोक तर तुझ्या यजमानांचे मित्र होते ना ?" सीतेनं विचारलं.

"अग ऽ, तुला या गावाची रीत ठावूक नाही. यांच्या वडिलांनी एकदा निवडणुकीत काम करून समोरच्या घराचं वैर संपादन केलं. अशी भांडणं आपण कशाला लावून घ्यायची ?" ललितेने उत्तर दिलं.

"तो काळच वेगळा होता. यांच्या वडिलांनी देशासाठी कधी अिकडची काडी तिकडे केली नाही. हे तर अडीच वर्षांचा तुरुंगवास भोगून आलेत. हे निवडणुकीला उभे राह्यले तर यांच्याशी कोण लढत देणार ?"– सीता म्हणाली.

"अहो तुम्हाला वाटतं तेवढं हे काम सोपं नाही. काळचाबाजारात भक्कम पैसा मिळवलेले एक महाशय या वार्डातून उभे राहणार आहेत, असं ऐकतो. शर्थीचा सामना होणार बरं !" पट्टाभिरामन् म्हणाला.

"होईना का ? आपण का भ्यायचं ? तुम्ही खरंच निवडणूक लढवणारा असलात तर मी घरोघर फिरून मतं मिळवीन." सीता बोलली.

"तुम्ही एवढ्या उत्साहानं माझ्या विजयासाठी काम करणार असलात तर मी निवडणुकीसाठी एका पायावर तयार आहे."

अशा रीतीनं खेळीमेळीत ज्या गोष्टी झाल्या त्यांना लवकरच मूर्त स्वरूप आलं. समोरच्या घरच्या दामोदर पिल्ले यांच्या सल्ल्याची पर्वा न करता पट्टाभिरामन् निवडणुकीला उभा राहिला.

ज्या दिवशी पट्टाभीनं नगरपालिकेची निवडणूक लढवण्याच्या निर्णय घेतला, त्या दिवसापासून त्याच्याकडची वर्दळ वाढली. गप्पांच्या मैफली भरू लागल्या. पट्टाभिरामन्‌कडेच कित्येकांची न्याहरी, कॉफी, दुपारची व रात्रीची जेवणं होऊ

लागली. पान-तंबाखूवर तर पाण्यासारखा पैसा खर्च होऊ लागला. ललितेला हे सारं काही पसंत नव्हतं.

पण दिवसेंदिवस सीतेचं प्रस्थ वाढत गेलं. तिचं वजन पडू लागलं. मात्र भोवतालचे लोक तिची तोंडभर स्तुती करीत, तेच आता तिच्याबद्दल वेडवाकडं बोलू लागले.

सीतेच्या वागणुकीनं ललितेला फार दुःख झालं. एक दिवस तर ललिता आणि पट्टाभिरामम् यांचं सीतेवरून चांगलं बिनसलं. रागाच्या भरात ललिता बोलली, " ही निवडणूक आणि सीता तुमच्या आयुष्यात सैतान बनून घुसली आणि आता नाचवताहेत. " तिचे हे शब्द ऐकून पट्टाभिरामन् एकदम भडकला आणि तिची मानगूट पकडून तिला घराबाहेर काढायला तयार झाला. . .घरात प्रवेश करताना सूर्याला हे दृश्य दिसलं.

सूर्याला आलेला पाहून पट्टाभिरामन् शरमेनं अर्धमेला झाला. झटकन् आपल्या खोलीत निघून गेला. सूर्याच्या मागोमाग धान्य, पापड-लोणची अन् सटरफटर सामान घेऊन येणाऱ्या सरस्वती अम्मा दिसताच ललिता आईच्या स्वागताला पुढं झाली.

सूर्या एकटाच बसलेला पाहून पट्टाभिरामन् त्याच्या जवळ जाऊन म्हणाला, " सूर्या, भय्या मी तर या निवडणुकीच्या लफड्यात पडून पुरा वैतागलो आहे, अक्षरशः यमयातना भोगतोय. कामाचा बोजाही इतका वाढलाय, की श्वास घ्यायला उसंत नाही. आता फक्त दोन आठवड्यांचा प्रश्न आहे. ललितेनं तर नाकात दम आणलाय्. ती सीतेचा मत्सर करू लागलीय. सीतेची अदबीची वागणूक, चारचौघांशी मोकळेपणानं बोलणं ललितेच्या डोळ्यात सलू लागलंय. आता तर काय, तू आपल्या आईलासुद्धा सोबत घेऊन आलास. आता घराचं रणांगण होऊन जाईल. माझं एक ऐकशील तर देव तुझं भले करील बाबा. सीतेला इथून घेऊन जा. मी इथलं काम कसंही निभावून नेईल. "

" अहो महाशय, तुम्ही अन् ललिता या थराला जाल असं वाटलं नव्हतं. निवडणुकीच्या भानगडीत न पडता तुम्ही सुखात राहू शकला असता. पण आता इतकं काम होऊन गेलेलं असताना तुम्हाला मागं हटता येणार नाही. सीता तुमच्या कामात फार मदत करते असं मी ऐकलंय् तेव्हा तिला इथून कुठं दुसरीकडे पाठवणं उचित ठरणार नाही. इतके दिवस इथं होतीच. आणखी दोन आठवडे राहू द्या. पुढचं पुढं पाहू. " सूर्यानं उत्तर दिलं.

सूर्यानं सीतेशी भेट झाली तेव्हा तो करुणापूर्ण आवाजात म्हणाला, " काय ग ताई, मी इथं आलो तेव्हा जे नाटक घडलं होतं ते तू बघितलंस ना ? "

" होय रे बाबा ! मी कुणाचं कितीही भलं करण्याचं ठरवलं तरी परिणामी ते वाईटच ठरतं. म्हणून मी तर आजच या घराचा निरोप घ्यायचा निश्चय केला आहे. " —सीतेनं उत्तर दिलं.

" कुठं जायचा इरादा आहे ? "

" जायला कितीतरी जागा आहेत ! तिरुपति, [illegible], [illegible], [illegible] अन् अशीच किती ठिकाणं सांगू ? [illegible] मद्रासला जाऊन माझ्या वासंतीला डोळे भरून पाहिलं, की माझ्यासाठी मोक्षाचा मार्ग मोकळा आहेत." असं बोलता बोलता सीतेच्या डोळ्यांना धारा लागल्या.

" उगीच असं अभद्र बोलू नकोस ताई. आम्हा पट्टाभिरामय्यांना या निवडणुकीत निवडून आणणं हे तुझं कर्तव्य ठरतं. यावेळी तू सोडून गेलीस तर इथलं काम बिघडून जाईल. वास्तविक पट्टाभींच्या मनात पदाची लालसा नव्हती. तूच पदाची नशा निर्माण केलीस. म्हणून निवडणूक होऊन जाईपर्यंत तुला इथंच थांबून काम करावं लागेल. " सूर्यानं समजावलं.

" तुझं म्हणणं खरं असलं तरी मी आता या घरात राहूच कशी ? मला या घरातून घालवून काढण्याची गोष्ट ललिता बोलताना पट्टाभीनं ऐकलंच ना, सीता इथंच राहील, जायचं असेल तर तुला जा... हे सारं या कानांनी ऐकून घेतल्यावर मी या घरात कसं राहायचं ? " सीतेनं विचारलं.

" अग ताई, रागाच्या भरात कोणीही तोंडाला येईल ते बोलतो. वास्तविक त्यांच्या मनात तसं काही नाही. म्हणशील तर मी ललितेलाच सोडून निवडणूक संपेपर्यंत तू इथंच राहा असं बजावून देतो.

" ते काही का असेना, मला एकदा मद्रासला जायलाच हवं. कालच वासंतीचं पत्र आलंय, चार दिवसांनी शाळेला सुट्टया लागणार आहेत. तुला भेटायला जीव आसुसलाय. त्वरित येऊन मला घेऊन जा. "

" ताई, तू निवडणुकीचं काम बघ. मी जाऊन वासंतीला घेऊन येतो. "

इकडे सरस्वती अम्मा आपल्या मुलीला बोलल्या, " तुझ्यासारखी महामूर्ख मुलगी कुठं पाहिली नाही. निवडणुकीत जावईबापूंना विजयी करण्यासाठी सीता रात्रीचा दिवस करून कामाला लागल्याचं ऐकलंय अन् तू तिच्याबद्दल वेडवाकडं बोलत्येस ? "

" वा ऽ ग आई, तुलाही निवडणुकीची धुंदी चढली का ? निवडणूक ही साधी गोष्ट का आहे ? निच्यापायी कितीतरी लोकांचं वैर पत्करावं लागेल. माझ्या मामंजींनी निवडणुकीच्या फंदात पडून काय कमी वाम सोसला. ? "

" सारं काही मला ठाऊक आहे. त्यांनी दुसऱ्यासाठी काम केलं अन् भांडण विकत घेतलं. यावेळी जावईबापू स्वतः उभे आहेत. निवडणूक जिंकले तर अध्यक्ष-पद यांनाच मिळणाराय म्हणे. खरं ना हे "

" अध्यक्षपद मिळून तरी कोणता असा फायदा आहे आई ? फार तर ' अध्यक्ष ' असं लिहून कपाळावर चिकटवून घ्या म्हणावं. अध्यक्षाला पगार नसतो हे ठावूक नाही का ? "

" अरे, पगार नसला म्हणून काय बिघडतं ? पूर्वी ती केवळ मानाची जागा असे. हल्ली तर ते प्राप्तीचं साधन बनलंय. सध्याच्या अध्यक्षांनी दोन लाखांची कमाई केलीय. त्यांच्या मुलाच्या वाढदिवसाला अर्ध्या लाखाच्या भेटी मिळाल्यात म्हणे. नाहीतर तू ! तुझ्या मुलाचा वाढदिवस केलास, तेव्हा काय मिळालं ? पोलि-सांच्या दांडक्यांचा प्रसादच ना ? "

ललिता मोठ्यानं हसली.

सीता नेमकी याचवेळी आत आली. सरस्वती अम्मांनी तिचं स्वागत करीत म्हटलं, " ये सीता, ये बाई ! मला सारं काही कळलंय. जावयांना निवडून आणण्या-साठी तू खूप मेहनत करत्येस, हे ऐकून आनंद झाला. नाहीतर नातंगोतं कशाला म्हणायचं ? "

मामीशी कसं अन् काय बोलावं असा विचार करीत सीता बावरत घावरत आत आली होती. पण सरस्वती अम्मांच्या तोंडून ही आपुलकीची वात्सल्यपूर्ण भाषा ऐकून ती विस्मयचकित झाली ती म्हणाली, " मामी, आता तुम्ही आलाच आहात, आता काम सांभाळून घ्या. मी आता आपल्या घरी जाईन म्हणते. "

" वा ऽ ग वा ! आता तुला कसं जाता येईल ? निवडणूक झाल्यावर जा. मी तर ऐकलंय, का तुझ्यामुळं जावई निवडणुकीला उभे राह्यलेत. तू म्हणे सभांतून चांगलं बोलत्येस, गात्येस. तुझ्यामुळेच यांना अध्यक्षपद मिळणाराय अशी चर्चा साऱ्या गावात सुरू आहे अन् आता तू आपल्या इथं निघून जाशील तर त्यांच्या मदतीला कोण आहे बरं ? "

" अहो, त्यांना कुणाच्या मदतीची गरज नाहीय्. ते स्वतः सर्व सांभाळून घेऊ शकतात. दुसरे लोक कसली डोंबलाची मदत करणार ? ते निवडणुकीला

उभे राह्यले याचा साऱ्या देवपट्टणम्‌ला आनंद झालाय्. आमचं मत त्यांनाच देऊ असंच सर्व म्हणतात. तुमच्या मुलीला हे काही आवडत नाही. नेहमी काहीच्या-बाही बडबडत असते. त्यांच्याशी तर अशी काही भांडते जसे काही ते घर बरबाद, करायलाच सिद्ध झालेयत्. अशानं ते खिन्न होऊन जातात. "

"आता ललितेचं तू काही मनावर घेऊ नकोस सीता. तिनं तोंड उघडलं तर मला सांग. म्हणजे चार थपडा लगावून तिला खोलीत कोंडूनच टाकत्ये. आधीच चार वर्षांपासून जावई बेकार बसले आहेत. कसंही करून त्यांना अध्यक्षपद मिळू दे, असा मी नवस केलाय कुलदेवतेला... सीमाच्चू मामा तर केवळ तुझ्या तक्रारी, मला सांगण्यासाठी गावाला येऊन गेले. बरंच काहीबाही बोलत होते. मी त्यांच्या गोष्टीकडे लक्षच दिलं नाही. उलट त्यांच्या तोंडावर म्हटलं, ' काहो भावोजी, दुसऱ्यांच्या कागाळ्या करण्याशिवाय तुम्हाला दुसरं कामच नाही का ? जा, आपलं काम बघा .....' सध्याच्या अध्यक्षांनी सीमाच्चूना कापड दुकानाचं लायसन मिळवून दिलं. दुकानात यांना खूप नफा मिळाला. याच गावात त्यांनी दोन मजली घर उभं केलं. म्हणून सीमाच्चू मामा त्यांच्या बाजूनं कामाला लागले, नातंगोतं पार विसरले. अग बाई आजच्या काळात पैसा म्हणजे सर्वस्व ! तिथं आपल्या नातलगाविषयी आपुलकी बाळगणारी तूच एक दिसत्येस. या पोरीचे कठोर शब्द तू गिळून टाकलेस, हे काय तुझे थोडे उपकार आहेत ? आपल्या कातड्याचे जोडे करून तुझ्या पायात घातले तरी या उपकाराची फेड व्हायची नाही ! " सरस्वती अम्मा बोलल्या.

ललितेला आपल्या आईचं स्वार्थी बोलणं मुळीच रुचलं नाही. पण आपल्या मैत्रिणीकडे पाहाण्याचा आईचा बदललेला दृष्टिकोन पाहून तिला मनस्वी आनंद झाला.

सीता तर आनंदानं फुलून गेली. मामी आपली प्रशंसा करील, असा काळ कधी तरी येईल, अशी तिनं स्वप्नातही अपेक्षा केली नव्हती. आज ती वेळ आली होती. त्यामुळे सीता आपलं सारं दुःख विसरून आनंदानं मोहरून गेली.

निळ्या सागराच्या लाटा कापीत आगबोट चालली होती. इंग्लंडवरून हिंदुस्थानात येणारी एस. एस एलिझाबेथ या नावाची प्रवाश्यांना घेऊन येणारी ती आगबोट होती. याच बोटीत मोठ्या प्रयासानं जागा मिळून राघवन् परतीचा प्रवास करीत होता. युद्ध संपून जेमतेम एक वर्ष झालं होतं. बोटीवर प्रवाशांची गर्दी असे. त्यामुळे जागा मिळणं कठीण व्हायचं.

युद्ध संपल्यावर थोड्याच दिवसांनी राघवन् इंग्लंडला गेला होता. खाजगी नोकरी कितीही मोठ्या पगाराची असली तरी तिला सरकारी नोकरीची सर येत नाही, याची राघवन्‌ला लवकरच जाणीव झाली. काही झालं तरी सरकारी कागदपत्रात आपली दोषी म्हणून नोंद का राहावी ? बरं, लढाईत ब्रिटन हरलं असतं अन् भारताला स्वातंत्र्य मिळतं तर गोष्ट वेगळी होती. निदान समाधानाला जागा होती. पण इंग्लंड विजयी झालं. ब्रिटनचं भारतावर राज्य कायम राहणार. अशा परिस्थितीत सरकारी नोकरीवर पाणी सोडणं कसं शक्य होतं ?

परंतु राघवन्‌ने प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही त्याला यश आलं नाही. म्हणून मायदेशी परत आल्यावर खाजगी कंपनीतच नोकरी करण्याचा त्यानं निर्णय घेतला.

इंग्लंडवरून हिंदुस्थानकडे जाणाऱ्या आगबोटीत जागा मिळणं कठीण झाल्यानं आगबोटीत जागा मिळवण्यासाठी त्याला बरीच वाट पाहावी लागली. मग रिकाम्या वेळात तो आगबोटीवर भटकत राहिला. आगबोटीवर फिरत असताना त्यानं जे काय पाहयलं अन् ऐकलं, त्यामुळे त्याच्या हृदयात आमूलाग्र बदल घडून आला.,..वाहवा ! हे इंग्रज कसे धीराचे व शूर आहेत ? त्यांनी आपल्या देशाच्या रक्षणार्थ किती दुःख भोगले ? नाहीतर आम्ही भारतीय इतकी वर्षे काय करीत राहिलो ? अनोळखी लोकांचं पारतंत्र्य पत्करून नोकरीच्या रूपात त्यांची गुलामगिरी करीत बसलो. नोकरी परत मिळावी म्हणून त्यांच्यापुढं नाकदुऱ्या काढण्यासाठी इतक्या दूर आलो. छेः ! हे असं अपमानित जिणं काय कामाचं ? या इंग्रजी शिक्षणानं आणि संस्कृतीनं आपल्या बुद्धीचं वाटोळं

केलं. असो जे झालं ते झालं आता याचं प्रायश्चित्त म्हणून काहीतरी नवं पाऊल उचललं पाहिजे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी असं काही कार्य करावं की सर्व लोक थक्क होऊन जातील !.....

आगबोटीच्या डेकवरील एका सोफ्यात बसलेला सुंदर राघवन् विचारात बुडून गेला होता. त्यावेळी त्याच्या डोक्यात असे कितीतरी विचार येऊन गेले. थोडा वेळ त्यानं मनाचा वारू मोकळा सोडताच तो पंधरा वर्षांपूर्वी केलेल्या फराची ते मुंबई समुद्र-प्रवासापर्यंत येऊन पोचला. अहाहा ! त्यावेळचा तो प्रवास काय सुखद होता. जणू काय आपण फुलाच्या रथात देवाच्या सोबत बसून गंधर्वांचे गाणे ऐकत आकाश-मार्गावरून आनंद घ्यायलाच निघालो होतो ! तारिणी त्याच बोटीतून प्रवास करीत होती, हे याचं कारण होतं.... अरेरे ! आपण केवढी घोडचूक केली. थोडा हट्ट धरून तारिणीशीच लग्न केलं असतं तर आपलं आयुष्य किती आनंदात गेलं असतं.

मग त्याच्या मनानं तारिणीकडून सीतेकडे उड्डाण केलं... तारिणीची प्रतारणा करण्यात जेवढी चूक झाली तिच्याहून मोठी चूक सीतेशी लग्न करण्यात झाली. आपण किट्टावय्यरांच्या मुलीला बघायला गेलो तर ही मध्येच टपकली. आपले टपोरे भेदक डोळे रोखून तिनं असा काही कटाक्ष टाकला, की माणसानं भ्रमिष्ट होऊन जावं. पण एक गोष्ट मान्य केलीच पाहिजे. नेत्र सौंदर्याच्या बाबतीत सीतेची बरोबरी करणारी दुसरी कुणी नाहीच. तारिणीच्या डोळ्यापेक्षा सीतेचे डोळे कितीतरी सुंदर आहेत... पण बाईच्या जातीला केवळ डोळ्यांचं सौंदर्यच पुरेसं आहे का ? मुळीच नाही. प्रत्यक्ष प्रमाणच हवं तर माझं जीवन आहे. तिच्या टपोऱ्या डोळ्यातून तिचं मन ओळखण्याचं माझं सामर्थ्य लुप्त झालं होतं.... काय तिची चंचल वृत्ती अन् काय तिचा भांडखोर स्वभाव. शिवाय मत्सरी व नाठाळ आहे. छे, छे! ...

माझ्या मनात असा विचार आला तरी कसा ? सर्व दोष काय सीतेचाच होता ? नव्हे, मीसुद्धा दोषी आहेच. सुरुवातीपासूनच जरा कडक धोरण ठेवलं असतं तर ती आज्ञाधारक बनून माझ्या इच्छेनुसार वागली असती. तिचा स्वभाव बदलायला तो मूर्ख सूर्यादेखील कारणीभूत आहे. तिला माझ्यापेक्षा सूर्याचेच विचार नव्हते का आवडत ? शेवटी त्या दुष्टानं तिला पापाच्या गर्तेत ढकलून दिलं !

नाहीतरी स्त्रियांचा स्वभावच विचित्रच ! त्यांनी सूर्याच्याठिकाणी असं काय असामान्यपण पाहिलं कळत नाही ! बरं सीतेचा तो मामेभाऊ तरी आहे. त्यामुळे कदाचित् त्यांच्यात आकर्षण असेलही. मात्र सूर्या अन् तारिणीचा संबंध

काय ? तरी सूर्यला पोलिसांच्या तावडीतून सोडवण्यासाठी तिनं केवढं धाडसी पाऊल उचललं ? यालाच म्हणतात दिलदारपणा ! हिंमत असावी तर तारिणीसारखी व दोघं त्या दिवशी जे फरार झाली ती अजून दिसलीच नाही....

यातली एक गंमत म्हणजे कलकत्त्यात सीतेलाच तारिणी समजून अटक केली अन् तुरुंगात टाकलं. आम्ही कलकत्त्याला येऊन काही दिवस होताच आपल्याला या गोष्टीचा पत्ता लागला. पण तिला सोडवून आणण्यासाठी काही करणं जमलंच नाही. शिवाय तिला सोडवून आणलं असतं तर आणखी काय प्रकार घडले असते कोण जाणे. त्यापेक्षा तिला तुरुंगातच राहून सडू द्या. तेव्हाच तिची बुद्धी ठिकाणावर येईल. जेव्हा सर्व लोक तुरुंगातून सुटतील तेव्हा सुटेल आपोआप सुटल्यावर काय ते बघता येईल...

काय असेल ते असो. सीतेला आणखी एक संधी द्यायलाच हवी, तिच्याबरोबर संसार करण्याचा आणखी एक प्रयत्न करून पाहू . अशा प्रकारे राघवन्नं दयाळू अंतःकरणानं विचार करण्यामागं काही कारणं होती. त्यानं सीतेला सोडून दिलं असतं तर त्याला कायमचं कैदाशी च्या वागून असली होती. म्हणजे हा प्रकार आगीतून फुफाट्यात पडण्यासारखाच होता. त्यापेक्षा बलवत्तर कारण होती वासंती. विलायतेला जाण्यापूर्वी राघवन् तिला भेटायला मद्रासला गेला होता. तेव्हा आपले अजाण डोळे बापावर रोखून तिनं विचारलं होतं, " बाबा, तुम्ही आईला सोबत नाही आणलीत ?" तिच्या या प्रश्नात राघवनला जी निराशायुक्त वेदना जाणवली, तिचा विसर अजून त्याला पडला नव्हता. निदान पोरीसाठी तरी आपण सीतेबरोबर संसार करायला हवा, असा त्यानं निर्णय घेतला होता. याशिवाय आणखी एक तिसरं कारण होतं...

राघवन् नवी दिल्लीवरून निघायच्या दहा दिवस आधी एक स्त्री एकाएकी त्याच्या घरात आली. तिचा चेहरा भीती वाटण्यालायक होता. त्यापेक्षा तिचं बोलणं थक्क करून सोडणारं होतं. तिनं म्हटलं, " मी कोण, हे ठाऊक आहे का ?"

" नाही बुवा !" राघवन् उत्तरला.

" मी तुझ्या बायकोची आई आहे !"

यावर राघवन हसून म्हणाला, " सीतेला आया तरी किती आहेत ?"

" हसतोस काय ? आपली हुशारी आपल्याजवळ ठेव. सीता माझी मुलगी आहे. माझ्या कुशीतून जन्मली नसली तरी मुलीपेक्षा अधिक लाडकी आहे.

बरं, तुझ्या बायकोच्या गळचात जो रत्नहार होता तो अजून आहे का विकून खाल्लास?" त्या स्त्रीनं विचारलं

राघवन्‌ला आश्चर्य वाटलं, भीती पण वाटली. तरी भीती दिसू न देता त्यानं दरडावून विचारलं, "हे तू कशासाठी विचारत्येस? तू आहेस तरी कोण? नाव काय तुझं?"

"सांगत्ये ऐक,! मी तुझी सासू आहे. माझं नाव रझिया बेगम. तो रत्नहार मीच सीतेला दिलाय. म्हणून विचारलं. कळलं? बरं, त्या गोष्टी सोड. तू सीतेचा फार छळ करतोस, हे मला माहिताय. तुझ्या छळापेक्षा तिला कैद बरी वाटली म्हणून ती तुरुंगात गेली. कधीतरी ती तुरुंगातून सुटेलच. त्यावेळी तिच्याशी सलोख्यानं वागून तिला संरक्षण देण्याचा प्रयत्न कर. नाहीतर या सुरीच्या एका घावात तुला खलास करून टाकीन." असं सांगून तिनं खरोखरीच त्याला सुरी काढून दाखवली.

ती सुरी पाहून राघवन् कमालीचा घाबरला. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. एवढचात त्याला एक गोष्ट आठवली. रजनीपूरची वेडी नामक एक स्त्री नवी दिल्ली भागात इतस्ततः फिरत असते, असं त्यानं ऐकलं होतं. म्हणून चाचरत त्यानं विचारलं, "तू रजनीपूरची...."

त्याचं वाक्यदेखील पूर्ण झालं नाही तोच ती म्हणाली, "ही मीच रजनीपूरची महाराणी आहे. माझ्या मुलीला नीट वागवलंस तर ठीक. नाहीतर ही सुरी भोसकून जीव घेईन." इतकं बोलून ती चालती झाली.

ही घटना कित्येक दिवस राघवन्‌च्या हृदयात ठाण मांडून बसली होती. रजनीपूरची ही पिशी आहे तरी कोण? तिचा सीतेशी काय संबंध? याबद्दल त्याच्या मनात जिज्ञासा जागृत झाली होती. दुसऱ्या कुणाकडून त्याला याचा पत्ता लागला नव्हता. सीतेलाच विचारून पाहावं लागणार होतं.....

समुद्रावरून थंड वारा वाहात होता लाटांचा आवाज पार्श्वगीतासारखा ऐकू येत होता. राघवन्‌चे डोळे जड झाले. तो सोफ्यातल्या सोफ्यात झोपी गेला....

झोपेत त्याला एक स्वप्न पडलं. एक तरुण स्त्री त्याच्याकडे येत होती. पहिल्यांदा ती तारिणी वाटली. पाहाता पाहाता तिथं सीतेचा चेहरा दिसू लागला. राघवन् तिला म्हणाला, "मला क्षमा कर सीता! मी तुझा फार छळ केलाय्.

सीतेनं म्हटलं, "मी तुम्हाला छळलं अन् तुम्ही मला छळलं. फिट्टंफाट झाली. आता क्षमा मागायला उरलंच काय? बरं, आपली वासंती कुठाय्?"

"अरेच्या! वासंतीला तर मी विसरूनच गेलो. आत्ता घेऊन येतो!" असं बोलून राघवन् तिथून धावत निघाला. आपण वासंतीला कुठं तरी ठेवलंय, हे त्याला आठवलं. पण कुठं, हे आठवेना. एकीकडे ती कुठंय, याची आठवण करीत तो धावत होता. धावण्याच्या धुंदीत त्यानं नदी-नाले, दऱ्या-खोऱ्या, पहाड-पर्वत पार केले. नदीच्या वाळून त्याचे पाय खोल रुतत होते. झाडाझुडपात कपडे अडकत होते. त्याला भिजलेल्या, लक्तर झालेल्या कपडयांची शुद्ध नव्हती. 'वासंती ऽ! वासंती ऽऽ!!' अशा हाका मारीत धावत राहिला. त्याच्या हाकांनी आकाश-पाताळ दुमदुमलं. हळूहळू त्याचा घसा बसला. आवाज निघेना. शेवटी शरीरातलं सारं बळ एकवटून त्यानं किंकाळी फोडली, 'वासंती ऽ!'...

त्याचं स्वप्न तुटलं होतं... तो गडबडीनं उठून उभा राहिला. त्या दिवसापासून त्याच्या मनात वासंतीला भेटण्याची तीव्र इच्छा जागृत झाली. वासंतीला आपल्यापासून कधीच दूर ठेवायचं नाही असा त्यानं निर्धार केला. त्या स्वप्नाच्या आठवणीनं त्याला कापरं भरायचं अन् तो देवाला प्रार्थना करायचा, 'माझ्या वासंतीला दुःखी करू नकोस!'

मुंबईच्या बंदरात उतरताच पहिल्यांदा त्यानं मद्रासचं विमान तिकीट मिळवलं. मद्रासला गेला. पद्मापुरामध्ये पोचताच त्याला त्याच्या घरापुढं गाडी उभी दिसली. त्याच्या मनात विचार आला, घरचं कुणी बाहेरगावी तर चाललेलं नाही ना? त्याच्या टॅक्सीचा आवाज ऐकून कामाक्षी अम्मा बाहेर आल्या. मुलगा आलेला पाहून त्यांना आनंद झाला. मोठ्या प्रेमानं त्याचं स्वागत करून विचारलं, "अरे, येणार असल्याचं पत्रही नाही घातलंस?"

या प्रश्नाचं उत्तर द्यायची त्याला गरज वाटली नाही. त्यानं विचारलं, 'कोणी बाहेरगावी चाललंय का?"

"होय बेटा! सूर्या वासंतीला घेऊन चाललाय. तू आज येशील याची कुणाला कल्पनाच नव्हती इथं. तू आलास हे बरंच झालं. आता पोरीला इथंच भेटून घे." कामाक्षी अम्मा म्हणाल्या.

"वासंतीला कुठं नेणार आहे तो?"

"देवपट्टणम्ला. तिथंच तिची आई राहत्येय."

"अच्छा! अशी गोष्ट आहे का?"

" आता तू आलाच आहेस तरी पोरगी आजच नाही जाणार ! "

" आजच काय कधीच जाणार नाही ! " असं बोलून राघवन् खाड्खाड् करीत आत गेला.

सूर्याबरोबर गावाला जायला वासंती तयार होऊन उभी होती. राघवन्ला बघताच ती त्याच्याजवळ जाऊन त्याला बिलगली.

क्षणात राघवन्नं आपल्या पॅन्टच्या खिशातून पिस्तुल बाहेर काढलं, सूर्यावर पिस्तुल रोखून तो ओरडला, " अरे लबाडा, बरा भेटलास. तुझ्यासारख्या बेइमानाला मारण्यात मुळीच पाप नाही ! "

क्षणभर सूर्या स्तंभित झाला. तरी चटकन् स्वतःला सांभाळून म्हणाला, " वा ऽ, बापूसाहेब ! हा कसला राग बुवा ? इंग्लंडमध्ये असताना बरेच इंग्रजी स्टन्ट पिक्चर पाहिलेत वाटतं. विनाकारण पिस्तुल चालवायची फुकटी धमकी देताय ? कशाला काडतूस वाया घालवता ? पुन्हा गरज भासली तर कामाला येईल. "

" मला माहिताय् तू बडबड्या आहेस ते. तूच ना मीनेला पळवून नेलंस ? आता वासंतीला पळवायला आलास होय ? पण मी तुला पोलिसांकडून अटक करूनच सोडीन. " राघवन् म्हणाला.

राघवन्च्या मागे उभ्या असलेल्या कामाक्षी अम्मा म्हणाल्या, " राघव, आल्या आल्या हे काय वेडवाकडं बडबडू लागलास ? सूर्या तसा नाही. तो कधीच कोणतं वाईट कृत्य करणार नाही. वासंतीला तिच्या आईकडे घेऊन जायला मीच त्याला सांगितलं. कितीतरी दिवसांपासून बिचारीनं आई बापाचं तोंड नाही बघितलंन्. सारखी झुरणीला लागलीय्. "

तेवढ्यात वासंती एकदम बोलली, " सूर्यामामा, मी बाबाचा हात पक्का धरून, ठेवल्ये. तुम्ही इथून पळा बरं. "

मुलीचं हे बोलणं ऐकून राघवन्चा राग बराच शांत झाला. तो आपल्या कृत्यानं लज्जित होऊन म्हणाला, " मिस्टर सूर्या, सर्व स्त्रीजात तुझाच पक्ष घेणार हे मी जाणतो. बरंय, यावेळेपुरता मी तुला माफ करतो. आता इथून एकदम चालता हो. गेट आऊट ! "

" अहो साहेब, मी तर चाललोच. मात्र जाण्यापूर्वी आपल्या माझ्याविषयी जो दूषित ग्रह झाला आहे, त्याचं निराकरण करून टाकायचंय्, तुम्ही

एवढ्यातच म्हणालास की, मी तुमच्या पत्नीला पळवलं. हे खरोखरीच मनापासून बोलतोस का आपलं बोलायचं म्हणून बोलताय्, मला कळलं नाही. पण तुमचा यावर विश्वास असला तर ती तुमची मोठीच चूक होतेय. रजनीपूरच्या राजाची माणसं तिला जबरीनं घेऊन गेली होती. मी शपथ घेऊन सांगतो. मी त्यांना अडविण्यासाठी व तिला सोडवण्यासाठीच त्यांचा पाठलाग केला. दुर्दैव पोलिसाच्या रूपानं आडवं आलं. नेमकं त्याचवेळी त्यांनी मला पकडलं. कळलं ? "

" याच गोष्टी सूर्यानं मलाही सांगितल्या बेटा. त्याच्या गोष्टीवर माझा विश्वास बसला. सीतेनही असंच सांगितलं होतं." कामाक्षी अम्मा बोलल्या.

" आईनं ज्या यातना भोगल्या त्या ऐकून आश्चर्य तर वाटलंच, पण धडकीही भरली बाबा." वासंतीनं म्हटलं.

राघवन्नं पिस्तुल खिशात घालत म्हटलं, " ठीक आहे! ती सारी हकीकत मलाही सांगून टाक. तुला गावाकडे जायची घाई तर नाही ना सूर्या ? "

" सारं काही सांगूनच जाईन. काही घाई नाही मला." सूर्या म्हणाला.

सूर्यानं रजनीपूरच्या राजेसाहेबांच्या माणसांचा उल्लेख करताच तो सारा वृतान्त त्याच्याकडून ऐकण्याची राघवन्च्या मनाला हुरहूर लागून गेली. म्हणून आंघोळ आणि जेवण आटोपताच तो सूर्याला घेऊन वरच्या मजल्यावरील आपल्या खोलीत गेला. तिथं दोघही आरामात बसल्यावर म्हणाला, " सूर्या, समुद्रप्रवासात मला एक भयंकर स्वप्न दिसलं. आमची वासंती कुठं तरी हरवली होती तिच्या शोधात मी आकाश-पाताळ एक केलं. सर्व शोधून काढलं. धुक्यात, वादळात, वणव्यात शोधलं. 'बाबा बाबा' अशा तिच्या करुण हाका कानी पडत होत्या. मात्र वासंती कुठंच दिसेना. ती भेटलीच नाही.... असे ते स्वप्न संपल्यावर मी मनाशी ठरवलं, की यापुढं एक दिवस तर काय, एक क्षणदेखील वासंतीला दृष्टिआड होऊ द्यायचं नाही. त्यामुळेच, तू वासंतीला घेऊन जायला निघालास हे ऐकताच माझा संताप अनावर झाला तरी तू ते मनावर घेऊ नकोस. हां, तू म्हणालास, रजनीपूरच्या राजेसाहेबांचे लोक सीतेला जबरीनं घेऊन गेले. त्यानंतर काय घडले हे तरी ऐकव."

" ती काही काल्पनिक कथा नव्हे मिस्टर राघवन्. प्रत्यक्षात घडलेली घटना आहे बरं का."

" बरं, असू दे. पण रजनीपूरच्या राजाची माणसं सीतेला का धरून घेऊन गेली ? तुझं म्हणणं खरं असल्याचं साधार सिद्ध करून देशील तर मी रजनीपूर संस्थानचं नावनिशाण नाहीसं करून टाकीन हं !"

" मी काहीच सिद्ध करू शकणार नाही. अहो बापूसाहेब, मागे केव्हातरी कुणी काही केलं त्याचा पुरावा आता मी कुठून देऊ ? तुम्ही माझ्या गोष्टींवर विश्वास ठेवणार असलात तर ठीक...."

"ठीक आहे. माझा विश्वास बसेल अशा तऱ्हेनं तू वृत्तान्त सांग म्हणजे झालं.'

" तुमचं चिमटे काढणं काही संपत नाही. साहेब, तुमचं एका गोष्टीवर कधी लक्ष गेलं आहे ? तारिणी नि सीता यांच्या स्वरूपातलं साम्य तुम्हाला कधी दिसलं का ?" सूर्यानं विचारलं.

राघवन्‌चं संपूर्ण शरीर शहारलं. त्याच्या अंत:करणातील अनेक शंका-कुशंकांना भरतं आलं. तथापि मनातले भावतरंग चेहऱ्यावर न दिसू देता तो शांतपणे म्हणाला, " नाही. सूर्या, बायकांच्या चेहऱ्याकडे नि त्यातील साम्यभेदाकडे माझं कधी लक्षच जात नाही. तरीपण तुझ्या म्हणण्याप्रमाणे दोघींच्या चेहऱ्या-मोहऱ्यात साम्य आहे असं मानलं तरी त्याचा इथं काय संबंध पोचतो ?"

" संबंध आहे नं ! रजनीपूरची माणसं सीतेलाच तारिणी समजून घेऊन गेलीत."

" अरेच्चा ! म्हणजे तारिणी...?" राघवन्‌च्या तोंडून पुढचे शब्द बाहेर पडलेच नाहीत. तो थोडावेळ विस्मयानं अवाक् होऊन गेला. तरी सावरून म्हणाला, " तुला हे कसं काय कळलं बाबा ? तारिणीची माझी इतकी जुनी ओळख असून तिनं कधीच काही सांगितलं नाही अन् मलाही तशी शंका आली नाही."

" तारिणीनं मला तरी कुठं सांगितलं. मला कळलं ते सीतेकडूनच."

" मग ते लोक सीतेलाच तारिणी समजून घेऊन गेले असं अनुमान तू कसं बरं केलंस ?"

" सीतेला त्या लोकांनी नेलं त्याच्या आदल्या दिवशीची गोष्ट. सायंकाळच्या वेळी मी अन् तारिणी चांदणी चौकाच्या मागच्या अंगाला बोलत बसलो होतो. तारिणी निघून गेल्यावर तीन असामी माझ्याजवळ आले. त्यांच्या पोषाखावरून चेहऱ्या-मोहऱ्यावरून ती माणसं कुठल्यातरी संस्थानातील असावीत असा मला संशय आला. त्यांनी मला म्हटलं, ' तारिणीला पकडून देण्यात तू मदत करशील तर आम्ही तुला एक लक्ष रुपये देऊ. ' यामागील हेतू काय होता हे त्यावेळी

मला कळलं नाही. मी अंदाज केला तो एवढाच, की एखाद्या संस्थानिकाच्या वासनापूर्तीसाठी हे तारिणीचा बळी देऊ पाहात असावेत. म्हणून मी त्यांना धमकावून घालवून दिलं.... दुसऱ्या दिवशी जवळपास त्याचवेळी सीता अन् मी त्याच मैदानात बोलत बसलो होतो...''

'' अस्सं म्हणजे घरी कुणाला न कळू देता, सर्वांच्या डोळ्यात धूळ फेकून तुझी माध्वी सीताबाई घराबाहेर पडून एकान्तात तुला भेटण्यासाठी गांधी मैदानापर्यंत आली. ती कशासाठी आली असावी, हे सांगतोस का ?''

''तुम्ही रागावणार नसलात तर खरं काय ते सांगतो.''

'' म्हणजे मी रागावणार असलो तर तू खोटं सांगणार. खरं नं ? ''

'' ठीक आहे. तुम्ही रागवा अगर रागवू नका, खरं काय ते मी सांगूनच टाकतो. मिस्टर राघवन्, मागे एकदा तुम्ही माझ्या अटकेसाठी सापळा रचला होता आणि घराभोवती गुप्त पोलिसांना उभं करून ठेवलं होतं, याची आठवण आहे ना ? म्हणूनच मी तुमच्या घरी येऊ नये व पोलिसांपासून सावध असावं अशी सूचना देण्यासाठी सीता गांधी मैदानावर आली होती....''

सूर्यानं मोठ्या शिताफीनं सीतेचा आपल्याकडे येण्याचा उद्देश न सांगता केवळ ओझरता उल्लेख केला. तेवढा राघवन्चा भडका उडायला पुरेसा होता. तो मनात कुढत राहिला, ' ओ हो ! या चांडाळणीनं अगदी गहजब केला. या लबाड सूर्याला वाचविण्यासाठी तिनं एवढं साहस का करावं ?''

सीतेला तारिणी समजून रजनीपूरच्या राजाच्या माणसांनी जबरीने उचलून नेल्यापासून कलकत्त्याला तिला अटक होईपर्यंतचा वृत्तान्त सूर्यानं अगदी थोडक्यात सांगून टाकला. शेवटी म्हटलं '' रजनीपूरवाल्यांनी जी चूक केली तिचीच उजळणी कलकत्त्याला पोलिसांनी केली. सीतेलाच तारिणी समजून भारत संरक्षण कायद्याखाली अटक करून तिला तुरुंगात डांबून टाकलं.''

सूर्याच्या तोंडून ही सर्व कथा ऐकूच घेतल्यावर राघवन्नं आपल्या घरी अचानक हातात सुरी घेऊन शिरलेल्या नि सीतेला नीट वागवण्याची धमकी देणाऱ्या वेडीचा वृत्तान्त विस्तारपूर्वक सांगून टाकला. शेवटी विचारलं, ''ती वेडी कोण ठाऊक आहे ? तिनं सीतेबद्दल एवढी आस्था का दाखवावी हे तुला सांगता येईल ?''

''होय सांगू शकतो नं ?'' हे त्याचे उत्तर ऐकून राघवन् पुन्हा शहारला.

"त्या बाईचं पूर्वीचं नाव रमामणी. आता ती रझिया बेगम आहे. सीते-विषयी तिला वात्सल्य वाटायला तसेच कारण आहे. सुमारे तीस वर्षांपूर्वीची ती दीर्घ कथा आहे. मला रझिया बेगमच्या तोंडूनच ती ऐकायला मिळाली. आता ती अभागी बाई भ्रमिष्टावस्थेत भटकत असते. कधीतरी तिचा भ्रम दूर होतो.... अशीच शुद्धीत असताना मला ती भेटली. आणि तिच्याच तोंडून तिची कथा ऐकण्याची संधी मिळाली." अशी प्रस्तावना करून मूर्या रझिया बेगमची ती अद्‌भुत नि अपूर्व इतिहासकथा सांगू लागला....

41

तीस वर्षांपूर्वी रजनीपूर संस्थानच्या गादीवर जे राजेसाहेब होते ते इतर कित्येक संस्थानिकांप्रमाणे विलासी वृत्तीचे होते. त्यांचे काही कुमार्गी सल्लागार होते. मदोंकर हा त्यांच्यापैकी प्रमुख होता.

अशीच एकदा महाराष्ट्रातील एक गायिका रजनीपूरच्या दरबारात गाण्याच्या मैफलीसाठी आली होती. तिचं नाव गंगाबाई. तिच्यावर राजेसाहेब लुब्ध होऊन गेले होते. त्या गायिकेबरोबर तिची मोठी बहीणही आली होती. तिचं नाव रमामणीबाई. ती फार चतुर अन् हिमतीची बाई होती. व्यवहारात आपला कोणी हात धरू शकत नाही, असं तिला वाटे.

राजदरबारात लागोपाठ तीन दिवस गंगाबाईचं गाणं झालं. तिसऱ्या दिवशी मदोंकर गायिकेचा बिऱ्हाडी आला. त्यानं सांगितलं, 'महाराज गंगाबाईवर बेहद्द खुश झाले असून तिच्यावरून जीव ओवाळून टाकायला तयार आहेत.' त्याच्या बोलण्यातील गर्भितार्थ ओळखून रमामणी म्हणाली, "असं आहे तर महाराजांनी माझ्या बहिणीशी लग्न लावून टाकावं."

मदोंकर म्हणाला, "महाराजांची तीच इच्छा आहे." लग्न या शब्दानं रमामणीची फसगत झाली. तिनं धाकटचा बहिणीवर वजन टाकून तिला तयार

केलं. लग्नाचं नाटक केलं गेलं. थोड्याच दिवसांत कळून आलं, की राजेसाहेबांची पूर्वीच तीन लग्नं झालेली असून अंत:पुरात तिन्ही राण्या विद्यमान आहेत.

ही गोष्ट कळल्यावर रमामणी शहारून उठली. पण ती निराश झाली नाही. तिनं हिंमत सोडली नाही. चौकशी केल्यावर तिला कळलं की, तिन्ही राण्यांना मूलबाळ नाही. मग एके दिवशी तिनं एकान्तात महाराजांची भेट घेतली अन् सुरीचा धाक दाखवून गंगाबाईला होणाऱ्या मुलालाच गादीचा वारसा मिळेल असं सहीनिशी लिहून घेतलं.

मदोंकरला लवकरच याचा सुगावा लागला. त्यानं रमामणीवर मात करण्यासाठी कंबर कसली. त्यानं आपल्या कारस्थानात मुइणीला सामील करून घेऊन गंगाबाईला होणाऱ्या मुलाला जन्मताच ठार करण्याचा बेत रचला.

मदोंकर आणि दाई आपसात बोलत असताना त्यांचं बोलणं एका राणीनं ऐकलं. राणीसाहेब धार्मिक वृत्तीच्या व दयाळू होत्या. त्यांनी रमामणीला बोलावून मदोंकरच्या कारस्थानाची जाणीव करून दिली. शिवाय, बाळंतपणाच्या काही दिवस आधीच गंगाबाईला मुंबईला घेऊन जाण्याचा सल्ला दिला. याबाबतीत लागेल ती मदत करण्याचं आश्वासन दिलं. राजेसाहेब त्यावेळी युरोपात होते. राणीसाहेबांच्या सल्ल्यानुसार वागण्याचं रमामणीनं ठरवलं. योग्य वेळी मदोंकर आणि त्याचे पहारेकरी यांच्या डोळ्यात धूळ फेकून रमामणी बहिणीला घेऊन मुंबईला गाडीत बसली.

रजपुतांच्या पड्याच्या प्रथेनुसार गंगाबाईनं तोंडावर घुंगट ओढला होता. त्यामुळे तिला घेऊन प्रवास करण्यात कसलीच अडचण उभी राहिली नाही. तरी इतर अनेक अडचणी आल्याच. विशेषत: प्रवासात त्यांचे पैसे अन् गाडीची तिकिटं हरवल्यामुळे मुंबईजवळच्या एका लहानशा स्टेशनात तिकीटचेकरनं त्यांना गाडीतून उतरवून दिलं....

आधीच लहानसं स्टेशन. त्यातही वेळ रात्रीची. सोबतीला कुणी पुरुष नसलेल्या असाहाय्य दोन तरुण स्त्रिया प्लॅटफॉर्मवर उभ्या. त्यांतील एक भरलेल्या दिवसांची. जवळ फुटकी कवडी नाही. गंगाबाईच्या अंगावर दागिने होते. त्यातला एखादा विकला तरी भरपूर पैसे मिळू शकले असते. पण अवेळी काय करणार ?

गाडी स्टेशनातून निघून जाताच शुकशुकाट झाला. रमामणी बहिणीला घेऊन प्रतिक्षालयात आली. गंगाबाईला वस्तुस्थितीची कल्पना आली. तिचा धीर

खचला. ती हुंदके देऊन रडू लागली...

या अवेळी इथं कोण रडतंय, हे पाहण्यासाठी रात्रपाळीचे स्टेशन-मास्तर प्रतीक्षालयात आले. तेव्हा त्यांना दिसलं– एक बाई घुंगट ओढून रडत बसलीय अन् दुसरी बाई तिच्याजवळ बसून आहे. त्यांनी सहज विचारपूस केली. हे स्टेशन-मास्तर म्हणजेच सीतेचे वडील दुरैस्वामी अय्यर...

रमामणी बाईनं ह्या मास्तरांना आपल्यावर कोसळलेल्या बिकट परिस्थितीची खरी हकीकत सांगितली. त्याजबरोबर रात्रभर थांबण्यासाठी योग्य जागा देण्याची आणि दुसऱ्या दिवशी सकाळी गर्भवती वहिणीला मुंबईच्या सूतिकागृहात पोचवण्यासाठी मदतीची याचना केली.

"मी तुम्हाला मदत केली तर तुम्ही काय द्याल ?" स्टेशन-मास्तरनं विचारलं. त्यावेळी दुरैस्वामीला फार कमी पगार मिळायचा. त्याची पत्नी राजम्मा सूतिकागृहात दाखल झाली होती. ती आपल्या पहिल्या अपत्याचं मुख पाहण्यासाठी आसुसली होती. दुरैस्वामींना तोकड्या पगाराच्या पैशातून खर्च भागवताना नाकी नऊ यायचे. म्हणून त्यांनी पैशांच्या अपेक्षेनं काय द्याल असं विचारलं होतं. त्या अपरिचित स्त्रियांच्या वेशावरून त्या धनवान असाव्यात असा त्यानं अंदाज केला होता.

रमामणीनं म्हटलं, "अशा अडचणीत आम्हाला मदत केलीत तर मागाल ती आमच्याजवळची वस्तू द्यायला तयार आहोत. आपण म्हणाल तर मी आपलं सर्वस्व आपल्या चरणी अर्पण करत्ये."

हे ऐकून दुरैस्वामी अय्यर थक्क होऊन गेले. त्यांनी वरमून म्हटलं, "बाई, तुम्ही हे काय बोलता ? वस्तुतः तुमच्याकडून मोबदल्याची अपेक्षा नाही. माझ्या सामर्थ्यानिसार मी तुम्हाला लागेल ती मदत करीन."

दुसऱ्या दिवशी सायंकाळी दुरैस्वामी अय्यरांनी त्यांची पत्नी असलेल्या सूतिकागृहात गंगाबाईला भरती केलं. मात्र ही गोष्ट त्यांनी आपल्या पत्नीला कळवली नाही.

रोज ते आपल्या बायकोला भेटायला सूतिकागृहात जायचे. तेथून निघताना परस्पर रमामणीला भेटून घ्यायचे. रमामणीनं त्यांच्या सद्भावनेबद्दल आणि सहाय्याबद्दल मनापासून आभार मानले. हळूहळू दोघांचा स्नेह दृढ झाला. मग त्याचं प्रेमात रूपांतर झालं...

गंगाबाई अन् राजम्मा एके दिवशी रात्री सूतिकागृहात बाळंत झाल्या.

मध्यंतरी मदोंकरला कुठून तरी सुगावा लागला अन् तो त्याच सुमारास सूतिकागृहात येऊन थडकला. रमामणीला ही गोष्ट कळली. तेव्हा आपल्या बहिणीला तेथून हलवून एखाद्या गुप्त स्थळी नेण्यासाठी तिनं दुरैस्वामीची मदत मागितली. रमामणीवर लुब्ध झालेल्या दुरैस्वामींनी मदोंकरला चुकवून त्यांना एका अज्ञात स्थळी नेलं. मुंबईसारख्या विशाल शहरात अशा स्थळांना काय तोटा ?

दुरैस्वामी अय्यर आपल्या बायकोला कळू न देता रमामणीकडे नियमानं जात राहिले.

तारिणीच्या जन्माच्यावेळी राजम्माला जे मूल झालं ते लवकरच देवाघरी गेलं. दुरैस्वामीला आपल्या पहिल्या अपत्याचं मरण असह्य झालं. ते दुःख विसरण्यासाठी दुरैस्वामी रमामणीच्या बिऱ्हाडी जाऊन तारिणीचे लाड करू लागले.

काही दिवसांनी रजनीपूरचे राजेसाहेब विलायतेवरून परत आले. रमामणी त्यांच्या मुंबईतील बंगल्यावर गेली. त्यांना भेटून तिनं कडाक्याचं भांडण केलं. रमामणीच्या तोंडून गंगाबाईबद्दल ऐकून महाराजांनी दुष्यंताप्रमाणे कानावर हात ठेवले. आपल्याला गंगाबाई कोण हे माहीत नाही, असं ते बोलले. रमामणीनं त्यांच्या हस्ताक्षरातलं पत्र त्यांना दाखवलं.

महाराजांच्या हुकुमावरून राजेसाहेबांच्या माणसांनी तिच्याकडून जबरीनं ते पत्र हिसकावून घेतलं अन् तिला कठोरपणानं घराबाहेर हाकून लावलं.

दुखावलेल्या हृदयानं अन् निराश अंतःकरणानं रमामणी बिऱ्हाडी आली. तिनं गंगाबाईला सारी हकीगत सांगितली. ती ऐकून गंगाबाईला घेरीच आली. त्यानंतर काही दिवसांनी तिनं इहलोकातून प्रयाण केलं.

तारिणी खरोखरीच राजकुमारी आहे ? — असा विचार मनात येताच राघवन्‌चं मन वादळी समुद्राप्रमाणे अत्यंत प्रक्षुब्ध झालं. आतापर्यंत बऱ्याच निरगाठी उकलल्या होत्या. तारिणी ही काही सामान्य स्त्री नव्हे, असं त्याला यापूर्वी कित्येकदा वाटून गेलं होतं. ते खरं ठरल्याचं दिसून येताच त्याला अभिमान वाटला. आपणही कधीतरी एका राजकुमारीच्या प्रेमाचे अधिकारी बनलो होतो, याबद्दल त्याला मनस्वी आनंद झाला. त्याचबरोबर त्या अपूर्व प्रेमाचा आपण स्वीकार केला नाही, याचं त्याला फार दुःख झालं. आटोकाट प्रयत्न करूनही तारिणीच्या जन्माचं रहस्य त्याला उलगडता आलं नव्हतं. तेच सूर्याला नेमकं कसं समजलं याचं त्याला नवल वाटलं होतं. तारिणी, सूर्या अन् सीता या त्रिकूटाचा त्याला मनोमन

संताप आला. या तिघांनी मिळून आपलं आयुष्य बरबाद करण्याचा कट रचला असावा, असंही त्याला वाटलं. मनात उफाळून येणारा मत्सर, द्वेष नि राग कसातरी दाबून तो म्हणाला, " सूर्या, तू गंगाबाईची जी कथा सांगितलीस ती स्कॉट नि ड्यूमाच्या कादंबऱ्यावर मात करण्याइतपत एखाद्या कल्पनारम्य कथे-सारखी मनोरंजक अन् मजेदार आहे बुवा ! "

" आपल्या देशातील संस्थानांत अशाच काल्पनिक कथांवर मात करणाऱ्या घटना प्रत्यक्षात घडल्या आहेत. पण त्या कथांनी मला हृदय विदीर्ण करणारं दुःख होतं. तसाच क्रोधही येतो. हजारो स्त्रियांची गंगाबाई व रमामणीसारखी दुर्दशा झाली असेल ! मला तर याच गोष्टीचं आश्चर्य वाटतं, की इतक्या पुण्यवान स्त्रियांच्या शोकयुक्त आसवांनी अन् तळतळून दिलेल्या शापांनी आमची ही संस्थानं जळून भस्म कशी झाली नाहीत ? " सूर्यानं प्रश्न केला.

" मला याचं मुळीच आश्चर्य वाटत नाही. हे कलियुग आहे. साध्वी स्त्रियांची शाप देऊन भस्मसात करण्याची शक्ती त्रेतायुगातच नष्ट झाली. हे आहे अत्याचारी लोकांचं युग. बरं, पुढं बोल. गंगाबाईच्या मृत्यूनंतर रमामणीनं काय केलं ? तसंच त्या भाग्यवान स्टेशन-मास्तरनं म्हणजे माझ्या सासऱ्यांनी पुढं काय केलं ? " राघवन्‌नं विचारलं.

गंगाबाईच्या मृत्यूनंतर रमामणी दुःखानं वेडीपिशी झाली.

दुःखातून सावरल्यावर रमामणीबाईनं मनाशी निर्धार केला, की माझ्या बहिणीच्या अकाली मृत्यूला कारणीभूत झालेल्या रजनीपूरच्या राजाचा आणि त्याच्या पातळयंत्री मंत्र्याचा–मदोंकरचा–बदला घ्यायचा. याच निर्धाराच्या बळावर अनेक संकटाशी सामना करण्याची शक्ती मिळवली. सूड घेण्याच्या आपल्या निर्धा-राला वास्तवात आणण्यासाठी व तारिणीला मदोंकरच्या तावडीतून वाचवण्यासाठी रमामणीबाईला पुरुषी आधार आवश्यक होता. तसा आधार तिला दुरैस्वामी अय्यर यांच्याकडूनच मिळणार होता. म्हणून संपूर्ण स्त्रीत्वाच्या लाघवी शक्तीचा वापर करून दुरैस्वामीशी लगट चालू ठेवली. संबंध टिकवून ठेवला.

बिचारे दुरैस्वामी चांगलेच कात्रीत सापडले. मुंबईसारख्या शहरातील महागाईत त्यांना मिळणाऱ्या तुटपुंज्या पगारावर दोन कुटुंबांचा चरितार्थ चाल-वण्याची जबाबदारी पार पाडणं त्यांना कठीण होऊन बसलं. दिवसेदिवस पैशाची अडचण भासू लागली...

तारिणी वयात आल्यावर रमामणीनं तिला रजनीपूरच्या राजाच्या हातून आयुष्याची माती झालेल्या गंगाबाईची—तिच्या आईची—संपूर्ण करुण कथा सांगून म्हटलं, " याचा जोरदार सूड उगवण्याचा मी निर्धार केलाय्. "

आपल्या मातेच्या जीवनाची दुर्दैवी शोकांतिका ऐकून ती स्वतःच्या भवितव्या-बद्दल साशंक झाली. साहजिकच तिच्या मनात राष्ट्रकार्याविषयी प्रलोभन निर्माण झालं. त्यावेळी मीठ-सत्याग्रहानं साऱ्या देशाचं लक्ष वेधून घेतलं होतं. त्या सत्याग्रही स्वयंसेविकांच्या पथकात ती सामील झाली. अशा रीतीनं ती स्वातंत्र्य-लढ्यात ओढली गेली. त्यानंतर बिहारमधील भूकंपपीडिताच्या सेवाकार्यासाठी बिहारात गेली.

जवळपास याच सुमारास राजम्मा दीर्घ मुदतीच्या आजारानं बिछान्याला खिळली होती. ती या आजारातून उठणं कठीण आहे असं रमामणीला कळलं. तिच्या मनात राजम्माला व तिच्या मुलीला बघायची फार दिवसांपासून इच्छा होती. म्हणून ती राजम्माला भेटायला गेली. रजनीपूरच्या राजाकडून तिच्या बहिणीला मिळालेल्या दागिन्यांपैकी एक रत्नहार तेवढा तिच्याजवळ उरला होता. तो रत्नहार आणि दोन हजार रुपये घेऊन दुरैस्वामी घरात नसताना ती राजम्माकडे गेली. सीतेच्या लग्नासाठी तो रत्नहार व रुपये देऊन ती परत आली.

अशा रीतीनं एक कर्तव्य पार पाडल्यावर रमामणी आपल्या जीवनातील दुसऱ्या उद्दिष्टाकडे वळली. ते उद्दिष्ट म्हणजेच सूड. मुंबईला येऊन राहिलेल्या रजनीपूरच्या राजाच्या खुनाचा तिनं प्रयत्न केला. पण यश आलं नाही. उलट खुनाचा प्रयत्न केल्याबद्दल रमामणीला अटक करून तुरुंगात डांबण्यात आलं.

रजनीपूरचे अधिपती त्यानंतर फार दिवस जगले नाहीत. म्हणून तुरुंगातून सुटका होताच रमामणीनं दुसरा शत्रू मदोंकर याच्यावर लक्ष केंद्रित केलं. परंतु इथंही तिच्या पदरात अपयशच आलं. एक तर मदोंकरला शोधण्यातच तिचा फार वेळ गेला. त्याचा शोध लागल्यावर सूड उगवण्याच्या संधीची वाट पाहात राह्यली. पण तिच्या आधी त्याच्या दुसऱ्याच कुणातरी शत्रूनं पुढाकार घेतला अन् मदोंकराचा खून करून मोकळा झाला....

42

गंगाबाई आणि रमणीबाई यांची ही करुण कथा ऐकल्यानंतर सूर्या राघवन्‌ला म्हणाला, " का हो बापूसाहेब, कुणीतरी उत्तर हिंदुस्थानी बाई तुमच्याकडे आली होती अन् सीतेला नीट वागवण्याबद्दल तुम्हाला धमकावणी देऊन गेली असं तुम्ही म्हणत होतात नं ? मला वाटतं, ती रझिया बेगमच असावी. तिला सीतेविषयी ममता वाटण्याचं कारण आता तरी लक्षात आलं ना ? "

" आलंय बाबा ! लग्नानंतर अजून मी आमच्या सासऱ्यांना पाहिलेलं नाही. ते हल्ली कुठं असतात, काय करतात, याची तुला काही कल्पना आहे ? " राघवन्‌नं विचारलं.

" अं हं ! ते आणि रझिया बेगम कुठं आहेत याचा पत्ता लावण्यासाठी तारिणीनं अन् मी आटोकाट प्रयत्न केला. पण शेवटी हार खावी लागली. "

" कशासाठी शोधलंत त्यांना ? "

सूर्यानं ओठांवर स्मित आणून म्हटलं, " मिस्टर राघवन्, एका कार्यासाठी त्यांची परवानगी नि आशीर्वाद मिळवायचं होतं. त्यासाठी त्यांचा शोध केला. खरं बोलायचं तर अजून शोध चालूच आहे. मी अन् तारिणीनं लग्न करायचं ठरवलंय. "

राघवन् जोरजोरात हसू लागला. हसता–हसता म्हणाला, " अरे सूर्या, मी तुला फार हुशार समजत होतो ! "

" ती धारणा चूक आहे असं आता वाटू लागलंय का ? "

" हं, नाहीतर तारिणीशी लग्न करण्याच्या गोष्टीच कशा केल्या असत्यास ? त्यासुद्धा आता इतक्या दीर्घ परिचयानंतर. हे बघ सूर्या, तारिणीशी लग्न करण्याचा विचार माझ्याही मनात कधीतरी डोकावून गेला होता. त्यावेळी तिनं माझ्यावर प्रेम करण्याचं ढोंग केलं होतं. "

" राघवन् ! तारिणीबद्दल असे शब्द उच्चारू नका. तुम्ही तारिणीच्या प्रेमाला ढोंग समजता ? तर मग तुम्ही तिला पुरतं ओळखलंच नाही. "

" म्हणजे तारिणीला माझ्यापेक्षा तूच अधिक चांगलं ओळखलंस, असं का तुला वाटतं ? " राघवन्‌नं विचारलं.

" शंकाच नको. तारिणीला तुम्ही नीट समजून घेऊ शकला असता तर तिनं प्रेमाचं ढोंग केलं किंवा नाटक केलं, असं म्हटलंच नसतं. "

" त्यावेळी ती मला म्हणायची, मी तुझ्यावरून जीव ओवाळून टाकीन. आता तुला म्हणत्ये, मी तुझ्याशी लग्न लावत्ये. या दोन विधानांपैकी एक खोटं असेल की नाही ? "

" मुळीच नाही. आपलं मत बदलायचा प्रत्येकाला अधिकार आहे. पूर्वी कधीतरी तुमच्यावर प्रेम केलंय हे खरं आहे. ते ढोंग नव्हतं की बनवाबनवी नव्हती. पण तिच्या जीवनातील उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीनं तुमची साथ काही उपयोगाची नाही, असं नंतर तिच्या लक्षात आलं तेव्हा तिनं आपला निर्णय बदलला. यात तिचं काही चुकलं असं कसं म्हणता येईल ?"

" सूर्या, तू एखाद्या हुशार वकिलाप्रमाणे तारिणीची वकिली करतो आहेस. तिचा उपयोग नाही. कारण तारिणीला तुझ्यापेक्षा मी अधिक चांगलं ओळखतो. तिनं माझ्यावर प्रेम करण्याचं ढोंग का केलं, हे मला माहीत आहे. केवळ दोन हजार रुपड्यांसाठी तिचं ते नाटक होतं. कितीही झालं तरी संस्थानिकांच्या दरबारातील धूळ चाटणाऱ्या गायिकेची मुलगीच ना ती ? "

सूर्या एकदम भडकून म्हणाला, " राघवन्, खबरदार ! तारिणीच्या चारित्र्या-बद्दल काही बोललात तर. . ." त्याच्या तोंडातून पुढील शब्द बाहेर पडले नाहीत. रागानं त्याचे ओठ थरथरू लागले.

" अरे जा ! मी बोललोच तर काय करशील ? रझिया बेगमप्रमाणे घाव घालून ठार करशील का ? " राघवन्नं टोमणा मारला.

" बरं आहे बापूसाहेब. तुमच्याशी बोलून फायदा नाही. परवानगी द्या. हा मी निघालोच ! "

" अरे अरे, असा रागावून जाऊ नकोस बुवा. निदान एवढं तर सांगून जा, की तुझी लाडकी आतेबहीण सीता सध्या कुठं आहे अन् तिचं काय चाललंय ? आता मी तिच्याबद्दल काही बोललो तरी तू कदाचित चवताळशील. वास्तविक तिचं करग्रहण केलेला मी तिचा पती आहे अन तू तिचा आवडता मामेभाऊ आहेस."

सूर्या खाली मान घालून उभा होता. त्याच्या डोळ्यातून दोन अश्रुबिंदू ओघळून जमिनीवर पडले !

" अरे ! हे काय सूर्या ? बायकांसारखी आसवं का ढाळतोस ? आपल्या आतेबहिणीचं नाव निघताच तू शरीरानं व मनानं पार विरघळून जातोस. तिच्या

नावातच अशी काही जादू आहे की तुमचं काही लफडं आहे ? "

राघवन्च्या तोंडून हे शब्द ऐकताच सूर्यानं डोळे पुसले, मान वर केली अन् म्हटलं, " तुम्ही माझ्याबद्दल काय हवं ते बोला, तारिणीविषयी काय वाटेल ते बोला, पण सीतेबद्दल अपशब्द बोलणारी जीभ झडून जाईल. ते शब्द उच्चारणारा पापी नरकात पडेल. धरणी दुभंगून त्याला आत गिळून टाकील."

सूर्याच्या तोंडून अशी कठोर वाणी ऐकताच राघवन्चं हृदय थरारलं. सूर्या पुढं म्हणाला, " राघवन, अजूनही सीता तुमच्याकडे यायला तयार आहे. पूर्वी काही चूकभूल झाली असली तरी झालं गेलं विसरून तुम्हाला आपले पतिदेव मानण्याच्या मनःस्थितीत ती आजही आहे. तिच्या नावावर एक लहानसं पत्र लिहिलंत तरी ती धावत-पळत इथं येईल. आली नाही तर म्हणा."

" सूर्या, या जन्मात तरी तुझ्या म्हणण्यासारखं घडायचं नाही. सीतेला अिथं बोलावून घेण्यासाठी पत्र लिहिण्याऐवजी मी आपला हात कलम करून टाकीन." राघवन् बोलला.

" छे : ! छे : ! असं काय बोलता ? माझं म्हणणं ऐका. आजवर झालं गेलं ते विसरून सीतेबरोबर संसार करून पाहा. खात्रीनं तुमचं जीवन सुखी होईल. राघवन् तुम्ही अन सीता दोघं आपसांत खेळीमेळीनं राहू लागलात तर मला नि तारिणीला कमालीचा आनद होईल."

आधीच राघवन्चं हृदय धगधगत होतं. सूर्यानं तारिणीचं नाव काढताच त्या आगीत तेल ओतलं गेलं.

" सूर्या तुला काय वाटलं, तुम्हाला संतुष्ट करणं हेच काय माझ्या जीवनाचं उद्दिष्ट आहे ? यासाठीच का माझा जन्म आहे ? एवढ्यासाठीच का वाढलो ?—" राघवन रागात किंचाळला. बोलता बोलता त्यानं सूर्याच्या गालावर एक चपराक हाणून दिली.

सूर्याचाही हात वर गेला. पण मोठ्या संयमानं त्यानं हात खाली केला.

" बापूसाहेब, आधी असं घडलं असतं तर एका चपराकीचं उत्तर नऊ चपराकींनी दिलं असलं. मात्र एवढ्यातच मी अन् तारिणीनं महात्मा गांधींच्या अहिंसेच्या मार्गानं जाण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्या अहिंसा व्रताची पहिली परीक्षा तुम्ही घेतलीत."

" असं काय ? तू महात्माजींच्या पक्षात सामील झालास होय, मग त्या आनंदाप्रीत्यर्थ हा आणखी प्रसाद घे." असं बोलून राघवन्नं त्याच्या

गालावर एक चपराक ठेवून दिली.

सूर्यानं दात-ओठ खात म्हटलं, "आता तरी झालं ना समाधान ? हृदय शांत झालं ना ? बरं, आता निघतो."

"अजून कुठं समाधान झालंय् ? माझं काळीज इतकं सहजासहजी थंड पडणार होय ?" असं बोलत असताना राघवन् त्याच्या गळचाला करकचून आवळत म्हणाला, "हे बघ सूर्या, यापुढं तू तारिणीला किंवा सीतेला भेटणार नाहीस असं आश्वासन दे. नाहीतर मी तुला ठार करून टाकीन."

"अहो साहेब, तुमचं बोलणं न्यायाला धरून नाही. मी सीतेला भेटणार नाही असं आश्वासन का देऊ ? माझ्या मनात पाप नाही. मग मला काय भीती ? तारिणीच्या बाबतीत तर मी मुळीच आश्वासन देऊ शकत नाही. वाटल्यास तुम्ही मला गोळी घालून ठार करा...सीता, तारिणी, तुमची आई व मुलगी तुमचं हे सत्कृत्य पाहून कृतार्थतेचा आनंद अनुभवतील !" सूर्या बोलला.

"ए मूर्खा, तुझ्या धमक्यांना मी भीक घालीन असं वाटलं होय तुला ?" एवढं बोलून आपल्या संपूर्ण शक्तीनिशी त्यानं सूर्याला दूर ढकलून दिलं. सूर्या जिन्यावरून खाली गडगडला अन् मधल्या वळणावर येऊन पडला.

एवढ्यात सूर्या पडल्याचा आवाज ऐकून लगबगीनं वासंती अन् तिची आजी तिथं आल्या.

"चक् चक् ! हे काय सूर्यामामा, वरून पडलात का ? अरेरे !" वासंतीनं सहानुभूतिपूर्वक विचारलं.

"होय ग बाई, पायाला ठेच लागून पडलो." सूर्यानं सांगितलं.

"अग वासंती, तुझा मामा ठेच लागून जिन्यात आपटला. बरं झालं, जिन्याच्या पायऱ्या सुरक्षित आहेत." असं बोलून राघवन् मोठ्यानं हसला.

43

साऱ्या देवपट्टणम् शहरात निवडणुकीची धामधूम सुरू होती. निवडणुकीच्या आदल्या दिवशी पट्टाभिरामन्‌च्या उमेदवारीच्या समर्थनासाठी सभा बोलावण्यात आली होती. निवडणुकीच्या सभेस एवढी गर्दी होईल असं वाटलं नव्हतं.

व्यासपीठावर पट्टाभिरामन्‌बरोबर गावातील बरेच प्रतिष्ठित स्त्रीपुरुष बसले होते. त्यांच्यांत सीतासुद्धा होती. गेल्या दीड महिन्यातील निवडणुकीतील भाषणांच्या सरावानं सीता चांगल्या वक्त्यांत गणली जाऊ लागली होती. तिची भाषणं देशभक्तीच्या भावनेनं ओथंबलेली असत. त्यात लोकांना उत्साहित करण्याची क्षमता असे. लोकांत स्वातंत्र्यप्राप्तीची इच्छा जागृत करण्याइतका आवेश असे. सीतेनं काळाबाजार करणाऱ्या विरोधकाचं सत्य स्वरूप उघडं करून दाखवलं होतं. त्यांच्या अनीतीवर व अमानुषतेवर असे कोरडे ओढले होते, की त्याचं मनोराज्य ढासळून गेलं. पट्टाभिरामन्‌चं समर्थन करताना स्नेह, सौहार्द व्यक्त व्हायचं. विरोधकावर तिनं जे वाग्बाण सोडले ते रामबाण ठरले. विरोधकाचा धीर खचून गेला होता.

त्यामुळे श्रीमती सीतादेवीचं भाषण ऐकण्यासाठी अगदी शेवटपर्यंत बसून राहण्याची श्रोत्यांना जणू सवयच होऊन गेली होती.

परंतु शेवटच्या दिवशी सभेला आलेल्या श्रोत्यांच्या पदरी निराशाच आली. कारण त्यादिवशी सीतेला काही बोलताच आलं नाही. बोलणं जमलंच नाही. नेहमीसारखी ती बोलायला तर उभी राहिली. मात्र चार-पाच वाक्यं बोलून झाली नाहीत तोच तिचा गळा दाटून आला. तिला एकदम रडायला आलं. म्हणून ती पटकन् खाली बसली...

त्यामागील कारण असं होतं की इकडे व्यासपीठावर कार्यक्रम सुरू झाला अन् तिकडे सभेत कोणीतरी काही पत्रकं वाटली. ती पत्रकं वाचणारे श्रोते व्यासपीठावर बसलेल्या सीतेकडे साशंक नजरेनं रोखून पाहू लागले. बऱ्याच श्रोत्यांच्या हातून पुढं जात जात एक पत्रक व्यासपीठावर पोचलं. सीतेनंच हात

पुढं करून ते घेतलं. पहिल्या चार-पाच ओळी वाचताच तिचं हृदय फुटायला आलं . . .

त्या पत्रकात सीतेची खूप बदनामी करण्यात आली होती. त्यात लिहिलं होतं, सीता आपल्या नवऱ्याला सोडून तिचा मामेभाऊ सूर्या याच्याबरोबर घरून पळून आली आहे. ती तुरुंगात गेली ती राष्ट्रकार्यासाठी नव्हे तर आगगाडीत चोरी करताना सापडली म्हणून तिला शिक्षा झाली. अशा धोकेबाज बाईच्या नादी लागून फसणाऱ्यांना मूर्ख म्हणून त्यांची संभावना करण्यात आली होती आणि त्यांची चांगलीच रेवडी उडवली होती.

एखाद्या स्त्रीच्या हृदयावर आघात व्हायला आणखी काय पाहिजे ? सीता तर खचून गेली. नंतरचे दोन दिवस ती घराबाहेर पडलीच नाही.

या घटनेमुळे पट्टाभिरामन्‌चं हृदय व्यथित होऊन गेलं. त्याचबरोबर कसंही करून ही निवडणूक जिंकून विरोधकाची फजिती केलीच पाहिजे, अशी ईर्ष्याही पट्टाभिरामन्‌च्या ठिकाणी जागृत झाली.

खरं तर, त्या पत्रकांनी मतदारांच्या विचारात फारसा बदल झाला नाही. लोकांची मूर्ख म्हणून संभावना केल्यानंतर त्यांचं सहकार्य कसं मिळणार ? देवपट्टणम्‌च्या मतदारांनी गलिच्छ पत्र छापणाऱ्यांचा ' मामा ' बनवायचं ठरवलं. काळा बाजार करणाऱ्या समाजकंटकाचंच हे काम असलं पाहिजे, असं लोक बोलू लागले. निवडणूक जिंकण्यासाठी त्यानंच एका सभ्य बाईची अशी खोटी बदनामी चालवली असल्याचं बोललं जाऊ लागलं. शहरातील लोकांची ही कल्पना खरी असल्याचं सिद्ध करून दाखवण्याचा जणू मतदारांनी विडाच उचलला. शेवटी पट्टाभिरामन् प्रचंड बहुमतांनी विजयी झाला.

एवढा प्रचंड विजय मिळूनही पट्टाभिरामन्‌ला जेवढा आनंद व्हायला हवा होता तेवढा झाला नाही. विषाच्या एका थेंबानं घागरभर दूध निरुपयोगी व्हावं, तसं सीतेच्या चारित्र्याला लावण्यात आलेलं दूषण सर्व आनंदाचा विचका करून गेलं. पट्टाभीच्या आनंदावर विरजण पडलं.

सर्व मित्रांनी पट्टाभिरामन्‌चं अभिनंदन करून आपला हर्ष व्यक्त केला. बाजारात विकायला ठेवलेले सर्व फुलांचे हार ललितेच्या व पट्टाभिरामन्‌च्या गळ्यात घातले गेले. ललितेला भेटायला आलेले म्हणत होते, ' तुमच्या भाग्यानं हा विजय मिळाला आहे. '

एकदोघांनी तर सीतेसंबंधी चौकशी करायला कमी केलं नाही.

सीतेबद्दल बोलणं निघालं तेव्हा समोरच्या दामोदर पिल्ले वकिलांनी म्हटलं, " सार्वजनिक जीवनात हे असं चालणारच. लोकांनी पिकवलेल्या कंड्यांना भीक घालू नये. खोटया अफवांनी खचून जाऊ नये. असं निराश होऊन कसं चालेल ?"

" मिस्टर पट्टाभिरामन्, तुम्ही सीताबाईना हिंमत द्यायला पाह्यजे. " अॅडव्होकेट अप्पाराव बोलले.

भेटायला आलेल्या सर्व लोकांना निरोप दिल्यावर घरची मंडळी जेवायला बसली. ललितेनं सीतेला जबरदस्तीनं ओढून आणलं.

" डोक्याचं दुखणं काय म्हणतं ? " पट्टाभिरामन्नं सीतेला विचारलं.

" तुमच्या विजयाची वार्ता ऐकताच डोक्याचं दुखणं पळालं. मी तुमचं अभिनंदन करत्ये ! "

" धन्यवाद ! तुमचं प्रोत्साहन अन् सहकार्य याचं हे फलित आहे. त्याबद्दल मी आभारी आहे. "

" ललितेचं नशीब बलवत्तर म्हणायचं. " सीता म्हणाली.

" अग ताई, हे फार लोभी आहेत बरं. या निवडणुकीत विजय मिळाला एवढयानं यांचं समाधान झालेलं नाही. अध्यक्षपद मिळालं तर खरं, असं म्हणतात."

" तुझ्या सद्भाग्यानं तेही घडून येईल. "

" केवळ भाग्यावर या गोष्टी अवलंबून नाहीत हं ! माझे मनोरथ पूर्ण व्हायचे तर पूर्वीसारखीच तुमची मदत आवश्यक आहे. अन् तुम्ही असं वरच्या खोलीत बसून भागणार नाही. "

" आता माझा तुम्हाला काही उपयोग होणार नाही, माझ्यामुळं फायदा सोडा, नुकसान होण्याचीच शक्यता अधिक दिसते. गेल्या दोन दिवसांत खोलवर विचार करून मी या निष्कर्षावर येऊन पोचले, की स्त्रियांनी सार्वजनिक कार्यात न पडलेलंच बरं. जनता फार लबाड असते. " सीतेनं म्हटलं.

" तुमचं बोलणं अगदी चूक आहे. आज जेवढे लोक माझं अभिनंदन करायला आले तेवढया सर्वांनी तुमच्याबद्दल विचारपूस केली. कुणाच्याही तोंडून उणंदुणं बाहेर पडलेलं नाही. "

" आज नाही उद्या बाहेर पडेल. तुम्ही ते पत्रक वाचलंत का ? ते वाचलं असतंत तर तुमचंही रक्त खवळून गेलं असतं. "

आता ललितेनं मध्ये पडून म्हटलं, " पुरे हो ! त्या गोष्टी थांबवा पाहू. अशा आनंदाच्या क्षणी त्या बोचक गोष्टीची चर्चा कशाला करायची ? "

सीता जेवण संपवून वरच्या मजल्यावर गेली. ती गेल्यावर सरस्वती अम्मा म्हणाल्या, " या पोरीचं यापुढं इथं राहणं बरं नव्हे. जेवढ्या लवकर निघून जाईल तेवढंच बरं होईल. "

" वा ऽ ग आई ! चांगलं बोललीस बाई. म्हणतात ना, कामापुरता मामा अन् ताकापुरती आजी. तसाच प्रकार करत्येस वाटतं ? अग, तिनं पुढाकार घेतला नसता तर हे निवडणुकीला उभेही राहात नव्हते की निवडून येत नव्हते. तूच ना असं म्हणाली होतीस ? "

" होय ग पोरी, अजूनही मी तिची मदत झाली नाही असं म्हणत्ये का ? पण तिचं मन निर्मळ असलं तरी तिनं चार-दोन दिवसांत इथून निघून जावं. तिला तिचं घरदार आहे, नवरा आहे, मुलगी आहे. अशी परक्यांच्या घरात धरणं धरून बसली तर तिच्या कुटुंबाचं कसं होणार ? तू जाऊन राहशील का अशी दुसऱ्यांच्या घरी ? नीट विचार करून बोल. "– सरस्वती अम्मांनी विचारलं.

आईच्या बोलण्यात बरंच तथ्य आहे असं ललितेला पटू लागलं !

पट्टाभिरामन्च्या मित्रांचे मनोरथ विफल झाले नाहीत. देवपट्टणम् नगर-पालिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत त्याचा विजय झाला. पण तो साधा विजय नव्हता. विजय आला तो वादळ घेऊन आला. प्रलयकारी ठरला.

दिवस चालले होते. अध्यक्षपदाची निवडणूक जवळ येत होती. निवड-णकीचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतसा पट्टाभिरामन्, ललिता अन् सीता यांचा उत्साह वाढत गेला.

निवडणुकीला दोन दिवस राहिले होते. अन् ललितेला एक पत्र आलं. पट्टाभिरामन् त्यावेळी घरी नव्हता. ललितेनं पत्र फोडलं. लिफाफ्यात पत्राऐवजी कुठल्यातरी वृत्तपत्रात छापलेल्या बातमीचं लहानसं कात्रण होतं. तिनं घडी उलगडली. त्या कागदावर ठळक अक्षरात शीर्षक छापलं होतं, ' पट्टाभिरामन्चे रंगढंग. ' ते वाचून तिचं हृदय धडधडू लागलं. शरीराला थरकाप सुटला,

ती लगबगीनं आपल्या खोलीत गेली. दार आतून लावून घेतलं. मग खिडकीजवळ जाऊन मजकूर वाचू लागली. धड अर्धा मजकूर ती वाचू शकली नाही. तिच्या डोळ्यांतून गरमगरम अश्रू वाहू लागले. थोडावेळ अश्रुपात

झाल्यावर तिचं मन मोकळं झालं. तिनं मनाला समजावलं —कुणातरी चलाख अन् मत्सरी माणसानं काहीतरी गलिच्छ लिहून छापून घेतलेलं दिसतं. अशा निराधार गोष्टी आपण मनाला कशाला लावून घ्यायच्या ?

अशा प्रकारे ललितेच्या मनाला यातना देणारा विषय म्हणजेच कुठल्या तरी सनसनाटी बातम्या छापणाऱ्या वृत्तपत्रातील एक बातमी. हे वृत्तपत्र गेल्या काही दिवसांपासून देवपट्टणम् शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या खाजगी आयुष्याच्या अंतरंगावर प्रकाश टाकण्याचं निमित्त करून त्यांच्याविषयी गलिच्छ मजकूर छापण्याचा उद्योग करीत होतं. हा मजकूर इतका घाणेरडा असे, की तो सांगायची किंवा ऐकायची लाज वाटावी. अशा प्रकारचं एक लंगोटी —पत्र देवपट्टणम् गावात प्रकाशित होतं, असं ललितेनं ऐकलं होतं. पण पट्टाभिरामन्च्या घरात त्याला प्रवेश नव्हता. अशा पत्राचा तो करडा विरोधक होता… कुणी, कुणास ठाऊक, अगदी कर्तव्यबुद्धीनं ललितेच्या नावावर त्या वृत्तपत्राचं हे कात्रण पाठवलं होतं. त्यात लिहिलं होतं, पट्टाभिरामन् आणि सीता यांचं परस्परांवर प्रेम आहे. सीतेला आपल्या घरात आश्रय देणारी ललिता महामूर्ख आहे. अशा दुश्चरित असलेल्या पट्टाभिरामन्ला देवपट्टणम् नगरपालिकेच्या अध्यक्षपदी बसविण्याचं दुर्लभ भाग्य नगरवासियांच्या वाट्याला येत आहे !

ह्या सर्व गोष्टी हृदयात साचलेल्या धुळीप्रमाणे झटकून टाकल्यावरही ललिता आता सीतेशी पूर्वीसारखी मोकळेपणानं वागू शकत नव्हती. तरी अध्यक्षीय निवडणूक जवळ येऊन ठेपल्यानं ललिता उत्साहाचं, स्नेहाचं नाटक करीत होती.

निवडणूक संपली. पट्टाभिरामन्वर त्याच्या स्नेह्यांनी व सोबत्यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला. त्यानं ते सहर्ष स्वीकारलं. हा सर्व सोहळा आटोपला. त्या सर्वांना निरोप दिल्यावर पट्टाभिरामन्ला भार उतरल्यासारखं हलकं वाटलं. पण दुसऱ्याच क्षणी त्याच्या मनाला प्रश्न पडला, ' अरे, आज ललितेला अन् सीतेला झालंय तरी काय ?' आपल्या मित्रांचे अर्थपूर्ण कटाक्ष स्मरताच त्याच्या हृदयाला वेदना झाल्या.

त्याच रात्री ललितेनं हळून त्याच्याजवळ गोष्ट काढली—

" का हो तुम्ही ' यमदूत ' पत्राचा अंक वाचला का ? "

पट्टाभिरामन् एकदम शहारून उठला. ' अरेच्या ! असं आहे का ? म्हणजे

त्या चिटोऱ्यात काही छापलं वाटतं ? त्याचा उल्लेख करून कुणीतरी हिच्या मनात विष पेरलेलं दिसतं ? '

" ते घाणेरडं चिटोरं मी पाहिलंच नाही, मग वाचणार कसं ?"

" तुम्ही नसेल वाचलं म्हणून काय झालं ? साऱ्या गावानं ते वाचलंय म्हटलं. आपल्याकडे पाहून हसतात सारे लोक ! "

" हसतात ? ते कशासाठी ? "

" कशासाठी म्हणजे काय ? अहो, त्यात काय काय छापलंय ? शेजारच्या बायकांनी मला वाचून दाखवलं ना ! साऱ्या गावाला कळलंय, तुम्हीच तेवढे कळायचे राहचलात."

" तो अंक तुझ्याकडे आहे का ? "

" हं ! आहे ! "

पट्टाभिरामन्‌ला संताप आला. पण तो न दाखवता म्हणाला, " कुठाय ? जा आण पाहू. काय लिहिलंय ते तरी बघू दे."

" इथंच आहे." असं सांगून ललितेनं दिवा लावला. आपल्या पेटीतून कात्रण काढून त्याच्या हातात दिलं.

पट्टाभिरामन्‌नं उभ्या-उभ्या एका दमात ते वाचून काढलं. वाचून त्याचं रक्त तापलं. कपाळावरील शिरा ताठल्या. दात ओठ खात त्यानं विचारलं,

" आगपेटी आहे ? "

" कशासाठी हवी ? "

' आधी दे, मग सांगतो."

ललितेनं त्याच्या हाती आगपेटी दिली. त्यानं एक काडी काढून पेटवली अन् कात्रणाला लावली.

' अय्या ! जाळू नका नं ! "

" का ? "

" अजून पुरतं वाचलं नाही. "

" अस्सं ? " पट्टाभिरामन्‌नं त्याची जाळून राख करून टाकली.

" एवढ्या घाईनं का जाळलंत ? माझ्या बोलण्याला काही किंमत नाही. मनात पाप भरलंय ना, तिथं दुसरं काय करणार ? "

पट्टाभिरामन् चटकन् तिच्या जवळ आला आणि तिच्या गालावर फाडकन्

चपराक ठेवून दिली अन् म्हणाला, " हज्जारदा सांगितलं, अशी घाणेरडी पत्रं विकत घेऊन वाचू नकोस. तुला हे विकत घ्यायची काही गरज होती ? "

ललिता रडत म्हणाली, " मी काही ते विकत घेतलेलं नाही. डाकेनं आलंय. "

" मग मला का नाही सांगितलंस ? मारे पेटीत बंद करून कशाला ठेवलंस ? याचा अर्थ काय लावायचा ? तुला अशा घाणेरड्या गोष्टींची आवड आहे असाच ना ? "

ललिता गप्प उभी होती.

दिवा मालवून पट्टाभिरामन् बिछान्यावर लोळला.

" माझं चुकलं. कृपा करून मला क्षमा करा. " ललितेनं म्हटलं.

" ठीक आहे ! यापुढं माझ्या चोरून असं काही करू नकोस. कळलं ? झोप आता गुपचुप ! " पट्टाभिरामन् बोलला.

ललिता बिछान्यावर पडली. तिला झोप आली नाही. उलट रडायला आलं. ती हुंदके देत रडू लागली...

•

44

नगरपालिकेच्या निवडणूक-सभेत सीतेच्या शीलावर शिंतोडे उडवणारी जी पत्रकं वाटण्यात आली त्यांनी सीतेच्या मनाला चांगलाच धक्का बसला. त्या आघातातून ती पुरती सावरली नाही तोच तिच्या हृदयावर आणखी एक आघात आला. सूर्यानं मद्रासवरून तिच्या नावावर एक पत्र पाठवलं होतं. तो मद्रासला पोचला त्याच दिवशी सुंदर राघवन् अचानक विलायतेहून सरळ तिथं आला होता, असं त्यानं पत्रात लिहिलं होतं या पत्रानं सीतेला आनंदाचा व आश्चर्याचा धक्का बसला होता. त्या ओळी वाचून तिला वाटलं, आता आपले दुर्दिन संपले, पंख लावून आताच राघवन्कडे उडून जावं, असं तिला उत्कटतेनं

वाटलं.... परंतु त्यानंतर लिहिलेला मजकूर वाचून पुन्हा असा धक्का बसला. की आतापर्यंतचा तिचा सारा उत्साह पार थंडावला. तिचं हृदय निराशेनं अन् वेदनेनं काळवंडून गेलं... राघवन् आपल्याशी कसा वागला याचं संक्षेपानं वर्णन करून पत्राच्या शेवटी लिहिलं होतं :

तुझा पती परतल्यावर तुम्हा दोघांतील मनोमालिन्य नाहीसं करून पुन्हा तुमचं मीलन घडवून आणण्याची माझी मनीषा होती. पण ते सारं स्वप्नच ठरलं.

अनेक कारणांमुळे मला आता गावाकडे यावसं वाटत नाही. मी इथून दिल्लीला चाललोय्.

शेवटी माझं एक मागणं आहे, माझं म्हणणं तुला रुचलं नसलं तर मला क्षमा कर. पट्टाभिरामन् निवडणुकीतच्या फंदात पडला याचंच मला वैषम्य वाटलं. त्या कामात तू सहाय्य करावंस याचं त्याहून वाईट वाटलं. यथाशक्य तू घराबाहेर पडणं बंद केलंस फार बरं होईल. हे जग मोठंच मतलबी अन् मत्सरी आहे. यापेक्षा अधिक काय लिहू ? ...

हे वाचून सीतेच्या दुःखाला तसाच संतापाला पारावार उरला नाही. जगावर व जगन्नियंत्यावर ती रुष्ट झाली. त्याहून अधिक राग आला तो आपल्या लाडक्या लेकीचा. आपल्या आईला लाथाडून बापाबरोबर ती कलकत्त्याला निघून गेली. अशी का असते पोरगी ?

सूर्याचा विचार मनात येताच तिचा राग अनावर झाला. 'बेशरम मेला ! म्हणे माझं नि त्यांचं सख्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला ! कुणी सांगितलं याला चोंबडेपणा करायला ? आम्हा दोघांत समेट घडवून आणणारा हा लागतो कोण ? .... इतक्या दिवसांच्या वियोगानंतरही यांच्या मनात काहीच फेरबदल झालेला दिसत नाही. मग मी तरी कशाला जाऊन त्यांच्या पायावर लोळण घेऊ नि नाकदुऱ्या काढू ?

खरोखरच सूर्याच्या अक्कलेला ग्रहण लागलंय् ! म्हणे, तुझं निवडणुकीत मदत करणं मला पसंत नाही. मी म्हणत्ये याला कसं पसंत पडेल ? तारिणीनं काही केलं तर त्याला पसंत पडतं. तेच मी केलं तर मात्र नापसंत काय ? त्याला आवडेल तेच करण्यासाठी का माझा जन्म आहे ?... मी व्यासपीठावर चढून चार शब्द बोलत्ये तर ते ऐकून प्रसन्न होणारे अन् प्रशंसा करणारे लोक नाहीत असं नाही. त्यांचं प्रेम नि प्रोत्साहन मिळतंय् हेच भाग्य म्हणावं !

याच मनोभावनेमुळे सीतेला आपली वेदना विसरण्याचं अन् निराशा सोडण्याचं बळ मिळालं. त्यामुळेच ती प्रसन्न दिसत होती.

तिनं सूर्याचं पत्र कुणाला दाखवलं नाही. तरीपण सूर्या तिच्या मुलीला घेऊन का आला नाही, हे सांगावंच लागलं. ललितेला तिनं एवढंच सांगितलं, की राघवन् विलायतेहून सरळ मद्रासला आले अन् लेकीला घेऊन कलकत्त्याला निघून गेले, यामुळे सूर्या वासंतीला घेऊन येऊ शकला नाही. ललितेनं इतर गोष्टी तर्कानं ओळखल्या. आता ती सीतेशी पूर्वीपेक्षाही अधिक प्रेमळपणानं वागू लागली.

इकडे नगरपालिकेची अध्यक्षीय निवडणूक जवळ आली. अन् तिकडे सीतेच्या जीवनावर आघातामागून आघात होत राहिले. त्यांनी ती तळमळू लागली.

दिल्लीला पोचल्यावर सूर्यानं आणखी एक पत्र पाठवलं. त्यानं लिहिलं, मी तारिणीला भेटून विचार-विनिमय केला. तुमच्या दोघांत इतरांनी लुडबूड करणं अंती नुकसानकारक होईल, असं तिचं मत आहे. म्हणून तिचं म्हणणं असं आहे की तू स्वतः कलकत्त्याला जावंस अन् आपल्या नवऱ्याशी मोकळ्या मनानं बोलून घ्यावंस, हेच बरं होईल. मागं तू म्हणाली होतीस, त्यांना भेटून मी सांगणार 'आजवर जे काय झालं ते झालं. ते सारं विसरू या अन् नव्यानं संसार मांडू या.' त्यावेळी चुकून ते तसंच राहून गेलं. आता तो विचार कृतीत उतरवून पाहायला काय हरकत आहे ? तरी तू तातडीनं कलकत्त्याला जाणंच मला योग्य वाटतं इथं नव्या दिल्लीत भूतपूर्व दिवाणसाहेबांच्या दोन मुली होत्या ना ? त्या कलकत्त्याला गेल्या आहेत असं ऐकलंय. त्यामुळे माझ्या काळजीत भर पडलीय्.

ते पत्र वाचून सीतेला वाटलं आता काय धगधगत्या आगीत तुपाचा वर्षावच झालाय...

अस्सं ! तर गोष्टी या थराला गेल्या आहेत का ? पण त्यांच्या तोंडून जर 'ये' निघत नाही तर मी स्वतःच का जाऊन त्यांच्या पायावर लोटांगण घालू ? त्यांनी हव्या त्या कैदाशिणीच्या गळी पडावं. मला त्याच्याशी कर्तव्य काय ? आता मी ती दिल्लीतली भोळी सीता राहिल्ये नाही. मला कुणाच्या पायावर लोटांगण घालायची गरज नाही....

नगराध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिवशी सीतेला आणखी दोन पत्रं आली. त्यांतलं एक चित्राचं होतं...

तू फार बुद्धिमान आहेस असं मी समजत होत्ये. केवढा हा माझा वेडेपणा ! तुझे पतिराज आमच्या घरासमोरच राहतात... सकाळ-संध्याकाळ ते खिडकीत उभे राहून भ्रमिष्टासारखे एकटक कुठंतरी शून्यात बघत असतात. त्यांची ती दशा पाहून माझं मन विरघळून जातं. कितीतरी प्रयासानं माझ्या यजमानांनी त्यांच्याशी गट्टी जमवली आहे. अशीच एक दिवस मी त्यांच्यासोबत तुझ्या घरी गेल्ये अन् तुझ्या लेकीला बघून आल्ये. किती लोभसवाणी पोर आहे ! अशा फुलासारख्या छान पोरीला सोडून तुला राहवतंच कसं ?

अशीच एके दिवशी तुझी वासंती माझ्या घरी आली. माझ्याकडून गप्प बसवलं नाही. मी विचारलं, ' तुझी आई ग कधी येणाराय ? ' तिनं चटकन् उत्तर दिलं, ' माझी आई नाहीच यायची. ' मी विचारलं, ' का ग ? ' ' आई बाबांवर रागावलीय ! ' तिनं उत्तर दिलं... नंतर मी विचारलं, ' तुझं कुणावर प्रेम आहे ? तुला कोण आवडतं ? ' ' मला आई-बाबा दोघंही आवडतात. ' ' पण तू तर तुझ्या बाबांबरोबर राहत्येस. आईला भेटायची इच्छा होत नाही का ?' मी विचारलं, ' का नाही होणार ? भेटायची इच्छा तर आहे, पण काय करू ? बाबा इथं एकटे आहेत. त्यांना एकट्याना सोडून कसं जायचं ? ' तिनं कसं गोड उत्तर दिलं. काय ग सीता, तू या पोरीची जन्मदात्री आईच आहेस ना ?

काही दिवसांपासून समोरच्या घरी दोन फॅशनवेड्या तरुणींची ये-जा फार वाढलीय. तुझ्या नवऱ्याशी खूप वेळ गप्पा करीत बसतात. माझ्या पतीला तर हे मुळीच आवडत नाही. एक दिवस यांनी जाऊन त्यांना विचारलंच, या मुली कोण ?तुझ्या यजमानांनी उत्तर दिलं, ' यांची माझी ओळख दिल्लीपासूनची आहे. ' ' ओळखच का, चांगलीच घसट दिसते ? यांनी कुत्सितपणे म्हटलं. त्यावर त्यांनी उत्तर दिलं, ' ती वाढण्याचा प्रयत्न चाललाय त्यांचा. मला त्या लग्नाच्या जाळ्यात पकडू पाहतात. ' हे एकदम म्हणाले, ' छान ! आंधळा मागतो एक डोळा अन् देव देतो दोन. तुम्ही तरी असे एकट्यानं किती दिवस राहणार ? टाका जुळवून दोघींपैकी एखादीशी ! ' यावर तुझे यजमान काय म्हणाले असतील ? ' ज्या मंदिरात देवीची प्राणप्रतिष्ठा केली तिथं या शूर्पणखेला कसं स्थान देऊ ?'

बाई ग, तुझ्या यजमानांनी अगदी मनापासून तुला तोंडभरून देवी म्हटलंय कळलं का ? तू तर कुठं तरी दडून बसलीस. आता हे दुःख कुणाला सांगावं ?

बरं, सोड त्या गोष्टी. कालपासून वासंतीला ताप आल्याचं ऐकलं. ती म्हणे झोपेत बडबडते, ' आई नाही का हो येणार ? ' तुझ्या हृदयात माया असली तर तातडीनं निघून ये.

तुझी
चित्रा.

या पत्रानं सीतेच्या मनाला धक्काच बसला !

चित्रानं जे लिहिलंय तें खरं असेल का ? की मी यावं म्हणून तिनं मनानंच हे भरकटलंय् ? . . . त्यांनी मला देवी म्हटलं असं चित्रा लिहिते. हे खरं असेल का. . . ? देवा ! माझ्या पोरीचं रक्षण कर ! मी जे काय पाप केलंय त्याची जी काय शिक्षा देशील ती निमूटपणे भोगायला मी तयार आहे. फक्त एवढीच कृपा कर, की माझ्या मुलीचं काही वाईट करू नकोस ! चित्रानं जे लिहिलंय ते खरं असो वा खोटं असो, मला इथून तातडीनं निघायला हवं. आज रात्रीच या लोकांचा निरोप घेतला पाहिजे.

असा विचार चाललेला असतानाच सीतेनं तिला आलेला दुसरा लिफाफा फोडला. त्यात एक छापील कात्रण होतं. दोन दिवसांपूर्वी ललितेला आलेल्या कात्रणाची ती प्रत होती. ललितेला वाचायला मिळालं ते सीतेला का वाचायला मिळू नये ? कुण्या तरी अज्ञात व्यक्तीनं कर्तव्यबुद्धीने सीतेच्या नावावर ते कात्रण पाठवून सुटकेचा निश्वास सोडला असावा. . .

वृत्तपत्राचं ते कात्रण वाचताच सीतेचे डोळे लाल आले. तो अपमान तिला असह्य झाला. धरणी दुभंगून आपल्याला पोटात घेईल तर हे काळं तोंड जगापुढं दाखवावं तरी लागणार नाही. पण आपलं भाग्य कुठं आहे एवढं ? ते भाग्य, आलं होतं जनककन्या सीतादेवीच्या वाट्याला. माझ्यासारख्या पापिणीच्या वाट्याला तें कसं येणार ?

असह्य अन् अनिर्वचनीय अपमानानं सीतेला थोडा वेळ वेड लागायची पाळी आली. हळूहळू तिचं डोकं ताळ्यावर आलं. मग ती विचार करू लागली, ' दोन दिवसांपासून ललितेच्या वागण्यात बदल दिसू लागला तो या कात्रणामुळेच असेल का ? वृत्तपत्रात छापून आलेली ही गलिच्छ बातमी वाचूनही ललितेनं आपल्या घरात राहू दिलं ? तसं असलं तर तीच सीता-सावित्री दमयंती यांच्यासारखी साध्वी आहे. नाही म्हटलं तरी ललितेच्या दृष्टीनं आपण पतिता ठरलो. आता

कसं तोंड दाखवायचं ? पट्टाभिरामन्‌ला तरी कसं तोंड दाखवू ? कुणाला न सांगताच इथून निघून जाणंच बरं. रात्री सर्व मंडळी झोपली की जावं झालं !

त्यावेळी कदाचित्‌ सीतेनं आपल्या कर्तव्याच्या बाबतीत निश्चित पाऊल उचलण्याच्या बाबतीत अळंटळं केली असेलही. मात्र या रात्री घराच्या तळमजल्यावर रात्री दहाच्या सुमारास नवराबायकोत जी बाचाबाची झाली, तिच्यामुळे सीतेच्या मनातील संशय दूर झाला.

आधीच लहानसं घर, त्यात ललिता आणि पट्टाभिरामन्‌ यांच्यात जी बाचाबाची झाली ती चांगल्याच चढ्या आवाजात झाली. त्यामुळे त्यांचा अर्धा-अधिक संवाद तिच्या कानी पडला आणि सीतेला जिवंतपणी यमयातनांचा अनुभव मिळाला.

सीता त्या नवराबायकोच्या झोपी जाण्याची वाट पाहात बसून राहिली. त्यांचं बोलणं थांबल्यावर सुमारे तासभरानं निघून जावं असा तिनं विचार ठरवला.

सीतेचे डबडबलेले डोळे कोरडे झाले. तिच्यावर जे दडपण आलं ते होतं ते नाहीसं झालं. यापुढं कोणता मार्ग स्वीकारायचा याबद्दल विचारमंथन करून तिनं पक्का निर्णय घेऊन टाकला होता. त्यामुळे तिला हलकं वाटत होतं. गेल्या कित्येक दिवसांत तिच्या वाऱ्याला न उभी राहिलेली मानसिक शांती आज तिला लाभली होती.

तिनं आपले कपडे गोळा करून पेटीत भरले. जवळ असलेले सर्व पैसेही पेटीत ठेवून दिले. टेबलाचा ड्रॉवर उघडून आतले सर्व कागदपत्रं फाडून फेकून दिले. अशी सर्व तयारी पूर्ण करून खालच्या मजल्यावर सामसूम होण्याची वाट पाहात बसली. . .

दिवे विझले. सर्व घर सामसूम झालं. . .आता सीतेच्या मनात विचार आला घरातल्या माणसांना कळू न देता, असं घराबाहेर निघून जाणं, बरं दिसेल का ? तिनं कागद-पेन घेऊन ललितेला पत्र लिहायला घतलं. पण दोनचार ओळी लिहून तिनं ते फाडून टाकलं. बरेचदा असं झालं. पत्र लिहून ठेवणं शक्य नसल्याचं लक्षात आलं मग तिनं तो नाद सोडला. हातात पेटी घेऊन तिनं दिवा विझवला अन्‌ पायांचा आवाज न होऊ देता ती सावधपणे जिन्यावरून खाली आली.

खालच्या खोलीत धूसर प्रकाश देणारा निळा बल्ब जळत होता. त्या अंधुक प्रकाशात समोर भिंतीवर टांगलेला एक फोटो दिसला. ते महात्मा गांधींचं

छायाचित्र होतं. त्यावर दृष्टी पडताच सीतेला वाटलं, महात्माजी स्वतः मूर्त स्वरूपात तिथं मंदमधुर स्मित करीत बसले असून आपली करुणामय दृष्टी फिरवून जणू तिला आशीर्वाद देत आहेत. सीतेचं शरीर रोमांचित झालं. तिला तो शुभशकून वाटला. तिच्या बालपणी तिची आई नेहमी म्हणायची, बेटा, या कलियुगात महात्मा गांधी हे साक्षात् ईश्वराचे अवतार आहेत. तिचे शब्द सीतेच्या अंतःकरणात पक्कं घर करून बसले होते.

सीतेनं हातातली बॅग खाली ठेवली. त्या फोटोपुढं साष्टांग दंडवत घातला. नंतर उठून क्षणभर हात जोडून उभी राह्यली. मनोमन प्रार्थना केली, 'बापू, मला आशीर्वाद द्या ! मी आपल्या जीवनात आता ज्या नव्या मार्गाचा अवलंब करत्येय्, त्यावरून निर्धारपूर्वक वाटचाल करण्याचं मनोबळ द्या ! हे करुणामूर्ती बापू ! आपल्या आशीर्वादाच्या बळावरच मी या घरातून एकटीच बाहेर पडत्ये आहे. आता ज्या मार्गावरून मी जाणार आहे त्यावरून चालताना कितीही विघ्नं आली, कितीही संकटांशी सामना द्यावा लागला तरी तुम्हाला आवडणार नाही असं कोणतंच काम करणार नाही. कोणत्याही अवस्थेत कामाच्या आधी मी आपल्या अंतरात्म्याला विचारीन, हे महात्माजींना खपेल का ? तेव्हाच त्याला हात लावीन. आपल्याकडून आश्वासन मिळाल्याखेरीज अशा कामासाठी मी पाऊल उचलणार नाही !'

अशा प्रकारे सर्वतोपरी समजून-उमजून तिनं प्रतिज्ञापूर्वक पुन्हा गांधीजींच्या छायाचित्राला वंदन केलं. मग जमिनीवरून आपली बॅग उचलून दाराकडे गेली. आवाज न होऊ देता तिनं अलगद दार उघडलं अन् घराबाहेर पडली.

पट्टाभिरामन्च्या घरापासून रेल्वे स्टेशन चार फर्लांगावर होतं. सडकेवर येताच तिनं स्टेशनकडे जाणारा जवळचा रस्ता पकडला.

45

सीतेनं कलकत्ता मेलमधून दोन दिवस प्रवास केला. ते दोन दिवस तिला दोन युगांसारखे वाटले. सीता स्त्रियांच्या ज्या डब्यातून प्रवास करीत होती त्या डब्यात कलकत्त्याला जाणाऱ्या काही मद्रासी बायका होत्या. त्यांच्यापैकी एक हावऱ्यात राहात होती. तिच्याशी सीतेची ओळख झाली आणि दोघींची चांगलीच गट्टी जमली.

गाडी नेहमीच्या वेळी हावरा स्टेशनात पोचू शकली नव्हती. त्या दिवशी सकाळपासूनच प्रत्येक स्टेशनात माणसं घोळके करून काही तरी चर्चा करीत होते. गाडीतील प्रवाश्यांमध्ये बराच तणाव दिसून येत होता. पण स्त्रियांच्या डब्यात याची गंधवार्ता नव्हती.

हावऱ्याच्या पलीकडच्या पहिल्या स्टेशनात दुसऱ्या डब्यातून कुणीतरी मद्रासी गृहस्थ बायकांच्या डब्याच्या खिडकीशी येऊन सीतेला विचारू लागले, "तुमच्या सोबत या गाडीत कोणी पुरुष आहे का ? की हावरा स्टेशनात तुम्हाला उतरून घ्यायला कोणी येणारय् ? कलकत्त्यास दंगा सुरू आहे म्हणतात. सांभाळून जायला हवं." तरी या बातमीनं सीता गडबडली नाही.

पण हावरा स्टेशनात गाडीतून उतरताच आपली चूक तिच्या लक्षात आली.

त्या दिवशी १९४६ सालच्या ऑगस्ट महिन्याची १६ वी तारीख होती. कलकत्त्यात जातीय दंगल सुरू होती. कमालीचा विध्वंस सुरू होता. अमानुष हत्याकांड सुरू होतं. जणू सर्व भूत-पिशाच्चं तिथं गोळा झाली होती. त्यांनी बायका, मुलं अन् म्हातारे यांचीसुद्धा गय केली नाही. त्यांच्या मनावर रक्तपाताची अशी काही धुंदी चढली होती की, भयंकर आरोळ्या ठोकत आणि कत्तली करीत ते कलकत्त्याच्या गल्लीबोळांतून भ्रमण करू लागले. त्या आरोळ्यांतून मधूनच अधिक चढ्या आवाजात 'पाकिस्तान जिंदाबाद !' अशा घोषणाही ऐकू येत.

गाडीत गट्टी जमलेल्या सीतेच्या मैत्रिणीला घरी घेऊन जायला तिची आप्तमंडळी स्टेशनात आली होती. शहरात दंगल सुरू असून हावरा पूल ओलांडून कुणी पलीकडे जाऊ शकत नाही, असं त्या लोकांनी सीतेला सांगितलं. सीता एकटी आली आहे असं त्या बाईनं सांगताच त्यांनी सीतेला दंगा थांबेपर्यंत त्यांच्याकडे

राहण्याबद्दल आग्रह केला. दंगा कमी झाला म्हणजे आप्तांचा शोध काढा व घरी जा, असं ते म्हणू लागले. त्याचं बोलणं ऐकून सीतेचा उत्साह पार मावळला. डोकं गरगरू लागलं. तरी थोड्याच वेळात स्वतःला सावरून ती म्हणाली, " नको ! काय व्हायचं तें होऊ दे. मी आजच घरी जाणार. मला काही व्हायचं नाही. "
" तर मग जाऊ शकता. आम्ही तुम्हाला कसं अडवणार ? " ते लोक म्हणाले. सीता बिचकत बिचकत कशीतरी हावरा पुलापर्यंत आली. तेवढ्यात स्टेशनकडे धावत पळत येणाऱ्या एका माणसाच्या लोंढ्यानं तिला ढकलत स्टेशनपर्यंत मागं आणलं. स्टेशनाच्या प्रवेशद्वाराजवळ हावऱ्याची मंडळी अजून थांबलेली होती. त्यांनी तिला आपल्या घरी नेलं.

हावऱ्यात असताना तिच्या मनाला शब्दातीत क्लेश होत होते. आपण एक दिवस आधी का आलो नाही, या विचारानं ती फार दुःखी झाली. आधी यऊन पोचलो असतो तर अशा धोक्याच्या वेळी वासंतीजवळ यांच्या साथीला राहू शकलो नसतो काय ? क्षणोक्षणी नवऱ्याच्या व लेकीच्या सुरक्षिततेच्या काळजीनं तिला रडू कोसळत होतं. हुंदके देत ती रडत बसायची.

कलकत्त्यात चाललेल्या दंगलीच्या बातम्या हावऱ्यात वेळोवेळी मिळत. त्या बातम्यांनी तिच्या मनाच्या घावावर टोचण्या बसून तिच्या वेदनांत भर पडत होती. विशेषतः दूधपित्या अर्भकांना जमिनीवर आपटून आणि विस्तवावर धरून हालहाल करून ठार मारतात, अशासारख्या बातम्यांनी तिच्या जिवाचा थरकाप होत होता. माझ्या पोरीची तर अशी दुर्दशा व्हायची नाही ना, या विचारानं तिचं मस्तक तडकू लागे. तिनं मनोमन हज्जारदा शपथ घेतली, की या संकटातून वासंती बचावली तर यापुढं कोणत्याही कारणासाठी मी माझ्या मुलीला सोडून जाणार नाही. पण त्यांचं कसं असेल ? देवा, त्यांचं भलं कर ! पोरीचं अन् त्यांचं काही वाईट होऊ देऊ नकोस ! पण कुणी सांगावं, आपल्या नशिबात काय असेल ?

सीतेला धड झोप येईना. थोडा डोळा लागला की भयंकर स्वप्नं पडायची. ती किंचाळून उठायची. तिच्या मनाची ही तडफड पाहून घरवाल्यांना वाईट वाटायचं. ते सहानुभूतिपूर्वक वागून तिचं सांत्वन करीत, तिला समजावीत.

हावरा स्टेशनात उतरल्यापासून आठव्या दिवशी ती अमरनाथकडे पोचली. सात दिवस तिनं सोसलेल्या मानसिक यातना भयंकर होत्या... अमरनाथच्या घरात निराश्रित मद्रासी कुटंबांनी आश्रय घेतला होता. अशी दंगलीतून बचावलेली कुटुंबं

सुमारे शंभर असावीत. त्यांपैकी अधिकांश लोकांना सुंदर राघवन्‌नं वाचवलं होतं. तिला हे कळलं तेव्हा तिचा हर्ष उरात मावेना !

राघवन्‌नं प्राणांची बाजी लावून कलकत्त्यातील मद्रासी बांधवांना सहाय्य केल्याच्या आणि अमरनाथनं शरणार्थी मद्रासी कुटुंबांना आश्रय दिल्याच्या बातम्या सीतेनं हावऱ्याला असतानाच ऐकल्या होत्या. अमरनाथच्या बिऱ्हाडी पोचताच तिनं आधी चित्राला शोधून काढलं. सीतेला बघताच चित्रानं तिचं स्वागत केलं, " यावं महाराणी यावं ! आपण आलात ही मोठीच कृपा म्हणायची. आता जाऊन आपल्या पतिराजांचा ताबा घ्या. ते वरच्या खोलीत बिछान्यात पडून आहेत. "

धडधडत्या अंतःकरणानं सीतेन विचारलं, " का बरं, त्यांनी बिछाना का धरला ? काय झालंय त्यांना ? "

" खूपच ताप भरलाय. १०५ अंशावर ताप जाऊन सन्निपात झालाय. तापात काही-बाही बरळतात. गेला आठवडाभर इतके श्रम घेतलेत, की ताप आला-यात नवल नाही. " चित्रानं सांगितलं.

" त्यांच्या जिवाला धोका तर नाही नं ? दुखण्यातून उठतील नं ? " सीतेनं विचारलं.

" तुझ्या अन्‌ तुझ्या लेकीच्या सेवाशुश्रूषेवर ते अवलंबून आहे. त्यांचं जगणं तुमच्या शुश्रूषेनंच शक्य होणाराय, असं डॉक्टराचं म्हणणं आहे....तुझी लेक वासंती फार हुशार पोर आहे बरं ! या सात दिवसांत तिनं मला किती मदत केली म्हणून सांगू ! मोठीच धीराची पोरगी बरं का ? इथं सर्व घाबरून गेले तरी ती घाबरली नाही. अग तिनं न घाबरता, हसून, खेळून उत्साह वाढवीत सर्वांचं जीवन सुसह्य केलं, अशा पतीला व कन्येला इथं तडफडत ठेवून तू देव-पट्टणमला कशी राहू शकलीस बाई ?... बरं ते सोड ! आता जाऊन नवऱ्याला सांभाळ बरं. अग, सांगू तरी काय ? तुझी लेक आपल्या बापाची शुश्रूषा करताना कंटाळत नाही की त्रासत नाही ! खरं बोलायचं तर इथं आलेल्या शेकडो लोकांवर लक्ष ठेवणं अन्‌ तुझ्या पतीची शुश्रूषा करणे, अगदी सारखं आहे. तुझी पोरगी शुश्रूषा करण्याच्या बाबतीत मात्र लहान नाही. चांगली तरबेज आहे. जा बरं, आता लवकर वरच्या खोलीत जा. " असंच आणखी काही काही बोलत चित्रा तिथून लगबगीनं निघून गेली.

उत्कंठा नि काळजी सीतेला पुढं ढकलत होत्या तर विनय नि संकोच मागं खेचत होते. या ओढाताणीत ती कशीतरी जिना चढून वर गेली. अगदी

दर्शनी खोलीत खचाखच माणसं भरली होती. त्यांचा कोलाहल सुरू होता.

माडीवर एका खोलीत मात्र स्तब्धता व शांतता होती. त्याच खोलीत एक खाटेवर राघवन् पहुडला होता. त्याचे डोळे मिटलेले होते. बेशुद्धीत तो काही तरी पुटपुटत होता. त्याच्या उशाशी बसून वासंती कपाळावर अन् डोक्यावर बर्फाची पिशवी ठेवत होती.

सीता दरवाजा उघडून आत आली तेव्हा वासंतीनं मान उचलून तिच्याकडे बघितलं. एकदम तिच्या नजरेत आश्चर्य, आनंद, उत्कंठा, करुणा, क्रोध, आक्रोश, प्रेम अशा शब्दातीत भावनांचा सागर हेलावला. पण तिनं तोंड उघडलं नाही.

सीतेच्या तोंडूनही शब्द उमटला नाही. ती बिचकत खाटेजवळ गेली. तिनं राघवन्च्या पायाला हात लावला. पाय गार होता. मग आणखी जवळ जाऊन त्याच्या तळहाताला स्पर्श केला तेसुद्धा गार लागले. थोडं पुढं सरकून त्याच्या गळ्याखाली छातीवर हात ठेवला. अंग चांगलच कढत होतं. हे चालू असताना वासंती आळीपाळीनं आईच्या अन् बापाच्या तोंडाकडे बघत होती. वासंती भेटल्यावर सीता तिच्याशी काय बोलणार होती, कुणास ठाऊक ! पण त्यासाठी ही वेळ योग्य नव्हती...

" वासंती, बर्फाची पिशवी माझ्याकडे दे बाळ ! तुझे हात दुखतील. " सीतेनं म्हटलं.

" नको आई, माझे हातबीत नाही दुखत. बर्फाची पिशवी ठेवणं तुला ग काय ठाऊक ? पिशवी अशी ठेवायला हवी की ती पूर्ण कपाळावर टेकली पाहिजे. "

" नाही ठावूक तर नसू दे. तू इथं जवळच आहेस ना ? मला शिकव तरी, म्हणजे मी शिकेन. " सीतेनं म्हटलं.

मग ती वासंतीजवळ जाऊन बसली. तिच्या हातून पिशवी घेऊन राघवन्च्या कपाळावर ठेवू लागली, वासंतीचा चेहरा आनंदानं फुलून गेला. ओठावर स्मित आणून तिनं विचारलं, " आई, आता तर तू मला नि बाबांना सोडून जायची नाहीस नं ? "

सीतेचा चेहरा आनंदित दिसू लागला. तिनं लेकीला उत्तर दिलं, " नाही ग बाई, नाही जायची. त्यावेळी तरी कुठं जाणार होत्ये ? निरुपायानं जावं लागलं. म्हणून का तू अन् तुझे बाबा मला न कळवता इथं निघून आलात ?

"आता त्या गोष्टी सोड आई. यापुढं तरी आम्हाला सोडून जाऊ नकोस हं !"

"बरं बाई, नाही जाणार !"

"अग आई, पाच-सहा दिवसांपूर्वी इथं मोठा दंगा झाला. कलकत्त्यात राहणाऱ्या लोकांची सरसकट कत्तल होणार असल्याच्या गोष्टी बोलल्या जात होत्या. त्यावेळी माझ्या मनात एक विचार आला. सांग पाहू, काय विचार आला असेल ?"

"वा ऽग वा ! तू सांगितल्याशिवाय कसं करणार ?"

"मरण्याआधी तुझी भेट घ्यायचीच. तुला भेटल्याशिवाय मरायची इच्छा नव्हती. म्हणून मी निश्चय केला, तुला न भेटता मरावं लागलंच तर आत्मा होऊन तुझयाकडे यायचं. तुला भेटून मगच जायचं !" वासंतीनं सांगितलं.

"असं बोलत नसतात पोरी ! ...काय ग वासंती, यांच्या तब्येतीबद्दल डॉक्टर काय म्हणाले ? कोणता ताप असल्याचं बोलले ?"

"ताप 'शॉक' मुळं आला, असं म्हणाले. दुखणं जिवावरचं आहे, शुश्रूषा चांगली करा, असंही बोलले."

"वासू, तुझ्या बाबांच्या कार्याची लोक एवढी ग का प्रशंसा करतात ? असं काय केलं यांनी ?"

"अग, त्यांनी जे काय केलं ते सारंच्या सारं सांगेन म्हटलं तर रामायण महाभारताएवढा एक ग्रंथच होईल. वानगीदाखल सांगत्ये, तेवढी ऐक दंगेखोरांनी एका घराला वेढून टाकलं अन् दरवाजा उघडा नाहीतर आग लावू अशा धमक्या देऊ लागले. ही घटना बाबांना कळताच त्यांनी काय केलं असेल ? त्यांनी फोनवरून सरकारी अधिकाऱ्याना कळवलं. एका मुसलमानाच्या घरावर हिंदूनी हल्ला चढवलाय....आता नक्कीच पोलीस येतील असं ते बोलले अन् तेवढ्यात ख़रोखरच पोलीस आले. बाबांनी स्वत: पोलिसांना त्या आपत्तीत सापडलेल्या घरी नेलं अन् घरातील लोकांना सोडवून आणलं......"

एवढ्यात राघवन भ्रमिष्टासारखं बडबडू लागला, 'मला काय समजलात ? जरा जवळ तर या, गोळीच घालतो....सुरीचा बदला सुरीनं, बंदुकीचा बंदुकीनं, खुनाचा बदला खुनानं घेईन. समजलात ?....मी काही महात्मा नव्हे !' असं किंचाळत तो उठून बसू लागला. सीतेनं अन वासंतीनं हात धरून त्याला पुन्हा

झोपवलं. आता राघवन्नं सीतेकडे रोखून पाहचलं. पण त्यानं तिला ओळखलं का नाही हे कळू शकलं नाही.

सीतेनं मनोमन प्रार्थना केली, 'देवा ! या दुखण्यात यांना मरण येणार असलंच तर निदान एकदा तरी त्यांना माझी ओळख पटू दे ! मी त्यांच्या-जवळ राहून त्यांची शुश्रूषा करतेय, एवढं तरी त्यांना कळू दे ! कृपाळू होऊन मला एवढा एक वर दे ! '

सीतेनं अगदी मनापासून ही प्रार्थना केली होती. ती आल्यापासून त्याचा ताप उतरत गेला. तापाच्या भरात तो मोठ्यांदा किंचाळायचा. मात्र सीतेच्या हाताचा स्पर्श होताच त्याचं शरीर नि मन शांत होई. हे बघून चित्रानं म्हटलं, ' अग सीता, पूर्वी तुझी काही चूकभूल झाली असेलही. तरी आता तू वेळ साधून आलीस अन् आपल्या पतीचा जीव वाचवलास. आपल्या या कृतीनं तू आपल्या मागच्या पापांचं प्रायश्चित्तच घेतलंस. " हे ऐकताच सीतेचे डोळे भरून आले.

सीता नुकतीच आली होती तेव्हा राघवन् तिच्याकडे सारखा रोखून पाहायचा तरी त्यानं तिला ओळखलं असावं असं म्हणता येत नव्हतं. पण दोन तीन दिवसांनंतर तिला पाहून राघवन्च्या दृष्टीत विस्मय अन् चेहऱ्यावर उल्हास दिसला. हळूहळू तो सीतेशी बोलू लागला. बोलण्याच्या ओघात त्यानं तिला विचारून ती कलकत्त्याला केव्हा आली आणि कुठं राहिली याची माहिती काढून घेतली. हावऱ्याला तिला आपल्या घरी आश्रय देणाऱ्या लोकांची प्रशंसा करून त्यांचे मनापासून आभार मानले.

वासंतीनं विचारला होता तोच प्रश्न थोडा फिरवून राघवन्नं नेमका विचारला, " आता तरी तुझी भ्रमंती संपलीय ना ? आता तर कुठं जायचं नाही नं ? "

" मुळीच नाही ! तेव्हासुद्धा मला कुठंच जायचं नव्हतं. आताही जायच नाहीय् ! " सीतेनं उत्तर दिलं.

" जाणार असलीस तरी वासंतीला सोडून जाऊ नकोस हं ! जाशील तिथं तिलाही सोबत घेऊन जा. " राघवन् म्हणाला.

" वासंतीला तर नाहीच नाही; पण तुम्हालाही सोडून जायची नाही. "

" माझी कशाला काळजी वाटते तुला ? "

सीतेनं काहीच उत्तर दिलं नाही. केवळ उदासवाणे त्याच्याकडे बघत राहिली.

असंच आणखी एके दिवशी राघवन् म्हणाला, " सीता, तुला हे कलकत्ता शहर फार आवडल्याचं चित्राच्या तोंडून ऐकलंय, ते खरं आहे का ? "

प्रसन्न मुद्रेनं सीतेनं उत्तर दिलं, " अगदी खरंय्. मला हे शहर खूपच आवडलंय्. मी खुशीनं इथं राहयला तयार आहे."

" छान ! तू अन् वासंती इथंच राहा. तुम्हाला इथं सोबतही चांगली आहे. मला मात्र हे नगर अगदी नापसंत आहे. इथं नुकतेच जे प्रकार घडले ते बघून या शहरावरचं माझं मन पार उडून गेलंय. मी इथं राहयलो तर माझं डोकं ठिकाणावर राहणार नाही. तब्येतीला थोडा आराम पडताच मी इथून निघून जायचं ठरवलंय्. "

" कृपया आम्हाला वेगळं ठेवायची भाषा बोलू नका ! तुम्हाला हे महानगर आवडत नाही तर मलाही आवडत नाही. तुम्हाला जे ठिकाण पसंत असेल तेच मलाही पसंत पडेल हं ! तर कुठं चलायचा विचार आहे तुमचा ? "

" पंजाबात जाऊन राहयचा विचार आहे. कदाचित् तुला पंजाब पसंत पडणार नाही. "

" का पसंत पडू नये ? आपण दिल्लीला होतो तेव्हाच मला पंजाबात जाऊन तिथली प्रेक्षणीय स्थळं बघायची होती. अमृतसरला शिखांचं अद्वितीय सुवर्ण मंदिर आहे. लाहोरला शालिमारा बाग आहे. भारतातील सर्वात मोठी मशीद तिथंच आहे. पंजाबात गेले तर हे सर्व पाहता येईल. "

राघवन्चा चेहरा एकदम उतरला. तो काकळुतीनं म्हणाला, " सीता, तुला एक विनंती करतो. तू हव्या त्या विषयावर बोलत चल. पण माझ्यापुढं चुकून मशिदीचं नाव काढू नकोस. अंगावर शहारे येतात बघ ! "

सीतेच्या मनात जुन्या स्मृतींनी गर्दी केली. आपण ताजमहाल पाहू, अकबराचा मकबरा पाहू. अशी मनीषा बाळगल्यानं तिला ज्या आपत्तींना तोंड द्यावं लागलं, त्यांची आठवण झाली.

" तोंडाला आलं ते मी बोलून टाकलं. आता मला कुठलंच ठिकाण बघायचं नाही. तुम्ही अन् वासंती सतत माझ्या डोळ्यासमोर असलात की झालं. तेवढंच मला पुरे. "

सीतेच्या तोंडून हे शब्द ऐकताच राघवन्चं हृदय आनंदानं उड्या मारू लागलं. किती दिवसांनी त्याला असा अननुभूत आनंद लाभला !

46

भारताच्या इतिहासात १९४७ सालच्या ऑगस्ट महिन्याला वैशिष्ट्यपूर्ण असं प्रमुख स्थान आहे. हजार वर्षे ज्या भारतानं गुलामगिरीत घालवली त्याच भारताला पंधरा ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य मिळालं. चाळीस कोटी जनता स्वतंत्र झाली. त्यापैकी चौतीस कोटी लोक भारतीय गणराज्याचे आणि सहा कोटी पाकिस्तानाचे नागरिक बनले. अशा प्रकारे विभाजन होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली.

स्वातंत्र्यप्राप्तीचा समारंभ साऱ्या भारतभर मोठ्या उत्साहानं साजरा करण्यात आला. स्वतंत्र भारताच्या दिल्ली या राजधानीत हा समारंभ मोठ्या प्रमाणात झाला. त्या दिवशी सकाळपासूनच जुन्या व नव्या दिल्लीत सर्वत्र गडबड सुरू होती.

सूर्या आणि तारिणी त्या दिवशी संध्याकाळच्या वेळी लोकांची गर्दी, गोंधळ उल्हास व दीपोत्सवाचा देखावा पाहात दिल्लीच्या चांदणी चौकातून फेरफटका करीत होते. दीपप्रकाशात दिल्ली शहर जसे झगमगत होते तसेच त्यांचे चेहरे आनंदाने उजळून निघाले होते.

पूर्वी याच चांदणी-चौकातून पोलिसांना चुकवण्यासाठी सूर्या नि तारिणी वेष पालटून फिरली होती. प्रकाशापासून दूर पळून अंधारात लपाछपीचा खेळ खेळली होते. आता मात्र ती भीती उरली नव्हती. लपाछपीचा प्रश्नच नव्हता. संकोच बाळगण्याचं कारण नव्हतं. सूर्यानं डोक्यावर खादीची टोपी घातली होती. तारिणीनं नारिंगी रंगाची साडी परिधान केली होती. दोघंही हसत खिदळत गप्पागोष्टी करीत रस्त्यानं चालली होती.

" भारत स्वतंत्र झालेला पाह्यचं भाग्य आपल्या आयुष्यात लाभलं याहून मोठं सुदैव कोणतं असू शकतं ?" तारिणीनं विचारलं.

" आपल्यासाठी याहून अधिक भाग्याचा असा एक विषय आहे. तो म्हणजे आपल्या लग्नाचा सोहळा. काय ? " सूर्यानं म्हटलं.

" बघा, आज दिल्ली नगरीतील दीपमालिका आकाशातील तारकासमूहाशी स्पर्धा करीत आहेत. " तारिणी बोलली.

" मी एक बोलतो तर तुम्ही दुसरंच काही बोलता. भारत स्वतंत्र झाल्या-नंतर लग्न करण्याचा आपण निर्णय घेतला नव्हता ? त्याबद्दल तुमचं आता मत काय आहे, एवढंच कृपा करून सांगा. "

" याच चांदणी चौकातून पूर्वी कितीदा .पोलिसांच्या भीतीनं लपून-छपून बिचकत-घाबरत गेलो असू. आपण म्हणायचो, महात्मा गांधी अन् मवाळ काँग्रेस पुढारी भारताला स्वातंत्र्य मिळवून देऊ शकत नाहीत. या सर्वांनी खुर्चीचा मोह सोडून जनतेची चळवळ सुरू करावी. अशी चळवळ करण्याचं सामर्थ्य जर कोणत्या पक्षात असेल तर समाजवादी पक्षातच आहे. पण अखेर स्वातंत्र्य मिळालं ते महात्मा गांधी आणि मवाळ काँग्रेसनेत्यांच्या द्वारेच मिळालं. "– तारिणीनं म्हटलं.

" त्याबद्दल चर्चा कशाला हवी ? स्वातंत्र्य मिळालं. मार्ग कोणताही असो. आता हेच नशीब समजा, की आपल्या लग्नाच्या मार्गातला मुख्य अडथळा दूर झालाय्. " – सूर्या समाधानपूर्वक बोलला.

" भारत स्वतंत्र झालाय् असं तुम्ही खरोखरच समजता का ? " तारिणीनं विचारलं.

" अरेच्चा ! तुम्हाला याबद्दल कसा काय संशय वाटतो ? ' गांधीजींच्या आत्मसामर्थ्याचा विजय झालाय्. ' ' भारत स्वतंत्र झाला !' ' नेहरू-माउंटबॅटन की जय !' असा उद्घोष साऱ्या देशभर सुरू आहे, त्याचं काय ? "

" भारत स्वतंत्र झाला ही गोष्ट खरी तर मग देशाचे दोन तुकडे का बरं झाले ? स्वतंत्र भारतानं स्वेच्छेनं तर हे पाऊल उचललं नाही ना ? "

" भारताचे दोन तुकडे झालेत हे खरं, पण त्यामुळं काय बिघडलंय् ? हे दोन्ही प्रदेश आपापल्या परीनं स्वातंत्र्याचा आनंद उपभोगत राहिले तर त्यानं काय फरक पडतो ? भारताचं विभाजन झालं हेच बरंय्. कुणी कुऱ्हाडीनं त्याचे तुकडे केलेले नाहीत, की बिहारप्रमाणे भूकंप होऊन दोन प्रदेशांत दऱ्या निर्माण झालेल्या नाहीत. भारतभूमी पूर्वी होती तशीच तर आताही आहे ना ? " सूर्यानं विचारलं.

" याबद्दलच मी साशंक आहे. जणू काही भारतमातेचे दोन हात तोडून वेगवेगळे फेकून दिलेत असंच मला वाटतंय्. "

" आता देशाची काळजी पुरे. आजवर तीच चिंता वाहिली. आपल्या लग्नाच्या गोष्टी बोला पाहू ! "

" आपल्या दोघांचं लग्न कसं होणार ? दोघांचा धर्म वेगळा आहे. तुम्ही हिंदू तर मी आहे मुसलमान. "

" हा कसला नवीनच अडथळा शोधून काढलात ? आपल्या दोघांत धर्म कुठून येऊन अडमडला ? मानवधर्म हाच आपला धर्म यावर केवढी चर्चा करून आपण निर्णयावर येऊन पोचलो. तुम्ही कधीतरी मुसलमानी पोशाख घातलात, याच एका कारणासाठी तुम्ही मुसलमान बनूच शकत नाही. "

" कुणाचे आईवडील मुसलमान असतील तर ...? "

" असले तर असू देत ! रजनीपूरच्या राजकुमारीला त्याची चिंता कशाला ?"

तारिणी खदखदून हसली.

" मुसलमान बायकांसारखा पोशाख कधीकधी फार कामी पडतो. तो केला नसता तर मला रजनीपूरच्या राजमहालातून बाहेर पडताच आलं नसतं. रजनीपूरचे राजेसाहेब अन् राजमाता यांनी मला तिथंच ठेवून घ्यायचा आटोकाट प्रयत्न केला. मी अर्ध राज्य मागितलं असतं तरी त्यांनी देऊन टाकलं असतं. पण मी मुसलमान स्त्री आहे हे त्यांना खपलं नाही. म्हणून त्यांनी मला इकडे येऊ दिलं. मी मुस्लीम नाही असं आताही म्हटलं तरी मी रजनीपूरच्या राज्याची राणी होईन.

" नको, नको ! तुम्ही माझ्याच हृदयाच्या सम्राज्ञी बनून राहिलात तरी पुरे ! आपलं लग्न होताच.... "

" सूर्या, तुम्हाला काही लाजलज्जा वाटते की नाही ? अशा हजारो लोकांत का कुठं लग्नाची चर्चा करतात ? " तारिणीनं त्याला झिडकारलं.

तारिणी अन् सूर्या दिल्लीच्या ' टाऊन हॉल ' च्या मागील उद्यानात जाऊन संगमरवरी बेंचावर बसले.

सूर्या आपली जिज्ञासा दाबू शकला नाही. तो ताडकन् म्हणाला, " तारिणी, आपल्या विवाहाची चर्चा हजारो लोकांत व्हावी, हेच श्रेयस्कर ठरेल, असं मला वाटतं. तसा एकान्तात बसून आपण अनेकदा विचार विनिमय करून, भारत स्वतंत्र झाल्यावरच विवाह करण्याचा निर्णय घेतला होता... "

त्याचं बोलणं मधेच थांबवून तारिणीनं म्हटलं, " तुम्ही जरा घोटाळा करताय. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर विवाहाचा विचार करून निर्णय घ्यायचा असं आपण त्यावेळी ठरवलं होतं. अजून तरी माझ्या मनाचं समाधान झालेलं नाही. भारताला स्वातंत्र्य मिळण्यात जरा घाई झाली असं मला तरी वाटतं. "

" यात माझा काय दोष ? फारतर महात्मा गांधींना दोषी धरावं लागेल. या बाबतीत मी काय करू शकतो ?...बरं त्या गोष्टी राहू द्या. आपल्या लग्नात बाधा आणणारी गोष्ट कोणती तेवढं सांगा. "

" तशी एक बाब आहे. माझ्या आई-वडिलांविषयी संपूर्ण माहिती मिळत नाही तोपर्यंत मी लग्न करू इच्छीत नाही. "

" तारिणी खात्रीनं तू रजनीपूरच्या राजाची मुलगी आहेस ! "

" हे मी कसं सांगू ? रजनीपूरची राजमाता म्हणते, तू राजकुमारी आहेस. रझिया बेगमनं आधी हे कबूल केलं नाही. मात्र आता म्हणते, की खरं आहे. तरीसुद्धा मी राजकुमारी नव्हे, असं माझ्या हृदयात सतत कुणीतरी म्हणत असतं. "

" तारिणी आता मला हृदयावरचा भार हलका झाल्यासारखा वाटतंय ! तुझ्या मनाचा कौल नेहमीच खरा असतो असं मला दिसून आलं. याबाबती-तही तुझ्या मनाची ग्वाही खरी ठरेल, असं मला वाटतं. "

" सूर्या, कधीकधी माझ्या कानात एक विचित्र विचार डोकावतो बघ. सीता म्हणजेच मी असं समजून रजनीपूरच्या राजाची माणसं तिला उचलून घेऊन गेली ना ? त्यावेळी सीतेचं काय झालं हे समजून घेण्यासाठी मी रजनीपूरला गेल्ये होते. सीतेची चेहरेपट्टी अगदी माझ्यासारखीच असल्यानं गल्लत झाली असं ती मंडळी बोलली. हे खरं का ? तसं असेल तर आम्हा दोघींच्या तोंडा-वळयात एवढं साम्य असण्याचं कारण काय ? तुम्हाला याचा काही अंदाज करता येतो ? "... तारिणीनं विचारलं.

सूर्या विचारात पडला... रजनीपूरच्या माणसांनी अशी कशी चूक केली ? कदाचित् त्यांच्या या संभ्रमात तारिणीच्या जन्माचं रहस्य लपलं असेल का ? असं कोणतं बरं रहस्य असेल ?... सूर्याला अंदाजच लागेना.

त्याच्या मौनाचा भंग करीत तारिणीनं म्हटलं, " सुंदर राघवन् आणि सीता आता किती आनंदात आहेत हे तुम्हाला कळलं असतं तर तुमचं हृदय आनंदानं भराऱ्या मारू लागलं असतं. "

" हे तुला कसं कळलं ? प्रत्यक्ष डोळयांनी पाहून आल्यासारखं बोलत्येस."

" मग काय तर ? पंजाबात जाऊन त्यांना बघून आल्ये म्हणून तर म्हणत्ये. "

" काय ? तू पंजाबात जाऊन आलीस ? केव्हा गेली होतीस ? खरंच का सीता आनंदात आहे ? "– सूर्यानं अपार कौतुकानं विचारलं.

" मामेबहिणीचं नाव उच्चारताच तुम्हाला केवढा उल्हास वाटतो ? "– तारिणीनं तेवढयाच आश्चर्यानं विचारलं.

"खरं तर माझ्यापेक्षा तुलाच तिच्याबद्दल अधिक ओढ दिसते. मी काही अद्याप तिला जाऊन भेटू शकलो नाही. तू तर तिला भेटूनही आलीस."

"सीतेविषयी माझ्या हृदयात एवढं प्रेम कुठून आलं, हे मलाच कळत नाही."

"तारिणी तू काय सीतेच्या प्रेमामुळं तिला भेटायला पंजाबात जाऊन आलीस ?"

"मुळीच नाही ! जेव्हा मी पंजाबात जायला निघाले तेव्हा त्यांना भेटण्याचा विचारही मनात आला नव्हता. या वर्षाच्या सुरुवातीपासून मी आपलं इतिहास-संशोधन कार्य पुन्हा हाती घेतलं. मैत्रीण निर्मला हिला घेऊन रावळपिंडीजवळ असलेल्या तक्षशिलेला गेल्ये होत्ये. तिथं आम्ही इतक्या आश्चर्य-जनक गोष्टी पाहिल्या, की त्यावर एक ग्रंथ सहज लिहिता येईल. परत येताना आम्हाला हुशंगाबादेवरून यावं लागलं. तिथं उतरून त्यांना भेटल्याशिवाय राहवलं नाही. सीता, राघवन् अन् वासंती किती आनंदात आहेत म्हणून सांगू ! वासंतीचे गाल काश्मीरी गुलाबासारखे गुलाबी झालेत. तिचा गोंडस चेहरा नजरेआड होत नाही. सीतेनंही अंग धरलंय्..."

"राघवन्सुद्धा अंगात भरलेत. गेल्या वर्षी याच सुमारास मृत्यूच्या दारी जाऊन परतले. आता तशी काहीच लक्षणं दिसत नाहीत."

सूर्याच्या तोंडून हे ऐकून तारिणी आश्चर्यचकित झाली. तिनं त्याच्यावर प्रश्नांचा वर्षाव केला, "तुम्ही त्यांना बघितलंत का ? कुठं अन् केव्हा बघितलंत ?"

"आजच !"

"आजच बघितलंत ? तर मग दिल्लीतच बघितलं असेल ? ते एकटेच होते की सीताही सोबत होती ?"

"एकटेच भेटले. सीतेला सोबत आणलं नाही, असं बोलले. सरकारी नोकरीची लालूच त्यांना ओढत इथं घेऊन आली. आता नव्या दिल्लीत स्वतंत्र भारताचं नवं सरकार स्थापन होणाराय् नं ? आपली गेलेली जुनी नोकरी परत मिळवायची इच्छा दिसली. त्याच खटपटीत ते गेला अेक आठवडा दिल्लीत आहेत."

"अग बाई ! केवढा हा अनर्थ ! तरीच मला दोन दिवसांपासून वारंवार सीतेची आठवण होतेय्. आता कारण कळलं. सूर्या, राघवन् कुठं उतरलेत ? मला त्वरित भेटायला हवं त्यांना !"

" तू त्यांना त्वरित भेटू शकणार नाहीस. आजच सकाळच्या गाडीनं त्यांनी कलकत्याला प्रयाण केलंय. नोकरीसंबंधीची त्यांचे काही कागदपत्र कलकत्त्यासच आहेत म्हणे. तीच आणायला गेलेत...पण तारिणी तुला एवढं घाबरायला काय झालंय ? "

" काय ते कळत नाही. पण सूर्या, मला वाटतं, सीतेवर काहीतरी आपत्ती येणार ! तिला वाचवण्यासाठी आपल्याला आताच इथून निघायला हवं. "

" काय हा वेडेपणा ! "

" हा वेडेपणा नव्हे बरं. रावळपिंडीला दंगा झाला तेव्हा मी पंजाबातच होत्ये. तिथल्या भीषण हत्याकांडाची आठवण येताच अंगावर भीतीनं शहारे येतात. तिकडनं येणारे म्हणतायत, पंजाबात रावळपिंडीच्या हजारो पुनरावृत्त्या होतील. आपल्या पक्षातील कितीतरी कार्यकर्ते एवढ्याचसाठी इकडे निघून आलेत. "

" तसं काही असतं तर राघवन्‌ला त्याची कल्पना नसती का ? मग ते सीतेला तिथंच एकटी सोडून इकडे कसे आले असते ? "

" तुम्ही मला वेडी म्हटलंत. पण वेडे ते आहेत. पंजाबातील शिखांच्या केसालाही कुणी धक्का लावू शकत नाही, असा त्याचा दृढ विश्वास आहे. म्हणून त्यांनी शिखांच्या वस्तीत घर घेतलंय. पण हा त्यांचा निव्वळ भ्रम आहे. सूर्या, तुम्ही मला सोबत करणार का नाही ? नाहीतर मी एकटीच निघून जाईन. "

" तारिणी, मी तुला कितीदा सांगितलं, की तुझ्यासोबत नरकातसुद्धा यायची माझी तयारी आहे. पण सीतेच्या बाबतीत दखल देणं कितपत उचित आहे याचा फेरविचार करायलाच हवा. जेव्हा जेव्हा आपण सीतेच्या भानगडीत पडलो तेव्हा तेव्हा तिला आपत्तींना तोंड द्यावं लागलंय. "

" कुणी सांगावं ? कदाचित त्याचं प्रायश्चित्त घेण्याची संधी आली असेल ! " असं बोलून तारिणी झपाझप चालू लागली. सूर्यादेखील तिच्या सोबत चालू लागला.

मध्यरात्र व्हायला आली होती. हातात 'ट्रिब्यून' वृत्तपत्र घेऊन सीता बसली होती. थोडा वेळ वाचन, मग थोडा विचार, मध्येच घड्याळात पाहणं, पुन्हा वाचन, असा क्रम सुरू होता. रात्री झोप आली नाही म्हणजे सीता एखादं पुस्तक किंवा वृत्तपत्र घेऊन वाचायला लागायची. मग तिला न वाचू देता झोप नेमकी तिला घेरायची. तिला ही सवयच पडली होती. पण त्या दिवशी खूप वेळ पानं उलटूनही तिला झोप आली नाही. तिचं मन सचिंत झालं होतं.

हुशंगाबाद शहराच्या एका टोकाला तिचं एकटंच घर होतं. घराच्या-भोवती भिंत असून अंगणात छोटीशी बाग सजवली होती. बंगल्याच्या वरच्या मजल्यावरील आपल्या शय्यागृहात सीता एकटीच बसली होती. जवळच्या पलंगा-वर वासंती गाढ झोपली होती. वासंतीच्या सोबतीचा का आधार म्हणायचा ? पहाऱ्यावर एक शीख शिपाई होता. तो रात्री आठ वाजता जेवायला घरी जायचा अन् नऊ-साडे नऊला परत यायचा. पण त्यादिवशी, का कुणास ठावूक परतला नव्हता. वृत्तपत्रांत प्रकाशित झालेल्या बातम्यांशी त्याच्या न येण्याचा काही संबंध असेल का ?...

पलंगावर झोपलेल्या वासंतीकडे सीतेची नजर गेली. . . .पोरीचे गोबरे गाल कसे सफरचंदासारखे दिसत होते. पापण्या मिटून गोड झोपेत असलेली पोर कशी शांत वाटत होती. पंजाबात आल्यापासून पोरीनं चांगलंच अंग धरलं होतं. एकाच वर्षात पोरगी किती वाढलीय !

वाहवा ! या प्रदेशातील निसर्गसौंदर्याबद्दल बोलावं तरी काय ? वसंत ऋतूचा महिमा आपल्याकडेही सांगितला जातो. मात्र तिथं वसंताचं असं बहारीचं रूप कुठं पाह्यला मिळतं ? पुस्तकातून केवळ लांबलचक वर्णनं तेवढी वाचून घ्या. उलट इथं फेब्रुवारीच्या पंधरा तारखेलाच वसंतागमाचा सोहळा बघायला मिळतो. एकच दिवस आधी पर्णहीन असणाऱ्या झाडांना नेमकी पंधरा तारखेला लाल पालवी दिसू लागते. हळूहळू तिचा रंग बदलतो, पानं मोठी होतात. जिकडे बघावं तिकडे पाचूच्या हिरव्या रंगाची पखरण झालेली दिसते.

फेब्रुवारीच्या १४ व्या तारखेला ओसाड वाटणाऱ्या माळरानात दुसऱ्या दिवशी इवलाल्या पिवळ्या रंगाच्या फुलांची शेज केल्यासारखी दिसते. निसर्गाची ही जादू बघतच राहावी ! एकाएकी धरणीमातेला उल्हासाचं भरतं येतं. मग ती जे अनहृत हास्य उधळते त्याचं काय बरं वर्णन करावं ?

अशा या सुंदर प्रदेशातून का बरं जायचं ?

पंजाबात आल्यापासूनचे दहा महिने सीतेच्या आयुष्यातील उत्कट आनंदाचे होते. ईर्ष्या नाही की द्वेष नाही, मोह नाही की मत्सर नाही, शत्रू नाहीत किंवा मित्रही नाहीत, अशी ती आपल्यातच पूर्णपणे गुरफटून गेली होती.

असं हे आनंदमय जीवन किती दिवस वाट्याला येणार कोण जाणे ! त्या अपशकुनी दिल्लीला परत जावं लागलं तर कसं व्हायचं ? यांच्या डोक्यात हे सरकारी नोकरीचं भूत पुन्हा कुठून शिरलं ? कुणी काही म्हणो, पुरुषाचं वागणंच असं विचित्र ! घरात चांगलं सुखशांतीचं साम्राज्य नांदत असलं तरी त्यांना तेवढं पुरेसं वाटत नाही. गर्दी, गडबड, थाटमाट अन् अधिकार यांच्या- मागं धावत असतात. नाहीतर याच पंजाबात नव्यानं आलो तेव्हाचा तो उत्साह कुठं गेला ? तेव्हाचं हसणं-खिदळणं, खिलाडूपण हळूहळू का कमी व्हावं ?

दहा दिवसांपूर्वी यांनी अचानक एक बॉम्बगोळा टाकला...

"सीता, या पंधरा तारखेला भारताला स्वातंत्र्य मिळेल. आता मला माझी जुनी नोकरी पुन्हा मिळू शकेल. आपण क्रांतिकारकांना आपल्या घरात आश्रय दिला म्हणून माझी नोकरी गेली होती. आपण स्वातंत्र्य–लढ्यात सहयोग दिलाय्. सीता तुला एक सत्य सांगतो. काहीही म्हण पण सरकारी नोकरीपुढं खासगी कंपनीतील नोकरी म्हणजे काही नव्हे. हजार रुपये कमी मिळोत, सरकारी नोकरीची मजा काही दुसऱ्या नोकरीत नाही."

"शंकाच नको ! सरकारी नोकरी चांगलीच असते. मिळाली तर कोण ती ठोकरणार ?"– सीतेनं म्हटलं.

"अग, पण अशी सरकारी नोकरी काही आपल्याला शोधत यायची नाही. आपल्यालाच तिच्या शोधासाठी जावं लागेल. दिल्लीला जाऊन प्रयत्न करावा लागेल. आता गेलो तर काम साधून जाईल. परतायला पंधरा दिवस तरी लागतील."

राघवन् दिल्लीला निघून गेला. त्यानंतर दोनच दिवसांनी भामा अचानक सीतेकडे आली. पूर्वी सीतेचा तिच्यावर फार राग होता. आता तिच्या अंतःकरणात

रागद्वेष यांना जागाच राहिली नव्हती. चुकून कधी क्रोध फणा वर काढू लागलाच तरी ती देवपट्टणम्‌वरून निघताना महात्मा गांधींच्या फोटोपुढं केलेल्या प्रतिज्ञेचं स्मरण करायची. पटकन् राग शांत होऊन जायचा. त्यामुळेच सीतेनं भामाचं प्रेमपूर्वक स्वागत केलं. भामासुद्धा पूर्वीची भामा राहिली नव्हती. तिच्या स्वभावात चांगलाच बदल झाला होता हे पाहून तर सीतेला खूपच आनंद झाला.

राघवन् तातडीनं दिल्लीला निघून जायचं आणखी एक कारण भामाशी झालेल्या गप्पागोष्टींतून सीतेला कळून आलं. राघवन् ज्या कंपनीत नोकरीला होता ती कंपनी पंजाबमधील आपला कारभार गुंडाळणार होती. कारण पंजाब पाकिस्तानात सामील झाला तर धंद्याचा विकास खुंटणार होता.

त्याच संबंधात निर्णय घेण्यासाठी भामाचे वडील लाहोरला आले होते. भामा त्यांच्याच सोबत आली होती. अशा अवस्थेत राघवन्‌चा पुढं काय करायचा विचार आहे, हे जाणून घेण्यासाठीच भामा हुशंगाबादला आली होती.

सीतेकडे ती आणखी काही दिवस थांबली. तिनं पंजाबमधील परिस्थिती गंभीर असल्याचं सांगून राघवन् एकटीला सोडून गेल्याबद्दल तक्रार केली. सीतेला आपल्या सोबत चलण्याचा आग्रह केला. सीता कबूल झाली नाही. म्हणून राघवन् परत येईपर्यंत सीतेच्या सोबतीला तिथंच राहण्याचा निर्धार तिने व्यक्त केला. पण ऑगस्टच्या पंधरा तारखेला वडील आपली काळजी करीत असतील, तेव्हा मला जायला हवं, अशी सबब सांगून ती निघून गेली.

भामा निघून गेल्यावर सीतेला एकाकीपण असह्य झालं. भामा जाऊन चार दिवस उलटले होते. राघवन्‌चं पत्रंही आलं नव्हतं. . तिला वाटलं आपण हट्ट करून राघवन्‌सोबत निघून जायला हवं होतं. निदान थोडी गळ घालून भामाला तरी थांबवून घ्यायला पाहिजे होतं. ते तरी बरं झालं असतं. वर्तमान-पत्रातल्या बातम्यांवरून दिवसेंदिवस परिस्थिती अधिक गंभीर होत असल्यासारखं दिसतं. कुठं काय होईल याचा नेम नाही. साऱ्या पंजाबात ज्वालामुखी धुमसतोय म्हणे. याचा अर्थ काय बरं असेल ?

दिवा मालवून सीता बिछान्यावर पडली... घड्याळात बाराचे ठोके पडले... बारावा ठोका हवेत विरल्यावर सर्व घरात भयाण शांतता पसरली. तीसुद्धा फक्त मिनिटभर. त्यानंतर लांबून गलबला ऐकू येऊ लागला. क्षणाक्षणाला आवाज वाढू लागला. जवळ येऊ लागला... समुद्राच्या लाटांसारखा आवाज !

छे, छे ! भलताच काही भ्रम होतोय्. आपला तो जुना रोग तर पुन्हा डोकं वर काढत नसेल ना ? अलीकड पाच सहा महिन्यांपासून वारंवार असे आवाज कानात घुमतात. आपल्या कानातच काही दोष निर्माण झाला असावा, असं राघवन् म्हणतात ते तर खरं नसेल ?

कानावर पडणारे आवाज क्षणाक्षणाला वाढतच होते हा सारा भास असेल का ? त्या भासापासून सुटण्यासाठी ती बिछान्यातून उठून खिडकीजवळ येऊन उभी राहिली अन् बाहेर पाहू लागली. .

नेहमीच शहरात रात्रभर दिवे जळत असायचे. पण केवढं आश्चर्य ! त्यावेळी का कुणास ठावूक, एकही दिवा नव्हता. गुडुप्प अंधार होता. कदाचित वीज गेली असेल !

कुठून तरी बिगुलाचा आवाज आला. उत्तरादाखल दुसरा बिगूल वाजला. एक कुत्रा जोरजोरात भुंकू लागला. मग ‘ ढम् ढम्, ढमाढम् ’ असा नगाऱ्याचाही आवाज येऊ लागला.

सीता आपादमस्तक शहारली... क्षणात ती सावरली. भ्यायचं कशाला ? पोलिसांनी बिगूल फुंकले तर त्यात कसलं नवल ? कुत्र्यानं भुंकू नये तर काय करावं ? शिखांच्या गुरुद्वारात नगारा वाजत असेल, यात घाबरण्यासारखं काय आहे ? . . .

अचानक सीतेच्या मनाला एक भयंकर शंका चाटून गेली. दोन अज्ञात डोळे आपल्याकडे रोखून बघतायत असं तिला जाणवलं. पण कुठून बघत असतील ? खोलीतून की बाहेरून, हे तिला कळेना. तिनं झटक्यानं आपली दृष्टी दुसरीकडे वळवली.

‘ माझ्या डोक्याला आज झालं तरी काय ? अगदी काम करीनासं झालंय् ! हे वेडेपणाचं पूर्वलक्षण तर नव्हे ?... हे केव्हा येतील कळत नाही...’ असा विचार करीत सीता खिडकीजवळून बाजूला झाली अन् बिछान्यावर येऊन बसली. बिछान्यावर पडता पडता तिनं उशीच्या बाजूला हातानं चाचपलं. हाताला टॉर्च अन् रिव्हॉल्वर लागलं. गेल्या दहा महिन्यांपासून टॉर्च आणि रिव्हॉल्वर उशाशी घेऊन झोपण्याची राघवन्‌ला सवयच जडली होती. त्याला कधी बाहेरगावी जावं लागलं तर या वस्तू हाताशी ठेवण्याची तिलाही त्याने सूचना देऊन ठेवली होती. सीता त्याच्या आज्ञेचं ततोतंत पालन करायची. वास्तविक रिव्हॉल्वरचं तिला काय काम पडणार होतं ? तिला शत्रूच कुठं होते ?

" अय्या ! ही कसली चाहूल बरं ? अं ? कुणीतरी शेजारच्या झाडावर चढतंय् वाटतं. 'सर् सर् ! " खात्रीनं कुणी तरी चढतंय्. कोण बरं असेल ? चोर, डाकू, का खुनी इसम ? शीख पहारेकरी तर नसेल ? छे ! पहारेकरी कशाला झाडावर चढेल. . . .

'' अग बाई ! हा धटिंगण तर मेला उडी मारून बाहेरच्या व्हरांड्यात उतरला. स्पष्ट आवाज आला. शंकाच नको. आता तो काय करील ? "

व्हरांड्याकडील खिडकीतून एक आकृती दिसली. काळी आकृती खिडकीजवळ येऊन उभी राहिली.

अरे देवा ! बायकांनी पुरुषांपासून वेगळं राहणं केवढं धोक्याचं आहे ? नको ग बाई. आजची ही वेळ टळली तर पुन्हा एकटी राह्यची चूक करणार नाही... पण हे संकट टळेल का ?

सीतेचं हृदय इतकं धडधडू लागलं की तिच्या कानात सतत घुमणारा लाटांचा आवाज त्या आवाजानं दबून गेला. घड्याळाची 'टिक् टिक' अन काळजाची 'धक् धक्' यांची जणू स्पर्धा सुरू झाली. अंगाला दरदरून घाम आला. अंग थरथर कापू लागलं. थरथरणाऱ्या हातानंच अंधारात चाचपडून तिनं पिस्तुल उचललं...

" सीता ! सीता ऽ ! ऊठ. ओरडू नकोस ! " कुणाचा तरी दबलेला आवाज आला.

अय्या ऽ ! कुणाचा बरं हा आवाज ? ओळखीचा वाटतो. त्या आवाजानं शरीर रोमांचित का बरं झालं ?

सीतेनं रिव्हॉल्वर खाली ठेवलं. टॉर्च उचलला. त्याचं बटण सरकावलं. खिडकीबाहेर उभ्या असलेल्या पुरुषाकृतीवर प्रकाशझोत पडला.

टॉर्चच्या उजेडात ती आकृती बघून सीतेला भिती न वाटता विस्मय वाटला.

त्या दाढीवाल्या मुसलमान व्यक्तीला तिनं यापूर्वीच एक दोनदा पाहिलं होतं.

" सीता टॉर्च बंद कर. लवकर दार उघड. वेळ उरला नाही. चल घाई कर. "

सीतेनं टॉर्च विझवला. गप्पकन् अंधार पडला. त्या अंधारात पुन्हा तिच्या उरात भीती संचारली तरी धीटपणानं ती खिडकीजवळ गेली.

'' दार उघड पोरी ! दार उघड. " अंधारातून आवाज आला.

" कोण आहात आपण दार का उघडायचं ? घरात कुणी पुरुष नाही."

" मला माहिताय् ! म्हणून तर धडपडत आलोय्. मला ओळखलं नाहीस पोरी ? "

" कोण बाबा ? '

" होय बेटा. मीच तो. आणखी अर्ध्या तासात इथं भीषण दंगा होणाराय्, मानवी रक्ताची तहान लागलेली भूतपिशाच्च इथं येऊन नंगानाच करणार आहेत... "

" हाय रे दैवा ! कोण आहेत ते ? "

शेजारच्या भिंतीआडून स्त्रीची एक आकृती पुढं आली.

" गलबला करू नकोस. सारं काम बिघडून जाईल. ही तुझी सावत्र आई. तुझ्या संरक्षणासाठीच इथं आलीय्. "

त्या स्त्रीनं मध्येच तोंड खुपसलं, " मुळीच नाही ! हिला वाचवायला नाही आल्ये मी. ही मेली कृतघ्न आहे. मी आल्ये ती माझ्या नातीच्या रक्षणासाठी. तुमची ही बेअक्कल पोरगी तुम्हालाच लखलाभ असो. काय ग बये, दार उघडत्येस का नाही ? का घेऊ तुझा जीव याच सुरीनं ? '

ती कोण हे त्याच क्षणी सीतेच्या ध्यानात आलं. आता दार उघडायला विलंब लावण्यात अर्थ नाही. आता आपल्यावर आपत्ती येणार अन् ही दोघं आपल्याला वाचविण्यासाठीच आली आहेत, याबद्दल तिला शंका उरली नाही. थरथरत्या हातानं तिनं दाराची चिटकनी उघडली. दुसऱ्याच क्षणी दार लोटून ते दोघं आत आली.

" बाबा, तुम्ही हा कसला अवतार करून घेतलात ? अन् यावेळी इथं कसे... ? "

सीतेचं वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच रझिया बेगम म्हणाली, " वेळेची काय गोष्ट करत्येस ? वेळ साधूनच आम्ही आलोत. तुझ्या बापाचं तुझ्यावर किती जिवापाड प्रेम आहे हे तुला आता दिसेलच. तुझ्या काळजीनं यांनी रात्रीच्या रात्री जागून काढल्या. दिल्लीवरून मलाही इथं ओढून आणलंन्. सध्या इथंच बस्तान मांडलंय्."

सीतेच्या वडिलांनी म्हटलं, " एक महिना फुकट गेला. आता मात्र वेळ दवडायला नको. कालपर्यंत इथं असं काही घडेल याची मलाही कल्पना नव्हती. कालपासून अख्खा पंजाब पेटून उठलाय्. माणूस इतका अमानुष बनू शकतो असा विचारदेखील मनात कधी डोकवला नव्हता. पण तसे प्रकार घडत आहेत. आणखी अर्ध्याच तासात साऱ्या शहराला नरककळा येईल. इथं नावालासुद्धा

शिखांचा व हिंदूंचा बच्चा जिवंत राहील, याबद्दल शंका वाटते. तुला अन् तुझ्या मुलीच्या बचावाचा एकच मार्ग उरलाय्. आमच्यावर विश्वास ठेवून तुला आताच इथनं निघायला हवं. आधी पोरीला हिच्या स्वाधीन कर. त्यानंतर तू माझ्यासोबत..."

"नाही बाबा. मी येणार नाही. पोरीला पाठवत्ये हवं तर. माझ्या शोधात हे इथं येतील तर..."

"मूर्ख पोरी, तुझा नवरा महामूर्ख आहे. अशा गंभीर परिस्थितीत तुला एकटी सोडून कुठं तरी निघून गेला अन् आता तर इथं नरकाची दारं सताड उघडली आहेत." मौलवी बोलले.

एवढ्यात दुरून कुठून तरी किकाळ्या ऐकू आल्या. काळ्या आकृती हातात मशाली घेऊन इतस्ततः धावताना दिसू लागल्या.

"सीते, आता एका मिनिटाचा उशीर नको. पटकन् पोरीला जागी कर.'

सीता विचार करीत बिचकून तशीच उभी होती.

"सीता, तुझं पालनपोषण करून वाढवणारा तुझा बाप आहे मी आणि माझ्यापेक्षा कितीतरी पटीनं तुझ्यावर माया करणारी ही रझिया आहे. हिच्यावर विश्वास ठेव अन् आपल्या पोरीला चटकन् तिच्या स्वाधीन कर पाहू."

"तू अन् हे तुझे वडील याच शहरात राहून मृत्यूच्या दाढेत सापडलात तरी मी तुझ्या नवऱ्याला कुठूनही शोधून काढून या पोरीला अगदी सुरक्षित त्याच्या स्वाधीन करीन. तू मुळीच काळजी करू नकोस."

"सीता लडखडत्या पावलांनी पलंगाकडे धावली. काही न बोलता तिनं पोरीला हलवून जागं केलं. वासंती खडबडून उठून बसली. डोळे उघडून भयभीत दृष्टीनं समोर उभ्या असलेल्या व्यक्तींकडे पाहू लागली.

"वासंती, तुझ्या बाबांची प्रकृती बिघडली म्हणे. आपल्याला आताच दिल्लीला जायचंय्–" सीतेनं सांगितलं.

"बरं आई, ही मी तयार आहे.–" असं बोलून वासंती पलंगावरून उडी मारून खाली उतरली.

"ये माझ्या पिल्या !' असं म्हणून रझिया बेगमनं तिला उचलून घेतलं.

"अय्या ! तुम्ही होय ? अग आई, मी यांना ओळखत्ये, एक दिवस किनई यांनी मला सफरचंद घेऊन दिलं अन् माझा मुका घेतला होता."

"होय ग सोने ? तुला चांगली आठवण दिसते."

" तुम्ही दिल्लीला येणार ? " वासंतीनं विचारलं.

" हो नं ! मीसुद्धा दिल्लीला येणाराय्–" रझिया बेगमनं उत्तर दिलं.

" वासंती, तू आईचं ऐकणारी शहाणी मुलगी आहेस नं ? आता तू या आजींच्या सोबतीनं स्टेशनवर जायचं. मी दारं बंद करून कुलूप लावत्ये अन् मागाहून या आजोबांबरोबर येते हं – कळलं ? "–सीतेनं म्हटलं.

" कळलं ! अन् आई खोटं बोलत्येय् हे पण कळलं. मी हुशार मुलगी आहे नं ? आई, तू खोटं ग का सांगत्येस ? " वासंतीनं विचारलं.

तिघंही थक्क होऊन स्तब्ध उभी राहिली.

" अग आई, मी केव्हाची जागीच होत्ये. तुमच्या सर्व गोष्टी ऐकत होत्ये. गाढ झोपेत असल्याचं सोंग करीत होत्ये. "

" अस्सं ? बरं आता सांग, तू आजीबरोबर जाणार ना ? "

" मी जात्ये. तूसुद्धा मागोमाग ये एवढं सांगून जात्ये. बाबाना एकट्याना टाकून जाणं ही आपली चूक असली तर तुझं अिथं एकटं राहणं ही त्याहून मोठी चूक ठरेल आई–" वासंतीनं म्हटलं.

" अगदी बरोबर ! केवढं अचूक बोललीस बेटा ! " रझियानं वासंतीला दोन्ही हातांनी जवळ ओढून तिच्या कपाळाचं चुंबन घेतलं.

" आई येणार नसली तर मी पण यायची नाही ! "

" बरं बाई ! दुसरा उपायच नाही. देवाची जशी इच्छा. तो दाखवील त्या मार्गानं जायचं. येईन मी. "–सीतेनं म्हटलं.

आतापर्यंत दूर चाललेला गलका जवळ येऊ लागला. . .

मौलवींनी वासंतीला म्हटलं, " तू तर फार हुशार मुलगी आहेस न वासंती ? आपण सर्वांनी एकदम जाण्यात धोका आहे. आधी तू नि आजी अिथून निघून जा. पंधरा मिनिटांनी तुझ्या आईला घेऊन मी आलोच बघ. "

" बरं ! " वासंती कबूल झाली.

पुढल्याच क्षणी रझिया बेगम अन् वासंती जिन्याच्या पायऱ्या उतरून लगबगीनं निघून गेल्या.

" बरं बाबा, आता आपण काय करायचं ? जायचं नक्की नं ? "

" नाही बेटा, आपण आताच अिथून जाऊ शकत नाही. कुणी निसटून जाऊ नये म्हणून शहरभर कडक पहारा ठेवण्यात आलाय्. पहाऱ्याची जबाबदारी

स्वीकारणाऱ्यांत मीसुद्धा आहे. आता मी पहारा करीत आपल्या ठराविक जागेवर जाऊन बसेन. काही वेळानं अत्याचाराला सोकावलेले ते नरपिशाच्च या घरावर हल्ला चढवतील, त्या सर्वांच्या पुढं मी इथं येईन. त्यावेळचं माझं वागणं पाहून तू आश्चर्य करू नकोस. घाबरून जाऊ नकोस. मी सुरी घेऊन अंगावर आलो तरी भ्यायचं नाही. जमल्यास भीतीनं बेशुद्ध पडल्याचा देखावा करायचा..."

दंगेखोरांचा गलबला आणखी जवळ ऐकू येऊ लागला. जिथं–तिथं आगी लावण्यात आल्या होत्या. घरं जळत होती. जळत्या घराच्या उजेडात हातात सुऱ्या, कुऱ्हाडी, अशी प्राणघातक शस्त्रे घेऊन गोंधळ घालीत इतस्ततः धावणाऱ्या काळ्या मनुष्याकृती दृष्टीस पडत होत्या.

"सीता, मी सांगतो ते नीट ध्यानात ठेव. देव तुझं कल्याण करील. एवढं बोलून मौलवी जिना उतरून निघून गेले.

सीता प्रतीक्षा करीत बसून होती. प्रतीक्षेचा क्षण तिच्या उरातील वेदनेत भर घालीत होता...

मुंबईत घालवलेले बालपणातील आनंदाचे दिवस सीतेला आठवले. आई-वडिलांनी कडेवर घेऊन केलेले लाड आठवले. तेच बाबा आता असे वागावेत यावर विश्वास बसत नाही...

यानंतरच्या घटना वेगानं घडून आल्या. आपणच हे अनुभवतो आहोत हे तिला खरं वाटेना. गती वाढवून घेतलेल्या सिनेमाच्या दृश्यांप्रमाणे त्या घटना वाटल्या. क्षणभर तिच्या घराच्या पुढल्या दाराजवळ आरडा ओरड झाली. दुसऱ्याच क्षणी कुऱ्हाडीनं दार फोडलं गेलं. दंगलखोर भराभर आत आले...

भराभर जिना चढून गुंड वर आले. सर्वांच्यापुढे मौलवी होते. त्यांच्या हातात लखलखती धारदार सुरी होती. एका उडीत ते सीतेजवळ आले. मानगूट धरून तिला त्यांनी जमिनीवर पाडलं. मग एक पाय तिच्या उरावर ठेवून ताठ्यात उभे राहिले. मागून येणाऱ्या माणसाकडे पाहून त्यांनी चढ्या आवाजात म्हटलं,

"खबरदार, यह मेरी है!"

दारातून येणारी भुतं त्या आरोळीनं दचकून जागीच थबकली. कुणी हसू लागले. कुणी टोमणा मारून म्हणालं, 'म्हाताऱ्याचा रंगेलपणा बघा!' एकजण सुरी उगारून धमकी देत त्यांच्या अंगावर धावून आला. त्याला अडवण्यासाठी दुसरा धावला. त्याच्या पायाखाली सीता तुडवली गेली. सीतेचे वडील आपल्या जागेवरून हलले नाहीत.

तेवढ्यात 'आग आग' करून कुणीतरी ओरडलं. 'पळा, पळा!' घसा फाडून मौलवी ओरडले. धुराचा एक लोळ हवेतून वर आला. तो बघताच खोलीत गोळा झालेले गुंड जीव घेऊन पसार झाले.

शहराच्या सर्व दिशांनी आगीचे भयंकर लोळ उठत होते. धुराचे लोट ढगासारखे पसरून आकाश झाकून टाकू लागले. यमदूतांसारखे ते भयानक राक्षस आरोळ्या ठोकत चहुबाजूंना धावताना दिसत होते. ते म्हाताऱ्या बायकांना आणि लहान लहान अर्भकांना पकडून आणून आगीत लोटत होते.

अशा नरकतुल्य नगरात एक प्रामाणिक व सज्जन मुसलमान व्यक्ती सीतेला आपल्या खांद्यावर उचलून गल्ल्या-बोळांतून झपझप चालली होती. ती व्यक्ती चौकस दृष्टीनं भोवताली पाहून पुढं चालू लागायची. कधी झपझप तर कधी हळू. कधी भिंतीचा आडोसा घेत तर कधी झाडाच्या आडून. अशा रीतीनं त्या व्यक्तीनं बराच लांबचा पल्ला गाठला.

'अहाहा! शेवटी त्या नरकातून एकदाचे बाहेर पडलो. इथं आगीची झळ लागत नाही. धुरानं कोंडमारा होत नाही. थंड वाऱ्याच्या झुळुका येत आहेत. कसं गार वाटतं. त्या नरकातील कल्लोळाचे आवाजही लांब राहिले. स्वर्गाच्या दारात येऊन पोचल्यासारखं वाटतं.'– मौलवी मनाशी म्हणाले.

सीता हळूहळू शुद्धीवर येऊ लागली. मोठ्या प्रयासानं तिनं आपल्या बंद पापण्या उघडल्या. तिच्या डोळ्यापुढं अगणित चांदण्या चमचम करू लागल्या. अहाहा ! आकाशमार्गानं आपण स्वर्गाजवळ येऊन पोचलो का पुष्पक विमानातून प्रवास चाललाय जणू.

हा सर्व भास आहे याची तिला लवकरच जाणीव झाली. गाडीचा खडखडाट अन् हिंदकळणं लक्षात येताच हा प्रवास पृथ्वीवरच चालला असल्याचं तिला उमजलं. तिचं सारं अंग ठणकत होतं..

"अयाई ग ऽ !"

"सीता, झोप झाली बाळ ?"

"मी बराच वेळ झोपून आहे का ?"

"पहाट व्हायला आलीय् !"

"वासंती कुठं आहे ?"

"ती अगदी सुरक्षित आहे. तू मुळीच काळजी करू नकोस. तुझी सावत्र आई हु[illegible]ार आहे. खंबीर आहे. तिनं अशा कितीतरी आपत्ती पाह्यल्यात."

सीता थोडा वेळ स्तब्ध होती. मग तिनं विचारलं, "बाबा, तुम्ही मुसलमान का झालात ?"

तिचे वडील गप्प बसून राहिले.

"माझा प्रश्न तुम्हाला आवडला नसला तर मला क्षमा करा. तुमचा देवावर विश्वास आहे का, हे समजून घेण्यासाठी मी असा प्रश्न विचारला. जर खरोखरच देव असता तर तर त्यानं लोकांना संकटात का लोटलं असतं ?" सीता बोलली.

"अशा संकटकाळी ईश्वराच्या अस्तित्वाविषयी शंका येणं स्वाभाविक आहे. या शंकेच्या समाधानार्थ ज्ञानवंतांना शरण जावं लागेल. पण तुझ्या पहिल्या प्रश्नाचं उत्तर मी देऊ शकतो. विचार पडला होता सुरुवात कशी करावी ? सीता, मी माझ्या जीवन-कथेबरोबरच आणखी एक रहस्य तुला सांगणार आहे." सीतेचे वडील म्हणाले.

48

सडकेच्या दोन्ही बाजूला खजुराच्या खुरटया झाडांचं जंगल होतं एका बाजूला थोडया अंतरावर एक उंच दगडी सुळका होता. मौलवी साहेबांनी गाडी हाकणाऱ्या पोराला काहीतरी सांगितलं. पोरानं रस्ता सोडून गाडी जंगलाकडे वळवली. खजुराच्या झाडांमधून गाडी हाकत त्यानं त्या दगडी सुळक्याच्या आडोशाला उभी केली.

बापलेक गाडीतून खाली उतरली. मौलवींनी गाडीतून एक घोंगडं काढून आणलं. ते जमिनीवर अंथरून म्हटलं, "इथं बैस बेटा. दिवसाचा वेळ इथंच बसून काढावा लागणाराय्."

मग त्यांनी गाडीतून पाण्याची पिशवी अन् लहानसा एक चौकोनी डबा आणला. त्या वस्तू घेऊन खाली बसत मौलवी म्हणाले, "या पिशवीत पाणी नि

डब्यात बिस्किटं आहेत. एवढ्यावर आपल्याला किती दिवस काढावे लागतील अन् असं जीवन किती काळ चालणार, कळत नाही."

" बाबा, एक वर्षापूर्वी मी इथं आल्ये तेव्हा हा प्रदेश किती चांगला वाटला. लोक परस्परांशी किती प्रेमळपणानं वागायचे. कलकत्त्यामधील भीषण हत्याकांड पाहिल्यानंतर मी अन् तुमचे जावई इथं आलो तर आम्हाला हा प्रदेश स्वर्गच वाटला. केवळ एक वर्षात इथल्या लोकांना काय बरं झालं ?"

" लोक पिसाळलेत ! त्यांच्या अंत:करणात सूडाची भावना पेटून उठली. कलकत्त्यातला सूड नोआखलीत उगवला गेला. नोआखलीची कसर बिहारात काढून घेतली गेली. बिहारातला बदला इथं पंजाबात घेतला जातोय. याचा शेवट काय होणार ते देवालाच ठाऊक ! या सर्व पिसाटांच्या समुदायात एकच खरा सत्पुरुष आहे. परस्पराविषयी स्नेहाची शिकवण देत फिरतो आहे. ती व्यक्ती म्हणजेच महात्मा गांधी. तुझी आई गांधींची भक्त होती. ती त्यांना ईश्वरी अवतार मानायची. "

"बाबा, तुम्ही रागावणार नसलात तर एक प्रश्न विचारू ? तुम्ही आईला कधी प्रेमानं वागवलंत का ? " सीतेनं विचारलं.

"तुझ्या प्रश्नानं मला मुळीच राग आला नाही हं सीता. गेली तीस वर्ष माझ्या मनावर जे ओझं वाहिलं ते हलकं करण्याची संधी मिळतेय. कुणाला सांगून मोकळं झाल्याशिवाय ते दडपण दूर व्हायचं नाही. वास्तविक स्वत:च्या अपराधाची कबुली प्रत्यक्ष पोटच्या पोरीपुढं देणं कठीण काम आहे. मात्र आज आलेली संधी गमावली तर पुन्हा असा योग येईलच असं सांगता येत नाही"– अशी प्रस्तावना करून मौलवींनी म्हणजेच दुरैस्वामींनी तीस वर्षापूर्वीची घटना सांगण्यास आरंभ केला...

राजम्माशी लग्न करून दुरैस्वामी आपल्या नववधूसह मुंबईला आले. ते नव्या नवतीचे दिवस फार आनंदात गेले. संसार सुखात चालला होता. दिवसें-दिवस आनंद वृद्धिगत होत होता. राजम्माला पहिल्यांदाच दिवस गेले होते.

दुरैस्वामीना पगार फार कमी होता. त्यामुळेच ते 'तीन पत्ती' नामक जुगाराच्या आहारी गेले. इथंच त्यांच्या जीवनात दु:खाचा प्रवेश झाला. जुगारात गमावलेले पैसे परत मिळण्याची जिद्द चढली. मग ते 'घोड्यांच्या शर्यती'कडे वळले. उसने पैसे घेऊन घोड्यांवर पैसे लावू लागले. आपल्या बुद्धिमत्तेच्या

बळावर गमावलेलेच पैसे नव्हेत तर कितीतरी पटीनं अधिक पैसे मिळवता येतील असा त्यांना विश्वास वाटे. मोठी रक्कम मिळाली की अंग काढून घ्यायचं असा त्याचा बेत होता. तरी शेवटी ते त्या नादात गुरफटले ते कायमचे. एवढ्यात राजम्माच्या प्रसूतीचे दिवस जवळ आले. भाड्याची मोटार करून तिला इस्पितळात पोचवायलाही खिशात पैसे नव्हते. आपल्या दुरवस्थेबद्दल खेद करीत स्टेशनात रात्रपाळी करीत असतानाच रमामणीबाई आपल्या भरलेल्या दिवसाच्या बहिणीला घेऊन स्टेशनात आली. तिच्या डोळ्यातील आसवांनी आणि तिच्या बहिणीच्या दुःखद जीवनकथेनं दुरैस्वामीचं मन पार विरघळून गेलं. त्याचबरोबर त्या दोघीना मदत केली तर आपलं दारिद्र्य दूर होण्याची शक्यताही दिसली. म्हणून त्यांनी आपल्या बायकोला ज्या दवाखान्यात भरती केलं होतं त्याच दवाखान्यात गंगाबाईलाही भरती करून घेतलं.

दुरैस्वामी आपल्या पत्नीला भेटायला इस्पितळात गेले की रमामणीची भेट घेऊन तिची चौकशी करीत. दारिद्र्यात गुरफटलेल्या दुरैस्वामीवर चतुर रमामणीनं मोहाचा फास फेकला. दुरैस्वामी त्यात अडकले. त्याचं मन दोलायमान होऊ लागलं.

राजम्मा आणि गंगाबाई एकाच रात्री प्रसूत झाल्या. नेमकी त्या रात्री दुरैस्वामीची रात्रपाळी होती त्यामुळे ते प्रसूतिगृहात जाऊ शकले नाही. रात्री त्यांनी टेलिफोनवरून चौकशी केली. राजम्माला मुलगी झाली असून बाळ-बाळतीण सुखरूप असल्याचं त्यांना कळवलं गेलं. सकाळी आपली 'ड्यूटी' संपताच दुरैस्वामी लगबगीनं इस्पितळात गेले. प्रसूतीमुळे राजम्मा क्षीण झाली होती. तरी त्याना बघताच रोमांचित होऊन म्हणाली, "माझंच म्हणणं खरं ठरलं !"

"काय खरं ठरलं ?" दुरैस्वामींनी विचारलं.

"मी म्हटलं होतं नं, मुलगाच होणाराय् ? खरं ठरलंय ते !"

"शक्य नाही! मुलीचा का कधी मुलगा होतो ?" दुरैस्वामी म्हणाले. राजम्मा आपली थट्टा करतेय् असं त्यांना वाटलं.

"तुम्हाला थट्टा वाटते का ? बघून खात्रीच करून घ्या नं !"

दुरैस्वामींनी मच्छरदाणी वर करून पाहिलं. आत खरोखरच मुलगा होता. पाहताक्षणी ते दचकलेच. जरा सावरल्यावर त्यांना वाटलं, रात्री बातमी देणारानं चूक केली असेल. रमामणीची भेट झाल्यावर गंगाबाईला रात्रीच मुलगी झाल्याचं कळलं. त्यांनीच गंगाबाईला आणून ठेवल्यामुळं तिला मुलगी झाल्याची

बातमी कळवली जाणं स्वाभाविकच होतं. दहा दिवसांनी दुरैस्वामींनी राजम्माला व मुलाला आपल्या घरी नेलं. काही दिवसांनी मुलाचा मृत्यू झाला. नवराबायकोला फार दु:ख झालं. अपत्य गेल्याच्या दु:खाचा विसर पडावा म्हणून ते गंगाबाईची मुलगी बघायला वारंवार जाऊ लागले. अनपेक्षितपणे गंगाबाईलाही मृत्यू आला. आता मुलीच्या संगोपनाचा भार रमामणीवर येऊन पडला.

एके दिवशी दुरैस्वामी रमामणीच्या बिऱ्हाडी गेले असताना आपली फसवणूक झाल्याचं त्यांना कळून आलं. ज्या रात्री बाळंतपण झालं त्याच रात्री मुलामुलीची अदलाबदल करण्यात आली होती. राजम्माची मुलगी गंगाबाईजवळ आणि गंगाबाईचा मुलगा राजम्माजवळ नेऊन ठेवण्यात आले. संबंधित नर्स व रमामणी यांच्यात त्याबाबत वाद चालला होता. नर्स निघून जाईपर्यंत दुरैस्वामी तिथंच लपून उभे होते. मग आत जाऊन थडकले. आधी त्यांनी रमामणीची चांगलीच खरडपट्टी काढली. तिनं सारं काही कबूल करून टाकलं. नी आक्सावोक्सी रडत म्हणाली. " माझं बहिणीवर जिवापाड प्रेम होतं. ती अचानक गेली. आता या पोरीकडे पाहून जगत्ये आहे. तुम्ही या मुलीला घेऊन गेलात तर मला जमण्यासारखं काही. उरणार नाही मी जीव देऊन टाकीन. " झालं ! तिनं रडून-भाकून आपलं काम साधून घेतलं.

" मुलांची अदलाबदल का केलीस ? " दुरैस्वामीनी विचारलं. त्यावर तिनं स्पष्टीकरण दिलं.

आपल्या बहिणीला मुलगा झाला तर तो रजनीपूर संस्थानाचा वारस होणार याबद्दल रमामणीची पूर्ण खात्री होती. त्यामुळे मुलगा झाल्याचं कळताच राजाचे दुष्ट मंत्री त्यांचा पत्ता काढून पोराला मारून टाकतील अशी तिला भीती पडली होती. म्हणून मुलाला कुठं तरी अज्ञात स्थळी नेऊन ठेवला तर तसा धोका होण्याचा संभव नाही. योग्य वेळी या रहस्याचा स्फोट केला म्हणजे झालं. पण गंगाबाई अशी अचानक मरून जाईल अन् तिचं पोरही मरून असा धोका देईल अशी शंकादेखील तिच्या मनाला शिवली नव्हती. या सर्वांवर मात म्हणजे अदलाबदल करून आणलेली राजम्माची पोर अशी गळ्यातील ताईत बनून जाईल असं तिला स्वप्नातही वाटलं नव्हतं...

बराच विचार केल्यावर दुरैस्वामीनाही पटलं, की मुलीला रमामणीजवळच राहू द्यावं. कारण मुलीला घरी नेऊन ही आपलीच आहे, हे राजम्माला कसं पटवून द्यायचं ? पण त्याच एका चुकीमुळे पुढं किती अनर्थ घडून आले !

रमामणीच्या अंगाखांद्यावर वाढत असलेल्या मुलीबद्दलची दुरैस्वामींची वात्सल्यभावना दिवसेंदिवस वाढीला लागली. यामुळे दुरैस्वामींना रमामणीशी कायमचा संबंध ठेवावा लागला अन् तिनं नाचवलं तसं नाचावं लागलं. एवढंच नव्हे तर राजम्माला दुःखात लोटावं लागलं.

" सीता, राजम्माच्या उदरातून जन्मलेल्या नि रमामणीच्या संगोपनात वाढलेल्या मुलीचं नाव तारिणी. तू तिची धाकटी बहीण आहेस. तुम्ही दोघी लहान असताना मला ज्या आपत्तींना तोंड द्यावं लागलं, त्यांची कल्पना करवणार नाही. या दुनियेत कोणावर अशा विपत्ती आल्या नसतील. मात्र या सर्व दुःखा-तही एक सुख होतं– "दुरैस्वामी अय्यर बोलले.

आतापर्यंत सीतेच्या जीवनातील कितीतरी गाठी उकलल्या नव्हत्या त्या आता उकलू लागल्या. तिलाच तारिणी समजून रजनीपूरची माणसं का घेऊन गेली होती याचं कारण स्पष्ट झालं. राजमपेट्टेला तिला बघताच राघवन् तिच्या प्रेमात का पडला, याचाही उलगडा झाला. खात्रीनं तारिणीच्या चेहऱ्याशी आपल्या चेहऱ्याचं साम्य हे याचं कारण असलं पाहिजे. तारिणीचं आपल्यावर एवढं प्रेम का, हे आता उमजलं. तिच्याही हृदयात तारिणीबद्दल प्रेमाचा उमाळा यायचा. पण ही मेली ईर्ष्या त्या प्रेमाच्या ज्योतीवर उडी घ्यायची. . .

खरंच, माझं मन किती संकुचित. नाहीतर तारिणीचं मन ! केवढं उदार अन् विशाल आहे. देवाच्या दयेनं या आपत्तीतून बचावून तारिणीला पुन्हा एकदा डोळे भरून बघायला मिळेल तर ?

" बाबा, तारिणीताईला या गोष्टी माहीत आहेत ? "

" नाही बेटा, माझं मनच भित्रं आहे. कितीदा तरी तिला सांगायचं ठरवलं. पण मला हिंमतच झाली नाही. शिवाय, मी हे रहस्य तारिणीला सांगू नये म्हणून रझिया बेगमनं वारंवार अडवलं. "

" का बरं बाबा ? "

" निव्वळ वेडेपणा आहे, दुसरं काय ? तारिणीला तिचं जन्मरहस्य कळलं तर तिचं आपल्याविषयीचं प्रेम कमी होईल, अशी तिला उगीच भीती वाटे. अजूनही कसंही करून तारिणीच्या नावानं रजनीपूर संस्थानचा अर्धा हिस्सा करून घेण्याची तिची मनीषा नष्ट झाली नाही. तिला या गोष्टीची जाणीवही नाही, की जग दिवसेंदिवस बदलत असून संस्थानांचा काळ संपलाय अन् एक दिवस त्यांचं नाव-निशाण शिल्लक राहणार नाही. "

थोडा वेळ सीता कसल्या तरी विचारात दंग होती. मग तिनं एकदम म्हटलं " बाबा, तुम्ही मला एक वर द्याल ? "

" अग, तुला वर द्यायला मी का देव आहे ? "

" हूं, तुम्ही देवच आहात. देवासारखेच तर धावून आलात. देवच नव्हे तर मला देवापेक्षा अधिक आहात. मातापिताच प्रत्यक्ष परमेश्वर असतात-म्हणूनच तर म्हणतात, ' अन्नेयुम् पिताकुग् मुन्नरि दैवम्. ' आई तर देवाघरी गेलीच; आता तुम्हीच माझे देव आहात. समजा, या प्रवासात काही संकट आलं अन् त्यात मला मरण आलंच, तर तुम्ही कसंही करून तारिणीताईला भेटून तिला माझ्या वतीनं एवढं सांगा की, तिच्याशी वैर धरून तिचा मी जो घात केला त्याबद्दल मी तिची मन:पूर्वक क्षमा मागत्ये ..."

" हे काय बोलत्येस सीता ? "

" केवळ तुमच्या म्हटल्यानं व्हायचं ते काय टळणार आहे बाबा ? माझं ऐका. समजा रस्त्यातच मला मरण आलं तर तुम्ही कसंही करून तारिणीताईला शोधून काढा. ह्यांच्या अंत:करणातून तिची आठवण पुसली गेलेली नाही. ताईला म्हणावं, ह्यांच्याशी अवश्य लग्न कर. तारिणीचं ह्यांच्याशी लग्न होऊन दोघं सुखानं संसार करू लागली तरच माझ्या आत्म्याला सद्गती मिळेल. "

" असं वेड्यासारखं काय बोलत्येस पोरी ? खरंच, तुला साऱ्या गोष्टी सांगून मी घोडचूक केलीय्. तुला काही सांगायलाच नको होतं ! "

" मी बोलल्ये ते ताईला सांगायचं आश्वासन द्याल तरंच मी इथून हलेन. नाहीतर अश्शी इथं बसून राहीन. "

" बरं बाई, तुझं मन राखण्यासाठी तू म्हणतेस तसं आश्वासन देतो. पण मला माझं आश्वासन पूर्ण करण्याची गरजच पडणार नाही पोरी. आपण रस्त्यातच तिला भेटून घेऊ. मग तुला वाटेल ते तूच सांगून टाक. " मौलवी म्हणाले.

49

पुढल्या सात-आठ दिवसांत ज्या घटना घडल्या त्या प्रत्यक्षात घडल्या यावर सीतेचा विश्वास बसेना. कधी वाटे त्या पूर्वजन्मी घडल्यात, तर कधी वाटे त्या स्वप्नात घडल्या असतील किंवा कुणाच्या तोंडून ऐकल्या असतील.

सीता आणि तिचे वडील दिवसाच्या वेळी डोंगरांच्या गुहांतून, जंगलांतून किंवा ओसाड मशिदींतून लपून बसत. अंधार पडल्यावर धडधडत्या हृदयानं, चौकस दृष्टी ठेवून, मागं पुढं पाहात प्रवास सुरू करीत. रस्त्यात आगीत धग-धगणारी कितीतरी गावं अन् शहरं दिसली. पेटणाऱ्या घरांच्या आगीच्या लोळांनी रात्री दिवसासारख्या वाटत होत्या. अशा वस्त्यांतून पुढं जाणं कमी धोक्याचं नसे.

रात्रीच्या वेळी सडकेवरून चालताना पुढून पावलांची चाहूल आली तर हृदय धडधडू लागायचं अन् मागे खुट्ट झालं तर हृदय बंद पडतंय असं वाटायचं. कशातच मन लागेना. कधी लोकांच्या झुंडीच्या झुंडी पळत येत असल्याची चाहूल लागे. मग बापलेक रस्त्याच्या बाजूच्या जंगलाचा आसरा घेत. जीव घेऊन पळणाऱ्या जनसमुदायाच्या मागून नरपशू धावत येत. त्यांचे चीत्कार आणि स्त्रियांच्या व अर्भकांच्या किंकाळ्या एकाचवेळी आसमंतात घुमू लागत. ते ध्वनी विरल्यावर कितीतरी वेळपर्यंत तो आवाज सीतेच्या कानात घुमत राही. अगदी समुद्रावरील लाटांच्या गर्जनेसारखा...तिचं हृदय वेदनेनं तडफडू लागे, ' हे मृत्यो, लवकर ये ! "

चालून चालून सीतेचे पाय दुखू लागले. पायांना फोड आले. रक्त साकळलं. सूज आली. ' आता एक पाऊल उचलणं कठीण आहे ' असंच जणू तिचे पाय म्हणत होते. " बाबा, मला गोळी घालून एकदाची ठार करून टाका. " सीतेनं बापाच्या पुढं हात जोडले. तिची विनवणी वाया गेली तेव्हा तिचं मन चीत्कारलं, ' हे मृत्यो, मला घेऊन जा ! '....सीतेच्या कानात घुमणारा लाटांचा आवाज वाढत होता.

ती एका रेल्वे स्टेशनात येऊन पोचली. त्या लहानशा स्टेशनातील प्रतीक्षा-लयात बसून गाडीची वाट पाहात बसली. कोणी तिथं येऊन सहज डोकावलं तरी सीतेचा चेहरा भीतीनं पांढरा पडायचा. बसल्या बसल्या सीतेला डुलकी आली.

झोपेत समुद्राच्या लाटांच्या आवाजानं खडबडून जागी झाली. आगगाडी येत होती. बापलेक प्लॅटफॉर्मवर गेली. गाडीत मुगी शिरायलाही जागा नव्हती. सर्व डबे आतून बंद होते. मौलवीसाहेब प्रत्येक डब्याजवळ जाऊन विनवण्या करीत होते. शेवटी एका डब्याचं दार उघडलं. दोघंही कसेतरी आता चढलो. गाडीतील प्रवासी रस्त्यात पाहिलेल्या, अंगावर शहारे आणणाऱ्या भयंकर दृश्यांची आपसात चर्चा करीत होते.....

गाडी एका ' जंक्शन ' वर येऊन थांबली. तिथून हलेचना. प्रवासी चिंताक्रांत झाले. हळूहळू काळजी वाढू लागली. स्टेशनात अन् बाहेर गोंधळ सुरू होता.

अचानक मौलवीसाहेब म्हणाले, " तिकडे बघ. ती तारिणी दिसते. " मौलवींनी बोट दाखवलं तिकडे सीतेनं दृष्टी वळवली. बऱ्याच अंतरावरील गर्दीतून सूर्या अन् तारिणी चालली होती.

" सीता, हा मी आलोच. तू इथं बसून रहा " एवढं बोलून मौलवी गाडीतून उतरले नि क्षणात गर्दीत मिसळून गेले.

त्यानंतरचा एकेक क्षण सीतेला युगासारखा भासला. असे कितीतरी क्षण संपल्यावर शेकडो गुंडांनी हातात सुरे-चाकू घेऊन रक्ताच्या धुंदीत प्लॅटफॉर्मवर प्रवेश केला. पहाता त्यांनी कितीतरी लोकांना ठार केलं. जिकडे तिकडे रक्ताची थारोळी साचली होती. त्याच्यापैकी काही गाडीच्या डब्यात घुसले. सीता बसली होती त्या डब्याच्या रोखानं चार-पाच गुंड धावत आले. सीतेनं भीतीनं अन् शिसारीनं डोळे मिटून घेतले. तिला वाटलं, चला, देवानं आपली विनवणी ऐकली. शेवटी मृत्यू येऊन ठेपला...अतिशय चपलतेनं ते गुंड डब्यात शिरले. डोळे मिटून सीता प्रतीक्षा करू लागली–' आता छातीत सुरा खुपसला जाईल. '

" सीता ! " अत्यंत मधुर आवाजात तिचं नाव उच्चारून दोन कोमल बाहुलतांनी तिला हृदयाशी कवटाळलं. सीतेनं डोळे उघडले. समोर तारिणी दिसली. तारिणीच्या एका हातातून रक्ताची धार लागली होती. ' ताईऽ ! ' सीतेनं किंकाळी फोडली.

ते तीन दिवस सीतेच्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचे दिवस होते ! कोणत्या तरी गावातील कोणाच्या तरी घराच्या मजल्यावरील खोलीत दारं-खिडक्या लावून हवा-प्रकाश यांनाही प्रवेश न देता ती लपून बसली होती.

तारिणीनं सीतेला मृत्यूच्या जबड्यातून ओढून काढलं अन् मोठ्या प्रयासानं तिथं आणून ठेवलं होतं. सीतेनं तारिणीला नात्याची माहिती सांगून विचारलं, " ताई, या साऱ्या गोष्टी तुला आधी कळल्या नव्हत्या का ग ? "

" पुष्कळ दिवसांपासून मला तशी शंका येत होतीच. पण पुन्हापुन्हा विचारूनही, खरं काय ते मला कुणी सांगेचना." तारिणीनं म्हटलं.

" बाई ग, केवढा हा अन्याय ? यांनी का बरं असं करावं ? तू माझी सख्खी बहीण आहेस हे कळण्याआधीसुद्धा मी तुझ्यावर जिवापाड प्रेम केलं. हे कळलं असतं तर आणखी कित्ती प्रेमाचा वर्षाव केला असता. आपण दोघी केवढ्या तरी समाधानात राह्यलो असतो ! " सीता म्हणाली.

सीतेचा आपल्यावरील राग अन् मत्सर तारिणीला आठवला. तरी तिनं जुन्या गोष्टी बोलून दाखवल्या नाहीत. उलट म्हणाली, " झालं गेलं गंगेला मिळालं. आता त्याचा विचार करून उपयोग काय ? यापुढं आपण अशा आनंदात राह्यचं की मागची कसर भरून निघायलाच हवी ! "

एवढं सर्व होऊनही दोघी त्याबद्दल साशंक होत्या. जागेपणी सीता अगदी तारिणीच्या गळ्यात पडून आपलं मन तिच्यापुढं मोकळं करायची. रात्रीदेखील तिच्या अंगावर हात ठेवून झोपायची. तारिणी आपल्याला सोडून तर जाणार नाही, अशी भीती तिच्या मनात घर करून राहिली होती.

शेवटी सीतेच्या मनातील भीती लवकरच खरी ठरली. तारिणीच्या वियोगाची घडी जवळ येताच ती हट्ट धरून बसली.

तारिणीनं तिला परोपरीनं समजावून सांगितलं. तिनं म्हटलं, " अग, मी तुला दिल्लीत नक्की येऊन भेटत्ये. माझी मैत्रीण निरुपमा पेशावरला अडकून पडलीय्. तिला इकडे घेऊन यायलाच पाहिजे. "

दोघी बहिणींत बराच वेळ वाद चालला होता.

अखेर सीता म्हणाली, " ताई, तू एक आश्वासन देत असलीच तरच मी तुला सोडीन. "

" बोल, कसलं आश्वासन देऊ तुला ? "

" यदाकदाचित रस्त्यातच मला मरण आलं तर तू यांच्याशी लग्न करायचं. देणार ना हे आश्वासन ? "

" हा ग कसला तुझा वेडेपणा सीता ? " तारिणीनं तिला खूप समजावलं. पण सीता हट्टालाच पेटली. तारिणी नकार देऊ लागली तशी सीता हट्ट धरून

बसली. शेवटी निरुपायानं तारिणीनं म्हटलं, " बरं बाई, तू मेलीस नि मी जिवंत असल्ये तर तुझ्या पतीच्या मनाचा अनुकूल ग्रह दिमताच मी त्यांच्याशी लग्न करीन."

तारिणीनं सीतेला मुसलमानी बायका घालतात तसा एका बुरखा दिला. सीता त्यात आपादमस्तक झाकून गेली. ऐन मध्यरात्री मौलवी अन् सीता त्या घराच्या वरच्या मजल्यावरून खाली आली. त्यांची प्रतीक्षा करीत दारात जीप गाडी उभी होती. ती चालवणारा पोलिसी वेशातला ड्रायव्हर जीप जवळ उभा होता.

तारिणीच्या गळचात पडून सीतेनं बजावलं, " ताई, आपलं दिलेलं वचन विसरायचं नाही बरं ! "

मौलवी साहेब व सीता जीपमध्ये बसताच ती भरधाव निघाली. मार्गातले अनेक अडथळे चुकवत ती पुढं जात होती. रस्त्यात काही ठिकाणी लोकांच्या झुंडी रस्ता अडवून चालल्या होत्या. त्यांना बाजूला मारून वेगात जीप पुढं जायची. काही ठिकाणी रस्त्याच्या बाजूची झाडं तोडून ती रस्त्यात आडवी ठेवली होती. अशा ठिकाणी सडकेच्या खाली उतरून वळसा देऊन गाडी काढली जात होती.....

सडकेवरून जीप भरवेगात धावू लागली तेव्हा सीतेला वाटलं, एक परीनं धोका टळला. पण लवकरच ती भावना चूक असल्याचं सीतेच्या लक्षात आलं. कारण त्याच्या जीपचा पाठलाग करीत दुसरी जीप येतेय् अशी शंका तिला चाटून गेली. चला, या प्रवासात आपलं मरण ओढवणार असं वाटलंच होतं. आता शंकाच नको. आता ती मनातल्या मनात मृत्यूचा धावा करू लागली. 'ये बाबा मरणा, लवकर ये ! ' तिच्या कानांतील लाटांचा आवाज वाढत होता .....

एका नदीच्या काठावर येऊन जीप थांबली. हे काय ? सूर्या तिथं आधीच येऊन उभा होता. आपल्या आधी हा इथं आला कसा ? नदी ओलांडून जाण्यासाठी एक नावही तयार ठेवलीन्. काही म्हणा, आपला सूर्या तो सूर्याच ! त्याची कोण बरोबरी करणार ?

बापलेकीला सूर्याच्या स्वाधीन करून जीपवाला निघून गेला. सूर्या त्याच्याशी सांकेतिक भाषेत काय बोलला ते कळलं नाही. विचारपूस करायची ती वेळ नव्हती.

सूर्यानं हाताचा आधार देऊन त्या दोघांना नावेत घेतलं. नाव चालू लागताच सीतेच्या मनातलं भय निघून गेलं. आता तिचं मन उल्हसित झालं. पंजाबच्या पंचनद्यांपैकी चिनाब नदीतून नाव जात होती. नदीची धार खळाळत वाहात होती. वारा सुटला होता. सीतेनं बुरखा काढून ठेवला. मग वडिलांकडे पाहून म्हणाली, " बाबा, तुम्ही पूर्वीसारखेच व्हाल तर काय चांगलं होईल ! "

" सीता, ह्या माझ्या पोशाखाला दूषण देऊ नकोस. याच्यामुळेच मी तुझं रक्षण करू शकलो. " मौलवी बोलले.

" झालं ना ? आता तर काही धोका उरला नाही ना ? " सीतेनं विचारलं.

जेमतेम नदीच्या प्रवाहाचा निम्मा भाग पार करून झाला होता. ते ज्या रस्त्यानं आले होते त्या रस्त्यावर धूळ उडताना दिसली. दुसऱ्याच क्षणी दुसरी एक जीप येऊन नदीच्या किनाऱ्यावर थांबली. जीपमधून उडी मारून खाली उतरणारा एक माणूस सीतेनं पाहिला. त्या माणसाच्या हातात बंदूक होती. नदीतून जाणाऱ्या नावेकडे त्यानं रोखून पाहिलं. पुढल्याच क्षणी त्यानं बंदूकीनं. नावेवर नेम धरून गोळी झाडली. हे सर्व विस्मयानं बघत असलेल्या सीतेला 'हाय ? मेलो ऽ ! ' अशी किंकाळी ऐकू आली. सीतेने वळून पाहिलं. वडिलांच्या गालावरून रक्त वाहात होतं. अन् ते एका बाजूला पडू लागले. सीता त्यांना सावरण्यासाठी धावली. एकदम नाव कलंडली. सीता प्रवाहात फेकली गेली.

50

हिवाळा कशाला म्हणतात, हे ज्याला समजून घ्यायचं किंवा अनुभवायचं असेल त्यानं हिवाळ्यात दिल्लीला जाऊन ग्हावं. तिथल्या थंडीतील थंड हवा घोंगडी, दुलई यातून आत शिरून कातडी, मांस, रक्त पार करून हाडांपर्यंत पोचते. अंग कसं बर्फासारखं गार होऊन जातं.

१९४८ सालच्या जानेवारी महिन्याच्या थंडीत आपला वेष, गावं, घरंदारं सोडून पळून आलेले दोन लक्षांपेक्षा अधिक निर्वासित दिल्ली शहराच्या रस्त्या-वर, गल्ल्याबोळांत नि उघड्या मैदानांत थंडीनं कुडकुडत पडले होते. त्यांना धरतीचं अंथरूण अन् आकाशाचं पांघरूण तेवढं होतं. शरीरं थंडीनं थरथर कापत होती तरी अंतःकरणं पेटून उठली होती आणि रक्त उसळ्या घेत होतं.

संध्याकाळी सातचा सुमार. जंतरमंतर मार्गावरून धुकं कापीत एक मोटार भरधाव निघाली होती. रस्त्यात वाहनांची व माणसाची रहदारी नाममात्र होती. त्यामुळे मोटार-चालकाला फार दक्षता बाळगण्याचं कारण नव्हतं. पण हे काय? हा कोण मधेच रस्त्यात येऊन धडपडला? अरे रामा! एकदम करकचून ब्रेक दाबल्यानं 'कर्रऽ' आवाज करीत गचका देऊन गाडी थांबली. अरे सैताना, रस्त्याच्या कडेनं चालायला काय होतं? जीव द्यायचाय् का....? असेल एखादा पंजाबातून आलेला शरणार्थी. लेकाचा जाणूनबुजून आडवा आलाय्.

मोटारीतून दोन व्यक्ती उतरल्या. एक होता राघवन् अन् दुसरी भामा होती. पडलेल्या माणसाला फार लागलं तर नाही ना, हे बघायला दोघं पुढं झाली. त्याचवेळी खाली पडलेला माणूस उठून उभा राहिला.

"अं, हे काय? सूर्या, तू इथं कसा धडपडलास? मला वाटलं, पंजाबातून आलेला कुणी निर्वासितच आत्महत्त्या करायचा प्रयत्न करतोय्. बरं, पण, आता कुठं जायचा विचार आहे तुझा? घाईत नसलास तर माझ्यासोबत चल. तुला खूप गोष्टी विचारायच्या आहेत." राघवन् म्हणाला.

"मला काही जरूरीचं काम तर आहेच. पण अर्धा तास उशिरा जाण्यानं तसं काही बिघडणार नाही." सूर्या म्हणाला. त्यालाही राघवन्शी बरंच बोलायचं होतं. काही ऐकून घ्यायचं होतं, तर काही ऐकायचं होतं.

मोटार सुंदर राघवन्च्या जुन्या बंगल्याजवळ जाऊन थांबली. ते दोघं खाली उतरले. भामानं गाडीत बसल्या-बसल्याच त्यांचा निरोप घेतला. घरात शिरताच सूर्याचं मन उद्विग्न झालं. मनाचा बांध फोडून जुन्या स्मृतींचा पूर वाहू लागला.

"सूर्या, बघ बाबा, हे घर कसं सुनं सुनं वाटतंय्!"

राघवन्च्या तोंडून हे शब्द ऐकताच सूर्याला रडायलाच आलं. अत्यंत प्रयासानं मनाला आवर घालून त्यानं विचारलं, "तुमची पूर्वीची नोकरी पुन्हा मिळाली का हो?"

" मिळाली तेव्हाच तर हा बंगला मिळाला ! " असं सांगून राघवन्नं पुढं विचारलं, " सूर्या, तू इथंच असतोस का ? सध्या काय चाललंय् ? "

" मी काय करतो म्हणता ? इकडं–तिकडं भटकतोय झालं. " सूर्या उत्तरला.

" म्हणजे ? "

" निर्वासितांच्या कॅम्पात जाऊन शक्तीनुसार त्यांना मदत करतो. "

हे ऐकताच राघवन्नं मोठ्या उत्सुकतेनं विचारलं, " एखाद्या शरणार्थींच्या कॅम्पात आपल्या ओळखीच्या कुण्या व्यक्तीला पाहिलंस का ? "

" आपल्या ओळखीची म्हणजे . . . ?"

" तारिणी किंवा वासंती यांच्याबद्दलच विचारतोय्. "

" नाही. मिस्टर राघवन् उलट मीच तुम्हाला त्यांच्यासंबंधी विचारणार होतो. "

" दोन महिन्यांपूर्वी एक अजब पत्र आलं. हस्ताक्षर तारिणीचं होतं. त्या पत्रात लिहिलं होतं, मी आणि वासंती सुरक्षित आहोत. जमल्यास लवकर येऊन भेट्. आश्चर्य म्हणजे, पत्र सीतेच्या नावावर लिहिलेलं होतं. यावरून तिला सीतेसंबंधी काही कळलं नसावं असं दिसतं. "

" सीतेचं काय झालं ? " सूर्यानं विचारलं.

" ती एक शोककथा आहे. जगात माझ्यासारखा दुर्दैवी मनुष्य क्वचितच मिळेल. यावेळी ज्या रीतीनं ही सीतेला गमावून बसलो, त्याहून अधिक दुर्दैवाची परिसीमा असूच शकत नाही. अहाहा ! गेलं अेक वर्ष हुशंगाबादेस आम्ही केवढ्या आनंदात काळ घालवला. पण देवालाही ते आवडलं नसावं. ऑगस्टच्या चौदा तारखेला आपण इथंच नव्या दिल्लीत भेटलो होतो. तेव्हा कलकत्त्याला जात असल्याचं बोललो होतो. आठवतंय नं ? तिथून आरंभ करून संपूर्ण कहाणी सांगतो. " राघवन् म्हणाला.

ज्या दिवशी राघवन् कलकत्त्याला पोचला त्या दिवशी कलकत्त्यात मोठ्या धामधुमीत स्वातंत्र्योत्सव साजरा होत असल्याचं त्या दृष्टीस पडलं. हिन्दू-मुसलमान प्रेमानं अेकमेकांना मिठ्या मारीत होते. 'जय हिन्द' ' वन्दे मातरम् ! ' ' हिन्दू-मुस्लिम अेक हो ! ' अशा घोषणा वातावरणात दुमदुमत होत्या. जिथं वर्षापूर्वी हिन्दू आणि मुसलमान अेकमेकांना ठार करून रक्ताचे पाट वाहवत होते, तेच का हे कलकत्ता शहर, असा त्याच्या मनाला संभ्रम पडला. कलकत्त्यामधील

सलोख्याचं, आनंदाचं वातावरण पाहून त्याला वाटलं, भारताचं भाग्य खरंय उजळलंय् !

नोकरीच्या संबंधातील जे कागदपत्र त्यानं गेल्यावर्षी अमरनाथकडे ठेवलेले होते ते घेऊन तो परतला. दिल्लीला येताच त्याला कळलं पंजाबात जातीय दंगे सुरू आहेत. भामेनंसुद्धा त्याचा शोध काढून त्याला पंजाबातील गंभीर परिस्थितीची कल्पना दिली. तेव्हा कसंही करून सीतेला व वासंतीला वाचविण्याचा त्यान निर्धार केला. पण पंजाबात जाणं म्हणजे वाघाच्या गुहेत शिरणं किंवा पेटत्या दारूच्या कारखान्यात प्रवेश करणं !

भामाची त्याला फार मदत झाली. भामेची साहसी वृत्ती, लोकांशी मोकळी वागणूक त्याच्या उपयोगी पडली. भामेकडे पाहण्याची त्याची पूर्वीची तिरस्काराची दृष्टीच बदलून गेली. किंबहुना त्याला वाटलं, बायका असाव्यात तर अशा धाडसी असाव्यात !

दोघांनीही कशीतरी विमानात जागा मिळवली अन् ती लाहोरला पोचली.

लाहोरचा एक भाग जळत होता. रस्त्यांवर जिथं-तिथं कापाकापी सुरू होती. प्रेतांचे ढीग पडले होते. संपूर्ण प्रांतात यापेक्षा भीषण अवस्था असल्याचं बोललं जात होतं. सुदैवानं राघवन् आणि भामा यांचे पोशाख व राहणी पाश्चात्य पद्धतीची असल्यानं इतरांना ते ॲंग्लो-इंडियन किंवा पारशी वाटत. त्यामुळे भोवतालच्या प्रदेशात फिरण्यात तेवढा धोका नव्हता.

इंग्रज अधिकाऱ्यांच्या कृपेनं त्यांना एक जीप दिमतीला मिळाली. मग त्यांनी प्रवास सुरू केला. मार्गात त्यांना जी भयानक दृश्यं दिसली ती पाहून त्यांना सीता व वासंती यांची फार काळजी वाटू लागली. शेवटी कसेतरी ती हुशंगाबादला पोचले.

ती शहरात पोचली तेव्हा हत्याकांडातून बचावलेल्या सर्व निराश्रितांना एकत्र आणून ठेवलेलं होतं. त्यांच्या संरक्षणासाठी शीख शिपाई येण्याची वाट पाहात होते. ते येताच त्यांच्या पहाऱ्यात सर्वांना तिथून हलवलं जाणार होतं. अधिकाऱ्याची परवानगी मिळवून राघवन् आणि भामा या दोघांनी निर्वासितांच्या झडीत सीता व वासंती यांचा शोध घेतला. पण त्या दोघी भेटल्या नाही.

त्यानंतर धाडस करून ती शहरात शिरली. राघवन् राहात होता त्या घरापाशी गेली. आता त्या घराची खिंडारं दिसत होती. उघड्या-बोडक्या भिंती आगीनं होरपळून काळ्या झाल्या होत्या. विटा, दगड, कोळसे नि राख यांचे ढीग दिसत होते. ते पाहून राघवन्च्या काळजाचं पाणी झालं. धीर खचला.

तो मटकन् खाली बसला अन् स्फुंदून रडू लागला. आयुष्यात पहिल्यांदाच तो असा रडत होता !

एवढ्यात तिथं बघ्यांची गर्दी वाढली. सोबतच्या पोलीस अधिकाऱ्यानं तिथून निघण्याची सूचना दिली. तिथून ती जीपकडे निघाली. तेवढ्यात एक पोरगा त्यांच्याजवळ येऊन म्हणाला, " साहेब, आपल्याशी काही बोलायचं आहे."

" बोल, काय म्हणतोस ? "

त्या पोरानं सांगितलं की, या घरातील मेमसाहेब मेली नाही. तिला एक म्हातारा मुसलमान सोबत घेऊन गेला. मी त्यांना आपल्या गाडीतून पोचवलं. लहान मुलीबद्दल मला काहीच माहीत नाही, असंही त्यानं सांगितलं. रात्रभर ते प्रवास करीत होते. दिवस उजाडल्यावर ते दोघं एका खडकापाशी थांबले. आपली इच्छा असली तर ते ठिकाण दाखवून देतो....

त्या मुलाला ते आपल्यासोबत जीपमधे बसवून घेऊन गेले. त्यानं दाखवलेल्या जागी गाडीच्या चाकाच्या चाकोऱ्या दिसत होत्या. शिवाय तिथं पिचलेल्या बांगडीचे तुकडे पडले होते. राघवन्‌ला सीतेच्या हातात ती बांगडी अनेकदा दिसली होती.

बांगडीचे तुकडे बघताच राघवन्‌च्या दुःखात भर पडली. क्षणात त्या दुःखाचं रूपांतर क्रोधात झालं. सीतेला कुठल्यातरी मुसलमान म्हाताऱ्यानं नेली याबद्दल त्याच्या मनात शंका उरली नाही. आता त्याच्या अंतःकरणात सूडाची भावना पेटून उठली.

पोराला त्याच्या घरी पोचवल्यावर राघवन् आणि भामा यांनी परतीचा प्रवास सुरू केला. वाटेत त्यांना एका गावात मुक्काम करावा लागला. ते ज्या घरात थांबले ते घर तेथल्या नामांकित हिंदू वकिलाचं होतं. त्या गावात हिंदूंची संख्या बरीच असल्यानं धोक्याची शक्यता फार कमी होती. तरी केव्हाही दंगल होण्याची भीती होतीच. तसे ते तोंड द्यायच्या तयारीत होते. ज्या रात्री ते तिथं मुक्कामाला होते त्याच रात्री अशी बातमी मिळाली, की एक म्हातारा मुसलमान हिंदू स्त्रीला मुसलमानी बुरख्यात लपवून जीपमधून पाकिस्तानला निघाला आहे. भोवताली काय चाललं आहे हे कळावं म्हणून गावकऱ्यांनी जे हेर पाठवले होते त्यांनीच ही बातमी आणली होती. बातमी ऐकताच राघवन्‌ला शंका आली, ती सीताच तर नसेल ? समजा ती सीता नसली तरी काय बिघडलं ? एक हिंदू स्त्री संकटात

आहे. तिचं संरक्षण करणं आपलं कर्तव्य नव्हे का ? कर्तव्याला पाठ देऊन जगण्यात अर्थच काय ?

झटकन् त्यानं जीप कोणत्या रस्त्यानं चालली याची माहिती मिळवली. मग त्याच रस्त्यानं आपली जीप भरवेगात चालवली. रस्त्यात कितीतरी अडथळे आले. तरी त्यानं पाठलाग थांबवला नाही. पाठलाग करीत तो चिनावच्या किनारी आला. नदीच्या प्रवाहात चाललेली नाव त्याला दिसली.

त्या नौकेत एक हिंदू स्त्री नि एक म्हातारा मुसलमानसुद्धा दिसला. आता विचार करण्यासारखं उरलं तरी काय ? त्यानं बंदूक काढली, म्हाताऱ्यावर नेम धरला अन् गोळी झाडली. म्हातारा कोलमडून नदीत पडला. त्यानंतर घडलं ते राघवन्ला अनपेक्षित होतं. नावेत असलेला एक पुरुष अन् ती स्त्री यांनी पाण्यात उड्या घेतल्याचा त्याला भास झाला. नावेत फक्त नावाडी उरला होता. राघवन् रागानं वेडाच नव्हे तर आंधळा झाला होता. त्यानं दुसरी गोळी नावाड्या-वर झाडली. ती नावाड्याला न लागता नावेला लागली. थोड्याच वेळात नाव पाण्यात बुडाली...

आता राघवन्चा क्रोध बराच शांत झाला होता. तो मनाशी म्हणाला, " अरे, हे मी काय केलं ? नावेत असलेली स्त्री सीताच असेल तर..."

सीता असली म्हणून काय झालं ? एका मुसलमानाच्या घरात जाऊन त्याच्या वासनेला बळी पडल्यावर जगण्यापेक्षा नदीत बुडून जीव देणं हजार पटीनं बरं नव्हे का ?

मग भामा व राघवन् अनेक संकटांतून बचावून दिल्लीला आली. दिल्लीत आल्यावर राघवन्नं पानिपत, कर्नाल, कुरुक्षेत्र येथील शरणार्थींचे सर्व कॅम्प शोधून काढले. तरी सीता व वासंती यांची काहीच खबर कळली नाही.

" सूर्या, यावेळी तू कुठं थांबला आहेस ? " राघवन्नं विचारलं.

" अजून तरी नक्की ठिकाण ठरलेलं नाही. ठिकाण निश्चित होताच अवश्य कळवीन. तुमचा व भामेचा विवाह होईल तेव्हा जरूर निमंत्रण द्या. विसरू नका बरं ?" सूर्या म्हणाला. हे बोलताना तो कुत्सितपणानं हसत होता.

" तुला हे कसं कळलं सूर्या ? आम्ही तर अद्याप कुणाजवळ बोललो नाही.' राघवन् आश्चर्यानं म्हणाला.

" सांगायला कशाला हवं ? अंदाजानं ओळखता येण्यासारखं आहे ते. एवढ्या मोठ्या बंगल्यात असे सडेफटिंग किती दिवस राहणार तुम्ही ? घरातील

शुकशुकाट खायला नाही का उठणार ? बरं, तुमचं लग्न कधी आहे हे तर सांगा. " सूर्या म्हणाला.

" त्याबद्दल विचार करताना अजूनही संकोच वाटतो सूर्या. निश्चितच मी आपलं सबंध आयुष्य असं एकट्यानं घालवू शकत नाही. पण सीतेबद्दल अजून काहीच निश्चित असं कळलेलं नाहीय्. एवढंच नव्हे, तर तारिणीच्या पत्रामुळे माझं मन स्थिर नाहीय्.... "

" सीतेसंबंधीच्या तारिणीच्या पत्रानं तुमचं मन विचलित का व्हावं ? "

" तुला सांगायला काहीच हरकत नाही. सूर्या, सीतेला गमावून बसल्यामुळं माझ्या अंतःकरणात जे दुःख माठलंय् ते दूर करण्याची पात्रता फक्त तारिणीच्या ठिकाणीच आहे. या बाबतीत तुझा विरोध असू शकतो. तरीही या गोष्टीत तू नाक न खुपसशील तर बरं होईल ! " राघवन् म्हणाला.

"क्षमा कर राघवन्, एकदाच दुसऱ्याच्या कामात नाक खुपसलं, त्याची फळं अजून भोगतोय्. आता माझं मन पार विटून गेलं. मी पुरता बेजार झालोय्. आता आणखी एक गोष्ट सांगून टाकतो, सीतेला जर खरंच मृत्यू आला असला अन् तिचा आत्मा इथं आला तर तुमचं नि तारिणीचं लग्न लागलेलं पाहून आनंदानं फुलून जाईल. तुम्हाला मनापासून आशीर्वाद पण देईल ! " सूर्या बोलला.

हे ऐकून राघवन्चा संयम सुटला. सूर्या आपला उपहास करतोय् अशी त्याला शंका आली. तो एकदम खवळून ओरडला, " अरे पाजी माणसा ! अजून तुझं पाजीपण संपलं नाही अन् खोटारडेपणा गेला नाही ना ? चल काळं कर माझ्या दृष्टीपुढून ! गेट आउट ! "

"त्याचीच तर वाट बघत होतो बापूसाहेब ! म्हटलं, तुम्ही अजून 'गेट आउट ' कसं म्हणत नाही ? ठीक आहे, येतो मी. " असं बोलून सूर्या उभा झाला.

" थांब सूर्या, थोडा वेळ थांब. खरंच तू हे मनापासून बोललास का ? मी तारिणीशी लग्न केलं तर खरंच सीता... ? " राघवन्ला संकोच वाटला.

" अहो संकोचता का ? खरोखरच तुमच्या लग्नानं सीतेच्या आत्म्याला संतोष वाटेल. त्याला तसंच कारणसुद्धा आहे. "

" कोणतं कारण ? "

" सीता अन् तारिणी मख्ख्या बहिणी होत. दोघीही एकाच बापाच्या व एकाच आईच्या कुशीत जन्मलेल्या याहून भक्कम कारण काय असणार ? " असं बोलून सूर्या चालू लागला.

" सूर्या थांब. चाललास कुठं ? अचानक बाँब टाकून जाशील तर कसं चालेल ? तुझ्या ह्या गोष्टी ख-या आहेत ? तुला कोणी सांगितल्या ? याला काही पुरावा ? " राघवन्नं प्रश्नांचा भडिमार चालवला.

" अहो, प्रत्यक्ष त्यांच्या जन्मदात्यानंच सांगितलंय. "

मग सूर्यानं दुरैस्वामीच्या पूर्वायुष्यातील घटना सविस्तर कथन केल्या. या घटनांवर चटकन् विश्वास बसणं कठीण होतं. तरी राघवन्ची पुरेपूर खात्री पटली.

" सूर्या, आता ते कुठं आहेत ? होय, दुरैस्वामींबद्दलच विचारतोय मी. आमच्या लग्नानंतर मी त्यांना बघितलंच नाही. अचानक कुठं निघून गेले ? का गेले ? "

" राघवन् ते सारं कशाला विचारता ? ते ऐकून तुम्हाला धक्का बसेल."

" धक्का बसेल ? तो का ? तुझ्या गोष्टी फार गूढ वाटतात बुवा. माझ्या तर काहीच लक्षात येत नाही ! "

" तुमचा जन्म एका सन्मान्य वैदिक परिवारात झालेला तर तुमचे सासरे मुसलमान मौलवी ! तुमच्या पिताजींना याचा सुगावा लागला तरी त्यांचं हार्ट फेल होऊन जाईल की ! "

" माझे सासरे तुझेही कोणी लागतात ना ? ते मुसलमान का बनले ? इस्लाम धर्मात सहज मोक्ष मिळतो, ' नजात ' मिळते, असं त्यांना वाटलं का ?"

" मला त्यांची धर्मविषयक मतं तेवढी ज्ञात नाहीत. मात्र मला वाटतं, जगाच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी त्यांनी हे सोंग घेतलं. पण त्याच सोंगामुळे त्यांना एकदम स्वर्ग मिळाला. नजात मिळाली म्हणा हवं तर. "

" अरेरे ! "

" त्या नावेत आम्हीच तिघं होतो. नदीच्या काठावरून नावेवर गोळी चालवणाऱ्या व्यक्तीविषयी माझ्या मनाला थोडी शंका वाटली. ती खरी होती हे मला आज कळतंय. "

" हे तू काय बोलतोस सूर्या ? माझं डोकं गरगरू लागलंय. नावेत तुम्ही तिघं होता ? तुम्ही तिघं कोण ? "

" मी, सीता नि तिचे वडील असे तिघं ! पंजाबातून जीव वाचवून आम्हीं येत होतो. मौलवीचा वेष सीतेच्या संरक्षणाचा हेतू साध्य करण्यासाठी कवचा-सारखा उपयोग पडेल, असं सीतेच्या वडिलांना वाटलं होतं. पण त्यांच्या जामा-तानंच त्याचा उलटा अर्थ घेतला."

" चक्, चक् ! तर काय त्या नावेतील ज्या मौलवीवर मी गोळी झाडली ते... ? "

" तुमचे सासरेच. तुमचा नेम जरासुद्धा चुकला नाही. राघवन्. त्या दुर्दैवी घटनेचा माहीतगार एकटाच मी होतो. आता तुम्हालाही ती कळलीय्. आता तिसऱ्या व्यक्तीकडे मी हे बोलणार नाही. मला वाटतं, तुम्ही पण सांगणार नाही." एवढं बोलून सूर्या तेथून चालता झाला.

राघवन् गोंधळून दगडी पुतळ्यासारखा बसून राहिला. सूर्याचे शेवटचे शब्द त्याच्या हृदयात बाणासारखे जाऊन लागले. सूर्या जे काय बोलला त्याच्या इष्टानिष्टतेवर विचार करण्याची शक्तीही उरली नाही. तरी या गोष्टी तारिणीला कळायला नकोत ही काळजी त्याला पडलीच.

घराच्या दाराबाहेर येताच सूर्या झपाझप चालू लागला. त्याच्या मनातील उद्वेग त्याच्या चालीतून व्यक्त होत होता.

51

अरुंद गल्ल्याबोळ पार करीत सूर्या चालला होता. एका बोळाच्या टोकाला पाऊलवाट दिसली. ती पाऊलवाट गावाबाहेरच्या लहानशा टेकडीवर गेली होती. सूर्या त्या वाटेनं पुढं गेला. टेकडावर मशीद होती. त्या मशिदीत निराश्रित, शरणार्थी स्त्रियांना आश्रय देण्यात आला होता. काही बायका चरख्यावर सूत काढत होत्या, काही मशिनवर लहान मुलांचे कपडे शिवत होत्या तर काही कलापूर्ण फुलदाण्या बनत होत्या. त्या सर्वांचे चेहरे निस्तेज दिसत होते.

खोल गेलेल्या डोळ्यांत चमक नव्हती. जणू काही निर्जीव प्रेतांमध्ये मंत्रानं जीव आणून कामाला बसवलं होतं!

त्या सर्व महिलांकडे करुणायुक्त दृष्टिक्षेप करीत सूर्या पुढं गेला. एका अगदीच अरुंद बोळातून अंधारानं वेढलेल्या एका लहानशा घरात शिरला.

निर्वासितांची ती छावणी पानिपत शहरात होती.

मीता स्वयंपाकघरात काही काम करीत होती. दुरैस्वामी अय्यर पुढच्या बैठकीत वर्तमानपत्र वाचत बसले होते.

नदीत बुडाल्यामुळे मीतेला धक्का बसला होता. त्यामुळे तिच्या मनात विकृती निर्माण झाली होती. तिला कानांनी नीट ऐकू येत नव्हतं अन् नीट बोलताही येत नव्हतं.

" सूर्या, ये बाबा! का एवढा उशीर केलास? काल रात्रीच का नाही आलास?" दुरैस्वामींनी विचारलं.

सूर्या गप्प उभा राहिला.

" अरे, बोलत का नाहीस? दिल्लीतून काही विशेष बातमी आणलीस का?"

" विशेष काय असणार? जिकडे बघावं तिकडे द्वेष, मत्सर, क्रोध अन् भीती दिसते. कुणाचं मन शांत नाही की संतुष्ट नाही."– सूर्या बोलला.

" या खेपेला महात्मा गांधींच्या प्रार्थना-सभेत गेला नव्हतास का? प्रार्थनेला गेल्यानं मनाला शांती लाभते, असं तूच तर म्हणत होतास?"

" गेलो होतो. पण यावेळी मन शांत झालं नाही. माझ्या मतानं महात्माजींचं यावेळी दिल्लीत राहणं योग्य नाही. ते कुठं निघून जातील तर बरं!"

" अरे? हे काय बोलतोस? महात्माजीच्या दिल्लीत राहण्यानं तुझं काय बिघडणार आहे?"

" जिथं तिथं गांधीजीबद्दल भलतं-सलतं बोललं जातं. त्यांचा राग केला जातो. त्यांचं कार्य दिल्लीत कुणालाच रुचत नाही."

" मग, आपली जुनी वडीलधारी मंडळी नीट विचार केल्याशिवाय का म्हणतात, 'वास्तववादी तेवढे बहुजन विरोधी!' लोक महात्माजींबद्दल काही बोलोत, कसेही वागोत, पण त्यांची एक पट्टशिष्या आहे. तुझ्या आतेबहिणीसंबंधीच बोलतोय्. तिला एकदा तू महात्मा गांधींच्या दर्शनाला घेऊन जा बाबा. त्या महात्म्याच्या दर्शनानं तिची विकृती कदाचित दूर होऊन जाईल. आजच तिला

'फिट्' आली होती. लवकर शुद्धीवरच येईना. शुद्धीवर येताच एवढ्या जोरात किंचाळली की माझ्या अंगावर शहारे आले. तू किंवा मी वगळून कुणी महनत्त करू शकणार नाही."

"सीतेला महात्माजींचं दर्शन करून द्यायचं असलं तर तिला त्वरित दिल्लीला न्यायला हवं. ते फार दिवस दिल्लीला राहतील असं वाटत नाही. इथलं वातावरणच तसं झालंय्. प्रार्थना-सभेत कुणीतरी बॉम्ब फेकला होता, हे तुम्हाला कळलं ना?"

"न कळायला काय झालं? वर्तमानपत्रात वाचलं होतं खरं. पण महात्मा गांधी काय अशा धमक्यांना भीक घालतात?... बरं, दिल्लीत आणखी कुणाला भेटलास का? काही नवीन बातमी?"– दुरैस्वामींनी विचारलं.

"हं! भेटलो नं! तुमच्या जामातांना भेटून आलो."

हे ऐकून दुरैस्वामींच्या चेहऱ्यावर जिज्ञासा प्रकटली. तरी ती दाबून ते म्हणाले, 'त्याला कशाला भेटलास? त्याला भेटू नकोस असं मी सांगितलं नव्हतं का?"

"मुद्दाम थोडाच भेटलो? अचानक गाठ पडली. असा प्रसंग आला की भेट होऊन गेली. आपले जावई तिसऱ्यांदा माझ्या जिवावर उठले होते. देवाच्या दयेनं सहीसलामत निसटलो."

"अरे हो! निसटलास म्हणून तर इथं माझ्यापुढं येऊन उभा आहेस? बरं, त्यानं तुला काही विचारलं का?"

"विचारलं ना! मला आपल्या बंगल्यावर नेलं अन् विचारलं, सीतेबद्दल तुला काही कळलंय् का?"

"तू काय उत्तर दिलंस?"

"सीता मेली असं सांगितलं."

"अरे पाप्या, असं का सांगितलंस?"

"मग काय सांगू? इकडे तुमची मुलगी म्हणते, की मी जिवंत आहे हे त्यांना कळू देऊ नकोस अन् तिकडे ते राजश्री लग्न करण्यासाठी उतावीळ होऊन बसलेत."

"काय म्हणालास? लग्न करायसाठी उतावीळ झालाय्? त्या दुष्टाबरोबर लग्न करायला कोणती पोरगी तयार होईल?"

"हे काय बोलता मामाजी ? तुमची ज्येष्ठ कन्या आहे न सौभाग्य-कांक्षिणी ! तिच्याविषयीच ते साहेब बोलत होते."

दुरैस्वामी आतापर्यंत लवंडून बोलत होते. सूर्याच्या तोंडून हे ऐकनाच ते खडबडून उठून बसले. मग त्यांनी विचारलं, "सूर्या तो तारिणीबद्दल काही बोलला का ?"

"हां ! त्यांच्या बोलण्यावरून तारिणी व वासंती जिवंत आहेत. ही आनंदाची बातमी आपल्याला कळलीय् !" मीनेच्या नावावर आलेल्या तारिणीच्या पत्राचा उल्लेख करून सूर्यानं सांगितलं.

"तर मग कसंही करून तारिणीला शोधून काढायलाच हवं. सूर्या, आताच तू बोललास तसं व्हायला नको. सावधपणे ते हाणून पाडायलाच हवं. त्यासाठी वाटल्यास आपण सर्व आताच दिल्लीला जाऊ या." दुरैस्वामी म्हणाले.

"मामाजी माझं ऐकाल तर एक सांगतो."– सूर्यानं मृदू स्वरात म्हटलं.

"नवीन काय सांगणार आहेस, सांग तरी."

"सीतेची माझी पहिली भेट राजमपेट्टैच्या रस्त्यात झाली. तुमची तार लपवून सीतेचं राघवन्शी लग्न लागू देण्यामागे माझा हात होता."

"त्यासाठी कितीदा मी तुला शिव्याशाप केले. बरं, तुला काय म्हणायचं आहे ?"– त्यांच्या बोलण्यात उत्सुकता होती.

"मामाजी" सद्भावनेतूनच माझ्या हातून ती चूक झाली. त्या चुकीचं प्रायश्चित्तही मी अनेकदा घेतलंय. रिव्हॉल्वर झाडून आत्महत्त्या करण्याचा तिचा प्रयत्न मीच हाणून पाडला नाही का ? चिनाब नदीच्या भर प्रवाहात बुडून मरत असताना तिला मी वाचवलं ना ?"

"सूर्या गतकाळातील त्या घटनांची पुन्हा उजळणी कशासाठी करतोस ?"

"सीतेवर माझा किती हक्क आहे हे समजून घ्यायला. दोनदा मी तिला यमदूताच्या हातून सोडवलंय. आता सीतेच्या शरीरात जो प्राण आहे तो अगदी नवीन. मी तिला मिळवून दिलेला. आता राघवन्चा तिच्यावर कोणताच अधिकार पोचत नाही. हे तुम्हाला मान्य असलं तर आपण दोघं दिल्लीला जाऊन राघवन्ला सांगू, सीतेला घटस्फोट घेण्याची परवानगी दे."

"त्यानं तशी परवानगी दिली तर ...?" दुरैस्वामींनी रागावून विचारलं

"मला वाटलं, तुम्हीच अनुमानानं ओळखाल... घस्टफोट घेतल्यावर सीतेशी मी स्वतः लग्न लावीन. लग्नानंतर तिला काश्मीरात किंवा नेपाळात घेऊन

जाईन. नवा प्रदेश नि नवे लोक पाहून तिचा रोग नाहीसा होईल. मामाजी, मी प्रतिज्ञा करतो, की मी आयुष्यभर तिचा नीट सांभाळ करीन!"

दुरैस्वामी अय्यरांच्या बाजूलाच एक पिस्तूल पडलं होतं त्यांनी ते उचललं अन् सूर्यावर रोखलं. "सूर्या, लक्षात ठेव. सीतेबद्दल असं काही बोललास तर गोळी घालून ठार करीन!"

सूर्या थोडावेळ मान खाली घालून उभा होता. मग मान वर उचलून त्यानं म्हटलं, "मामाजी, कुठल्या तरी भावनेच्या भारात मी हे बोललो. नाहीतर असं बोललोच नसतो."

"ठीक भावनेच्या भरात बोललो, हे तू कबूल केलंस त्याअर्थी तुझं डोकं ठिकाणावर आहे. विचारशक्ती जागृत आहे. तेव्हा काळजीचं कारण नाही. आताच तू जे काय बडबडलास ते मी तर विसरतोच, तूदेखील विसरून जा. दिल्लीला जायची तयारी कर, जा!"– दुरैस्वामी अय्यर म्हणाले.

52

सीतेच्या दुर्दैवाने तिचे मनोरथ सफल झाले नाहीत. त्यात अडथळे आले. दिल्लीला जाण्याची तयारी करून दोनतीन दिवसांनी जाण्याचा त्यांचा बेत ठरला होता. तो बेत फलद्रूप होण्यापूर्वीच तीस जानेवारीला संध्याकाळी सर्व जगावर वज्राघात करणारी एक बातमी रेडिओवरून ध्वनिक्षेपित करण्यात आली. सर्वदूर ती वार्ता पसरली तशीच ती पानिपत शहरातही कळली. प्रथमतः त्या वृत्तावर कोणाचा विश्वासच बसेना. प्रत्येकजण दुसऱ्याला विचारू लागला, 'काहो, हे खरं आहे का?' कोणी म्हणत होता, 'कोणीही माणूस महात्मा गांधींवर कशी बरं गोळी झाडील?' दुसरा विचारत होता, 'समजा एखाद्या दुष्टानं गोळी झाडलीच तरी असा तडकाफडकी गांधीचा जीव जाऊ शकतो का?' कुणीतरी उगीच ही खोटी

बातमी पसरवली असावी. लवकरच महात्माजी जिवंत आहेत' ही आनंदाची वार्ता येईल.

रात्री साडेआठ वाजता सर्व शंका फिटल्या. पंडित जवाहरलाल नेहरू आणि सरदार पटेल यांच्या मुखानं भारावलेल्या आवाजात गांधीजींच्या मृत्यूच्या बातमीवर शिक्कामोर्तब झालं तेव्हा शंकेला जागाच उरली नाही.

सूर्यानं निर्वासितांच्या छावणीत ती दुष्ट वार्ता ऐकली तसाच तो धावत पळत आपल्या बिऱ्हाडी आला. तिथं त्याला दिसलं, सीता बेशुद्ध पडली असून दुरैस्वामी तिला शुद्धीवर आणण्याच्या प्रयत्नात गुंतले आहेत. सूर्यानं रेडिओवरील वार्ता त्यांना सांगितली. दोघंही कमालीचे व्यथित झाले. आता सीतेला ही बातमी कशी सांगायची याची त्यांना काळजी पडली.

थोड्याच वेळात सीता शुद्धीवर आली. तिनं खुणांनी सांगितलं, मी आता फार दिवस जगत नाही. मला महात्मा गांधींच्या दर्शनासाठी दिल्लीला घेऊन चला. सकाळ होताच सूर्यानं सीतेला दिल्लीला घेऊन जावं, असा त्या दोघांनी निर्णय घेऊन टाकला. असंही ठरवलं की संधी साधून गांधींच्या हत्येची बातमी तिला सांगावी किंवा समक्ष पाहूनच तिला समजू द्यावं.

दुरैस्वामीच्या शरीरात दिल्लीपर्यंत जाण्याचं त्राण नव्हतं. म्हणून आपण दिल्लीला येत नाही असं त्यांनी सांगून टाकलं. तरी दोघांना निरोप देताना सीतेची काळजी घेण्याचं त्यांनी सूर्याला वारंवार बजावलं. हुशारीनं जा अन् तसेच नीट परत या, अशी सूर्याला सूचना दिली.

सीतेच्या आयुष्यात पुन्हा एकदा स्वप्नवत् घटना घडल्या. पानिपतवरून दिल्लीस जाणाऱ्या रस्त्यावर माणसांची अशी रांग लागली होती, की तिच्या मनात शंकांचं काहूर माजलं.

अखेर ती दोघं दिल्लीत पोचली. जुन्या दिल्लीतून नव्या दिल्लीकडे लोकांची सारखी रीघ लागली होती. स्वप्नात असल्यासारखी सीता लोकांच्या मागोमाग चालू लागली.

सूर्या आणि सीता नव्या दिल्लीत पोचली तेव्हा गांधीजीच्या अंत्ययात्रेची तयारी सुरू होती. गर्दीतून धक्के खात दोघंही अंत्यदर्शनासाठी पुढं गेली. आज काहीतरी गंभीर घटना घडणार असं गर्दी पाहून सीतेनं आधीच भाकित केलं होतं. ती मोठ्या चपळाईनं पुढं गेली. तिथं फुलांनी सजविलेला एक रथ होता. त्या पुष्परथात फुलांनी झाकलेला गांधीजींचा देह झोपवला होता. त्यांचा चेहरा

शांत होता. निश्चल होता. जवळच प्रमुख पुढारी बसले होते. सर्वांच्या डोळ्यांना धारा लागल्या होत्या. हे बघताच सीतेला वातावरणातील गांभीर्याचं कारण उमजलं.

लक्षावधी लोक गोळा झाले होते. लोकांचा आक्रोश सुरू होता. सीतेच्या कानात सतत जो समुद्रातील लाटांचा आवाज घुमायचा तो या आक्रोशात मिसळून गेला. गांधीजींची ही काय दशा झाली याची कल्पना येताच तिचे प्राण कंठाशी आले. मस्तकातील एखादी शीर तुटावी किंवा वीणेची मधली तार तुटावी तसं झालं!

थोड्याच वेळात विस्मयाचा धक्का कमी होऊन परिस्थितीची जाणीव होऊ लागली. अयाई ! या महापुरुषाच्या दर्शनाची संधी आपल्या आयुष्यात कितीदा तरी येऊन गेली. पण या ना त्या कारणानं ती चुकत गेली. केवढं हे दुर्भाग्य ! त्याचा प्राण निघून गेला, कलेवर मागं राह्यलं नि आता त्याचं दर्शन घडतंय !

असा प्रकारे विचार करीत सीता अंत्ययात्रेबरोबर चालली होती. मध्येच लोकांची गर्दी धक्काबुक्की करून तिला मागं रेटायची, तर मधेच गर्दीत लोटून ती पुष्परथाजवळ पोचण्याचा प्रयत्न करायची. कसंही करून पुष्परथापर्यंत जावं, गांधीजींच्या पायांना स्पर्श करावा नि तेच हात डोळ्यावरून फिरवावे अशी तीव्र इच्छा तिच्या मनाला होत होती.

त्या गर्दीत तिची व सूर्याची ताटातूट झाली. महात्मा गांधींचं अंत्यदर्शन घेतल्यावर तिला सूर्याची आठवणही झाली नव्हती. पण दोघांची ताटातूट होताच सूर्या घाबरून गेला. तिला शोधण्यासाठी गर्दीत इकडेतिकडे फिरू लागला.

शेवटी संध्याकाळी चार वाजता मिरवणूक यमुनेच्या काठी येऊन पोचली. चंदनाची चिता रचली. अंत्यक्रिया केली गेली. यावेळी सीता गर्दीत मागं लोटली गेली. खूप प्रयत्न करूनही ती पुढं जाऊ शकली नाही.

चितेला अग्नी दिला गेला, धगधगत्या अग्नीच्या ज्वाला आपल्या लाल लाल जिभांनी आकाशाला स्पर्श करू लागल्या. उपस्थित जनसमुदायात असा काही हाहाःकार माजला, की जणू सप्त सागर क्षुब्ध होऊन उसळ्याच मारत होते. त्यानंतर सीतेला तिथं थांबणं असह्य होऊन गेलं. सर्व संपलं होतं. सर्व मनोरथांची राख झाली होती. आता तिथं थांबून काय उपयोग ?

सीता परत निघाली. पण तिला कुठं जायचं होतं ? जायचं ठिकाण निश्चित नसल्यानं पाय नेतील तिकडे ती चालू लागली. यावेळीसुद्धा तिला सूर्याची आठवण झाली नाही. . .

अचानक तिला वासंतीची आठवण झाली. माझी वासंती ! पण तिचं आता काय ? कोण जाणे, ती जिवंत आहे की, ...? जिवंत असली तर तिचं

संगोपन कोण करणार ?... का ? देव आहेच की ! ... देव ! देव असता तर जगात चाललेले अत्याचार अन् त्यामुळं पीडलेले जीव बघत गप्प का बसला असता ? अशा देवाला 'करुणासिंधू' कसं म्हणायचं ?... पण गांधीजी करुणानिधी भगवन्ताबद्दल नेहमी बोलायचे. त्याचा महिमा गायचे. का ? गांधीजींचा हा विश्वास निराधार असेल ?... अशा विचारलहरींवर तरंगत ती पुढं पुढं चालली होती. अखेर तिची सारी शक्ती खलास झाली. पाय लटलटू लागले. सकाळपासून पोटात अन्नाचा कण नव्हता. एका बंगल्याच्या बाहेरची भिंत धरून ती उभी राहिली. बंगल्यातून एक गीत ऐकू आलं. आकाशवाणीवरून ऐकवलं जाणारं ते गीत हृदय पिळवटून काढणारं, डोळ्यांतून अश्रू पाडणारं होतं. तन–मन पाझरून टाकणारं ते गीत होतं—

'हरी ! तुम हरो जन की पीर !'

अगबाई, हे काय मला कानांनी ऐकू येतंय ? खरं गाणं कसं स्पष्ट ऐकायला येतंय्. अमृतासारख कानात शिरतंय्. इतके दिवस कानात लाटांचा आवाज घुमायचा, तो कुठं गेला ? सतत कानठळ्या बसावणारा तो गोंगाट कुठं गेला ?

हे करुणानिधी महात्माजी ! आपल्या करुणेचं कसं वर्णन करू ? आपल्या मृत्यूनं आपण मला जीवदान दिलंत !

ज्यावेळी त्यांचा पार्थिव देह अग्निदेवाला समर्पण केला जात होता त्याचवेळी रेडिओवरून त्यांचं अत्यंत प्रिय असं मीराबाईचं भजन ध्वनिक्षेपित केलं जात होतं...

हरी ! तुम हरो जन की पीर !
द्रौपदी की लाज रखी,
तुम बढाओ चीर !
भगत कारन रूप नरहरी
धर्‍यो आप शरीर
हरिन कश्यप मार लीन्ह्यो
धर्‍यो नांहिन धीर !
बूडतो गजराज राख्यो
कियो बाहर नीर !
दासि मीरा लाल गिरधर
दुख जहां तहं पीर !!

सीता देहभान विसरून ते भजन अैकत स्तब्ध उभी होती. भजन संपलं. चहू-बाजूंनं मोटारीचे कर्णे (हॉर्न) वाजू लागले. निरनिराळे संमिश्र आवाज अैकू येअू लागले.

अंधार बराच पडला होता ! सीतेनं चहूबाजूंना नजर फेकली. त्याचवेळी तिची नजर हात धरून ठेवलेल्या भिंतीकडे गेली. अय्या ! हे काय ? कुणाचं बरं हे घर ? हे तर आपलंच घर दिसतंय् ! कितीतरी वर्ष आपलं घर मानून आपण इथं राहिलो. खात्रीनं हे घर तेच आहे. आता या घरात कोण राहात असेल ? . . . का बरं ? हेच राहात असतील. हा रेडिओसुद्धा तेच अैकत असतील का ? देवानंच मला अिथं धाडलंय्. आत जाअून त्यांना बघून घेअू या का ? आता तरी का नाही म्हणायचं, झालं गेलं गंगेला मिळालं. नव्यानं जीवनाचा आरंभ करू या. हे सारं मी त्यांच्या पुढं बोलू शकेन ?

आपली जीभ पूर्वीसारखीच वळू लागलीय् यांची तिला जाणीव झाली. आपण उत्तम प्रकारे बोल शकू असंही तिला वाटलं . . . सीता धडधडत्या अंन:करणानं नि लटलटत्या पायानं बंगल्याच्या बागेत शिरली.

सीता बिचकन बिचकत बंगल्याच्या प्रवेशद्वारापुढे जाअून उभी राहिली. आतून भजनाचे स्वर बंद झाले होते.

सीता विचारात मग्न झाली असतानाच बंगल्याचं फाटक उघडंल. कोण आलंय कोण जाणे ! आपल्याला दारात उभी पाहून काही म्हणेल तर ? चटकन् ती बाजूला झाली. घराच्या भिंतीआड उभी राहिली. कोण आलंय् याकडे तिचं लक्ष केंद्रित झालं होतं . . .

येणारी व्यक्ती स्त्रीच होती, तिनं आपलं संपूर्ण शरीर झाकून घेतलं होतं. अय्या ! ही कोण ? इथं यावेळी ती का बरं आली ? अरे देवा, या घरात कुणी मुसलमान राहतांसं वाटतंय्. इथं येऊन आपण मूर्खपणाच केला. आपण आत नाही गेलो हेच बरं. ही मुसलमानीण आत जाताच आपण इथून पळून जावं. पण जायचं कुठं ?

ती बुरखाधारी स्त्री पावलांचा आवाज न करता दारापर्यंत गेली. व्हरांड्यात जाऊन उभी राहिली. बिचकत दारापर्यंत गेली. मग हिंमत करून बोटांच्या मागच्या खड्यांनी दारावर ' टिक् टिक् ' केलं. ती टिक् टिक् सीतेला स्पष्ट ऐकू आली. केवढं आश्चर्य. आपली श्रवणशक्ती केवढी वाढली ? खात्रीनं ही महात्मा गांधींचीच कृपा.

घरातून आवाज आला, ' गेट इन ! ' तो आवाज ऐकताच तिच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. त्याच आवाजानं गेल्या बारा वर्षात जेवढं सुख तेवढंच दुःखही दिलं. एकेकाळी त्या आवाजानं तिच्यावर जसा प्रेमाचा वर्षाव केला तसंच त्रस्तही करून सोडले. याच आवाजानं क्रोध अन् तिरस्कार यांचा प्रसाद दिला. खात्रीनं तोच आवाज. घरात तेच आहेत. यांनीच आपल्या गळ्यात मंगळसूत्र बांधून भार्या म्हणून आपला स्वीकार केला. . .

ती बुरखाधारी स्त्री दार उघडून आत गेलेली तिनं बघितली. दुसऱ्याच क्षणी तिच्या मनात आत जाण्याची व तिथं काय घडतं हे बघण्याची उत्कंठा जागी झाली. त्या उत्कंठेनं तिच्या रोमारोमांत शिरून तिला अस्वस्थ केलं. आत जायचंच. पण समोरच्या दारानं नको. दारातून शिरताच बैठक आहे. बैठकीत रेडिओ आहे अन् हे तो ऐकत बसलेत. त्या दारातून आत गेलो तर त्यांना दिसू. आपण ज्या गोष्टी ऐकायसाठी उत्सुक आहोत त्या कशा ऐकता येतील ?

म्हणून मागच्या दारातून जाणंच बरं राहील. मागचं दार बंद नसलं तर आपल्याला सहज प्रवेश मिळून जाईल. अगदी आवाज न करता आपण आत जाऊ. आपल्या आत शिरण्याचा पत्ताही लागणार नाही, त्याचं आपसात चाललेलं बोलणं सहज ऐकता येईल. मागचा दरवाजा उघडा नसला तर शय्यागृहाजवळ जी खिडकी आहे तिच्याआड लपून ऐकता येईल.

सीतेचे पाय तिला मागच्या दाराकडे फरफटत घेऊन गेले. मागचं दार उघडंच होतं. हात लावताच ते उघडलं. सीता पाऊल न वाजू देता आत गेली. रेडिओ असलेल्या खोलीच्या बाजूच्या खोलीत गेली. तिचे पाय कमालीचे थकून गेले होते. म्हणून भिंतीजवळ ठेवलेल्या सोफ्यावर ती बदकन् जाऊन बसली.

" कोण आहेस तू ? इथं का आलीस ? मला वाटतं, हे दुसऱ्याच कुणाचं घर समजून आलीस. जा. इथून चालती हो ! घरात मी एकटाच आहे. कुणी बाईमाणूस नाही. चटकन् चालती हो पाहू. " राघवन् करड्या स्वरात बोलत होता.

" क्षमा करा राघवन् ! मी तुमचा फार वेळ घेणार नाही. लवकरच निघून जाईन. "– तिचाच आवाज होता तो.

तो आवाज ऐकताच तिचं शरीर पुलकित झालं. तारिणीचा होता तो आवाज.

आताच जाऊन ' ताई ! ' म्हणून तारिणीला मिठी मारावी असं सीतेला वाटलं. आपली ती इच्छा तिनं मोठ्या प्रयासानं दाबली. कारण आपण जिवंत

आहोत, हे राघवन्‌ला कळू नये अशी तिची इच्छा होती.

" तारिणी, तू आहेस होय ? हा कुठला विचित्र पोषाख केलास ? अग, हा बुरखा कशासाठी घेतलास ? ये बैस. तुला भेटायसाठी मी किती दिवसांपासून झुरतोय्. खरं म्हणजे तपश्चर्याच चालवली आहे. कृपा करून खाली बैस. " राघवन् म्हणाला.

" हं ! बसत्येच. नाहीतरी फार थकवा आलाय्. तेव्हा जे काय सांगायचं ते बसूनच सांगत्ये. अधिक वेळ घेऊन तुमची अडचण करणार नाही. मलाही घाई आहे. उशीर झाला तर वासंतीला काळजी पडेल. "

" वासंती कुठं आहे तारिणी ? तिला का नाही सोबत आणलंस ? ती बरी आहे ना ? "

" हो, अगदी मजेत आहे. तिच्यासंबंधीच बोलायला आल्येय्. तुम्ही सांगाल तेव्हा तिला इथं आणून पोचवीन. "

" काय म्हणालीस ? पोचवून देशील, असंच ना ? ठीक आहे. ये घेऊन तिला. त्या पोरक्या पोरीला घरात ठेवून घेणं सोपं नाही. कष्ट पडतील. हरकत नाही. घेऊन ये. "

" अहो तिला पोरकी का म्हणता ? सीतेबद्दल तुम्हाला काही निश्चित कळलंय् का ? "

" होय तारिणी. सीता चिनाब नदीत बुडून मेली ! माझ्यासारखा दुर्दैवी माणूस साऱ्या जगात नसेल. सूर्यानं आपल्या डोळ्यानं पाह्यलंय्. " यावेळी तरी दबलेल्या हुंदक्यांचा आवाज आला.

" सीतेला व वासंतीला हुशंगाबादेत एकट्या सोडून या अभद्र नोकरीच्या मागं लागलो. आता ती आठवण होताच काळीज फाटून जातं... पाकिस्तानातील लोक एकाएकी पिशाच्चांसारखे क्रूर बनतील हे तरी मला कुठं ठाऊक होतं ? "

" राघवन्, घडून गेलेल्या गोष्टींची आठवण उकरून काढून कशाला बरं दुःखी होता ? सीता खरंच भाग्याची. विश्वबांधव बापू, ज्यांच्याबद्दल जगाला अभिमान वाटतो, ते एका खुनी इसमाच्या हातून निष्ठुरतेनं मारले जावेत, हे ऐकण्या-पाहण्याचं दुर्भाग्य आमच्याच वाट्याला आलं, बिचारी सीता मात्र या वेदनेतून बचावली. आधीच निघून गेली. याबद्दल तिच्या भाग्याची प्रशंसाच करायला हवी. "

" काल रात्री या क्रूर हत्येची वार्ता ऐकली तेव्हापासून तर मला सारखी सीतेची आठवण येते. तिची महात्माजींवर अपार श्रद्धा होती. आम्ही पंजाबात होतो त्यावेळी ती गांधीजींना ईश्वर मानून त्यांची पूजा करायची."

" सीतेनं फार पुण्य जोडलंय् ! बरं, मिस्टर राघवन्, येत्ये मी. उद्या सकाळीच आपली मुलगी वासंती मी इथं आणून पोचवीन."

" उद्याची गोष्ट सोड. मी आत्ता कार घेऊन चलतो. जाऊन वासंतीला इथं घेऊन येऊ. मात्र पोरीला अशी पोरकी सोडून तुला निघून जाता यायचं नाही. तू सीतेचं स्थान ग्रहण करून मुलगी नि घर सांभाळणार असलीस तरच मी ही जबाबदारी पत्करायला तयार आहे."

" अय्या ऽ ! तुम्ही हे काय बोलता ? सीतेची जागा मी घ्यावी म्हणता ? म्हणजे तुमच्या डोक्यातलं जुनं वेड अजून गेलेलं नाही."

नाही. जुनं वेड जाणार कसं ? तूच विचार कर तारिणी... या घरात राहून वासंतीचं संगोपन करायला तू दुसरी सोडून कोण योग्य व्यक्ती आहे ? तू माझ्याशी लग्न करायला तयार असलीस तरच... पण तुला हे पटायचं नाही. पुन्हा केव्हा बोलू. आज आपलं मन सुन्न झालंय. अस्वस्थ झालंय. आता आधी आपण वासंतीला घेऊन येऊ. मात्र आधी तू हा बुरखा काढून फेक. तुझा हा विचित्र वेष मला मुळीच पसंत नाही."

" बरं बाई ! मी हा बुरखा आत्ताच काढून टाकते. तो आता काढायलाच हवा. मात्र लग्नाची गोष्ट आणखी एखाद्या दिवसासाठी राखून ठेवू इच्छित नाही. आताच सारं काही पक्कं करून टाकू. माझ्या मनाला समाधान वाटेल."

" फारच उत्तम ! चांगल्या गोष्टींना विलंब कशाला हवा ? आताच ठरवून टाकू या. खरं तर निश्चित करायला उरलंच काय ? तू होकार दिलास म्हणजे झालं ! मी तर गेली चौदा वर्ष त्यासाठी तपश्चर्या करतोय्."

" माझा होकार देण्याआधी एक गोष्ट सांगून टाकत्ये. तुम्ही माझ्याशी लग्न लावायला तयार असलात तर मी तुमच्याशी जरूर लग्न करीन, असं आश्वासन मी सीतेला दिलंय्."

" मग, आपलं ते आश्वासन पूर्ण करणार, की त्याची विल्हेवाट लावणार ?"

" जिवंतपणी सीतेला माझ्यामुळं खूपच यातना भोगाव्या लागल्या. तिला वाचवण्याचा अखेरचा प्रयत्नही विफल ठरला. निदान सीतेच्या आत्म्याला शांती मिळायला हवी ? म्हणून मी तिला दिलेलं वचन मोडणार नाही. तुमची

माझ्याशी लग्न करायची इच्छा आहे तर मीदेखील तुमच्याशी लग्न करायला तयार आहे. मात्र तुम्ही नीट विचार करून पावलं उचलायला हवीत हं ! ”

आतापर्यंत सीता सोफ्यावर बसून होती ती एकदम उठून उभी राहिली. ‘ अग वेडे अजून इथं उभी का ? जा चालू लाग. मन खंबीर आहे तोपर्यंत इथून निघून जाणं बरं. पुन्हा मन चळलं तर काय करशील ? ” अशी अंतर्मनाची चेतावणी मिळतांच पायाची चाहूल न लागू देता सीता निथून निघाली. मागच्या दारानं बाहेर पडून तिनं घराला एक प्रदक्षिणा घातली व फाटकाशी आली. फाटकातून हळूच बाहेर पडून ती झपाझप चालू लागली. सर्व बाजूंना गडद अंधार पसरला होता...

राघवन् एकदम खेकसला. “ नीट विचार करा, असा सारखा जप काय चालवला आहेस ग ? पुरेपूर विचार केलाय्. आता विचार करण्यासारखं उरलंच काय ? ”

बुरखा न काढता उभ्या असलेल्या तारिणीला एकदम हसू आलं. तिचं हसणं ऐकून नकळत राघवन् भ्याला. तरी भीती न दाखवता म्हणाला, “ हसायला ग काय झालं ? वेळीअवेळी अशी हसत्येस का ? ”

“ क्षमा करा. चुकल्ये मी ! हसायला नको होतं हे कबूल करत्ये... तुम्ही काहीही म्हटलंत तरी मी तुम्हाला विचार करायला अजून एक दिवसाचा—संपूर्ण चोवीस तासाचा—वेळ देत्ये. उद्या ठीक याचवेळी वासंतीला इथं घेऊन येईन. ”

“ तुझा हट्टी स्वभाव काही अजून गेलेला नाही. ठीक आहे. तू आपल्या इच्छेनुसार वासंतीला उद्या संध्याकाळीच आण. फक्त जाण्यापूर्वी बुरखा काढून आपला मुखचंद्र तेवढा दाखवून जा. ” राघवन् म्हणाला.

तारिणी मिनिटभर स्तब्ध उभी राहिली. मग म्हणाली, ” बरं ! तुमची इच्छा आताच पूर्ण करत्ये. मग मला दोष देऊ नका हं ! ”

एवढं बोलून तारिणीनं अंगावरचा बुरखा काढला....

राघवन्ला काय दिसलं ? जिच्या दर्शनासाठी तो आसुसला होता ती तारिणी, हृदयपटलावर कोरून ठेवलेल मोहक व मनोहारी तारिणी, सीतेच्या सख्या बहिणीशी चंद्राशी स्पर्धा करणारी स्वरूपसुंदरी त्याच्या पुढं नव्हती.

राघवन्ला दिसली एक भयानक आकृती. एक हात तुटलेला. एका डोळ्याची नुसतीच खाच अन् चेहऱ्यावर कपाळापासून डाव्या गालापर्यंत लागलेल्या आडव्या

घावाची खूण, असं ते बीभत्स रूप होतं !

सुंदर राघवन्‌च्या मनात भय, तिरस्कार, वेदना अशा कितीतरी भावना उचंबळून आल्या. तो थक्क झाला. त्याचे डोळे पांढरे व्हायला आले. तोंड उघडंच राहिलं. अंगातली शक्तीच नाहीशी झाली. उभं राहणं अशक्य होऊन तो सोफ्यावर धपकन् आदळलाच !

ती आकृती बोलू लागली तेव्हा तिच्या मुखात समोरचे दोन दात नसल्याचं दिसून आलं. त्यामुळे चेहऱ्याची विद्रूपता अधिकच वाढली होती.

" क्षमा करा राघवन् ! ! आज मी तुम्हाला दुःखात लोटणार नव्हत्ये. पण तुम्ही ऐकलं नाही." तारिणी बोलली.

अं ? विद्रूप झाली असली तरी खात्रीनं ती तारिणीच होती ! तरीसुद्धा राघवन्‌चा स्वतःवरच विश्वास बसत नव्हता.

" बरं ! आता मी येत्ये. संपूर्ण एक दिवस नीट विचार करून काय ते ठरवा. एकच दिवस कशाला, हवातर अेक आठवडा घ्या. मात्र चांगला विचार करूनच निर्णय घ्या."

राघवन्‌च्या डोक्यात जणू शेकडो पिशाच्चांनी प्रवेश केला आणि विकट हास्य करून त्याचा उपहास चालवला . , .

" तारिणी जाऊ नकोस. थांब ! थांब, मला काहीतरी सांगून जा नाहीतर मला वेड लागेल ग." राघवन् किंचाळला.

तारिणी खाली बसली अन् म्हणाली, ' देवाशपथ असे डोक्यात राख घालू नका. अेवढं मनाला लावून घेऊ नका. मी तरी काय सांगणार ? तुम्ही विचाराल ते सांगेन."

राघवन्‌नं अेकवार तिच्याकडे निरखून बघितलं. मग टेबालवर डोकं टेकून स्फुंदून रडू लागला...

" अहो, तुम्ही अेवढे शिकलेले. तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी. झाल्यागेल्या गोष्टीचं स्मरण करून रडत बसल्यानं काय होणार ? आजवर दैवावर का कुणाला विजय मिळालाय् ? "–तारिणीनं विचारलं.

राघवन्‌नं हळूच डोकं वर उचललं नि चाचरत विचारलं, " तारिणी त्या विधात्यानं हे भीषण दृश्य दाखवण्यासाठीच का मला जिवंत ठेवलंय् ? कलकत्त्यातच मला का मृत्यू आला नाही ? "

"दैवावर विजय मिळवण्याची शक्ती देवानं आपल्याला दिली नाही. पण मोठ्यात मोठ्या संकटांवर नि दुःखावर विजय मिळविण्याची शक्ती दिली. महात्मा गांधीच्या निधनामुळे आज सारं जग दुःखात बुडालंय. अेक महिन्यानंतर सर्व लोक त्यांना विसरून जातील. पुन्हा आपल्या कामाला लागतील. जगात कोणतंच सुख किंवा दुःख शाश्वत नाही. त्यानं आम्हाला दुःख विसरण्याची शक्ती दिली ही देवाची दयाच म्हटली पाहिजे. "– तारिणी म्हणाली.

"देवाचं नाव काढू नकोस. देव नाहीच हे मी शपथेवर सांगू शकतो. तुला या विद्रूप अवस्थेत बघितल्यावर माझा देवावर कसा विश्वास बसेल ?" राघवन्नं विचारलं.

"ही विद्रूपता आल्यावरच माझा देवावर खरोखर विश्वास बसलाय. त्याच्याच दयेनं मी माझ्या पालनकर्त्या आईच्या व तुमचा लाडक्या वासंतीचा जीव वाचवू शकल्ये. अगदी योग्य वेळी देवानं मला त्या ठिकाणी पोचवलं. त्या दोघींना वाचण्याच्या प्रयत्नात मला हात गमवावा लागला, एका डोळ्याला मुकावं लागलं अन् सुऱ्याचा जबरदस्त वार झेलावा लागला. तरी मी आपल्या पालनकर्तीचा नि तुमच्या मुलीचा जीव वाचवू शकल्ये ही देवाची कृपाच नव्हे का ?"

त्यानंतर तारिणीनं सांगितलं, रजनीपूर राज्यातील एका मशिदीत काही बायकांना वाचविण्यासाठी बंद करून ठेवण्यात आलं होतं. काही उन्मत्त गुंडांनी त्या मशिदीला आग लावून दिली आणि बंद करून ठेवलेल्या बायकांना जाळून मारण्याचा घाट घातला. त्यांच्याशी तिनं एकटीनं सामना दिला. तेवढ्यात संस्थानची महाराणी मोठं सैन्य घेऊन तिथं आली. आणि तारिणीला व त्या स्त्रियांना जीवदान दिलं.

राघवन्नं पूर्वीच वृत्तपत्रांतून या बातम्या वाचलेल्या होत्या. त्यावेळी रजनीपूरच्या राणीनं मुसलमानांच्या मशिदीचं संरक्षण केल्याबद्दल त्याला फार राग आला होता. तारिणीच्या तोंडून ही सर्व हकीगत ऐकल्यावर त्याचं मन पार बदललं. मतच नव्हे विचारही बदलून गेले. 'हे भगवंता ! त्याच मशिदीत सापडलेल्या माझ्या वासंतीचे प्राण वाचले ? ही सारी तुझीच कृपा !....'

नेमकी याचवेळी टेलिफोनची घंटी वाजली.

53

तरिणीच्या तोंडन साऱ्या गोष्टी ऐकून राघवन्‌च्या हृदयात उलथापालथ होऊन गेली. त्या विचारचक्रातून सुटण्याचा मार्ग सापडत नव्हता. टेलिफोनच्या घंटीमुळं कोंडीतून सुटण्याचं साधन मिळालं. विषय बदलायला ते चांगलं निमित्त होतं.

"यावेळी कोणाला आठवण झाली ? नसता त्रास ! "

त्रासिकपणे राघवन्‌नं टेलिफोनचा रिसीव्हर उचलला, " हॅलो ! कोण बोलतंय् ? "

टेलिफोनवरून त्याला कळलेली बातमी आश्चर्यात टाकणारी असावी. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव भराभर बदलत गेले.

रिसीव्हर खाली ठेवताच तो तारिणीला म्हणाला, 'ऐकलंस का तारिणी, सीता बुडून मेली ही गोष्ट एकदम खोटी आहे. सूर्या माझ्याशी का खोटं बोलला हेच कळत नाही ? दिवाणसाहेबांची मुलगी भामा तुला माहीत आहेच. तिच्या घरी सीता यावेळी असून सूर्याही तिथंच आहे. भामेनं मला तातडीनं बोलावलंय्. तू माझ्यासोबत..."

राघवन् जे बोलणार होता ते न बोलता थांबला.

त्याच्या स्वरात जे कुतूहल होतं त्याचा नेमका अर्थ तारिणीला कळला. केवळ सीता जिवंत आहे एवढ्यानंच तो आनंदित झाला नव्हता तर आता अधू झालेल्या तारिणीशी लग्न करण्याचा निर्णय घेण्याची गरज नाही म्हणून तो प्रसन्न झाला होता.

"मीसुद्धा येत्ये." तारिणीनं म्हटलं.

राघवन्‌न मोठ्या त्वरेनं मोटार बाहेर काढली. तारिणी मागच्या सीटवर जाऊन बसली. गाडीतून जाताना त्यानं टेलिफोनवरील बातमीचा सारांश सांगितला तो असा :

सीता व तिचे वडील आतापर्यंत पानिपतलाच राहात होते. आजच सूर्या गांधीजीच्या अंत्ययात्रेसाठी सीतेला दिल्लीत घेऊन आला. गर्दीत दोघांची ताटातूट

झाली. गर्दीत तिला शोधताना योगायोगानं सूर्याची भामेशी गाठ पडली. त्याने सीतेची चुकामूक झाल्याची बातमी भामेला सांगितली. पोलिसात वर्दी देऊन सीतेचा शोध लावण्याच्या विचारान ती घरी आली. भामेच्या दाराशीच सीता बेशुद्धावस्थेत पडली होती. दोघांनी तिला आत नेलं. आता तिला शुद्धीवर आणण्यासाठी उपचार चालू आहेत. डॉक्टर आले आहेत. पण एक आश्चर्य बघ तारिणी, नेमकी आजच सीता सापडली. ही देवाचीच दया म्हणावी लागेल !

गाडी भामेच्या दारात येऊन उभी राहिली. गाडीचा आवाज ऐकताच सूर्या व भामा दारात आले. भामेनं राघवन्चा हात धरून ' चला लवकर ' असं म्हणून आत नेलं. आत जाताना राघवन सूर्याला म्हणाला, " तू मला चांगलीच थाप दिलीस. हरकत नाही. मोटारीत तारिणी बसली आहे. जा, तिला भेटून घे. " तारिणीचं ते भयाण स्वरूप पाहून सूर्याची कशी केविलवाणी स्थिती होईल असा विचार त्यावेळी त्याच्या मनात आल्यावाचून राहिला नाही.

लगबगीनं पावलं टाकत यणाऱ्या सूर्याकडे बघत तारिणीनं विचारलं, " कशी आहे आता सीतेची प्रकृती ? "

" ती वाचणं कठीण आहे, असं डॉक्टर म्हणतात. आताच मूर्च्छेतून शुद्धीवर आलीय्. शुद्धीवर येताच तिनं तुझं अन् वासंतीचं नाव घेतलं. "

" अरे देवा ! मग आताच जाऊन वासंतीला आणायला हवं. आपल्या जुन्या घरी आहे ती. तुम्ही जरा येता का बरोबर ? "—तारिणीनं विचारलं.

" अवश्य ! बिचारा राघवन् शेवटच्या घटकेला का होईना, थोडावेळ सीतेशी एकान्तात बोलून मन:शांतीचा लाभ घेवो." सूर्या म्हणाला.

डॉक्टर इन्जेक्शन द्यायसाठी औषध भरत होते.

राघवन् सीतेचं डोकं मांडीवर घेऊन बसला होता. त्याच्या तोंडून हुंदक्यांचा आवाज वारंवार ऐकू येत होता.

सीतेनं क्षीण स्वरात अडखळत म्हटलं, " तुम्ही का बरं रडता ? कस्तुरबांसारखं मलाही तुमच्या मांडीवर मरण यावं, म्हणून मी तप केलं. ते माझं तप फळाला आलं.. यापेक्षा भाग्याचं मरणं कोणतं असणार ?... या माझ्या भाग्याचं कौतुक करायचं !... रडू नका ! "

एकीकडे राघवन् दु:खाच्या भारानं व्यथित झाला होता नि दुसरीकडे आपल्या अन्याय्य गतकर्माबद्दल लज्जित झाला होता. तो म्हणाला, " असं बोलू

नकोस ग सीता ! तुला काही झालेलं नाही, लवकरच बरी होऊन तू हिंड–फिरू लागशील."

"नाही ! आता मी थोड्या वेळाची सोबती आहे. माझं मनच मला सांगतंय्. तारिणीताई यावेळी कुठं आहे ? तिला जरा इकडे बोलवता ? "

"वासंतीला आणायला गेलीय् ... हे बघ, तुला वाटतं तसं व्हायचं नाही. मला असं दुःखात लोटून तुझं निघून जाणं देवालासुद्धा आवडायचं नाही." राघवन् म्हणाला. त्याच वेळी तो मनोमन प्रार्थना करीत होता, 'देवा ! सीतेला एकदाच जीवदान दे ! मी आपलं वर्तन सुधारीन. स्वार्थात गुरफटणार नाही. सीतेला यापुढं सुखात ठेवीन.'

"माझी एक तीव्र इच्छा आहे. मी कायमचे डोळे मिटल्यावर तुम्ही तारिणीताईशी लग्न करून घ्या. ताईनं मला तसं वचन दिलंय्. ती आपलं वचन मोडणार नाही." सीतेनं म्हटलं.

थोड्याच वेळात तारिणी व सूर्या वासंतीला घेऊन आली. सीतेनं आपले अशक्त हात पुढं करून वासंतीला आपल्याजवळ ओढण्याचा प्रयत्न केला. पण तिची शक्ती अपुरी पडली.

तारिणीनं हे पाहिलं. अन् वासंतीला तिची आईच्या उशाजवळ नेलं.

सीतेनं डोळे उघडून पाहिलं. आपल्या समोर एक बुरखेवाली बाई बसलेली पाहून तिनं विचारलं, "ही कोण ?"

"तू मला ओळखलं नाहीस का सीता ? "–तारिणीनं विचारलं. आवाजावरून सीतेला तिची ओळख पटली.

"आलीस ताई ? आनंद वाटला. आता माझं मन शांत झालं ... तू यांच्याशी जे बोललीस ते मी लपून ऐकलं. मला कसलीच काळजी उरली नाही.... पण तू आपलं तोंड बुरख्यात का झाकून ठेवलंस ? बुरखा काढ बरं ताई. मरणापूर्वी एकदा तुझा चेहरा डोळे भरून बघावासा वाटतो. तुझा चेहरा पाह्यचा अन् तोच मनात साठवून परलोक प्रवास सुरू करायचा..."

बोलता बोलता सीतेला ग्लानी आली तिचे डोळे आपोआप मिटले.

"सीता, मी आपला बुरखा काढत्ये. एकदा माझ्याकडे डोळे भरून बघ तरी. मात्र भ्यायचं नाही. तुझ्या लेकीला वाचवण्याच्या प्रयत्नात ही दशा झालीय्. मात्र त्यासाठी तू वाईट वाटून घेऊ नकोस..."

सीतेला तिचं बोलणं नीट ऐकू आलंच नाही...

बुरखा काढल्यावर सीतेनं तारिणीकडे प्रयासानं पाहिलं. एकदम तिच्या डोळ्यात विझायला आलेल्या निरांजनाच्या ज्योतीची दीप्ती चमकली.

पूर्वीपेक्षा अधिक क्षीण आवाजात ती बोलू लागली. तिच्या स्वरात आश्चर्य व आनंद व्यक्त होत होता. तिनं म्हटलं, ताई, तुझा मुखचंद्र किती सुंदर आहे!... तुझं सौंदर्य पूर्वी पाह्यलं होतं ... पण आता त्यात भर पडलीय् ... खरंच, तू सौंदर्यवती आहेस ! तुझ्यावरून यांनी जीव ओवाळून टाकला होता, ते ठीकच होतं. माझ्यावर ते प्रेम करू शकले नाहीत, यात नवल नाही ... तरी मी मोठी भाग्यवती बरं का ताई ! माझी कोणाबद्दल काही तक्रार नाही. मी अगदी शांत मनानं चाललेय्. माझ्यासाठी तुम्ही कुणी दु:ख करू नका ..- सूर्या वेडा आहे. तो उगीच माझ्यासाठी रडेल. त्याची समजून घाल ...

सीतेच्या तोंडून आपलं नाव ऐकून सूर्या तिच्याजवळ गेला. अन् वाकून म्हणाला. " सीता, हा मी आलोय्. "

सीता अगदी क्षीण आवाज म्हणाली, " सूर्या, मी अभागिनी आहे रे ! ... तू लवकर लग्न करून घे. "

खरंच सीता मोठीच भाग्यवती होती.

सूर्या ओक्साबोक्शी रडू लागला. सुंदर राघवन् स्फुंदून स्फुंदून रडू लागला. तारिणी आणि वासंती असह्य दु:खाने मोठमोठ्यांदा रडू लागल्या.

पण सीतेला त्यांचं रडणं, ओरडणं काही ऐकू आलं नाही. तिच्या पंचेंद्रियांवर त्याची कोणतीच प्रतिक्रिया झाली नाही.

तिचे प्राण हा नश्वर देह त्याग करून आकाशमार्गाकडे निघून गेले.

तिचा आत्मा वर, वर, आणखी वर जातच राहिला. इंद्रधनुष्यांच्या रंगांत न्हाऊन पुढे निघाला. पांढऱ्याशुभ्र ढगांच्या समूहाचा छेद करीत जाऊ लागला. मंद मंद वाऱ्याच्या झुळुका आपल्यासवे जो सुगंध वाहून आणीत होत्या त्यांचा आस्वाद घेत राहिला. माधुर्याची पराकाष्ठा असलेल्या गीतामृताचे पान करीत निघाला.

थोड्या वेळाने देवलोकातील पारिजात, मंदारसारख्या वृक्षांची फुले पडू लागली. जणू पुष्पवर्षावच होऊ लागली. ती फुलं सीतेभोवती गिरक्या घेऊन स्वत:मध्ये विलीन होऊन जाऊ लागली.

झालं. मग काय होतं ? दाट निळ्या रंगाचं आकाश होतं. अनंत आकाश;

अपार मिळा वर्ण. आदि व अंत नसलेल्या आनंदाचा प्रवाह. सीतेचा आत्मा त्याच्याशी एकरूप होऊन अद्वैतानंदास जाऊन मिळाला.

खरोखरच सीता मोठी भाग्याची !

54

देवपट्टणम्च्या मुख्य रस्त्यावर समोरासमोर जी दोनमजली घर होती, त्या घरावर आता पूर्वीच्या पाट्या नव्हत्या. ॲडव्होकेट अय्यरांचं अनुकरण करून त्यांचे मित्र दामोदरम् पिल्लेदेखील परलोकाला निघून गेले होते. त्यांनी स्वर्गाच्या न्यायालतसुद्धा वकिली सुरू केली की काय, कोण जाणे !

दामोदरम् पिल्ले मृत्युशय्येवर पडून होते तेव्हा अमरनाथ कलकत्त्यावरून देवपट्टणम्ला आला. वडिलांच्या मृत्यूनंतर कलकत्त्याला परत जायची इच्छा त्याला झाली नाही.

अमरनाथ आणि पट्टाभिरामन् हे दोघेही मित्र स्वतंत्र भारताच्या आर्थिक विकासाला हातभार लावण्याच्या इराद्यानं एखादा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याच्या विचारात असतानाच महात्मा गांधींच्या अमानुष हत्येची वार्ता आली. त्या वार्तेनं ते शोकाकुल झाले. मागोमाग सीतेच्या मृत्यूची बातमी कळली तेव्हा तर त्यांच्यावर वज्राघातच झाला.

कलकत्त्याच्या सडकेवर मूर्च्छित पडलेल्या सीतेचा अमरनाथनंच जीव वाचवला होता. त्यानंतर त्या नवराबायकोला तिच्याबद्दल इतकी आपुलकी वाटू लागली की जणू ती त्यांच्या कुटुंबातील एक होती. तिच्या अकाली निधनानं तो शोकविव्हल होऊन गेला. पट्टाभिरामन्ची तशीच अवस्था झाली. त्याला सार्वजनिक जीवनात पुढं आणण्यात सीतेनंच पुढाकार घेतला होता. दोघेही मित्र सीतेच्या गुणदोषांची चर्चा करून आपलं दुःख विसरण्याचा प्रयत्न करीत राहिले. मात्र प्रत्येकानं आपलं मत व्यक्त होऊ दिलं नाही.

चित्रा आणि ललिता हे मानायलाच तयार नव्हत्या, की सीतेच्या ठिकाणी कुठलाही दुर्गुण होता. ललितेनं तर सर्व दोषांचं खापर स्वतःच्या माथी फोडून घेतलं अन् आपल्या वर्तनाबद्दल पश्चात्ताप करीत राहिली. सीतेच्या विपत्तींच्या मुळाशी आपणच आहोत याचं तिला अती दुःख झालं. वास्तविक सुंदर राघवन् आपल्यालाच बघायला आला होता. आल्यावर त्याला सीता दिसली. त्यानं हट्ट करून तिच्याशी लग्न लावलं. राघवन्शी विवाह झाल्यानं आपल्याला ज्या यातना भोगाव्या लागल्या असत्या सीतेनं भोगल्या त्या एवढंच नव्हे तर ती देवपट्टणम्‌ला येऊन राहिली तरीही तिनं आपल्या मनातलं दुःख कळू दिलं नाही. हृदयात दुःख बाळगून वरवर आनंदी असायची. ती या घरात होती तेव्हा घरात वर्दळ असायची. घर कसं भरलेलं वाटायचं.

अशा रीतीनं जुन्या आठवणी काढून सारखा शोक करणाऱ्या ललितेला चित्रानं अनेक प्रकारे समजावलं. तरी ती पुनःपुन्हा मूळ पदावर येत म्हणायची, " तू कितीही समजूत घातलीस तरी मनाला पटत नाही. बिचाऱ्या सीतेनं जन्मभर दुःख भोगलं अन् शेवटी पिचून मेली ग ! "

" सीतेनं आपल्या जीवनात सुखाचा अनुभवच घेतला नाही, असं का तुला वाटतं ? अग, वेडी आहेस तू. ललिता मीसुद्धा तिच्या संपर्कात राहून चुकल्ये. तिनं अत्यधिक सुख अन् अत्यधिक दुःख भोगलंय् बाई. बंगालचे महाकवी रवींद्रनाथ ठाकूर काय म्हणतात, आहे ठाऊक ? ' देवा, मला या जीवनात दुसरं कोणतंच भाग्य नको. केवळ अश्रू ढाळून रडण्याचं भाग्य लाभू दे, सुखदुःखाच्या संमिश्रणानं भरलेलं जीवन हेच खरं जीवन होय !' अग ऽ , काव्य, अितिहास पुराण यांपैकी कशातीलही कथा घे. तिच्यातील नायकनायिकांपैकी कोणाच्या वाट्याला दुःख आलेलं नाहीय् ? " चित्रानं विचारलं.

" सीतेच्या जीवनाचीच आता एक कहाणी बनलीय्. चित्रा, तुला ठावूक असेल अगर नसेल, सीतेला पूर्वीपासून कथा-कहाण्यांची खूप आवड होती. राजमपेट्टेमधील तलावाच्या किनाऱ्यावर चांदण्या रात्री तिनं मला कितीतरी कथा ऐकवल्या होत्या. आठवण झाली की हृदय पिळवटून निघतं. कथा तरी कशी नि किती ? दुष्यंत–शकुंतलेपासून लैला–मजनू नि रोमिओ-ज्यलिएटपर्यंत तऱ्हेतऱ्हेच्या देशो–देशीच्या कथा. कथा सांगताना ती इतकी भावनाविवश होऊन जायची, जणू तीच स्वतः नायिका आहे. अरेरे ! बिचारीनं आपलं उरात किती स्वप्नं बाळगली असतील, कोण जाणे ! पण एकही स्वप्न साकार झालं नाही. नशिबानं एकही सुख

मिळालं नाही. बिचारी अपुऱ्या खेळातून उठून गेली !" असं बोलून ललिता रडू लागली.

"सीतेच्या आठवणी काढून किती अश्रू ढाळशील, किती कुढशील ? पण तिची अेक मोठी बहीण आहे. तिचा विचारही तुझ्या मनात येत नाही. बिचारी अेक हात व अेक डोळा गमावनही अजून जिवंत आहे. तिची काय दुर्दशा झाली असेल याचा विचार कर पाहू." चित्रानं म्हटलं.

ललितेचं आक्रंदन अेकदम थांबले —अश्रू डोळ्यातच थिजले.

"तिच्या व्यंगपूर्ण अवस्थेचं स्मरण होताच हृदय फाटून जातं. मी अजून त्या आपल्या थोरल्या आतेबहिणीला बघितलं नाही. पाहिल्यांदाच पाह्यचं तेच का अशा विद्रूप रूपानं ? —या विचारानं माझं मन विव्हळ होतं."

"तू केवळ आपल्याच मनाचा विचार करत्येस ललिता. जरा आपल्या भावाकडे बघ. खरा धीराचा पुरुष ! अशा अपंग स्त्रीशी विवाह करण्याचा विचार अशा धीराच्या माणसाशिवाय कोणाच्या मनात येणार ? अग बाई ऽ, आपली अशी दशा आली असती तर आपले नवरे कुठल्या कुठं पळून गेले असते !"

"ते सर्व ठीक आहे चित्रा, पण त्याचं हे तुला कृत्य योग्य वाटतं का ? मलातर मुळीच आवडलं नाही. अशा लग्नाची काय जरूर येअून पडली ? अेका हातानं अपंग अन् अेका डोळ्यानं अधू बाईशी कशाला ग लग्न करायचं ? आमच्या आईला हे कळलं तर ती पटकन् प्राण सोडून देईल."

"प्राण सोडील तर सोडू दे. जगात कितीतरी लोक मरतात. मिनिटाला लक्षावधी जीव जातात. महात्मा गांधीसुद्धा मेलेच. तुझ्या आईमुळं असं काय अडून पडणार आहे ? सूर्यासारखं नररत्न तिच्या पोटी आलं, याची तिला जाणीव नसली तर कोण काय करणार ? तुझ्या जागी मी असत्ये ना तर असा अलौकिक भाअू मिळाला म्हणून गर्वानं फुगून गेले असत्ये नि आनंदान नाचल्ये असत्ये." —चित्रा म्हणाली.

दोन्ही काठाला घनदाट वृक्षांनी वेढलेल्या राजमपेट्टे गावाची सडक तशीच लांबवर पसरली होती. तिच्या बाजूला असलेलं पोस्ट ऑफिस पंधरा वर्षांपासून तसंच होतं.

गावच्या ब्राह्मण आळीतही काही विशेष बदल जाणवत नव्हता. जगात केवढीही उलथापालथ होवो, आमच्या भागातील ग्रामीण जीवनावर त्याचा परिणाम व्हायचा नाही. मात्र गावात आता पूर्वीसारखी वर्दळ नव्हती. कारण तिथले पाटील

किट्टावय्यर स्वर्गवासी झाले. होते परंपरेनं चालत आलेली पाटीलकी शुंडू ऊर्फ श्यामसुंदर याच्याकडे आली होती.

ललिता आपल्या आईच्या भेटीसाठी देवपट्टणम्‌वरून माहेरी आली होती. दारावर 'पत्र घ्या' अशी हाक ऐकू येताच ललिता दाराकडे धावली. तिची जुनी सवय अद्याप गेली नव्हती.

पत्र तिच्या नवऱ्याचं होतं. मुलांच्या क्षेम-कुशलाची चौकशी करून त्यानं पुढं लिहिलं होतं–

'एक आश्चर्यकारक बातमी कळवायची आहे, ऐकून तुला चक्कर न येवो ! तुझा भाऊ सूर्या इथं आलाय्, सोबत आपल्या बायकोलाही आणलंय्. त्याच्या बायकोला पाहून तुझी फसगत होईल. पत्रात खुलासा करायचा नाही. स्वत: डोळ्यांनी पाहूनच उलगडा करून घे. आम्ही तिघं उद्या तिथं येत आहेत.'

पत्र वाचून ललितेची उत्कंठा शिगेला पोचली. राजमपेट्टेला ललिता आली होती. ती मुख्यत: आईला सूर्याच्या लग्नाची पूर्वसूचना देण्यासाठी पण अजून बोलायचा धीर झाला नव्हता. आता टाळून चालणार नव्हतं. उद्या तर तो आपल्या बायकोला घेऊन इथं यायचाय्.

शेवटी तिनं आईला सांगून टाकलं, की सूर्यानं लग्न केलंय् अन् बायकोला घेऊन तो उद्या इथं येणार आहे.

हे ऐकून सरस्वती अम्मा थक्क झाल्या !

"काय म्हणालीस ? सूर्याचं लग्न झालं. आम्हाला न कळता झालं ? काही तरीच. असं कसं होईल ? पोरगी कोण, कुठली, कशी आहे ? कळत नाही–" विद्ध स्वरात अम्मा बडबडू लागल्या.

"मलादेखील कल्पना नाही आई. आधीच माझ्या कानावर तशी बातमी आली होती खरी पण विश्वास बसला नाही. पण बातमी खरी होती असं आता वाटतंय्." ललिता म्हणाली.

"काय बातमी आली होती ?"

"सूर्यानं ज्या मुलीशी लग्न लेलं ती अधू असल्याचं ऐकलं होतं. कुणी म्हणतं, तिला एक डोळाच नाही. कुणी म्हणतात, एक हातच नाही. सूर्याची कामंच अशी बेहिशोबी. काय सांगू आई, ऐकल्यापासून मन ठिकाणावर नाही."

"हे काय मेलं जगावेगळं ? असं कोणी मुलगा करील का ? काय ग

ललिता, हे खरं असेल का अन् खरं असलं तर मी चारचौघांत कसं तोंड दाखवू ? " सरस्वती अम्मांचा कंठ दाटून आला.

पट्टाभिरामन्, सूर्या नि त्याची बायको बैलगाडीनं येऊन पोचले. ललिता लगबगीनं दाराकडे गेली. तारिणीला बघायला ती अगदी उतावीळ झाली होती.

तिनं आपलं मन आवरण्याचा खूप प्रयत्न केला. पण ऐनवेळी त्यानं धोका दिला, तिला दारात नेऊन उभं केलं. तिचं काळीज धडधडत होतं. आईनं संमती दिली नाही तर काय होईल, याची तिला भीती पडली होती.

प्रथम पट्टाभिरामन् अन् सूर्या खाली उतरले. नंतर एक तरुण पोरगी उतरली. हे काय ? ज्याची अपेक्षा केली, ते काही दिसलं नाही, ती बाई दोन्ही हातात दोन पेट्या धरून उतरत होती. डोळ्यातही अधूपणा दिसत नव्हता. जरा आधुनिक वाढल्यासारखी दिसत होती, एवढंच. चेहऱ्या–मोहऱ्यात दोष काढण्यासारखं काही दिसलं नाही. लुळी-पांगळी तर नव्हतीच मुळी. ललितेला वाटलं, अजून तारिणी उतरली नसावी; आता उतरेल. पण चौथी व्यक्ती उतरलीच नाही. ललितेनं पाहुण्यांचं स्वागत केलं. कुशल विचारून आत नेलं.

" सूर्या, ही मेमसाहेब रे कोण ? तू तर लिहिलं होतंस...?" ललितेनं विचारलं.

" हीच आमची सौभाग्यवती, आणखी कोण ? दिवाणसाहेब आदिवराहाचार्य यांची सुकन्या. तिचं नाव आहे भामा. अग, आमच्या लग्नाला चांगले दोन आठवडे होत आलेत. आम्ही मधुचंद्रासाठी इथं आलोत. " सूर्यानं ललितेच्या अर्धवट राहिलेल्या प्रश्नाचं सविस्तर उत्तर देऊन टाकलं.

सूर्या एकटा असताना ललितेची गाठ पडली तेव्हा त्यानं म्हटलं, " कदाचित तुझी निराशा झाली असेल ललिता, माझी तर तुझ्यापेक्षा अधिक निराशा झालीय्. पण आपल्या निराशेला कारणीभूत तारिणी नव्हे, राघवन् आहे बरं का ! त्याच्या स्वभावाशी परिचित असणाऱ्या सर्वांना त्यानं बुचकळ्यात टाकलं. तारिणीशीच लग्न करण्याचा त्यानं हट्ट धरला. आपण केवळ तारिणीच्या सौंदर्यावर नव्हे तर तिच्यावर लुब्ध आहोत, असं त्यानं शपथेवर सांगितलं. तारिणीनं सीतेला लग्नाचं वचन दिलंय्, या गोष्टीवर त्यानं भर दिला. तिनं दिलेला शब्द पाळला पाहिजे, असं त्याचं म्हणणं. सीतेनं त्या वचनाची आपल्यास

माहिती दिली होती, असंही त्यानं सांगितलं. तारिणीनं विरोध करून पाहिला पण त्यानं दाद दिली नाही. खरं तर, तारिणीचं राघवन्‌वर मनस्वी प्रेम आहे, असं मलाही दिसून आलं. म्हणून मी त्यांच्या मार्गातून दूर झालो. त्या दोघाचं लग्न लावून दिलं. आता राघवन्‌नं नोकरी सोडून दिली. दोघंही वासंतीला घेऊन रजनीपूरला गेलेत्. संस्थान विलीन झालं असलं तरी राणीच्या नावावर भरपूर जमीन–जुमला आहे. राणीचं तारिणीवर अपार प्रेम आहे रजनीपूरच्या राणीनं दोघांनाही रजनीपूरला येऊन राहण्याचं आणि तिथं निर्वासितांच्या पुनर्वसनाचं काम करण्याचं निमंत्रण दिलंय. तिथं जाऊन त्यांनी तेवढी जबाब–दारी उचलायची. त्यासाठी राणी आपली संपूर्ण मालमत्ता लिहून देणार. म्हणून दोघं रजनीपूरला गेलीत. "

" बरं, पण या पोरीला तू कुठं पकडलंस बाबा ? " ललितेनं विचारलं.

" ती एक गंमतच आहे. अग, आधी तर मी तिचा तिरस्कारच करीत होतो. तिच्या गुणांबद्दलचा माझा हिशोब चुकला होता. ती चूक माझ्या नजरेला आणून दिली तीही तारिणीनं. तिनं माझा गैरसमज दूर केला. तिनं तर असंही म्हटलं की तुला बघून प्रथमदर्शनीच तिचं तुझ्यावर प्रेम बसलंय्. मग तिनं भामेच्या अंतरंगाचा परिचय करून दिला. बेचाळीसच्या चळवळीच्या काळात भामेनं उघडपणे सरकारी अधिकाऱ्यांशी स्नेहसंबंध वाढवून गुप्तपणे भूमिगतांना मदत केली. बराच काळपर्यंत तारिणीला पोलिसांपासून वाचवलं. पोलिसांच्या पहाऱ्यातून सुटका करून घेण्यासाठी मला साहित्य पुरवणारी हीच. या सर्वांवर ताण म्हणजे, ही सर्वांच्या आधी पंजाबात गेली अन् सीतेला इकडे आणण्याच्या प्रयत्नाला लागली. या साऱ्या गोष्टी ऐकल्यावर माझे विचार पार बदलून गेले. पुढं तिच्याशी चर्चा केली तेव्हा दिसलं की, हिच्या माझ्या विचारात खूपच साम्य आहे. हिच्या बाह्यरूपावरून अनुमान काढू नकोस. आपल्या वहिनीशी सख्य करून तिचे गुणावगुण कळल्यावर काय ते बोल ! " सूर्यानं म्हटलं.

श्यामसुंदर पाटीलकीच्या कामासाठी बाहेर गेला होता. घरी परतल्यावर भाऊ-भावजयीला आलेले पाहून त्याच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यानं विचारलं, " दादा, रिटर्न तिकीट ' घेऊन आलास का काही दिवस इथं थांबा-यचा विचार आहे ? "

" जोपर्यंत तू आम्हाला हात धरून काढून देत नाहीस तोपर्यंत आम्ही इथं राहणार. अरे बाबा, देश आता स्वतंत्र झालाय्. देशापुढं आर्थिक विकास अन्

अधिक धान्योत्पादन हे दोन महत्त्वाचे प्रश्न उभे आहेत. तेव्हा आता आपलं कार्य इथंच सुरू करावं म्हणतो. त्यासाठी कुळांना प्रोत्साहन द्यायचं... "

" आता या भागात शेतकरी कुळांचा त्रास उरला नाही. त्यांची चळवळ चालवणारा पुढारी ' कृषक-संघा'चे पाच हजार रुपये खाऊन परागंदा झालाय. तेव्हापासून ती चळवळ थांबली. आता तू पुन्हा सुरू करशील तर कदाचित् जोर धरील. "

" कृषकांची चळवळ थांबली म्हणून आनंदित होण्याचं कारण नाही. शंडू कुळांना उत्साह वाटला पाहिजे. त्यांचं समाधान झालं पाहिजे. आपल्या मेहनतीचा योग्य मोबदला पदरात पडतो असं त्यांना वाटायला हवं. नाहीतर आज न उद्या, संघर्ष नि क्रांती डोकं वर उचलतील. मी शेतीत काही नवीन प्रयोग करून हा व्यवसाय लाभदायक असल्याचं दाखवून देणार आहे. माझ्या या कार्यात भामासुद्धा हातभार लावील. तुझं काय म्हणणं आहे शंडू ? "

" माझं काहीच म्हणणं नाही. दादा, तुम्ही आपली सर्व जमीन कुळांना वाटून टाकलीत तरी मला ते मान्य होईल. तुम्ही इकडे-तिकडे भटकायचं सोडून या गावात राहू लागलात तरी माझ्या दृष्टीनं पुरेसं आहे. दुसरा एखादा व्यवसाय करून मी आपला उदरनिर्वाह करून घेईन. " शंडूनं म्हटलं.

" अरे, कुणी सांगावं, असेही दिवस येतील जेव्हा सर्व जमीन शेतकऱ्यांत वाटली जाईल, त्यासाठी आपण तयारी ठेवलीच पाहिजे. दुसरे व्यवसाय करून जगण्याचे मार्ग शोधायलाच हवेत. " सूर्यानं म्हटलं.

एवढ्यात त्यांची आई सरस्वती अम्मा तिथं येऊन म्हणाली, " जोवर मी अखेरचे डोळे मिटत नाही तोवर धीर धरा. मग काय हवं ते करा ! "

" आम्ही खूप धीर धरू ग आई पण भूकंप, ज्वालामुखी, प्रलय, हे का कुणासाठी थांबणार आहेत ? "

" अरे हो ! भूकंप नि प्रलय हे शब्द ऐकून मला सीतेचं स्मरण झालं बघ ! सीता अन् तिची आई नेहमी म्हणायच्या, आमच्या कानात लाटांचा आवाज घुमत असतो. हा निव्वळ भ्रम असेल का ? का त्यांच्या कानातच काही दोष असेल ? " ललितेनं विचारलं.

" त्यांना होणारा भास होता, की त्यांच्या कानातच काही दोष होता, हे काही मला माहीत नाही. तसंच मला हे पण सांगता येणार नाही, की

एखाद्या दवी शक्तीच्या पुण्याईनं भविष्यात ओढवणाऱ्या संकटांची त्यांना पूर्व-सूचना मिळत होती की काय ? पंजाबातून जीव वाचवून येत असताना आम्ही जेव्हा नदीत बुडालो तेव्हा सीतेची श्रवणशक्ती नष्ट होऊन ती बहिरी झाली. मात्र तिच्या कानात सतत लाटांचा आवाज घुमायचा. पण गांधीजींचा दहन संस्कार झाला त्या दिवशी तिला पुन्हा ऐकू येऊ लागलं. तिच्या कानांनी प्रथम ऐकलं ते महात्माजींचे अत्यंत आवडतं भजन

'हरी ! तुम हरो जन की पीर ! "

मला तर शुभाची सूचना वाटते. महात्माजींच्या महान त्यागामुळे आता या विशाल देशावर कोणतंच संकट येणार नाही. आपला देश प्रगतीच्या मार्गावर पुढं जात राहील ! " सूर्यानं म्हटलं.